# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक :—२७ जानेवारी, २००५

## दिनांक २७/०१/२००५ रोजी घेण्यात आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरुवार दिनांक २७/०१/२००५ रोजी सायंकाळी ४. ३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात आयोजित करण्यात आली होती सदर सभेस खालील दर्शविलेले सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या

०१) श्री वनवारी किशोर नारायणदास
०२) श्री एडके गणपत गोविंद
०३) श्री गायकवाड सुरेश नामदेव
०४) श्रीमती जावळे संगिता रमेश
०५) श्री संजय बठिजा
०६) श्रीमती वनवारी मोना अशोक
०७) श्री. उमाप रामदास राघोजी
०८) श्री ठाकुर नरेंद्र केवलराम (कुमारी)
०९) श्रीमती छाब्रिया भारती पहलाज
१०) श्री जेसवानी सतरामदास फतनदास
११) श्री पंजाबी नारायण सन्मुखदास
१२) श्रीमती बामणकर नंदिनी गजानन

तर,

०१) मा. सभापती , श्रीमती कलानी ज्योती सुरेश ( पप्पु ), २) श्री. बेहरानी मोहन, ०३) श्री. साधवानी माहेन रहंदोमल, ०४) श्री. सोनवणे नथु काशिराम हे सभेस अनुपस्थित होते.

सायंकाळी ४. ५० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यात आले.

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— आज मा. सभापती महोदया या अनुपस्थित असल्याने सभेचे कामकाज चालविणेसाठी आपल्यापैकी एका सदस्याची सर्वानुमते अथवा बहुमताने पीठासीन अधिकारी म्हणुन निवड करावी लागेल.

मा. सदस्य श्री नरेंद्रकुमार ठाकुर :— श्री किशोर वनवारी यांचे नांव पीठासीन अधिकारी म्हणुन आम्ही सुचवित आहोत.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :— आमचे त्यांच्या नांवाला अनुमोदन आहे.

यावेळी श्री किशोर वनवारी हे पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :—</u> सभेला सुरुवात करण्यापुर्वी मी सांगु इच्छितो की, दोन दिवसांपूर्वी वाई—सातारा येथील मांढरदेव येथे जत्रेमध्ये मोठी दुर्घटना होवुन बरेच भावीक मृत्युमुखी पडलेले आहेत. सदर ठिकाणी त्या दिवशी जत्रेला मी सुध्दा गेलो होतो, मी जवळुन हा अपघात पाहिलेला आहे. तरी कृपया तेथे मृत्युमुखी पडलेल्यांना श्रध्दांजली अर्पण करावी, अशी मी विनंती करतो.

यावेळी सभागृहात उपस्थित असलेल्या सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पित केली.

<u>मा. सचिव :—</u> आपल्या महापालिकेत श्री संदिप आरोटे यांनी उपायुक्त पदाचा कार्यभार स्विकारलेला आहे, ते त्यांची ओळख सर्वांना करुन देतील.

<u>मा.पीठासीन अधिकारी :—</u> आरोटे साहेबांना सर्व ओळखतात, त्यांनी ओळख करुन देण्याची आवश्यकता नाही.

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

विषय:— मागील सभेचे दिनांक २४/१२/२००४ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

<u>मा. सदस्या श्रीमती नंदिनी बामणकर :—</u> आतापर्यंत कर निर्लेखित करण्यासाठी किती अर्ज प्राप्त झालेले आहेत.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री.आर.के.सोनवणे) :—</u> माझ्या माहितीप्रमाणे जवळपास ९७०० एवढे अर्ज प्राप्त झालेले असुन त्यापैकी सुमारे ५५० अर्जावर निर्णय झालेला आहे.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :—</u> सभापती महोदय, मागील बैठकीत हा विषय आला होता, त्यावेळी यावर चर्चा करता आला नाही कारण यादीमध्ये कोणाचे नांव आहे हे कोणालाच माहिती नव्हते. कोणालाही यादी प्राप्त झाली नव्हती त्यामुळे चर्चा करता आली नाही. बैठक झाल्यानंतर उशिरा यादी प्राप्त झाली. हे चुकीचे आहे. यामुळे आम्हाला यादीवर अभ्यास करुन चर्चा करता येत नाही. आमच्या प्रभागातील फक्त ५—७ व्यक्तींचे नांव त्यामध्ये होते, आमच्या प्रभागातील कामे होतच नाहीत. त्यामुळे यापुढे आधी यादी देवुन त्यानंतरच विषय येथे चर्चेला आणला जावा.

<u>मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :—</u> पुढच्या वेळी आधी यादी द्या त्यानंतरच विषय येथे आणा.

<u>मा. पीठासीन अधिकारी :—</u> मागील बैठकीत सर्वांना यादी मिळाली होती. मी तर त्याच दिवशी यादी घेवुन गेलो होतो. त्यामुळे असे म्हणणे चुकीचे आहे. या वेळी आम्ही बैठकीत हा विषय ठेवला नाही कारण आम्हाला प्रशासनाकडुन गोषवारा प्राप्त झाला नाही. मी आयुक्तांच्या निदर्शनास आणु इच्छितो की, ब—याच व्यक्तिंनी करमाफीसाठी महापालिकेत अर्ज केले आहेत तरी देखिल त्यांना थकबाकी व चालु मागणीचे देयक पाठविण्यात आलेले आहे. मी विनंती करेन की करमाफीसाठी अर्ज केलेल्या मालमत्ताधारकांना फक्त चालु वर्षाचेच देयक पाठविण्यात यावे. ज्यांच्या अर्जावर अद्याप निर्णय झाला नाही त्यांच्याकडुन फक्त चालु मागणीचे देयक स्विकारण्यात यावे व निर्णय झाल्यानंतर थकबाकीवर विचार करण्यात यावा.

मा. प्रभारी आयुक्त :— ज्या कोणी करमाफीसाठी अर्ज केला असेल त्यांना फक्त या वर्षाचे देयक व थकबाकीपैकी शिक्षण उपकर वसुल करण्यात येईल. तो त्यांना भरावाच लागेल.

मा. पीठासीन अधिकारी :— आपण कृपया त्यांना तसा आदेश द्यावा.

मा. प्रभारी आयुक्त :— आम्ही अधिका—यांना तसा आदेश देवु.

मा. पीठासीन अधिकारी :— आयुक्त साहेब ९००० नाही तर सुमारे २० ते २५ हजार अर्ज प्राप्त झालेले आहेत. आता सध्या कर्मचारीवर्ग कामात व्यस्त असल्याने अर्जांवर निर्णय होवु शकलेला नाही. त्यामुळे बरेचसे अर्ज प्रलंबित आहे. आम्ही या योजनेची मुदत देखिल वाढविण्याचा विचार करीत आहोत. येत्या अर्थसंकल्पात देखिल तशी तरतुद करण्यात येईल.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :— आयुक्त साहेब आमची कर विभागाबद्दल तक्रार आहे. मागील वर्षी ब—याच व्यक्तिंचे कर देयकात चुकीची दुरुस्ती करण्यात आली होती परंतु या वर्षी देयके पाठविताना पुन्हा तशीच पाठविण्यात आलेली आहेत. काही लोकांना अद्याप देयकही प्राप्त झालेले नाही. कर विभागात सावळागोंधळ आहे. त्यामुळे लोक आमच्याकडे तक्रार घेवुन येत आहेत. कृपया चुकांची दुरुस्ती करुन त्यानंतरच देयक पाठवा.

मा. प्रभारी आयुक्त :— १२५००० देयके द्यायची होती. त्यातील १ लाख देयके आम्ही यु.पी.सी ने पाठविलेली आहेत. माझ्याकडे अशी तक्रार आली की, बरीचशी देयके ही एका राजकीय पक्षाच्या कार्यालयात पडुन आहेत, यानंतरच आम्ही त्वरित पोस्ट मास्तरांकडे याची तक्रार देखिल केलेली आहे. या नंतरही आमचे कर्मचारी घरोघरी जावुन देयके देत आहेत. त्यामुळे कोणाची तक्रार येणार नाही.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :— आयुक्त साहेब मी एक सुचना करु इच्छितो, आपण देयके पोस्टाने पाठवितो, त्याचा खर्च बराच येतो. त्यापेक्षा या कामासाठी आपण तात्पुरत्या स्वरुपात कर्मचारी नियुक्त करुन त्यांना एका देयकासाठी एक रुपया दिला तर ते दिवसाला सुमारे १००—१५० देयके वाटु शकतात. यामुळे खर्च देखील कमी होईल व सर्वांना देयकेही मिळतील.

मा. प्रभारी आयुक्त :— कोणतेही देयक हे यु.पी.सी व आर.पी.ए.डी नेच पाठविण्यात यावे अशी कायद्यात तरतुद आहे. ते तसे पाठविले तर ते संबधिताला मिळाले असेच ग्राहय धरण्यात येते. जर आपण माणसे नेमली व त्यांनी बिले व्यवस्थित वाटली नाहीत तर त्याने आपल्यालाच त्रास होईल. काही वेळेला घरात कोणी नसते अशा वेळी तात्पुरता कर्मचारी बिल तेथे फक्त टाकुन येईल व आपल्याला बिल दीले असा अहवाल देईल त्यामुळे पुन्हा तक्रारी येतील. पोस्टाने पाठविलेले देयके वैध असतील.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :— आयुक्त साहेब झोपडपट्टयांमध्ये बिले मिळत नाहीत.

मा. पीठासीन अधिकारी :— बिल मिळाले नाही तर आपले कर्मचारी त्यांच्या घरी जावुन बिलाची नक्कल देतात.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :— यामुळे वसुली कमी होते.

मा. प्रभारी आयुक्त :— असे होणार नाही.

<u>मा. पीठासीन अधिकारी :—</u> मागील सभेचे दिनांक २४/१२/२००४ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करीत आहे.

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र.२ :—</u> राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत उल्हासनगर—१, भिमनगर कॉलनी, बॅरेक क्र. ३९, येथे जलवाहिनी टाकणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :—</u> आज जलवाहिन्यांचे बरेच विषय आहेत. आपण २०००—०१ व २००४—०५ ची दरसुची बघितली तर दर जास्त आहेत. तर हे २ टक्के जास्त का आहेत याचा खुलासा द्यावा.

<u>मा. प्रभारी आयुक्त :—</u> आपणा सर्वांना माहिती असेलच की सध्या बाजारात स्टीलचे भाव बरेच वाढलेले आहेत. त्यामुळे पाणी पुरवठा विभागातील सर्वच निविदांचे दर हे जास्त येत आहेत. उमाप साहेब तुमचाही फॅब्रिकेशनचा धंदा आहे त्यामुळे माझ्यापेक्षा तुम्हाला याची माहिती जास्त आहे

<u>मा. सदस्या श्रीमती नंदिनी बामणकर :—</u> आयुक्त साहेब हे सर्व विषय बघितले तर दिसुन येईल की कल्पतरु हाच ठेकेदार आहे. हा ठेकेदार फक्त कामे घेतो व नंतर ती चालु करीत नाही. तर तुम्ही त्याला काम लवकर चालु करायला सांगा.

<u>मा. प्रभारी आयुक्त :—</u> मी त्यांना तसे सांगतो.

<u>काही सदस्य :</u> पास, पास.........

<u>मा. पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना:—</u>

<u>विषय क्र.२ :—</u> राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत उल्हासनगर—१, भिमनगर कॉलनी, बॅरेक क्र. ३९, येथे जलवाहिनी टाकणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उपरोक्त विषयांकित कामाकरिता रू. ६२३८५०/— खर्चाच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे. सदर कामासाठी मागविण्यात आलेली निविदा दर इ. बाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

या कामासाठी यापूर्वी तीन वेळा निविदा मागविण्यात आल्या होत्या. पहिल्यांदा मागविलेल्या निविदेत योग्य कागदपत्रे नसल्याने निविदा उघडण्यात आली नाही. दुस—यांदा व तिस—यांदा निविदेस योग्य प्रतिसाद न मिळाल्याने निविदा चौथ्यांदा मागविण्यांल आली. या कामासाठी एकच निविदा प्राप्त झाली. ती दि. २४.५.०४ रोजी उघडण्यात आली. सदर निविदाधारक मेसर्स कल्पतरू इंजिनिअर्स यांची अंदाजपत्रकीय प्राकलनाच्या किंमतीपेक्षा १४.८ टक्के जादा नमुद केले आहेत. सदर निविदाधारकांस वाटाघाटीसाठी दि. २४.८.०४ रोजी बोलविण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी २. ३८ टक्के दर कमी करण्यास लेखी संमती दिली आहे. म्हणजेच निविदादराच्या १२. ४२ टक्के (रू. ७०१३३२/—) जादा दराने काम करण्यात तयार आहेत.

सदर प्राकलन सन २०००–०१ च्या दरसूचीवर आधारित असुन प्राप्त दरांची २००४–०५ च्या दरसूचीशी तूलना करता २ टक्के जास्त आहेत. त्यामुळे सदर दर स्विकृत करण्यात आले आहेत.

सबब सदर प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अंतर्गत आयुक्तांनी मान्य केला असुन मा. स्थायी समितीपुढे माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १३६ दिनांक:– २७.१.२००५

सुचकाचे नाव :– श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती संगिता जावळे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत उल्हासनगर–१, भिमनगर कॉलनी, बॅरेक क्र. ३९, येथे जलवाहिनी टाकणेकामी प्रशासनाने मे. कल्पतरु इंजिनिअर्स यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :– विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

विषय क्र.३ :– राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत उल्हासनगर–३ सुभाष नगर, (पंजाबी कॉलनी) येथे जलवाहिनी टाकणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

काही सदस्य : पास, पास..........

मा. पीठासीन अधिकारी :– सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:–

विषय क्र.३ :– राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत उल्हासनगर–३ सुभाष नगर, (पंजाबी कॉलनी) येथे जलवाहिनी टाकणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उपरोक्त विषयांकित कामाकरिता रू ५३३११५/— खर्चाच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे. सदर कामासाठी मागविण्यात आलेली निविदा दर इ.बाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

या कामासाठी यापूर्वी चार वेळा निविदा मागविण्यात आल्या होत्या. पहिल्यांदा निविदा अवाजवी दराने प्राप्त झाली त्यामुळे फेरनिविदा मागविण्यात आली. दुस—यांदा, तिस—यांदा व चौथ्यांदा निविदेच योग्य प्रतिसाद मिळाला नाही. म्हणुन पाचव्या वेळेच निविदा मागवली व ती दि. ०२.०७.०४ रोजी उघडण्यात आली.

मेसर्स कल्पतरू इंजिनिअर्स यांची अंदाजपत्रकिय प्राकलनाच्या किंमतीपेक्षा २० % जादा दराने निविदा प्राप्त झाली आहे.

सदर कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदेतील दर जास्त असल्याने त्यांना वाटाघाटीसाठी दि. ०३.०८.०४ रोजी वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी भरलेल्या दरापेक्षा ५.७ % दर कमी करण्याची लेखी संमती दिले म्हणजेच १४.३% (रू. ६०९३५०/— ) जादा दराने काम करण्यास तयार आहेत. हे प्राप्त दर चालू वर्षाच्या (सन २००४—०५) या दरसूचीशी तूलना करता ४.०३% जादा आहेत. त्यामुळे सदर दर स्विकृत करण्यात आले आहेत.

सबब सदर प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ७३(ड) अंतर्गत आयुक्तांनी मान्य केला असून मा. स्थायी समितीपुढे माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १३७ — दिनांक:— २७.१.२००५

सुचकाचे नाव :— श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती संगिता जावळे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत उल्हासनगर—३ सुभाष नगर, (पंजाबी कॉलनी) येथे जलवाहिनी टाकणेकामी प्रशासनाने मे. कल्पतरु इंजिनिअर्स यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

विषय क्र.४ :— राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत उल्हासनगर—३, सरस्वती नगर, पवई चौक जवळ जलवाहिनी टाकणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

काही सदस्य : पास, पास..........

मा. पीठासीन अधिकारी :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:—

विषय क्र.४ :— राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत उल्हासनगर—३, सरस्वती नगर, पवई चौक जवळ जलवाहिनी टाकणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उपरोक्त विषयांकित कामाकरिता रू २००४४१/— खर्चाच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे. सदर कामासाठी मागविण्यात आलेली निविदा दर इ.बाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

या कामासाठी यापूर्वी निविदा मागविण्यात आली होती. त्यास प्रतिसाद न मिळाल्याने दूस—यांदा निविदा मागविण्यात आली. दूस—यांदा निविदा मागविण्यात आली असता एकच निविदा प्राप्त झाली.ती दि. २४.५.०४ रोजी उघडण्यात आली. सदर निविदाधारक मेसर्स कल्पतरू इंजिनिअर्स यांची अंदाजपत्रकीय प्राकलनाच्या किमतीपेक्षा १४.८ % जादा नमूद केले आहेत. सदर निविदाधारकांस वाटाघाटीसाठी दि. २४.८.०४ रोजी बोलविण्यात आले हाते. त्यावेळी त्यांनी ४.१६ % दर कमी करण्यास लेखी संमती दिली आहे. म्हणजेच निविदा दराच्या १०.६४ % (रू २२१७६८/—) जादा दराने काम करण्यास तयार आहेत.

सदर प्राकलन सन २०००—०१च्या दरसूचीवर आधारित असून प्राप्त दरांची २००४—०५च्या दरसूचीशी तूलना करता २ % जास्त आहेत. त्यामुळे सदर दर स्विकृत करण्यात आले आहेत.

सबब सदर प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ७३(ड) अंतर्गत आयुक्तांनी मान्य केला असून मा. स्थायी समितीपुढे माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १३८ — दिनांक:— २७.१.२००५

सुचकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती संगिता जावळे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत उल्हासनगर—३, सरस्वती नगर, पवई चौक जवळ जलवाहिनी टाकणेकामी प्रशासनाने मे. कल्पतरु इंजिनिअर्स यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :—** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

**विषय क्र.५ :—** राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत उल्हासनगर—३, विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन जवळील झोपडपट्टीत येथे जलवाहिनी टाकणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

**काही सदस्य :** पास, पास..........

**मा. पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

**प्रस्तावना:—**

**विषय क्र.५ :—** राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत उल्हासनगर—३, विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन जवळील झोपडपट्टीत येथे जलवाहिनी टाकणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उपरोक्त विषयांकित कामाकरिता रू ७३४२५३/— खर्चाच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे. सदर कामासाठी मागविण्यात आलेली निविदा दर इ.बाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

या कामासाठी यापूर्वी तीन वेळा निविदा मागविण्यात आल्या होत्या.पहिल्यांदा मागविलेल्या निविदेत योग्य कागदपत्रे नसल्याने निविदा उघडण्यात आली नाही. दूस—यांदा व तिस—यांदा निविदेतय योग्य प्रतिसादर न मिळाल्याने चौथ्यांदा निविदा मागविण्यात आली असता एकच निविदा प्राप्त झाली.ती दि. २४.५.०४ रोजी उघडण्यात आली. सदर निविदाधारक मेसर्स कल्पतरू इंजिनिअर्स यांची अंदाजपत्रकीय प्राकलनाच्या किमतीपेक्षा १४.८ % जादा नमूद केले आहेत. सदर निविदाधारकांस वाटाघाटीसाठी दि.२४.८.०४ रोजी बोलविण्यात आले हाते.त्यावेळी त्यांनी ५.२८ % दर कमी करण्यास लेखी संमती दिली आहे. म्हणजेच निविदा दराच्या ९.५२ % (रू ८०४१५४/— जादा दराने काम करण्यास तयार आहेत.

सदर प्राकलन सन २०००—०१च्या दरसूचीवर आधारित असून प्राप्त दरांची २००४—०५च्या दरसूचीशी तूलना करता २ % जास्त आहेत.  त्यामुळे सदर दर स्विकृत करण्यात आले आहेत.

सबब सदर प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ७३(ड) अंतर्गत आयुक्तांनी मान्य केला असून मा. स्थायी समितीपुढे माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. १३९** **दिनांक:— २७.१.२००५**

सुचकाचे नाव :— श्री. एडके गणपत

अनुमोदकाचे नाव :— श्री. उमाप रामदास

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत उल्हासनगर–३, विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन जवळील झोपडपट्टीत येथे जलवाहिनी टाकणेकामी प्रशासनाने मे. कल्पतरु इंजिनिअर्स यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :– विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

विषय क्र.६ :– विशेष स्थानिक विकास निधी अंतर्गत उल्हासनगर–५, ओ.टी ते झुलेलाल टॉवर येथे जलवाहिनी टाकणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

काही सदस्य : पास, पास..........

मा. पीठासीन अधिकारी :– सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:–

विषय क्र.६ :– विशेष स्थानिक विकास निधी अंतर्गत उल्हासनगर–५, ओ.टी ते झुलेलाल टॉवर येथे जलवाहिनी टाकणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उपरोक्त विषयांकित कामाकरिता रू ४०००००/– खर्चाच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे. सदर कामासाठी मागविण्यात आलेली निविदा दर इ.बाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

या कामासाठी यापूर्वी दोन वेळा निविदा मागविण्यात आल्या होत्या.पहिल्यांदा निविदा अवाजवी दराने प्राप्त झाली. दुस–यांदा निविदेस योग्य प्रतिसाद मिळाला नाही. म्हणून तिस–या वेळेस निविदा मागवली व ती दि. २.७.०४ रोजी उघडण्यात आली.

मेसर्स कल्पतरू इंजिनिअर्स यांची अंदाजपत्रकीय प्राकलनाच्या किंमतीपेक्षा २० टक्के जादा दराने निविदा प्राप्त झाली आहे.

सदर कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदेतील दर जास्त असल्याने त्यांना वाटाघाटीसाठी दि.३.८.०४ रोजी बोलविण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी भरलेल्या दरापेक्षा ८ टक्के दर कमी करण्याची लेखी संमती दिली. म्हणजेच १२ टक्के जादा दराने काम करण्यास तयार आहेत. हे दर देखील अवाजवी असल्याने त्यांना फेरवाटाघाटीसाठी दि. २४.८.०४ रोजी बोलविण्यात आले. त्यावेळी त्यांनी २० टक्के ऐवजी १०.४२ टक्के दर कमी करण्याची संमती दर्शविली. म्हणजेच

निविदेतील दरापेक्षा ९. ५८ टक्के (रू. ४३८३२०/–) काम करण्यास तयार आहेत. हे प्राप्त दर चालु वर्षाच्या (सन २००४–०५) या दरसूचीशी तूलना करता २ टक्के जादा आहेत. त्यामुळे सदर दर स्विकृत करण्यात आले आहेत.

सबब सदर प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ७३(ड) अंतर्गत आयुक्तांनी मान्य केला असून मा. स्थायी समितीपुढे माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १४० दिनांक:– २७.१.२००५

सुचकाचे नाव :–श्री. संजय बठिजा

अनुमोदकाचे नाव :– श्री. उमाप रामदास

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार विशेष स्थानिक विकास निधी अंतर्गत उल्हासनगर–५, ओ.टी ते झुलेलाल टॉवर येथे जलवाहिनी टाकणेकामी प्रशासनाने मे. कल्पतरु इंजिनिअर्स यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :– विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

विषय क्र.७ :– विशेष स्थानिक विकास निधी अंतर्गत उल्हासनगर–५, गागन सायकल ते कच्छी पाडापर्यंत जलवाहिनी टाकणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

काही सदस्य : पास, पास..........

मा. पीठासीन अधिकारी :– सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:–

विषय क्र.७ :– विशेष स्थानिक विकास निधी अंतर्गत उल्हासनगर–५, गागन सायकल ते कच्छी पाडापर्यंत जलवाहिनी टाकणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उपरोक्त विषयांकित कामाकरिता रू ३१५०००/– खर्चाच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे. सदर कामासाठी मागविण्यात आलेली निविदा दर इ.बाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

या कामासाठी यापूर्वी दोन वेळा निविदा मागविण्यात आल्या होत्या.पहिल्यांदा मागविलेल्या निविदेत अवाजवी दर असल्याने निविदा रद्द करण्यात आली. व दुस–यांदा निविदेस योग्य प्रतिसाद न मिळाल्याने निविदा तिस–यांदा मागविण्यात आली. या कामासाठी एकच निविदा प्राप्त झाली. ती दि. २.७.०४ रोजी उघडण्यात आली.

मेसर्स कल्पतरू इंजिनिअर्स यांची अंदाजपत्रकिय प्राकलनाच्या किंमतीपेखा २० टक्के जादा दराने निविदा प्राप्त झाली आहे.

सदर कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदेतील दर जास्त असल्याने त्यांना वाटाघाटीसाठी दि.३.८.०४ रोजी बोलविण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी भरलेल्या दरापेक्षा ७ टक्के दर कमी करण्याची लेखी संमती दिली. म्हणजेच १३ टक्के जादा दराने काम करण्यास तयार आहेत. हे दर देखील अवाजवी असल्याने त्यांना फेरवाटाघाटीसाठी दि. २४.८.०४ रोजी बोलविण्यात आले. त्यावेळी त्यांनी २० टक्के ऐवजी ९.८३ टक्के दर कमी करण्याची संमती दर्शविली. म्हणजेच निविदेतील दरापेक्षा १०. १७ टक्के (रू. ३४७०३५/–) काम करण्यास तयार आहेत. हे प्राप्त दर चालु वर्षाच्या (सन २००४–०५) या दरसूचीशी तूलना करता २ टक्के जादा आहेत. त्यामुळे सदर दर स्विकृत करण्यात आले आहेत.

सबब सदर प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ७३(ड) अंतर्गत आयुक्तांनी मान्य केला असून मा. स्थायी समिती पुढे माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. </u> १४१          <u>दिनांक:– २७.१.२००५</u>

सुचकाचे नाव :– श्री. सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार विशेष स्थानिक विकास निधी अंतर्गत उल्हासनगर–५, गागन सायकल ते कच्छी पाडापर्यंत जलवाहिनी टाकणेकामी प्रशासनाने मे. कल्पतरु इंजिनिअर्स यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची <u>सही/–</u>

अनुमोदकाची <u>सही/–</u>

<u>सर्वानुमते</u>

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>**मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :–**</u> विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र.८ :–</u> विशेष स्थानिक विकास निधी अंतर्गत उल्हासनगर–५, कुळदेवी मंदिर ते भाटीया रस्त्यापर्यंत जलवाहिनी टाकणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

काही सदस्य : पास, पास..........

मा. पीठासीन अधिकारी :– सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:–

विषय क्र.८ :– विशेष स्थानिक विकास निधी अंतर्गत उल्हासनगर–५, कुळदेवी मंदिर ते भाटीया रस्त्यापर्यंत जलवाहिनी टाकणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उपरोक्त विषयांकित कामाकरिता रू ७५९५७०/– खर्चाच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे. सदर कामासाठी मागविण्यात आलेली निविदा दर इ.बाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

या कामासाठी यापूर्वी तीन वेळा निविदा मागविण्यात आल्या होत्या. पहिल्यांदा व दूस–यांदा निविदा अवाजवी दराने प्राप्त झाली त्यामुळे फेरनिविदा मागविण्यात आली. तिस–यांदा योग्य प्रतिसाद मिळाला नाही. म्हणून चौथ्या वेळेस निविदा मागवली .व ती दि. ०२.०७.०४ रोजी उघडण्यात आली.

मेसर्स कल्पतरू इंजिनिअर्स यांची अंदाजपत्रकिय प्राकलनाच्या किंमतीपेक्षा २० % जादा दराने निविदा प्राप्त झाली आहे.

सदर कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदेतील दर जास्त असल्याने त्यांना वाटाघाटीसाठी दि. ०३.०८.०४ रोजी बोलविण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी भरलेल्या दरापेक्षा ३ % दर कमी करण्याची लेखी संमती दिली. म्हणजेच १७% जादा दराने काम करण्यास तयार आहेत. हे दर देखील अवाजवी असल्याने त्यांना फेरवाटाघाटीसाठी दि. २४.८.०४ रोजी बालविण्यात आले. त्यावेळी त्यांनी २०% ऐवजी ६.०२% दर कमी करण्याची संमती दर्शविली. म्हणजेच निविदेतील दरापेक्षा १३.९८% (रू ८६५७६०/–)काम करण्यास तयार आहेत. हे प्राप्त दर चालू वर्षाच्या (सन २००४–०५) या दरसूचीशी तूलना करता २ % जादा आहेत. त्यामुळे सदर दर स्विकृत करण्यात आले आहेत.

सबब सदर प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ७३(ड) अंतर्गत आयुक्तांनी मान्य केला असून मा. स्थायी समितीपुढे माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १४२ | दिनांक:– २७.१.२००५

सुचकाचे नाव :– श्री. सतरामदास जेसवानी
अनुमोदकाचे नाव :– श्रीमती नंदीनी बामणकर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार विशेष स्थानिक विकास निधी अंतर्गत उल्हासनगर–५, कुळदेवी मंदिर ते भाटीया रस्त्यापर्यंत जलवाहिनी टाकणेकामी प्रशासनाने मे. कल्पतरु इंजिनिअर्स यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :– विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.

**विषय क्र.९ :—** उल्हासनगर—५, गायकवाड पाडा येथे जलवाहिनी टाकणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

**काही सदस्य :** पास, पास..........

**मा. पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

**प्रस्तावना:—**

**विषय क्र.९ :—** उल्हासनगर—५, गायकवाड पाडा येथे जलवाहिनी टाकणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उपरोक्त विषयांकित कामाकरिता रू ६९६३००/— खर्चाच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे. सदर कामासाठी मागविण्यात आलेली निविदा दर इ.बाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

या कामासाठी यापूर्वी चार वेळा निविदा मागविण्यात आल्या होत्या. पहिल्यांदा निविदा अवाजवी दराने प्राप्त झाली त्यामुळे फेरनिविदा मागविण्यात आली. दूस—यांदा,तिस—यांदा व चौथ्यांदा निविदेस योग्य प्रतिसाद मिळाला नाही. म्हणून पाचव्या वेळेस निविदा मागवली .व ती दि. ०२.०७.०४ रोजी उघडण्यात आली.

मेसर्स धनंजय आर.निकम यांची अंदाजपत्रकिय प्राकलनाच्या किंमतीपेक्षा २८.३ % जादा दराने निविदा प्राप्त झाली आहे.

सदर कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदेतील दर जास्त असल्याने त्यांना वाटाघाटीसाठी दि. ०३.०८.०४ रोजी बोलविण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी भरलेल्या दरापेक्षा १५ % दर कमी करण्याची लेखी संमती दिली. म्हणजेच १३.३% जादा दराने काम करण्यास तयार आहेत. हे दर देखील अवाजवी असल्याने त्यांना फेरवाटाघाटीसाठी दि. २४.८.०४ रोजी बालविण्यात आले. त्यावेळी त्यांनी १३.३% ऐवजी ३.०२% दर कमी करण्याची संमती दर्शविली. म्हणजेच निविदेतील दरापेक्षा १०.२८% (रू ७६७८८०/—)काम करण्यास तयार आहेत. हे प्राप्त दर चालू वर्षाच्या (सन २००४—०५) या दरसूचीशी तूलना करता २ % जादा आहेत. त्यामुळे सदर दर स्विकृत करण्यात आले आहेत.

सबब सदर प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ७३(ड) अंतर्गत आयुक्तांनी मान्य केला असून मा. स्थायी समितीपुढे माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** १४३ **दिनांक:— २७.१.२००५**

सुचकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती नंदिनी बामणकर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर–५, गायकवाड पाडा येथे जलवाहिनी टाकणेकामी प्रशासनाने मे. धनंजय आर. निकम यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :– विषय क्र. १० वाचुन दाखवितात.

विषय क्र.१० :– उल्हासनगर भुयारी गटार व्यवस्था देखभाल व दुरुस्तीसाठो मजुर पुरविणेकामी प्रशासनास सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदाराशी पुर्वीच्या अटी, शर्ती व दराने दिनांक १०.११.०४ पासुन पुढील निविदा अंतिम होवून नविन ठेकेदार निश्चित होईपर्यंत निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे व अंतर्भुत खर्चास मान्यता देणे.

श्री नरेंद्रकुमार ठाकुर :– सदरचा विषय पुढे ढकलला जावा.

मा. प्रभारी आयुक्त :– का?

कार्यकारी अभियंता (पा.पु)(श्री आर.आर.सावकारे) :– काम बंद करता येणार नाही.

मा. पीठासीन अधिकारी :– आम्ही विषय नामंजुर करीत नसुन पुढे ढकलीत आहोत. अधिकारी येथे विषय आणायला उशिर करतात, ३–३ महिने मुदतवाढ देतात, मग विषय पुढे ढकलले तर काय झाले.

काही सदस्य :– विषय वगळा.

मा. पीठासीन अधिकारी : सदरचा विषय सर्वानुमते कार्यसुचीवरुन वगळण्यात येत आहे.

(विषय क्र.१० :– उल्हासनगर भुयारी गटार व्यवस्था देखभाल व दुरुस्तीसाठो मजुर पुरविणेकामी प्रशासनास सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदाराशी पुर्वीच्या अटी, शर्ती व दराने दिनांक १०.११.०४ पासुन पुढील निविदा अंतिम होवून नविन ठेकेदार निश्चित होईपर्यंत निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे व अंतर्भुत खर्चास मान्यता देणे.)

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. ११ वाचुन दाखवितात.

विषय क्र.११ :— उल्हासनगर—५ येथील सतनाम साखी या अनधिकृत इमारतीचे निष्कासन करतेवेळी जेसीबी मशिन, डंपर ट्रक, सुमो जीप इत्यादी वाहनांच्या वापराकामी प्रशासनाने मे. मोहिनीराज ट्रॅव्हल्स व ट्रान्सपोर्ट या न्युनतम दराच्या पुरवठादाराशी केलेल्या निविदेशिवाय थेट संविदेस मान्यता देणे व अंतर्भुत खर्चास मान्यता देणे.

काही सदस्य : पास, पास..........

मा. पीठासीन अधिकारी :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:—

विषय क्र.११ :— उल्हासनगर—५ येथील सतनाम साखी या अनधिकृत इमारतीचे निष्कासन करतेवेळी जेसीबी मशिन, डंपर ट्रक, सुमो जीप इत्यादी वाहनांच्या वापराकामी प्रशासनाने मे. मोहिनीराज ट्रॅव्हल्स व ट्रान्सपोर्ट या न्युनतम दराच्या पुरवठादाराशी केलेल्या निविदेशिवाय थेट संविदेस मान्यता देणे व अंतर्भुत खर्चास मान्यता देणे.

उल्हासनगर—५ येथील सतनाम साक्षी या अनधिकृत इमारतीचे निष्कासन करणेकामी जेसीबी मशीन , डंपर ट्रक, सुमो जीप इत्यादी वाहने आवश्यक असल्यामुळे पुरवठादाराकडून कोटेशन मागविले ते पुढील प्रमाणे.

| अ. क्र | पुरवठादाराचे नांव | दर दिवशी ५० कि.मी. व ८तासासाठी | ५० कि. मी. नंतर जादा कि.मी. दर | ८ तासानंतर जादा तासाचा दर |
|---|---|---|---|---|
| १ | मे. मोहिनीराज ट्रव्हलर्स ॲन्ड टॉन्स. | १७५०/— | २०/— | १४०/— |
| २ | मे. राम ट्रान्सपोर्ट उल्हासनगर | १९००/— | ३०/— | २५०/— |
| ३ | मे. अनमोल ट्रान्सपोर्ट | २०००/— | २५/— | ३००/— |
| ४ | मे. आरती अर्थमोव्हर्स | १९००/— | ....... | ......... |
| ५ | मे. आरती अर्थमोव्हर्स | जेसीबी मशीन १० तासासाठी रूपये ७०००/— | | |

उपरोक्त सर्व पुरवठादार याचे दर पत्रक पाहता मे. मोहिनीराज ट्रव्हलर्स ॲन्ड ट्रान्सपोर्ट यांचेदर पत्रक सर्वात कमी असल्याने त्यांनाच दर पत्रकाबाबत समक्ष बोलणी केली असता त्यांना त्यांचे दर पत्रकातील ८ तासाऐवजी पुर्ण दिवस रू. १७००/— मध्ये काम करण्यास सांगितले असता त्यांनी तशी तयारी दाखविली तसेच ५० कि.मी. नंतर व ८ तासानंतर चे दर रद्द करण्याबाबत त्यांना सांगितले असता त्यांनी सहमती दर्शविली आहे. तसेच जेसीबी मशीन उपलब्ध असते. परंतु महापालिकेची जेसीबी मशीन ना दुरूस्त झाल्यामुळे तातडीच्या कामासाठी मे. आरती अर्थ मोव्हर्स यांच्याकडुन जेसीबी दर मागविण्यात आले होते. ते वरील प्रमाणे आहेत. मे. मोहिनीराज ट्रव्हलर्स ॲन्ड ट्रान्सपोर्ट यांच्याकडुन जेसीबी मशीन अत्यंत आवश्यक असल्यामुळे रूपये ६८००/— या दराने कुठल्याही प्रकारच्या जादा तासाचा मोबदला न देता एकुण ७ पुर्ण दिवस घेण्यात आली आहे.

जेसीबी मशीन, डंपर ट्रक, सुमो जीप इत्यादी वाहने आवश्यक असल्यामुळे पुरवठा दाराकडुन घेण्यात आली होती. त्याचा एकुण खर्च रू. २,८१,८३३/— एवढा आहे. सदर खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यतेसाठी मा. स्थायी समिती समोर सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १४४ दिनांकः— २७.१.२००५

सुचकाचे नाव :— श्री. गणपत एडके

अनुमोदकाचे नाव :— श्री. रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर—५ येथील सतनाम साखी या अनधिकृत इमारतीचे निष्कासन करतेवेळी जेसीबी मशिन, डंपर ट्रक, सुमो जीप इत्यादी वाहनांच्या वापराकामी प्रशासनाने मे. मोहिनीराज ट्रॅव्हल्स व ट्रान्सपोर्ट या न्युनतम दराच्या पुरवठादाराशी निविदेशिवाय केलेल्या थेट संविदेस कायम करीत आहे व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. १२ वाचुन दाखवितात.

विषय क्र.१२ :— श्री एस.के.शेठ यांच्या विशेष कार्यकारी अधिकारी या पदावरील वाढीव कालावधीसाठी झालेल्या नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देणे.

मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :— एक वर्षासाठी पास करा.

मा. सदस्य श्री नरेंद्रकुमार ठाकुर :— स्थायी समितीला याचे अधिकार आहेत काय?

मा. पीठासीन अधिकारी :— आता तर १५ महिने झालेले आहेत.

मा. प्रभारी आयुक्त :— येथे विषय मंजुर करुन मान्यतेसाठी महासभेसमोर ठेवा. सुरुवातीला सहा महिन्यांसाठी जी नियुक्ती देण्यात आली ती आयुक्तांच्या अधिकारात होती त्यामुळे येथे आणले नाही. मुदतवाढीसाठी येथे प्रस्ताव आणलेला आहे.

मा.पीठासीन अधिकारी :— मग आपण थेट महासभेतच प्रस्ताव पाठवायला हवा होता.आता या ठिकाणी त्यांचा जेवढा कालावधी झालेला आहे तेवढा पास करणे योग्य राहील.

मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :— आम्ही आता येथे एका वर्षासाठी प्रस्ताव पास करतो.

काही सदस्य : पास, पास..........

मा. पीठासीन अधिकारी :— श्री एस.के.सेठ यांच्या दि. २५/९/०३ पासुन झालेली नियुक्ती दिनांक २७/१/०५ पर्यंतच्या वाढीव कालावधीसह सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:—

विषय क्र.१२ :— श्री एस.के.शेठ यांच्या विशेष कार्यकारी अधिकारी या पदावरील वाढीव कालावधीसाठी झालेल्या नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देणे.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामधील होत असलेले अनधिकृत बांधकामे / अतिक्रमणे हटविणेबाबत व त्यावर आळा बसणेबाबत स्वतंत्रपणे नियंत्रण ठेवणेकामी श्री. एस. के. शेठ यांची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या नियम ५३ (१)च्या तरतुदीनुसार दि. २५.९.२००३ पासून विशेष कार्यकारी अधिकारी अतिक्रमण निर्मुलन म्हणुन दरमहा रूपये १५०००/— एवढया ठोक मानधनावर सहा महिनेसाठी प्रथम नियुक्ती केली होती. त्यांचा सहा महिनेचा कालावधी दि. ३१.३.२००४ रोजी संपुष्टात आलेला आहे.

श्री. एस. के. शेठ यांनी अतिक्रमण विभागामध्ये अत्यंत उत्कृष्टपणे व नियमाप्रमाणे काम केले आहे. तसेच, उल्हासनगर महानगरपालिकेतील अनधिकृत बांधकामाबाबत माननिय न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्याची कृती आराखडा (Action Plan) तयार करून अनधिकृत बांधकामाबाबत शिस्तबध्द् कार्यवाही केली आहे. त्यामुळे शहरातील अनधिकृत बांधकामांना मोठया प्रमाणात आळा बसला आहे. तसेच, माननीय न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे अजुनही कार्यवाही करावयाची आहे. अशा परिस्थितीत श्री. शेठ यांच्या सेवेची गरज लक्षात घेता मुंबई प्रांतिक महानगर अधिनियम १९४९ च्या नियम ५३ (३) मधील तरुदीनुसार श्री. शेठ यांची पुढील सहा महिन्यासाठी ०२ वेळा अनुक्रमे कार्यालयीन दि. ०२.४.२००४ च्या आदेशान्वये दिनांक २.४.२००४ पासुन ०६ महिन्यासाठी व दि. १.१०.२००४ च्या आदेशान्वये दि. ४.१०.२००४ पासुन ०६ महिन्यासाठी विशेष कार्यकारी अधिकारी, अतिक्रमण निर्मुलन म्हणुन नियुक्ती केलेली आहे.

माहे—एप्रिल, २००४ मधील लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकासाठी निवडणूक आयोगाने दिनांक २९.२.२००४ पासुन आचारसंहिता लागु केली होती. तसेच माहे ऑक्टोबर, २००४ मधील विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता दि. २५.१०.२००४ पर्यंत असल्याने श्री. शेठ यांचा प्रस्ताव मान्यतेसाठी स्थायी समितीकडे ठेवता आलेला नाही.

तरी श्री. शेठ यांच्या वरील वाढीव कालावधीसाठी झालेल्या नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे ठेवणेस प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १४५ दिनांक:— २७.१.२००५

सुचकाचे नाव :— श्री. सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार श्री एस.के.शेठ यांच्या महापालिका सेवेत विशेष कार्यकारी अधिकारी या पदावरील दिनांक २५/९/२००३ पासुन झालेल्या नियुक्तीस दिनांक २७/१/२००५ पर्यंत वाढीव कालावधीसह कार्योत्तर मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :– विषय क्र. १३ वाचुन दाखवितात.

विषय क्र.१३ :– मा. महापौर व मा. उपमहापौर यांच्यासाठी गोदरेज मेकची टेबल व खुर्ची पुरवठा करणे कामी प्रशासनास निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

मा. प्रभारी आयुक्त :– आम्ही हा विषय मागे घेवु इच्छितो. कारण आम्ही स्थानिक खरेदी करुन आता पुरवठा केलेला आहे. त्यामुळे आता येथे याची गरज नाही.

मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :– आयुक्त साहेब स्थायी समितीत देखिल टेबल व खुर्चीची आवश्यकता आहे.

मा. प्रभारी आयुक्त :– ठिक आहे तुम्ही पत्र द्या त्यानंतर आम्ही देतो. आता सदरचा विषय आम्ही मागे घेत आहोत.

मा. पीठासीन अधिकारी :– सदरचा प्रस्तावा प्रशासनाच्या मागणीवरुन सर्वानुमते कार्यसुचीवरुन वगळण्यात येत आहे.

**(विषय क्र.१३ :– मा. महापौर व मा. उपमहापौर यांच्यासाठी गोदरेज मेकची टेबल व खुर्ची पुरवठा करणे कामी प्रशासनास निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.)**

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :– विषय क्र. १४ वाचुन दाखवितात.

विषय क्र.१४ :– सन २००४–०५ सालासाठी श्री गणेश दर्शन प्रतियोगीता अंतर्गत विविध प्रकारचे साहित्य पुरविणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :– आता येथे मंजुर करणार त्यानंतर काय सामान घेणार ते कसे काय कळणार?

<u>मा.पीठासीन अधिकारी :—</u> हे काम यापूर्वीच झालेले आहे, फक्त माहितीसाठी आहे.

<u>काही सदस्य :</u> पास, पास..........

<u>मा. पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना:—</u>

<u>विषय क्र.१४ :—</u> सन २००४—०५ सालासाठी श्री गणेश दर्शन प्रतियोगीता अंतर्गत विविध प्रकारचे साहित्य पुरविणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

श्री. गणेश दर्शन प्रतियोगीता सन २००४—२००५ साठी मा. सभापती, क्रिडा समिती यांचे दिनांक १४.६.२००४ रोजीच्या पत्रानुसार माहे १८ सप्टेंबर, २००४ ते २७ सप्टेंबर, २००४ हया कालावधीत होणा—या गणेशोत्सव कार्यक्रमासाठी उत्कृष्ट गणेशमुर्ती, उत्कृष्ट सजावट, देखावा, चांगली साफ—सफाई असणा—या मंडळास पारितोषिके देणे बाबत. संपूर्ण साधन सामुग्री उपलब्ध करणेबाबत सुचीत केल्याने उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत क्रिडा समितीसाठी भांडार विभागाव्दारा ''श्री. गणेश दर्शन प्रतियोगिता'' साहित्य / बक्षीसे खरेदी व पुरवठा करणे बाबतची जाहिर निविदा सुचना दिनांक २५ जुलै, २००४ रोजीच्या नवभारत टाईम्स हया वर्तमानपत्रात प्रकाशित करण्यात आली त्या अनुषंगाने अनुक्रमे (१) मे. महादेव इंटरप्राईझेस (२)मे. मोहिनी इंटरप्राईझेस (३) मे. उमा इंटरप्राईजेस या निविदाकारांच्या निविदा उघडल्या असता मेसर्स माहिनी इंटरप्राईझेस यांचे बाब क्रमांक १ ते १६ बाब क्रमांक ५ वगळुन तसेच मेसर्स उमा इंटरप्राईझेस, यांचे बाब क्रमांक ५,१७, ते २२ साठी दिलेले दर न्युनतम ठरले. श्री. गणेश दर्शन प्रतियोगिता २००४ चे बाब क्रमांक १ ते २२ चे एकूण खरेदीसाठी रूपये २,४७,८५८ तसेच मुर्ती सजावट मानधन रूपये ६,०००/— असे मिळुन रूपये २,५३,८५८/— एवढा खर्च होणार असुन तो क्रिडा समितीच्या लेखा शिर्ष ४ चे (४)अन्वये आवश्यक ती वित्तिय तरतूद केलेली आहे. सदर प्रस्तावास मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, यांनी छाननी केलेली आहे.

सदर बाब स्थायी समितीपुढे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये माहितीसाठी सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १४६ <u>दिनांक:— २७.१.२००५</u>

सुचकाचे नाव :— श्री. संजय बठिजा

अनुमोदकाचे नाव :— श्री. रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार सन २००४—०५ सालासाठी श्री गणेश दर्शन प्रतियोगीता अंतर्गत विविध प्रकारचे साहित्य पुरविणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>
अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :– विषय क्र. १५ वाचुन दाखवितात.

विषय क्र.१५ :– महापालिकेतील अनावश्यक रद्दी कागदपत्रांच्या व वर्तमानपत्रांच्या विनियोगाकामी प्रशासनास उच्चतम दराच्या कंत्राटदाराशी संविदेस मान्यता देणे.

काही सदस्य : पास, पास..........

मा. पीठासीन अधिकारी :– सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:–

विषय क्र.१५ :– महापालिकेतील अनावश्यक रद्दी कागदपत्रांच्या व वर्तमानपत्रांच्या विनियोगाकामी प्रशासनास उच्चतम दराच्या कंत्राटदाराशी संविदेस मान्यता देणे.

महानगरपालिका मुख्यालयाचे जिन्यावर तसेच भांडार विभागात पडून असलेल्या अनावश्यक रद्दी कागदपत्रांची व वर्तमान पत्राच्या रद्दीची विक्री करणेसाठी पत्र क्रमांक उमपा/भांडार/विक्री/८१ दिनांक ५.११.२००४ अन्वये इच्छुक खरेदीदारांकडुन दरपत्रक मागविण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त दर खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | विक्री साहित्याचा तपशिल | अंदाजित संख्या/ वजन | खरेदीदारांचे नांव | | | एकुण रूपये |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मे. रजपुत ट्रेडर्स ॲण्ड वेस्ट पेपर मार्ट–कल्याण | रेणूका ट्रेडर्स वेस्ट पेपर मार्ट–शहापुर | अमोल पेपर मार्ट वेस्ट पेपर डिलर–कोनगांव | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | कार्यालयीन जुनी अनावश्यक कागदपत्र | १००० कि. ग्रॅम | दर ३ .०० | प्रती किलो २. ०० | २. ५० | ३००० |
| २ | जुनी वर्तमान पत्र इंग्रजी मराठी | ५. ०० कि. ग्रॅम | ३. ६० | २. २५ | २. ७० | १८०० |
| | | | | | एकुण | ४८०० |

दर पत्रकातील दरांचा तुलनात्मक दृष्टया विचार केला असता मे. राजपुत ट्रेडर्स ॲण्ड, वेस्ट पेपर मार्ट कल्याण यांचे खरेदीचे दर अधिक आहेत.

सदरच्या दराने विक्री करण्यास प्रशासनाने मान्यता दिलेली आहे. विक्री करावयाचे कागद पत्राचे वजन अंदाजित असुन त्यात घट किंवा वाढ होण्याची शक्यता आहे. तरी सदरच्या विक्रीस मंजुरी मिळणेस्तव स्थायी समितीपुढे सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १४७ दिनांक:— २७.१.२००५

सुचकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :— श्री. रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार महापालिकेतील अनावश्यक रद्दी कागदपत्रांच्या व वर्तमानपत्रांच्या विनियोगाकामी प्रशासनास उच्चतम दराचे कंत्राटदार मे. राजपुत ट्रेडर्स ॲण्ड वेस्ट पेपर मार्ट, कल्याण यांच्याशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. १६ वाचुन दाखवितात.

विषय क्र.१६ :— माहे नोव्हेंबर २००४ पर्यंतच्या महापालिका लेख्यांची छाननी व मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

काही सदस्य : पास, पास..........

मा. पीठासीन अधिकारी :— प्रशासनाने उत्पन्न वाढीसाठी विशेष लक्ष द्यावे तसेच सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:—

विषय क्र.१६ :— माहे नोव्हेंबर २००४ पर्यंतच्या महापालिका लेख्यांची छाननी व मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसार माहे नोंव्हेंबर २००४ पर्यंतच्या कालावधीचा जमा खर्चाचा अहवाल.

वित्तिय वर्ष २००४ — २००५ च्या "अ" व "क" अर्थसंकल्पात अंदाजित केलेले उत्पन्न व माहे नोंव्हेंबर २००४ पर्यत प्राप्त झालेले उत्पन्न हे पुढे दर्शविलेले आहे .

| अर्थसंकल्प | अपेक्षित जमा रुपये |
|---|---|
| १ | २ |

| | |
|---|---|
| “अ” | १३२,०६,७०,००० |
| “क” | ५३,४३,००,००० |
| एकुण | १८५,४९,७०,००० |

अपेक्षित जमेमध्ये खालील बाबी अंतर्भूत आहेत.

| अ. क्र. | बाब | अपेक्षित जमा रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | महसूल जमा | १६२,२५,१५,००० |
| २ | शासकीय अनुदान | ८,७२,००,००० |
| ३ | अनामत रकमा/दायित्वे इ. | १४,५०,५०,००० |
| | एकूण | १८५,४७,६५,००० |
| | प्रारभिंक शिल्लक | २,०५,००० |
| | एकुण :— | १८५,४९,७०,००० |

वित्तीय वर्ष २००४—२००५ च्या अर्थसंकल्पात महसूल जमा रक्कम रु. १६२,२५,१५,०००/— अपेक्षित धरलेली आहे. माहे नोंव्हेंबर २००४ पर्यंत समप्रमाणात रु. १०८,१६,७६,०००/— महसूल उत्पन्न अपेक्षित होते. प्रत्यक्षात रु.५०,६१,५०,०००/—(एकुण महसूल जमेच्या ३१.२० टक्के) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे नोंव्हेंबर २००४ पर्यंत अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा लेखा शिर्षानिहाय खालील प्रमाणे आहे.

| | लेखा शिर्ष अर्थ संकल्प “अ” | अंदाजीत | माहे नोंव्हेंबर / २००४ पर्यंत अपेक्षित | प्रत्यक्ष जमा (रु. १००० पुर्णांकात) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | जकात | ५९,२५,७५,००० | ३९,५०,५०,००० | ३९,२७,२१,००० | ९९.४१ |
| २ | मालमत्ता कर | ३४,००,१०,००० | २२,६६,७३,००० | १,५७,०७,००० | ६.९३ |
| ३ | एम आर टी पी वसुली | ५७,६०,००० | ३८,४०,००० | ११,४८,००० | २९.९० |
| ४ | मार्केट उत्पन्न | १०,००,००० | ६,६७,००० | — | — |
| ५ | रुग्णालय फी | १,५०,००० | १,००,००० | ३९,००० | ३९.०० |
| ६ | परवाना व इतर फी | ५२,८५,००० | ३५,२३,००० | १२,४३,००० | ३५.२८ |
| ७ | संकिर्ण | ७,७५,४८,००० | ५,१६,९९,००० | ६,७४,३०,००० | १३०.४३ |
| ८ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | ६,८९,३७,००० | ४,५९,५८,००० | ७,२६,००० | १.५८ |
| | एकुण — अ | १०९,१२,६५,००० | ७२,७५,१०,००० | ४७,९०,१४,००० | ६५.८४ |
| | अर्थ संकल्प “क” | | | | |
| १ | पाणी बिले वसुली | ४५,००,००,००० | ३०,००,००,००० | १,९२,१६,००० | ६.४० |
| २ | मालमत्ता कर | ७,००,१०,००० | ४६,६७,३००० | ३१,५६,००० | ६.७६ |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| ३ | परवाना/इतर फी | १,१०,७०,००० | ७३,८०,००० | २२,१२,००० | २९.९७ |
| ४ | संकिर्ण | १,७०,००० | १,१३,००० | २५,५२,००० | २२५८.४० |
| | एकूण– “क” | ५३,१२,५०,००० | ३५,४१,६६,००० | २,७१,३६,००० | ७.६६ |
| | एकूण– “अ” व “क” | १६२,२५,१५,००० | १०८,१६,७६,००० | ५०,६१,५०,००० | ४६.७९ |

“अ” व “क” अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु. १८५,४९,७०,०००/– ( प्रारंभिक शिलकेसह) अपेक्षित केलेले आहे. प्रत्यक्षात माहे नोंव्हेंबर २००४ पर्यंत रु. ५७,८२,७३,०२२/– उत्पन्न प्राप्त झाले आहे. उत्पन्नात वाढ होण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करणे आवश्यक आहे. पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पन्नाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही.

खर्च :–

माहे एप्रिल २००४ ते नोव्हेंबर २००४ या कालावधीमध्ये रु. ५६,६३,३२,१५९/– खर्च लेखांकित झालेला आहे.

खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते तसेच लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकांचे प्रदान झालेले आहे झालेला खर्च हा सक्षम प्राधिकाराच्या पुर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पिय तरतूदी अधिन आहे.

माहे नोव्हेंबर २००४ पर्यंतची जमा व खर्चाची पत्रके सोबत जोडलेली आहेत.

निवृत्तीवेतन प्रकरणे :– माहे नोंव्हेंबर २००४ पर्यंत महापालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या / निधन पावलेल्या कर्मचा–यांची ८ निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

स्थायी समिती ठराव क्र. १४८ दिनांकः– २७.१.२००५

सुचकाचे नाव :– श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :– श्री. रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे माहे नोव्हेंबर २००४ पर्यंतच्या महापालिका लेख्यांची छाननी व मुख्य लेखा परीक्षकांचा अहवाल विचारात घेऊन प्रशासनास खालील निर्देश देत आहे.

१. महापालिका उत्पन्नात वाढ होण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करावी.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :– विषय क्र. १७ वाचुन दाखवितात.

विषय क्र.१७ :— सन २००४—०५ करिता मार्गप्रकाशासाठी, उद्यानात बसविलेल्या दिवाबत्तींची व महापालिका भवनातील देखभाल व दुरुस्तीकामी लागणारे विद्युत साहित्य खरेदी करणेकामी प्रशासनास लघुत्तम दराच्या निविदाकारांशी संविदेस मान्यता देणे.

मा. पीठासीन अधिकारी :— आज आयलानी साहेब येथे नाहीत, त्यांच्या विभागाचे चार प्रस्ताव आहेत, तरी देखिल ते बैठकीसाठी आलेले नाहीत, तरी हा विषय पुढे ढकलला जावा.

मा. प्रभारी आयुक्त :— ते नसले तरी मी आहे. आयलानी साहेब आय.एस.ओ चे जे अधिकारी आलेले आहेत त्यांच्या समवेत गेले असल्याने येवु शकलेले नाहीत.

काही सदस्य :— विषय वगळा.

मा. पीठासीन अधिकारी : सदरचा विषय सर्वानुमते कार्यसुचीवरुन वगळण्यात येत आहे.

**( विषय क्र.१७ :— सन २००४—०५ करिता मार्गप्रकाशासाठी, उद्यानात बसविलेल्या दिवाबत्तींची व महापालिका भवनातील देखभाल व दुरुस्तीकामी लागणारे विद्युत साहित्य खरेदी करणेकामी प्रशासनास लघुत्तम दराच्या निविदाकारांशी संविदेस मान्यता देणे.)**

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. १८ वाचुन दाखवितात.

विषय क्र.१८ :— उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १० विविध कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :— सदरचा विषय पुढे ढकलला जावा.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :— का? याचे कारण द्या.

मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :— यामध्ये कोणत्या निधीतुन काम करणार याचा उल्लेख नाही. प्रभागाचा उल्लेख नाही सविस्तर माहिती द्यायला हवी.

मा. सदस्य श्री नरेंद्रकुमार ठाकुर :— सर्वांचे काम व्हायला हवे.

मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :— असे असेल तर पुढील वेळी आमच्या प्रभागातील काम देखिल समाविष्ट केले जावे. माझ्या प्रभागातील डांबरीकरणाचे काम आहे.

काही सदस्य :— विषय वगळा.

मा. पीठासीन अधिकारी :— सदरचा विषय सर्वानुमते कार्यसुचीवरुन वगळण्यात येत आहे.

**(विषय क्र.१८ :— उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १० विविध कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.)**

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. १९ वाचुन दाखवितात.

विषय क्र.१९ :— डंपिंग ग्राऊंडवर क—यापासुन खतनिर्मीती करणे कामी प्रशासनास निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :— आयुक्त साहेब या विषयावर थोडी माहिती द्यावी.

मा. प्रभारी आयुक्त :— सभापती महोदय, हा प्रकल्प आम्ही प्रायोगिक तत्वावर करीत आहोत. आपण डंपिंग ग्राऊंडवर जो कचरा टाकतो त्यावर प्रक्रिया करुन त्यापासुन उर्जानिर्मीती अथवा सेंद्रीय खते निर्माण करु शकतो. या आधीही आम्ही २—३ वेळा प्रयत्न केला जसे ग्रीन कोल वगैरे, परंतु त्याचे काहीच झाले नाही. ग्रीन कोलला महासभेने देखिल मान्यता दिली होती. आता ही कंपनी कच—यापासुन खतनिर्मीती करणर असुन त्या खताचा वापर शेतीसाठी करेल. यासाठी सर्व यंत्रणा त्यांची असेल आपल्याला त्यांना फक्त पाणी व परवानगी द्यायची आहे. हा प्रकल्प यशस्वी झाल्यानंतर आपणांस कांबा येथे जे डंपिंग ग्राऊंड मिळणार आहे तेथे निविदा मागवुन मोठा प्रकल्प उभारण्यात येईल. यामध्ये महापालिकेला काहीही खर्च नाही आपणांस फक्त पाणीच द्यायचे आहे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :— पाण्याचे पैसे कोण देणार.

मा.प्रभारी आयुक्त :— पाण्याचे पैसे आपण घेवु. उर्वरित खर्च तोच करेल. तो जी खतनिर्मीती करेल त्यापासुन तो पैसे मिळवु शकतो.

मा. सदस्य श्री सतरामदास जेसवानी :— हा चांगला प्रकल्प आहे, आयुक्तांना धन्यवाद देतो.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :— चांगला विषय आहे.

काही सदस्य : पास, पास..........

मा. पीठासीन अधिकारी:— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:—

विषय क्र.१९ :— डंपिंग ग्राऊंडवर क—यापासुन खतनिर्मीती करणे कामी प्रशासनास निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

Umwelt-Enviro Energy, यांचे पत्र दि. ९.९.२००४ रोजी मिळाले. सदर पत्रानुसार त्यांनी उल्हासनगर महानगरपालिकेच्या डंपिग ग्राऊंडवर कच—यापासुन खत निर्मिती करण्यासाठी परवानगी मागितलेली आहे.

सदर उपक्रम सहा महिन्याच्या प्रायोगिक तत्वावर राबविण्याची त्यांची तयारीअसुन उपक्रमासाठी येणारा खर्च ते स्वत: करणार असल्याचे पत्रात नमुद केले आहे. सदर उपक्रमासाठी आवश्यक असणारी डंपिंगग्राऊंडवर जागा, पाण्याची व्यवस्था व वीजेची व्यवस्था महापालिकेने करून दयावी. अशी विनंती त्यांनी केलेली होती. परंतु दि. ९.११.२००४ रोजी दिलेल्या पत्रानुसार या संस्थेने वीजऐवजी स्वखर्चाने जनरेटर चालविण्याचे कळविले आहे. त्यामुळे उमपाने पाणी पुरवठा केल्यास हा प्रकल्प कार्यान्वित होऊ शकतो.

सदर उपक्रम राबविल्यास कच–यापासुन खत निर्मितीच्या बाबतीत उमपातील सदर प्रकल्प एक दिशादर्शक ठरेल या प्रकल्पाच्या यशापयशावरून घनकचरा विल्हेवाटीसाठी उमपास निश्‍चित अशा स्वरूपाची दिशा मिळेल.

श्री. सेलवान , उपअभियंता शहर यांचे अहवालानुसार घनकच–यापासुन खतनिर्मितीच्या प्रकल्पास अंदाजे ४००० लीटर्स पाण्याची आवश्यकता असल्याचे संबंधित ठेकेदार यांनी कळविले आहे. प्रत्यक्ष त्याठिकाणी प्रकल्प उभारण्यात येणार आहे. प्रत्यक्ष ज्याठिकाणी प्रकल्प उभारण्यात येणार आहे त्या ठिकाणी सद्यस्थितीत महापालिकेची वितरण वाहिनी जवळपास नसल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथुन नविन ''१'' जलवाहिनी अंदाजे ६०० मीटर्स टाकण्याची आवश्यकता आहे यासाठी अंदाजे ६०,०००/– रूपये खर्च अपेक्षित आहे. वरील खर्चिक बाब लक्षात घेता सद्यस्थितीत टॅकरव्दारे दररोज लागणारे ४००० लीटर्स पाण्याचा पुरवठा करता येणे शक्य आहे.

Umwelt-Enviro Energy, या संस्थेस प्रयोगित तत्वावर, सदर संस्थेच्या खर्चाने प्रकल्प राबविण्यास देण्याचे प्रस्तावित करण्यात येते. सदर प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या विजेची संपुर्ण व्यवस्था संबंधित ठेकेदार यांनी करण्याचे प्रस्तावित करण्यात येते. तसेच सद्यस्थितीत टॅकरव्दारे दररोज लागणारे ४००० लीटर्स पाण्याचा पुरवठा महानगरपालिकेमार्फत करण्याचे प्रस्तावित करण्यात येते.

तरी सदर Umwelt-Enviro Energy, या संस्थेस कच–यापासुन खत निर्मिती करण्याकरिता महानगरपालिकेस निविदेशिवाय थेट अभिकर्ता नियुक्ती करण्याकरिता मुंबई महानगरपालिका अधिनियम ५ (२)(२) अन्वये सदर प्रस्ताव मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेस्तव प्रस्तावित आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १४९ <u>दिनांकः– २७.१.२००५</u>

सुचकाचे नाव :– श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :– श्री. रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महापालिकेच्या डंपिंग ग्राऊंडवर स्वखर्चाने कच–यापासुन खतनिर्मिती प्रकल्प राबविणेकामी प्रशासनास मे. अमवेल्ट एनव्हायरो एनर्जी, महापे, नवी मुंबई या संस्थेस अभिकर्ता नेमणेकामी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे व या कामी डंपिंग ग्राऊंडवर महापालिकेने दररोज ४००० लिटर्स टॅकरने पाणी पुरवठा करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/–</u>

अनुमोदकाची <u>सही/–</u>

<u>सर्वानुमते</u>

पीठासीन अधिकारी<br>स्थायी समिती सभा<br>उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :–</u> विषय क्र. २० वाचुन दाखवितात.

विषय क्र.२० :— सन २००३—०४ या वर्षाची संगणकीकृत पाणी बिले तयार करणेकामी प्रशासनास सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदाराशी पुर्वीच्या अटी, शर्ती व दराने पुढील निविदा अंतिम होवून नविन ठेकेदार निश्चित होईपर्यंत निविदेशिवाय थेट मुदतवाढीच्या संविदेस प्राधिकृत करणे व अंतर्भुत खर्चास मान्यता देणे.

मा. पीठासीन अधिकारी :— आधीची निविदा अंतिम का नाही झाली?

मा. प्रभारी आयुक्त :— तेच काम आहे. हे काम नवीन नाही. आता आमचे संगणकीकरणाचे काम सुरु आहे. ते पुर्ण झाल्यावर आपणांस ठेकेदाराची आवश्यकता भासणार नाही. आपण स्वत:च कर विभागाचे व पाणी पुरवठा विभागाचे देयक बनविण्याचे काम करु शकतो. ३१ मार्च २००५ नंतर हे काम आपणच करणार आहोत. तत्पुर्वी या कामाला परवानगी द्यावी लागेल.

मा. पीठासीन अधिकारी :— आपणा सर्वांना माहिती आहेच की, उल्हासनगर महापालिकेत १ एप्रिल पासुन दरवर्षी नवीन अर्थसंकल्प अंमलात येतो. ज्या काही निविदा आहेत त्यांची मुदत ३१ मार्च पर्यंतच ठेवायला हवी तसेच प्रत्येक निविदेचा कालावधी हा १ एप्रिल ते ३१ मार्च असाच ठेवायला हवा. आपण बघितले तर पाणी पुरवठा विभाग, टॅंकर मध्ये सर्वीकडे निविदेचा कालावधी वाढवुन घेतला जातो. कोणीही अधिकारी जबाबदारीने काम करीत नाही.

मा. प्रभारी आयुक्त :— मी आपल्या म्हणण्याशी सहमत आहे. यापुढे असे होणार नाही. आम्ही फेब्रुवारी महिन्यातच निविदा बोलावु व प्रत्येक कामाचा अवधी १ एप्रिल ते ३१ मार्च असा ठेवु. आम्ही आता यापुढे सर्व कामाची वर्षातुन एकदाच निविदा काढुन दर निश्चित करु व त्याला काम करायला सांगु. आपण ब—याच वेळा सार्वजनिक बांधकाम विभागाची कामे डी.डी.आर कडे पाठवतो त्यांच्याकडुन ठेकेदार निश्चित होवुन येत नाही त्यामुळे काम थांबते. असे व्हायला नको यासाठी आम्ही आता शहरातील सर्व शौचालये दुरुस्त करण्यासाठी एकत्र निविदा काढली होती. जेणेकरुन कुठेही शौचालय नादुरुस्त असले तर ते त्या एकाच ठेकेदाराकडुन दुरुस्त करण्यात येईल. आता सर्व कामांमध्ये आम्ही असेच करणार आहोत. त्यामुळे काही त्रास होणार नाही. हे काम करणे आवश्यक असल्याने आता तुमच्यासमोर ठेवले आहे.

मा. पीठासीन अधिकारी :— आयुक्त साहेब तुमचे बोलणे चांगले आहे परंतु मी सांगु इच्छितो की शौचालय दुरुस्तीची निविदा तुम्ही आतापर्यंत ब—याच वेळा प्रसिध्द् केली परंतु तिला प्रतिसाद न मिळाल्याने एकही शौचालय दुरुस्त होवु शकलेले नाही. त्यापेक्षा डी.डी.आर कडे पाठविलेले चांगले असते त्यांने काम तरी होते. आपण पाणी पुरवठयाचे, सिक्युरीटी गार्डचे, वाहन वापराचे सर्वांची मुदत वाढवुन घेता तर असे व्हायला नको. संबधित विभागप्रमुखाने त्याची जबाबदारी ओळखुन फेब्रुवारी महिन्यातच निविदेची प्रक्रिया पुर्ण करायला हवी, जेणेकरुन मुदतवाढ होणार नाही.

मा. प्रभारी आयुक्त :—यापुढे प्रत्येक निविदेची मुदत ३१ मार्च पर्यंतच असेल.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :— आयुक्त साहेब तुम्ही आता सांगितले की, सा.बां.विच्या कामाची एकच निविदा काढणार त्यामुळे एकाच ठेकेदाराला काम जावुन कामामध्ये अडचण होईल.

मा. प्रभारी आयुक्त :— कोणतीही अडचण होणार नाही. उलट आपला जो वेळ वाया जातो तो वाया जाणार नाही. प्रत्येक वेळी काम डी.डी.आर कडे जाणार नाही, एकच एजंसी असली म्हणजे त्याच्यावर जबाबदारी टाकता येईल.

<u>मा. सदस्य श्री सतरामदास जेसवानी :—</u> मा. सभापती महोदय आयुक्तांचा प्रस्ताव चांगला आहे परंतु असे केल्याने काम व्यवस्थित होणार नाही. जसे आयुक्तांनी सांगितले की एकाच ठेकेदाराला काम देवु परंतु काही ठेकेदार हे पात्र नसतानाही दर कमी करुन निविदा घेतात त्यानंतर काम खराब करतात, दोन महिन्यातच वाट लागते त्यामुळे लोक नाराज होतात. काही वेळा काम अर्धवट सोडुन निघुन जातात.

<u>मा. प्रभारी आयुक्त :—</u> आपली आर्थिक स्थिती खराब असल्याने हे असे होत आहे. आपले उत्पन्न रु ८८ कोटीचे असताना आपण रु ११० कोटीचा अर्थसंकल्प तयार करतो. अर्थसंकल्प वाढविल्याने काम जास्त होते परंतु प्रत्यक्षात निधी नसतो. यासाठी अर्थसंकल्प व्यवस्थित करायला हवा. जर उत्पन्न रु ११० कोटीचे असेल तर अर्थसंकल्पही रु ११० कोटीचाच करायला हवा. या वर्षी आम्ही जेवढे उत्पन्न असेल तेवढेच काम हाती घेणार आहोत. तसेच ठेकेदारांचे जे रु १० कोटी द्यायचे आहेत ते देखिल आम्ही अदा करणार आहोत. त्यामुळे कामे रखडणार नाहीत.

<u>मा. सदस्य श्री सतरामदास जेसवानी :—</u> आयुक्त साहेब जे ठेकेदार काम व्यवस्थित करीत नाहीत त्यांचे नांव काळया यादीत टाका.

<u>मा. पीठासीन अधिकारी :—</u> आता हे काम आपण पुढे ढकलु.

<u>मा. सदस्य श्री सतरामदास जेसवानी :—</u> आयुक्त साहेब आपण एका ठेकेदाराला माझ्या प्रभागात ८ लाखाचे काम दिले होते परंतु प्रत्यक्षात त्याने फक्त ६ लाखाचेच काम जागेवर केले. ते देखिल बरोबर केले नाही. जेव्हा अधिका—यांनी येवुन मोजमाप घेतले तेव्हा कळले की, काम फक्त रु ६ लाखांचेच आहे. फक्त अर्धवट रस्ता झालेला आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त :—</u> कोणता रस्ता आहे?

<u>मा. सदस्य श्री सतरामदास जेसवानी :—</u> गोशाळा ते शाळेपर्यंतचा व तिरथ टॉवर येथील रस्ता आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त :—</u> जवादे साहेब याची चौकशी करुन आपण सोमवारपर्यंत मला अहवाल द्यावा.

<u>मा. सदस्य श्री सतरामदास जेसवानी :—</u> यावेळी देखिल ठेकेदाराने असेच केले आहे, त्यामुळे लोक आम्हाला शिव्या देत आहेत.

<u>मा. प्रभारी आयुक्त :—</u> आपण देखिल तरतुदींप्रमाणे काम करीत नाही म्हणुन असे होते.

<u>मुख्य लेखा परिक्षक (श्री एस.के.बनसोडे) :—</u> मी सांगु इच्छितो की, जे ठेकेदार काम व्यवस्थित करीत नाहीत, अर्धवट काम करतात अशा ठेकेदारांची सुरक्षा अनामत आपल्याकडे असते ती आपण जप्त करु शकतो.

<u>मा. सदस्य श्री सतरामदास जेसवानी :—</u> मग ती कधी जप्त करणार.

<u>मुख्य लेखा परिक्षक (श्री एस.के.बनसोडे) :—</u> मी फक्त आपल्या निदर्शनास आणले.

<u>मा. पीठासीन अधिकारी :–</u> ही तरतुद आम्हाला देखिल माहिती आहे. यांचे म्हणणे आहे ठेकेदाराला काळया यादीत का टाकत नाही? काही ठेकेदार काम व्यवस्थित करीत नाही, कामात गुणवत्ता राखत नाहीत त्यामुळे त्यांना काळया यादीत टाकणे आवश्यक आहे. यापूर्वी देखिल हा विषय येथे आला होता त्यावेळी तत्कालीन आयुक्त श्री पोखरकर साहेबांनी सांगितले होते की, आपण त्यांना काळया यादीत टाकु शकत नाही ते काम डी.डी.आर करु शकतो. यासाठी आपण येथुन डी.डी.आर ला याची माहिती द्यायला हवी. आता तर एक नवीन कायदा झाला आहे त्याप्रमाणे एका संस्थेला फक्त रु ३० लाखाचे काम द्यायचे असे ठरले आहे, त्यामुळे कोणीही ठेकेदार जास्तीचे काम घेणार नाही.

<u>काही सदस्य :–</u> विषय वगळा.

<u>मा. पीठासीन अधिकारी :</u> सदरचा विषय सर्वानुमते कार्यसुचीवरुन वगळण्यात येत आहे.

( <u>विषय क्र.२० :–</u> **सन २००३–०४ या वर्षाची संगणकीकृत पाणी बिले तयार करणेकामी प्रशासनास सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदाराशी पुर्वीच्या अटी, शर्ती व दराने पुढील निविदा अंतिम होवून नविन ठेकेदार निश्चित होईपर्यंत निविदेशिवाय थेट मुदतवाढीच्या संविदेस प्राधिकृत करणे व अंतर्भुत खर्चास मान्यता देणे)**

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :–</u> विषय क्र. २१ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र.२१ :–</u> उल्हासनगर महापालिकेच्या नागरी सुविधा केंद्रात ६४ के.बी.पी.एस इंटरनेट लिझ लाईन बसविणेकामी प्रशासनाने व्ही.एस.एन.एल, मुंबई यांच्याशी निविदेशिवाय केलेल्या थेट संविदेची माहिती नोंद करणे व अंतर्भुत खर्चास कार्योत्तर मान्यता देणे.

<u>मा.पीठासीन अधिकारी :–</u> हा विषय पुढे ढकलण्यात यावा.

<u>मा. प्रभारी आयुक्त :–</u> का? हे काम व्ही.एस.एन.एल कडुन केले आहे ही एक शासकीय कंपनी आहे, हे काम का पुढे ढकलत आहात?

<u>मा. पीठासीन अधिकारी :–</u> अधिकारी उपस्थित नाहीत.

<u>मा. प्रभारी आयुक्त :–</u> आयुक्त उपस्थित असताना अधिका–यांची आवश्यकताच काय आहे?

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :–</u> सभापती महोदय हे काम पास करा.

<u>मा. प्रभारी आयुक्त :–</u> तुम्ही जर असे कायदेशिर प्रस्ताव देखिल पास करणार नसाल, पुढे ढकलणार असाल तर मला येथे बसण्यात काही स्वारस्य नाही.

यावेळी प्रभारी आयुक्त श्री आर.के.सोनवणे हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>मा.पीठासीन अधिकारी :–</u> १० मिनीटांसाठी सदरची सभा स्थगित करण्यात येत आहे.

१० मिनीटानंतर पुनश्च: सभेस प्रारंभ करण्यात आला.

प्रभारी आयुक्त श्री आर.के.सोनवणे हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या जागी श्री उत्तम लोणारे, उपायुक्त (मुख्यालय) हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन उपस्थित होते.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :– आयुक्त साहेब बैठकीतुन का गेले याची माहिती द्यावी. मी आधीच सांगितले होते की हे काम पास करा.

काही सदस्य : पास, पास.........

मा. पीठासीन अधिकारी :– सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:–

विषय क्र.२१ :– उल्हासनगर महापालिकेच्या नागरी सुविधा केंद्रात ६४ के.बी.पी.एस इंटरनेट लिझ लाईन बसविणेकामी प्रशासनाने व्ही.एस.एन.एल, मुंबई यांच्याशी निविदेशिवाय केलेल्या थेट संविदेची माहिती नोंद करणे व अंतर्भुत खर्चास कार्योत्तर मान्यता देणे.

सादर करण्यात येते आहे की, शासनाच्या दि. २७.२.२००३ च्या निर्णयानुसार महानगरपालिकेने ठराव क्र. ४ दिनांक २५.४.२००३ अन्वये महानगरपालिकेचे संगणकीकरण करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे.

सदर धोरणात्मक निर्णयाच्या अंतर्गत महापालिकेत नागरीक सुविधा केंद्र हे दि. १५.६.२००४ रोजी चाचणी तत्वावर सुरू झालेले आहे. ८० नागरिकांपासुन सुरू होवुन सध्या १५० पेक्षा जास्त नागरिक या सुविधा केंद्राचा दररोज लाभ घेत आहेत. नागरिकांसाठी एकुण ६८ सेवा व १४२ तक्रारी उपलब्ध आहेत.

दि. १५.६.२००४ पासून उल्हासनगर महानगरपालिकेतील नागरिक सुविधा केंद्रात M/S Videsh Sanchar Nigam LTD, Mumbai यांचे कडील 64KBPS Internet Leased Line खरेदी करून बसविण्यात आलेलेआहे. या कामास खालीलप्रमाणे खर्च आलेला आहे.

| CIRCUIT DETAILS | | | |
|---|---|---|---|
| TYPE : STD ILL 1:1 | | CIRCUIT SPEED : 64KBPS | |
| BSO : MTNL | | LOCAL LOOP SPPED : 64 KBPS | |
| 1. | VSNL CHARGES AS PER NEW TERMS & CONDITIONS | | |
| f. | Registration charges (One Time) | Rs. | 5000. 00 |
| g. | Installation/other Charges (One Time) | Rs. | 1000.00 |
| h. | 1st Quarter Advance of Annual Tariff of Rs. 1,50,000/- | Rs. | 37500.00 |
| i. | Modem Charges (Rental Bi-Monthly) | Rs. | 00 |

| | | | |
|---|---|---|---|
| j. | Routher Charges (Rental Bi-Monthly) | Rs. | 00 |
| 2- | MTNL Local Lead Charges | Rs. | 99660.00 |
| TOTAL DEMAND | | Rs. | 152160.00 |
| Payment Already Received | | Rs. | 15000.00 |
| PRESENT DEMAND | | Rs. | 137160.00 |

सदर कामास मान्यता देवुन झालेल्या खर्चास १,३७,१६०/— कार्योत्तर मंजुरी देऊन त्यानंतर वेळोवेळी येणा—या भाडे खर्चास मान्यतेसाठी स्थायी समिती पुढे सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १५०  दिनांकः— २७.१.२००५

सुचकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :— श्री. रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर महापालिकेच्या नागरी सुविधा केंद्रात ६४ के.बी.पी.एस इंटरनेट लिझ लाईन बसविणेकामी प्रशासनाने व्ही.एस.एन.एल, मुंबई यांच्याशी निविदेशिवाय केलेल्या थेट संविदेस व अंतर्भुत खर्च रु १,३७,१६०/— यांस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. २२ वाचुन दाखवितात.

विषय क्र.२२ :— बॅ.क्र २०७२, उल्हासनगर—५ येथील वापरात नसलेल्या सार्वजनिक शौचालयाच्या विनीयोगास मान्यता देणे

काही सदस्य : पास, पास..........

मा. पीठासीन अधिकारीः— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना:—</u>

<u>विषय क्र.२२ :—</u> बॅ.क्र २०७२, उल्हासनगर—५ येथील वापरात नसलेल्या सार्वजनिक शौचालयाच्या विनीयोगास मान्यता देणे

उपरोक्त विषयाबाबतचे पत्र मा.नगरसेवक, श्री.किशोर वनवारी, (सभागृह नेता) उल्हासनगर—५ यांचे कडून आरोग्य विभागास प्राप्त झाले आहे.

सदर पत्रानुसार प्रभाग क्र. ११ क, बॅरेक नं. २०७२, रूम नंबर ११ जवळ, उल्हासनगर—५ येथे सार्वजनिक शौचालय आहे. सदर शौचालय जुने असुन ते वापरात नाही. त्यामुळे सदर शौचालय तोडण्याची विनंती मा. नगरसेवक, श्री.किशोर वनवारी, (सभागृह नेता) यांनी केली आहे.

सदर शौचालयाचा अहवाल व पंचनामा श्री. एम. आर. उमालकर, स्वच्छता निरिक्षक, उल्हासनगर महानगरपालिका यांनी सादर केला आहे. सदर अहवालानुसार बॅरेक नं. २०७२, रूम नंबर ११ जवळ, उल्हासनगर—५ येथे सार्वजनिक शौचालय जूने असून तुटलेल्या अवस्थेत आहे. सदरच्या शौचालायाचा वापर होत नसल्याने सदर शौचालय तोडुन तेथे सी.सी. पॅसेज बनविण्यात यावे असे तेथिल नागरिकांनी सांगितले व त्याप्रमाणे त्यांनी स्वाक्ष—याही दिलेल्या आहेत. तसेच सदर शौचालयाची पाहणी श्री. मनिष हिवरे, बाजार निरिक्षक, उल्हासनगर महानगरपालिका यांनी केली आहे. त्यांचे अहवालानुसार बॅरेक नं. १७७९ व १९६२ समोर, प्रभाग क्र. १२ 'ब' येथील सार्वजनिक शौचालय मोडकळीस आलेले आहे. तसेच सदर शौचालयाची नोंद मालमत्ता नोंदवहीत नसल्याचे सदर अहवालात नमुद केले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे. सबब प्रस्तावित शौचालय / मुतारी निष्कासित करून सदर मालमत्तेचा महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार विनियोग केला जाईल. तरी सदर मालमत्ता निष्कासित करणेसाठी व त्या ठिकाणी सी. सी. पॅसेज बनविणेकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ प्रमाणे मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव प्रस्तावित आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १५१ <u>दिनांक:— २७.१.२००५</u>

सुचकाचे नाव :— श्री. सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. गणपत एडके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार बॅरेक क्र. २०७२, उल्हासनगर—५ॅ येथील जुने सार्वजनिक शौचालय निष्कासन करण्यास व जागेवरील परिस्थिती पाहता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग / विनियोग करण्यास मान्यता देत आहे

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. २३ वाचुन दाखवितात.

विषय क्र.२३ :— बॅ.क्र १७७९ व १७६२ समोर, प्रभाग क्रमांक १२ 'ब' येथील वापरात नसलेल्या सार्वजनिक शौचालयाच्या विनीयोगास मान्यता देणे.

काही सदस्य : पास, पास..........

मा. पीठासीन अधिकारी :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:—

विषय क्र.२३ :— बॅ.क्र १७७९ व १७६२ समोर, प्रभाग क्रमांक १२ 'ब' येथील वापरात नसलेल्या सार्वजनिक शौचालयाच्या विनीयोगास मान्यता देणे

उपरोक्त विषयाबाबतचे पत्र मा.नगरसेवक, श्री.सतरामदास फ. जेसवानी, उल्हासनगर—५ यांचे कडून आरोग्य विभागास प्राप्त झाले आहे.

सदर पत्रानुसार बॅ.क्र १७७९ व १७६२ समोर, प्रभाग क्रमांक १२ 'ब' येथे सार्वजनिक शौचालय आहे. सदर शौचालय जुने असुन मोडकळीस आलेले आहेत व ते वापरात नाहीत. त्यामुळे सदर शौचालय तोडण्याची विनंती सदर नगरसेवक यांनी केली आहे.

सदर शौचालयाचा अहवाल व पंचनामा श्री. अरूण जाधव, स्वच्छता निरिक्षक, उल्हासनगर महानगरपालिका यांनी सादर केला आहे. सदर अहवालानुसार बॅ.क्र १७७९ व १७६२ समोरील सार्वजनिक शौचालय आहेत. सदर शौचालये जुने असुन सदर शौचालये तुटलेल्या अवस्थेत आहेत. सदर शौचालयाच्या भिंती मोडकळीस आलेल्या आहेत. सदरच्या शौचालयाचा वापर त्या परिसरातील नागरीक करीत नसल्याचे तेथील नागरीकांनी सांगितले व त्याप्रमाणे त्यांनी पंचनाम्यावर स्वाक्ष—याही दिलेल्या आहेत. तसेच शौचालयाची पाहणी श्री. मनिष हिवरे, बाजार निरिक्षक, उल्हासनगर महानगरपालिका यांनी केली आहे.यांचे अहवालानुसार बॅ.क्र १७७९ व १७६२ समोर, प्रभाग क्रमांक १२ 'ब' येथील सार्वजनिक शौचालय मोडकळीस आलेले आहेत. तसेच सदर शौचालयाची नोंद मालमत्ता नोंदवहीत नसल्याचे सदर अहवालात नमुद केले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे. सबब प्रस्तावित शौचालय / मुतारी निष्कासित करून सदर मालमत्तेचा महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार विनियोग केला जाईल. तरी सदर मालमत्ता निष्कासित करणेसाठी व त्या ठिकाणी सी. सी. पॅसेज बनविणेकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ प्रमाणे मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १५२ दिनांक:— २७.१.२००५

सुचकाचे नाव :— श्री. सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. गणपत एडके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार बॅरेक क्र. १७७९ व १७६२ समोरील, प्रभाग क्र. १२ ब येथील जुने सार्वजनिक शौचालय निष्कासन करण्यास व जागेवरील परिस्थिती पाहता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग / विनियोग करण्यास मान्यता देत आहे

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. २४ वाचुन दाखवितात.

विषय क्र.२४ :— महापालिका मुख्यालयाच्या आवारातील जुने जळीत भंगार, साहित्य विनियोगाकामी प्रशासनास उच्चतम दराच्या कंत्राटदाराशी संविदेस मान्यता देणे.

काही सदस्य : पास, पास..........

मा. पीठासीन अधिकारी :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:—

विषय क्र.२४ :— महापालिका मुख्यालयाच्या आवारातील जुने जळीत भंगार, साहित्य विनियोगाकामी प्रशासनास उच्चतम दराच्या कंत्राटदाराशी संविदेस मान्यता देणे.

उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयातील आवारातील जुने जळीत व इतर जमा असलेले भंगार, लोखंड, लाकुड इत्यादी विक्री करण्याकरिता कार्यायतीन सुचना क्रमांक उमपा/ भांडार/ विक्री/४५/भावि/२००४ दिनांक ३.८.२००४ नुसार इच्छुक खरेदीदारांकडुन सिलबंद दरपत्रक मागविण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | विक्री साहित्याचा तपशिल | खरेदीदारांचे नांव | | |
|---|---|---|---|---|
| | | मे. ए—१ बॅरक्स उल्हासनगर—३ | मे. रामनारायण पांडे ओल्डमोटर पार्टस ॲण्ड स्क्रेपमटेरियल उल्हासनगर—३ | मे. सुड्डूभाई ओल्डमोटर पार्टस उल्हासनगर७३ |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयाच्या आवारात असलेले जुने जळीत व इतर भंगार | अ. लोखंड<br>ब. लाकूड | दर<br>६. ७०<br>—— | प्रती किलो<br>९. ००<br>०.५० | ९. २०<br>०. ६० |

दरपत्रकातील दरांचा तुलनात्कक दृष्टया विचार केला असता मे. सुड्डुभाई, ओल्ड मोटर पार्टस, उल्हासनगर—३ यांचे खरेदीचे दर अधिक आहेत. तरी सदरच्या विक्री मंजुरी मिळणेस्तव स्थायी समितीपुढे सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १५३ दिनांकः— २७.१.२००५

सुचकाचे नाव :— श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार महापालिका मुख्यालयाच्या आवारातील जुने जळीत भंगार, साहित्य विनियोगाकामी प्रशासनास उच्चतम दराचे कंत्राटदार मे. सुड्डुभाई ओल्ड मोटार पार्टस, उल्हासनगर—३ यांच्याशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. २५ वाचुन दाखवितात.

विषय क्र.२५ :— उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत २ विविध कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

काही सदस्य :— विषय वगळा.

मा. पीठासीन अधिकारी : सदरचा विषय सर्वानुमते कार्यसुचीवरुन वगळण्यात येत आहे.

( विषय क्र.२५ :— उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत २ विविध कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे)

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. २६ वाचुन दाखवितात.

विषय क्र.२६ :— उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ४३ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

काही सदस्य : पास, पास..........

मा. पीठासीन अधिकारी:— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय क्र.२६ :— उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ४३ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

प्रस्तावना:—

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् 2004-2005 च्या निधीतून मा. नगरसेवक यांनी कामे करणेसाठी विनंती केलेली आहे.

| अ.क्र | कामाचे ठिकाण | प्राकलनीय किंमत | करारनामा दिनांक | एजन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| 1 | उल्हासनगर-2,गरीब नगर मध्ये शावुबाई साळवे यांचे घराजवळ 10 बैठकीचे शौचालय बांधणे (गलिच्छ वस्ती 519) | 441800 | 27-10-04 | मे जनसेवा म. का. सोसा. |
| 2 | उल्हासनगर -3 बॅ नं 941 ते 950 मध्ये सी सी व नाली बनविणे. (नगरसेवक निधी 865) | 199100 | 1-10-04 | मे हरे रामा म. का.सोसा. |
| 3 | उल्हासनगर-3 वडीयार यांचे घरापासून ते गणपती मंदिर पर्यत सोनार यांचे घरापासून ते आण्णा यांचे घारासमोर बिल्डींग पर्यत नाली व सी सी दुरूस्ती करणे. (प्रभाग समिती निधी 933) | 99900 | 1-12-04 | मे. कलश म. का. सोसा. |
| 4 | उल्हासनगर-3 आणा यांचे घरापासून ते मुदलीयार यांचे घरापर्यत, मद्रासी पाडा, शर्मा यांचे घरापासून यादव यांचे घरापर्यत, बेंगाली पाडा आणि गुजराथी पाडा, सुभाष नगर येथे प्रभाग क्र. 7 येथे सी सी व नालीचे पुर्नबांधकाम करणे.(नगरसेवक निधी 934) | 199650 | 1-12-04 | मे. कलश म. का. सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 | उल्हासनगर-3 बॅरेक नं 902 ते 904 येथील उद्यानाला हरित ,सुशोभिकरण व नुतनीकरण करणे. (प्रभाग समिती निधी 971) | 100000 | 27-10-04 | मे सुर्य ज्योत म. का. सोसा. |
| 6 | उल्हासनगर- 4 प्रभाग क्र. 14 मधील शंकर चव्हाण यांच्या घरामागील नाला श्री नाईक यांचे घरापासून म्हात्रे यांचे घरापर्यतचा नालाचे पुनर्बांधणी करणे (महापाालिका निधी 996) | 299900 | 21-12-04 | मे. कपलेश्वर म. का. सोसा. |
| 7 | उल्हासनगर- प्रभाग क्र. 6 मध्ये इंदुमती राय यांचे घर ते चौधरी यांचे घरापर्यत नाली बनविणे (महापालिका निधी 1016) | 191930 | 1-12-04 | मे श्री मॉ. म. का. सोसा. |
| 8 | उल्हासनगर- येथे रामकुमार यादव यांचेपासून कींनराजयांचेघर रामविलास यादव यांचे घर , मीहनलाल यांचे घर निजधाम बिल्डींग मागे शीव मंदिर जवळ घरापर्यत सी सी आणि नाली बांधणे. आझादनगर येथे 10 बैठकिचे शौचालय बांधणे यांचे ( महापालिका निधी 1017) | 156320 | 1-12-04 | मे श्री मॉ. म. का. सोसा. |
| 9 | उल्हासनगर-3 येथील प्रभाग क्र. 25 येथील बॅ नं 939 व 952 येथे सिमेंट पायवाटा व नाल्या बनविणे. (नगरसवेक निधी 1040) | 99600 | 27-10-04 | मे. शिव म. का. सोसा. |
| 10 | उल्हासनगर-3 यंथील यश पॅलेसच्या बाजूला सिमेंट पायवाटा व नाल्या बनविणे (नगरसेवक निधी 1041) | 199400 | 16-12-04 | मे लक्ष्मी क्रिपा म. का. सोसा. |
| 11 | उल्हासनगर-3 प्रभाग क्र. 25 मधील गणेशनगर येथे नाला बनविणे. (महापालिका निधी 1043) | 249675 | 27-10-04 | मे जय म. का. सोसा. |
| 12 | उल्हासनगर -3 प्रभाग क्र. 25 येथील शिवाजीनगर येथे नाला बनविणे (महापालिका निधी 1044) | 249670 | 27-10-04 | मे जय म. का. सोसा. |
| 13 | उल्हासनगर-3 येथील प्रभाग क्र. 8 येथील बॅ नं 1064 व 1065 व सभोवतालच्या भागात धर्मदास दरबारच्या बाजूला सिमेंट पायवाटा व नाल्या बनविणे. (महापालिका निधी 1095) | 81000 | 1-12-04 | मे कल्पतरू म. का. सोसा |
| 14 | प्रभाग क्र. 15 जिजामाता उद्यानच्या बाजूला पोलीस चौकी बांधणे. (नगरसेवक निधी 1109) | 149067 | 1-12-04 | मे ओम म. का. सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 15 | उल्हासनगर- येथील प्रभाग क्र. 19 मध्ये प्रिय दर्शनी अपार्टमेंट जवळ बॅरेक नं 1201 जवळ उल्हासनगर-3 मध्ये साकव बांधणे (महापालिका निधी 1110) | 108490 | 21-12-04 | मे. कपलेश्वर म. का. सोसा. |
| 16 | उल्हासगनर -3 येथील प्रभाग क्र. 25 येथे सुग्नी निवास बॅ नं 1025 व बॅ नं 1050 च्या मागे एम-250 ने सी सी व पायवाटा बनविणे (नगरसेवक निधी 1126) | 199600 | 27-10-04 | मे गुरदेव म. का. सोसा. |
| 17 | उल्हासनगर -3 येथील प्रभाग क्र. 25 येथील बॅ नं 957, 941, 943 येथे सिमेंट पायवाटा व नाल्या बनविणे व साईट पटटया परमानंद भांडार ते बॅ नं 957 ते व्हाया बॅ नं 941 , 943 पर्यत साई पटटया भरणे. (नगरसेवक निधी 1127) | 149850 | 27-10-04 | मे गुरदेव म. का. सोसा. |
| 18 | उल्हासनगर-3 येथील प्रभाग क्र. 25 राधास्वामी सतसंग हॉलजवळ एम-200 ने साईपटटी बनविणे व बॅ नं 939 येथे एम-250 ने रस्ता व नाली बनविणे. (नगरसेवक निधी 1128) | 199850 | 27-10-04 | मे. खंडेराव म. का. सोसा. |
| 19 | उल्हासनगर-3 येथी मिस्तरी यांच्या निवासस्थाना पासुन अंटी निवासस्थान मार्गे रवि पाटील यांच्या निवासस्थानापर्यत सिमेंट पायवाटा व नाल्या बनविणे (महापौर निधी 1161) | 99900 | 8-12-04 | मे गुरदेव म. का. सोसा. |
| 20 | उल्हासनगर- प्रभाग क्र. 7 मध्ये बॅ नं 723 ते यश पॅलेस बॅ नं 703, 27, 28,29,712 ,714, आणि बॅ नं 1147 मागे सी सी आणि नाली बांधणे . (नगरसेवक निधी 1163) | 199600 | 1-12-04 | मे अल्का म. का. सोसा. |
| 21 | उल्हासनगर- येथील प्रभाग क्र. 12 मध्ये बॅ नं 1782 कच्ची पाडा येथे एम-250 ने रस्ता आणि नाली बांधणे. (महापालिका निधी 1175) | 199900 | 1-12-04 | मे ज्योती म. का. सोसा. |
| 22 | उल्हासनगर- येथील प्रभाग क्र. 18 मध्ये बॅ नं 1167, निजाम पॅलेस ते पवई चौक प्र्यत सी सी एम-250 आणि नाली बांधणे. (नगरसेवक निधी 1192) | 200000 | 1-12-04 | मे कलश म. का. सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 23 | उल्हासनगर-1 प्रभाग क्र. 21 बॅ नं 65, 66 व बॅ नं 280 / 1 दामोदर मकवाणी यांच्या घराजवळ सी सी एम-250 पायवाटा व नाल्या बांधणे (नगरसेवक निधी 1197) | 200000 | 29-12-04 | मे माजी सैनिक म. का. सोसा. |
| 24 | उल्हासनगर-2 प्रभाग . 22 झेलुलाल मार्केट बॅरेक नं 464 येथे नाली व सी सी पायवाटा बनविणे (महापालिका निधी 1198) | 57000 | 1-12-04 | मे सुर्यज्योती म. का.सोसा |
| 25 | उल्हासनगर-3 प्रभाग क्र. 24 मधील बॅरेक नं 832, 824, 854 आणि 855 पर्यत सी सी पायवाटा व नाली बनविणे. (नगरसेवक निधी 1202) | 200000 | 3-12-04 | मे श्री मॉ. म. का. सोसा. |
| 26 | उल्हासनगर-3 प्रभाग क्र. 25 येथील बॅ नं 952 च्या मागे सिमेंट पायवाटा व नाल्या बनविणे (महापालिका निधी 1206) | 112800 | 8-12-04 | मे लक्ष्मी म. का. सोसा. |
| 27 | उल्हासनगर-3 येथील वार्ड नं 7 येथील प्रितमसिंग यांच्या घरापासुन गंजराथी पाडा नगीना पॅलेस समोर,व चर्चजवळ व गणेश ट्रेडींग शाळेपासून अंबेमाता मंदिर पर्यत नाली व साईटपटटी बनविणे व रामपालसिंग यांच्या घराजवळ पायवाटा व नाली बनविणे. (महापालिका निधी 1224) | 106800 | 8-12-04 | मे श्री विनायक म.का.सोसा. |
| 28 | उल्हासनगर-4 येथील प्रभाग क्र. 9 मधील नागसेन नगर जवळील थोरात यांच्या घरापासून वाघमारे यांच्या घरापर्यत सी सी एम-250 ने रस्ता बांधणे व नाली बांधणे (नगरसेवक निधी 1225) | 200000 | 21-12-04 | मे कलश म. का. सोसा. |
| 29 | उल्हासनगर-4 येथील प्रभाग क्र. 9 मधील नागसेन नगर जवळील खडांगळे यांच्या घरापासून आंबेडकर उद्यानापर्यत सी सी एम-250 ने रस्ता व नाली बांधणे (नगरसेवक निधी 1226) | 199900 | 29-12-04 | मे कलश म. का. सोसा. |
| 30 | उल्हासनगर-5येथील प्रभाग क्र. 11 मधील सेक्शन 36 मध्ये आकाश चालीजवळ सी सी एम-250 ने रस्ता बांधणे. (महापालिका निधी 1237) | 200000 | 8-12-04 | मे धनलक्ष्मी म. का. सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 31 | उल्हासनगर- येथील सिताराम नगर मध्ये रस्ता बनविणे प्रभाग . 15 (शिवसेना शाखा ते शिवाजी किराणा स्टोर पर्यत. (महापालिका निधी 1241) | 299518 | 1-12-04 | मे शिवानी म. का. सोसा. |
| 32 | उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र. 12 मधील बॅनं 1719, 1720, 1819, 1820, 1779, 1789 जवळ सी सी पायवाटा व नाली बांधणे, दत्त निवास जवळील शौचालय दुरूस्ती करणे . (नगरसेवक निधी 1247) | 200200 | 8-12-04 | मे अल्का म. का. सोसा. |
| 33 | उल्हासनगर-4 प्रभाग क्र. 18 ब मध्ये बॅ नं 1246 व 1237 येथी सी सी एम-250 व नाली बनविणे. (नगरसेवक निधी 1248) | 99725 | 8-12-04 | मे श्री गंगा म. का. सोसा. |
| 34 | उल्हासनगर- येथील प्रभाग क्र. 23 मध्ये कारा हॉल ते लार्ड क्रिष्णा अपार्टमेंट पर्यत नाला बांधणे (महापालिका निधी 1251) | 198100 | 1-12-04 | मे श्री मॉ. म. का. सोसा. |
| 35 | उल्हासनगर-2 प्रभाग क्र. 5 बॅ नं 590, अशाराम आश्रम ते विधा कुकरेजा बॅनं 270-291 तवळ सी सी पायवाटा व नाल्या बांधणे (नगरसेवक निधी 1255) | 199300 | 8-12-04 | मे अल्का म. का. सोसा. |
| 36 | उल्हासनगर-2 बॅ नं 600, 625, 293, 298, 299, 304, 307, आणि अशोकनगर मध्ये सी सी पायवाटा व नाल्या बांधणे. (नगरसेवक निधी 1256) | 199700 | 8-12-04 | मे स्वामी समथै म. का. सोसा. |
| 37 | उल्हासनगर-2 येथील आझादनगर येथील वार्ड 22 मध्ये नारायण किराणा ते रणजीत यादव राजगरख हरिहार चव्हाण यांचे घरापासून हरिचंद्र राजगर यांचे घरापर्यत व मनोज किराणा मागे पायवाट व व नाल्या बनविणे. (नगरसेवक निधी 1257) | 200000 | 8-12-04 | मे श्री सिध्दी विनायक म.का. सोसा |
| 38 | उल्हासनगर- येथील प्रभाग क्र. 10 मध्ये बॅ नं 1876 समोर एकता कॉलनी सेक्शन 29 येथे सी सी पॅसेज दुरूस्तीकरणे (प्रभाग समिती4 निाधी 1262) | 100000 | 1-12-04 | मे शंकर महादेव म. का. सोसा |
| 39 | उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र. 10 मधील बॅ नं 1917 जवळील उद्यानाचे सुशोभिकरण करणे. (प्रभाग समिती निधी 1264) | 99000 | 1-12-04 | मे जय म. का. सोसा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 40 | उल्हासनगर-3 येथील मध्यवर्ती जकात नाका येथे डब्ल्युबीएम बनविणे ( 1302) | 384900 | 28-10-04 | मे श्री मॉ म. का. सोसा |
| 41 | उल्हासनगर- येथे हिराघाट बोटक्लब येथे गणपती विसर्जन घाट बनविणे(महापालिका निधी 1303) | 234000 | 2-9-04 | मे श्री मॉ. म. का. सोसा. |
| 42 | उल्हासनगर-3 महानगरपालिकेच्या इमारतीत अपंगासाठी रॅम्प , शौचालय बनविणे. (महापालिका निधी 1304) | 110050 | 4-11-04 | मे श्री मॉ. म. का. सोसा. |
| 43 | उल्हासनगर येथील वाको कंपाऊंड गेट नं 1, ते एस्केप बिस्कीट फॅक्टरीपर्यत नाला बनविण्याबाबत (महापालिका निधी 1006) | 253000 | 21-12-04 | मे चंदा म. का. सोसा. |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप- निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १५४ दिनांकः— २७.१.२००५

सुचकाचे नाव :— श्री. गणपत एडके

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती नंदिनी बामणकर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ४३ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. २७ वाचुन दाखवितात.

**विषय क्र.२७ :–** उल्हासनगर महापालिका मुख्यालयातील आंतरित दुरध्वनींची वार्षिक निगा व दुरुस्ती कामी कामी प्रशासनास मे. आय.टी.आय लिमिटेड, मुंबई यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

**काही सदस्य :** पास, पास..........

**मा. पीठासीन अधिकारी :–** सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:–

**विषय क्र.२७ :–** उल्हासनगर महापालिका मुख्यालयातील आंतरित दुरध्वनींची वार्षिक निगा व दुरुस्ती कामी कामी प्रशासनास मे. आय.टी.आय लिमिटेड, मुंबई यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

महानगरपालिकेने सात वर्षा पूर्वी भारत सरकार उपक्रम मे. आय. टी. आय. लिमिटेड मुंबई यांच्या मार्फत 96/128P. C- DOT आंतारिक दूरध्वनि संच मुख्याल्यात बसविलेला आहे. ज्याची वर्षिक निगा व देखभाल त्याच कंपनी मार्फत करण्यात येत आहे.

वर्ष २००५ साठी ही उत्पादक कंपनी, मे. आय. टी. आय. लिमिटेड, मुंबई (भारत सरकार उपक्रम) यांनी रु. ४१,४००/– चे अंतर्गत दूरध्वनि संच निगा व दुरुस्ती साठी देयक सादर केले आहे.

हे निगा व दुरुस्तीचे कार्य दर वर्षी मे. आय. टी. आय. लिमिटेड मुंबई (भारत सरकार उपक्रम) जे उत्पादक कंपनी आहे त्याना ही देणे जास्त रास्त असल्याने सदर खर्चास व या पुढे ही 96/128P. C- DOT आंतारिक दूरध्वनि सिस्टम मे. आय. टी. आय. लिमिटेड, मुंबई (भारत सरकार उपक्रम) मार्फत निगा व दुरुस्तीस लागणारा खर्चास मान्यता देणे करिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २ (२) अंतर्गत मंजुरी साठी मा. स्थायी समिती पुढे सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. १५५** **दिनांक:– २७.१.२००५**

सुचकाचे नाव :– श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :– श्री. गणपत एडके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर महापालिका मुख्यालयातील आंतरित दुरध्वनींची वार्षिक निगा व दुरुस्ती कामी कामी प्रशासनाने मे. आय.टी.आय लिमिटेड, मुंबई यांच्याशी निविदेशिवाय केलेल्या थेट संविदेस कायम करीत असुन अंतर्भुत खर्च रु ४१,४००/– यांस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. २८ वाचुन दाखवितात.

विषय क्र.२८ :— श्री मोहन एस. चिजवाणी यांची उल्हासनगर पर्यावरण अहवाल व कृती आराखडा अंमलबजावणीसाठी समन्वयक या पदावरील नियुक्ती कायम करणे.

मा. सदस्य श्री नरेंद्रकुमार ठाकुर :— एक वर्षासाठी पास करा.

मा.पीठासीन अधिकारी :— आयुक्तांनी त्यांच्या अधिकारात आधी सहा महिने नियुक्ती दिलेली आहे. आता आपल्या समोर मुदतवाढीसाठी प्रस्ताव आलेला आहे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :— श्री चिजवानी यांना आमचा वैयक्तिक विरोध नाही. परंतु ही नियुक्ती चुकीची आहे. आमचा या कामाला १०० टक्के विरोध आहे. या अधिका—यांना महिन्याला रु १५००० पेक्षा जास्त दिले जातात. असे आपण देवु शकतो का?

मा. सदस्य श्री नरेंद्रकुमार ठाकुर :— मग तुम्ही आधी शेठ साहेबांचे कसे काय पास केले?

मा. सदस्य श्री रामदास उमाप :— ही नियुक्ती चुकीची आहे. अशा प्रकारे २—४ अधिका—यांची नियुक्ती केलेली आहे. यापेक्षा हे काम जे कर्मचारी लायक आहेत त्यांना देण्यात यावे.

आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी :— हा विषय वेगळा आहे. मुं.प्रां.म.अ. १९४९ चे कलम ५३ (३) अशी नियुक्ती करता येते.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :— किती पगार द्यायला हवा. १५—१८—२० हजार एवढा आपण देवु शकतो काय?

आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी :— पगार किती द्यायचा याच्या मार्गदर्शक सुचना यामध्ये दिलेल्या नाहीत. त्या अधिका—यांचा दर्जा बघुन आपण त्याप्रमाणे त्यांना पगार देत आहोत.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :— हे अधिकारी काहीच कामाचे नाहीत, ते काहीही काम करत नाहीत. फुकटचा खर्च होत आहे.

मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :— आमचा यांना विरोध आहे. हे शहर अभियंता असताना यांनी काही काम केले नाही, सर्व वाट लावली. आता यांना कशाला ठेवता.

आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी :— यांच्याकडे पर्यावरण अहवाल बनविण्याचे काम आहे. त्यांनी आधी चांगले काम केले म्हणुन त्यांचा कालावधी वाढविलेला आहे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :— आमचा या प्रस्तावाला विरोध आहे.

मा.पीठासीन अधिकारी :— सचिव साहेब आपण मतदान घ्यावे.

मा. सचिव :— जे हा प्रस्ताव पास करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या बाजुने ८ मते :</u>

१ श्री किशोर वनवारी
२ श्री नारायण पंजाबी
३ श्री नरेंद्रकुमार ठाकुर
४ श्री सतरामदास जेसवानी
५ श्री गणपत एडके
६ श्री सुरेश गायकवाड
७ श्रीमती मोना वनवारी
८ श्रीमती भारती छाब्रिया

<u>मा. सचिव :–</u> जे हा प्रस्ताव पास करण्याच्या बाजुने नाहीत त्यांनी कृपया हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या विरोधात ३ मते :</u>

१ श्री रामदास उमाप
२ श्रीमती नंदिनी बामणकर
३ श्रीमती संगिता जावळे,

<u>मा. पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषय बहुमताने संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना:–</u>

<u>विषय क्र.२८ :–</u> श्री मोहन एस. चिजवाणी यांची उल्हासनगर पर्यावरण अहवाल व कृती आराखडा अंमलबजावणीसाठी समन्वयक या पदावरील नियुक्ती कायम करणे.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामधील पर्यावरण विषयक अहवाल तयार करणे व त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे यासाठी 'समन्वयक' म्हणुन श्री. मोहन एस. चिजवाणी यांची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या नियम ५३ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १८ जुन, २००४ पासून 'समन्वयक' म्हणुन दरमहा रू. १५,०००/– एवढया ठोक मानधनावर ०६ महिन्यासाठी नियुक्ती करण्यात आली होती. त्यांचा ०६ महिन्याचा कालावधी दिनांक १७.१२.२००४ रोजी संपुष्टात आलेला आहे. परंतु त्यांच्या सेवेची लोकहिताच्यादृष्टीने महापालिकेस आवश्यकता आहे. परंतु त्यांच्या सेवेची लोकहिताच्यादृष्टीने महापालिकेस आवश्यकता आहे. ही बाब विचारात घेऊन श्री. मोहन एस. चिजवानी यांना दिनांक २५.१२.२००४ पासून पुढील ०६ महिन्यासाठी 'समन्वयक' म्हणुन नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे ठेवणेस प्रस्तावित आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १५६ <u>दिनांक:– २७.१.२००५</u>

सुचकाचे नाव :– श्री. नारायण पंजाबी
अनुमोदकाचे नाव :– श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार श्री मोहन एस. चिजवाणी यांच्या उल्हासनगर पर्यावरण अहवाल व कृती आराखडा अंमलबजावणीसाठी महापालिका सेवेत समन्वयक या पदावरील दिनांक २५/१२/२००४ पासुन झालेल्या नियुक्तीस वाढीव कालावधीसह एकूण एका वर्षासाठी मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

<u>बहुमताने</u>

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :–</u> विषय क्र. २९ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र.२९ :–</u> उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत उल्हासनगर–४, प्रभाग क्र १५ मध्ये महाराष्ट्र बॅक ते बॅ.नं. १३०६ पुजा अपार्टमेंट पर्यंत एम २५० रोड व नाली बनविणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

<u>काही सदस्य :–</u> विषय वगळा.

<u>मा. पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते कार्यसुचीवरुन वगळण्यात येत आहे.

**(<u>विषय क्र.२९ :–</u> उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत उल्हासनगर–४, प्रभाग क्र १५ मध्ये महाराष्ट्र बॅक ते बॅ.नं. १३०६ पुजा अपार्टमेंट पर्यंत एम २५० रोड व नाली बनविणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.)**

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :–</u> विषय क्र. ३० वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र.३० :–</u> उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ३ विविध कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

<u>मा. पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते कार्यसुचीवरुन वगळण्यात येत आहे.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :–</u> का वगळण्यात येत आहे?

<u>मा. सदस्य श्री नरेंद्रकुमार ठाकुर :–</u> सर्वांचे प्रस्ताव येथे आणायला हवेत, त्यानंतरच पास करण्यात येईल.

<u>मा.पीठासीन अधिकारी :–</u> या आधीचा जो विषय होता तो आमचे नगरसेवक श्री सुरेश जाधव व श्री प्रशांत जाधव यांच्या प्रभागातील होता तरी देखिल आम्ही तो पुढे ढकलला कारण सर्वांचे प्रस्ताव येथे यायला हवेत. हा विषय तर श्री कुमारी यांच्या प्रभागातील आहे.

<u>मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :–</u> पास करा.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :–</u> आमचा विषय वगळण्यासाठी विरोध आहे.

<u>मा.पीठासीन अधिकारी :–</u> सचिव साहेब आपण मतदान घ्यावे.

<u>मा. सचिव :–</u> जे हा विषय वगळण्याच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया हात वर करावेत.

<u>प्रस्ताव वगळण्याच्या बाजुने ८ मते :</u>

१ श्री किशोर वनवारी
२ श्री नारायण पंजाबी

३ श्री नरेंद्रकुमार ठाकुर
४ श्री सतरामदास जेसवानी
५ श्री गणपत एडके
६ श्री सुरेश गायकवाड
७ श्रीमती मोना वनवारी
८ श्रीमती भारती छाब्रिया

मा. सचिव :— जे हा विषय वगळण्याच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया हात वर करावेत.

प्रस्तावा वगळण्याच्या विरोधात ३ मते :
१ श्री रामदास उमाप
२ श्रीमती नंदिनी बामणकर
३ श्रीमती संगिता जावळे,

मा. पीठासीन अधिकारी :— सदरचा प्रस्ताव बहुमताने कार्यसुचीवरुन वगळण्यात येत आहे.

( विषय क्र.३० :— उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ३ विविध कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे. )

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. ३१ वाचुन दाखवितात.

विषय क्र.३१ :— उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत २ विविध कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :— आमचा विषय वगळण्यासाठी विरोध आहे.

मा.पीठासीन अधिकारी :— सचिव साहेब आपण मतदान घ्यावे.

मा. सचिव :— जे हा विषय वगळण्याच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया हात वर करावेत.

प्रस्ताव वगळण्याच्या बाजुने ८ मते :
१ श्री किशोर वनवारी
२ श्री नारायण पंजाबी
३ श्री नरेंद्रकुमार ठाकुर
४ श्री सतरामदास जेसवानी
५ श्री गणपत एडके
६ श्री सुरेश गायकवाड
७ श्रीमती मोना वनवारी
८ श्रीमती भारती छाब्रिया

मा. सचिव :— जे हा विषय वगळण्याच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया हात वर करावेत.
प्रस्ताव वगळण्याच्या विरोधात ३ मते :
१ श्री रामदास उमाप
२ श्रीमती नंदिनी बामणकर
३ श्रीमती संगिता जावळे,

मा. पीठासीन अधिकारी :— सदरचा प्रस्ताव बहुमताने कार्यसुचीवरुन वगळण्यात येत आहे.

(विषय क्र.३१ :— उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत २ विविध कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.)

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. ३२ वाचुन दाखवितात.

विषय क्र.३२ :— उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत उल्हासनगर—४, प्रभाग क. १४ मधील अय्यप्पा बिल्डींग ते शर्मा यांच्या दुकानापर्यंत व्हाया होली फॅमिली शाळा रस्त्याचे कॉक्रिटीकरण करणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :— आमचा विषय वगळण्यासाठी विरोध आहे.

मा.पीठासीन अधिकारी :— सचिव साहेब आपण मतदान घ्यावे.

मा. सचिव :— जे हा विषय वगळण्याच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया हात वर करावेत.

प्रस्ताव वगळण्याच्या बाजुने ८ मते :

१ श्री किशोर वनवारी
२ श्री नारायण पंजाबी
३ श्री नरेंद्रकुमार ठाकुर
४ श्री सतरामदास जेसवानी
५ श्री गणपत एडके
६ श्री सुरेश गायकवाड
७ श्रीमती मोना वनवारी
८ श्रीमती भारती छाब्रिया

मा. सचिव :— जे हा विषय वगळण्याच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया हात वर करावेत.

प्रस्तावा वगळण्याच्या विरोधात ३ मते :

१ श्री रामदास उमाप
२ श्रीमती नंदिनी बामणकर
३ श्रीमती संगिता जावळे,

मा. पीठासीन अधिकारी :— सदरचा प्रस्ताव बहुमताने कार्यसुचीवरुन वगळण्यात येत आहे.

(विषय क्र.३२ :— उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत उल्हासनगर—४, प्रभाग क. १४ मधील अय्यप्पा बिल्डींग ते शर्मा यांच्या दुकानापर्यंत व्हाया होली फॅमिली शाळा रस्त्याचे कॉक्रिटीकरण करणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.)

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. ३३ वाचुन दाखवितात.

विषय क्र.३३:– राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत उल्हासनगर–३ क्षेत्रातील घोषित झोपडपट्टयांना दिवाबत्ती सुविधा पुरविणेकामी प्रशासनास लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

काही सदस्य : विषय वगळा.

मा. पीठासीन अधिकारी :– सदरचा प्रस्ताव सर्वानुमते कार्यसुचीवरुन वगळण्यात येत आहे.

**( विषय क्र.३३:– राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत उल्हासनगर–३ क्षेत्रातील घोषित झोपडपट्टयांना दिवाबत्ती सुविधा पुरविणेकामी प्रशासनास लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे).**

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :– विषय क्र. ३४ वाचुन दाखवितात.

विषय क्र.३४ :– राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत उल्हासनगर–४ क्षेत्रातील घोषित झोपडपट्टयांना दिवाबत्ती सुविधा पुरविणेकामी प्रशासनास लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

काही सदस्य : विषय वगळा.

मा. पीठासीन अधिकारी :– सदरचा प्रस्ताव सर्वानुमते कार्यसुचीवरुन वगळण्यात येत आहे.

**( विषय क्र.३४ :– राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत उल्हासनगर–४ क्षेत्रातील घोषित झोपडपट्टयांना दिवाबत्ती सुविधा पुरविणेकामी प्रशासनास लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.)**

आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी :– याशिवाय प्रशासनाच्या वतीने आजच्या बैठकीत एक आयत्या वेळचा विषय आणला असुन आपली संमती असल्यास तो आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करता येईल.

मा. पीठासीन अधिकारी :– सदरचा विषय सर्वानुमते सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यात येत आहे.

मा. सचिव :– विषय क्र. ३५ वाचुन दाखवितात.

आयत्यावेळचा विषयः–

विषय क्र.३५ :– कुटुंबकल्याण विशेष मोहिम राबविणेसाठी प्रोत्साहनपर अनुदानासाठी खर्चास मान्यता देणे.

काही सदस्य :– पास, पास..........

मा.पीठासीन अधिकारी :– सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना :

**विषय क्र.३५ :–** कुटुंबकल्याण विशेष मोहिम राबविणेसाठी प्रोत्साहनपर अनुदानासाठी खर्चास मान्यता देणे.

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १.१.२००५ ते ३१.३.२००५ या कालावधीत कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया मोहिम जाहिर केली असुन या मोहिमे अंतर्गत कुटूंब कल्याण शस्त्रक्रियांची उद्‌दीष्टे पुर्ण करण्याचे आदेश प्राप्त झाले आहेत. सदर मोहिमेचा आढावा मा. आयुक्त कोकण विभाग हे नियमीतपणे घेतात. उल्हासनगर महापालिकेस सन २००४–२००५ या वर्षासाठी कुटूंब कल्याण शस्त्रक्रियांची उद्‌दीष्ट ३७५० इतके देण्यात आले असुन अद्याप २००० शस्त्रक्रिया होणे बाकी आहे.

कुटूंब कल्याण शस्त्रक्रियांची उद्‌दीष्टे पुर्तीसाठी लाभार्थीना प्रोत्साहनपर भेट वस्तु म्हणुन संसारोपयोगी भांडी दिल्यास तसेच या कार्यक्रमात एकात्मीक बाल विकास सेवा योजनेतील अंगणवाडी कार्यकर्ती यांना प्रोत्साहात्मक रक्कम देवुन त्यांचा सहभाग घेतल्यास त्याचा योग्य प्रकारे फायदा होऊ शकेल.

त्या अनुषंगाने या मोहिम कालावधीत शस्त्रक्रिया करून घेणा–या स्त्री व पुरूषास प्रत्येकी रू. २५०/– ची गृहपयोगी भांडी देण्याचे प्रस्तावित करण्यात येते. सदर प्रोत्साहनात्मक योजनेसाठी रू. ५०००००/– (रू.२५०/– X २००० लाभार्थी) इतका खर्च अपेक्षित आहे.

तसेच शहरातील १०४ अंगणवाडी कार्यकर्तीना कुटुंब कल्याण शस्त्रक्रियासाठी लाभार्थीना प्रवृत्त करण्यासाठी प्रत्येक लाभार्थीमागे रू. १००/– इतकी रक्कम प्रोत्साहनात्मक देण्यात प्रस्तावित करण्यात येते. अंगणवाडी कार्यकर्तीनी १००० लाभार्थी प्रवृत्त केल्यास त्यांना त्यापोटी अंदाजे रू. १०००००/– (रू. १००/– X १००० लाभार्थी) इतका खर्च अपेक्षित आहे. या प्रमाणे खर्च मंजुरीसाठी मा. स्थायी समिती समोर सदरचा प्रस्ताव प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १५७ — दिनांक:– २७.१.२००५

सुचकाचे नाव :– श्री. नारायण पंजाबी
अनुमोदकाचे नाव :– श्री. रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात दि. १/१/२००५ ते ३१/३/२००५ या कालावधीत कुटूंब कल्याण विशेष मोहिम राबविण्यासाठी शस्त्रक्रिया करुन घेणा–या स्त्री व पुरुषास प्रत्येक रु २५०/– प्रमाणे २००० लाभार्थ्यांसाठी रु ५ लक्ष व अंगणवाडी कार्यकर्तीना लाभार्थीना प्रवृत्त करण्यासाठी रु १००/– प्रमाणे १००० लाभार्थ्यांसाठी रु १ लक्ष असे एकुण रु ६ लक्ष अनुदानास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ६. ०० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. पीठासीन अधिकारी यांनी जाहीर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक :—२ फेब्रुवारी, २००५

## दिनांक ०२/०२/२००५ रोजी घेण्यात आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरुवार दिनांक ०२/०२/२००५ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात आयोजित करण्यात आली होती सदर सभेस खालील दर्शविलेले सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या

०१) मा.सभापती :—श्रीमती ज्योती कालानी.
०२) श्री वनवारी किशोर नारायणदास
०३) श्री एडके गणपत गोविंद
०४) श्री गायकवाड सुरेश नामदेव
०५) श्रीमती जावळे संगिता रमेश
०६) श्रीमती वनवारी मोना अशोक
०७) श्री. साधवानी मोहन रहंदोमल
०८) श्री. उमाप रामदास राघोजी
०९) श्रीमती छाब्रिया भारती पहलाज
१०) श्री जेसवानी सतरामदास फतनदास
११) श्री पंजाबी नारायण सन्मुखदास
१२) श्रीमती बामणकर नंदिनी गजानन

तर,

०१) श्री. बेहरानी मोहन , ०२) श्री संजय बठिजा, ०३) श्री. सोनवणे नथु काशिराम, ०४) श्री ठाकुर नरेंद्र केवलराम (कुमारी) , हे सभेस अनुपस्थित होते.

सायंकाळी ४. २५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यात आले.

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :—</u> आज मा. प्रभारी आयुक्त श्री.आर.के.सोनवणे साहेब यांचा वाढदिवस आहे मी अधिकारीवर्गातर्फे त्यांचे अभिनंदन करतो.

यावेळी मा. सभापती व उपस्थित सदस्यांनी पुष्पगुच्छ देवुन आयुक्तांचे अभिनंदन केले.

<u>मा. सचिव :—</u> आज आपल्यापुढे कामकाजासाठी दोन विषय असुन ते पुढीलप्रमाणे आहेत.

<u>विषय क्र. १ </u>: करांचे दर प्रस्तावित करणे व सन २००५—०६ साठी अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणे..

<u>विषय क्र. २</u> : उल्हासनगर महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाच्या अर्थसंकल्पीय अंदाज विचारात घेणे

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री आर् के सोनवणे):—</u> मा सभापती, मा सदस्य, महापालिका सचिव तसेच उपस्थित सर्व विभागप्रमुख यांना मी उल्हासनगर महानगरपालिकेचे सन २००४—०५ चे जमा खर्चाचे

सुधारित अंदाजपत्रक व सन २००५—०६ चे अंदाजपत्रक प्रशासनाच्या वतीने मा. सभापतींना देत आहे व सभागृहाच्या पटलावर ठेवत आहे

मा. स्थायी समिती सभापती श्रीमती. ज्योति सुरेश कलानीजी, सर्व सन्माननीय सदस्य उल्हासनगर महानगरपालिकेचा सन २००४—०५ चा सुधारीत अंदाज व सन २००५—०६ साठी उत्पन्न व खर्चाचे अंदाज आपणासमोर निवेदित करीत आहे. माझे निवेदन काहीसे कठोर. भासल्यास आपण त्यातील फक्त भावना समजावी व कठोर शब्द प्रयोग विसरुन जावेत, अशी नमनालाच प्रार्थना करतो.

या पुर्वी वेळोवेळी प्रशासनाने सुचविलेली कर दरवाढ नामंजूर करुन आपण या शहरातील नागरीकांवर अंनत उपकार केले आहेत, अशी भावना लोकप्रतिनिधींमध्ये निर्माण झाल्याचे चित्र दिसून येते. तथापि, वस्तुस्थिती वेगळी असून लोकप्रतिनिधींनी पुर्वी सवंग लोकप्रियतेसाठी घेतलेले निर्णय शहराच्या विकासाला मारक ठरले असून महानगरपालिकेची आर्थिक घडी विस्कळीत होण्यास कारणीभूत झाले आहेत. एका बाजूला कर दरवाढ करण्यास नकार देणे, कर आकारणी व वसुलीसाठी कठोर उपाययोजना केल्यास त्यास विरोध करणे व दुस—या बाजुला विकास कामे होत नाहीत म्हणून प्रशासनावर टीका करणे या दुटप्पी भुमिकेस लोकप्रतिनिधींनी तिलांजली देणे आवश्यक आहे.

कर्जमुक्त व ऋणमुक्त महानगरपालिका हे प्रशासनाचे स्वप्न आहे. सदर स्वप्न साकार करण्यासाठी अर्थसंकल्पिय अंदाजामध्ये काही तरतुदी सुचविण्यात आलेल्या आहेत. महानगरपालिकेच्या स्थापनेपासून अद्यापपर्यंत कर्जाच्या थकबाकीपासून महापालिका मुक्त होवु शकेलेली नाही. त्यामुळे या आर्थिक वर्षातही कर्जमुक्तीची संकल्पना प्रत्यक्षात येईल किंवा नाही याबाबतीत आपण सर्वच साशंक आहोत..

प्रशासनाचे कर दरवाढीचे प्रस्ताव लोकप्रतिनिधींना पचनी पडणारे नाहीत याची जाणीव असूनही कर्तव्य भावनेतून नव्हे तर शहर विकासासाठीची दुरदृष्टी व सामाजिक बांधिलकेच्या भावनेतून सदरचे प्रस्ताव सुचविण्यात आले आहेत.

. सन २००४—०५ चे सुधारीत व सन २००५—०६ उत्पन्न व खर्चाचे अंदाज तसेच मागच्या वर्षी अर्थसहाय्य देवुन पुरविलेल्या सेवाबाबतचा अहवाल स्थायी समितीच्या समोर अंदाजपत्रक तयार करण्याच्या प्रयोजनार्थ मी सादर करीत आहे.

<u>सन २००४—०५ च्या अर्थसंकल्पातील सुधारीत तरतुदी : ——</u>

सन २००४ —०५ या चालू वर्षाच्या मूळ अंदाजपत्रकात एकूण रु. १८५.५० कोटी एवढी जमा रक्कम अपेक्षित होती व एकूण रु. १८५.३५ एवढा खर्च गृहीत अंदापत्रकास मा. महासभेची मंजुरी प्राप्त झाली होती. चालू वित्तीय वर्षाचा सुधारीत आराखडा तयार करण्यात आला असून त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

(आकडे लाखात )

| उत्पन्न | | | खर्च | | |
|---|---|---|---|---|---|
| लेखा शिर्ष | महासभा अंदाज | सुधारीत अंदाज | लेखा शिर्ष | महासभा अंदाज | सुधारीत अंदाज |
| आरंभीची शिल्लक | २ | ३२३ | पगार भत्ते व इ. प्रशासकीय खर्च | ३२८५ | ३१७१ |
| | | | म.औ. वि. म. | ३३३५ | ३३४० |
| | | | | | |
| जकात | ५९२५ | ६३५३ | भुयारी गटार कर्ज परतफेड | ११७५ | –– |
| | | | पाणी पुरवठा योजना कर्ज परतफेड | ११३८ | –– |
| | | | हुडको कर्ज परतफेड | ४२ | ११२ |
| मालमत्ता कर | ५००० | २३०० | एम.एम.आर.डी.ए कर्ज परतफेड | २६५ | २६५ |
| | | | दिवा बत्ती बीले | २४० | २५० |
| | | | कचरा वाहतूक व जंतू नाशके इ खर्च | ६३१ | ५०१ |
| | | | शिक्षण मंडळ | ५७३ | ५०५ |
| पाणी पुरवठा | ४५०० | १५०० | शासकीय व इतर देणी | १४४७ | ५६२ |
| | | | दिवा बत्ती खाते | १४६ | १०० |
| | | | उद्याने | ३५ | २९ |
| अनुदाने | ८७२ | ५४७ | अग्निशमन | ६० | ९ |
| | | | डिस्पेंसरी व आरोग्य विषयी कार्यक्रम | ११४ | ५७ |
| | | | पाणी पुरवठा | ११८५ | ४४९ |
| | | | भुयारी गटार | २१३ | १११ |
| | | | जल नि:सारण खाते | २१५ | १७७ |
| | | | बांधकाम खाते | ३८८७ | १९५० |
| | | | प्रभाग समित्या | ३०८ | २१९ |
| इतर | २२५१ | १००४ | इतर | २४१ | २०३ |
| **एकुण** | **१८५५०** | **१२०२७** | **एकुण** | **१८५३५** | **१२०१०** |

स्थायी समितीने तयार केलेले अर्थसंकल्प अवास्तव असल्याने व त्याप्रमाणात उत्पन्न येत नसल्याने आर्थिक तुट मोठया प्रमाणात वाढत असल्याचे दिसून येते. अंदाजपत्रकात विविध कामाच्या तरतुदी असल्याने कामे प्रस्तावित केली जातात व त्यांना मंजुरी दिली जाते. परंतू त्या प्रमाणात उत्पन्न प्राप्त न झाल्याने आपण दरवर्षी उत्पन्नापेक्षा जास्त आर्थिक दायित्व ओढवून घेतले आहे.

## वित्तीय वर्ष सन २००५ –२००६ च्या उत्पन्न व खर्चाचे अंदाज

सन २००५–२००६ या वित्तीय वर्षाच्या उत्पन्न व खर्चाचे अंदाज खालील प्रमाणे अपेक्षीत आहेत

(आकडे लाखात )

| उत्पन्न | | खर्च | |
|---|---|---|---|
| लेखा शिर्ष | प्रशासनाचे अंदाज | लेखा शिर्ष | प्रशासनाचे अंदाज |
| आरंभीची शिल्लक | १७ | पगार भत्ते व इतर प्रशासकीय खर्च | ३२९२ |
| | | म.औ.वि.म. | ३३४० |

| | | | |
|---|---|---|---|
| जकात | ७२०० | भुयारी गटार कर्ज परतफेड | १३७० |
| | | पाणी पुरवठा योजना कर्ज परतफेड | १२६३ |
| | | हुडको कर्ज परतफेड | ४० |
| मालमत्ता कर | २३०० | एम.एम.आर.डी.ए कर्ज परतफेड | २६५ |
| | | दिवा बत्ती बीले | २५० |
| | | कचरा वाहतूक व जंतू नाशक इ. खर्च | ५६५ |
| | | शिक्षण मंडळ | ५४७ |
| पाणी पुरवठा | १५०० | शासकीय व इतर देणी | ५७४ |
| | | दिवा बत्ती खाते | १०० |
| | | उद्याने | ३९ |
| अनुदाने | ६५९ | अग्निशमन | ३७ |
| | | डिस्पेंसरी व आरोग्य विषयी कार्यक्रम | १११ |
| | | पाणी पुरवठा | ६३४ |
| कर्ज | ३५० | भुयारी गटार | २०२ |
| | | जल नि:सारण खाते | ५७५ |
| इतर | ६३७ | | |
| | | बांधकाम खाते | २५२९ |
| | | प्रभाग समित्या | १५२ |
| | | इतर | २८५ |
| *एकुण* | १२६६३ | *एकुण* | १६१७० |

## जमा बाजुची वैशिष्टे :—

*भिक्षापात्र अवलंबिणे । जळो जिणें लाजिरवाणें ।*
*ऐसियास नारायणें । उपेक्षिजे सर्वथा ॥*

असे संत तुकाराम महाराज यांनी म्हटले आहे.

कोणत्याही व्यक्तीने भिक्षा मागून जगणे जसे लाजिरवाणे आहे तसेच कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेने उत्पन्नाचे स्वत:चे स्त्रोत विकसीत न करता शासकीय अनुदान अथवा कर्ज यावर अवलंबून राहून विकास कामे हाती घेणे अव्यवहार्य आहे. विकासकामांसाठी कर्ज घेणे अपरिहार्य असले तरी त्या कर्जाची परतफेड करण्यासाठी उत्पन्नाचे सध्याचे स्त्रोताचा पर्याप्त वापर करणे व नविन स्त्रोत शोधणे ही प्रशासनाची व लोकप्रतिनिधींची वैधानिक जबाबदारी आहे. .ही बाब लक्षात घेवुन जकात, मालमत्ता कर व पाणीपटटी, महानगरपालिकेच्या मालमत्ता या उपलब्ध स्त्रोतांच्या माध्यमातून महसुली उत्पन्न वाढविण्यासाठी प्रशासनाने खालील प्रस्ताव सुचविले आहेत.

१) जकात :—

माहे २५ जुलै, २००४ पासून महानगरपालिकेने जकात वसुली स्वत: करण्याचे ठरविले. सन २००४ — ०५ या आर्थिक वर्षात प्रचलीत दराने वसुली केल्यास महापालिकेस जकातीपासुन रु. ७२ कोटी इतका महसुल प्राप्त होईल असा विश्वास वाटतो. महापालिकेने खाजगी अभिकर्त्यापेक्षा जास्त जकात वसुली केली ही बाब प्रशंसनीय आहे. तथापि, गेल्या काही वर्षातील थकबाकीच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी जकात दरात वाढ सुचविली आहे. सदर दरवाढीमुळे रु. २० कोटी इतके वाढीव उत्पन्न प्राप्त होईल.

२) मालमत्ता कर व पाणी पटटी :—

चालू वर्षी मालमत्ता कर व पाणीपट्टी या पासून रु. ३८ कोटी इतके उत्पन्न अपेक्षित असून सदरचे उत्पन्न एकुण मागणीच्या तुलनेत अत्यल्प .आहे. कर निर्धारण न झालेल्या मालमत्तांचे सर्वेक्षण करुन त्याचे उचित मुल्य निर्धारण करण्यासाठी प्रशासनामार्फत सातत्याने प्रयत्न सुरु आहेत.तथापि मागील काही वर्षांची थकीत देयके प्रदान करणे व भांडवली कामासाठी निधी उपलब्ध व्हावा म्हणून त्यात दरवाढ सुचविली आहे. सदर दरवाढीमुळे रु ६.६० कोटी इतके वाढीव उत्पन्न प्राप्त होईल.

अ) मालमत्ता कर :–

सध्या करयोग्य मुल्याच्या २६ टक्के दराने सामान्य कर आकारला जातो. मालमत्ता करात समाविष्ट असणा–या खालील करांमध्ये वाढ प्रस्तावित आहे.

२–अ–१) पथकर (Street Tax)

अधिनियमाच्या कलम १४८ (क) मधील तरतुदीनुसार सार्वजनिक रस्ते, पुल, भुयारी मार्ग बांधणे त्यांची निगरानी ठेवणे व त्यात सुधारणा करणे. या प्रयोजनासाठी पथकर बसविण्याची तरतुद आहे. सध्या सदर कर करयोग्य मुल्याच्या ३ टक्के इतका आकारला जातो परंतू एकात्मिक रस्ते विकास टप्पा क्र १ या अंतर्गत ४२ कोटी रुपये खर्च अपेक्षित असून त्यासाठी रु. १६.५ कोटीचे कर्ज मुंबई महानगर विकास प्राधिकरणाचे आहे व रु. २ कोटी ६४ लाख प्रतिवर्षी भरावे लागतात. म्हणून रस्ता कर दरामध्ये दरवाढ प्रस्तावित असून करयोग्य मुल्याच्या १० टक्के दराने आकारण्यात यावी, असे प्रस्तावित आहे.

२–अ–२) *मलप्रवाह कर :–*

मलप्रवाह कर किंवा साफसफाई कर बसविण्याबाबतचा तपशिल अधिनियमाच्या कलम १३१ मध्ये देण्यात आलेला आहे. सध्या करयोग्य मुल्याच्या ५ टक्के दराने हा कर आकारला जातो. यामध्ये दरवाढ प्रस्तावित नाही.

२–अ–३) *मलप्रवाह सुविधा लाभ कर :–*

सध्या या कराचा दर कराच्या मुल्याच्या १ टक्के आहे. महापालिकेने भुयारी गटार योजना राबविण्यासाठी रु. ११.८४ कोटी कर्ज उभारणी केली होती व त्यापोटी सध्या महापालिकेस प्रतिवर्षी रु. १ कोटी कर्जफेड करावी लागत आहे. म्हणून सदर कर्जात वाढ करुन तो ३ टक्के करावा असे प्रस्तावित आहे. म्हणजे सदर वाढीपोटी वार्षिक ७४ लाख रुपये मिळण्याची शक्यता आहे.

२–अ–४) *पाणीपुरवठा लाभ कर :–*

महापालिकेने साधारणत: २५ कोटी रुपये खर्चाची पाणी पुरवठा योजना टप्पा क्र. १ राबविली आहे. यासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी सदर कर करयोग्य मुल्याच्या ५ टक्के लावण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

२–अ–५) *अग्निशमन लाभ कर :–*

अग्निशमन पथक योग्य त्या यंत्रसामुग्रीसह सुसज्ज ठेवण्यासाठी अग्निशमन कर २ टक्के प्रस्तावित करण्यात येत आहे.

२–अ–६) *विशेष साफसफाई कर :–*

महापालिका हद्दीत हॉटेल्स्, हॉस्पीटल्स्, तबेले, मंगलकार्यालय इ. मालमत्ताद्वारे मोठया प्रमाणात कचरा निर्माण होतो म्हणून अशा मालमत्तांवर करयोग्य मुल्याच्या १० टक्के विशेष साफसफाई कर आकारण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

महसुली उत्पन्न वाढविण्यासाठी नविन मिळकती शोधून त्यावर कर आकारणी करणे, जुन्या मिळकतींच्या वापरात बदल झाला असल्यास अथवा त्यात वाढ / घट झाली असल्यास पुर्ननिर्धारण करणे आवश्यक आहे. आपल्या मालमत्तेचे योग्य कर निर्धारण करुन घेण्यासाठी व करांचा वेळच्या वेळी भरणा करण्यासाठी नागरीकांनी स्वत:हून पुढे येणे अपेक्षित आहे. तसेच नागरीकांची मानसिकता बदलण्यासाठी लोकप्रतिनिधींनी प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे.

*(२–ब) पाणीपट्टी :–*

महापालिकेचे स्वत:चे पाण्याचे स्त्रोत नसल्याने आपल्याला महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून साधारणत: १२० एम.एल.डी पाणी दररोज खरेदी करावे लागत आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने पाण्याच्या दरात अवास्तव वाढ केल्याने त्याचा आर्थिक बोजा महापालिकेवर पडत आहे, चालू वर्षामध्ये पाणीपुरवठा विभागामार्फत मिळणारे एकूण उत्पन्न १२.५४ कोटी असून खर्च मात्र रु. ३६.९७ कोटी इतका आहे. म्हणजेच रु. २४.४३ कोटीची सरळ तूट दिसून येते.

महापालिका शहरातील नागरीकांकडून आकारत असलेली पाणीपट्टी व आपण म.औ.वि. महामंडळास अदा करीत असलेली देयके यामध्ये प्रचंड तफावत आहे. सदर तफावत दुर करण्यासाठी इतर स्त्रोतातून प्राप्त होणा—या उत्पन्नातून अर्थसहाय्य द्यावे लागत असल्याने विकासकामांना खीळ बसत आहे. तसेच महापालिका टॅंकरद्वारे विनाशुल्क पाण्याचा पुरवठा काही ठिकाणी करत असल्यामुळे त्याचाही आर्थिक भार महापालिकेवर पडतो. पाणीपुरवठा विभागातील कर्मचा—यांवरील आस्थापना खर्च, कुपनलिका देखभाल दुरुस्ती उंदचन केंद्रे, विद्युत देयके, जलवाहिन्या दुरुस्ती इ. बाबीवर मोठया प्रमाणात खर्च होत असल्याने महापालिकेची आर्थिक स्थिती डबघाईला येण्याची शक्यता नाकारता येत नाही. उत्पन्न व खर्चातील तफावत दुर करण्यासाठी पाणीपुरवठयाच्या दरामध्ये वाढ करणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे रु. ८.६१ कोटी दरवाढीचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

*(३) महानगरपालिका स्थावर मालमत्तांपासून उत्पन्न :—*

महानगरपालिकेने विकसीत केलेले भाजी मंडई, व्यापारी गाळे, टाऊन हॉल, जलतरण तलाव, क्रीडांगणे इ. पासून रु. २५ लक्ष इतका महसूल महानगपालिकेस प्राप्त होईल असा अंदाज आहे.

*(४) विशेष अधिनियमाखालील वसुली :—*

खाजगी मालमत्तेंचा विकास करतांना विकासकांनी द्यावयाच्या अधिभारापोटी मागील वर्षी रु. २२ लक्ष महसुल प्राप्त झाला. सन २००५—०६ मध्ये यापासून रु. २४ लक्ष इतका महसूल प्राप्त होईल असा अंदाज आहे.

## खर्चाच्या बाजुची वैशिष्टे:—

१) प्रशासकीय खर्च व संगणकीकरण :—

कर्मचा—यांचे वेतन व महागाई भत्यात दिवसेंदिवस वाढ होत असल्यामुळे प्रशासकीय खर्चात देखील वाढ होत आहे. मागील वर्षाच्या तुलनेत या वर्षी कर्मचा—यांचे वेतन व भत्ते यामध्ये रु. १.२५ कोटी इतकी वाढ प्रस्तावित केली आहे. . महापालिका मुख्यालयात उभारण्यात आलेले नागरी सुविधा केंद्र सुरु करुन महापालिकेने लोकाभिमुख व प्रशासकीय कामात गतिमानता आणण्याचा एक यशस्वी प्रयत्न केला आहे. संगणकीकरणाच्या माध्यमातून गतिमान, पारदर्शी व लोकाभिमुख प्रशासनाची हमी देण्यासाठी या वित्तीय वर्षात **प्रशासकीय खर्चासाठी रुपये ३३ कोटी एवढी व संगणकीकरणासाठी रु. २० लाख एवढी तरतूद प्रस्तावित करण्यांत** आलेली आहे.

.विद्युत विभागाच्या नेत्रदिपक कामगिरीमुळे उल्हासनगर महानगरपालिका ぁ ९००१ रू २००० हे प्रमाणपत्र प्राप्त करणारी देशातील पहिली महापालिका ठरली आहे, ही बाब खचितच् गौरवास्पद आहे विद्युत विभागाप्रमाणेच सामान्य प्रशासन, घनकचरा व्यवस्थापन व सचिव कार्यालय या विभागांसाठी ぁ प्रमाणपत्र प्राप्त करण्याचा मानस आहे.

२) निर्भय योजना :—

महानगरपालिकेने पाणीपुरवठा व मलनिस्सारण योजनेसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड वेळच्या वेळी न केल्यामुळे रु. १९ कोटीची मुद्दल व व्याजाची थकबाकी असून त्यावर रु.. ६ कोटी इतके विलंब आकार आकारण्यात आलेला आहे. शासनाने निर्भय योजना जाहिर केल्यानंतर सदर योजनेत सहभागी होण्यासाठी महानगरपालिकेने धोरणात्मक निर्णय घेतला. तथापि, अपेक्षित उत्पन्न प्राप्त होवु न शकल्याने या योजनेचा लाभ महानगरपालिका अद्याप घेवु शकली नाही. सदर योजनेचा लाभ प्राप्त व्हावा म्हणून रु. १९ कोटीची तरतूद करणे अनिवार्य आहे.सदर योजनेतर्गत उल्हासनगर महापालिकेचे दायित्व कमी झाल्यास.महापालिकेचे ब्तमकपज त्ंजपदह सुधारण्यास मदत होईल.

३) मागील वर्षाचे दायित्व :—

केवळ अंदाजपत्रकात तरतुद केली म्हणून सी.सी. पॅसेज दुरुस्ती व नविन बांधणी, नाली बांधणी व दुरुस्ती, समाजमंदिर बांधणे एम २५० व एम ३५० चे अंतर्गत रस्ते व पायवाटा बांधणे, कमी

वाहतूक घनता असलेल्या रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणे अशा स्वरुपांच्या अनियोजित व अनावश्यक कामांवर अनियंत्रित खर्च केल्यामुळे महापालिकेचे वित्तीय व्यवस्थापन कोलमडले असून गेल्या काही वर्षात केलेल्या अशा खर्चाची रु. २० कोटीची देयके अद्याप प्रलंबित आहेत. ठेकेदारांनी काम पुर्ण केलेले असल्यामुळे देयक अदा करणे अनिवार्य आहे. यासाठी देखील रु. २० कोटीची तरतुद करणे क्रमप्राप्त आहे.

४) *महसुली व भांडवली कामावरील एकत्रित खर्च :—*

महापालिकेतर्फे हाती घ्यावयाच्या देखभाल व दुरुस्तीच्या विविध कामांसाठी रु..१५ कोटीची तरतुद प्रस्तावित केली आहे. तसेच नगरसेवक निधी, दलितवस्ती सुधारणा योजना, पाणी पुरवठा व मलनिस्सारण, रस्ते बांधणी, उद्यान विकास व इतर भांडवली स्वरुपाच्या कामासाठी रु. १७ कोटीची तरतुद प्रस्तावित केली आहे.

७४ व्या घटना दुरुस्तीनंतर नियोजन प्रक्रियेचे विकेंदीकरण होण्यासाठी व नागरिकांची अत्यावश्यक पालिका सेवांच्या संबंधातील गा—हाणी त्वरेने दुर करण्यासाठी प्रभाग समित्या स्थापन करण्यात आल्या असुन त्यासाठी **४ प्रभाग समित्यांसाठी रु १.५२ कोटीची** तरतुद प्रस्तावीत करण्यांत येत आहे. याशिवाय नगरसेवकांना आपल्या प्रभागात **स्वेच्छानिधी अंतर्गत कामे करण्यासाठी रुपये १.६२ कोटीची तरतुद प्रस्तावित** करण्यांत येत आहे

५) *प्राथमिक शिक्षण :—*

प्राथमिक शिक्षण हे महानगरपालिकेचे घटनात्मक कर्तव्य असून शिक्षण मंडळाचे दैनंदिन कर्तव्य पार पाडण्यासाठी महापालिका वर्गणी म्हणून रु. ५.४७ कोटीची तरतुद सुचविली आहे. याशिवाय जीर्ण झालेल्या इमारतींची दुरुस्ती व नविन वर्ग खोल्या बांधण्यासाठी रु.२.१० कोटीची तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

६) *मनोरुग्ण व कुष्ठरुणांसाठी तरतुद :—*

अधिनियमाचे कलम ६५ अन्वये मनोरुण व कुष्ठरुग्णांच्या निर्वाह व उपचारासाठी तरतुद करणे बंधनकारक आहे. यापुर्वी यासाठी नाममात्र तरतुद केली जात होती. तथापि, या वर्षी त्यात वाढ सुचविली असून रु. २५ लक्ष एवढी तरतुद प्रस्तावित केली आहे.

## *सन २००५ —०६ या अर्थसंकल्पीय वर्षात हाती घ्यावयाचे महत्त्वाचे प्रकल्पाबाबत संक्षिप्त माहिती :—*

१) एकात्मीक सुविधा विकास कार्यक्रम ( Integrated Infrastructure Development Project)

उल्हासनगर शहर हे मुंबई खालोखाल व्यापार व उद्योगाचे महत्त्वाचे केंद्र आहे. शहरातील व्यापार —उद्योगाला चालना मिळण्यासाठी दर्जेदार पायाभुत सुविधा उपलब्ध करुन देणे हे या योजनेचे मुळ उद्दिष्ट आहे.

१—अ) पाणी पुरवठा व मलनिस्सारण :—

सध्या महानगरपालिका पाणीपुरवठयासाठी म..औ..वि. महामंडळावर अवंलबून आहे. त्यामुळे अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते पाणीपुरवठयात कपात तसेच पाणी दरात अवास्तव वाढ या सारख्या प्रश्नांना महापालिकेला सामोरे जावे लागते म्हणून पाणीपुरवठयासारख्या मुलभूत सुविधेमध्ये स्वंयपुर्ण होण्यासाठी व मलजलाची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी खालील प्रमुख योजना हाती घेतल्या आहेत.

१—अ—१) पाणी पुरवठा योजना टप्पा क्रमांक —१ :—

उल्हासनगर शहरातील उंच सखल भागात सम प्रमाणात पाणीपुरवठा करण्यासाठी मे. किर्लोस्कर तांत्रिक सल्लागार, पुणे. यांचेमार्फत करण्यात आलेल्या तांत्रिक अहवालानुसार कामे हाती घेण्यात आली होती. सुधारीत वित्तीय आकृतीबंधानुसार महापालिकेने लोकवर्गणीची भरणा केली असून याबाबतचा प्रस्ताव मंजुरीसाठी राज्य शासनाकडे पाठविला आहे. परंतू अद्याप यास प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली नाही.

१.अ—२) स्वत:चे स्त्रोत असलेली उल्हासनगर पाणी पुरवठा योजना टप्पा क्रमांक —२ (उल्हास नदी उद्भव) :—

याबाबतच्या निविदा तयार करण्यात येवुन त्यांना प्रसिध्दी देण्यात आली आहे. याद्वारे 'सवलत करार' तत्वावरचा प्रकल्प उभारण्यासाठी अभिकर्ता निश्चितीची प्रक्रीया अंतिम टप्प्यात आहे. याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येवुन स्वत:ची पाणीपुरवठा योजना हे स्वप्न साकारले जाईल व ज्यायोगे महापालिकेस महाराष्ट्र

औद्योगिक विकास महामंडळाला नियमीतपणे द्याव्या लागणा—या अवास्तव पाणी देयकाच्या रक्कमेत मोठी बचत होईल व महापालिकेला विकासासाठी निधी उपलब्ध होवू शकेल, असा विश्वास आहे. ही योजना पाणीपुरवठयात सुधारणा करण्याबरोबर वित्तीय व्यववस्थापनाला संजीवनी देणारी ठरेल असा आशावाद वाटतो.

*१—अ—३) व्यवस्थापन करार तत्वावर पाणी वितरण :—*

सध्या उल्हासनगर महापालिकेला पाणी वितरणासाठी ६ कोटी रुपये खर्च करते तरी देखील शहराच्या सर्व भागात समान वितरण होवू शकत नाही म्हणून स्वत:चा स्त्रोत विकसित करण्याबरोबरच नविन जलवाहिन्या टाकणे, जलवाहिन्या दुरुस्त करणे व पाणी वितरणासाठी व्यवस्थापन करार पध्दतीचा (Management Contract) अवलंब करणे प्रस्तावित आहे. या अन्वये पाणी गळती व पाणीचोरी यावर खाजगी अभिर्कत्याचे नियंत्रण राहील . या खाजगी अभिकर्त्यामार्फत नविन नळजोडण्या, नविन मीटर बसविणे, अनधिकृत नळजोडण्या खंडीत करणे अथवा नियमित करणे, अनधिकृत नळजोडण्यांचा शोध घेणे, पाण्याची देयके तयार करणे व वसुल करणे, पाणी वितरणातील गळती व चोरी बंद करणे, इ. कामे पार पाडण्यात येतील पर्यायाने पाणी या राष्ट्रीय संपत्तीची बचत होवू शकेल.

*१—ब) भुयारी गटार योजना दुरुस्ती व विस्तार :—*

उल्हासनगर शहरासाठी भुयारी गटार योजनेचे काम सन १९९४ मध्ये पुर्ण करण्यात आले असून त्यातर्गत ११५ कि.मी. लाबींच्या मलवाहिन्या व २८ द.ल.लि. क्षमतेचे मलप्रक्रीया शुध्दीकरण केंद्र कार्यान्वित आहे. तथापि, सदर योजना पुर्ण क्षमतेने कार्यरत नाही. मलवाहिन्या तुटलेल्या असून खाजगी मिळकतींचे मलजल त्यास पुर्णपणे जोडलेले नाहीत त्यामुळे शहरात गॅस्ट्रो, कॉलरा, विषमज्वर व हिवताप या सारखे आजार उद्‌भवतात. भुयारी गटार योजना शहरातील सर्व भागासाठी राबविणे अनिवार्य असल्यामुळे अस्तित्वातील योजनेचा विस्तार करणे प्रस्तावित आहे. सध्या शहराची लोकसंख्या व दैनंदिन होणारा पाणीपुरवठा लक्षात घेता ८० द.ल.लि. क्षमतेचे मलप्रक्रीया केंद्र उभारावे लागेल. सदर मलप्रक्रीया केंद्रात पाण्यावर प्रक्रीया करुन त्याचा पुर्नवापर शहरातील उद्योगांसाठी केल्यास शहरातील दैनंदिन पाणीपुरवठयात देखील बचत होवु शकेल.

## २) रस्ते बांधणी व सुशोभिकरण , वाहन तळ व व्यापारी संकुल उभारणे :—

*२—अ ) रस्ते व वाहनतळ :—*

सन १९७४ च्या मंजूरविकास आराखडयानुसार शहरातील रस्त्यांची लांबी १२० कि.मी. इतकी असून त्यापैकी फक्त ३० कि.मी. लांबीचे रस्ते विहित निकषानुसार विकसीत करण्यात आलेले आहेत. उर्वरित रस्त्यांचा विकास करण्यासाठी D.P.S (Deferred Payment Scheme) योजनेमार्फत करण्यास महासभेने मागील वर्षी तत्वत: मंजुरी दिलेली आहे. .शहाड स्टेशन, विठ्ठलवाडी व उल्हासनगर रेल्वेस्थानकाबाहेर महापालिका हद्‌दीत वाहनतळ उभारण्याच्या कामासाठी प्राथमिक अभ्यास पुर्ण झाला असून, निविदा प्रक्रीया सुरु आहे तसेच मागील वर्षी महानगरपालिकेने मंजुरी मिळालेल्या रस्त्यांचा क्ण्च्रौण (कालातंराने रक्कम अदा करण्याच्या योजने) द्वारे विकास करण्यासाठी निविदा मागविण्यात येत आहेत.

२.ब—१) पथदिवे व शहर सुशोभिकरण :—

महापालिका क्षेत्रातील रस्त्यांच्या सुशोभिकरणासाठी व नागरीकांच्या सुरक्षिततेसाठी विद्युत विभागामार्फत पथदिव्यांची निगरानी ठेवण्यात येते.शहरातील चौक विकसित करणे, चौकांमध्ये प्रवासी बेटे निर्माण करणे, हायमास्ट उभारणे इत्यादी स्वरुपाची कामे प्रस्तावित आहेत.

२.ब—२) सौर—पवन संकरित उर्जा प्रकल्प :—

उर्जा बचतीसाठी नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रात सौर उर्जा प्रकल्प उभारणे सक्तीचे करण्याचा निर्णय राज्य शासनाने अलिकडेच घेतला आहे. उल्हासनगर महानगरपालिकेने मात्र यापुर्वीच १० K.W. क्षमतेचा सौर—पवन संकरित उर्जा पथदर्शी प्रकल्प उभारुन यशस्वीपणे कार्यान्वित केला आहे या वर्षी नविन १० K.W. क्षमतेच्या प्रकल्पाला मंजुरी प्राप्त झालेली आहे. या प्रकल्पासाठी रु. २० लक्ष एवढे अनुदान देखील केद सरकारकडून मंजुर झाले आहे.

३) <u>सार्वजनिक उद्याने, क्रीडांगण, सामाजिक विकास केंद्र व व्यापारी संकुल विकसीत करणे :—</u>

महानगरपालिकेकडे भांडवली कामांसाठी निधी नसल्यामुळे विकास आराखडयातील उद्यानासाठी राखीव भुखंड, व्ही.टी.सी. येथील क्रीडासंकुल, विकास आराखडयातील क्रीडांगण व सामाजिक केंद्रासाठी आरक्षित भुखंड इत्यादींचा सेवा भावी संस्था किंवा 'बांधा वापरा व हस्तांतरीत करा' या तत्त्वावर विकास करणे प्रस्तावित आहे.

४) *<u>माहिती तंत्रज्ञान व मनोरंजन केंद्र</u>* :—

शहाड रेल्वे स्थानकाजवळील भुखंडावर व्यापारी संकुल उभारण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प बि.ओ.टी. तत्वावर हाती घेण्याचे प्रस्तावित केले आहे. या प्रकल्पात आय. टी. पार्क, मल्टीप्लेक्स् थियेटर व व्यापारी गाळे विकास हक्क तत्वावर बांधणे प्रस्तावित आहे. या प्रकल्पास मा. महासभेने मंजुरी दिलेली आहे.

५) <u>प्राथमिक शाळा इमारत बांधणी :—</u>

महानगरपालिका क्षेत्रामध्ये १२९ प्राथमिक शाळा असून त्यापैकी महापालिका २८ शाळा चालवित आहे. या शाळांमधून १०८३६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. महानगरपालिका शिक्षण मंडळामार्फत चालविल्या जाणा—या शाळांना इमारती व आवश्यक कर्मचारी पुरविण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. महानगरपालिकेने पुरविलेल्या सध्याच्या इमारती जीर्ण झालेल्या असून त्यामध्ये अत्यावश्यक सुविधांचा अभाव असल्यामुळे दिवसेंदिवस पटसंख्या कमी होत असून शिक्षक अतिरिकत ठरत आहेत. महानगरपालिका शिक्षण मंडळ सध्या चालवित असलेल्या शाळांची संख्या, विद्यार्थी पटसंख्या लक्षात घेता अंदाजे २५० वर्गखोल्यांची गरज आहे.

महापालिका शाळांमधील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी पुढील तीन वर्षामध्ये सर्व शाळांच्या दुरुस्त्या व नवीन इमारतींचे बांधकाम कार्यक्रम हाती घेणे अनिवार्य आहे. अन्यथा, सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण पुरविण्याची स्थानिक स्वराज्य संस्थेवर सोपविलेली घटनात्मक जबाबदारी पार पाडण्यास कसूर केली असा आक्षेप घेतल्यास तो वावगा होणार नाही.

६) <u>सामाजिक सुरक्षा व सामाजीक न्याय योजना :—</u>

महानगरपालिकेच्या आरक्षित भुखंडांचा विकास करतांना शासनाच्या मार्गदर्शक धोरणानुसार पात्र झोपडपट्टीवासियांचे पुर्नवसन करण्याची सामाजिक जबाबदारी महानगरपालिकेची आहे. सर्वच पात्र झोपडपट्टीवासियांचे पुर्नवसन एकाच वर्षात करणे शक्य

नाही. तथापि, पहील्या टप्प्यात साधारणत: ४ हजार घरांची निर्मिती करुन झोपडपट्टीवासियांचे पुर्नवसन करणे न्यायोचित होईल. त्यासाठी वाल्मिकी — आंबेडकर आवास योजना, झोपडपट्टी पुर्नविकास योजना, दलित वस्ती सुधारणा योजना, सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना अशा राज्य व केंद सरकारच्या विविध विकासांच्या योजनाबरोबरच महापालिका निधीमधून काही योजना राबविणे प्रस्तावित आहे.

७) <u>पर्यावरण सुधारणा कार्यक्रम :—</u>

सन २००२—२००३ या वर्षातील पर्यावरण स्थितीचा अहवाल ष्यशदाष या नामंकित संस्थेकडून तयार करुन घेण्यात आला होता. सदर अहवाल महानगरपालिकेने स्विकृत केला असुन त्यात पर्यावरण संवर्धनासाठी सुचविलेल्या उपाय योजनांची अंमलबजावणी करणे वैधानिकदृष्टया बंधनकारक आहे.

७—अ) <u>घन कचरा व्यवस्थापन :—</u>

महापालिका क्षेत्रात निर्माण होणा—या घनकच—याची शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी मौजे कांबा येथील २५ हेक्टर जमिन जिल्हाधिकारी, ठाणे. यांनी मंजुर केली असून तेथे कच—यावर प्रक्रीया करण्याच्या प्रकल्प उभारणे प्रस्तावित आहे.

७—ब) <u>पर्यावरण सनियंत्रण केंद्र उभारणे :—</u>

चालू आर्थिक वर्षात हवा प्रदुषण संनियंत्रण केंद्राचे काम पुर्ण होवु शकले नाही. त्यामुळे सदर प्रकल्प पुढील वर्षात पुर्ण करण्यात येईल.

७—क) <u>नाला बांधणी :—</u>

अंबरनाथ येथील औद्योगिक वसाहतीतून उल्हासनगर स्टेशनजवळून जाणा—या वालधुनी नाल्यामध्ये दुषित व रसायने मिश्रित पाणी सोडले जाते. या दुषित पाण्यामुळे उल्हासनगर मधील रहिवाश्यांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. <u>सदर नाल्याचा 'कालवा व्यवस्थापन' पध्दतीने विकास</u> करण्याचे काम 'यशदा' या संस्थेकडे सोपविले असून सदरच्या कामाची प्राकलने व आराखडे तयार करण्यात येत आहेत.

सन २००४—०५ च्या अर्थसंकल्पात शहर विकासाच्या अनेक योजना प्रशासनाने प्रस्तावित केल्या होत्या परंतू निधी अभावी त्या योजना प्रत्यक्षात येवु शकल्या नाहीत. त्यामुळे या वर्षाचा अर्थसंकल्पही फक्त कागदावरच राहील की काय ? अशी शंका आपल्या मनात येणे साहजिक आहे.

*ओलें मूळ भेदी खडकाचे अंग । अभ्यासासी सांग कार्यसिध्दी ।*
*नव्हे ऐसें काही नाही अवघड । नाहीं कइवाड तोंचि वरि ॥*

या संत वचनावर विश्वास ठेवुन आपण सर्वांनी प्रयत्न केल्यास अर्थसंकल्पातील सर्व संकल्प तडीस जातील व कल्याणकारी, लोकाभिमुख, गतिमान व पारदर्शी प्रशासन देणारी महानगरपालिका असा लौकीक उल्हासनगर महानगरपालिकेस प्राप्त होईल, अशी मी आपणास ग्वाही देतो !

मा. स्थायी समितीने प्रशासनाचे प्रस्ताव व उल्हासनगर शहरवासियांच्या आशा—आकांक्षा विचारात घेवुन सन २००५—०६ साठी वास्तव अर्थसंकल्प तयार करावा यासाठी मी सदीच्छा व्यक्त करतो !

जयहिंद !

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :—</u> मा. आयुक्त साहेबांनी आज स्थायी समितीत अर्थसंकल्प सादर करुन त्यांचे काम पार पाडलेले आहे. परंतु माझी विनंती आहे की, आम्हाला अर्थसंकल्पाच्या प्रती आजच मिळालेल्या असल्याने आम्हाला यावर अभ्यास करणे आवश्यक आहे. यासाठी सदरची सभा २—३ दिवसांसाठी स्थगित केली जावी.

<u>मा. प्रभारी आयुक्त :—</u> करांचे दर हे दिनांक २० फेब्रुवारी पूर्वी निश्चित करणे आवश्यक असते त्यामुळे त्यापूर्वी याला मंजुरी मिळणे आवश्यक आहे. अर्थसंकल्प हा ३१ मार्च पूर्वी पारीत करणे आवश्यक असते.

<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी :—</u> मा. सभापती महोदया सदरची सभा ७/२/०५ पर्यंत स्थगित करावी.

<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :—</u> सदरची सभा वर सुचवल्याप्रमाणे सर्वानुमते दिनांक ७/२/२००५ रोजी सायंकाळी ५—०० वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे

सायंकाळी ५—३० वाजता सभेचे कामकाज दिनांक ७/२/२००५ सायंकाळी ४—०० वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत असल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक :—७ फेब्रुवारी, २००५

## दिनांक ०७/०२/२००५ रोजी घेण्यात आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरुवार दिनांक ०२/०२/२००५ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित करुन सदरची सभा दिनांक ७/२/२००५ रोजी सायंकाळी ४—०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस खालील दर्शविलेले सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या

०१) मा.सभापती :—श्रीमती ज्योती कालानी.
०२) श्री वनवारी किशोर नारायणदास
०३) श्री एडके गणपत गोविंद
०४) श्री गायकवाड सुरेश नामदेव
०५) श्रीमती जावळे संगिता रमेश
०६) श्री संजय बठिजा
०७) श्रीमती वनवारी मोना अशोक
०८) श्री. उमाप रामदास राघोजी
०९) श्री ठाकुर नरेंद्र केवलराम (कुमारी)
१०) श्रीमती छाब्रिया भारती पहलाज
११) श्री जेसवानी सतरामदास फतनदास
१२) श्री पंजाबी नारायण सन्मुखदास
१३) श्रीमती बामणकर नंदिनी गजानन

तर,

१) श्री. बेहरानी मोहन, ०२) श्री. साधवानी माहेन रहंदोमल, ०३) श्री. सोनवणे नथु काशिराम हे सभेस अनुपस्थित होते.

सायंकाळी ४. ३० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यात आले.

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :—</u> आज मा. सभापती महोदया या अनुपस्थित असल्याने सभेचे कामकाज चालविणेसाठी आपल्यापैकी एका सदस्याची सर्वानुमते अथवा बहुमताने पीठासीन अधिकारी म्हणुन निवड करावी लागेल.

<u>मा. सदस्य श्री नरेंद्रकुमार ठाकुर :—</u> श्री किशोर वनवारी यांचे नांव पीठासीन अधिकारी म्हणुन आम्ही सुचवित आहोत.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :—</u> आमचे त्यांच्या नांवाला अनुमोदन आहे.

यावेळी श्री किशोर वनवारी हे पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.

<u>मा. पीठासीन अधिकारी :—</u> आता मा. सभापती महोदया या अनुपस्थित असल्याने सदरची सभा दोन तासांसाठी सर्वानुमते स्थगित करण्यात येत आहे.

सायंकाळी ७—१५ वाजता सभेस पुनश्चः प्रारंभ करण्यात आला.

पीठासीन अधिकारी म्हणुन मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी या उपस्थित होत्या.

<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी :—</u> उमाप साहेब तुमचे काय म्हणणे आहे ते सांगा.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :—</u> अर्थसंकल्पात जी करवाढ सुचविण्यात आलेली आहे तीला आमचा पुर्ण विरोध आहे. आम्ही करवाढीच्या विरोधात आहोत.

<u>मा. सदस्या श्रीमती नंदिनी बामणकर :—</u> आम्ही करवाढीच्या विरोधात आहोत.

<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी :—</u> आपण जर याला विरोध करीत असाल, तर आम्ही देखिल यावर अद्याप सविस्तर अभ्यास केलेला नाही, त्यामुळे सभा दोन दिवसांसाठी स्थगित करण्यात यावी.

<u>मा. सभापती :—</u> सदरचा सभा दोन दिवसांसाठी सर्वानुमते स्थगित करण्यात येत आहे.

सायंकाळी ७—३० वाजता सभेचे कामकाज दिनांक ९/२/२००५ सायंकाळी ४—३० वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत असल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक :—९ फेब्रुवारी, २००५

## दिनांक ०९/०२/२००५ रोजी घेण्यात आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरुवार दिनांक ०२/०२/२००५ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित करुन सदरची सभा दिनांक ७/२/२००५ रोजी सायंकाळी ४—०० वाजता आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर सदर सभेचे कामकाज पुनश्च: स्थगित करुन सदरची सभा दिनांक ९/२/२००५ रोजी सायंकाळी ४—३० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस खालील दर्शविलेले सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या

०१) मा.सभापती :—श्रीमती ज्योती कालानी.
०२) श्री वनवारी किशोर नारायणदास
०३) श्री एडके गणपत गोविंद
०४) श्री गायकवाड सुरेश नामदेव
०५) श्रीमती जावळे संगिता रमेश
०६) श्री. बठिजा संजय रामचंद
०७) श्रीमती वनवारी मोना अशोक
०८) श्री. साधवानी मोहन रहंदोमल
०९) श्री. सोनवणे नथु काशिराम
१०) श्री. उमाप रामदास राघोजी
११) श्री. ठाकुर नरेंद्र (केवलराम) कुमारी
१२) श्रीमती छाब्रिया भारती पहलाज
१३) श्री जेसवानी सतरामदास फतनदास
१४) श्री पंजाबी नारायण सन्मुखदास
१५) श्रीमती बामणकर नंदिनी गजानन

तर,

मा. सदस्य श्री. बेहरानी मोहन हे सभेस अनुपस्थित होते.

सायंकाळी ४. ५५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यात आले.

मा. प्रभारी आयुक्त श्री. आर. के. सोनवणे हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या जागी श्री. संदीप आरोट, उपायुक्त हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन उपस्थित होते.

<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी :—</u> मी सभेस सुरुवात करण्यापूर्वी मा. सभापतींना विनंती करेन की आज आपणांस अर्थसंकल्प मंजुर करुन महासभेसमोर सादर करावयाचा आहे. यासाठी लवकरच महासभेची सूचना देखिल काढावयाची आहे. अर्थसंकल्पावर चर्चा करण्याकरिता आम्ही आज या सभेत विशेष निमंत्रीतांना बोलाविले आहे. आपले शहराचे आमदार मा.श्री.सुरेश (पप्पु) कलानी, व्यापारी वर्गाचे प्रतिनिधीत्व करणारे श्री गिरधर मलाणी व अंबरनाथ नगरपालिकेचे स्विकृत सदस्य श्री नरेंद्र चव्हाण यांना

आम्ही येथे आम्हांस मार्गदर्शन करण्यासाठी व त्यांच्या सूचना/हरकती ऐकुन घेण्यासाठी बोलाविले आहे. तरी मा. सभापती महोदयांनी यासाठी परवानगी द्यावी.

मा. सभापती :– आजच्या सभेत ३ विशेष निमंत्रीत श्री सुरेश कलानी, श्री गिरधर मलाणी व श्री नरेंद्र चव्हाण यांना येण्यासाठी अनुमती देण्यात येत आहे.

मा. सदस्य श्री किशोर वनवारी :– विरोधी पक्षातर्फे सुरुवात करण्यात यावी.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :– तुम्ही आधी प्रस्तावित तर करा.

मा. सदस्य श्री किशोर वनवारी :– जे काही आहे ते आयुक्तांनी प्रस्तावित केले आहे. आपले मुख्य लेखा अधिकारी श्री हरेश इदनानी यांनी आपणांस सादरीकरणाद्वारे सर्व समजावुन सांगितले आहे. आता त्यावर तुमचे काय म्हणणे आहे ते आधी सांगा. प्रशासनाने रु ३५ कोटींची करवाढ प्रस्तावित केली आहे त्यावर तुमचे काय म्हणणे आहे? ते सांगा.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :– त्यापूर्वी आजच्या या सभेत ज्या ३ मान्यवर व्यक्तिंना निमंत्रीत करण्यात आले आहे, तर असे करणे कायदेशिर आहे अथवा नाही यावर सचिव साहेबांनी त्यांचे कायदेशिर मत द्यावे, ही विनंती.

मा. सभापती :– मी तुम्हाला आठवण करुन देते की यापूर्वी महासभेत आपण सी.एच.एम कॉलेजचे प्राचार्य श्री दिनेश पंजवानी यांना विशेष निमंत्रीत म्हणुन बोलाविले होते. त्यापूर्वी येथील उपायुक्त श्री फडतरे यांना देखिल महासभेत बोलाविले होते. त्यामुळे येथे कोणाला बोलाविणे गैर आहे असे मला वाटत नाही. येथे आता पुर्ण वर्षाचा अर्थसंकल्प सादर होत आहे, त्यावर निर्णय होत आहे. हा फार महत्वाचा व शहरातील जनतेवर परिणाम करणारा विषय असल्याने आम्ही येथील स्थानिक आमदारांना निमंत्रीत केले आहे. तसेच यातील काही निर्णय आपल्या विरुध्द् जावु शकतात अशावेळी शासन स्तरावर त्याचा पाठपुरावा करण्यात आमदार मोठी कामगिरी बजावु शकतात यासाठी त्यांना येथे बोलाविले आहे. तसेच उल्हासनगर मॅन्युफॅक्चर्स असोशिएशनचे जे श्री गिरधर मलाणी आहेत तर त्याबद्दल मी सांगु इच्छिते की, व्यापारी हा देखिल शहराचा एक महत्वाचा घटक आहे, त्यांच्याद्वारेच आपणांस जास्तीत जास्त महसुल प्राप्त होत असतो, अशा वेळी त्यांचे देखिल मत विचारात घेणे योग्य होईल. त्यांचा सल्ला देखिल घ्यायला हवा. आपण फक्त त्यांचा सल्ला घेवु शेवटी पास करणे न करणे हे आपल्याच हातात आहे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :– यावर सचिव साहेबांनी कायदेशिर मत द्यावे. आपण असे करु शकतो अथवा नाही? जर त्यांनी सांगितले की असे करु शकतो तर काही हरकत नाही. परंतु आधी त्यांनी त्यांचे मत द्यावे.

मा. सचिव :– मा. स्थायी समिती सभापतींनी जो निर्णय घेतलेला आहे तो त्यांच्या जवाबदारीत घेतलेला आहे. परंतु मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये विशेष निमंत्रीतांना बोलाविण्याबाबत कोणतीही तरतुद नाही. हा जो निर्णय आहे तो सभापतींनी घेतलेला असुन त्यांच्या स्वअधिकारात घेतलेला आहे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :– आपण त्यांना बोलावु शकत असु तर ठिक आहे.

मा. सचिव :– कायद्यात तशी तरतुद नाही. सभापतींनी त्यांच्या स्वअधिकारात निर्णय घेतलेला आहे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :– ठिक आहे.

<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी :—</u> प्रशासनातर्फे जे अंदाज सादर करण्यात आले होते, त्यामध्ये जकातीच्या दरात आम्ही पुढीलप्रमाणे सुधारणा सुचवित आहोत.
बाब कमांक १४ ब —— ३.२५ ची ४ टक्के
बाब कमांक ६१ —— १.६० चे १.८०
बाब कमांक १३ —— ३ चे ४ टक्के
बाब कमांक ३० अ —— ३.५० चे ४ टक्के
बाब कमांक ३८ —— २.५ चे ४ टक्के
बाब कमांक ४० —— ३.२५ चे ४ टक्के

<u>श्री गिरधर मलाणी, अध्यक्ष, उमा ——</u> यामध्ये तुम्ही पेट्रोलवर जी जकात वाढविली आहे त्याला आमचा काही आक्षेप नाही. परंतु ३८ अ मध्ये जे इतर घटक आहेत ते औद्योगिक वापराशी संबधित कच्चया मालाचे घटक आहेत, त्यामुळे उद्योजकांवर भार पडु शकतो, ते दर वाढविण्यात येवु नयेत.

यावेळी मा. सदस्य श्री रामदास उमाप व मा. सदस्या श्रीमती नंदिनी बामणकर व श्रीमती संगिता जावळे या सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>श्री सुरेश (पप्पु) कलानी (मा. आमदार) :—</u> दोन्ही दर वेगवेगळे ठेवले तर त्याने महसुलात किती फरक पडु शकतो याची माहिती आहे का?

<u>श्री गिरधर मलाणी, अध्यक्ष, उमा ——</u> इतर बाबींचे दर वाढविण्यात येवु नयेत.

<u>श्री सुरेश (पप्पु) कलानी (मा. आमदार) :—</u> येथे आपण दर वाढविल्यानंतर ते महासभेत अंतिम मान्यतेसाठी जातील. आता जरी दर वाढविलेत तरी महासभेत त्यामध्ये सुधारणा होवु शकते. आपण दर वाढविल्यानंतर नक्की किती रक्कम वाढेल हे बघु व दरवाढ मामुली होत असेल व सहमती होत नसेल तर ते महासभेत बघु. व्यापा—यांना विश्वासात घेतल्याशिवाय कोणतीही दरवाढ होणार नाही याची मी आपणांस हमी देतो.

यावेळी मा. सदस्य श्री रामदास उमाप व मा. सदस्या श्रीमती नंदिनी बामणकर व श्रीमती संगिता जावळे यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :—</u> मा. सभापती महोदया आजच्या सभेत जे विशेष निमंत्रीत बोलाविण्यात आलेले आहेत त्याबद्दल आम्ही सभात्याग करीत आहोत.

यावेळी मा. सदस्य श्री रामदास उमाप, श्री नथु सोनवणे हे व मा. सदस्या श्रीमती नंदिनी बामणकर व श्रीमती संगिता जावळे या सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी :—</u> यात आम्ही फक्त जकातीचे दर वाढविले आहेत, इतर कोणतीही करवाढ करण्यात आलेली नाही. फक्त टॅकर्सवर शुल्क आकारणी करण्यात आलेली आहे. सध्या ज्या ठिकाणी टॅकर्स जातात त्या ठिकाणी टॅकर्सने पाणी मिळते म्हणुन अधिकारी जलवाहिनी टाकण्याकडे लक्ष देत नाहीत. आपण जर टॅकर्स बंद केले तर त्या ठिकाणी जलवाहिन्या टाकता येतील. तसेच ज्या ठिकाणी जलवाहिन्या टाकता येणार नाहीत अशा छोटया छोटया भागात टॅकर्सने पुर्वीप्रमाणेच पाणी पुरवठा करण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री मोहन साधवानी :—</u> मा. सभापती महोदया काही सोसायट्यांमध्ये ३—३ जोडण्या असतात तरी देखिल पुरेसे पाणी मिळत नाही. अशा ठिकाणी टॅकर्सने पाणी पुरवठा करावाच लागेल. अन्यथा आधी त्यांना पुरेश्या नळजोडण्या द्या त्यानंतरच टॅकरवर दर आकारणी करण्यात यावी. सोसायटीमधील लोक आधीच घरपट्टीमध्ये पाण्याचे देयक भरत आहेत, अशावेळी आपण त्यांच्याकडुन टॅकरचे पैसे

घेतले तर ते योग्य होणार नाही. त्यांना दोनवेळा पैसे भरावे लागतील. त्यांना जलवाहिनीद्वारे फक्त अर्धा तासच पाणी मिळते. अशा वेळी त्यांनी दररोज रु ३०० टॅंकरचे भरले तर महिन्याचे किती पैसे लागतील.

मा. सदस्य श्री किशोर वनवारी :— १९९७ मध्ये जेव्हा टॅंकर चालु होते त्यावेळी पैसे घेवुन मगच टॅंकर देण्यात येत असे. टॅंकर फुकट देण्याची प्रथा ही १९९९ पासुन सुरु झालेली आहे. पाण्याची समस्या तर त्या पुर्वी पासुन होती. आता आपण फुकट टॅंकर देतो. त्यामुळे लोकांना त्याची सवय झाली आहे. आवश्यकता नसेल तरी देखिल फुकट आहे म्हणुन सोसायटयांमध्ये टॅंकर घेतला जातो. काही सदस्य सोसायटीवाल्यांना खुश करण्यासाठी टॅंकर पाठवित असतात. आता आपल्याला यावर गंभीर होवुन विचार करावा लागेल. एखादया सोसायटीत ४५ सदनिका असतील तर त्यासर्वांना पाण्याचे बिल जाते. अशावेळी त्यांनी सोसायटीमध्ये जास्तीचे नळ घ्यावेत जेणेकरून त्यांना जास्त पाण्याचा पुरवठा होवु शकेल.

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी:—पाणी पुरेशा दाबाने येत नाही. तर ते सातव्या मजल्यावरील व्यक्तीस कसे काय मिळेल?

मा. सभापती:—आता शहरात आमदार निधीतुन जलवाहिन्या टाकण्याचे काम सुरू आहे. अर्धे काम झाले आहे व अर्धे काम बाकी आहे. ते पुर्ण झाल्यानंतर पाण्याची टंचाई जाणवणार नाही.

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी:—आता ही सवलत अजुन एक वर्ष चालु ठेवावी त्यानंतर टॅंकरवर शुल्क आकारणी करण्यात यावी. अन्यथा लोकांना त्रास होईल.

मा. सभापती:—आता तक्रारी देखिल कमी आहेत.

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी:—माझी विनंती आहे की, एक वर्ष नाही तर कमीत कमी सहा महिने तरी ही सवलत चालु ठेवावी.

मा. सभापती:—तुमच्या प्रभागात ज्या इमारतीत पाणी येत नसेल तेथील पत्ता सांगावा. जेणेकरून तेथील समस्या सोडविता येतील.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—तुमच्या प्रभागात कुलदेवी मंदीर ते भाटीया हॉस्पीटल येथे जलवाहिनी टाकण्याचे काम मंजुर झाले आहे. ते काम झाल्यावर काहीही त्रास होणार नाही.

मा. सदस्य श्री.मोहन साधवानी:—काम पास होते परंतु चालु होत नाही.

श्री. सुरेश (पप्पु) कालानी (मा. आमदार):—**माझ्या माहिती प्रमाणे आमदार निधीतुन जे काम सुरू आहे ते मार्च पुर्वी पुर्ण होईल. आपण टॅंकरवर मार्च नंतर शुल्क आकारणी करणार आहोत. त्यामुळे काही त्रास होणार नाही. सदरचे काम मार्च पुर्वी पुर्ण होईल का याची माहिती दयावी.**

कार्यकारी अभियंता (पा.पु. विभाग)(श्री. आर. आर. सावकारे):—८० टक्के काम जवळपास पुर्ण झाले आहे.

श्री. सुरेश कालानी (मा. आमदार):—**मार्च पुर्वी पुर्ण होईल का?**

मा. सभापती:—८० टक्के काम झाले आहे असे वाटत नाही.

श्री. सुरेश (पप्पु) कालानी (मा. आमदार):—मी ब—याचशा वर्तमानपत्रात देखिल वाचले आहे व मला माहिती देखिल मिळाली आहे की, शहरात टॅंकरचा मोठया प्रमाणावर दुरूपयोग होत आहे. काही

सोसायटयांमध्ये पाणी विकले जात आहे. काही इमारतीवर असलेल्या बागांना पाणी देण्यासाठी देखिल टॅंकरचा उपयोग केला जात आहे. तसेच काही बिल्डर्सना, लग्नाच्या हॉलला टॅंकरने पाणी विकले जात आहे. आता जसे कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, काम लवकर पुर्ण होईल तर त्या नंतर पाण्याचा प्रश्न एवढा जाणवणार नाही. त्यामुळे टॅंकरवर शुल्क आकारणी करण्यास काही हरकत नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—प्रशासनाने सादर केलेल्या अंदाज पत्रकात स्थायी समितीच्या वतीने पुढील प्रमाणे बदल सुचविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | उत्पन्न | रुपये : १२६६२५० | खर्च | रुपये : १६१६९५४ |
|---|---|---|---|---|
| १ | जकात | + ५५००० | दिवाबत्ती दुरुस्ती व निगा | + २५०० |
| २ | सर्व साधारण कर | + १३७७०० | दिवाबत्ती दुरुस्ती व निगा (दुर्बल घटक) | + २००० |
| ३ | महापालिका शिक्षण कर | + २७००० | रस्त्यावरील दिवाबत्ती बीले | + २५०० |
| ४ | वृक्ष कर | + २७०० | शोध विकास व वीज बचत | + १००० |
| ५ | पथ कर | + १६२०० | उदयाने दुरुस्ती व निगा | + ५००० |
| ६ | शिक्षण कर | + ४३२०० | माध्यमिक शिक्षण | + २००० |
| ७ | रोजगार हमी कर | + ५४०० | गलिच्छ वस्ती सुधारणा (दुरुस्ती) | + ४०० |
| ८ | पाणी पुरवठा लाभ कर | + ५४०० | दुर्बल घटक वसाहतीत खर्च (दुरुस्ती) | + ४०० |
| ९ | मल प्रवाह सुविधा लाभ कर | + ५४०० | उदयाने दुरुस्ती व निगा (वार्ड कमिटी –१) | + १०५० |
| १० | मल प्रवाह कर | + २७००० | रस्ते दुरुस्ती व निगा (वार्ड कमिटी –१) | + १०५० |
| ११ | पाणी बीले वसुली | + ३००००० | उदयाने दुरुस्ती व निगा (वार्ड कमिटी –२) | + ९५० |
| १२ | पाणी टॅंकर भाडे | + १०००० | रस्ते दुरुस्ती व निगा (वार्ड कमिटी –२) | + ९५० |
| | | | उदयाने दुरुस्ती व निगा (वार्ड कमिटी –३) | + ९०० |
| | | | रस्ते दुरुस्ती व निगा (वार्ड कमिटी –३) | + ९०० |
| | | | उदयाने दुरुस्ती व निगा (वार्ड कमिटी –४) | + ९०० |
| | | | रस्ते दुरुस्ती व निगा (वार्ड कमिटी –४) | + ९०० |
| | | | दुर्बल घटक वसाहतीसाठी नवीन दिवाबत्ती खरेदी | + १५०० |
| | | | महापालिका इमारती बनविणे (प्रशासकीय व निवासी) | + ८००० |
| | | | नवीन रस्ते बनविणे | + १४०००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | नगरसेवक निधीतून विकास कार्य | + १६२०० |
| | | | | दुर्बल घटक वसाहतीत विकास कार्य | + २००० |
| | | | | गलिच्छ वस्त्यात विकास कार्य | + २००० |
| | | | | महापौर निधी | + ५००० |
| | | | | उप महापौर निधी | + २५०० |
| | | | | स्थायी समिती सभापती निधी | + २५०० |
| | | | | शिक्षण कर परतावा | + ४३२०० |
| | | | | रोजगार हमी कर परतावा | + ५४०० |
| | | | | पाणी टॅंकर भाडे | + ५००० |
| | | | | कुपनलिका दुरुस्ती खर्च | + ३००० |
| | | | | बुस्टर पंपिंग मशिनरी | + १००० |
| | | | | दुर्बल घटक वसाहतीत शौचालय, मुता–या, नाले, गटार व कलव्हर्ट इत्यादी खर्च (दुरुस्ती) | + ३५०० |
| | | | | पावर पंप व पा. पु. साहित्य खरेदी व बसविणे खर्च (नविन) (दुर्बल घटक) | + ५५०० |
| | | | | सार्वजनिक शौचालय , मुता–या , नाले, गटार व कलव्हर्ट इ. बनविणे . (नविन) | + ५००० |
| | | | | दुर्बल घटक वसाहतीत शौचालय , मुता–या , नाले, गटार व कलव्हर्ट इ. बनविणे ( नविन ) . | + ३००० |
| | एकुण :– | १९०१२५० | | १८९४६५४ | |
| | | | अखेरची शिल्लक :– | ६५९६ | |

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:–</u>आयुक्तांनी सादर केलेल्या अंदाजात नगरसेवक निधी रूपये २ लाख एवढा दाखविण्यात आला होता तो वाढवुन आम्ही रूपये ४ लाख एवढा केला आहे. कारण आता आम्ही उत्पन्नाच्या बाजुत देखिल वाढ केली आहे. त्यामुळे आम्ही त्यात वाढ केली आहे. तसेच मागील अर्थसंकल्पात आयुक्तांनी ६७ रस्त्यांचे काम हाती घेतले होते यावेळी एकाही रस्त्याचे काम यात दाखविण्यात आलेले नाही. यासाठी आम्ही मागील वर्षी जे ६७ रस्ते दाखविले होते त्यांचे काम न झाल्याने यावर्षी पुन्हा अर्थसंकल्पात दाखविले आहे. त्यासाठी अर्थसंकल्पात तरतुद देखिल दर्शविली आहे. मागील वर्षी आम्ही दारीद्रय रेषेखालील लोकांना करमाफी देण्यासाठी एक योजना आणली होती. सदर योजने अंतर्गत जवळपास ९, ५०० एवढे अर्ज प्राप्त झाले होते. परंतु आमचा कर्मचारी वर्ग वसुलीच्या कामात व्यस्त असल्याने सर्व अर्जावर निर्णय होवु शकलेला नाही. यासाठी आम्ही सदरच्या योजनेला अजुन मुदतवाढ देत आहोत. जेणेकरून गरीब लोकांना ज्याचा फायदा होईल.

<u>श्री. सुरेश (पप्पु) कालानी (मा. आमदार):—</u>ज्या लोकांनी अदयाप अर्ज केलेले नाही. त्याला याचा फायदा कसा मिळेल?

<u>मा. सभापती:—</u>काही लोकांकडे आवश्यक ती कागदपत्रे नसल्याने त्यांचे काम होत नाही यासाठी आपणांस शर्ती शिथिल कराव्या लागतील.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>जवळपास ९,५०० अर्ज प्रलंबित आहेत. त्यावर निर्णय होणे आवश्यक आहे. यासाठी योजनेला देखिल मुदतवाढ दयायला हवी. आयुक्तांनी देखिल ही योजना अजून सहा ते बारा महिने वाढविण्यासाठी सहमती दर्शविली आहे. तसेच स्थायी समितीकडे यावेळी जकात खाजगीकरणाचा प्रस्ताव आलेला नाही. आम्हाला असे कळले होते की, आयुक्त साहेब तसा प्रस्ताव आणणार आहेत परंतु त्यांनी तो प्रस्ताव आणला नाही यासाठी आम्ही त्यांना धन्यवाद देतो. यापुर्वी जकातीद्वारे वर्षाला रूपये ५६कोटी मिळत होते परंतु महापालिकेने हे काम हाती घेतल्यानंतर आता जवळपास रूपये ७२कोटी प्राप्त होणार आहेत. ही वाढ लोकप्रतिनधींनी व अधिका—यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे शक्य झाली आहे. त्यामुळे आता खाजगीकरणाची आवश्यकता नाही. महापालिकेने चांगले प्रयत्न केल्यास रूपये ७२ कोटी वरून रूपये १०० कोटी एवढी वाढ होईल अशी आम्हाला खात्री आहे.

<u>मा. सदस्य श्री. मोहन साधवानी:—</u>जकातीमध्ये तुम्ही ३—४ बाबींमध्ये वाढ दर्शविली आहे. इतर बाबींचे काय?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>इतर बाबींमध्ये कोणत्याही प्रकारची करवाढ केलेली नाही. त्या तशाच राहतील. तसेच विषय समितीचे जे आठ सभापती आहेत. त्यांना देखिल मागील वर्षीप्रमाणेच तरतुद राहील. मी विनंती करेन की, विषय समिती सभापती व प्रभाग समिती सभापती यांना वाहनभत्ता त्वरीत अदा करावा. ज्याप्रमाणे महापौर, उपमहापौर, सभागृह नेता, स्थायी समिती सभापती यांना भत्ता देण्यात आला आहे त्याचप्रमाणे त्यांनाही देण्यात यावा. तसेच महसुल समितीला देखिल इतर समित्यांप्रमाणे सवलत देण्यात यावी अशी आम्ही अपेक्षा करतो. तसेच आमचा अजुन एक सल्ला आहे की, उल्हासनगर महापालिका क्षेत्रातुन शेजारील आशेळे, माणेरे या गांवाना पाणी पुरवठा करण्यात येत आहे. महापालिका क्षेत्रातील पाणी बाहेरील गावांना जात आहे. यामुळे उल्हासनगरमधील लोक पाण्यापासुन वंचित रहात आहेत. आधीच उल्हासनगरला पाणी कमी आहे. तर याकडेही आपण लक्ष दयावे. मागील वर्षी पाणी पुरवठयातुन आपणांस फक्त ४८ टक्के एवढी वसुली मिळाली होती. आता आपल्याकडे तडफदार उपायुक्त श्री. आरोटे हे आलेले आहेत. ते सदरची वसुली ८० टक्क्यापर्यंत नेतील. अशी आम्ही अपेक्षा करतो. मालमत्ता कर विभागाची जी वादग्रस्त प्रकरणे आहेत त्यावर तोडगा काढल्यास आपणांस मोठया प्रमाणावर वसुली मिळु शकते. तसेच दारीद्रय रेषेखालील व्यक्तींना मालमत्ता करात जी सुट देण्यात येणार आहे ती देताना ज्यांच्याकडे दुचाकी, तीनचाकी व चार चाकी वाहने असतील अशांना सुविधा देण्यात येवु नये. ते सोडुन इतर सर्वांना मग त्यांच्याकडे टिव्ही असेल तरी देखिल लाभ देण्यात यावा कारण बरेच लोक हप्त्यांवर टिव्ही खरेदी करतात. आपले अधिकारी त्यांच्याकडे टिव्ही असेल तरी त्यांचे काम करीत नाही. आपले अधिकारी जेव्हा वसुली करण्यासाठी जातात तर ज्या लोकांनी कर माफीसाठी अर्ज केला आहे अशा लोकांकडुनही वसुली करतात. ज्यांनी अर्ज केला आहे. अशांचे फक्त चालु मागणीचे देयक स्विकारण्यात यावे. त्यांच्याकडुन थकबाकी घेण्यात येवु नये. तुमचे अधिकारी जावुन त्यांना त्रास देतात तर त्यांना तसे न करण्यास सांगावे.

<u>मा. सभापती :—</u>आमचे सदस्य श्री. सतरामदास जेसवानी यांनी एक चांगली सूचना दिली आहे की, शहरात ज्या ठिकाणी दुकाने अथवा कारखाने उघडतात अशा ठिकाणची माहिती महापालिकेला मिळत नाही. यासाठी आपण एम.एस.ई.बी. कडुन माहिती घेतल्यास व त्यानंतर त्यांना व्यापारी दराने कर आकारणी केल्यास आपणांस मोठया प्रमाणावर महसुल प्राप्त होवु शकतो.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>आपण पाण्याचे बिल घेताना व्यापारीदराने रूपये १८ एवढी आकारणी करतो. सद्या महापालिकेच्या रेकॉर्डवर व्यापारी दराने पाणीपट्टी होणारे फक्त २४०० ग्राहक आहेत. परंतु

एम.एस.ई.बी. चा रेकॉर्ड पाहिला तर असे ग्राहक सुमारे ३१,००० एवढे आहेत. त्यातील १०,००० ग्रहकांकडे नळ जोडणी नाही असे गृहीत धरले तरी सुमारे २१,००० एवढे ग्राहक होतात. ही तफावत भरून काढल्यास आपणांस मोठया प्रमाणात पाणी पट्टी पासुन उत्पन्न प्राप्त होवु शकते. त्याचप्रमाणे आपले झोपडपट्टी विभागात १३,५०० ग्राहक आहेत. आपण करपट्टीमध्येच पाणीपट्टीचे देयक देखिल पाठवतो. सध्या उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात ४८ घोषित झोपडपट्टया आहेत. परंतु प्रत्यक्षात शहरामध्ये ३०० झोपडपट्टया आहेत. त्यांचे सर्वेक्षण केल्यास आपणांस मोठया प्रमाणावर महसुल प्राप्त होवु शकतो. त्याचप्रमाणे शहरात ब—याच इमारतींचे कर निर्धारण झालेले नाही. आमचे श्री. रवी खिलनानी यांनी कॅम्प नंबर ५ येथील गोकुळधाम इमारतीचे उदाहरण दिले आहे. या इमारतीला ब—याच वर्षापासुन कर पट्टीचे देयक दिलेले नाही. अशी बरीच उदाहरणे आहेत. जर आपण सर्वेक्षण व्यवस्थित केले तर पुष्कळ उत्पन्न प्राप्त होवु शकेल, करोडो रूपये मिळु शकतील. त्याचप्रमाणे सध्या आयुक्तांनी दुरूस्ती परवानगी देण्याचे बंद केले आहे. त्यापासुन आपणांस रूपये ५०० मिळत होते. दुरूस्ती परवानगी देण्याचे सुरू केले व त्यासाठी रूपये २ ते ३ हजार आकारणी केल्यास लोक स्वखुशीने पैसे देतील. तसेच गिरण्यांसाठी ना हरकत दाखला देखिल देण्याचे बंद केले आहे. यापुर्वी स्थायी समितीत ठराव करून सुमारे २५० गिरण्यांसाठी १० अश्वशक्तींचा दाखला देण्यासाठी मंजुरी देण्यात आली होती. व त्यांच्याकडुन प्रत्येकी रूपये ३०००/— शुल्क घेण्यात आले होते. आता ते देखिल बंद केले आहे. ते पुन्हा सुरू केल्यास व ५ ते १० हजार रूपये शुल्क ठेवल्यास मोठया प्रमाणावर उत्पन्न प्राप्त होवु शकते. आपण दाखला न दिल्याने लोक लाच देवुन विद्युत जोडणी घेत आहेत. आपण दाखला दिल्यास तेच पैसे शुल्कापोटी आपणांस प्राप्त होवु शकतील.

<u>मा. सदस्य श्री. गणपत एडके:—</u>झोपडपट्टयामध्ये देखिल ना हरकत दाखला दया.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>झोपडपट्टीवाल्यांना देखिल ना हरकत दाखला दयायलाच हवा. त्यांना दाखला दिल्यास त्यापासुन महापालिकेस उत्पन्न प्राप्त होवु शकते. तसेच सदरचा दाखला देताना कराचे देयक पाहुन दाखला दिला जावा. त्यांच्याकडे सनद अथवा इतर बांधकाम परवानगीची चौकशी करण्यात येवु नये. ज्यांना आपण करपट्टीचे देयक देतो त्यांना दाखला देण्यास काय हरकत आहे. यामार्गाने महापालिकेस करोडो रूपये प्राप्त होवु शकतात.

<u>श्री. सुरेश (पप्पु) कालानी (मा. आमदार):—</u>ज्यांच्याकडे ना हरकत दाखला नसतो ते कसेही करून विद्युत जोडणी करून घेतात त्यांना किंती शुल्क आकरणी करावी. असे आपले मत आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>रूपये १००० ते ५००० एवढे घ्यायला हवे. परंतु यासाठी बांधकाम परवानगी अथवा सनदेची सक्ती करण्यात येवु नये. कार्यपध्दती सुलभ असायला हवी. ज्या लोकांचे रस्तारूदीकरणामध्ये बांधकाम बाधित होते. त्यांच्याकडुन देखिल शुल्क आकारणी करून बांधकाम परवानगी दयायला हवी. जेणे करून लोक सदरचे पैसे लाच देण्यासाठी खर्च न करता महापालिकेत भरतील. अशाप्रकारे एका व्यक्तीकडुन रूपये १० ते १५ हजार आपण घेवु शकतो.

<u>श्री. सुरेश (पप्पु) कालानी (मा. आमदार):—</u>ज्यांना आपण ना हरकत दाखला दिला नाही व त्यांनी एम. एस.ई.बी. ची जोडणी घेतली आहे असे किती लोक आहेत?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>सुमारे ३१ हजार व्यापारी जोडण्या आहेत.

<u>श्री. सुरेश (पप्पु) कालानी (मा. आमदार):—</u>मी या विषयाबाबत विधानसभेत प्रश्न विचारून माहिती घेईन. एम.एस.ई.बी. ने महापालिकेच्या दाखल्याशिवाय कोणालाही विद्युत जोडणी देता कामा नये. यामुळे महापालिकेच्या महसुलात वाढ होवु शकते.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:—माझ्या माहितीप्रमाणे एम.एस.ई.बी. तर्फे विद्युत जोडणी देताना हमी पत्र घेवुन त्यांनतर जोडणी देण्यात येते. आपण किती जणांना फोटो पास दिला आहे यावरून आकडेवारी कळु शकते.

श्री. सुरेश (पप्पु) कालानी (मा. आमदार):—यासाठी आयुक्तांनी एम.एस.ई.बी.च्या अधिका—यांसमवेत एक बैठक घ्यावी असा माझा सल्ला आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—येथे शिक्षण मंडळाचे अंदाजपत्रक देखिल आले आहे. त्यांच्या सभापतींनी एक सल्ला दिला आहे की, सध्या उल्हासनगर शहरात महापालिकेच्या माध्यमिक शाळा नाहीत. त्या सुरू करण्यासाठी २० लाखांची तरतुद करण्यात यावी. अशी त्यांनी विनंती केली आहे.

मा. सभापती:—ही चांगली योजना आहे. याला निधी दयायला हवा.

श्री. सुरेश (पप्पु) कालानी (मा. आमदार):—माध्यमिक शाळा का चालु करायच्या याचे कारण मी सांगतो. सध्या महापालिकेच्या प्राथमिक शाळा आहेत त्यामध्ये झोपडपट्टींतील गरीब मुले शिक्षण घेतात परंतु त्यानंतर खाजगी माध्यमिक शाळांमध्ये फी भरून प्रवेश घेण्याची त्यांची ऐपत नसल्याने ते शिक्षण सोडुन देतात. यासाठी महापालिकेने देखिल माध्यामिक शाळा सुरू करणे आवश्यक आहे. जेणेकरून गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेता येईल.

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी:—सध्या महापालिकेच्या शाळांमध्ये किती विद्यार्थी आहेत?

मा. सभापती:—प्रत्येक शाळेत सरासरी ३५० विद्यार्थी आहेत.

प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ)(श्री. बी.एस. पवार):—२८ शाळा असुन सुमारे १०,००० विद्यार्थी आहेत.

श्री. सुरेश (पप्पु) कालानी (मा. आमदार):—प्रत्येक वर्षी विद्यार्थी कमी होत आहेत का?

प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ)(श्री. बी.एस. पवार):—होय.

श्री. सुरेश (पप्पु) कालानी (मा. आमदार):—असे का?

प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ)(श्री. बी.एस. पवार):—खाजगी शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. तेथे प्रवेश घेण्याकडे जास्त कल असतो त्यामुळे महापालिका शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या कमी होत आहे.

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी:—प्रत्येक माध्यमाच्या किती शाळा आहेत?

प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ)(श्री. बी.एस. पवार):—मराठी माध्यमाच्या आठ, सिंधी माध्यमाच्या पाच, गुजराती माध्यमाच्या दोन व हिंदी माध्यमाच्या बारा शाळा आहेत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—बी.पी.एम.सी. ॲक्ट प्रमाणे आपण शिक्षण मंडळाला माध्यमिक शाळांसाठी अनुदान देवु शकत नाही यासाठी आपण आपल्या पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समितीच्या अर्थसंकल्पीय अंदाजात रूपये २० लाखांची तरतुद करू. त्यांच्या माध्यमातुन आपण माध्यमिक शाळा चालवु शकतो.

श्री. सुरेश (पप्पु) कालानी (मा. आमदार):—माझ्या माहितीप्रमाणे ठाणे व भिवंडी येथे माध्यमिक शाळा सुरू करण्यात आल्या आहेत. हे कसे काय झाले आहे? याची माहिती दयावी.

प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ)(श्री. बी.एस. पवार):—यासाठी त्यांनी स्वतंत्र विभाग उघडला असुन त्या शाळा स्वतंत्र अधिका—यामार्फत चालविल्या जातात.

मा. सभापती:—आपण ते स्वतंत्र केल्यास आपणांस अजुन एक अडचण येवु शकते. आपल्या प्राथमिक शाळांमध्ये काही शिक्षक अतिरिक्त आहेत. त्यांना आपणांस नविन शाळांमध्ये सामावुन घ्यावे लागेल.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—माध्यमिक शाळांसाठी महापालिकेच्या लेखा शिर्षातुन खर्च करण्यात येत आहे.

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी:—यामध्ये शिक्षकांच्या वेतनावर रूपये ६. ५२ कोटी खर्च दर्शविला आहे तसेच शासनाकडुन रू. ३. ९२ कोटी अनुदान मिळणार असे दाखविले आहे तर जास्त अनुदान मिळु शकत नाही का?

मा. सभापती:—ते ठरवुन दिलेले असते.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—आपण अर्थसंकल्प पाहिल्यास दिसुन येईल की, त्यामध्ये वेतन, भत्ते व पाण्याचे देयक यामध्येच जास्तीत जास्त खर्च होत असल्याचे दिसुन येते. तसेच विद्युत दिव्यांसाठी होणा—या खर्चातही मोठया प्रमाणावर वाढ झाली आहे. उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न झाल्याचे दिसुन येत नाही. तसेच आम्ही यापुर्वी पाण्याच्या दरात कधीही वाढ केलेली नाही. आम्ही पाण्यामध्ये जास्तीत जास्त सवलत देण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळे महापालिकेच्या कर्जात मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे आयुक्तांनी रूपये ३५ कोटीची करवाढ प्रस्तावित केलेली आहे. आम्ही तर रूपये ५—६ कोटी पण वाढविली नाही. महापालिकेला पाणी पट्टी व घरपट्टीतुन अपेक्षित उत्पन्न प्राप्त होत नाही असे दिसुन येते.

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी:—खाजगी अनुदानित शाळांना यामध्ये रूपये १५ लाख नॉन सॅलरी ग्रान्ट म्हणुन दर्शविले आहे. हे काय आहे?

प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ)(श्री. बी.एस. पवार):—महापालिका क्षेत्रात ५३ खाजगी अनुदानित शाळा आहे. त्यांना आपल्याला हे दयावे लागते. शासन ५० टक्के व महापालिका ५० टक्के देते.

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी:—अशा शाळांची आपण आम्हाला यादी दया.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—या अर्थसंकल्पात आम्ही मुता—यांसाठी निधी ठेवला आहे. आपण शहरातील कॅम्प नं. १ ते ५ मध्ये पाहिले तर दिसुन येईल की, महिलांसाठी कोठेही मुतारी बांधलेली नाही. यासाठी आम्ही यामध्ये रूपये १ कोटीची तरतुद केलेली आहे. या निधीतुन प्रत्येक प्रभागात एक मुतारी महिलांसाठी बनविण्यात येईल. महिलांना त्रास आहे, म्हणुन आम्ही ही तरतुद केलेली आहे.

मा. सभापती:—पुर्ण शहरात जेथे जेथे वाणिज्य विभाग आहे तेथे महिलांसाठी मुता—या बनविण्यात याव्यात.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—याशिवाय अजुन एक प्रस्ताव आहे. आपण कल्याण—डोंबिवली महापालिका क्षेत्रात बघितले असेल तेथे वाचनालय बनविले आहे. यासाठी आपले येथेही प्रत्येक प्रभागात एक वाचनालय बनविण्यात यावे. जेथे ज्येष्ठ नागरिक वाचन करू शकतात. प्रत्येक नगरसेवकाने त्याच्या प्रभागात एक—एक वाचनालय बनवायला हवे.

<u>मा. सभापती:—</u>आमदार निधीतुन एक वाचनालय सपना गार्डन येथे तयार होत असुन लवकरच त्याचे उद्घाटन ही करण्यात येईल. आमदार निधीतुन वाचनालय बनविण्यासाठी आम्ही प्रयत्नशिल आहोत यासाठी आम्ही विविध ठिकाणी जागांची पहाणीही केली प्रथम आम्ही भगवंती नावानी स्टेजच्या खालील जागा अंतिम केली होती परंतु त्या ठिकाणी पाणी भरते असे कळल्याने नंतर तेथिल जागा रद्द केली. त्यानंतर सपना गार्डन येथे वाचनालय बनविले.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>ज्या ठिकाणी वापरात नसलेले शौचालय तोडण्यात आले आहेत. त्या ठिकाणी वाचनालय बनविण्यास हरकत नाही. त्याचप्रमाणे गेल्या दोन वर्षापासुन समाज मंदिर बनविण्याचे देखिल बंद केले आहे ते देखिल सुरू करण्यात यावे.

<u>मा. सभापती:—</u> याबद्दल आयुक्तांना विचारले असता ते सांगतात की समाज मंदीराचे काम झाल्यावर त्याला टाळा लावुन नगरसेवक चावी स्वत:कडे ठेवतात. परंतु समाज मंदीरांची आवश्यकता आहे. आम्ही आमदार निधीतुन काही दिवसापुर्वी मागासवर्गीयांसाठी झोपडपट्टीत रूपये ७ लाख खर्च करून समाज मंदीर बनविले होते त्याचा चांगल्या प्रकारे वापर होत आहे. परंतु काही दिवसापुर्वी एका प्रभागात समाज मंदीरावरून बेबनाव झाल्याने व भांडणे झाल्याने आयुक्तांनी समाज मंदीर बनविण्यास नकार दिलेला आहे. या विरोधात आम्ही आयुक्तांकडे देखिल गेलो होतो. तेव्हा आयुक्तांनी आम्हाला हे कारण सांगितले.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>माझ्या प्रभागात देखिल समाज मंदीर आहे. परंतु त्याची चावी माझ्याकडे नसुन त्याची चावी मालमत्ता विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग येथे आहे. आयुक्त चुकीचे बोलतात. काहीही बोलतात. त्यांच्याकडे चुकीची माहिती आहे.

<u>श्री. सुरेश (पप्पु) कालानी (मा. आमदार):—</u>नविन कर आकारणीबद्दल आपले काय म्हणणे आहे?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>नविन कर आकारणी व्हायला हवी. लोक तयार आहेत परंतु महापालिकेतुन कर निर्धारण करून मिळत नाही. माझ्या प्रभागातील ५० लोकांचे अर्ज यासाठी प्रलंबित आहेत. लोक २—३ वर्षाचा कर भरण्यास तयार आहेत परंतु तरी देखिल त्यांना कर निर्धारण करून मिळत नाही.

<u>मा. सदस्य श्री. गणपत एडके:—</u>झोपडपट्टीतील लोक देखिल तयार आहेत परंतु पावत्या मिळत नाहीत.

<u>मा.सभापती:—</u>परंतु आयुक्तांनी आता जे नविन दर लागु केले आहेत. त्यामुळे लोकांमध्ये असंतोष आहे. ते दर कमी करायला हवे.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:—</u>ज्यावेळी नविन बांधकाम होते त्यावेळीच कर निर्धारण करायला हवे परंतु असे होत नाही.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>उल्हासनगरमध्ये सर्व योजना अपयशी ठरल्या आहेत. आपण टेलिफोन विभाग व एम.एस.ई.बी. यांचा कारभार बघितला तर दिसुन येईल की ते लोक बिलाचा भरणा न केल्यास त्वरीत त्यांच्या सेवा खंडीत करतात. परंतु आपल्या येथे कर वसुलीसाठी कोणतीही कठोर कारवाई करण्यात येत नाही.

<u>श्री. संजय दुसाने (उपायुक्त शहर):—</u>मागील वर्षी आम्ही ६००० मालमत्तांचे कर निर्धारण केले आहे. व यावर्षी सुमारे ३००० मालमत्ताच्या निर्धारणाचे काम सुरू आहे.

मा. आयुक्तांच्या जागी उपस्थित प्राधिकृत अधिकारी:—ज्यांचे कर निर्धारण झाले नाही त्यांचीच चर्चा येथे करण्यात येते. व ज्यांचे कर निर्धारण झाले आहे परंतु करोडो रूपये थकबाकी आहे अशांची चर्चा येथे केली जात नाही.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:—ब—याच ठिकाणी मालमत्तांचे निर्धारण करताना त्यामध्ये भाडोत्री नसतानाही भाडोत्री दाखविण्यात येतो. मग लोकांना कर भरताना पुर्ण कर भरायला सांगितले जाते. त्यांना फक्त चालु वर्षाचाच फायदा देण्यात येतो. मागील वर्षीचा फायदा देण्यात येत नाही. त्यामुळे लोक कर भरण्यास टाळाटाळ करतात.

श्री. सुरेश कालानी (मा. आमदार):—यांचे म्हणणे असे आहे की, बिल गेले, नोटीस गेली परंतु भाडोत्री दाखवला म्हणुन लोक बिल भरत नाहीत.

श्री. संजय दुसाने (उपायुक्त शहर):—वादग्रस्त प्रकरणांमध्ये निर्णय घेताना फक्त चालु वर्षातच सुट देता येते. मागील वर्षाची थकबाकी पुर्ण भरावी लागते.

श्री. सुरेश (पप्पु) कालानी (मा. आमदार):—अर्ज दिला असेल तर थकबाकी माफ करता येईल का?

मा. सभापती:—आता आपण योजना आणली तेव्हापासुन कमीत कमी चालु वर्षाचे तरी माफ करीत आहेत. यापुर्वी तर कोणताही फायदा देत नव्हते. आम्ही प्रश्न विचारल्यावर सांगायचे की ठाण्याला पाठवावे लागेल.

श्री. सुरेश (पप्पु) कालानी (मा. आमदार):—जर वेळेत हरकत घेतली असेल तर मालमत्ताधारकाला त्याचा फायदा दयायला हवा.जर भाडोत्री नसेल व तरी देखिल बिलात भाडोत्री दाखवत असतील तर तशी दुरूस्ती करण्याचा महापालिकेला पुर्ण अधिकार आहे.

श्री. संजय दुसाने (उपायुक्त शहर):—चालु वर्षाच्या देयकात आम्ही तशी दुरूस्ती करून फायदा देत आहोत.

मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:—मागील वर्षी ज्यांनी कर माफीसाठी अर्ज केले होते त्यांना देखिल यावर्षी पुन्हा संपुर्ण बिल पाठविण्यात आले आहे. त्यांना पुर्ण रक्कम भरण्यासाठी सांगितले जात आहे.

श्री. सुरेश (पप्पु) कालानी (मा. आमदार):—ज्यांनी अर्ज केला आहे त्यांना सुनावणी देवुन त्यानंतरच देयक पाठवायला हवेत.

मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:—त्यांना सुनावणी न देता तशीच देयके पाठविण्यात आली आहेत.

मा. सभापती:—आम्ही दारीद्रय रेषेखालील सुमारे ९५० लोकांची प्रकरणे निकालात काढली आहेत. तर त्यांना देखिल देयक पाठविण्यात आले आहेत.

श्री. संजय दुसाने (उपायुक्त शहर):—५४२ व्यक्तींना कर माफीचा फायदा दिला आहे. आता जी ३०० प्रकरणे मंजुर झाली त्यांची देयके आधीच निघालेली असल्याने फायदा देता आला नाही. परंतु आता त्यांच्याकडुन फक्त चालु मागणीचे देयक व थकबाकी पैकी शिक्षण उपकर आणि रोजगार हमी कराची रक्कम वसुल करण्यात येईल.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:—माझ्या प्रभागात असेच एक प्रकरण होते त्या व्यक्तीला रूपये ८४७चे देयक होते. त्याने अर्ज केला होता तरी देखिल त्याला पुर्ण देयक भरण्यासाठी सांगण्यात आले. अशाप्रकारे कर्मचारी काम करत आहेत.

<u>श्री. संजय दुसाने (उपायुक्त शहर):—</u>ज्यांनी करमाफीसाठी अर्ज केला आहे त्यांच्याकडुन थकबाकीची रक्कम वसुल करण्यांत येत नाही. आम्ही कर्मचा—यांना तशा सूचना दिल्या आहेत.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—</u>करमाफीसाठी सुमारे ९ हजार अर्ज आले आहेत. त्यांची त्वरीत छाननी करून त्यावर निर्णय घ्यायला हवा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>३१ मार्च पर्यंत कर्मचारी कर वसुलीत व्यस्त असल्याने एप्रिल महिन्यात सदर अर्जावर निर्णय घेण्यात येईल. यासाठी योजनेची मुदत एक वर्ष वाढवायला हवी.

<u>श्री. सुरेश (पप्पु) कालानी (मा. आमदार):—</u>आपण सहा महिन्यांसाठी मुदतवाढ देवु. १ वर्ष फार जास्त होते. तसेच त्यांनी चालु मागणीचे देयक भरायला हवे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>तसेच मी या ठिकाणी असेही सांगु इच्छितो की, आता आम्ही टॅकरवर शुल्क प्रस्तावित केले आहे. यानंतर जो कोणी नळ जोडणी मागेल त्याला नळ जोडणी दयायला विलंब होता कामा नये.

<u>मा. सदस्य श्री. मोहन साधवानी:—</u>तुम्ही टॅकरवर जे शुल्क लावले आहे त्याला माझा पुर्ण विरोध आहे. तुम्ही एका टॅकरचे ३०० रूपये लावले आहेत. आमच्या येथील पुजा टॅकरवाला २५० रूपयांना एक टॅकर देतो. मग ३०० रूपये कसे काय लावले?

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—</u>माझी एक सूचना आहे, ज्यांना नळ जोडणी हवी असेल त्यांना ती त्वरीत देण्यात यावी. तसेच नळ जोडणी देताना कॅम्प नं. ५ येथील प्रकरणे कॅम्प नं. ५ येथील पाणी पुरवठा कार्यालयातच मंजुर करण्यात यावी. सदरची प्रकरणे मुख्यालयात पाठविण्यात येवु नये. यामुळे लोकांना नाहक हेलपाटे मारावे लागतात.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:—</u>नळ जोडण्या देण्याचे काम पुर्ण वर्षभर चालु ठेवावे. महापालिका उन्हाळयात नळ जोडण्या देत नाही. याचा फायदा प्लंबर घेतात व लोकांना लुटतात. तसेच प्लंबरचा जो परवाना आहे तो देखिल ब—याच दिवसापासुन दिलेला नाही. त्यांना परवाने दयावेत व जुन्या परवान्यांना मुदतवाढ दयावी.

<u>मा. सदस्य श्री. मोहन साधवानी:—</u>नविन नळ जोडणी घेताना रूपये १६०० डिपॉझिट व रूपये १६०० लाच दयावी लागते त्यानंतर नविन नळ जोडणी मिळते. अशाप्रकारे रूपये ३२०० खर्च करावे लागतात यामुळे लोकांचा कल अवैध नळ जोडणी घेण्याकडे असतो.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:—</u>आमच्या प्रभागात आम्ही कोणतीही लाच न देता नळ जोडणी टाकुन देतो.

<u>मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:—</u>नविन नळ जोडणीसाठी लोकांना कॅम्प नं. ५ येथील कार्यालयात पाठविले जाते. तेथील दाखला मिळाल्यावरच नळजोडणी मिळते. तेथील कार्यालयात गेल्यावर ते जुने बिल्डरच्या नावावर असलेले देयक भरायला लावतात. यामुळे कंटाळुन लोक अवैध नळ जोडण्या घेतात.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u> आधी पाणी पुरवठा विभागाचे मंडळ होते. त्यावेळी प्रत्येक विभागात एका मिस्त्रीची नेमणूक केली होती. तो मिस्त्रीच नळ जोडणी दयायचा. त्यामुळे नळ जोडण्यांवर नियंत्रण होते. परंतु आता कोणीही प्लंबर नळ जोडणी करुन घेतो. त्यामुळे वितरण व्यवस्था कोलमडली आहे.

<u>मा. सभापती :–</u> यामुळेच वितरण व्यवस्था खराब झाली आहे.

<u>कार्यकारी अभियंता (पा.पु.वि.)(श्री. आर.आर. सावकारे):–</u> आम्ही अवैध नळजोडण्या खंडीत करतो.

<u>श्री. सुरेश (पप्पु) कालानी (मा. आमदार):–</u>तुम्ही अवैध नळजोडण्या घेणा–यावंर एफ.आय.आर दाखल करायला हवा. तुम्ही शिस्त राखायला हवी. त्यामुळे यावर नियंत्रण येईल.

<u>मा. सभापती :–</u>माझ्या प्रभागात तर कोणीही जावून वॉल्व उघडते. एक महिला आहे मिना नावाची ती स्वत: जावून वॉल्व उघडते व बंद करते. त्यामुळे तेथिल लोकांनी तक्रार केली असता, मी तिला बोलावले तेव्हा तिच्याशी माझे भांडण देखील झाले. तरी ती ऐकत नाही.

<u>कार्यकारी अभियंता (पा.पु.वि.)(श्री. आर.आर. सावकारे):–</u>आता आम्ही ते जावून बंद केले आहे.

<u>मा. सभापती :–</u>पण हे असे का होते? आपले कर्मचारी या कामासाठी ७–८ हजार रुपये पगार घेतात, त्यांनी त्यांचे काम व्यवस्थीत करायला हवे.

<u>श्री. सुरेश (पप्पु) कालानी (मा. आमदार):–</u>तुम्ही येथे उत्पन्न वाढीसाठी उपाय सुचवायला हवे. तुम्ही एवढी वर्ष झाले निवडून येतात. काही तरी उपाय सुचवायला हवा. तुम्ही फक्त खर्च जास्त करता, परंतु उत्पन्न वाढीसाठी काही करत नाही. उत्पन्न कसे वाढेल याचा देखील विचार करायला हवा. उत्पन्न नसल्याने महापालिकेची अवस्था बिकट झाली आहे. देणेक–यांचे देणे होत नाही. त्यामुळे दिवसभर महापालिकेत ठेकेदार बसलेले असतात. त्यांना पैसे न मिळाल्याने ते काम हाती घेत नाहीत. परंतु अधिकारी व आपण त्यांची समजूत घालून काम करण्यासाठी प्रवृत्त करतो, त्यामुळे ते काम करीत आहेत. यासाठी महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याचा देखील प्रयत्न करायला हवा.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u> उल्हासनगर शहरात बरेच कारखाने आहेत. त्यांच्याकडे एमएसइसीबी चे कनेक्शन आहे, परंतु त्यांचे कर निर्धारण झालेले नाही. आपण त्यांना नळजोडणी दिल्यास व घरपट्टी आकारणी केल्यास डिपॉझिट द्वारे मोठया प्रमाणावर उत्पन्न प्राप्त होवू शकते. त्यांच्याकडे घरपट्टी नसल्याने ते एमएसइबीत लाच देवून काम करुन घेतात. त्यांचे तेथे जास्त पैसे जातात. यासाठी त्यांना महापालिकेने ना हरकत दाखला दयायला हवा.

<u>श्री. सुरेश कालानी (मा. आमदार):–</u>याचा अर्थ आपण अनधिकृत बांधकामास प्रोत्साहन देत आहात असा होतो. ज्या बांधकामास परवानगी नसेल, योग्य कागदपत्रे नसतील असे बांधकाम अनधिकृत असते. त्यांना आपण ना हरकत दाखला देवू शकत नाही. ना हरकत दाखला दयायचा असेल तर त्यांच्याकडुन हमीपत्र घ्यायला हवे की, महापालिका भविष्यात कधीही तुमचे बांधकाम तोडु शकते. अनधिकृत बांधकाम धारकांकडुन जास्त पैसे घ्यायला हवे व ज्यांच्याकडे बांधकाम परवानगी असेल त्यांच्याकडुन कमी पैसे घ्यायला हवे. जेणेकरुन त्यांना एमएसइबीकडुन जोडणी घेतांना पैसे दयावे लागणार नाही. याशिवाय आपले अजून काही विचार असतील तर ते सांगा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> जी २० हजार अनधिकृत नळ जोडण्या आहेत, त्यांचा शोध घेवून त्यांना दंड आकारणी करुन त्या नियमित करायला हव्यात. त्याचप्रमाणे पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेमध्ये ५० टक्के एवढी गळती आहे. ती शोधून काढुन थांबवायला हवी. जेणेकरुन नुकसान कमी होईल. शहराती बरेच पाणी वाया जात आहे. ते थांबविले तर सध्या होत असलेला पाणी पुरवठा हा २४ तास अविरत चालू शकतो. तसेच महापालिकेला महसूलही मिळेल. दरवर्षी अर्थसंकल्प येतो तेव्हा त्यामध्ये करवाढ सुचविली जाते. व करवाढ न केल्यास कामे होणार नाही असेही सांगितले जाते. परंतु आम्हांलाही शहरातील लोकांना तोंड दयावे लागते. त्यांना व्यवस्थित सुविधा मिळाल्यास करवाढ करण्यास हरकत नाही. करवाढ करण्याऐवजी जी थकबाकी आहे त्याची वसूली करायला हवी. शहरातील सुमारे २० हजार मालमत्तांचे सर्वेक्षण झालेले नाही. ते करायला हवे. तसेच सुमारे

१३,५०० झोपडया आहेत त्या शोधून त्यांना कर आकारणी करायला हवी. नगरसेवक तुम्हांला नेहमी सहयोग करतात.

श्री. सुरेश (पप्पु) कालानी (मा. आमदार):—आयुक्तांनी महापौर, उपमहापौर , स्थायी समिती सभापती व नगरसेवक निधी यामध्ये कपात केली होती तुम्ही तो पुन्हा वाढविला आहे. तो खर्चही कमी करायला हवा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—आम्ही तो शासकीय नियमाप्रमाणे ठेवलेला आहे. महापालिकेचे जे उत्पन्न असते त्याच्या दोन टक्के एवढी रक्कम आपण त्यासाठी ठेवु शकतो. आयुक्तांनी आधी अर्थसंकल्पात कमी रक्कम दर्शविली होती. आता आम्ही अर्थसंकल्प रू. १८३ कोटीचा केला आहे. त्यास अनुसरून आम्ही नगरसेवक निधी रूपये ४ लाख एवढा ठेवला आहे.

श्री. सुरेश (पप्पु) कालानी (मा. आमदार):—हा निधी कमी केला तर महापालिकेचे किती रूपये वाचतील?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—सन २००२ पर्यंत हा निधी रूपये १० लाख एवढा होता परंतु त्यानंतर श्री. पोखरकर साहेबांनी शासनाला पत्र देवुन तो कमी करण्यासाठी सांगितले त्याप्रमाणे शासनाने सर्व महापालिकेतील नगरसेवक निधी कमी केलेला आहे.

यावेळी मा. सदस्य श्री. मोहन साधवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—उत्पन्न वाढविण्यासाठी कर वसुली जास्तीत जास्त करण्याचे प्रयत्न करावेत. उत्पन्न वाढविण्यासाठी नविन पर्याय शोधणे आवश्यक आहे. जसे पाणी पुरवठा योजनेमध्ये नुकसान आहे ते कमी करायला हवे. ब—याच मालमत्ताचे निर्धारण झालेले नाही. सुमारे २० हजार व्यापारी नळ जोडण्या आहेत त्या शोधुन त्यावर आकारणी करायला हवी. सध्या जकातीचे मार्गस्थ शुल्क रूपये २० एवढे आहे. इतर महापालिकांमध्ये ते रूपये १०० आहे. ते वाढविल्यास रूपये २—३ करोड वाढतील. शासनाकडे ते प्रलंबित आहे. त्याचा निकाल लागल्यास फायदा होवु शकेल. त्याचप्रमाणे शहरात ज्या इमारतींमध्ये वाढीव बांधकाम केलेले आहे. तेथे बाल्कनी व जीन्याचा चटई क्षेत्र निर्देशांक वाढवुन दिल्यास त्याद्वारे उत्पन्न वाढु शकते. तसेच टीडीआर दिल्यास त्यानेही उत्पन्न वाढु शकते. सध्या आमचे जकातीचे जे उपायुक्त आहेत ते सक्षम आहेत. त्यामुळे वसुली चांगली आहे. त्यांनी सहा कर्मचा—यांना निलंबित देखिल केले. जकात चोरी थांबली तर महापालिकेचे उत्पन्न अजुन वाढेल. त्याचप्रमाणे शासकीय योजनांचा देखिल महापालिकेने जास्तीत जास्त फायदा घ्यायला हवा. येथे आमचे आमदार उपस्थित आहेत. त्यांची वर चांगली चालते. त्यांच्यामार्फत जास्तीत जास्त फायदा घेण्याचा प्रयत्न व्हायला हवा. तसेच ज्या इमारती आरक्षित भुखंडावर आहेत. त्या नियमित केल्यास करोडो रूपये प्राप्त होवु शकतात. यापुर्वी नगरपालिकेत श्री. प्रल्हाद आडवानी हे अध्यक्ष असताना १९८७ साली त्यांनी अशाप्रकारे काही इमारती नियमित केल्या होत्या. आम्ही महासभेत तसा ठरावही पास केला आहे. त्याचप्रमाणे काही आरक्षित भुखंडावर सनद असते अशा व्यक्तींना बांधकाम परवानगी देताना २५ टक्के बांधकाम महापालिकेस हस्तांतरीत करेल या अटीवर परवानगी दिली जाते. अशा ब—याच मालमत्ता आता महापालिकेकडे आहेत. त्या विकल्यास त्यापासुन सुमारे रू. १५—२० कोटी महापालिकेस प्राप्त होवु शकतात. याचे एक उदाहरण देतो विठ्ठलवाडी स्टेशन जवळ एका व्यक्तीने पार्कींगसाठी आरक्षित भुखंडावर ॲम्ब्रोसिया नावाचे हॉटेल बांधले आहे. हॉटेल बांधुन झाल्यावर त्याने तेथील २५ टक्के प्रमाणे भुखंड पार्कींगसाठी महापालिकेच्या ताब्यात दिला. परंतु सध्या तेथे तोच इसम स्वत:च्या पार्कींगसाठी तो भुखंड वापरीत आहे. ब—याच ठिकाणी बिल्डर जागा देताना महापालिकेस कोप—यातील अथवा चौथ्या मजल्यावरील जागा देतात. असे न करता आपण मोक्याच्या ठिकाणावरील जागा घ्यायला हवी. परंतु असे होत नाही. आयुक्तं स्वत:च्या अधिकारात करार करून टाकतात. एमआरटीपी ॲक्टच्या कलम ३७ प्रमाणे याची अंतिम मान्यता देण्याचा अधिकार महासभेला आहे. परंतु आजपर्यंत एकाही आयुक्तांनी असे प्रकरण महासभेसमोर आणलेले नाही. यानंतर असे व्हायला नको. आयुक्त हे फक्त त्या मालमत्तेची देखरेख करू शकतात. अंतिम मान्यता महासभाच देईल.

<u>मा. सभापती:—</u>इंदीरा गांधी भाजी मार्केट येथे देखिल एक इमारत बनली आहे. परंतु तेथील विकासकाने महापालिकेस २५ टक्के जागा न देता सदर ठिकाणी स्वत:चे टाळे लावले आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>भाजी मार्केट मधील गाळयांचा लिलाव करण्यासाठी यापुर्वी निविदा काढण्यात आली होती परंतु ती अंतिम न केल्याने काही व्यक्तींनी अनाधिकृतरित्या गाळयांचा ताबा घेतलेला आहे. निविदा काढुन गाळे दिले तर उत्पन्न प्राप्त होवु शकते. त्याचप्रमाणे शहरात स्पोर्टस कॉम्प्लॅक्स व टाऊनहॉल आहे. त्याचेही काम पुर्ण झालेले नाही. टाऊन हॉलला आम्ही दोन वेळा मुदतवाढ दिली अजुन त्याचे काम झालेले नाही. तर ते देखिल बघायला हवे. त्याचप्रमाणे येथे मोठया प्रमाणावर नोकर भरती झाली. शासन निर्णयाप्रमाणे नोकर भरती करताना एक समिती स्थापन करायला हवी. व त्यामध्ये लोकप्रतिनिधींनाही घ्यायला हवे. परंतु येथे असे केले नाही. मोठया प्रमाणावर नोकर भरती करण्यात आली. आवश्यकता नसतानाही बाहेरून लोकांना घेतले गेले. आता येथे अतिरिक्त कर्मचारी झाले आहेत. जे कर्मचारी नव्याने घेतले आहेत त्यामुळे आस्थापना खर्चात देखिल वाढ झाली आहे. आवश्यकता नसेल तर त्यांना कामावरून कमी करण्यात यावे. तसेच पदोन्नती देतानाही येथील स्थानिक कर्मचा—यांनाच पदोन्नती दयायला हवी. परंतु येथे असे झालेले नाही. यामुळे महापालिकेवरील बोजा वाढला आहे. या व आमच्या व इतर सूचना या ठराव मानुन प्रशासनाने त्यावर अंमलबजावणी करायला हवी.

<u>मा. सभापती:—</u>वरील चर्चेअंती श्री किशोर वनवारी यांनी सुचविलेल्या सुचनांसह महापालिकेचे अर्थसंकल्पीय अंदाज व शिक्षण मंडळाने प्रस्तावित केलेले अर्थसंकल्पीय अंदाज या दोन्ही विषयी पुढीलप्रमाणे सर्वानुमते ठराव पारीत करीत आहे.

<u>विषय क्र. १</u> : करांचे दर प्रस्तावित करणे व सन २००५—०६ साठी अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणे.

<u>प्रस्तावना :</u>

सन २००४—२००५ या वर्षा करिता अर्थसंकल्पीय अंदाजाप्रमाणे उत्पन्न रू. १८५.५० कोटी अपेक्षीत होते आणि खर्च रू. १८५.३५ कोटी अपेक्षित होता. अर्थसंकल्पीय अंदाजाप्रमाणे उत्पन्न होत नाही , त्यामूळे खर्चात कपात करणे आवश्यक असून सदर वर्षात उत्पन्नाचा खर्चाशी मेळ बसविण्यासाठी आयुक्तांनी सन २००४—२००५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात येणे प्रमाणे सुधारणा प्रस्तुत केलेली आहे.

उत्पन्न : १२०.२७ कोटी

खर्च : १२०.१० कोटी

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ च्या तरतुदी प्रमाणे आयुक्तांनी सन २००५—२००६ करिता उत्पन्न व खर्च यांचे अंदाज तयार केले असून ते खालील प्रमाणे आहे.

उत्पन्न : १२६.६२ कोटी

खर्च : १६१.६९ कोटी

वित्तीय वर्ष २००५—२००६ चे अपेक्षित उत्पन्न व खर्च लक्षात घेता रहाणारी तुट रू. ३५.०७ कोटी जकात, मालमत्ता कर, पाणी पट्टी, टॅंकर भाडे व इतर फी च्या दरामध्ये वाढ करणेचा प्रस्ताव आयुक्तांनी स्थायी समितीपुढे सादर केला आहे. तसेच आयुक्तांनी स्थायी समितीकडे अर्थसंकल्पीय अंदाज सादर करताना त्या सोबत वर्ष २००३—०४ च्या लेखा विवरण पत्र व अर्थसहाय देवून पुरवण्यात आलेल्या सेवां बाबत अहवाल जोडला आहे. सदर सेवा म्हणजे पाणीपुरवठा व मलजलाची विल्हेवाट, कचरा साफ करणे त्याची वाहतुक करणे व विल्हेवाट लावणे आणि रस्त्यावरील दिवाबत्तीची व्यवस्था इत्यादी.

आयुक्तांचे सन २००४–२००५ चे सुधारीत अंदाजपत्रक, सन २००५–२००६ चे जमा–खर्चाचे अंदाज, कर वाढीचे प्रस्ताव व प्रशासनाकडून तपशिलवार माहिती घेवून अधिनियमाचे कलम ९६ नुसार अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणेस प्रस्तावित आहे.

**स्थायी समिती ठराव क्रमांक : १५८** **दिनांक : ९/२/२००५**

सुचकाचे नांव : श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नांव : श्री. सतरामदास जेसवानी

ही स्थायी समिती आयुक्तांकडून विविध करामधील वाढसंबधी प्रस्ताव, आयुक्तांचे सन२००५–२००६ चे जमा–खर्चाचे अंदाज तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ९६ मधील सर्व तरतूदी व सभेत चर्चेअंती सुचवलेल्या फेरफार विचारात घेवून विविध कराचे दर खालील प्रमाणे प्रस्तावित करीत आहे.

अ) जकात :–

| वस्तू गट क्रमांक | वस्तूचे नांव | सद्याचे प्रचलित दर (%) | प्रस्तावीत वाढीव दर (%) | अंदाजीत वाढीव उत्पन्न (लाखात) |
|---|---|---|---|---|
| १३ | कॅन्फेशनेरी, जेली,मासळी,किराणा माल इ. | ३.०० | ४.०० | १२८ |
| ३८अ | सर्व प्रकारचे पेट्रोल व स्पिरीट इत्यादी | ३.५० | ४.०० | १०० |
| ३८अ | सर्व प्रकारचे खनिजतेल , पेट्रोलियम पदार्थ | २.५० | ३.०० | |
| ४०ब | केमिकल्स | ३.२५ | ४.०० | ५६ |
| ५३क | प्लॉस्टिक व बेकालाईट इ. | २.४० | २.६० | ३१ |
| ४१ | सर्व प्रकारचे कापड | १.६० | १.८० | १८८ |
| ४५ | सुत | १.९० | २.०० | ११ |
| ५१ | हार्डवेअर, लोखंड व पोलाद | ३.०० | ३.२० | २३ |
| ५७ | पितळ,तांबे,टिन,ॲल्युमिनियम व इतर अलोह धातू | १.४० | १.५० | १८ |
| | **एकुण अपेक्षित उत्पन्न :–** | | | ५५५ |

ब) पाणी टॅकर भाडे :–

| टॅकर क्षमता | प्रस्तावित दर |
|---|---|
| ७००० लिटर | रु. २५० प्रती फेरी |
| १०००० लिटर | रु. ३०० प्रती फेरी |

क) मालमत्ता कर :—

मालमत्ता करातील दरात कोणतीही वाढ मंजूर न करता प्रचलित दर कायम करण्यात येत आहे.

ड) पाणी पट्टी दर :—

पाणी पट्टीच्या दरात कोणतीही वाढ मंजूर न करता प्रचलित दर कायम करण्यात येत आहे. आयुक्तांनी २००५—२००६ करिता उत्पन्न व खर्चाचे जे अंदाज सादर केले आहेत त्यात पुढील प्रमाणे फेरफार करुन अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्यात येत आहे.

| पान क्रमांक | अ.क्र. | उत्पन्न | रुपये : १२६६२५० | खर्च | रुपये % १६१६९५४ | पान क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | जकात | ५५००० | दिवाबत्ती दुरुस्ती व निगा | २५०० | १६ |
| २ | २ | सर्व साधारण कर | १३७७०० | दिवाबत्ती दुरुस्ती व निगा (दुर्बल घटक) | २००० | १६ |
| २ | ३ | महापालिका शिक्षण कर | २७००० | रस्त्यावरील दिवाबत्ती बीले | २५०० | १६ |
| २ | ४ | वृक्ष कर | २७०० | शोध विकास व वीज बचत | १००० | १६ |
| २ | ५ | पथ कर | १६२०० | उदयाने दुरुस्ती व निगा | ५००० | १९ |
| ९ | ६ | शिक्षण कर | ४३२०० | माध्यमिक शिक्षण | २००० | २० |
| ९ | ७ | रोजगार हमी कर | ५४०० | गलिच्छ वस्ती सुधारणा (दुरुस्ती) | ४०० | २१ |
| ३३ | ८ | पाणी पुरवठा लाभ कर | ५४०० | दुर्बल घटक वसाहतीत खर्च (दुरुस्ती) | ४०० | २१ |
| ३३ | ९ | मल प्रवाह सुविधा लाभ कर | ५४०० | उदयाने दुरुस्ती व निगा (वार्ड कमिटी —१) | १०५० | २२ |
| ३३ | १० | मल प्रवाह कर | २७००० | रस्ते दुरुस्ती व निगा (वार्ड कमिटी —१) | १०५० | २२ |
| ३३ | ११ | पाणी बीले वसुली | ३०००00 | उदयाने दुरुस्ती व निगा (वार्ड कमिटी —२) | ९५० | २२ |
| ३४ | १२ | पाणी टॅंकर भाडे | १०००० | रस्ते दुरुस्ती व निगा (वार्ड कमिटी —२) | ९५० | २२ |
| | | | | उदयाने दुरुस्ती व निगा (वार्ड कमिटी —३) | ९०० | २२ |
| | | | | रस्ते दुरुस्ती व निगा (वार्ड कमिटी —३) | ९०० | २२ |
| | | | | उदयाने दुरुस्ती व निगा (वार्ड कमिटी —४) | ९०० | २३ |
| | | | | रस्ते दुरुस्ती व निगा (वार्ड कमिटी —४) | ९०० | २३ |
| | | | | दुर्बल घटक वसाहतीसाठी नवीन दिवाबत्ती खरेदी | १५०० | २५ |
| | | | | महापालिका इमारती बनविणे (प्रशासकीय व निवासी) | ८००० | २७ |
| | | | | नवीन रस्ते बनविणे | १४०००० | २७ |
| | | | | नगरसेवक निधीतून विकास कार्य | १६२०० | २७ |
| | | | | दुर्बल घटक वसाहतीत विकास कार्य | २००० | २८ |
| | | | | गलिच्छ वस्त्यात विकास कार्य | २००० | २९ |
| | | | | महापौर निधी | ५००० | २९ |
| | | | | उप महापौर निधी | २५०० | २९ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | स्थायी समिती सभापती निधी | २५०० | २९ |
| | | | | | शिक्षण कर परतावा | ४३२०० | ३२ |
| | | | | | रोजगार हमी कर परतावा | ५४०० | ३२ |
| | | | | | पाणी टॅंकर भाडे | ५००० | ४० |
| | | | | | कुपनलिका दुरुस्ती खर्च | ३००० | ४० |
| | | | | | बुस्टर पंपिंग मशिनरी | १००० | ४१ |
| | | | | | दुर्बल घटक वसाहतीत शौचालय, मुता—या, नाले, गटार व कलव्हर्ट इत्यादी खर्च (दुरुस्ती) | ३५०० | ४२ |
| | | | | | पावर पंप व पा. पु. साहित्य खरेदी व बसविणे खर्च (नविन) (दुर्बल घटक) | ५५०० | ४६ |
| | | | | | सार्वजनिक शौचालय , मुता—या , नाले, गटार व कलव्हर्ट इ. बनविणे . (नविन) | ५००० | ४७ |
| | | | | | दुर्बल घटक वसाहतीत शौचालय , मुता—या , नाले, गटार व कलव्हर्ट इ. बनविणे ( नविन ) . | ३००० | ४७ |
| | | एकुण :— | १९०१२५० | | १८९४६५४ | | |
| | | | | अखेरची शिल्लक :— | ६५९६ | | |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ मध्ये उल्लेखलेल्या सर्व अनुषगिंक बाबी विचारात घेवून **सन २००५—२००६ साठी रुपये ६५ .९६ लक्ष** शिल्लकीच्या अर्थसंकल्पिय अंदाज तयार करण्यात येत आहे. तसेच सन २००४—२००५ च्या सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाजास व प्रस्तावित करण्यात आलेल्या कराच्या दरास अंतिम मान्यता देण्यासाठी महासभेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

उक्त अंदाजपत्रक छापून प्रत्येक पालिका सदस्यास त्यांची प्रत पाठविण्याची व्यवस्था मुख्य लेखा अधिकारी करतील व छापील अंदाजपत्रक या ठरावाचा भाग मानला जाईल.

<u>सर्वानुमते</u>

सभापती /पिठासन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपलिका

<u>प्रस्तावना</u> :

<u>विषय क्र. २</u> : उल्हासनगर महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाच्या अर्थसंकल्पीय अंदाज विचारात घेणे.

प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ मधील पार पाडावयाची कार्ये व कर्तव्य लक्षात घेता, उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळातर्फे शिक्षण मंडळ ठराव क्रमांक १०५ दिनांक १८/८/२००४ अन्वये खालील प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे .

अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : १००७८९५००/—

अंदाजपत्रकीय खर्च रुपये : १००७८९५००/—

उपरोक्त दर्शविलेल्या एकूण अंदाजात रुपये ३९२८१००० /— शासकीय अनुदान अपेक्षित असून उर्वरित रक्कम ६०६८१५०० /— महापालिकेकडून महापालिका वर्गणी म्हणून अदा करावयाची आहे . शिक्षण मंडळाने सादर केलेल्या अंदाजपत्रकात काही लेखाशीर्षातर्गत बाबीवरील खर्च वगळून पुढील प्रमाणे सिमित करण्यात आलेले आहे व त्याचे परिशिष्ट सोबत जोडण्यात आलेले आहे .

अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : ९४७८९५००/—

अंदाजपत्रकीय खर्च रुपये : ९४७८९५००/—

सदर खर्चापोटी महापालिकेचा हिस्सा म्हणून रुपये ५४६८१५००/— ची तरतुद करण्यात आलेली आहे. शिवाय महापालिका शाळा दुरुस्तीसाठी व नविन शाळा बनविणेसाठी महापालिका अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आलेली आहे .

सबब शिक्षण मंडळाचे सन २००५—२००६ चे अंदाजपत्रक स्थायी समिती मान्यतेसाठी प्रस्तावीत करीत आहे.

**स्थायी समिती ठराव क्रमांक : १५९** **दिनांक : ९/२/२००५**

सुचकाचे नांव : श्री. नरेंद्रकुमार ठाकूर

अनुमोदकाचे नांव : श्री. नारायण पंजाबी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे मा. महासभा मंजूरीच्या अधिन राहून शिक्षण मंडळाचे सन २००५—२००६ चे अंदाजपत्रकास स्वीकृती देत आहे.

सुचकाची सही /—

अनुमोदकाची सही /—

<u>एकमताने मंजूर</u>

पिठासन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपलिका

सायंकाळी ७. ०५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. पीठासीन अधिकारी यांनी जाहीर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांक :—४ मार्च, २००५

# दिनांक ०४/०३/२००५ रोजी घेण्यात आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक ०४/०३/२००५ रोजी सायंकाळी ४. ३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात आयोजित करण्यात आली होती सदर सभेस खालील दर्शविलेले सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या

०१) मा. सभापती श्रीमती ज्योती कालानी
०२) श्री वनवारी किशोर नारायणदास
०३) श्री एडके गणपत गोविंद
०४) श्री गायकवाड सुरेश नामदेव
०५) श्रीमती जावळे संगिता रमेश
०६) श्री संजय बठिजा
०७) श्रीमती वनवारी मोना अशोक
०८) श्री. साधवानी मोहन रहंदोमल
०९) श्री. उमाप रामदास राघोजी
१०) श्री ठाकुर नरेंद्र केवलराम (कुमारी)
११) श्रीमती छाब्रिया भारती पहलाज
१२) श्री जेसवानी सतरामदास फतनदास
१३) श्री पंजाबी नारायण सन्मुखदास
१४) श्रीमती बामणकर नंदिनी गजानन

तर,
०१) श्री. बेहरानी मोहन, ०२) श्री. सोनवणे नथु काशिराम हे सभेस अनुपस्थित होते.

सायंकाळी ४. ४० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यात आले.

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

विषय:— मागील सभेचे दिनांक २७/१/२००५ रोजीचे व दिनांक २/२/०५ रोजीचे (त्यात दिनांक ७/२/०५ व ९/२/०५ रोजीचे) इतिवृत्त कायम करणे.

मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :— मा. सभापती महोदया, मागील बैठकीत मी माझ्या प्रभागातील डांबरीकरणाचे काम करण्याबद्दल सांगितले होते, तरी देखिल आजच्या सभेत माझा प्रस्ताव आलेला नाही. असे का?

मा. सभापती :— इतिवृत्तामध्ये आहे का?

मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :— इतिवृत्तात आले आहे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :— यांचे म्हणणे असे आहे की, इतिवृत्तात त्याचा उल्लेख झालेला नाही.

मा. सचिव :— इतिवृत्तात आले आहे.

<u>मा. सदस्य श्री नरेंद्रकुमार ठाकुर :—</u> रस्ता कोणता होता.

<u>मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :—</u> सी ब्लॉक, गवळी पाडा ते दत्त मंदिर या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम होते.

<u>मा. प्रभारी आयुक्त :—</u> हा रस्ता विकास आराखडयामध्ये आहे का?

<u>मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :—</u> नाही.

<u>मा. प्रभारी आयुक्त :—</u> त्यामुळे त्या रस्त्याचे काम येथे आले नसेल.

<u>मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :—</u> आयुक्त साहेब आमच्या विभागात झोपडपट्टी आहे, तेथे काम करणे आवश्यक आहे, कृपया पुढीलवेळी याचे काम आणावे.

<u>काही सदस्य :—</u> पास, पास.........

<u>मा. सभापती :—</u> मागील सभेचे दिनांक २७/१/२००५ रोजीचे व दिनांक २/२/०५ रोजीचे (त्यात दिनांक ७/२/०५ व ९/२/०५ रोजीचे) इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र २</u> :— प्रभात सिनेमा, प्रभाग क्र. १२, उल्हासनगर—५ येथील वापरात नसलेल्या सार्वजनिक शौचालयाच्या विनीयोगास मान्यता देणे.

<u>मा. सदस्य श्री मोहन साधवानी :—</u> मा. सभापती महोदया माझी विनंती आहे की, या ठिकाणी जोपर्यंत नवीन सुलभ शौचालय तयार होत नाही तोपर्यंत जुने शौचालय तोडण्यात येवु नये. या ठिकाणी व्यापारी विभाग आहे, शौचालय लगेच तोडल्यास त्रास होवु शकतो.

<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी :—</u> ठेकेदाराला तसे सांगावे.

<u>मा. प्रभारी आयुक्त :—</u> ठिक आहे.

<u>काही सदस्य :—</u> पास, पास.........

<u>मा. सभापती :—</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना:—</u>

<u>विषय क्र.२ :—</u> प्रभात सिनेमा, प्रभाग क्र. १२, उल्हासनगर—५ येथील वापरात नसलेल्या सार्वजनिक शौचालयाच्या विनीयोगास मान्यता देणे.

उपरोक्त विषयाबाबतचे पत्र ''एकता सामाजिक प्रतिष्ठान'' या संस्थेकडुन आरोग्य विभागास प्राप्त झाले आहे.

'एकता सामाजिक प्रतिष्ठान' यांनी महासभा ठराव क्र. १९, दि. १९.५.२००४ अन्वये प्रभात सिनेमा, प्रभाग क्र. १२, उल्हासनगर–५ येथे ''पैसे द्या व वापरा'' तत्वावर शौचालय बांधकाम करणेसंबधी दिनांक ५.८.२००४ रोजी उल्हासनगर महानगरपालिकेशी करारनामा केला आहे. सदर ठिकाणी शौचालयाचे काम सुरू करणेची (वर्क ऑर्डर) सदर संस्थेस देण्यात आली आहे.

परंतु प्रभात सिनेमा, प्रभाग क्र. १२, उल्हासनगर–५ येथे जुनी मुतारी असल्याने सदर ठिकाणची जुनी मुतारी तोडण्याची व त्या ठिकाणी ''पैसे द्या व वापरा'' तत्वावर नवीन शौचालय बांधण्यांची अनुमती देणेचे उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये सदर संस्थेकडून कळविण्यात आले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे. सबब प्रस्तावित मुतारी निष्कासित करून सदर मालमत्त्चो ''पैसे द्या व वापरा'' तत्वावर शौचालय बांधण्यासाठी विनियोग केला जाईल. तरी सदर मालमत्ता निष्कासित करण्यासाठी व त्या ठिकाणी ''पैसे द्या व वापरा'' तत्वावर शौचालय बांधण्यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ प्रमाणे मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १६०      दिनांकः– ४.३.२००५

सुचकाचे नाव :–श्री. सतरामदास जेसवानी
अनुमोदकाचे नाव :–श्री. गणपत एडके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार प्रभात सिनेमा, प्रभाग क्र. १२, उल्हासनगर–५ येथील जुने सार्वजनिक शौचालय निष्कासन करण्यास व जागेवरील परिस्थिती पाहता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग / विनियोग करण्यास मान्यता देत आहे

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :– विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

विषय क्र ३ :– राधास्वामी सत्संग हॉल समोर साकव बनविणेकामी सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

काही सदस्य :– पास, पास.........

मा. सभापती :– सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावनाः–

विषय क्र.३:– राधास्वामी सत्संग हॉल समोर साकव बनविणेकामी सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

उपरोक्त संदर्भाधिन विषयाबाबत नमुद करण्यात येत आहे की, उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे राधास्वामी सतसंग हॉल समोर, कल्याण अंबरनाथ रस्त्यामध्ये असलेल्या जुन्या पाईप कलव्हर्टचे रूंदीकरण करून आर.सी.सी स्लॅबने बांधकाम हाती घेतले आहे. या कामाबाबत थोडक्यात माहिती खालील प्रमाणे आहे.

प्राकलनीय किंमत :– २१, ७८, ६५०/–

प्रशासकीय व वित्तिय मंजुरी
प्राकलन :– स्थायी समिती ठराव क्र. ४२ दिनांक ९.७.२००३
निविदा :– स्थायी समिती ठराव क्र. १२२ दिनांक २४.१२.२००३
कंत्राटदाराचे नांव :– मे. जयभारत कन्स्ट्रक्शन कपंनी
निविदा रक्कम:– २०,५३,५७६/–
निविदा दर :– प्राकलनीय दराने
कामाची मुळ मदत :– दिनांक २५/०६/२००४ पर्यंत
वाढीव मुदत :– दिनांक ३१.१२.२००४
मुदत वाढविण्याचे कारण:– पाणी पाईपलाईन, टेलीफोन, एम.ए.ई.बी. च्या केबल इत्यादींचे स्थलांतरण व अतिरिक्त करावे लागलेले खोदकाम इत्यादी कारणांमुळे.

सदर कलव्हर्टचा रस्ता कल्याण–अंबरनाथ रस्ता असल्याने या रस्त्यावर वाहतूकीचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे कलवव्हर्टचे काम करणे करिता सदर रस्ता संपुर्ण बंद करणे योग्य नसल्याने अर्ध्याभागामध्ये कलव्हर्टचे काम हाती घेण्यात आले आहे.

अर्धे कलव्हर्टचे काम झाल्यानंतर दुतर्फा जोड रस्ते बांधण्याचे काम सुरू करते वेळी या ठिकाणी घेतलेल्या चाचणी खड्डयांमध्ये कच्च्या मातीचा (plastic Soil) थर आढळुन आला होता. या थराची खोली ३ मीटर पेक्षा अधिक असल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे जोड रस्त्यांमध्ये हा थर काढून त्या जागी मुरूमाची भरणी करण्यात आली आहे. परंतु कलव्हर्टच्या दुतर्फा बांधावयाच्या जोड रस्त्यांना मजबुती येण्याकरिता आवश्यक ती तजवीज करावी लागत आहे. या करिता काही अतिरिक्त काम जसे की नव्याने मुरूम भरणी, २ फुट सोलींग, फिल्टर ड्रेन, उर्ध्व भागामध्ये काली माता मंदिराकडून येणा–या नालीमुळे रिटेनिंग वॉलचे बांधकाम इत्यादी अतिरिक्त कामे करावे लागणार असल्यामुळे मुळ प्राकलन सुधारित करण्यात आले आहे. त्याची किंमत रूपये २७,०४,४५०/– इतकी होत आहे. मुळ प्राकलनाची किंमत रू. २१,७८,६५०/– च्या तुलनेमध्ये २४. १३ टक्के वाढ होत असल्याने सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी अपेक्षित आहे. या कामावरील खर्च अर्थ संकल्पीय तरतुद सी–४ (iii) भाग–२ रस्ते, प्रवास पुल इत्यादी सुधारणे नवीन बांधणे या लेखा शिर्षातुन करण्याकरिता वर्ष २००३–२००४ मध्ये मुळ प्रस्तावित आहे. या लेखा शिर्षामधूनच सुधारित प्राकलनावरील खर्च प्रस्तावित आहे. चालू वर्षी या कामाकरिता या खर्चास या लेखाशिर्षामध्ये तरतुद उपलब्ध होत आहे.

सदर प्राकलनास शहर अभियंता यांनी तांत्रिक मंजुरी दिलेली आहे. तरी सदर सुधारित प्राकलनास स्थायी समितीकडून प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळणेकरिता प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १६१ दिनांक:– ४.३.२००५

सुचकाचे नाव :—श्री. सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :—श्री. सुरेश गायकवाड

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार राधास्वामी सत्संग हॉल समोर साकव बनविणेकामी सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

विषय क्र ४ :— उल्हासनगर शहरातील विद्युत विभागांतर्गत ४ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

काही सदस्य :— पास, पास.........

मा. सभापती :— सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:—

विषय क्र ४ :— उल्हासनगर शहरातील विद्युत विभागांतर्गत ४ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर महानगरपालिका विद्युत विभागाचे कामास दिलेल्या मंजुरीची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामांचे नाव | कामाचा कालावधी | मंजुर निविदा रक्कम रू. | मंजुरी दिनांक | एजंन्सीचे नांव | निधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | राष्ट्रीय गलिच्छवस्ती सुधार कार्यक्रम अंतर्गत उल्हासनगर—१ येथे दिवाबत्ती लावणे बाबत. | 120 days | 4,00,227.60 | 18/1/05 | M/s. Perfect Electric Works, Mumbai | म्हाडा द्वारा राष्ट्रीय झोपडपट्टीत सुधारणा कार्यक्रम |
| २ | राष्ट्रीय गलिच्छवस्ती सुधार कार्यक्रम अंतर्गत उल्हासनगर—२ | 120 days | 5,34,234.80 | 18/1/05 | M/s. Perfect Electric Works, Mumbai | म्हाडा द्वारा राष्ट्रीय झोपडपट्टीत सुधारणा कार्यक्रम |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | येथे दिवाबत्ती लावणे बाबत. | | | | Mumbai | |
| ३ | राष्ट्रीय गलिच्छवस्ती सुधार कार्यक्रम अंतर्गत उल्हासनगर–५ येथे दिवाबत्ती लावणे बाबत. | 120 days | 5,48,045.00 | 18/1/05 | M/s. Perfect Electric Works, Mumbai | म्हाडा द्वारा राष्ट्रीय झोपडपट्टीत सुधारणा कार्यक्रम |
| ४ | आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत गोल मैदान येथील समाज मंदिर परिसर व आजूबाजूस विद्युतीकरण करणे साठी. | 30 days | 99,596.50 | 26/2/04 | M/s. Gaavdevi Labour Co-op Society Ltd. | आमदार स्थानिक निधी |

तरी सदरची माहिती कृपया स्थायी समिती अवलोकनार्थ प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १६२ दिनांक:– ४.३.२००५

सुचकाचे नाव :–श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :–श्री. सतरामदास जेसवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर महानगरपालिका विद्युत विभागांतर्गत ४ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :– विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

विषय क्र ५ :– उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ७ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

काही सदस्य :— पास, पास.........

मा. सभापती :— सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:—

विषय क्र ५ :— उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ७ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् 2004-2005 च्या निधीतून मा. नगरसेवक यांनी कामे करणेसाठी विनंती केलेली आहे.

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| 1 | उल्हासनगर-1 येथील वार्ड क्र. 21, महान पॅलेसच्या मागे नाला व स्लॅब बांधणेबाबत. .(महापालिका निधी 914) | 98150/- | 1.2.2005 | मे अल्का म. का. सोसा. |
| 2 | उल्हासनगर-3 येथील वार्ड नं 25 येथील शांता गोविंदराम बंगल्यापासून ते बॅ नं 975 येथे एम 250 ने रस्ता बनविणे व पायवाटा बनविणे व 945 ते 949 येथे सिमेंट पायवाटा व नाल्या बनविणे व द्वारकाधाम ते ठकूराम अपार्टमेंट पर्यत नाली बनविणे (नगरसेवक निधी 1204) | 199900/- | 1.2.2005 | मे भोलेनाथ म. का. सोसा. |
| 3 | उल्हासनगर-3 येथील प्रभाग क्र. 24 मध्ये बॅ नं 942ते 892 ते 906 पर्यत नाला बांधणे (महापालिका निधी 928) | 299587/- | 7.2.2005 | मे शिवानी म. का. सोसा. |
| 4 | उल्हासनगर-3येथील रामगिरधर इंडस्ट्रियल इस्टेट येथील नाल्याची दुरूस्ती व चेंबर बनविणे. (महापालिका निधी 1341) | 112100/- | 7.2.2005 | मे श्री मॉ म. का. सोसा. |
| 5 | उल्हासनगर-3 येथील प्रभाग क्र. 24 मधील महापालिकेजवळ आंबेडकर पुतळयाजवळ,ब्लॉक सी 48, 49 डॉ ग्वालानी हाऊस येथे सी सी पॅसेज व नाली बनविणे व मल्हार टी जवळ कलव्हर्ट बनविणे (नगरसेवक निधी 1242) | 199655/- | 1.2.2005 | मे गुरूराज म. का. सोसा. |
| 6 | उल्हासनगर-3 राधाबाई क्रिपलानी चौकाजवळ बॅनं 181 येथील शौचालय व सिमेंट पायवाटा दुरूस्ती करणे (महापालिका निधी 1347) | 49800/- | 7.2.2005 | मे महादेव क्रीपा म. का. सोसा. |
| 7 | उल्हासनगर-3 येथील प्रभाग क्र. 24 मधील बॅ नं 823 ते 827 जवळ व बॅ नं 831, 832, 837, | 299322/- | 7.2.2005 | मे भोलेनाथ म. का. सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | 840 येथे सी सी एम 250 व नाली दुरूस्ती करणे (महापालिका निधी 1360) | | | |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १६३ दिनांक:— ४.३.२००५

सुचकाचे नाव :—श्री. नारायण पंजाबी
अनुमोदकाचे नाव :—श्री. गणपत एडके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर महानगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ७ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

विषय क्र ६ :— उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत २ विविध कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे

मा. सदस्य श्री रामदास उमाप :— निधी कोणत्या वर्षाचा आहे? कोणता निधी आहे?

मा. सदस्य श्री किशोर वनवारी :— हा चालु वर्षाचा निधी आहे. १ एप्रिलपासुन नवीन निधीची कामे सुरु होतात.

काही सदस्य :— पास, पास.........

मा. सभापती :— सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:—

विषय क्र.६ :— उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत २ विविध कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् 2004-2005 च्या निधीतून कामे करण्यास प्राकलने तयार केलेली आहे.

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत |
|---|---|---|
| 1 | उल्हासनगर 3 येथील प्रभाग क्रमांक 25 मध्ये फॉलवर लाईन येथे बॅ नं 11238 जवळ 10 बैठकिचे शौचालय बाधणे. | 493920/- |
| 2 | उल्हासनगर-2 प्रभाग क्र. 5 मधील, विशाल विरेवाला हयांच्या घराजवळ एम-250 रोड बनविणे बॅ नं 619 समोरील नाला बनविणे व बॅ नं क्र. 588, 587 व आणि दुर्गानगर येथे सी सी पायवाट व नाली बनविणे. | 490800/- |

उपरोक्त नमुद केलेल्या कामांच्या जागेवर जाऊन कनिष्ठ अभियंता व उप-अभियंता यांनी पहाणी करून सदर प्राकलने तयार केलेली आहे. तरी सदर कामे करून घेण्यासाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळण्याकरिता स्थायी समिति सभेपुढे ठेवण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १६४ दिनांक:— ४.३.२००५

सुचकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
अनुमोदकाचे नाव :— श्री. रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत उपरोक्त २ विविध कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

विषय क्र ७ :— उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत उल्हासनगर—४, प्रभाग क्र १५ मध्ये महाराष्ट्र बॅक ते बॅ.नं. १३०६ पुजा अपार्टमेंट पर्यंत एम २५० रोड व नाली बनविणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :– मा. सभापती महोदया, आम्ही आमचे जे प्रस्ताव देतो ते येथे येत नाहीत. आमच्या प्रभागातील कामे होत नाही. श्रीमती जावळे यांच्या प्रभागातील देखिल एक काम आहे, तसेच श्रीमती बामणकर यांच्या प्रभागातील शौचालयाचे काम आहे, ते देखिल अद्याप येथे आलेले नाही. त्या कामाची तर मोठी फाईल तयार झाली आहे. आमचे प्रस्ताव देखिल येथे यायला हवेत.

मा. सभापती :– पुढच्या वेळेस तुमच्या प्रस्तावांचे बघु.

काही सदस्य :– पास, पास.........

मा. सभापती :– सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:–

विषय क्र.७ :– उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत उल्हासनगर–४, प्रभाग क्र १५ मध्ये महाराष्ट्र बॅंक ते बॅ.नं. १३०६ पुजा अपार्टमेंट पर्यंत एम २५० रोड व नाली बनविणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेले काम करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् 2004-2005 च्या निधीतून काम करण्यास प्राकलने तयार केलेली आहे.

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत |
|---|---|---|
| 1 | उल्हासनगर-4 प्रभाग क्र. 15 मध्ये महाराष्ट्र बॅंक त बॅ नं 1348 यु सर्कल ते विटमॅन हायपिंग ते बॅ नं 1306 पुजा अपार्टमेंट पर्यत एम-250 रोड व नाली बनविणे | 4,97,300/- |

उपरोक्त नमुद केलेल्या कामाच्या जागेवर जाऊन कनिष्ठ अभियंता व उप–अभियंता यांनी पहाणी करून सदर प्राकलन तयार केले आहे. तरी सदर काम करून घेण्यासाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळण्याकरिता स्थायी समिती सभेपुढे ठेवण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १६५ दिनांक:– ४.३.२००५

सुचकाचे नाव :– श्री. संजय बठिजा

अनुमोदकाचे नाव :– श्री. सुरेश गायकवाड

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत उल्हासनगर–४, प्रभाग क्र १५ मध्ये महाराष्ट्र बॅंक ते बॅ नं १३४८ यु सर्कल ते विटमॅन हायपिंग ते बॅ नं १३०६ पुजा अपार्टमेंट पर्यंत एम २५० रोड व नाली बनविणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

विषय क्र ८ :— बॅ.क्र. ९५७ समोरील व ९४१/१ जवळ, सेक्शन २२, प्र.क्र २५, उल्हासनगर—३ येथील वापरात नसलेल्या सार्वजनिक शौचालयांच्या विनीयोगास मान्यता देणे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :— हे काम कोणत्या संस्थेला देणार आहात?

मा. प्रभारी आयुक्त :— ज्या संस्थांचे अर्ज प्राप्त होतील त्यापैकी चांगल्या संस्थेस सदर ठिकाणचे काम देण्यात येईल.

काही सदस्य :— पास, पास.........

मा. सभापती :— सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:—

विषय क्र.८ :— बॅ.क्र. ९५७ समोरील व ९४१/१ जवळ, सेक्शन २२, प्र.क्र २५, उल्हासनगर—३ येथील वापरात नसलेल्या सार्वजनिक शौचालयांच्या विनीयोगास मान्यता देणे.

उपरोक्त ठिकाणचे शौचालय तोडणेबाबतचे पत्र मा. नगरसेविका, श्री. मिनु राज दासानी, पॅनल क्र. २५ 'क', उल्हासनगर—३ यांचेकडुन आरोग्य विभागास प्राप्त झाले आहे.

सदर पत्रानुसार प्रभाग क्र. २५, बॅरेक नं. ९५७ समोरील व बॅरेक नं. ९४१/१ जवळ, सेक्शन —२२, उल्हासनगर—३ येथे सार्वजनिक शौचालये आहेत. सदर शौचालये जूने असून मोडकळीस आलेले आहेत व ते वापरात नाहीत. त्यामुळे सदर शौचालये तोडण्याची विनंती सदर नगरसेविका यांनी केली आहे.

सदर शौचालयाचा अहवाल व पंचनामा श्री. व्ही. एस. जाधव, स्वच्छता निरिक्षक, उल्हासनगर महानगरपालिका यांनी सादर केला आहे. प्रभाग क्र. २५, बॅरेक नं. ९५७ समोरील व बॅरेक नं. ९४१/१ जवळ, सेक्शन २२, उल्हासनगर—३ येथे सार्वजनिक शौचालये आहेत. सदर शौचालये जूने, तुटलेल्या अवस्थेत असून मोडकळीस आलेली आहेत. सदरच्या शौचालयाचा वापर त्या परिसरातील नागरीक करीत नसल्याचे तेथील नागरिकांनी सांगितले आहे. सदर शौचालय निष्कासन करणेची मान्यता दर्शविणेस्तव शौचालयाच्या पंचनाम्यावर तेथील नागरिकांनी स्वाक्ष—या केलेल्या आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे. सबब प्रस्तावित शौचालये निष्कासित करून सदर मालमत्तेचा खाजगी संस्थेमार्फत नवीन शौचालय बांधण्यासाठी विनियोग केला जाईल. तरी सदर मालमत्ता निष्कासित करण्यासाठी व त्या ठिकाणी खाजगी संस्थेमार्फत नीवन शौचालय बांधणेकरीता मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ प्रमाणे मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १६६ दिनांकः— ४.३.२००५

सुचकाचे नाव :—श्री. गणपत एडके

अनुमोदकाचे नाव :—श्री. सुरेश गायकवाड

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार बॅ.क्र. ९५७ समोरील व ९४१/१ जवळ, सेक्शन २२, प्र.क्र २५, उल्हासनगर—३येथील जुने सार्वजनिक शौचालय निष्कासन करण्यास व जागेवरील परिस्थिती पाहता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग / विनियोग करण्यास मान्यता देत आहे

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.

विषय क्र ९ :— उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत २ विविध कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

मा. सचिव :— यापैकी प्रथम क्रमांकाचे काम यापूर्वी झालेले आहे त्यामुळे ते वगळण्यात येत आहे.

मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :— कॅम्प नं २ आहे की ३ आहे ते लिहीलेले नाही.

मा. प्रभारी आयुक्त :— गोपाळ समाज मंदिर येथील काम आहे.

काही सदस्य :— पास, पास.........

मा. सभापती :— सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:—

विषय क्र.९ :— उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत २ विविध कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् 2004-2005 च्या निधीतून काम करण्यास प्राकलने तयार केलेली आहे.

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत |
|---|---|---|
| 1 | उल्हासनगर गोपाळ समाज मंदीर ते रेल्वे लाईन पर्यंत जाणारा रस्ता बनविणे | 500000/- |

| | | |
|---|---|---|
| | बाबत. | |
| 2 | उल्हासनगर- 5 प्रभाग क्र. 12 मधील हरिजन कॉर्टर बिल्डींग क.अे.बि.च्या मागील नाला बिल्डींग क.सि.डि. पर्यंत नाला बांधणे. | 500000/- |

उपरोक्त नमुद केलेल्या कामांच्या जागेवर जाऊन कनिष्ठ अभियंता व उप-अभियंता यांनी पहाणी करून सदर प्राकलने तयार केलेली आहे. तरी सदर कामे करून घेण्यासाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळण्याकरिता स्थायी समिती सभेपुढे ठेवण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १६७ दिनांकः– ४.३.२००५

सुचकाचे नाव :– श्री. मोहन साधवानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. सुरेश गायकवाड

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत उपरोक्त २ विविध कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :– विषय क्र. १० वाचुन दाखवितात.

विषय क्र १० :– उल्हासनगर भुयारी गटार व्यवस्था देखभाल व दुरुस्तीसाठी मजुर पुरविणेकामी प्रशासनास सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदाराशी पुर्वीच्या अटी, शर्ती व दराने दिनांक १०.११.०४ पासुन पुढील निविदा अंतिम होवून नविन ठेकेदार निश्चित होईपर्यंत निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे व अंतर्भुत खर्चास मान्यता देणे.

काही सदस्य :– पास, पास.........

मा. सभापती :– सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:–

विषय क्र १० :– उल्हासनगर भुयारी गटार व्यवस्था देखभाल व दुरुस्तीसाठी मजुर पुरविणेकामी प्रशासनास सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदाराशी पुर्वीच्या अटी, शर्ती व दराने दिनांक १०.११.०४ पासुन पुढील निविदा अंतिम होवून नविन ठेकेदार निश्चित होईपर्यंत निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे व अंतर्भुत खर्चास

मान्यता देणे.

उपरोक्त कामांसाठी सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदारांची मुदत दि. १०.११.०४ रोजी संपलेली आहे. या कामासाठी चालु वर्षाकरिता अंदाजपत्रक मंजूरीस्तव सादर करण्यात आले आहे. यानंतर या कामासाठी ठेकेदार निश्चित करण्यासाठी अदयापी दोन महिन्यांचा कालावधी लागणार आहे. हे काम दैनंदिन देखभाल व सार्वजनिक आरोग्याशी निगडीत आहे. यासाठी सदर काम पुढील निविदा अंमलात येईपर्यंत मागील ठेकेदारांकडूनच काम करण्याची परवानगी मिळणेकरिता स्थायी समितीपुढे मंजुरीस्तव सादर करण्यात येत आहे.

पुढील निविदा माहे जानेवारी मध्ये अंमलात येण्याचा अदमास गृहीत धरून दि. १०.११.०४ ते दि. ९.१.०५ पर्यंत (२ महिने) अंदाजित रू. ३७६००/—या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेसाठी स्थायी समितीपुढे सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १६८ दिनांकः— ४.३.२००५

सुचकाचे नाव :—श्री. गणपत एडके
अनुमोदकाचे नाव :—श्रीमती संगिता जावळे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर भुयारी गटार व्यवस्था देखभाल व दुरुस्तीसाठी मजुर पुरविणेकामी प्रशासनास सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदाराशी पुर्वीच्या अटी, शर्ती व दराने दिनांक १०.११.०४ पासुन पुढील निविदा अंतिम होवून नविन ठेकेदार निश्चित होईपर्यंत निविदाशिवाय थेट संविदेस कायम करीत आहे व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. ११ वाचुन दाखवितात.

विषय क्र ११ :— राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत उल्हासनगर—३ क्षेत्रातील घोषित झोपडपट्टयांना दिवाबत्ती सुविधा पुरविणेकामी प्रशासनास लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

मा. सदस्य श्री किशोर वनवारी :— ३१ मार्च पूर्वी काम पूर्ण करा.

काही सदस्य :— पास, पास.........

मा. सभापती :— सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:—

**विषय क्र.११ :–** राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत उल्हासनगर–३ क्षेत्रातील घोषित झोपडपट्टयांना दिवाबत्ती सुविधा पुरविणेकामी प्रशासनास लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

| | | |
|---|---|---|
| १ | कामाचे नांव | उल्हासनगर महानगरपालिका कम्प ३ क्षेत्रातील घोषित झोपडपट्यांना दिवाबत्ती सुविधा पुरविणे करीता राष्टीय गलिच्छवस्ती सुधार कार्यक्रम अंतर्गत मागविलेले निविदेस मंजुरी बाबत. |
| २ | प्राकलनाची किंमत | १३,३९,७५०. १ (दर सुची २००३–०४ नुसार) |
| ३ | तांत्रिक मंजुरी देणा–या अधिका–याचे पदनाम | कार्यकारी अभियंता (विद्युत) व उप अभियंता (विद्युत) |
| ४ | तांत्रिक मंजुरी मिळाल्याचा क्र. व दिनांक: | UMC/Elect/Dye/37 dated 7/11/03, UMC/Elect/EE/11 dated 10/11/03. UMC/Elect/Dye/29 dated 7/11/03, UMC/Elect/DyE/34 dated 7/11/03. UMC/Elect/EE/12 dated 10/11/03, UMC/Elect/DyE/31 dated 7/11/03,UMC/Elect/DyE/36 dated 7/11/03, UMC/Elect/DyE/32 dated 7/11/03, UMC/Elect/DE/43 dated 10/11/03, UMC/Elect/Dye/44 dated 10/11/03 UMC/Elect/DyE/35 dated 7/11/03, UMC/Elect/DyE/46 dated10/1/1/03, UMC/Elect/Dye/33 dated 7/11/03, UMC/Elect/Dye/45 dated 10/11/03, UMC/Elect/DyE/30 dated 7/11/03 |
| ५ | प्रशासकीय मंजुरी दिनांक | जा. क्र. / कों.मं./ मु.अ./२२५५ /२००४ दिनांक २२/११/२००४ |
| ६ | निविदा सुचना क्रमांक व दिनांक | न्डब्ध्समबण्ध्२ध्२१५ ;३द्ध कनम वद २७ध्९२ध्०४ |
| ७ | निविदा सूचना ज्या दैनिकात प्रसिध्द केली त्याचे नांव | दै. नवशक्ती व दै. फ्री प्रेस |
| ८ | विक्री केलेल्या निविदा फॉर्म्सची संख्या | ३ |
| ९ | अंतिम दिवशी प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | २ |
| १० | निविदा उघडल्याचा दिनांक | ६/१/०५ |

| | |
|---|---|
| ११ | निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता |

| अ. क्र. | निविदाधारकाचे नांव | |
|---|---|---|
| १ | मे. जाधव ॲण्ड संन्स, कल्याण | निविदा रक्कम रु. १३,३९,७५०.१ पेक्षा १७.३० टक्के जास्त |
| २ | मे. परफेक्ट इलेक्ट्रीक वकर्स, मुंबई | निविदा रक्कम रु. १३,३९,७५०.१ पेक्षा १० टक्के जास्त |
| १२ | निविदाधारकाशी वाटाघाटी केल्या असल्याचा त्याचा तपशिल | मे. परफेक्ट इलेक्ट्रीक वकर्स, मुंबई यांच्याशी वाटाघाटी करुन निविदा रक्कम रु. १३,३९,७५०.१ (AT PAR with Estimate) नुसार |

सदर तुलनात्मक तक्त्यानुसार मे. परफेक्ट इलेक्ट्रीक वकर्स, मुंबई यांचे प्राक्लनीय रक्कम रु. १३,३९,७५०. १ नुसार (At par with estimated value) सर्वात कमी व वाजवी आहे. उक्त दर वाजवी असल्याने व आर्थिकदृष्टया महानगरपालिकेसाठी फायदेशिर असल्याने मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांच्या शिफारसीनुसार दर स्वीकृत करण्यात आले आहेत. सबब, मे. परफेक्ट इलेक्ट्रीक सटोर, मुंबई यांचेशी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे

कलम ७३(क) अन्वये संविदा करणेस प्रशासनाला प्राधिकृत करणेसाठी स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यासाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १६९ दिनांकः– ४.३.२००५

सुचकाचे नाव :– श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :– श्री. सतरामदास जेसवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत उल्हासनगर–३ क्षेत्रातील घोषित झोपडपट्टयांना दिवाबत्ती सुविधा पुरविणेकामी प्रशासनास लघुत्तम दराचे निविदाकार मे. परफेक्ट इलेक्ट्रीक वर्क्स, मुंबई यांच्याशी संविदा करण्यास व अंतर्भुत खर्च रु. १३,३९,७५० यांस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :– विषय क्र. १२ वाचुन दाखवितात.

विषय क्र १२:– राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत उल्हासनगर–४ क्षेत्रातील घोषित झोपडपट्टयांना दिवाबत्ती सुविधा पुरविणेकामी प्रशासनास लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

काही सदस्य :– पास, पास.........

मा. सभापती :– सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावनाः–

विषय क्र.१२ :– राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत उल्हासनगर–४ क्षेत्रातील घोषित झोपडपट्टयांना दिवाबत्ती सुविधा पुरविणेकामी प्रशासनास लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

| | | |
|---|---|---|
| | कामाचे नांव | उल्हासनगर महानगरपालिका कम्प ४ क्षेत्रातील घोषित झोपडपट्यांना दिवाबत्ती सुविधा पुरविणे करीता राष्ट्रीय गलिच्छवस्ती सुधार कार्यक्रम अंतर्गत मागविलेले निविदेस मंजुरी बाबत. |
| | प्राकलनाची किंमत | १४,०३,९०८.४० (दर सुची २००३–०४ नुसार) |

| | | |
|---|---|---|
| | तांत्रिक मंजुरी देणा–या अधिका–याचे पदनाम | कार्यकारी अभियंता (विद्युत) व उप अभियंता (विद्युत) |
| | तांत्रिक मंजुरी मिळाल्याचा क्र. दिनांक: | UMC/Elect./EE/8 dated 10/11/03,<br>UMC/Elect/DyE/15 dated 7/11/03,<br>UMC/Elect/DyE/8 dated 7/11/03,<br>UMC/Elect/DyE/10 dated 7/11/03,<br>UMC/Elect/DyE/11 dated 7/11/03,<br>UMC/Elect/DyE/7 dated 7/11/03,<br>UMC/Elect/DyE/09 dated 7/11/03,<br>UMC/Elect/DyE/12 dated 7/11/03,<br>UMC/Elect/DyE/13 dated 7/11/03,<br>UMC/Elect/DyE/14 dated 7/11/03 |
| | प्रशासकीय मंजुरी दिनांक | जा. क्र. / कों.मं./ मु.अ./२२५५ /२००४ दिनांक २२/११/२००४ |
| | निविदा सुचना क्रमांक व दिनांक | UMC/Elec./2/215 (4) due on 27/12/04 |
| | निविदा सूचना ज्या दैनिकात प्रसिध्द केल त्याचे नांव | दै. नवशक्ती व दै. फ्री प्रेस |
| | विक्री केलेल्या निविदा फॉर्म्सची संख्या | ३ |
| | अंतिम दिवशी प्राप्त झालेल्या निविदां संख्या | २ |
| १० | निविदा उघडल्याचा दिनांक | ६/१/०५ |
| ११ | निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता | |

| अ. क्र. | निविदाधारकाचे नांव | |
|---|---|---|
| १ | मे. जे. डी. इलेक्ट्रीक वर्क्स, कल्याण | निविदा रक्कम रु. १४,०३,९०८.४० पेक्षा १७.३० टक्के जास्त |
| | मे. परफेक्ट इलेक्ट्रीक वर्क्स, मुंबई | निविदा रक्कम रु. १४,०३,९०८.४० पेक्षा १० टक्के जास्त |
| १२ | निविदाधारकाशी वाटाघाटी केल्या असल्याचा त्याचा तपशिल | मे. परफेक्ट इलेक्ट्रीक वर्क्स, मुंबई यांच्याशी वाटाघाटी करुन निविदा रक्कम रु. १४,०३,९०८.४० (AT PAR with Estimate) नुसार |

सदर तुलनात्मक तक्त्यानुसार मे. परफेक्ट इलेक्ट्रीक वकर्स, मुंबई यांचे प्राक्लनीय रक्कम रु. १४,०३,९०८.४० नुसार (At par with estimated value) सर्वात कमी व वाजवी आहे. उक्त दर वाजवी असल्याने व आर्थिकदृष्टया महानगरपालिकेसाठी फायदेशिर असल्याने मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांच्या शिफारसीनुसार दर स्वीकृत करण्यात आले आहेत. सबब, मे. परफेक्ट इलेक्ट्रीक सटोर, मुंबई यांचेशी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये संविदा करणेस प्रशासनाला प्राधिकृत करणेसाठी स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यासाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. १७०</u> <u>दिनांक:– ४.३.२००५</u>

सुचकाचे नाव :– श्री. नारायण पंजाबी
अनुमोदकाचे नाव :– श्री. गणपत एडके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत उल्हासनगर–४ क्षेत्रातील घोषित झोपडपट्टयांना दिवाबत्ती सुविधा पुरविणेकामी प्रशासनास लघुत्तम दराचे निविदाकार मे. परफेक्ट इलेक्ट्रीक वर्क्स, मुंबई यांच्याशी संविदा करण्यास व अंतर्भुत खर्च रु. १४,०३,९०८ यांस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. १३ वाचुन दाखवितात.

विषय क्र १३:— उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ६ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

काही सदस्य :— पास, पास.........

मा. सभापती :— सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.
प्रस्तावना:—

विषय क्र.१३ :— उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ६ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् २००४—२००५ च्या निधीतून मा. नगरसेवक यांनी कामे करणेसाठी विनंती केलेली आहे.

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| 1 | उल्हासनगर-2 प्रभाग क्र. 5 बॅ नं 575, झुलेलाल कॉलनी, 578, 581 संतुचाल बॅनं 286 मानस अपार्टमेंट बॅरेक नं 271 जवळ, सी सी पायवाटा व नाली बनविणे (नगरसेवक निधी 1133) | 199500/- | 9.1.04 | मे कलश म. का. सोसा. |
| 2 | उल्हासनगर- येथील प्रभाग क्र. 14 मध्ये लालचक्की चौक ते कारवी इलेक्ट्रकल पर्यत रस्ता एम-250 ने रस्ता बनविणे (नगरसेवक निधी 1181) | 200000/- | 9.1.04 | मे चंदा म. का. सोसा. |
| 3 | उल्हासनगर-4 येथील प्रभाग क्र. 14 मधील ट्रान्सफार्मर पासून श्री पारेख यांच्या घरापर्यत सी सी एम-250 ने रस्ता बांधणे (नगरसेवक निधी 1182) | 200000/- | 9.1.05 | मे चंदा म. का. सोसा. |
| 4 | उल्हासनगर-2 प्रभाग क्र. 5 हनुमान नगर येथे गुरव हाऊस राजाराम हाऊस,चर्च, अन्सारी हाऊस, गुप्ता किराणा, तायडे, बापू शिंदे ,जगन्नाथ येथे सी सी पॅसेज व नाली बनवणे(रमाबाई आंबेडकर नगर) (महापालिका निधी 1154) | 296300/- | 15.1.05 | मे जनता म. का. सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 | उल्हासनगर-1 प्रभाग क्र. 1, प्रबुध्द नगर येथील, नारायण सुर्वे यांच्या घराजवळ वसंत अहिरे ते ढोले यांच्या घरापर्यंत तात्या केदार यांचे घरापासून वसंत अहिरे यांच्या घरापर्यंत व गुप्ता किराणा येथील ठिकाणी सी सी पायवाट व नाली बनवणे. (दुर्बल घटक निधी 1305) | 288000/- | 24.1.05 | मे वनीदेवी म. का. सोसा. |
| 6 | उल्हासनगर-5 येथील समता नगर ते आंबेडकर पुतळा पर्यत रस्ता सी सी एम 250 रस्ता, पायवाट नाली बनविणे (नगरसेवक निधी 1172) | 199900/- | 19.1.04 | मे श्री क्रिपा म. का. सोसा. |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १७१ दिनांक:— ४.३.२००५

सुचकाचे नाव :—श्री. संजय बठिजा
अनुमोदकाचे नाव :—श्री. गणपत एडके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर महानगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ६ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. १४ वाचुन दाखवितात.

विषय क्र १४:— सन २००५—०६ या आर्थिक वर्षासाठी जकात वसुलीकामी अभिकर्ता नेमणेस मान्यता देणे.

मा. सदस्य श्री किशोर वनवारी :— महापालिकेनेच हे काम करावे. हा विषय नामंजुर करण्यात येत आहे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :— आयुक्तांना आधी त्यांचे म्हणणे तरी मांडु द्या.

मा. प्रभारी आयुक्त :— हा विषय आम्ही यासाठी येथे आणला की, ज्यावेळी महासभेत चर्चा होते त्यावेळी काही सदस्यांना वाटते की जकात चोरी फार मोठया प्रमाणावर होत आहे, पण चोरी तर

सर्वीकडेच होते, आपल्या येथेही होते पण जर आपण खाजगीकरण केले तर चोरी होणार नाही. दुसरे म्हणजे जर खाजगीकरण केले तर आपला जो विविध विभागातील कर्मचारी जकात वसुलीच्या कामासाठी नेमला आहे त्यांच्या सेवा आपणांस पुन्हा उपलब्ध होतील. आपण त्यांना कर विभागात वसुलीचे काम देवु शकतो. आपल्याकडे कर्मचारीवर्ग कमी असल्याने तो एक फायदा होवु शकतो. तिसरे म्हणजे खाजगीकरण केले तर आपणांस निश्चित उत्पन्न प्राप्त होवु शकते. उत्पन्न कमी जास्त होणार नाही. कधी काय होईल ते सांगता येत नाही. आपण सध्या रु ७ कोटी प्रतिमाह या प्रमाणे जकात वसुली करीत आहोत पण पुढे काय होईल ते आताच सांगता येत नाही. तसेच आपणांस यातुन जास्तीचा जो महसुल मिळेल त्यातुन विकासाची कामे देखिल करता येतील. निर्णय तर आपणांसच घ्यावयाचा आहे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :— जकातीच्या विषयाबद्दल मी प्रथमत: प्रशासनाचे अभिनंदन करतो. आधी जकात वसुली जी रु ५६ कोटी होती ती आयुक्तांच्या व प्रशासनाच्या मेहनतीने रु ७३ कोटी एवढी झालेली आहे. यामुळे महापालिकेचा बराच फायदा झालेला आहे. अशाप्रकारे चांगले काम होत असताना खाजगीकरणाचा विषय येथे कशासाठी आणला आहे? आपल्या कर्मचा—यांनी जकातीचे काम केले तर वसुली वाढु देखिल शकते. मला असे वाटते की, आयुक्तांच्या मनात रु ८० कोटी वसुली करण्याचे उद्दीष्ट आहे त्यामुळे त्यांनी येथे हा विषय आणला असावा. जकात खाजगीकरण मात्र करण्यात येवु नये.

मा. सदस्य श्री नरेंद्रकुमार ठाकुर :— आमचे जे उपायुक्त श्री प्रकाश कुकरेजा आहेत त्यांना उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सुवर्णपदक देण्यात यावे. त्यांचा सन्मान करण्यात यावा.

मा. सभापती :— आपला कर्मचारीवर्ग या कामासाठी सक्षम आहे. ते रु ८० कोटी एवढी वसुली करु शकतील.

मा. सदस्य श्री सतरामदास जेसवानी :— ज्याप्रमाणे सध्या प्रशासन काम करत आहे ते योग्य रितीने करीत आहे. आपले सचिव साहेब चांगल्याप्रकारे हे काम करीत आहेत. जकातीचे खाजगीकरण केल्यास व्यापा—यांना त्रास होतो. मी तर व्यापा—यांच्यातर्फे बोलेन, जकात खाजगीकरण करण्यात येवु नये. तसेच चांगल्या कामासाठी मी प्रशासनाला धन्यवाद देतो.

मा. सदस्य श्री किशोर वनवारी :— आमचे कर्मचारी जे काम करीत आहेत त्याचा आम्हाला गर्व आहे. त्यांनी रु १०० कोटी एवढी वसुली करावी. तसेच हे काम नेहमीसाठी श्री प्रकाश कुकरेजा यांच्याकडेच देण्यात यावे. या महापालिकेत श्री प्रकाश कुकरेजा, श्री हरेश इदनानी व श्री मुकेश आयलानी हे तीन सक्षम अधिकारी आहेत. त्यांचे काम फार चांगले आहे.

मा. सभापती :— सदरचा प्रस्ताव सर्वानुमते नाकारण्यात येत आहे.

प्रस्तावना:—

विषय क्र.१४ :— सन २००५—०६ या आर्थिक वर्षासाठी जकात वसुलीकामी अभिकर्ता नेमणेस मान्यता देणे.

उल्हासनगर महानगरपालिकेची जकात वसुलीचे काम १९९८—९९ पासुन खाजगी जकात अभिकर्त्यामार्फत पार पाडण्यात येत होते. महासभा ठराव क्र. २० दिनांक १९.५.२००४ अन्वये सदरचे काम महापालिका कर्मचा—यांमार्फत करण्याचे ठरल्यानंतर दिनांक २५.७.२००४ पासुन जकात वसुलीचे

काम महापालिका कर्मचा–यांमार्फत पार पाडण्यात येत आहे. सदर काम पालिकेने हातात घेतल्यापासुन वार्षिक रू. ७२ कोटी एवढे उत्पन्न जकात वसुलीपासुन प्राप्त होवुन शकते असे निदर्शनास येते. परंतु जकात विभागात होत असलेल्या किरकोळ जकात चोरीमुळे अपेक्षित असलेली जकात वसुली होत नाही त्यामुळे या जकात चोरीवर प्रभावीपणे आळा घालण्यासाठी खाजगी अभिकर्त्यामार्फत वसुली करणे हा एकमेव पर्याय आहे.

उपरोक्त बाबींचा विचार केल्यानंतर शासन आदेश क्र. एम.एम.ए.–१०९४/प्र. क्र. ३/९४/नवि–३२ मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक २.८.१९९४ अन्वये जकात वसुलीसाठी अभिकर्ता नेमण्याबाबत अटी व शर्ती विनिर्दिष्ट केलेले आहे व त्याच धर्तीवर महापालिकेने वेळोवेळी जकात अभिकर्ता नेमले आहे.

उपरोक्त पध्दतीमुळे जकात कर संकलनाचे काम सोपे होईल त्यामुळे वाढीव रक्कम प्राप्त होणे अपेक्षित असुन त्याशिवाय या कामात सध्या खर्ची पडत असलेला वेळ पालिकेला विकास कामांकडे लक्ष पुरविण्यात व जनसंपर्क वाढविण्यात उपलब्ध होईल अशी अपेक्षा आहे.

यास्तव उल्हासनगर महानगरपालिकेचे जकात वसुलीचे काम अभिकर्ता पध्दतीने करण्यात यावे याकामी जकात अभिकर्ता नेमण्याकामी शासनातर्फे यापुर्वी नगरपालिका क्षेत्रात विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तीशी सुसंगत असेल व किमान देयक रक्कम रू. ८०. ५० कोटी, इसा–याची रक्कम रूपये ४, ०२,५०,०००/–, सुरक्षा अनाम रक्कम रूपये १२,८८,००,०००/– अशी असेल. जकात अभिकर्ता नेमण्याचे प्रस्ताव प्रशासनास मान्य असुन हया विषयावर विचार विनिमय करणे व योग्य दिशा देणे गरजेचे आहे.

सन २००५–२००६ च्या संकल्पिय अंदाज स्थायी समितीने तयार करतेवेळी जकात वसुलीबाबत धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. त्याअर्थी दिनांक १.४.२००५ ते ३१.३.२००६ या कालावधी करीता जकात वसुलीकामी अभिकर्ता नेमण्याचा प्रस्ताव असुन, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचीतील प्रकरण ८, नियम ३५ अन्वये अभिकर्ता नेमण्यासाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १७२ दिनांक:– ४.३.२००५

सुचकाचे नाव :–श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :–श्री. उमाप रामदास

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार सन २००५–०६ या आर्थिक वर्षासाठी जकात वसुलीकामी अभिकर्ता नेमणेस मान्यता देत नाही.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :– विषय क्र. १५ वाचुन दाखवितात.

विषय क्र १५:– उल्हासनगर महापालिकेतील नागरिक सुविधा केंद्रांत संगणक

साहित्य खरेदी कामी प्रशासनाने लघुत्तम दराच्या निविदाकारांशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

काही सदस्य :— पास, पास.........

मा. सभापती :— सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:—

विषय क्र.१५ :— उल्हासनगर महापालिकेतील नागरिक सुविधा केंद्रांत संगणक साहित्य खरेदी कामी प्रशासनाने लघुत्तम दराच्या निविदाकारांशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

महानगरपालिकेने जवळजवळ प्रत्येक विभागाकडे संगणक पुरविलेला आहे, तसेच सचिव कार्यालयात मोठे प्रिन्टर पण लावलेले आहे आणि नागरिकांच्या सुविधेसाठी एका केंद्राची उभारणी करुन तेथेही संगणक बसविलेले आहे. महापालिकेतील विविध विभागांसांठी 'संगणकाचे विविध प्रिन्टर, झेरॉक्स मशिन, जेसटेटनर मशिन इत्यादी करीता लागणारे नष्ट होणारे (Consumables) सामान खरेदी करण्याकरिता' वर्ष २००४— २००५ साठी मागविलेल्या निविदेस मा.आयुक्त यांनी मुबंई प्रातिंक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मजुरी दिली आहे.

## तुलनात्मक तक्ता

| Sr.No. | Details of Printers & Xerox Machines for which consumables are required | Cartridge No./Ribbon/Toner/Master & its make | Approx. Qty in Nos. | Rates for 2003 – 2004 in Rs. | Bharat Equipment Company, Rates in Rs. | Yesh Trading Company, Rates in Rs. | Amount (Qty. X lowest Rate) in Rs. | Recommendations pertaining to each items |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1 | Hp LJ 6L Gold | C-3906F HP Make | 7 | 2958 | 2850 | ***2765*** | ***19355*** | Rate of Yesh Trading Company is Lowest and reasonable being lower than estimated rate, hence recommended. |
| 2 | HP DJ 640 C-Color, HP DJ 656 C-Color Cartridge | C-51649 Color HP Make | 14 | 1488 | 1425 | ***1413*** | ***19782*** | Rate of Yesh Trading Company is Lowest and reasonable being lower than estimated rate, hence recommended. |
| 3 | HP Dj 640 C-Black Cartridge, HP DJ 656 C-Black Cartridge | C-6614 Black HP Make | 13 | 1129 | 1255 | ***1125*** | ***14625*** | Rate of Yesh Trading Company is Lowest and reasonable being lower than estimated rate, hence recommended. |
| 4 | HP OJ 4110 (Black) | C-6656aa Black HP Make | 8 | 1100 | 1095 | ***1060*** | ***8480*** | Rate of Yesh Trading Company is Lowest and reasonable being lower than estimated rate, hence recommended. |
| 5 | HP LJ 1000 | C-7115 HP Make | 3 | 3294 | 3240 | ***3135*** | ***9405*** | Rate of Yesh Trading Company is Lowest and reasonable being lower than estimated rate, hence recommended. |
| 6 | HP DJ 3550, HP DJ 3420, HP DJ 3745 Black | C-8727a Black HP Make | 71 | 964 | 830 | ***810*** | ***57510*** | Rate of Yesh Trading Company is Lowest and reasonable being lower than estimated rate, hence recommended. |
| 7 | HP DJ 3550, HP DJ 3420 HP DJ 3745 Black, Hp OJ 4110 (Color) | C-8728a Color HP Make | 18 | 1223 | 1180 | ***1145*** | ***20610*** | Rate of Yesh Trading Company is Lowest and reasonable being lower than estimated rate, hence recommended. |

| Sr.No. | Details of Printers & Xerox Machines for which consumables are required | Cartridge No./Ribbon/Toner/Master & its make | Approx. Qty in Nos. | Rates for 2003 – 2004 in Rs. | Bharat Equipment Company, Rates in Rs. | Yesh Trading Company, Rates in Rs. | Amount (Qty. X lowest Rate) in Rs. | Recommendations pertaining to each items |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | Epson LQ1150 | Ribbon each standard length & standard width of reputed make of standard quality (for refill) | 9 | 24 | 51 (lipi) | ***not quoted*** | ***0*** | *Not recommended for purchase, as rate is not for our specifications.* |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 9 | Studio160 Copier / Printer | Toshiba Make T/600D | 10 | 1525 | 1675 | ***1400*** | ***14000*** | Rate of Yesh Trading Company is Lowest and reasonable being lower than estimated rate hence recommended. |
| 10 | Epson LQ1070+ | Epson Make Cartridge | 3 | 75 | 99 (lipi) | 175 | ***0*** | *Not recommended to purchase being on higher side / lowest rate not for our specification.* |
| 11 | Epson LX300+ | Epson Make Cartridge | 3 | 75 | 85 (lipi) | 150 | ***0*** | *Not recommended to purchase being on higher side / lowest rate not for our specification.* |
| 12 | Epson LQ1150 | Epson Make Cartridge | 2 | 75 | 115 (lipi) | 175 | ***0*** | *Not recommended to purchase being on higher side / lowest rate not for our specification.* |
| 13 | Epson LQ1170 | Epson Make Cartridge | 1 | 75 | 115 (lipi) | 175 | ***0*** | *Not recommended to purchase being on higher side / lowest rate not for our specification.* |
| 14 | TVSE MSP 445 | TVSE Make Cartridge | 1 | 75 | **125** | 250 | ***125*** | Recommended to purchase one Quantity needed urgently. |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 15 | Gestetner Master Roll 680gm CPMT 9 | For Model No.5327 Gestetner Make | 28 | 4050 | 3895 | ***3385*** | ***94780*** | Rate of Yesh Trading Company is Lowest and reasonable being lower than estimated rate hence recommended. |
| 16 | Gestetner Ink 600ml CPI2 Black | For Model No.5327 Gestetner Make | 121 | 775 | 775 | ***750*** | ***90750*** | Rate of Yesh Trading Company is Lowest and reasonable being lower than estimated rate hence recommended. |
| 17 | Canon Toner | For Model No. 6130 Canon make | 42 | 480 | ***465*** | 1420 | ***19530*** | Rate of Bharat Equipment Company is Lowest and recommended |
| 18 | HP DDS C1554C DDS-3 Cartridge tape | 12/24 GB DDS 3 125 Mtr. HP or Sony Or 3M make | 14 | 205 | ***200*** | 220 | ***2800*** | Rate of Bharat Equipment Company is Lowest and recommended |
| 19 | CD - Recordable With Cover | 48x & Above HP or Sony or 3M Make | 22 | 21 | 25 | 25 | ***550*** | Rates are reasonable & same by both agencies recommended to devide the quantity in both agencies i.e. M/s. Bharat Equipment Company and M/s. Yesh Trading Company |
| 20 | Wipro 500 Line matrix Printer | Wipro make Printronix Part No.107675-001 | 2 | 395 | ***395*** | 600 | ***790*** | Rate of Bharat Equipment Company is Lowest and reasonable hence recommended. |
| 21 | HP2300n Network Laser Printer | HP Make Q2610A | 18 | 6400 | 6300 | ***6250*** | ***112500*** | Rate of Yesh Trading Company is Lowest and reasonable being lower than estimated rate hence recommended. |
| 22 | 1.44 Floppies | 1.44MB Sony make | 34 | 11 | **13.5** | 15 | ***459*** | Recommended to purchase as needed urgently. |
| | ज्ञस | | | | | | ***4,86,051*** | |

वरिल तुलनात्मक तक्त्यानुसार ज्या ॲटमसाठी ज्या कंपनीने सर्वात कमी दर दिलेले आहेत व तातडीची आवश्यकता आहे, त्यांच्या दराला मजुंरी दिली असुन मे.यश ट्रेडिग कपंनी,डोबिवली याच्यांशी करार करुन त्यांना ॲटम क्र.१,२,३,४,५,६,७,९,१५,१६,१९,२१ बाबतचे कार्यादेश देण्यात आले.तसेच मे.भारत इक्वीपमेंट कपंनी, दहिसर याच्यांशी करार करुन त्यांना ॲटम क्र. १४,१७,१८,१९,२०,२२ बाबतचे कार्यादेश देण्यात आले.

तरी सदरची माहीती स्थायी समितीकडे अवलोकनार्थ प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १७३ दिनांक:— ४.३.२००५

सुचकाचे नाव :—श्रीमती भारती छाब्रिया
अनुमोदकाचे नाव :—श्रीमती संगिता जावळे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर महापालिकेतील नागरिक सुविधा केंद्रांत संगणक साहित्य खरेदी कामी प्रशासनाने लघुत्तम दराच्या निविदाकारांशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :—</u> विषय क्र. १६ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र १६</u>:— उल्हासनगर रेल्वे स्टेशन जवळील पुजा हॉटेल लगत असलेल्या पादचारी पुलाची दुरुस्ती करणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

<u>काही सदस्य :—</u> पास, पास.........

<u>मा. सभापती :—</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना:—</u>

<u>विषय क्र १६</u>:— उल्हासनगर रेल्वे स्टेशन जवळील पुजा हॉटेल लगत असलेल्या पादचारी पुलाची दुरुस्ती करणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

उल्हासनगर —३ मध्ये उल्हासनगर रेल्वे स्टेशन जवळ वालधुनी नाल्यावर पूजा हॉटेलच्या बाजूला २५ वर्षापुर्वी बांधलेला एक जुना पादचारी पूल आहे.

सदर पुल १९८१ पूर्वी बांधलेला असून १९८१ मध्ये त्याच्या बाजुस लागुन तितक्याच रूंदीचा पुल बांधून रूंदीकरण करण्यात आले आहे. या पुलाचे बांधकाम, पुलाचे खांब खडकी बांधकामाचे असुन त्यावर बीम व स्लॅब टाकून पादचारी मार्ग तयार करण्यात आलेला आहे.

सदर पुलाच्या बीम स्लॅबची पहाणी करता असे आढळुन आले आहे की, बीम व स्लॅब मध्ये भेगा पडून त्यामधील लोखंडी सळया उघडया पडल्या आहेत. दगडी बांधकामाच्या खांबापैकी एका खांबामधील दगड निखळुन पडले आहेत. स्लॅबवर लावलेली लोखंडी पाईपाची रेलींग नादुरूस्त झालेली आहे. पूलाची सद्यस्थिती पहाता सदर पुल भविष्यात कधीही धोकादायक स्थितीत जावुन कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या पूलाच्या बाजूस वालधुनी नाल्यावर उल्हासनगर स्टेशन जवळ १५ वर्षापुर्वी वाहतूकीकरिता पुलाचे बांधकाम हाती घेतले होते. सदर काम काही कारणास्तव पूर्ण होऊ शकले नाही.

त्यामुळे उल्हासनगर स्टेशनवरील रेल्वे प्रवाशांना उपरोक्त पादचारी पुलाचा उपयोग करावा लागत आहे. सदर अर्धवट अवस्थेत बांधकाम केलेल्या वाहतूकीच्या पुलाचे उर्वरित बांधकाम करण्याकरिता वेगळा प्रस्ताव तयार करून महासभेच्या मंजुरीकरिता पाठविण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावास मंजुरी मिळुन प्रत्यक्षात काम पुर्ण होईपर्यंत उपरोक्त पादचारी पूलावर अखंड वर्दळ राहणार आहे. त्यामुळे सदर पुल धोकादायक अवस्थेत जाणार नाही याकरिता त्याची ताबडतोब दुरूस्ती करणे आवश्यक आहे.

सार्वजनिक बांधकाम खात्याने या पुलाच्या दुरूस्तीकरिता प्राकलन तयार केले असुन त्यामध्ये बीम स्लॅब यांची गनाइटींग पध्दतीने दुरूस्ती, दगडी बांधकाम मजबुती करण्याकरिता जॅकेटींग करणे रेलींग बसविणे, रेलिंगला अतिरिक्त आधार देणे. इत्यादी कामांच्या बाबींची तरतुद ठेवण्यात आलेली आहे. या कामावरील प्राकलनीय खर्च रू. ७,३८,३५०/— इतका काढण्यात आला आहे.

महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये या कामावरील खर्चाकरिता स्वतंत्र तरतुद आढळत नाही. रस्ते दुरूस्ती या शिर्षामधुन सदर खर्च भागविता आला असता. परंतु या लेखा शिर्षामध्येही तरतुद उपलब्ध नाही. लोक हितार्थ, पुलास अपघात होऊन जिवीत हानी होऊ नये याकरिता सदर काम होणेकरिता या कामावरील खर्च रस्ते सुधारणा सी—४ (iii) या लेखा शिर्षामधुन भागविणे करिता प्रस्तावित करण्यात येत

आहे. तरी या कामाच्या रू. ७,३८,३५०/— स्थायी समिती कडुन प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळणे करिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १७४ दिनांकः— ४.३.२००५

सुचकाचे नाव :—श्रीमती भारती छाब्रिया
अनुमोदकाचे नाव :—श्रीमती संगिता जावळे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर रेल्वे स्टेशन जवळील पुजा हॉटेल लगत असलेल्या पादचारी पुलाची दुरुस्ती करणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :—** विषय क्र. १७ वाचुन दाखवितात.

**विषय क्र १७**:— सन २००४—०५ करिता मार्गप्रकाशासाठी, उद्यानात बसविलेल्या दिवाबत्तींची व महापालिका भवनातील देखभाल व दुरुस्तीकामी लागणारे विद्युत साहित्य खरेदी करणेकामी प्रशासनास लघुत्तम दराच्या निविदाकारांशी संविदेस मान्यता देणे.

**काही सदस्य :—** पास, पास.........

**मा. सभापती :—** सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावनाः—

**विषय क्र १७**:— सन २००४—०५ करिता मार्गप्रकाशासाठी, उद्यानात बसविलेल्या दिवाबत्तींची व महापालिका भवनातील देखभाल व दुरुस्तीकामी लागणारे विद्युत साहित्य खरेदी करणेकामी प्रशासनास लघुत्तम दराच्या निविदाकारांशी संविदेस मान्यता देणे.

सालाबादा प्रमाणे वर्षे २००४—२००५ करीता रस्त्यावरील दिवाबत्ती, उद्यानात बसविलेल्या दिवाबत्ती दुरुस्तीसाठी लागणारे विद्युत साहित्य खरेदी करण्याकरीता मागच्या अनुभवाच्या आधारावर लागणारे विद्युत साहित्य खरेदी करण्याकरीता यादी बनवून त्यांचे दर १ वर्षा करिता ठरविण्यासाठी ॲटम रेट टेंडर दै. नवशक्ती व दै. महा जनशक्ती (जनसंपर्क कार्यालयामार्फत) या दोन वर्तमान पत्रात निविदा सुचना देउन सिलबंद निविदा मागविण्यात आलेले आहे. सदर निविदा १. मे. दशमेश केबल २. मे. शारदा इंड्स्ट्रिज ३. मे. फिलिप्स इंडिया लि. ४. मे. चामुंडा इंटरप्राईसेस ५. मे. मेघदूत इलेक्ट्रीकल एण्ड इलेक्ट्रोनिक ६. मे. गौरव ट्रेडर्स यांनी खरेदी

केले आणि सर्वानी वेळेवर निविदा भरल्या आणि त्या दिनांक ८/१२/०४ रोजी ११.३० वाजता उघडण्यात आल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता पुढील प्रमाणे आहे.

| Item No. | Description | परिमाण | मे. फिलिप्स इंडिया लि. रु. | मे. दशमेश केबल रु. | मे. मेघदूत इलेक्ट्रीकल एण्ड इलेक्ट्रोनिक रु. | मे. गौरव ट्रेडर्स रु. | मे. चामुंडा इंटरप्राईसेस रु. | मे. शारदा इंडस्ट्रिज रु. | एकूण रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | इगनाईटर २५० वॉट (सिलिंन्डिकल आकार) | १००० नग | १४५ | १५२ | १३२ | १३५ | १३० | २३५ | १,३०,००० |
| 2. | इगनाईटर २५० वॉट (आयताकृत आकार) | २०० नग | ३३५ | ४२६ | ४०५ | ४०८ | ७५० | ४५१ | ६७,००० |
| 3 | २५० वॉ. एच.पी.एस. व्ही. चोक (पोलिस्टर कम्पाउंड) | ५०० नग | ६५० | ७५७ | ७२२ | ७३० | ८०० | १०११ | ३,२५,००० |
| 4. | २५० वॉ. एच.पी.एस. व्ही. चोक (खुली संरचना) | २०० नग | ७०० | ७५९ | ७२२ | ७६५ | ८०० | ११७० | १,४०,००० |
| 3 | २५० वॉ. एच.पी.एस. व्ही. चोक (पोलिस्टर कम्पाउंड) | ५०० नग | ६५० | ७५७ | ७२२ | ७३० | ८०० | १०११ | ३,२५,००० |
| 4. | २५० वॉ. एच.पी.एस. व्ही. चोक (खुली संरचना) | २०० नग | ७०० | ७५९ | ७२२ | ७६५ | ८०० | ११७० | १,४०,००० |
| 5. | २५० वॉ. एम. वी. एल. होल्डर | ३०० नग | ९५ | ९६ | ८२ | ९० | ६० | ८९ | १८,००० |
| 6. | २५० वॉ. एच.पी.एस. व्ही. लॅप (Son-T type) | १२०० नग | ४९५ | ५९१ | ५२८ | ५४१ | ६०० | ६१७ | ५,९४,००० |
| 7. | जी. आई. पोल (६ मी.) | १०० नग | Regret | २२०० | २०३० | २३०० | Regret | २५०० | २,०३,००० |
| 8. | ४० वॉ. स्टार्टर | १००० नग | १० | ११ | ५ | ७.५० | ९ | ८.५० | ५,००० |
| 9. | ४० वॉ. टयुब लाईट चोक | १०० नग | १०५ | १४२ | ११४ | १३० | १२५ | १४४ | १०,५०० |
| 10. | १ X ४० वॉ. ॲक्रिलिक कव्हर | १०० नग | ३५० | ९२ | ७० | ८३ | १८० | ४९.५० | ४,९५० |
| 11. | ४० वॉ. टयुब लाईट | २५०० नग | ३९.८० | ४९ | ४१.५० | ४२ | ४० | ४७ | ९९,५०० |
| 12. | ४० वॉ. फिटिंग टयुब लाईट सह | १०० नग | ८४० | ६०३ | ५४९ | ७६० | ९०० | ६८० | ५४,९०० |
| 13. | ४० वॉ. बॉक्स टाईप फिटिंग टयुब लाईट सह | ५० नग | ३९९ | ४८०.५० | ४५० | ५४० | ९३० | ५४५ | १९,९५० |
| 14. | १५० वॉ. एच. पी. एस. व्ही. फिटिंग बल्ब सह | २०० नग | ३०९० | ३१२१ | ३०५४ | ३३०० | ३४०० | ३१५० | ६,१०,८०० |
| 15. | १५० वॉ. एच. पी. एस. व्ही. चोक (पॉलीस्टर कम्पाउंड) | १०० नग | ६०० | ५५६ | ५३१ | ५४५ | ६०० | ६९९ | ५३,१०० |
| 16. | १५० वॉ. एच. पी. एस. व्ही. चोक (खुली सरचंना) | १०० नग | ५९० | ६९२ | ६३१ | ६३२ | ६२५ | ८६६ | ५९,००० |
| 17. | १५० वॉ. एच. पी. एस. व्ही. टयुबूलर बल्ब | ३०० नग | ४६४ | ५४९ | ५०७ | ५३० | ५५० | ५११ | १,३९,२०० |

| Item No. | Description | परिमाण | मे. फिलिप्स इंडिया लि. रु. | मे. दशमेश केबल रु. | मे. मेघदूत इलेक्ट्रीकल एण्ड इलेक्ट्रोनिक रु. | मे. गौरव ट्रेडर्स रु. | मे. चामुंडा इंटरप्राईसेस रु. | मे. शारदा इंड्स्ट्रिज रु. | एकूण रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 18. | २५० वॉ. ॲक्रिलिक कव्हर | २००० नग | ४०० | २३४ | १९३ | २०६ | ३०० | १४९.५० | २,९९,००० |
| 19. | १०० एम्प. किट केट | ५०० नग | Regret | ३७९ | ३२३ | ३४० | Regret | ३३८ | १,६१,५०० |
| 20. | १००० वॉ. हॅलोजीन लम्प | ५० नग | १२५ | १७१ | १३० | १३० | १२५ | १४१.५० | ६,२५० |
| 21. | पी. व्ही. सी. टेप | ५०० रोलस | Regret | २३ | १० | १२ | १२ | १३ | ५,००० |
| 22. | सिलिंग पंखे | २५ नग | Regret | १३०७ | ११३० | १२०० | ११०० | १३३७ | २७,५०० |
| 23. | २.५ ॲल्युमिनियम वायर | १०० Coils | Regret | २२७ | ३८५ | ४०० | Regret | ४१३ | २२,७०० |
| 24. | २.५ ॲल्युमिनियम सर्व्हीस वायर २ कोर | १०० Coils | Regret | ६६० | ७२० | ७२० | Regret | ८१९ | ६६,००० |
| 25. | ६ Sq. एम. एम. २ कोर ॲल्युमिनियम सर्व्हीस वायर | १०० Coils | Regret | १२३१ | १४१० | १४३५ | Regret | १६१३ | १,२३,१०० |
| 26. | १.५ Sq. एम. एम. २ कोर ॲल्युमिनियम सर्व्हीस वायर | १०० Coils | Regret | ४३९ | ४८० | ४८५ | Regret | ६०९ | ४३,९०० |
| 27. | १६ Sq. एम. एम. ४ कोर ॲल्युमिनियम केबल | १५०० Mtrs. | Regret | ८८ | ९७ | ११० | Regret | ११३ | १,३२,००० |
| 28. | १.० Sq. एम. एम. सिंगल कोर कॉपर वायर | २५ Coils | Regret | ३१७ | ३४२ | ३४२ | Regret | ४०६ | ७,९२५ |
| 29. | १.५ Sq. एम. एम. सिंगल कोर कॉपर वायर | १० Coils | Regret | ४७० | ४८० | ४८२ | Regret | ५८५ | ४,७०० |
| 30. | २.५ Sq. एम. एम. सिंगल कोर कॉपर वायर | १० Coils | Regret | ७४० | ९०० | ९३० | Regret | ८८६ | ७,४०० |
| 31. | ४.० Sq. एम. एम. सिंगल कोर कॉपर वायर | ५ Coils | Regret | ११२६ | ११४९ | ११५० | Regret | १४१५ | ५,६३० |
| 32. | सिलिंग फॅन रेग्युलेटर | २५ नग | Regret | ८०.५० | ६३ | ७३ | Regret | ८९ | १,५७५ |
| 33. | १०० A. चेंज ओव्हर स्विच | १ नग | Regret | ५०४० | ४४०० | ४५३० | Regret | ४९९९ | ४,४०० |
| 34. | २०० A. मेन स्विच | २ नग | Regret | ५८०१ | ५०१० | ५३०० | Regret | ५५६१ | १०,०२० |
| 35. | २०० A. चेंज ओव्हर स्विच | २ नग | Regret | ५८८७ | ५१११ | ५४०० | Regret | ६३१७ | १०,२२२ |

वरील तुलनात्मक तक्त्यानुसार

१) मे. चामुंडा इंटरप्राईसेस, वसई – यांनी ॲटम क्रमाक – १, ५, २० व २२ मध्ये सर्वात कमी दर दिलेले आहेत. २) मे. शारदा इंडस्ट्रीज, उल्हासनगर – २ यांनी ॲटम क्रमाक – १० व १८ मध्ये सर्वात कमी दर दिलेले आहेत. ३) मे. दशमेश केबल, उल्हासनगर –२ यांनी ॲटम क्रमाक – २३, २४, २५, २६, २७, २८, २९, ३० व ३१ मध्ये सर्वात कमी दर दिलेले आहेत. ४) मे. मेघदूत इलेक्ट्रीक व इलेक्ट्रॉनिकस, मुंबई – यांनी ॲटम क्रमाक – ७, ८, १२, १४, १५, १९, २१, ३२, ३३, ३४ व ३५ मध्ये सर्वात कमी दर दिलेले आहेत. ५) मे. गौरव ट्रेडर्स, औरगांबाद – यांनी कुठल्याही ॲटम मध्ये कमी दर दिलेले नाही. ६) मे. फिलिप्स इंडिया लि.,

मुंबई यांनी ॲटम क्रमांक – २, ३, ४, ६, ९, ११, १३, १६, १७ व २० मध्ये सर्वात कमी दर दिलेले आहेत.

वरील बाबी लक्षात घेता सदर कमी निविदा धारकांना दिनांक १९/१/०५ रोजी बोलवून वाटा घाटी करण्यात आली परंतु कुठल्या ही कमी निविदा धारकांनी निविदेत दिलेल्या दरा पेक्षा कमी दर करण्याचे नाकारले.

ज्या ॲटम मध्ये ज्या कंपनीचे कमी दर दिलेले आहेत ते दर वाजवी आहेत वरील अंदाजे परिमाण खरेदी करणे करीता रुपये ३४,७२,७२२/– इतका खर्च येणार आहे व ते अंदाज पत्रकीय रक्कम रुपये ४५,०३,०९५/– पेक्षा २२.८८ टक्के कमी आहे. निविदेत दिलेले परिमाण अंदाजीत आहे व त्यात वर्ष अखेरी पर्यंत फेरबदल होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने परिमाणात पंचवीस टक्के पर्यंत फेरबदल करण्याची त्यानुसार होणच्या खर्चा ची मंजुरी देणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी लक्षात घेउन ज्या ॲटम मध्ये ज्या कंपनीचे दर सर्वात कमी दिलेले आहे, त्यांच्या दराला मंजुरी देउन एका वर्षाच्या कालावधी मध्ये लागणारे विद्युत साहित्य त्यांच्या कडून खरेदी करण्याकरीता मंजूरी देउन लागणा–या खर्चास मान्यते साठी स्थायी समिती पुढे सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १७५ <u>दिनांकः– ४.३.२००५</u>

सुचकाचे नाव :– श्रीमती भारती छाब्रिया

अनुमोदकाचे नाव :– श्री. उमाम रामदास

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार सन २००४–०५ करिता मार्गप्रकाशासाठी, उद्यानात बसविलेल्या दिवाबत्तींची व महापालिका भवनातील देखभाल व दुरुस्तीकामी लागणारे विद्युत साहित्य खरेदी करणेकामी प्रशासनास बाब क्र. १,५,२० व २२ साठी मे. चामुंडा एंटरप्रायजेस वसई यांच्याशी, बाब क्र. १० व १८ साठी मे. शारदा इंडस्ट्रीज यांच्याशी, बाब क्र. २३ ते ३१ साठी मे. दशमेश केबल, उल्हासनगर यांच्याशी, बाब क्र. ७,८,१२,१४,१५,१९,२१,३२,३३,३४ व ३५ साठी मे. मेघदुत इलेक्ट्रीक व इलेक्ट्रॉनिक्स, मुंबई यांच्याशी, बाब क्र. २,३,४,६,९,११,१३,१६,१७ व २० साठी मे. फिलिप्स इंडिया लि. मुंबई या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस व परिमाणात २५% पर्यंत फेरबदलास अधिन राहुन अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/–</u>

अनुमोदकाची <u>सही/–</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :–</u> विषय क्र. १८ वाचुन दाखवितात.

विषय क्र १८:– उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १० विविध
कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे

मा. सदस्या श्रीमती नंदिनी बामणकर :– आयुक्त साहेब, ही कामे महापालिका निधीतुन प्रस्तावित केलेली आहेत, यामध्ये माझ्या प्रभागातील शौचालयाचे काम का आलेले नाही?

मा. प्रभारी आयुक्त :– माझ्याकडे जेवढी कामे आले होती त्यापैकी काही कामे मंजुर होवुन येथे आलेली आहेत. या प्रस्तावामध्ये मुख्यत: शौचालयांची कामे आहेत व एक काम महापालिकेच्या मागच्या रस्त्याचे आहे. तो महत्वाचा असल्याने येथे आणलेला आहे. दुसरी कोणतीही कामे घेतलेली नाहीत.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :– आयुक्त साहेब यांच्या प्रभागात शौचालय बनविण्यासाठी प्रस्ताव तयार आहे, मोठी फाईल तयार झालेली आहे. काम व्हायला हवे, पण होत नाही.

मा. प्रभारी आयुक्त :– शौचालयाचे काम असेल तर माझ्याकडुन मंजुर झालेले आहे प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवतो.

काही सदस्य :– पास, पास.........

मा. सभापती :– सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:–

विषय क्र.१८ :– उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १० विविध कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् 2004-2005 च्या निधीतून कामे करण्यास प्राकलने तयार केलेली आहे.

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत |
|---|---|---|
| 1 | उल्हासनगर- प्रभाग क्र. 3 मधील राम मंदिर क्रास रोड पासुन जनार्दन मढवी यांचे घर ते साधूराम मढवी यांचे घर आणि राजाराम भोईर यांचे घर ते श्री विठठल किराणा स्टोर पर्यत सी सी एम-250 रोड आणि नाली बांधणे | 349700/- |
| 2 | उल्हासनगर- शास्त्रीनगर येथे प्रभाग क्र. 6 मध्ये मधूमती किराणा स्टोर ,शिवनारायण किराणा स्टोर येथे रस्ता एम-350 रस्ता बांधणे. | 499200/- |
| 3 | उल्हासनगर- प्रभाग क्र. 7 मध्ये मच्छि मार्केट येथे लाकडी वखार येथे 6 बैठकिचे शौचालय बांधणे. | 323120/- |
| 4 | उल्हासनगर- येथे प्रेस बाजारमध्ये सुमन गुप्ता यांचे घर येथे 6 बैठकिचे शौचालय बांधणे. | 323210/- |

| | | |
|---|---|---|
| 5 | उल्हासनगर- येथील प्रभाग क्र. 15 मध्ये सरस्वती अपार्टमेंट ते बॅ नं 1423 पर्यत सी सी एम-250 रोड बांधणे | 398862/- |
| 6 | उल्हासनगर- येथे प्रभाग क्र. 25 मध्ये फालोवर लाईन येथे 6 बैठकिचे शौचालय बांधणे. | 323000/- |
| 7 | उल्हासनगर-3 येथील महापालिकेच्या मागील बाजूस स्वीमींग पुल ते आयलसिंगानी चेंबर पर्यत रस्त्याचा विकास करणे . | 3147230/- |
| 8 | उल्हासनगर-3 येथील विठठलवाडी झोपडपटटीत सिंध नॅशनल स्कुलच्या मागे 10 बैठकिचे शौचालय बांधणे | 399211/- |
| 9 | उल्हासनगर-3 येथील हिराघाट भैयासाहेब आंबेडकर नगर येथे 10 बैठकिचे शौचालय बांधणे | 399211/- |
| 10 | उल्हासनगर-3 येथील शांतीनगर गऊबाई पाडा येथे 10 बैठकिचे शौचालय बांधणे. | 399211/- |

उपरोक्त नमुद केलेल्या कामांच्या जागेवर जाऊन कनिष्ठ अभियंता व उप-अभियंता यांनी पहाणी करून सदर प्राकलने तयार केलेली आहे. तरी सदर कामे करून घेण्यासाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळण्याकरिता स्थायी समिती सभेपुढे ठेवण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १७६ दिनांकः— ४.३.२००५

सुचकाचे नाव :— श्रीमती मोना वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. गणपत एडके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत उपरोक्त १० विविध कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते
सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. १९ वाचुन दाखवितात.

विषय क्र १९:— दिनांक २०/१/०५ रोजी झालेल्या महासभेत महापालिका सदस्यांसाठी भोजनाची व्यवस्था केल्याबाबत मे. हरेश कॅटरिंग सर्विसेस यांच्याशी प्रशासनाने केलेल्या निविदेशिवाय थेट संविदेस कायम करणे.

काही सदस्य :— पास, पास.........

मा. सभापती :— सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावनाः—

विषय क्र.१९ :— दिनांक २०/१/०५ रोजी झालेल्या महासभेत महापालिका सदस्यांसाठी भोजनाची व्यवस्था केल्याबाबत मे. हरेश कॅटरिंग सर्विसेस यांच्याशी प्रशासनाने केलेल्या निविदेशिवाय थेट संविदेस कायम करणे.

उल्हासनगर महानगरपालिकेत दिनांक २०.१.२००५ रोजी दुपारी १२.०० वाजता, सांयकाळी ४.०० वाजता व सांयकाळी ५.०० वाजता अशा तीन वेगवेगळया महासभांचे आयोजन करण्यांत आले होते.

दुपारी १२.०० वाजता आयोजित केलेल्या महासभेपूढे १५ विषयांचे कामकाज होते. या सभेपूढील विषयांची संख्या पाहता सभेचे कामकाज प्रदिर्घकाळ चालेल अशी अपेक्षा असल्याने यावेळी सभागृहात उपस्थित असणारे सन्माननिय सदस्य, पालिका अधिकारी, बंदोबस्तासाठी असलेले पालीस, पोलीस अधिकारी व पत्रकार इत्यादी अंदाजे १५० व्यक्तींसाठी दुपारच्या शाकाहारी व मांसाहारी भोजनाची प्रशासनाच्या वतीने व्यवस्था करण्यांत आली होती.

याकामी मे. हरेश कॅटरिंग सर्व्हिसेस यांच्याशी निविदेशिवाय केलेल्या थेट संविदा नुसार त्यांनी दिनांक २०.१.२००५ रोजी दुपारी १५० व्यक्तींसाठी उत्तम प्रकारचे शाकाहारी व मांसाहारी भोजन पुरविले आहे. स्थानिक कॅटरर्सकडे या शाकाहारी व मांसाहारी जेवणाच्या दरा बाबत विचारणा केली असता मे. हरेश कॅटरिंग सर्व्हीसेस यांनी आकारलेला रुपये ७०/—(प्रती व्यक्ती) हा दर योग्य व वाजवी असून प्रशासनाने त्यांच्याशी केलेल्या रुपये १०,५००/— खर्चाच्या निविदेशिवाय थेट संविदेस कार्योत्तर मंजूरी मिळणेसाठी स्थायी समितीपूढे प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १७७ दिनांकः— ४.३.२००५

सुचकाचे नाव :—श्रीमती मोना वनवारी
अनुमोदकाचे नाव :—श्रीमती नंदीनी बामणकर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार दिनांक २०/१/०५ रोजी झालेल्या महासभेत महापालिका सदस्यांसाठी भोजनाची व्यवस्था केल्याबाबत मे. हरेश कॅटरिंग सर्विसेस यांच्याशी प्रशासनाने केलेल्या निविदेशिवाय थेट संविदेस कायम करीत असुन अंतर्भुत खर्च रु १०,५००/— यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते
सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. २० वाचुन दाखवितात.

विषय क्र २०:— सन २००४—०५ या वर्षाची संगणकीकृत पाणी बिले तयार करणेकामी प्रशासनास सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदाराशी पुर्वीच्या अटी, शर्ती व दराने पुढील निविदा अंतिम होवून नविन ठेकेदार निश्चित होईपर्यंत निविदेशिवाय थेट मुदतवाढीच्या संविदेस कायम करणे व अंतर्भुत खर्चास मान्यता देणे.

काही सदस्य :— पास, पास.........

मा. सभापती :— सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावनाः—

**विषय क्र २०**:— सन २००४—०५ या वर्षाची संगणकीकृत पाणी बिले तयार करणेकामी प्रशासनास सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदाराशी पुर्वीच्या अटी, शर्ती व दराने पुढील निविदा अंतिम होवून नविन ठेकेदार निश्चित होईपर्यंत निविदेशिवाय थेट मुदतवाढीच्या संविदेस कायम करणे व अंतर्भुत खर्चास मान्यता देणे.

उपरोक्त विषयांकित कामाकरिता रू २३०५००/— खर्चाचे अंदाजपत्रकास प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची मागविण्यात आलेली निविदा मेसर्स आदित्य कॉम्प्युटर सर्व्हिसेस,उल्हासनगर ३,यांनी आदेश क्र. २७५,दिनांक ०१.०२.०२ व करारनामा दि. २१.०१.०३ अन्वये मंजूर झालेल्या दराप्रमाणे काम करण्यास संमती दिली आहे. सदर कामासाठी त्यांनी मंजूर दरातच काम करण्यास दि.२५.१०.०४ रोजी संमती दिल्यामुळे त्यांना कामाचे आदेश देण्यात आले आहेत. केलेल्या कार्यवाहीला कार्योत्तर मंजूरीसाठी सादर.

तरी सदरचे रू २३०५००/—इतक्या रकमेचे अंदाजपत्रक मान्य करण्याकरिता तसेच सन २००४—०५ या वर्षासाठी सदर एजन्सीला पूर्वीच्याच मंजूर दराप्रमाणे काम करण्यासाठी मुदतवाढ देण्यासाठी स्थायी समितीसमोर ठेवण्यासाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १७८ — दिनांकः— ४.३.२००५

सुचकाचे नाव :— श्रीमती मोना वनवारी
अनुमोदकाचे नाव :— श्री. सतरामदास जेसवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार सन २००३—०४ या वर्षाची संगणकीकृत पाणी बिले तयार करणेकामी प्रशासनाने मे. आदित्य कॉम्प्युटर सर्विसेस, उल्हासनगर—३ यांच्याशी केलेल्या संविदेस कायम करीत आहे व पूर्वीच्या करारातील अटी, शर्ती व दराने सन २००४—०५ या वर्षासाठी प्रशासनास त्याच्याशी मुदतवाढीच्या निविदाशिवाय थेट संविदेस व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५. ०० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती महोदया यांनी जाहीर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक :—२९ मार्च, २००५

# दिनांक २९/०३/२००५ रोजी घेण्यात आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा मंगळवार दिनांक २९/०३/२००५ रोजी सायंकाळी ४. ३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात आयोजित करण्यात आली होती सदर सभेस खालील दर्शविलेले सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या

०१) मा. सभापती श्रीमती ज्योती कालानी
०२) श्री वनवारी किशोर नारायणदास
०३) श्री एडके गणपत गोविंद
०४) श्री गायकवाड सुरेश नामदेव
०५) श्रीमती जावळे संगिता रमेश
०६) श्री संजय बठिजा
०७) श्रीमती वनवारी मोना अशोक
०८) श्री. सोनवणे नथु काशिराम
०९) श्री ठाकुर नरेंद्र केवलराम (कुमारी)
१०) श्रीमती छाब्रिया भारती पहलाज
११) श्री पंजाबी नारायण सन्मुखदास
१२) श्रीमती बामणकर नंदिनी गजानन

तर,

मा. सदस्य ०१) श्री. बेहरानी मोहन, ०२) श्री. साधवानी मोहन रहंदोमल०३) श्री. उमाप रामदास राघोजी, ०४) श्री जेसवानी सतरामदास फतनदास हे सभेस अनुपस्थित होते.

सायंकाळी ५. ०० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यात आले.

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

विषय:— मागील सभेचे दिनांक ४/३/२००५ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

काही सदस्य :— पास, पास............

मा. सभापती :— मागील सभेचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

विषय क्र.२ :— उल्हासनगर महानगरपालिका दैनंदिनी २००५ छपाई व पुरवठा करणेकामी प्रशासनाने मे.व्ही.पी. एंटरप्रायजेस यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

काही सदस्य :— पास, पास............

मा. सभापती :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:—

विषय क्र.२ :— उल्हासनगर महानगरपालिका दैनंदिनी २००५ छपाई व पुरवठा करणेकामी प्रशासनाने मे.व्ही.पी. एंटरप्रायजेस यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर महानगरपालिका दैनंदिनी २००५ छपाई क्षेत्रातील इच्छुक पुरवठादारांकडुन मोहरबंद निविदा मागविण्यात आल्या. सदर निविदा बाबतची जाहीरात दिनांक १७/१२/०४ रोजी दैनिक नवभारत व सम्राट हया वृत्तपत्राव्दारे करण्यात आली. दैनंदिनी छपाई कोरी निविदा फार्म (१) मे. प्लेटो प्रिंटर्स, उल्हासनगर (२) गणेश प्रिंटर्स, नवी मुंबई (३) इंम्प्रीन्ट ऑफसेट प्रिंटर्स नाशिक (४) व्ही.पी. इंटरप्रायजेस, उल्हासनगर यांनी घेतले. त्यापैकी इंम्प्रीन्ट ऑफसेट प्रिंटर्स नाशिक यांना सोडुन सर्वांनी आवश्यक इसारा अनामत रक्कम सादर करून मोहरबंद निविदा सादर करण्यात आल्यात.

दिनांक २४/१२/०४ रोजी मा. उप आयुक्त (मुख्यालय) यांच्या दालनात मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा अधिकारी यांचे समक्ष निविदा धारकांच्या उपस्थितीत प्राप्त मोहरबंद निविदा उघडण्यात आल्या. प्राप्त निविदांपैकी मे. व्ही.पी. इंटरप्रायजेस, उल्हासनगर यांचे दैनंदिनी छपाई दर रू. ११८/— न्युनतम असल्यामुळे त्यांना पुन्हा दिनांक ३१/१२/०४ रोजी प्रत्यक्ष वाटाघाटीसाठी उपआयुक्त, मुख्यालय यांच्या दालनात बोलविण्यात आले. सदर चर्चेअंती प्रती नग रू. ११८/— प्रमाणे दैनंदिनी छपाईसह व पुरवठा करण्याचे मे. व्ही. पी. इंटरप्रायजेस, उल्हासनगर यांनी मान्य केले त्या अनुषंगाने त्यांना १५०० नग दैनंदिनी छपाई करण्याचे आदेश देण्यात आले.

दैनंदिनी छपाई व पुरवठासाठी रू. ११२/— प्रति नग याप्रमाणे एकुण रूप्ये १,६८,०० मात्र खर्च होणार आहे.

आर्थिक वर्ष २००४—२००५ चे अंदाजपत्रकातील फेरदा शिर्ष —अ (३) मध्ये छपाईसाठी एकूण रू. १२. ५० लाख इतकी तरतुद करण्यात आली आहे. दैनंदिनी २००५ चे छपाईस आयुक्तांची प्रशासकीय मान्यता मिळाली असून पुरवठादारांशी प्रशासनाने करारनामा करून पुरवठयाचे आदेश पारित केले आहेत.

तरी मा. स्थायी समिती समोर माहितीस्तव सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १७९ — दिनांक:— २९. ३.२००५

सुचकाचे नाव :—श्री. गणपत एडके

अनुमोदकाचे नाव :—श्रीमती संगिता जावळे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर महानगरपालिका दैनंदिनी २००५ छपाई व पुरवठा करणेकामी प्रशासनाने मे.व्ही.पी. एंटरप्रायजेस यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

**विषय क्र.३ :–** बिमला पॅलेस, बॅ. क्र. ७६१, चोपडा कोर्ट, उल्हासनगर–३ येथील वापरात
नसलेल्या सार्वजनिक शौचालयाच्या विनीयोगास मान्यता देणे.

**काही सदस्य :–** पास, पास...........

**मा. सभापती :–** सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:–

**विषय क्र.३ :–** बिमला पॅलेस, बॅ.क्र. ७६१, चोपडा कोर्ट, उल्हासनगर–३ येथील वापरात नसलेल्या सार्वजनिक शौचालयाच्या विनीयोगास मान्यता देणे.

उपरोक्त विषयाबाबतचे पत्र नागरी सुविधा केंद्र, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर–३ यांचेकडून आरोग्य विभागास प्राप्त झाले आहे.

सदर पत्रातील तक्रारीनुसार बिमला पॅलेस, बॅरेक नं. ७६१, चोपडा कोर्ट, उल्हासनगर–३ येथील शौचालय मोडकळीस आलेले असून ते गेली १० वर्षे वापरात नाही. सदर शौचालयाचा गैरवापर काही समाज कंटकांकडून केला जात आहे. त्यामुळे येथील रहिवाशांनी सदर शौचालय तोडण्याची व त्या ठिकाणी सी.सी.पॅसेज बनविणेची विनंती केली आहे.

सदर शौचालयांचा अहवाल व पंचनामा या प्रभागाचे स्वच्छता निरिक्षक, श्री.सी.एल.छाब्रिया यांनी सादर केला आहे. सदर अहवालानुसार बॅरेक नं. ७६१, चोपडा कोर्ट, उल्हासनगर–३ येथील शौचालय मोडकळीस आलेले असून ते वापरात नाही. त्यामुळे सदर शौचालय तोडून त्या ठिकाणी सी.सी.पॅसेज बनविण्यात यावे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे. सबब प्रस्तावित शौचालय/मुतारी निष्कासित करून सदर ठिकाणची जागा मालमत्ता विभागाने ताब्यात घेऊन सदर ठिकाणी वृक्षारोपण / नविन शौचालय / मुतारी करणेकरीता मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ प्रमाणे मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १८० दिनांक:– २९. ३.२००५

सुचकाचे नाव :–श्री. गणपत एडके
अनुमोदकाचे नाव :–श्री. नथु सोनवणे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार बिमला पॅलेस, बॅ.क्र. ७६१, चोपडा कोर्ट, उल्हासनगर–३ येथील जुने सार्वजनिक शौचालय निष्कासन करण्यास व जागेवरील परिस्थिती पाहता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग / विनियोग करण्यास मान्यता देत आहे

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :–** विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

**विषय क्र.४ :—** बॅ.क्र ७० व ७२, रेखा अपार्टमेंटच्या मागे, उल्हासनगर—३ येथील वापरात
नसलेल्या सार्वजनिक शौचालयाच्या विनीयोगास मान्यता देणे.

**काही सदस्य :—** पास, पास............

**मा. सभापती :—** सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:—

**विषय क्र.४ :—** बॅ.क्र ७० व ७२, रेखा अपार्टमेंटच्या मागे, उल्हासनगर—३ येथील वापरात नसलेल्या सार्वजनिक शौचालयाच्या विनीयोगास मान्यता देणे.

उपरोक्त विषयाबाबतचे पत्र नागरी सुविधा केंद्र, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर—३ यांचेकडून आरोग्य विभागास प्राप्त झाले आहे.

सदर पत्रातील तक्रारीनुसार बॅरेक नं. ७०, ७२, रेखा अपार्टमेंटच्या पाठीमागे, उल्हासनगर—३ येथील सार्वजनिक शौचालये मोडकळीस आलेले असून ते वापरात नाही यामुळे सदर ठिकाणचे शौचालये तोडण्याची विनंती उपरोक्त संदर्भिय पत्रांन्वये महानगरपालिकेस करण्यात आली आहे.

सदर शौचालयांचा अहवाल व पंचनामा या प्रभागाचे स्वच्छता निरिक्षक, श्री. दिपक भोये, यांनी सादर केला आहे. सदर अहवालानुसार बॅरेक नं. ७०, ७२, रेखा अपार्टमेंटच्या पाठीमागे असलेले दोन शौचालये असून एक ०८ सीट्सचे स्त्रीयांचे व दुसरे ०४ सीट्सचे (०२ स्त्री व ०२ पुरूष) शौचालये आहेत. सदर शौचालये मोडकळीस आलेली असून ते वापरण्यास योग्य नाहीत. तसेच या परिसरातील नागरीकांना विचारणा केली असता सदर शौचालय तोडण्यास नागरीकांची हरकत नाही. सदर शौचालयाचे जागेवर सी.सी.पॅसेज बनविण्यात यावे असे तेथील नागरीकांनी सुचविले आहे. सदर शौचालयाचा अहवाल व पंचनामा सोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे. सबब प्रस्तावित शौचालय/मुतारी निष्कासित करून सदर ठिकाणची जागा मालमत्ता विभागाने ताब्यात घेऊन सदर ठिकाणी वृक्षारोपण / नविन शौचालय करणेकरीता मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ प्रमाणे मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव प्रस्तावित आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. १८१** — **दिनांकः— २९. ३.२००५**

सुचकाचे नाव :—श्री. संजय बठिजा
अनुमोदकाचे नाव :—श्रीमती नंदिनी बामणकर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार बॅ.क्र ७० व ७२, रेखा अपार्टमेंटच्या मागे, उल्हासनगर—३ येथील जुने सार्वजनिक शौचालय निष्कासन करण्यास व जागेवरील परिस्थिती पाहता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग / विनियोग करण्यास मान्यता देत आहे

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :—** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

**विषय क्र.५ :—** बॅ.क्र. ८९६, सेक्शन २०, उल्हासनगर—३ येथील वापरात नसलेल्या

सार्वजनिक शौचालयाच्या विनीयोगास मान्यता देणे.

<u>काही सदस्य :—</u> पास, पास............

<u>मा. सभापती :—</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना:—</u>

<u>विषय क्र.५ :—</u> बॅ.क्र. ८९६, सेक्शन २०, उल्हासनगर—३ येथील वापरात नसलेल्या सार्वजनिक शौचालयाच्या विनीयोगास मान्यता देणे.

उपरोक्त विषयाबाबतचे पत्र मा. नगरसेविका, श्रीमती भारती पहलाज छाब्रिया, पॅनल क्र. '२४' 'अ', उल्हासनगर—३ व नागरी सुविधा केंद्र, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर—३ यांचेकडून आरोग्य विभागास प्राप्त झाले आहे.

सदर पत्रांतील तक्रारीनुसार बॅरेक नं. ८९६, सेक्शन—२०, उल्हासनगर—३ येथील शौचालय वापरात नसून ते कोणत्याही क्षणी पडण्याची शक्यता असल्याने सदर ठिकाणचे शौचालय तोडण्याची विनंती उपरोक्त संदर्भिय पत्रांन्वये महानगरपालिकेस करण्यात आली आहे.

सदर शौचालयाचा अहवाल व पंचनामा या प्रभागाचे स्वच्छता निरिक्षक, श्री. एकनाथ पवार यांनी सादर केला आहे. सदर अहवालानुसार बॅरेक नं. ८९६, सेक्शन—२०, उल्हासनगर—३ येथील ०४ सीट्सचे शौचालय मोडकळीस आलेले असून ते वापरण्याजोगे नाही. तसेच या परिसरातील नागरीकांना विचारणा केली असता सदर शौचालय तोडण्यास नागरीकांची हरकत नाही. सदर शौचालयाचे जागेवर सी.सी. पॅसेज बनविण्यात यावे असे तेथील नागरीकांनी सुचविले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे. सबब प्रस्तावित शौचालय/मुतारी निष्कासित करून सदर ठिकाणची जागा मालमत्ता विभागाने ताब्यात घेऊन सदर ठिकाणी वृक्षारोपण करणेकरीता मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ प्रमाणे मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव प्रस्तावित आहे.

**<u>स्थायी समिती ठराव क्र.</u>** १८२ <u>दिनांक:— २९. ३.२००५</u>

सुचकाचे नाव :—श्री. सुरेश गायकवाड
अनुमोदकाचे नाव :—श्रीमती संगिता जावळे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार बॅ.क्र. ८९६, सेक्शन २०, उल्हासनगर—३ येथील जुने सार्वजनिक शौचालय निष्कासन करण्यास व जागेवरील परिस्थिती पाहता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग / विनियोग करण्यास मान्यता देत आहे

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :—</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र.६ :—</u> बॅ.क्र. ७५६/७५८, चोपडा कोर्ट, उल्हासनगर—३ येथील वापरात नसलेल्या सार्वजनिक शौचालयाच्या विनीयोगास मान्यता देणे.

काही सदस्य :— पास, पास............

मा. सभापती :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:—

विषय क्र.६ :— बॅ.क्र. ७५६/७५८, चोपडा कोर्ट, उल्हासनगर—३ येथील वापरात नसलेल्या सार्वजनिक शौचालयाच्या विनीयोगास मान्यता देणे.

उपरोक्त विषयाबाबतचे पत्र नागरी सुविधा केंद्र, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर—३ यांचेकडून आरोग्य विभागास प्राप्त झाले आहे.

सदर पत्रातील तक्रारीनुसार बॅरेक नं. ७५६/७५८, चोपडा कोर्ट, उल्हासनगर—३ शौचालय मोडकळीस आलेले असून ते गेली १० वर्षे वापरात नाही. त्यामुळे येथील रहिवाशांनी सदर शौचालय तोडण्याची व त्या ठिकाणी सी.सी.पॅसेज बनविणेची विनंती केली आहे.

सदर शौचालयांचा अहवाल व पंचनामा या प्रभागाचे स्वच्छता निरिक्षक, श्री.सी.एल.छाब्रिया यांनी सादर केला आहे. सदर अहवालानुसार बॅरेक नं. ७५६/७५८, चोपडा कोर्ट, उल्हासनगर—३ येथील शौचालय मोडकळीस आलेले असून ते वापरात नाही. त्यामुळे सदर शौचालय तोडून त्या ठिकाणी सी. सी.पॅसेज बनविण्यात यावे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे. सबब प्रस्तावित शौचालय/मुतारी निष्कासित करून सदर ठिकाणची जागा मालमत्ता विभागाने ताब्यात घेऊन सदर ठिकाणी वृक्षारोपण / नविन शौचालय/ मुतारी करणेकरीता मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ प्रमाणे मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १८३ दिनांक:— २९. ३.२००५

सुचकाचे नाव :—श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
अनुमोदकाचे नाव :—श्रीमती नंदीनी बामणकर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार बॅ.क्र. ७५६/७५८, चोपडा कोर्ट, उल्हासनगर—३ येथील जुने सार्वजनिक शौचालय निष्कासन करण्यास व जागेवरील परिस्थिती पाहता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग / विनियोग करण्यास मान्यता देत आहे

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

,

विषय क्र.७ :— मालमत्ता कराची संगणीकृत देयके व इतर साहित्य पुरविणेकामी प्रशासनास सध्या कार्यरत असलेल्या मे. कॉम्प्युटर ॲडस या ठेकेदाराशी पुर्वीच्या अटी, शर्ती व दराने सन २००४—२००५ करिता मुदतवाढीच्या संविदेस मान्यता देणे.

मा. सदस्य श्री नथु सोनवणे :— याची निविदा काढुन वर्तमानपत्रात द्यायला हवी होती.

<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी :—</u> ठेकेदार मागील वर्षीच्याच दराने काम करण्यास तयार आहे.

<u>काही सदस्य :—</u> पास, पास...........

<u>मा. सभापती :—</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावनाः—</u>

<u>विषय क्र.७ :—</u> मालमत्ता कराची संगणीकृत देयके व इतर साहित्य पुरविणेकामी प्रशासनास सध्या कार्यरत असलेल्या मे. कॉम्प्युटर ॲडस या ठेकेदाराशी पुर्वीच्या अटी, शर्ती व दराने सन २००४—२००५ करिता मुदतवाढीच्या संविदेस मान्यता देणे.

उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत अंदाजे १,४७,००० मालमत्ता असून सदर मालमत्ता संबंधी कराची देयके, मागणी नोटीस, नोंदवही इत्यादीची कामे गेल्या काही वर्षापासुन खाजगी संस्थेमार्फत संगणकावर करण्यात येतात. सदर कामासाठी आवश्यक ते प्रोग्रामिग सदर संस्थेनेच केलेली असून सदर प्राग्रामिग व देयके तयार करणेचे काम आजतागायत सुरळीतपणे सरू आहे. शिवाय सदर कामासाठी ज्या एजन्सीची नेमणुक करण्यात आली होती. त्याची मुदत संपत आली आहे.

सध्या महानगरपालिकेने सर्व विभागातील कामकाजाचे संगणकीकरण करण्याचे ठरविले असुन सदर संगणकीकरणाची कार्यवाही चालु आहे. व ती पुर्ण होणेस काही कालावधी लागेल असे दिसते.

दरम्यान महानगरपालिकेस वर्ष २००४—२००५ करीता नवीन कराची बीले, मागणी नोटीस, नोंदवही तसेच ज्या मिळकतीमध्ये जादा बांधकाम अथवा फेरफार झाला आहे. किंवा वापरात बदल झाला आहे. अशा मिळकतीची कर आकारणी, इत्यादी संबधीची कार्यवाही संगणकावर पुर्वीच्या पध्दतीने करणे आवश्यक आहे.

मेसर्स कॉम्प्युटर ॲडस यांनी मागील वर्षाच्या मंजुर दराप्रमाणे वरील करासंबधीची कामे संगणकावर तयार करणेस संमती दर्शविली असून त्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ) आकारणी | मे. कॉम्प्युटर ॲडस |
|---|---|
| १. अ. मालमत्ते संबंधीची माहिती आकारणी पुस्तकातून संगणकास पुरविणे<br>ब.६० जीएसएम लेखन सामुग्री आकारणी नोटस छपाई करणे (दोन प्रतीत)<br>क. ६० जी एक एम १३२ कॉलम लेखनसामुग्रीवर आकारणी नोंदवही छपाई | रू. ७.६५ पै. |
| २. मालमत्तावर नोंदणी पुस्तकात त्रुटीच्या सुधारणा करणे व | रू.२. २५ पै. |
| ३. मालमत्तावर नोंदणी पुस्तकात त्रुटीच्या सुधारणा करणे व सुधारणा केलेली छापील प्रत ६० जीएसएम १३२ कॉलम लेखन सामुग्री पुरविणे | रू. २. २५ पै |
| ४.सुधारणे नंतर कायम मालमत्ता पुस्तीका ८० जीएसएम १३२ कॉलम लेखन सामुग्रीवर छापणे | रू. २. ०५ पै. |
| ब. कर व्यवस्था<br>१. अ. मागणी, थकबाकी व इत्यादी तपशिल दर्शविणारी मागणी नोंदवही ८० जीएसएम १३२ कॉलम लेखनसामुग्रीवर छापणे | रू. ६. ३५ पै<br>रू. २. ०० पै |

| | |
|---|---|
| ब.दोन प्रतीत मालमत्ता कराची बिले ६० जीएसएम लेखन सामुग्रीवर छापणे (१०'' x ८ '' आकाराची)<br>२. दोन प्रतीत मागणी नोटीस ६० जीएसएम लेखन सामुग्रीवर छापणे (१०'' x ८'' आकाराची)<br>३)जमा रक्कमांचे तपशिल संगणकास पुरविणे | रू. २. ०५ पै |
| क. अहवाल<br>४. ८० कॉलम च्या लेखनसामुग्रीवर सामान्य अहवाल छापणे | |
| ३. संपुर्ण यादी | रू. ०.१३ पै |
| ४. विगतवारी यादी | रू. ०.२५ पै |
| ५. ८० कॉलमच्या लेखनसामुग्रीवर संक्षिप्त अहवाल छापणे | |
| ३.संपुर्ण यादी | ०.२२ पै |
| ४. विगतवारी यादी | ०.४५ पै. |
| ६. १३२ कॉलम लेखनसामुग्रीवर सामान्य अहवाल छापणे | |
| १. संपुर्ण यादी | ०.१५ पै. |
| २.विगतवारी यादी | ०.२९ पै |
| ७. १३२ कॉलम लेखनसामुग्रीवर सामान्य अहवाल छापणे | |
| १. संपुर्ण यादी | रू. ०.१७ पै |
| २. विगतवादी यादी | रू. ०.३६ पै |

सन २००४—२००५ च्या अदांजपत्रकातील अ अंदाजपत्रक अ—३—xi लेखा शीर्षातील पुर्ण तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी त्यांना वर्ष २००४—२००५ या वित्तिय वर्षासाठी कराची देयके मागणी नोटीस, इत्यादी तयार करणेस कॉम्प्युटर ॲडस यांना एक वर्षाची मुदतवाढ देणेस स्थायी समितीपुढे प्रस्तावित करीत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १८४ दिनांक:— २९. ३.२००५

सुचकाचे नाव :—श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :—श्रीमती भारती छाब्रिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार मालमत्ता कराची संगणीकृत देयके व इतर साहित्य पुरविणेकामी प्रशासनास सध्या कार्यरत असलेले मे. कॉम्प्युटर ॲडस या ठेकेदाराशी पुर्वीच्या अटी, शर्ती व दराने सन २००४—२००५ करिता निविदेशिवाय मुदतवाढीच्या थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

विषय क्र.८ :— वालधुनी नाल्याचे प्रदुषण रोखण्यासाठी ''वालधुनी प्रकल्प'' मे. सृष्टी इको रिसर्च इन्सटीटयुट, पुणे यांचे मार्फत राबवण्यिासाठी प्रशासनास निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे व अंतर्भुत खर्चास मान्यता देणे.

मा. सदस्य श्री नथु सोनवणे :— आयुक्त साहेब खेमाणी नाल्याचा प्रस्ताव पण येथे येणार काय?

मा. प्रभारी आयुक्त :— खेमाणी येथील नाल्याचा प्रस्ताव वेगळा आहे, त्या नाल्याचे पण काम करायचे आहे. त्याची निविदा प्रक्रिया होईल आणि त्यानंतर प्रस्ताव मान्यतेसाठी स्थायी समितीसमोर येईल.

मा. सदस्य श्री नथु सोनवणे :— तो नाला शहराच्या मध्यवर्ती भागातुन वाहतो त्यामुळे लोकांना त्याचा त्रास येतो. त्यामुळे ते काम लवकर व्हायला हवे.

मा. प्रभारी आयुक्त :— हे जे काम आहे ते महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाकडुन करुन घ्यावयाचे आहे. हे काम आपण करणार आहोत.

मा. सदस्य श्री नथु सोनवणे :— चांगला विषय आहे.

काही सदस्य :— पास, पास............

मा. सभापती :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:—

विषय क्र.८ :— वालधुनी नाल्याचे प्रदुषण रोखण्यासाठी ''वालधुनी प्रकल्प'' मे. सृष्टी इको रिसर्च इन्सटीटयुट, पुणे यांचे मार्फत राबवण्यिासाठी प्रशासनास निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे व अंतर्भुत खर्चास मान्यता देणे.

शहरामधुन निघणा—या घरगुती सांडपाण्यावर योग्य ती प्रक्रीया करून वाहणा—या नाले, नदयांची गुणवत्ता राखणे त्यांना प्रदुषण मुक्त राखणे ही संवैधानिक जबाबदारी स्थानिक महापालिका / नगरपालिकांची असते.

उल्हासनगर शहराच्या मध्यभागातुन दुषित पाण्याने भरलेला वालधुनी नाला वाहत आहे. वालधुनी नाल्याचा उगत अंबरनाथ परिसरातील पहाडातून सुरू होतो. व हा नाला उल्हासनगर व कल्याण परिसरातुन वाहत जावुन शेवटी उल्हासनदीच्या खारेपाणी क्षेत्रात एन.आर.सी. बंधा—यांच्या खालच्या बाजुला मिळतो. सदर नाल्यामध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या बदलापुर, अतिरिक्त अंबरनाथ, चिकलोली मोरीवली, अंबरनाथ केमिकल्स झोन व इतर एमआयडीसी बाहेरील मोठया उद्योगांचे औद्योगिक सांडपाणी सोडले जाते. तसेच उल्हासनगर महानगरपालिका व अंबरनाथ नगरपालिकेचे व काही प्रमाणात कल्याण महानगरपालिकेचे सांडपाणी सुध्दा सोडले जाते. नाल्यामध्ये एकुण ११६ एम.एल. डी. सांडपाणी सोडले जाते. त्यापैकी ८० टक्के स्थानिक स्वराज्य संस्थेचे घरगुती सांडपाणी असून २० टक्के उद्योगांचे औद्योगिक सांडपाणी आहे. वालधुनी नाल्याच्या बदलत्या जलगुणवत्तेविषयी वाढत्या तक्रारीमुळे

जनक्षोभ कमी होण्याच्या दृष्टीने व पर्यावरणाचे संरक्षणाच्या दृष्टीने म.प्र. नि. मंडळाने हा प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

दि. १७/२/२००५ रोजी मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी उल्हासनगर येथे स्वत: भेट देवुन सर्व संबंधितांशी चर्चा केली आहे. सदर बैठकीत डॉ. श्री. डी. बी. बोराळकर, सदस्य सचिव, मप्रनि मंडळ, यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या चर्चेमध्ये 'ग्रीन ब्रिज' व ग्रिन लेक या तंत्रज्ञानाचा वालधुनी नाल्याच्या शुध्दीकरणासाठी अवलंब करायचा आहे.

**उल्हासनगर महानगरपालिकेची जबाबदारी:—**

'मिशन वालधुनी' प्रकल्पात उल्हासनगर महानगरपालिका 'नोडल एजन्सी' म्हणुन काम करणार आहे. उल्हासनगर शहरातून वाहणा—या दुषित वालधुनी नाल्याच्या शुध्दीकरणात अत्यंत महत्वपुर्ण भुमिका महापालिकेला निभवावी लागेल. सुरूवातीला नाल्यामध्ये असलेला घनकचरा काढून नाला स्वच्छ करणे तसेच आवश्यक तेथे नाल्याच्या काठावर तारेचे कुंपण लावणे व जागा संपादन करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. तसेच प्रकल्प उभारण्याच्या दरम्यान व नंतर संरक्षण, देखभाल करण्याचीही जबाबदारी आहे.

**वित्तिय आकृतीबंध:—**

'मिशन वालधुनी' प्रकल्पात अभ्यास, उभारणी आणि एका वर्षापर्यतच्या देखभालीचा एकुण खर्च जवळ जवळ रू. ५० लाख अपेक्षित आहे. सदर खर्चाचे अंदाज ढोबळ अंदाजपत्रकावर आधारित असल्याने त्यात वाढ अथवा घट होवू शकते. दि. १७/२/२००५ च्या बैठकीत ठरल्याप्रमाणे वित्तिय आकृतीबंध खालीलप्रमाणे राहील.

१. म.प्र. नि. मंडळ २५ टक्के
२. उल्हासनगर महानगरपालिका, अंबरनाथ नगरपरिषद व कल्याण डोंबिवली महानगरपालिका, २० टक्के
३. उद्योग ५० टक्के
४. आमदारांच्या स्थानिक विकास निधी ५ टक्के.

प्रकल्पखर्चापैकी मदतीचा पहिला हप्ता म्हणुन रू. ५ लक्ष इतका निधी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने महानगरपालिकेस अदा केला आहे.

**प्रकल्प अंमलबजावणीसाठी संस्थेची नियुक्ती:—**

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, यांनी या कामासाठी मे. सृष्टी इका रिसर्च इन्स्टीटयुट, पुणे या नामांकित संस्थेचे नाव सुचविले आहे. या संस्थेमध्ये सदर प्रकल्पासंबंधी आवश्यक असलेली तांत्रिक गुणवत्ताधारक अधिकारी / कर्मचारी व इतर मनुष्यबळ उपलब्ध असून त्यांनी पुण्यातील भोसरी क्षेत्रात 'ग्रीन ब्रिज' व 'ग्रीन लेक' या तंत्रज्ञानाचा उपयोग करून काही नाल्यांचे सुशोभिकरण केलेले आहे दि. १७.२.२००५ रोजी श्री. डी. बी. बोराळकर, सदस्य सचिव, म.प्र.नि. मंडळ यांच्या उपस्थितीत मे.सृष्टी इको. रिसर्च इन्स्टीटयुटचे श्री. संदीप जोशी यांनी ग्रीनब्रीज व ग्रीनलेक या तंत्रज्ञानाचा उपयोग करून सुशोभिकरणासंबंधी माहिती सादर केली होती.

सदर प्रकल्प राबविण्यासाठी आवश्यक असलेली तांत्रिक गुणवत्ता व क्षमता मे. सृष्टी इको रिसर्च इन्स्टीटयुट यांचेकडे असल्याने त्यांची नियुक्ती करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २ (२) अन्वये थेट संविदा करण्यात स्थायी समितीची मंजुरी मिळण्यास व येणा—या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. वित्तिय वर्ष २००५—२००६ च्या अंदाजपत्रकात पर्यावरण संनियंत्रण या लेखा शिर्षाखाली पुरेशी तरतुद करण्यात आली आहे.

सबब, सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** १८५ **दिनांक:— २९. ३.२००५**

सुचकाचे नाव :—श्री. संजय बठिजा

अनुमोदकाचे नाव :—श्री. नथु सोनवणे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार वालधुनी नाल्याचे प्रदुषण रोखण्यासाठी ''वालधुनी प्रकल्प'' मे. सृष्टी इको रिसर्च इन्सटीटयुट, पुणे यांचे मार्फत राबवण्यिासाठी प्रशासनास त्यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सदस्य श्री किशोर वनवारी :— आज आपल्या सदस्यांपैकी ८ सदस्य निवृत्त होत आहेत, त्यांचा कार्यकालावधी संपत आहे. त्यांनी २ वर्षाच्या कालावधीत स्थायी समितीमध्ये जे सहकार्य दिले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानत असुन मा. सभापतींनी पुष्पहार देवुन त्यांना धन्यवाद द्यावेत अशी विनंती करतो.

यावेळी निवृत्त होणा—या आठ सदस्यांना पुष्पहार देवुन त्यांना मा. सभापतींनी धन्यवाद दिले.

सायंकाळी ५. १५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. पीठासीन अधिकारी यांनी जाहीर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक :—३१ मार्च, २००५

### दिनांक ३१/०३/२००५ रोजी घेण्यात आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक ३१/०३/२००५ रोजी सकाळी ११. ०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात आयोजित करण्यात आली होती सदर सभेस खालील दर्शविलेले सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या

०१) मा. सभापती श्रीमती ज्योती कालानी
०२) श्री वनवारी किशोर नारायणदास
०३) श्री एडके गणपत गोविंद
०४) श्री गायकवाड सुरेश नामदेव
०५) श्रीमती जावळे संगिता रमेश
०६) श्री संजय बठिजा

०७) श्री. साधवानी मोहन रहंदोमल
०८) श्री. सोनवणे नथु काशिराम
०९) श्री. उमाप रामदास राघोजी
१०) श्री ठाकुर नरेंद्र केवलराम (कुमारी)
११) श्री. जेसवानी सतरामदास फतनदास
१२) श्री पंजाबी नारायण सन्मुखदास

तर,

मा. सदस्य ०१) श्री. बेहरानी मोहन, ०२) श्रीमती वनवारी मोना अशोक ०३) श्रीमती छाब्रिया भारती पहलाज, ०४) श्रीमती बामणकर नंदिनी गजानन हे सभेस अनुपस्थित होते.

सकाळी ११.१५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यात आले.

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :– विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

विषयः– मागील सभेचे दिनांक २९/३/२००५ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

काही सदस्य :– पास, पास...........

मा. सभापती :– मागील सभेचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :– विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

विषय क्र.२ :– महापालिका जकात वसुली संगणकीकरण करणेकामी प्रशासनास न्युनतम दराच्या
ठेकेदाराशी संविदेस मान्यता देणे.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:–याबाबत वर्तमानपत्रामध्ये निविदा सूचना प्रसिध्द केली होती काय?

मा. सचिव:–प्री प्रेस जर्नल, धनुष्यधारी, हिंदु सिंधी आणि दोपहर का सामना या वर्तमानपत्रामध्ये निविदा सूचना प्रसिध्दीस दिल्या होत्या. सदरच्या निविदेस प्रतिसाद मिळून मेसर्स आदित्य कॉम्प्युटर व मेसर्स जे.पी कॉम्प्युटर्स या निविदाकारांनी निविदा भरल्या होत्या. त्यातील मेसर्स आदित्य कॉम्प्युटर यांनी भरलेले दर हे सर्वात कमी असल्याने त्यांच्याशी संविदा करण्याचा प्रस्ताव प्रस्तावित केला आहे.

काही सदस्य :– पास, पास...........

मा. सभापती :– सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:–

विषय क्र.२ :– महापालिका जकात वसुली संगणकीकरण करणेकामी प्रशासनास न्युनतम
दराच्या ठेकेदाराशी संविदेस मान्यता देणे.

प्रस्तावनाः–

वरील विषयान्वये सादर करण्यात येते की, दिनांक २५/७/२००४ पासुन उल्हासनगर महानगरपालिकेने जकात वसुलीचे काम हाती घेतलेले आहे. जकात वसुलीचे संगणकीकरणाचे काम मेसर्स जे.पी.कॉम्प्युटर्स यांना देण्यात आले होते. सदरच्या कामाचा कालावधी दिनांक ३१/३/२००५ रोजी संपुष्टात येत आहे.

सदर कामी दिनांक १/४/२००५ नंतर नवीन ठेकेदाराची नियुक्ती करणे आवश्यक असल्याने त्या अनुषंगाने फ्रि प्रेस जर्नल, धनुष्यधारी, हिंदु सिंधी व दोपहर का सामना या वृत्तपत्रांमध्ये दिनांक १८/३/२००५ रोजी निविदा सूचना प्रसिध्द् करण्यात आली होती. सदरच्या निविदेस प्रतिसाद मिळुन मेसर्स आदित्य कॉम्प्युटर्स व मेसर्स जे.पी. कॉम्प्युटर्स यांनी निविदा फॉर्म घेतले होते. सदरच्या दोन निविदाकारांनी दिनांक २९/३/२००५ रोजी सिलबंद लिफाफयात त्यांच्या निविदा सादर केलेल्या होत्या. सदरच्या निविदा त्याच दिवशी उपायुक्त (जकात) व मुख्य लेखा परिक्षक यांच्या उपस्थितीत उघडण्यात आल्या. यावेळी मे. आदित्य कॉम्प्युटर्स यांच्या वतीने श्री आनंद केवलरामानी व मेसर्स जे.पी. कॉम्प्युटर्स यांच्या वतीने श्री जयप्रकाश शहदादपुरी हे उपस्थित होते.

दोन्ही निविदाकारांनी पुढीलप्रमाणे देकार रक्कम दिल्याचे दिसुन आले.

| अ.क्र | तपशिल | मे .आदित्य कॉम्प्युटर यांनी सादर केलेले दर | जे पी. कॉम्प्युट्रॉनिक्स यांनी सादर केलेले दर . |
|---|---|---|---|
| १ | संगणक, संगणक साहित्य व कर्मचारी वृंद पुरविणे . | १,३५,०००/–प्रति माह | १,६०,०००/– प्रति माह |

वरील तक्ता पहाता मेसर्स आदित्य कॉम्प्युटर्स यांनी सादर केलेले दर रुपये १,३५,०००/– हे सर्वात लघुत्तम असल्याचे दिसुन येते. या कामावर सन २००५–२००६ या वर्षासाठी एकूण खर्च रुपये १६,२०,०००/– अपेक्षित आहे. या कामी मे. आदित्य कॉम्प्युटर्स यांचे दर न्युनतम असल्याने त्यांच्याशी संविदा करणे योग्य राहील.

सबब मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मे. आदित्य कॉम्प्युटर्स यांच्याशी संविदेस मान्यता मिळणेसाठी स्थायी समितीसमोर सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १८६ दिनांकः– ३१. ३. २००५

सुचकाचे नाव :–श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :–श्री. उमाप रामदास

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार महापालिका जकात वसुली संगणकीकरण करणेकामी प्रशासनास मे. आदित्य कॉम्प्युटर्स या न्युनतम दराच्या ठेकेदाराशी संविदा करण्यास व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

विषय क्र.३ :— कुटुंबकल्याण विशेष मोहिमे अंतर्गत देण्यात येणा—या गृहोपयोगी वस्तु हंडा, कळशी पुरविणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे / मा. सदस्य श्री. रामदास उमाप:—कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया करून घेणा—यांना आपण ही जी भांडी, हंडा, कळशी देणार आहात त्यांचे नमुने स्थायी समिती सदस्यांना दाखविले जावे.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:—मागच्या वेळेस महापालिकेने जी दैनंदिनी छापुन घेतली तीचा नमुना ही स्थायी समिती सदस्यांना दाखविला नाही. स्थायी समिती समोर हे जे विषय मंजुरीस येतात आम्ही त्यास मंजुरी देतो परंतु या वस्तुचा जेव्हा पुरवठा केला जातो त्यावेळेस त्यांचा दर्जा बरोबर नसतो.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—महापालिकेस पुरविल्या जाणा—या वस्तु या प्रमाणित दर्जाच्या असाव्यात म्हणुनच स्थानिक स्वराज्य संस्थेकडुन त्या मागविल्या जातात परंतु या संस्थेकडुन पुरविण्यात येणा—या वस्तुही सुमार दर्जाच्या असतात. म्हणुन सन्माननिय सदस्य वस्तुंचा नमुना दाखविण्याची जी मागणी करतात ती योग्य अशीच आहे. मागच्या वेळेस कर्मचा—यांच्या गणवेशाबाबतचा प्रस्ताव होता. एस.कुमार या कंपनीचे कापड पुरविले जाईल असा प्रस्ताव होता तसा नमुनाही दाखविला होता पंरतु प्रत्यक्षात गणवेशाचे जे कापड पुरविले ते भिवंडीच्या यंत्रमागावर.

मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :—हंडा कळशीचा नमुना दाखविला जावा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—डायरी कशी होती ती आम्ही बघितली होती.

श्री. उत्तम लोणारे (उपायुक्त मुख्यालय):—यासाठी आम्ही त्याच्या देयकात देखिल कपात केली होती.

मा.सदस्य श्री. रामदास उमाप:—स्थायी समितीने नमुना मागविला होता त्याचा नमुना देखिल आधी दाखवला नव्हता.

श्री. उत्तम लोणारे (उपायुक्त मुख्यालय):—आता आम्ही आधी नमुना दाखवु आणि त्यानंतरच कार्यादेश देवु.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमापः—</u>हे जे दोन्ही विषय आहेत या दोन्ही विषयांचा नमुना दाखवावा.

<u>श्री. उत्तम लोणारे (उपायुक्त मुख्यालय):—</u>भांडी मध्यवर्ती रूग्णालयात ठेवलेली आहेत आपण तेथे पाहु शकता.

<u>मा. सदस्य श्री. मोहन साधवानी:—</u>प्रस्ताव काय आहे?काय दिले जाईल? कुणास दिले जाईल?

<u>मा. सचिवः—</u>कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेणा—या स्त्री व पुरूष व्यक्तीस प्रत्येकी रूपये २५०/— इतक्या किंमतीची हंडा व कळशी ही भांडी महापालिकेच्या वतीने देण्याचा प्रस्ताव आहे.

<u>मा. सभापती:—</u>लोकांना प्रोत्साहन देण्यासाठी सदरची योजना आहे.

<u>काही सदस्य :—</u> पास, पास............

<u>मा. सभापती :—</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>विषय क्र.३ :—</u> कुटुंबकल्याण विशेष मोहिमे अंतर्गत देण्यात येणा—या गृहोपयोगी वस्तु हंडा, कळशी पुरविणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

<u>प्रस्तावना:—</u>

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १/१/२००५ ते दिनांक ३१/३/२००५ या कालावधीत कुटूंबकल्याण शस्त्रक्रिया मोहिम जाहिर केली असून या मोहिमे अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिकेस सन २००४—२००५ या वर्षासाठी कुटूंबकल्याण शस्त्रक्रियेची उद्दिष्ट ३७५० इतके देण्यात आले असून अद्याप २००० शस्त्रक्रिया होणे बाकी आहे. त्या अनुशंगाने या मोहिम कालावधीत शस्त्रक्रिया करुन घेणा—या स्त्री व पुरुषास प्रत्येकी रुपये २५०/— इतक्या किंमतीची गृहपयोगी भांडी (हंडा व कळशी) देण्यासाठी स्थायी समिती ठराव क्र. १५७ दिनांक २७/१/२००५ अन्वये प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली आहे.

त्या अनुशंगाने उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील इच्छुक पुरवठादाराकडुन मोहरबंद निविदा मागविण्यात आल्या आहेत. सदर निविदा बाबतची जाहिरात दिनांक २७ फेब्रुवारी, २००५ दैनिक गावकरी व नगर न्युज या वृत्तपत्राद्वारे करण्यात आली. निविदाची कोरी निविदा फार्म (१) मे. कैलाश इन्टरप्राईजेस (२) में महादेव इंटरप्राईजसे (३) मे. मोहिनी इंटरप्राईजस (४) मे. व्ही.पी. इंटरप्राईजेस हयांनी घेतले आणि सर्वांनी इशारा अनामत रक्कम भरुन मोहरबंद निविदा दिनांक ७/३/२००५ रोजी सादर करण्यात आल्यात.

दिनांक ७/३/२००५ रोजी मा. उप—आयुक्त (मुख्यालय) यांच्या दालनात मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा अधिकारी निविदादारक यांच्या उपस्थितीत प्राप्त मोहरबंद निविदा उघडण्यात आल्या. प्राप्त निविदा पैकी मे. महादेव इंटरप्राईजसे उल्हासनगर यांचे दर रुपये २६२/— न्युनत्तम असल्यामुळे त्यांना पुन्हा दिनांक १४/३/२००५ रोजी प्रत्यक्ष वाटाघाटीसाठी उप—आयुक्त (मुख्यालय) यांच्या दालनात बोलविण्यात आले. सदर चर्चेअंती प्रति नग रुपये २४०/— प्रमाणे हंडा व कळशी पुरवठा करण्याचे मे. महादेव इंटरप्राईजसे उल्हासनगर यांनी मान्य केले. त्या अनुषंगाने त्यांना २००० नग हंडा व कळशी पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले.

हंडा व कळशी पुरवठासाठी रुपये २४०/— प्रति नग प्रमाणे एकूण रुपये ४,८०,०००/— मात्र खर्च होणार आहे. सदर खर्च आर्थिक वर्ष २००४—२००५ अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष अ.ब.क.—२ (II) करणेत येणार असून एकूण रुपये ७ लाख इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. सदर खर्चास मा. आयुक्तांची प्रशासकिय मान्यता मिळाली असून पुरावठादाराशी प्रशासनाने कारारनामा करुन पुरवठाचे आदेश पारीत केलेले आहेत.

तरी मा. स्थायी समिती समोर माहितीस्तव सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १८७ दिनांकः— ३१. ३. २००५

सुचकाचे नाव :—श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :—श्री. मोहन साधवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार कुटुंबकल्याण विशेष मोहिमे अंतर्गत देण्यात येणा—या गृहोपयोगी वस्तु हंडा, कळशी पुरविणेकामी प्रशासनाने मे. महादेव एंटरप्रायजेस या न्युनतम दराच्या निविदाकाराशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे .

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

विषय क्र.४ :— महापालिका सेवेतील लाभार्थी कर्मचा—यांना गणवेश वाटप करणेकामी प्रशासनास महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ, मुंबई यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

मा.सदस्य श्री. रामदास उमाप:—याचा पण आधी नमुना दाखवावा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:— आम्ही नमुना बघु.

काही सदस्य :— पास, पास...........

मा. सभापती :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय क्र.४ :— महापालिका सेवेतील लाभार्थी कर्मचा—यांना गणवेश वाटप करणेकामी प्रशासनास महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ, मुंबई यांच्याशी निविदेशिवाय

थेट संविदेस प्राधिकृत करणे.

प्रस्तावना:—

उल्हासनगर महानगरपालिकेतील विविध विभागातील सेवेत असलेले लाभार्थी कर्मचा—यांना आवश्यक त्या रंगाचे गणवेष जसे स्त्री कर्मचारी यांना साडी, पेटीकोट, ब्लाऊज पीस व पुरुष कर्मचारी यांना शर्ट, पॅन्टपिस इत्यादी वाटप करण्यासाठी महाराष्ट्र शासन संचालित संस्था / महामंडळाकडुन शासन मान्य दराने खरेदी करणे प्रस्तावित असून त्यासाठी महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाकडुन दरपत्रके मागविण्यात आलेली होती. उपरोक्त गणवेश कापडाचे दर हे शासनाचे उद्योग संचनालय मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना यांचे परिपत्रक क्रमांक भांखस / हातमाग कापडाशिवाय /दर निश्चिती (२९) /सी/—२३१२८/२००४—०५, दिनांक १६/१०/२००४ हयांनी निश्चित केलेले असून शासनाच्या निर्देशानुसार गणवेषाची खरेदी ही त्यांचे महाराष्ट्र राज्य यंत्रमाग कापडाशिवाय /दर निश्चिती/०४/२००१—२००२ दिनांक ६/१०/२००१ अन्वये खरेदी करण्यात यावी असे सुचित केले आहे.

कर्मचा—यांच्या गणवेषाकरीता लागणारे कापड खरेदी ही महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मुंबई यांचेकडुन शासनमान्य दराने खरेदी करावयाची असून खरेदी खर्च रुपये १६.६७ लाख एवढा अपेक्षित असून महानगरपालिका अंदाजपत्रक सन २००४—२००५ या वित्तीय वर्षाकरीता लेखाशिर्ष अ आणि ब—२(८) / अन्वये रुपये ६२.०० लाखाची तरतुद आहे. अर्थसंकल्पात सदर रक्कमेस मान्यता असल्याने त्यास प्रशासकिय व वित्तीय मान्यता प्राप्त आहे. गणवेश खरेदीसाठी आवश्यक संविदेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदनाम | कर्मचा—यांची संख्या | लगणारे कापड मीटरमध्ये | रंग | दर प्रति मिटर | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | हेल्पर, माळी, वॉचमेन, लेबर, कॅटल केचर, सुतार, गवंडी, जोडारी, पंपचालक, मीटर दुरुस्तीकार, रंगारी, विजतंत्री | ४७५ | ३०८७.५० | खाकी | ७७.०० | २३७७३७.५० |
| २. | अग्निशमन कर्मचारी | ३९ | २९२.५० | खाकी | ७७.०० | २२५२२.५० |
| ३. | विद्युत कर्मचारी | ५८ | ३७७.०० | चॉकलेटी | ८०.५० | ३०३४८.५० |
| ४. | शिपाई, बिलसर्वेअर, शिपाई कम वॉचमेन, तरणतलाव शिपाई, वाहनचालक | १४५ | १०८७.५० | सफेद | ७३.०० | ७९३८७.५० |
| ५. | सफाई कामगार (पुरुष) | ६३६ | ६२०१.०० | खाकी | ७७.०० | ४७७४७७.०० |
| अ.क्र. | पदनाम | कर्मचा—यांची संख्या | लगणारे कापड मीटरमध्ये | रंग | दर प्रति मिटर | एकूण रुपये |
| ६. | आरोग्य निरिक्षक आणि आरोग्य मुकादम | ५६ | ६३०.०० | सफेद | ७३.०० | ४५९९०.०० |
| ७. | मिस्त्री आणि मुकादम | ८९ | १००१.२५ | सफेद | ७३.०० | ७३०९१.२५ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८. | महिला सफाई कामगार | ३५६<br><br>१५९ | ५८७४.०० (५.५० मि. साडी)<br>३९११.४० ८.२ मि. (साडी)<br>१३९०.५० ब्लाऊज<br>२४०३.०० (पेटीकोट) | निळा | ४९.००<br><br>४९.००<br><br>४५.००<br><br>३४.०० | २८७८२६.००<br><br>१९१६५८.६०<br><br>६२५७२.५०<br><br>८१७०२.०० |
| ९. | महिला मजूर | ५०<br><br>३१ | ५५० (५.५० मि. साडी)<br>५०८.४० (८.२ साडी)<br>१४५.८० ब्लाऊज<br>२२५.०० (पेटीकोट) | निळा | ४९.००<br>३४.००<br>४९.००<br>४५.००<br>३४.०० | २६९५०.००<br>७६५०.००<br>२४९११.६०<br>६५६१.००<br>७६५०.०० |
| १०. | महिला सफाई मुकादम | १ | २४.६०(८.२ मि.साडी)<br>१६.५० (साडी)<br>५.४० ब्लाऊज<br>६.७५ (पेटीकोट) | सफेद | ४९.००<br>४९.००<br>४५.००<br>३४.०० | १२०५.४०<br>८०८.५०<br>२४३.००<br>२२९.५० |
| ११. | सुरक्षा रक्षक (स्त्री) | २ | २२.०० (साडी)<br>९.०० (पेटीकोट)<br>३.६० (ब्लाऊज) | खाकी | ४९.००<br>३४.००<br>४५.०० | १०७८.००<br>३०६.००<br>१६२.०० |

| अ.क्र. | पदनाम | कर्मचा—यांची संख्या | लागणारे कापड मीटरमध्ये | रंग | दर प्रति मिटर | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १२ | शिपाई, बिलसर्व्हेअर, तरणतलाव शिपाई, शिपाई कम ट्रेसर, कॅटलकॅचर, सफाई कम माळी, माळी | ३५ | ३८५.०० (साडी)<br>१५७.५० (पेटीकोट)<br>६३.०० (ब्लाऊज) | सफेद | ४९.००<br>३४.००<br>४५.०० | १८८६५.००<br>५३५५.००<br>२८३५.०० |
| एकुण रुपये ——— | | | | | | १६,६६,९८६.१० |

कापड खरेदी नंतर गणवेष शिलाईसाठी शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार शिलाईचा खर्च रोखीने संबंधितास देणे योग्य होईल. सामान्य प्रशासन निर्णय क्र. सी.एम.ओ.१०८३/२५१४ दिनांक १९/९/१९९० अन्वये शासनाचे गणवेष शिलाईचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| पॅन्ट आणि शर्ट | एकत्रित | रुपये १००/— |
| ब्लॉऊज आणि पेटीकोट | एकत्रित | रुपये २०/— |

उपरोक्त शासनमान्य दरानुसार शिलाई खर्च संबंधित लाभार्थीस देण्यास हरकत नसावी. त्याचा अपेक्षित खर्च अंदाजे रुपये ४.०५ लाख होणार आहे.

तरी प्रस्तावित गणवेष खर्च रुपये १६.६७ लाख एवढा तसेच गणवेष शिलाई खर्च रुपये ४.०५ लाख असा एकूण २०.७२ लाख यांस स्विकृती मिळणेस्तव स्थायी समिती सभेपूढे प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १८८ दिनांकः— ३१. ३. २००५

सुचकाचे नाव :—श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :—श्रीमती संगिता जावळे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार महापालिका सेवेतील लाभार्थी कर्मचा—यांना गणवेशाचे कापड पुरविणेकामी प्रशासनास महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ, मुंबई यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे व कर्मचा—यांना शिलाई खर्चापोटी पॅन्ट आणि शर्ट रु १००/— व ब्लाउज आणि पेटीकोट रु २०/— याप्रमाणे एकुण अंतर्भुत खर्च रु २०.७२ लाखास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सकाळी ११.२५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. पीठासीन अधिकारी यांनी जाहीर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—१६ एप्रिल, २००५.

## दि. १६.४.२००५ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शनिवार दिनांक १६.४.२००५ रोजी सांयकाळी ४. ०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

१. *श्रीमती ज्योती सुरेश (पप्पु)कालानी*
२. श्री. वनवारी किशोर नारायणदास
३. श्री. एडके गणपत गोविंद
४. श्री. गायकवाड सुरेश नामदेव
५. श्रीमती. जावळे संगिता रमेश
६. श्री. बठिजा संजय रामचंद्र
७. श्रीमती. वनवारी मोना अशोक
८. श्री. साधवानी मोहन रहंदोमल
९. श्री. सोनवणे नथु काशिराम
१०. श्रीमती कृष्णानी रेखा हरेश
११. श्री जग्यासी राजु किशनचंद
१२. श्रीमती मसंद माया घनश्यामदास
१३. श्री मोकल चंदाराम विठोबा
१४. श्री वाघे श्यामु बाबु
१५. श्रीमती ससाणे लक्ष्मी रोहिदास
१६. श्री जाधव सुरेश मधुकर

सांयकाळी ४—१५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):— स्थायी समिती सभापती यांनी दि. १६.४.२००५ रोजी आपल्या पदावरून राजीनामा दिला आहे व त्या सभापती पदासाठी उमेदवार म्हणुन उभ्या आहेत. म्हणुन या सभेत आपल्या सदस्यांमधुन कुणा तरी एका सदस्याची बहुमताने अथवा सर्वानुमते पीठासिन अधिकारी म्हणुन निवड करायची आहे.

काही सदस्य:—श्री. किशोर वनवारी यांना पीठासीन अधिकारी म्हणुन काम पहावे.

यावेळी सर्वानुमते श्री. किशोर वनवारी हे पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १:— स्थायी समितीच्या सभापतींची नेमणूक करणे.

स्थायी समिती सभापती पदासाठी दोन उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यांची नावे मी वाचून दाखवितो. पहिल्या क्रमांकावर श्रीमती. कालानी ज्योती सुरेश (पप्पु) व दुस—या क्रमांकावर श्रीमती ससाणे लक्ष्मी रोहिदास यांचे नाव आहे.

निवडणूक प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी कुणी उमेदवार आपली उमेदवारी मागे घेऊ इच्छित असेल तर ५ मिनिटांची वेळ दिली जात आहे. आता ४ वाजून २० मिनिटे झाली आहेत.

यावेळी संध्याकाळचे ४ वाजुन २५ मिनिटे झाली आहेत. पाच मिनिटाची वेळ संपली आहे आणि कोणी आपली उमेदवारी मागे घ्यायला इच्छिुक दिसत नाही.

आता ४ वाजुन ३० मिनिटे झाली आहे. आता निवडणूक प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):— सदरच्या निवडणूकीमध्ये आपणांस महापौरपदाच्या निवडणूकीप्रमाणे उभे राहुन हात उंचावुन मतदान करायचे आहे. जर दोन्ही बाजुस समसमान मते मिळाली तर लॉटरीद्वारे निकाल ठरविण्यात येईल. आता जे सदस्य श्रीमती कालानी ज्योती सुरेश (पप्पु) यांच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया उभे राहुन आपले हात वर करावेत.

*१२मते*

१. *श्रीमती ज्योती सुरेश (पप्पु)कालानी*
२ श्री. वनवारी किशोर नारायणदास
३ श्री. एडके गणपत गोविंद
४ श्री. गायकवाड सुरेश नामदेव
५ श्री. बठिजा संजय रामचंद्र
६ श्रीमती. वनवारी मोना अशोक
७ श्री. साधवानी मोहन रहंदोमल
८. श्री जग्यासी राजु किशनचंद
९. श्रीमती मसंद माया घनश्यामदास
१०. श्री मोकल चंदाराम विठोबा
११. श्री वाघे श्यामु बाबु
१२. श्री जाधव सुरेश मधुकर

जे सदस्य श्रीमती ससाणे लक्ष्मी रोहिदास यांच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया उभे राहुन आपले हात वर करावेत.

*४ मते*

१. श्रीमती जावळे संगिता रमेश
२. श्री सोनवणे नथु काशिराम
३. श्रीमती कृष्णानी रेखा हरेश
४. श्रीमती ससाणे लक्ष्मी रोहिदास

प्रस्तावना

विषय:— स्थायी समितीच्या सभापतीची नेमणुक करणे.

सन २००५—२००६ करिता स्थायी समितीच्या सभापतीची नेमणुक करणे कामी आयुक्तांनी दिनांक १६.४.२००५ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता स्थायी समितीची सभा बोलावली आहे. स्थायी समिती सभा सूचने सह प्रत्येक स्थायी समिती सदस्याला निवडणुक कार्यक्रम पुरविण्यात आला होता त्या कार्यक्रमानुसार स्थायी समिती सभापती पदाच्या नेमणुकीसाठी दिनांक १२.४.२००५ रोजी दुपारी ३ ते सायंकाळी ५ या दरम्यान नामनिर्देशनपत्र स्विकारण्यासाठी निश्चित करण्यांत आलेल्या मुदती अंतर्गत दोन उमेदवारांनी आपले नामनिर्देशन पत्र महापालिका सचिवांकडे दाखल केले. ज्यांची नामनिर्देशनपत्र वैध झाली त्यांची नावे येणेप्रमाणे:—

१. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश (पप्पु)

२. श्रीमती ससाणे लक्ष्मी रोहिदास

निवडणुक कार्यक्रमानुसार उमेदवारी मागे घेण्याच्या तारखेस विहित मुदतीत वरील उमेदवारांपैकी कोणीही आपली उमेदवारी मागे न घेतल्याने निवडणुक प्रक्रिया सुरू करणेस व तद्नंतर निवडणूक निकाल जाहिर करणेसाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १ दिनांकः— १६.४.२००५

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार १६ स्थायी समिती सदस्यांनी केलेल्या मतदानाअंती खाली दर्शविलेल्या प्रत्येक उमेदवारासमोर मिळालेली मते जाहिर करीत आहे आणि सर्वात जास्त मते मिळालेल्या उमेदवार श्रीमती. कालानी ज्योती सुरेश (पप्पु) यांना ''स्थायी समिती सभापती '' पदावर निवडून आल्याचे घोषित करीत आहे.

| उमेदवाराचे नाव | मिळालेली एकुण मते |
|---|---|
| १. श्रीमती.कालानी ज्योती सुरेश (पप्पु) | १२ |
| २. श्रीमती ससाणे लक्ष्मी रोहिदास | ०४ |

मतदानाद्वारे मंजुर

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. पीठासीन अधिकारी :— उपस्थित सदस्यांच्या मतदानाअंती आलेल्या निकालाप्रमाणे मी स्थायी समितीतर्फे श्रीमती ज्योती कालानी सुरेश (पप्पु) यांना १२ मते तर दुसरे उमेदवार श्रीमती ससाणे लक्ष्मी रोहिदास यांना ४ मते मिळाले असुन श्रीमती. ज्योती कालानी सुरेश (पप्पु) यांना सर्वाधिक म्हणजे १२ मते मिळाल्याने त्या मा. स्थायी समिती सभापती पदी निवडून आल्याचे मी जाहिर करत आहे.

यावेळी श्रीमती ज्योती कलानी या सभापती पदावर आसनस्थ झाल्या.

निवडणुक निकाल जाहिर झाल्यानंतर श्रीमती. ज्योती कालानी सुरेश (पप्पु) स्थायी समिती सभापती स्थानी आसनस्थ झाल्या. तद्नंतर माननीय आयुक्त व इतर स्थायी समिती सदस्यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.
सायंकाळी ४—५० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा़ पीठासीन अधिकारी यांनी जाहीर केले़

(प्रकाश पं़ कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—२५ एप्रिल, २००५.

## दि. २५.४.२००५ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक २५.४.२००५ रोजी सांयकाळी ४. ०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

१. श्री. वनवारी किशोर नारायणदास
९. श्री. एडके गणपत गोविंद
१०. श्री. गायकवाड सुरेश नामदेव
११. श्रीमती. जावळे संगिता रमेश
१२. श्रीमती. वनवारी मोना अशोक
१३. श्री. सोनवणे नथु काशिराम
७. श्रीमती कृष्णानी रेखा हरेश
८. श्री जग्यासी राजु किशनचंद
९. श्रीमती मसंद माया घनश्यामदास
१०. श्री वाघे श्यामु बाबु
११. श्रीमती ससाणे लक्ष्मी रोहिदास

तर,

१.मा. सभापती श्रीमती ज्योती सुरेश (पप्पु)कालानी तसेच मा. सदस्य २.श्री. बठिजा संजय रामचंद्र, ३.श्री. साधवानी मोहन रहंदोमल, ४.श्री मोकल चंदाराम विठोबा, ५.श्री जाधव सुरेश मधुकर हे अनुपस्थित होते.

सांयकाळी ४—१० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):— आजच्या सभेस मा. सभापती महोदया हया अनुपस्थित असल्याने सभेचे कामकाज चालविण्यासाठी उपस्थित सदस्यांमधुन एका सदस्याची बहुमताने अथवा सर्वानुमते पीठासीन अधिकारी म्हणुन निवड करायची आहे.

मा. सदस्य श्री गणपत एडके :— श्री किशोर वनवारी यांनी पीठासीन अधिकारी म्हणुन काम पहावे.

मा. सदस्य श्री नथु सोनवणे :— आमचे श्री किशोर वनवारी यांच्या नावाला अनुमोदन आहे.

यावेळी श्री किशोर वनवारी हे सर्वानुमते पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.

मा. सचिव :— विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १ :— मागील सभेचे दिनांक ३१/३/२००५ व दिनांक १६/४/०५ रोजीचे

इतिवृत्त कायम करणे.

<u>मा. सदस्य श्री नथु सोनवणे :—</u> सचिव साहेब दिनांक १६/४/०५ च्या बैठकीच्या इतिवृत्तातील ठरावामध्ये श्रीमती लक्ष्मी ससाणे यांच्या ऐवजी माझे नांव आले आहे, त्यात दुरुस्ती केली जावी.

<u>मा. सचिव :—</u> चुकीची दुरुस्ती करण्यात येईल.

<u>काही सदस्य :—</u> पास, पास...............

<u>मा. पीठासीन अधिकारी :—</u> मागील सभेचे दिनांक ३१/३/२००५ व दिनांक १६/४/०५ रोजीचे इतिवृत्त वर सुचविलेल्या सुधारणेसह जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात

<u>विषय क्र.२ :—</u> उल्हासनगर शहरातील बांधकामांचे सर्वेक्षण करणेकामी प्रशासनास मे. बिऑड सॉफटवेअर टेक्नॉलॉजीस, डोंबिवली यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

<u>मा. सदस्य श्री नथु सोनवणे :—</u> सभापती महोदय, हे जे काम आपण देणार आहोत हे म्हणजे आपल्या घरात काय चालु आहे ते पाहण्यासाठी बाहेरच्या व्यक्तीला बोलावणे असे होणार आहे. आपल्याला जी माहिती हवी आहे ती अनधिकृत बांधकाम विभागातुन प्राप्त होवु शकते.

<u>मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :—</u> आपल्याकडे रेकॉर्ड नाही का?

<u>मा. आयुक्त :—</u> मा. सभापती महोदय आपणा सर्वांना माहिती असेलच की या शहरातील एक नागरिक श्री हरी तनवानी यांनी शहरातील अनधिकृत बांधकामांविरुध्द् मा. उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केलेली आहे. सदर याचिकेमध्ये न्यायालयाने आयुक्तांनी शहरातील अनधिकृत बांधकामे शोधुन त्यावर कायदेशिर कारवाई करण्याविषयी आदेश दिलेले आहेत. यापूर्वी शहरातील अनधिकृत बांधकामांची पाहणी अशाप्रकारे उपविभागीय कार्यालय व नगर भुमापन कार्यालय यांच्यामार्फत केली जायची. परंतु यावेळी न्यायालयाने महापालिकेला सदरची माहिती गोळा करण्यासाठी सांगितले आहे. शहरातील अनधिकृत बांधकामांची पाहणी करण्यासाठी आपल्याकडे पुरेसा कर्मचारीवर्ग व अद्यावत तंत्रज्ञान उपलब्ध नाही. जी संस्था हे काम करेल ती संस्था उपग्रहाद्वारे फोटो घेवुन त्यानंतर विहीत कार्यपध्द्तीद्वारे अनधिकृत बांधकामांची पाहणी करेल. सदरचे काम कालमर्यादेत करणे आवश्यक असल्याने खाजगी संस्थेद्वारे करुन घेणे योग्य राहील.

<u>मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :—</u> आपल्या कार्यालयात आधीचा रेकॉर्ड असेल.

<u>मा. आयुक्त :—</u> आपल्याकडे जो अभिलेख आहे त्याविषयी शंका आहे. मा. उच्च न्यायालयात माहिती देताना ती अद्यावत तंत्रज्ञानाने तयार करुन देणे योग्य राहील.

<u>मा. सदस्य श्री राजु जग्यासी :—</u> परंतु हे काम कसे करणार आहेत?

<u>मा. आयुक्त :—</u> आधी उपग्रहाद्वारे प्रतिमा घेवुन त्या चिन्हांकित करतील, मग प्रत्यक्ष जागेवर पाहणी करुन इमारतीचे नांव, मालकाचे नांव घेतील नंतर आपल्याकडे जो रेकॉर्ड उपलब्ध आहे त्याच्याशी पडताळणी करुन अधिकृत व अनधिकृत इमारती / बांधकामांची वेगवेगळी यादी करतील. यामध्ये प्रत्येक बांधकामाची पाहणी केली जाईल मग त्यामध्ये झोपडया सुध्दा येतील.

काही सदस्य :— पास, पास..........

मा. पीठासीन अधिकारी :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:—

विषय क्र.२ :— उल्हासनगर शहरातील बांधकामांचे सर्वेक्षण करणेकामी प्रशासनास मे. बिऑड सॉफटवेअर टेक्नॉलॉजीस, डोंबिवली यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

उल्हासनगर येथील पत्रकार श्री. हरि तनवानी यांनी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याचे आदेश महापालिकेस देण्यासाठी मा. उच्च न्यायालय मुंबई यंथे जनहित याचिका क्रमांक १०५/२००३ दाखल केली असल्याने अनधिकृत इमारती शोधण्याचे काम करून त्वरीत मा. न्यायालयाचे आदेशाचे पालन कमी कालावधीत करून न्यायालयाचे आदेशाचे पालन व्हावे याकरिता खाजगी संस्थेकडून उपग्रहीय प्रतिमा मिळवणे, सद्याच्या उपलब्ध सर्व नकाशाचे संगणकीकरण करणे, सर्व नकाशांचा एकमेकांशी ताळमेळ घालणे, तसेच महापालिकेने बांधकामांना परवानगी देण्यात आलेली आहे, ती बांधकामे व शासनाने पुर्वी बांधलेली व अद्यापर्यंत अस्तित्वात असलेली बांधकामे स्वतंत्रपणे दर्शविणे, तसेच उर्वरित अनधिकृत बांधकामांचे जागेवर सर्वेक्षण करून इमारतीचे नावं, क्रमांक शोधणे, निवासी सदनिकांची संख्या, वाणिज्य दुकानांची संख्या व गाळे, इमारतीचा प्रकार, इमारतीचे मजले इत्यादी सर्वेक्षण करून माहिती संकलीत करणेसाठी खाजगी अनुभवी संस्थाकडुन प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. त्यांना तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

| अ. क्र. | संस्थेचे नांव | कालावधी | रक्कम (रूपये) |
|---|---|---|---|
| १ | बिऑड सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजीस प्रा. लिमिटेड, डोंबिवली | १८ (आठवडे) | ९,९६,०००/— |
| २ | इन्फो विझार्डस (इंडिया) प्रा. लि. मुंबई—२८ | ९ (महिने) | १५,८०,०००/— |
| ३ | स्टॅन्डर्ड इंजिनिअर्स, मुंबई—४०० ००१ | १० (महिने) | १५,५०,०००/— |

प्राप्त प्रस्तावातील दरांचा तुलनात्मक दृष्टया विचार केला असता, बिऑड सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजीस प्रा. लिमिटेड, डोंबिवली यांचे दर व कालावधी कमी असून सदरचे काम त्यांचेकडून करून घेण्यासाठी येणारा खर्च रू. ९,९६,०००/— इतक्या रक्कमेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेस्तव स्थायी समितीपुढे सादर.

स्थायी समिती ठराव क्र. २ दिनांक:— २५.४.२००५

सुचकाचे नाव :—श्री. गणपत एडके
अनुमोदकाचे नाव :—श्री. नथु सोनवणे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील बांधकामांचे सर्वेक्षण करणेकामी प्रशासनास मे. बिऑड सॉफटवेअर टेक्नॉलॉजीस, डोंबिवली यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सदरहु ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता करण्यात यावी.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

विषय क्र. ३ :— उल्हासनगर शहराकरिता पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल व कृती आराखडा तयार करणेकामी प्रशासनास यशदा, पुणे यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

काही सदस्य :— पास, पास..........

मा. पीठासीन अधिकारी :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:—

विषय क्र. ३ :— उल्हासनगर शहराकरिता पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल व कृती आराखडा तयार करणेकामी प्रशासनास यशदा, पुणे यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

घटनेतील कायदा १९९२ (सुधारित क्रमांक ७४ कलम २३४ परिशिष्ट १२ विषय ८ अन्वये महानगरपालिकांना पर्यावरण संवर्धन तेथील शहरातील नुतनीकरण तसेच त्यांच्या प्रशासकीय क्षेत्राला पर्यावरणाच्या विविध अंगाच्या अभ्यासाचा पुरस्कार करणे अशी जबाबदारी सोपविलेली आहे)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ 'अ' अन्वये पर्यावरण हा विषय अगदी अग्रभागी मानून महानगरपालिका आयुक्त यांनी पर्यावरण स्थिती अहवाल तयार करून ३१ जुलै, पुर्वी महासभेकडून मान्य करून घेणे बंधनकारक आहे.

पर्यावरण प्रवाहांचे नियंत्रण कर्तव्य क्षेत्र कामकाजांची पातळी याबाबत माहिती जमा करणे व त्यांचे मुद्रण करून त्यांच्या १०० प्रती महानगरपालिकेस सादर करणे करिता मागील वर्षी यशदा पुणे यांना सदरचे काम दिलेले होते. या कामाकरिता यशदा यांना रूपये ३. २० लक्ष इतका मोबदला अदा करण्यात आला होता. मागील वर्षी यशदा पुणे यांचेशी केलेल्या संविदेच्या अटी आणि शर्तीवरच चालु वर्ष २००५—२००६ करिता पर्यावरण स्थिती दर्शक अहवाल व कृती आराखडा अहवाल (Envinmental Status Report & Action Plan) तयार करून घेणे करिता प्रस्तावित करण्यात येत आहे. या करिता यशदा पुणे यांना इकडील पत्र क्रमांक उमपा/प्रव्यक/०६/२००५ दिनांक १ फेब्रुवारी, २००५ अन्वये कळविण्यात आले होते.

मे. यशदा या शासकीय संस्थेने महानगरपालिकेस आवश्यक असलेल्या पर्यावरण स्थिती दर्शक अहवाल उपाययोजना अहवालसह १०० प्रतिमध्ये सादर करण्यास त्यांचेकडील दिनांक २१/६/२००४ च्या पत्रान्वये संमती दिली होती. या पत्रामध्ये मागील वर्षी यशदा यांना हे काम त्या आधीच्या वर्षात म्हणजे वर्ष २००३—२००४ मध्ये ज्या दराने व ज्या अटी शर्तीच्या अधिन राहून दिले होते.

याच अटी शर्ती (रूपये ३,२०,०००/—) किंमतीवर सदर काम करण्यास यशदाने त्यांचेकडील पत्र क्र. सीईडी—प्रकल्प/२००५/उल्हासनगर दिनांक १ फेब्रुवारी, २००५ पत्रान्वये संमती दिलेली आहे.

सदरचा खर्च महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये 'अ' अंदाजपत्रक भाग–१ महसूल खर्च क– सार्वजनिक आरोग्य व इतर सुखसोयी क–१ (III) पर्यावरण सनियंत्रण अंतर्गत रू. २०.०० लक्ष या तरतुदीमधून करण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

सन २००३–२००४ आणि सन २००४–२००५ या वर्षासाठी निश्चित केलेल्या अटी शर्ती प्रमाणे रूपये ३,२०,०००/– खर्चाचे पर्यावरण स्थिती दशक अहवाल (२००५–२००६)कृती आराखडा २००६–२००७ तयार करण्याचे काम यशदा पुणे यांना देणेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २ (२) नुसार स्थायी समिती कडून मान्यता मिळून यशदा पुणे यांचेशी या कामाकरिता संविदा करण्यास आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्याकरिता मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ३ दिनांक:– २५.४.२००५

सुचकाचे नाव :–श्री. गणपत एडके
अनुमोदकाचे नाव :–श्रीमती संगिता जावळे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहराकरिता पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल व कृती आराखडा तयार करणेकामी प्रशासनास यशदा, पुणे यांच्याशी सन २००३–०४ व २००४–०५ या वर्षासाठी निश्चित केलेल्या दराने, अटी व शर्तीच्या धर्तीवर निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे व अंतर्भुत खर्च रु ३२०,०००/– यांस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :– विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

विषय क्र.४ :– सन २००५–०६ पावसाळयापूर्वी शहरातील लहान मोठे नाले सफाई कामाकरिता एक महिन्याकरिता हंगामी कामगारांची नेमणूक करणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

मा. सदस्य श्री नथु सोनवणे :– आता हा प्रस्ताव एक महिन्यासाठी आणलेला आहे, दर वर्षी २ महिन्यांसाठी सफाई कामगार ठेवण्यात येतात, मग आताही दोन महिन्यांसाठी ठेवा.

मा. पीठासीन अधिकारी :– प्रशासन प्रस्ताव आणताना नेहमी १ महिन्यासाठी आणते परंतु स्थायी समिती ते २ महिन्यांसाठीच पास करते.

मुख्य लेखा अधिकारी (श्री हरेश इदनानी) :– एक महिन्यासाठी जवळपास रु २२ लक्ष व दोन महिन्यांसाठी जवळपास रु ४५ लक्ष एवढा खर्च या कामावर अपेक्षित आहे.

मा. सदस्य श्री नथु सोनवणे :– परंतु १५ मे पूर्वी हे काम पुर्ण करा, यावर्षी पावसाळा लवकर सुरु होणार आहे.

**मा. पीठासीन अधिकारी :—** आता आपण दोन महिन्यांसाठी पास करु. यासाठी जो खर्च येईल तो सुधारित अर्थसंकल्पात समायोजीत करण्यात येईल. जो खर्च होईल तेवढी कर वसुली जास्त दर्शविण्यात यावी. आपण येथे पास करु अर्थसंकल्पात समायोजन करण्यासाठी महासभेसमोर प्रस्ताव सादर होईल.

**काही सदस्य :—** पास, पास...........

**मा. पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषय पुढीलप्रमाणे सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

**प्रस्तावना:—**

**विषय क्र.४ :—** सन २००५—०६ पावसाळयापूर्वी शहरातील लहान मोठे नाले सफाई कामाकरिता एक महिन्याकरिता हंगामी कामगारांची नेमणूक करणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

पावसाळयात अतिवृष्टीमुळे पुराचे पाणी शहरातील भागात साठु नये, अतिवृष्टीमुळे शहरातील नागरीकांची वित्तहानी व प्राणहानी होवु नये तसेच पावसाळयात शहरात रोगराई होवु नये म्हणुन महानगरपालिकेला दरवर्षी पावसाळयापूर्वी शहरातील लहान मोठे नाले सफाईची कामे नियमित सफाई कामगारांकडुन चांगल्याप्रकारे करून घेणे शक्य होत नाही. त्यामुळे एकत्रित वेतनावर तात्पुरत्या स्वरूपात रोजंदारी कामगार नेमणुक करून अथवा मजुर कामगार सहकारी संस्था यांना कामाचे वाटप करून नाला सफाईचे कामे करून घ्यावी लागतात. मागील दोन वर्षे हंगामी कामगारांची रोजंदारीवर नेमणुक करण्यात आली होती.
तरी वरील परिस्थिती पाहता चालु वर्षी सन २००४—२००५ मध्ये शहरातील लहान मोठे नाले सफाई कामे करून घेण्यास प्रत्येक वार्डात १० याप्रमाणे असे एकुण ७६० पुरूष कामगार ३० दिवसांसाठी सुट्टीचे दिवस सोडुन १६ मे, २००५ ते ३० जुन, २००५ याकालावधीत तात्पुरत्या स्वरूपात किमान वेतन कायद्यानुसार देय रोजंदारीवर नेमण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. या हंगामी कामगारांनी नाले सफाईसाठी लागणारे साहित्य फावडे, घमेले, टिकाव, कुदळ इत्यादी गतवर्षीप्रमाणे स्वत: घेवुन यावे. सदर खर्चाची सन २००५—२००६ च्या उल्हासनगर महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात तरतुद केलेली नाही. त्यामुळे सदर खर्चाची तरतुद सुधारीत अंदाजपत्रकात करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर प्रस्ताव वित्तिय व प्रशासकीय मंजुरीस स्थायी समितीस सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ४ दिनांक:—२५.४.२००५

सुचकाचे नाव :—श्री. गणपत एडके
अनुमोदकाचे नाव :—श्री. नथु सोनवणे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार पावसाळयापुर्वी शहरातील लहान व मोठे नाले सफाई करणेकरिता एक महिन्याऐवजी दोन महिन्यासाठी ६० दिवसांसाठी प्रत्येक प्रभागात १० कामगार याप्रमाणे एकुण ७६० पुरुष कामगार रूपये १००/— प्रति दिवस नेमणुकीस मान्यता देत आहे व अंतर्भुत खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.परंतु नाले सफाईसाठी लागणारे साहित्य उदा० फावडे, घमेले, टिकाव, कुदळ इत्यादी कामगारांना स्वत: आणावे लागतील, महापालिकेतर्फे सदरचे साहित्य पुरविण्यात येणार नाही.

सदर खर्चाची तरतुद करणेसाठी अंदाजपत्रकात पुढील प्रमाणे बदल प्रस्तावीत करण्यात येत आहे.

| अ. क्र. | ज्या लेखा शीर्षात रक्कम वर्ग करावयाची आहे त्याचे नाव | ज्या लेखा शीर्षातून रक्कम वर्ग करावयाची आहे त्याचे नाव | रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| १ | नाला व गटार साफसफाई खर्च (क—अंदाजपत्रक, प्रभाग समिती—१) | सार्वजनिक नाला व गटार बांधणी (क—अंदाजपत्रक, भाग—२—ड—जलनिस:रण खाते) | १२,५०,०००/— |
| २ | नाला व गटार साफसफाई खर्च (क—अंदाजपत्रक, प्रभाग समिती—२) | सार्वजनिक नाला व गटार बांधणी (क—अंदाजपत्रक, भाग—२—ड—जलनिस:रण खाते) | १२,५०,०००/— |
| ३ | नाला व गटार साफसफाई खर्च (क—अंदाजपत्रक, प्रभाग समिती—३) | सार्वजनिक नाला व गटार बांधणी (क—अंदाजपत्रक, भाग—२—ड—जलनिस:रण खाते) | १२,५०,०००/— |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | नाला व गटार साफसफाई खर्च (क–अंदाजपत्रक, प्रभाग समिती–४) | सार्वजनिक नाला व गटार बांधणी (क–अंदाजपत्रक, भाग–२–ड–जलनिस:रण खाते) | १२,५०,०००/– |
| | | एकूण | ५०,००,०००/– |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ७ मधील २ नुसार कोणतीही रक्कम एका अर्थसंकल्पीय अनुदानातून दुस–या अर्थसंकल्पीय अनुदानात बदली करण्याची तरतुद आहे. त्यानुसार सदर रक्कम एकालेखा शीर्षातून दुस–या लेखा शीर्षात बदल करणेसाठी स्थायी समिती मा. महासभेस शिफारस करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. आयुक्त :– याशिवाय प्रशासनाच्या वतीने आयत्या वेळचा विषय म्हणुन एक प्रस्ताव आणलेला आहे, आपली मंजुरी असल्यास आजच्या सभेच्या कामकाजात सदरचा विषय समाविष्ट करुन घेता येईल.
मा. पीठासीन अधिकारी :– सदरचा विषय सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करुन घेण्यात येत आहे.

मा. सचिव :– विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

आयत्यावेळचा विषय:–

विषय क्र.५ :– पावसाळयापुर्वी महापालिका हद्दीतील नाले पोक्लेन मशिनद्वारे सफाई करणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

मा. सदस्य श्री नथु सोनवणे :– कामास लवकर सुरुवात करा.

मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :– कोणकोणते नाले आहेत.

कार्यकारी अभियंता (पा.पु)(श्री.आर.आर.सावकारे) :– मी तुम्हास त्या नाल्यांची यादी देतो.

मा. पीठासीन अधिकारी :– निविदा लवकर मागवुन काम सुरु करावे. तसेच आजचे हे जे दोन विषय आहेत, तर इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता सदर ठरावावर अंमलबजावणी करण्यात यावी.

काही सदस्य :– पास, पास...........

मा. पीठासीन अधिकारी :– सदरचा विषय पुढीलप्रमाणे सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

आयत्यावेळचा विषय:–

**विषय क्र.५ :–** पावसाळयापुर्वी महापालिका हद्दीतील नाले पोक्लेन मशिनद्वारे सफाई करणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

**प्रस्तावना:–**

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ४१ लहान मोठे नाले प्रतिवर्षी कंत्राटी पध्दतीने ठेकेदारामार्फत पोक्लेन मशीनने साफ करण्यात येतात. कॅम्प क्र. १ ते ५ मधील सर्व नाले गाळ काढुन साफ करण्यासाठी सन २००५–०६ या वर्षाकरिता रू. ९९६०००/– खर्च येईल.

सदर प्राकलनास कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी तांत्रिक मंजूरी दिली असून, मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी प्रस्तावाची छाननी करून मंजुरीची शिफारस केली आहे.

सदर काम तातडीच्या स्वरूपाचे व नागरिकांच्या आरोग्याशी निगडीत असून हे काम पावसाळयापूर्वी करणे अत्यंत जरूरीचे आहे. सदर प्राकलनास प्रशासकीय, वित्तिय मान्यतेकरिता व स्पर्धात्मक जाहीर निविदा (बी–१) मागविण्याकरिता स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ५ दिनांक:–२५.४.२००५

सुचकाचे नाव :–श्री. राजु जग्यासी

अनुमोदकाचे नाव :–श्री. नथु सोनवणे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार महापालिका हद्दीतील एकुण ४१ लहान मोठे नाले पावसाळयापुर्वी पोक्लेन मशिनद्वारे साफ करणे कामी रू. ९,९६,०००/– च्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सदर खर्चाची तरतुद करणेसाठी अंदाजपत्रकात पुढील प्रमाणे बदल प्रस्तावीत करण्यात येत आहे.

| अ. क्र. | ज्या लेखा शीर्षात रक्कम वर्ग करावयाची आहे त्याचे नाव | ज्या लेखा शीर्षातून रक्कम वर्ग करावयाची आहे त्याचे नाव | रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| १ | नाला व गटार साफसफाई खर्च (क–अंदाजपत्रक, भाग–१–ड–जलनिस:रण खाते – अ. क्र. ४ ) | सार्वजनिक नाला व गटार बांधणी (क–अंदाजपत्रक, भाग–२–ड–जलनिस:रण खाते अ. क्र. १ ) | ५,००,०००/– |
| | | एकुण | ५,००,०००/– |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ७ मधील २ नुसार कोणतीही रक्कम एका अर्थसंकल्पीय अनुदानातून दुस–या अर्थसंकल्पीय अनुदानात बदली करण्याची तरतुद आहे.

त्यानुसार सदर रक्कम एका लेखा शीर्षातून दुस–या लेखा शीर्षात बदल करणेसाठी स्थायी समिती मा. महासभेस शिफारस करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ४. ३० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. पीठासीन अधिकारी यांनी जाहीर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—३० मे, २००५.

## दि. ३०.५.२००५ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक ३०.५.२००५ रोजी सांयकाळी ४. ३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

१. श्रीमती कालानी ज्योती सुरेश (पप्पु)
२. श्री. वनवारी किशोर नारायणदास
१४. श्री. एडके गणपत गोविंद
१५. श्री. गायकवाड सुरेश नामदेव
१६. श्रीमती. जावळे संगिता रमेश
१७. श्री. बठिजा संजय रामचंद्र
१८. श्रीमती. वनवारी मोना अशोक
१९. श्री. सोनवणे नथु काशिराम
८. श्रीमती कृष्णानी रेखा हरेश
९. श्री जग्यासी राजु किशनचंद
१०. श्री. जाधव सुरेश मधुकर
११. श्री. मोकल चंदाराम विठोबा
१२. श्री वाघे श्यामु बाबु
१३. श्रीमती ससाणे लक्ष्मी रोहिदास

तर,

१. श्री. साधवानी मोहन रहंदोमल, २. श्रीमती मसंद माया घनश्यामदास हे अनुपस्थित होते.

सांयकाळी ५.०० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> आयुक्त साहेब, महापालिका सचिव श्री. कुकरेजा साहेब हे रजेवर असल्यामुळे आजच्या या सभेचे कामकाज चालविण्यासाठी एखादया अधिका—यास बसविले जावे.

<u>मा. आयुक्त श्री. रामनाथ सोनवणे :—</u> श्री. दुसाने साहेब, आजच्या सभेचे कामकाज चालविण्यासाठी प्रभारी सचिव म्हणून आपण बसा.

श्री. संजय दुसाने, उप–आयुक्त (कर) हे महापालिका सचिवांच्या स्थानी प्रभारी सचिव म्हणुन आसनस्थ झाले.

मा. प्रभारी सचिव :– विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १ :– मागील सभेचे दिनांक २५.४.२००५ चे इतिवृत्त कायम करणे.

मा. सभापती श्रीमती ज्योती कालानी :–मागील सभेचे दिनांक २५.४.२००५ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

मा. प्रभारी सचिव :–विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

विषय क्र. २ :–उल्हासनगर महानगरपालिकेतील मालमत्ता कर विभागासाठी प्रिन्टर पुरविणेकामी प्रशासनास निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

काही सदस्य :–पास–पास.......

मा. सभापती :– सदरचा विषय सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:

विषय क्र. २ :–उल्हासनगर महानगरपालिकेतील मालमत्ता कर विभागासाठी प्रिन्टर पुरविणेकामी प्रशासनास निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील मालमत्ता कर विभागात कर बिले /देयके, मागणी नोटिस व रजिस्टर, आकारणी रजिस्टर, थकबाकी रजिस्टर, हरकत रजिस्टर, वसुली रजिस्टर इत्यादींची छपाईची कामे केली जातात.

मालमत्ता कर विभागातील वर नमुद केलेल्या कामे लक्षात घेता एक १००० LMP, 132/136 column क्षमतेचा लाईन मॅट्रिक्स प्रिंन्टर, भारत सरकारने DGS & D किंवा CSPO द्वारा मंजुर केलेल्या कंपन्याद्वारा व त्यांच्या दराप्रमाणे खरेदी करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

उपकरणांची गुणवत्ता चाचणी DGS & D किंवा CSPO द्वारा प्रमाणित करण्यात येत असल्यामुळे त्यांच्याकडुन थेट खरेदी करण्यात वाजवी दर, प्रमाणीकता ही नक्की होत आहे. सदर खरेदी करिता अंदाजित खर्च रुपये २.६ लाख अपेक्षित आहे. व वित्तीय वर्ष २००५–२००६ च्या अंदाजपत्रकात A-3 (xi) मध्ये संगणक व संगणकीय साहित्य खरेदीसाठी रुपये ३० लाखाची तरतुद आहे.

वरील बाबी लक्षात घेता प्रशासनाला DGS & D किंवा CSPO मंजुर दराला त्यांच्या मान्यताप्राप्त कंपन्याकडुन मालमत्ता कर विभागासाठी १००० LPM, 132/136 column लाईन मॅट्रिक्स प्रिंटर खरेदी करण्याकरिता प्राधिकृत करण्यासाठी मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २ (२) अंतर्गत मंजुरीसाठी व लागणा–या अंदाजे खर्च रुपये २.६ लाख यास मान्यतेसाठीचा प्रस्ताव स्थायी समिती पटलावर सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ६ दिनांक:–३०/५/२००५

सुचकाचे नाव :– श्री. नथु सोनवणे

अनुमोदकाचे नाव :– श्री. संजय बठिजा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे मालमत्ता कर विभागासाठी १००० LPM,132/136 Column लाईन मॅट्रिक्स प्रिंन्टर पुरविणे कामी प्रशासनाला DGS & D किंवा CSPO द्वारा शासन मंजूर दराला किंवा त्यांच्या मान्यता प्राप्त कंपन्याशी निविदाशिवाय थेट संविदा करण्यास प्राधिकृत करित आहे. व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही:–
अनुमोदकाची सही:–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. प्रभारी सचिव :—विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. ३** :— उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांच्या सेप्टीक टॅकमधील मैला काढुन शहराबाहेर टाकणेकामी सध्या कार्यरत असलेला ठेकेदार मे. समर्थ केमीकल्स यांना पूर्वीच्या करारातील दराने अटी व शर्तीने निविदा परिमाणापेक्षा जास्त कामी प्रशासनाने केलेल्या निविदा शिवाय थेट संविदेस कायम करणे.

मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :— त्यांनी प्राकलनापेक्षा जास्त काम केले आहे काय? मागच्या वर्षी किती काम केले आहे? कोणत्या विभागात?

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :— मागच्या वेळेस त्यांनी किती काम केले?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—मागच्या वेळेस त्यांनी नेमुन दिलेल्या प्राकलनीय कामापेक्षा जास्त काम केले आहे. त्याची देयक रक्कम अदा करायची आहे.

मा. आयुक्त श्री. रामनाथ सोनवणे :—या कामाचे प्राकलन तयार केले होते. त्यावेळेस सेप्टीक टॅकची क्षमता किती आहे ती पकडली नव्हती. ब—याचशा ठिकाणी ब्रिटीश काळातील सार्वजनिक शौचालय आहेत. ही शौचालय ब—याच वर्षापुर्वीची असल्याने त्यांच्या सेप्टीक टॅक भरल्या होत्या.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :— ही जी सार्वजनिक शौचालये आहेत ती आपल्या कामाची नव्हती?

मा. आयुक्त श्री. आर.के. सोनवणे:— या ज्या सेप्टीक टॅक आहेत त्या बॅरेकच्या शौचालयांच्या आहेत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— या सार्वजनिक शौचालयांच्या सेप्टीक टॅकमधील मैला साफ करण्याचे काम ठेकेदारास दिले होते. काही लोकप्रतिनिधींनी त्यांच्या विभागातील सार्वजनिक शौचालयांच्या सेप्टीक टॅकमधील मैला साफ करुन घेणे कामी मागणी केल्यानुसार व प्रसासनाच्या सुचनेनुसार या ठेकेदाराने हे वाढीव काम केल्याने त्याची देयक रक्कम अदा करायची असल्याने त्यासाठी हा प्रस्ताव स्थायी समितीपुढे आणला आहे.

मा. सभापती :— सदरचा विषय सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

**प्रस्तावना**

विषय क्र. ३ :— उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांच्या सेप्टीक टॅकमधील मैला काढुन शहराबाहेर टाकणेकामी सध्या कार्यरत असलेला ठेकेदार मे. समर्थ केमीकल्स यांना पूर्वीच्या करारातील दराने अटी व शर्तीने निविदा परिमाणापेक्षा जास्त कामी प्रशासनाने केलेल्या निविदा शिवाय थेट संविदेस कायम करणे.

उपरोक्त कामासाठीची रुपये ५,५६,५६७/— एवढया किंमतीची निविदा मे. समर्थ केमिकल्स यांना देण्यात आली होती. सदरहू ठेकेदाराने निविदेनुसार कामाचे परिमाण पूर्ण केलेले आहे. तथापि सार्वजनिक शौचालयाच्या टाक्यांच्या मोठमोठया साईज, तसेच कामाच्या आवश्यकतेनुसार व लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार सदरहू ठेकेदाराने हे काम प्रशासनाच्या सुचनेनुसार चालु ठेवले होते. त्यामुळे निविदा परिमाणांपेक्षा जास्त काम (वाढीव परिमाण) झालेले आहे. या वाढीव कामांची प्रत्यक्ष मोजमापानुसार किंमत रुपये ४,४५,७३०/— एवढी आहे.

सदर ठेकेदाराने निविदा मर्यादिपक्षा वाढीव कामाचे देयक अदा करणेसाठी स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ७** **दिनांकः—३०/५/२००५**

सुचकाचे नाव :— श्री. सुरेश गायकवाड

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती रेखा कृष्णानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणामुळे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयाच्या सेप्टीक टॅंक मधील मैला काढून शहरा बाहेर टाकणेकामी सदया कार्यरत असलेला ठेकदार मे. समर्थ केमिकल्स यांच्याशी प्रशासनाच्या सूचनेवर पूर्वीच्या करारातील दराने, अटी व शर्तीने निविदा परिमाणापेक्षा जास्त कामी प्रशासनाने केलेल्या निविदाशिवाय थेट संविदेस कायम करित आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती /पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>**मा. प्रभारी सचिव :—**</u>विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

<u>**विषय क्र. ४:—**</u> कर्मचा—यांना गणवेष वाटप करणे कामी या शिर्षाखालील अनुदानातुन रुपये ५ लाखाची तरतूद नवीन जेस्टेटनर कॉपी प्रिंटर खरेदी करण्यासाठी अर्थसंकल्पीय अनुदानात वर्ग करण्याकामी महापालिकेस शिफारस करणे.

<u>**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—**</u> यासाठी रक्कम एका लेखा शिर्षातुन दुस—या लेखा शिर्षात वर्ग करावयाची आहे.

<u>**मा. सभापती :—**</u> सदरचा विषय सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

<u>**प्रस्तावना**</u>

<u>**विषय क्र. ४:—**</u> कर्मचा—यांना गणवेष वाटप करणे कामी या शिर्षाखालील अनुदानातुन रुपये ५ लाखाची तरतूद नवीन जेस्टेटनर कॉपी प्रिंटर खरेदी करण्यासाठी अर्थसंकल्पीय अनुदानात वर्ग करण्याकामी महापालिकेस शिफारस करणे.

उल्हासनगर महानगरपालिकेने आपले नागरी प्रशासन अधिकाधिक तत्पर व गतिमान बनविण्याचा निर्णय घेतला असून त्याचाच एक भाग म्हणून सचिव कार्यालयासाठी आय. एस. ओ. ९००१ —२००० प्रमाणपत्र प्राप्त करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून या कामीचे व्यवस्थापकिय आढावा समिती बैठकी मध्ये एक नविन जॅस्टेटर्नर प्रिंटर खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने मेसर्स जेस्ठेटनर इंडिया लिमिटेड मुंबई —०२८ या कंपनीकडुन जेस्ठेटनर कॉपी प्रिंटर (मॉडेल ५३०८) चे दरपत्रक प्राप्त झाले असून या मशिनची किंमत ४,३०,०००/— अधिक १० टक्के सेल्स टॅक्स रक्कम रुपये ४३००० /— अशी एकुण किंमत रुपये ४,७३,०००/— ( जकात व मुल्यवर्धीत करापोटी होणारी वाढ वगळून) असून महापालिकेकडे असलेले जुने प्रिंटर (मॉडेल ५३२३) कंपनीस परत

केल्यास त्यापोटी महापालिकेस मिळणारे रुपये ६०,०००/— वजा जाता नविन जेस्टनर प्रिंटर खरेदीसाठी महापालिकेंस रुपये ४,१३,०००/— (+ मुल्यवर्धीत कर) जेस्टनर कंपनीस अदा करावे लागतील.

परंतु वरील झेरॉक्स मशिन खरेदी करण्याकरीता महानगरपालिकेच्या सन २००५ —२००६ चे अर्थसंकल्पात अ—३ (प्प्) या लेखा शिर्षात फक्त रुपय २,००,०००/— रक्कमेची तरतुद असून नविन जेस्टनर प्रिंटर खरेदीसाठी ही रक्कम पुरेशी नसल्याने या खर्चा कामी अब. अ २ (टप्प्) कर्मचा—यांना गणवेश , रेनकोट , चप्पल, छत्री इत्यादी साहित्य पुरविणे. या लेखा शिर्षाखाली असलेल्या तरतूद ६५ लक्ष मधून रुपये ५,००,०००/— इतकी तरतूद नविन जेस्टनर प्रिंटर खरेदीसाठी वर्ग करावी लागेल.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ७ मधील २ नुसार कोणतीही रक्कम एका अर्थसंकल्पीय अनुदानाच्या शिर्षातुन दुस—या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या शिर्षात बदली करण्याची तरतुद आहे.

त्यानुसार सदर रक्कम एका लेखा शिर्षातुन दुस—या लेखा शिर्षात बदली करण्यासाठी महासभेच्या शिफारस करण्यासाठी स्थायी समितीपुढे ठेवण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ८** दिनांकः—३०/५/२००५

सुचकाचे नाव :— श्री. वाघे शामु

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती संगिता जावळे

ही स्थायी समिती महासभेच्या मंजूरी अधिन राहून कर्मचा—यांना गणवेश वाटप करणेकामी या शिर्षाखालील अनुदानातून रु.५ लाखाची तरतूद नवीन जेस्टेटनर कॉपी प्रिन्टर खरेदी करण्यासाठी अर्थसंकल्पीय अनुदानात बदल करण्यास महासभेस शिफारस करित आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती /पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. प्रभारी सचिव :—</u>विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

**विषय क्र.** ५ :— महासभेच्या व शासनाच्या मंजूरीस अधिन राहून महापालिका आस्थापनेवर पर्यावरण संवर्धन अधिकारी या पद निर्मितीस मान्यता देणे व शासन मंजुरी प्रलंबित असे पर्यंत एका वर्षासाठी करारतत्वावर रुपये १०,०००/— इतक्या ठोक वेतनावर योग्य व्यक्तीच्या नेमणूकीस मान्यता देणे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>आयुक्त साहेब या विषयाबाबत आम्हांला जरा सविस्तर माहिती दया.

<u>मा. आयुक्त श्री. आर.के. सोनवणे :—</u> आपणाकडे पर्यावरण संवर्धनासाठी कुणी अधिकारी उपलब्ध नाही. आयुक्तांस प्रत्येक वर्षी पर्यावरण स्थिती दर्शक अहवाल तयार करुन महासभेपुढे ठेवावा लागतो. ही आयुक्तांची जबाबदारी आहे. परंतु या कामी आपल्या महापालिकेत योग्य असा कुणी अधिकारी उपलब्ध नाही. आमच्याकडे जे तांत्रिक अधिकारी आहेत त्यांना पर्यावरण स्थिती विषयक काही ज्ञान नाही. आम्हांला कृती आराखडा तयार करावयाचा आहे. त्यासाठी वृक्ष संवर्धन अधिकारी हे पद महापालिका अस्थापनेवर निर्माण करावयाचे आहे. स्थायी समितीने या पदनिर्मितीस मंजुरी दिल्यानंतर ते मंजुरीसाठी महासभेपुढे राज्य शासनाकडे

पाठवावे लागेल. यास मंजुरी मिळेपर्यंत एक वर्षाचा  कालावधी लागण्याची शक्यता असल्याने या पदावर एक वर्षासाठी करारतत्वावर ठोक पगारावर वृक्ष संवर्धन अधिका–याची नेमणुक करण्यासाठी प्रस्ताव ठेवला आहे.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :– या पदाबाबत वर्तमानपत्रामध्ये जाहिरात दिली असली तर होवू शकते १० हजार पेक्षा कमी पगारावर आपणांस लायक असा माणुस उपलब्ध झाला असता.  कमी पगारावर जर एखादा माणुस मिळत असेल तर काय हरकत आहे?

मा. आयुक्त श्री. आर.के. सोनवणे :– परंतु त्या अगोदर पदनिर्मीतीस मंजुरी दयायची आहे.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :– महिन्याला १० हजार रुपये ठोक पगारावर नियुक्ती करावयाची आहे असे या प्रस्तावामध्ये लिहिले आहे.  त्यापेक्षा कमी पगारावर लायक अधिकारी जर मिळू शकत असेल तर ?

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :– प्रतिमहा रुपये १० हजार पगाराची रक्कम ही किमान रक्कम आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– या प्रस्तावास स्थायी समितीने मंजुरी दिल्यानंतर तो महासभेपूढे जाईल आणि त्यानंतर तो राज्य शासनाकडे जाईल.  शासनाकडुन प्रस्ताव मंजुर होवून येईपर्यंत बराचशा कालावधी लागणार आहे.

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :– वृक्ष संवर्धन या अधिका–याची नेमणुक केल्यानंतर त्यास एखादा लिपिक लागेल, शिपाई लागेल.  त्याबाबतचा प्रस्ताव आपण येथे ठेवला नाहीत.  हे कर्मचारी आपण कोठुन पुरविणार?

मा. आयुक्त श्री. आर.के. सोनवणे :– हे कर्मचारी आम्ही आमच्याकडे उपलब्ध असलेल्या कर्मचा–यांमधुन पुरवु.

मा. सभापती :– दोन–तीन दिवसापुर्वी मी प्रभाग समितीच्या सभेसाठी गेले होते.  तेथे आपल्या महापालिकेचे एवढे काही कर्मचारी बसले होते की, ते पाहुन असे वाटत होते की, येथे एखादा मोर्चा वगैरे आला आहे की काय? त्या कर्मचा–यांना तेथे काही काम नव्हते ते नुसतेच तेथे बसुन होते.

मा. आयुक्त श्री. आर.के. सोनवणे :– त्या कर्मचा–यांना तेथे काम आहे.  अनाधिकृत बांधकामे निष्कासित करण्या कामी त्यांना पाठवायचे असल्याने त्यांना तेथे बसवुन ठेवले होते.

मा. सभापती :– सदरचा विषय सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

विषय क्र. ५ :– महासभेच्या व शासनाच्या मंजूरीस अधिन राहून महापालिका आस्थापनेवर पर्यावरण संवर्धन अधिकारी या पद निर्मितीस मान्यता देणे व शासन मंजुरी प्रलंबित असे पर्यंत एका वर्षासाठी करारतत्वावर रुपये १०,०००/– इतक्या ठोक वेतनावर योग्य व्यक्तीच्या नेमणूकीस मान्यता देणे.

उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये एकूण ९२ संवर्ग आहेत.  परंतु, पर्यावरण संवर्धन अधिकारी हे पद मंजुर नाही वा तसे पद शासनाकडे मंजूरीसाठी प्रस्तावित केलेले नाही.  त्यामुळे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील पर्यावरण विषयक अहवाल तयार करण्यासाठी व त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे यासाठी दिनांक १८ जून, २००४ पासून समन्वयक म्हणून श्री. मोहन एस. चिजवानी, सेवानिवृत्त शहर अभियंता यांची ०६ महिन्यांकरीता नियुक्ती करण्यात आली होती.  परंतु, प्रशासकिय कारणास्तव सदर पद पुढे चालू ठेवता येत नसल्यामुळे सदर पदाची सेवा संपृष्टात आणण्यात आली आहे.

सध्या महापालिकेच्या वेगवेगळया विभागांतर्गत पर्यावरणविषयक संबंधित पुढील कामे पाहण्यासाठी पर्यावरणविषयक माहिती असलेला अधिकारी नियुक्त करणे आवश्यक आहे.

पर्यावरण विषयक बाबी.

घनकचरा व्यवस्थापन विषयक बाबी (म्युनिसिपल सॉलिड वेस्ट)
बायोमेडिकल वेस्ट / प्लॅस्टिक वेस्ट
घरगुती सांडपाण्याचे शुध्दीकरण
वालधुनी नाल्याचे शुध्दीकरण
वायु प्रदुषण

सध्या महापालिकेची लोकसंख्या अंदाजे ६ लक्षपेक्षा अधिक आहे. शहरातील दररोज निघणारा २७० टन घनकचरा उचलणे व त्यावर वैज्ञानिकरित्या प्रक्रिया करणे, शहरातील प्लॅस्टीकची योग्य रितीने विल्हेवाट लावणे, सांडपाण्याचे शुध्दीकरण करणे, शहरातील वस्तीच्या ठिकाणचे, औद्योगिक क्षेत्रातील हवेचे नमुने घेणे त्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये पर्यावरण कक्ष निर्माण करण्यात आला आहे. परंतु सदर कामासाठी पर्यावरणविषयक ज्ञान असलेल्या अधिका—याचे पद मंजुर नसल्यामुळे पर्यावरणविषयक अधिका—याची नियुक्ती करता येत नाही. त्यासाठी प्रथम श्रेणीतील पद निर्माण करणे आवश्यक आहे.

ही बाब विचारात घेऊन रुपये ८०००—२७५—१३५०० या वेतनश्रेणीतील उप अभियंता संवर्गातील मंजूर रिक्त पदांपैकी एक पद व्यपगत करुन पर्यावरण संवर्धन अधिकारी या पदनामाचे पद महापालिकेच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात यावे. सदर पद एकाकी असल्यामुळे सरळसेवेने भरण्यात यावे. सदर पदासाठी शैक्षणिक अर्हता पुढीलप्रमाणे ठेवण्यात यावी.
मान्यताप्राप्त विद्यापिठाची बी.एस्सी. पर्यावरण विषयासह पदव्युत्तर पदवी किंवा बी.ई. पर्यावरण पदवी परिक्षा उत्तीर्ण. पदव्युत्तर पदवीधारकास प्राधान्य.
शासकीय / निमशासकीय कार्यालयातील पर्यावरणविषयक कामाचा ०३ वर्षाचा अनुभव.
महापालिका सेवेत काम करीत असलेल्या कर्मचा—याव्यक्तीरिक्त अन्य उमेदवाराचे वय ४० पेक्षा अधिक असू नये.

सदर पदाची महापालिकेला आवश्यकता असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ५१ खाली असलेल्या तरतुदीनुसार 'पर्यावरण संवर्धन अधिकारी' या पदनामाचे पद निर्माण करण्यात यावे. सदर पद निर्मितीस शासनाची मंजुरी मिळण्यास काही कालावधी लागणार असल्याने व सदर पदाची आवश्यकता विचारात घेता सदर पद ०१ वर्षासाठी करार तत्वावर रुपये १००००/— इतक्या ठोक वेतनावर भरण्यात यावे. या प्रस्तावास स्थायी समितीने महासभेस शिफारस करण्यासाठी स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यात यावे.

**स्थायी समिती ठराव क्र. ९** **दिनांक:—३०/५/२००५**

सुचकाचे नाव :— श्री. गणपत एडके

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुरेश गायकवाड

ही स्थायी समिती महापालिकेच्या व शासनाच्या मंजूरीच्या अधिन राहून महापालिका अस्थापनेवर पर्यावरण संवर्धन अधिकारी या पद निर्मीतीस मान्यता देत आहे. व शासन मंजूरी प्रलंबित रु.१०,०००/—दर महा इतक्या ठोक पगारावर योग्य व्यक्तीच्या नेमणूकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती /पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**<u>मा. प्रभारी सचिव :—</u>**विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. ६ :–** उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ६ विविध कामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u>या प्रस्तावामध्ये हे नाही लिहिले की, हे काम कोणत्या निधीतुन करणार आहात?

<u>मा. आयुक्त श्री. आर.के. सोनवणे :–</u>हा प्रस्ताव प्रशासकिय व वित्तीय मंजुरीसाठी स्थायी समितीपुढे ठेवला आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> परंतु ही कामे कोणत्या निधीतुन करावयाची आहेत ते लिहिले नाही जसे की– महापौर निधी, उपमहापौर निधी...........

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :–</u>गरीब नगर या एका नगरमध्ये ४ सार्वजनिक शौचालये प्रस्तावित केली आहेत.

<u>मा. आयुक्त श्री. आर.के. सोनवणे :–</u> त्या विभागातील नागरीकांनी मागणी केली असेल म्हणून ...........

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :–</u>आम्ही लोकांनी आमच्या प्रभागात सार्वजनिक शौचालयांची मागणी केली होती. इंदिरा नगरसाठी सार्वजनिक शौचालयाची आम्ही मागणी केली होती. आमच्या प्रभागातील सार्वजनिक शौचालयाचा प्रस्ताव न ठेवता गरीब नगर या एका वस्तीमध्ये ४–४ शौचालय बांधण्याचा प्रस्ताव मंजुरीस आणता.

<u>मा. आयुक्त श्री. आर. के. सोनवणे :–</u> या प्रस्तावास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळाल्यानंतर या कामांच्या निविदा काढल्या जातील. नाहीतर या कामाचे प्रस्ताव डी.डी.आर.कडे पाठविले जातील.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> या अगोदरचे कामे झाले नाहीत हि तरी होतील किंवा नाही हे आपल्यावर अवलंबून आहे. कार्यसुचीवरील पुढील विषय क्र. ९ व १० चे जे प्रस्ताव आहेत त्यामध्ये ही कामे कोणत्या निधीतून करायची आहेत ते लिहिले आहे. परंतु फक्त या प्रस्तावामध्ये हे काम कोणत्या निधीतून करावयाचे आहे ते लिहिलेले नाही.

<u>मा. आयुक्त श्री. आर.के. सोनवणे :–</u> पास करणे आपले काम आहे. प्रस्ताव पारीत करणे आपणांवर अवलंबुन आहे. आपण प्रस्ताव पारीत केला तर कामे होतील नाही तर नाही.

<u>मा. सभापती :–</u> एकाच प्रभागामध्ये ४–४ सार्वजनिक शौचालयाची कामे प्रस्तावित केली आहेत. आमच्या प्रभागामध्ये एकाही सार्वजनिक शौचालयाचे काम प्रस्तावित केले नाही.

<u>मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :–</u> एकाच प्रभागातील ४–४ शौचालयांची कामे प्रस्तावित केली आहेत. म्हणुन आम्ही बोलत आहोत.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :–</u>गरीब नगर मधील प्रस्तावित केलेल्या ४ कामांपैकी एक काम सार्वजनिक शौचालयाच्या दुरुस्तीचे आहे तर ३ कामे नविन सार्वजनिक शौचालयाबाबतची आहेत.

<u>शहर अभियंता श्री. जाधव :–</u> ही कामे महापालिका निधीतुन करावयाची आहेत.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :–</u> या प्रस्तावास मंजुरी दिली जावी हे अतिशय आवश्यक असे काम आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> आम्ही कुठे विरोध करीत आहोत.

मा. सभापती :–माझ्या पॅनेल क्र. ४ मध्ये सार्वजनिक शौचालयाची एवढी दुर्दशा झाली आहे की, त्याबाबत शिष्ट मंडळे घेवून लोक माझ्याकडे येवून बसतात.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :– उल्हासनगर कॅम्प नं. १ ते ५ मध्ये कुठेही सार्वजनिक शौचालयाचे काम असो सार्वजनिक शौचालयाबरोबर तेथे मुतारी असली तर अधिक चांगले होईल.

मा. सभापती :– निवासी क्षेत्रामधील सार्वजनिक शौचालयांची स्थिती अतिशय खराब आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– मा. सभापती महोदया, यांचे म्हणणे आहे की, माझ्या प्रभागात सुध्दा एका सार्वजनिक शौचालयाची आवश्यकता आहे, त्याचबरोबर माझ्या प्रभागात गायकवाड पाडा येथे सुध्दा एका सार्वजनिक शौचालयाची आवश्यकता आहे.

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :– माझ्या प्रभागात इंदिरा नगर येथे एका सार्वजनिक शौचालयाची आवश्यकता आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– या प्रस्तावामध्ये असे लिहिले आहे की, कनिष्ठ अभियंता व उपअभियंता यांनी प्रत्यक्ष जागेवर जावुन पाहणी करुन प्राकलन तयार केले आहे. त्यानुसार तेथे जशी सार्वजनिक शौचालयाची आवश्यकता आहे त्याप्रमाणे आमच्या प्रभागात सुध्दा सार्वजनिक शौचालयाची आवश्यकता आहे.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :– मागच्या वेळेस पवई चौक येथे सार्वजनिक शौचालय बांधणे कामी मंजुरी दिली आहे. सार्वजनिक शौचालयांबाबत आमचा काही विरोध नाही आहे.

मा. सदस्य श्री. गणपत एडके :– माझ्या प्रभागात सुध्दा सार्वजनिक शौचालयाची अत्यंत आवश्यकता आहे.

मा. सभापती :– आपण अर्ज दया. म्हाडा कडुन जो निधी प्राप्त होतो त्यातुन आपल्या प्रभागात सार्वजनिक शौचालय बांधण्यास मंजुरी देता येईल.

मा. सदस्य श्री. गणपत एडके :– माझ्या प्रभागात सार्वजनिक शौचालय नसल्यामुळे काही लोक कंपाउंड वॉलच्या मागे शौचास जातात म्हणून काही दिवसापुर्वी तेथिल वॉचमनने १०–१५ लोकांना मारझोड केली.

मा. सभापती :– सार्वजनिक शौचालयाबाबत आपण अर्ज दया. म्हाडाकडुन जो निधी येतो त्यातुन आपल्या प्रभागात सार्वजनिक शौचालया बांधण्याचा प्रस्ताव घेता येईल.

मा. आयुक्त श्री. आर.के. सोनवणे :– म्हाडा, दुर्बल घटक किंवा महापालिका निधी यापैकी एखादया निधीतुन आपल्या प्रभागामध्ये सार्वजनिक शौचालय बांधण्याचा प्रस्ताव ठेवता येईल.

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :– इंदिरा नगरमध्ये सार्वजनिक शौचालयाची अतिशय आवश्यकता आहे.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :– सभापती महोदया, दुनिचंद कालानी कॉलेजच्या समोर जेथे आपण नेहमी जात येत असतात, तेथे सुध्दा सार्वजनिक शौचालयाची अतिशय आवश्यकता आहे. श्री. जवादे साहेब, या ठिकाणाकडे आपण विशेष करुन लक्ष दयावे.

मा. सभापती :– सदरचा विषय सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

विषय क्र. ६ :– उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ६ विविध

कामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेले दोन कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतुद ठेवलेल्या सन २००४–२००५ च्या निधितून काम करण्यास प्राकलने तयार केलेली आहे.

| अ. क्र. | कामांचे नाव | प्राकलनिय किंमत |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर–२, गरीब नगर मध्ये लिंबाजी पवार यांचे घराजवळ १० बैठकीचे शौचालय बांधणेबाबत. | ४,३१,८००/– |
| २. | उल्हासनगर–२ वार्ड नं. ६ येथिल गरीबनगर झाोपडपट्टीतील लिंबा पवार यांच्या घराजवळील मोडकळीस आलेल्या शौचालयाचे नुतनीकरण करणे बाबत. | ३,२३,१२०/– |
| ३. | उल्हासनगर–३ गरीबनगर येथिल मधू घोरपडे यांच्या घराशेजारील शौचालय बनविणेबाबत. | ४,९६,८००/– |
| ४. | गरीबनगर येथिल पांडुरंग कांबळे यांच्या घराशेजारील १० सिटचे शौचालय बनविणे. | ४,९६,८००/– |
| ५. | वुडलॅंड कॉम्पलेक्स या इमारतीत तिस–या मजल्यावर शाळा क्र. २७ स्थलांतरीत करण्याकरीता खोल्या तयार करणेबाबत. | १०,६२,०००/– |
| ६. | प्रभाग क्र. १७ मधील श्रीरामनगर पुनम लॉज ते बापू सावंत यांच्या घरापर्यंत एम २५० रोड व नाली बनविणे बाबत. | ३,४७,६४०/– |

उपरोक्त नमुद केलेल्या कामाच्या जागेवर जाऊन कनिष्ठ अभियंता व उप–अभियंता यांनी पहाणी करुन सदर प्राकलन तयार केले आहे. तरी सदर काम करुन घेण्यासाठी प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळण्याकरीता स्थायी समिती सभेपूढे ठेवण्याकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. १०** **दिनांकः**–३०/५/२००५

सुचकाचे नाव :– श्री. संजय बठिजा

अनुमोदकाचे नाव :– श्री. नथु सोनवणे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गतचे ६ विविध कामीचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

सभापती /पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. प्रभारी सचिव :–**विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

**विषय क्र.** ७ :– महापालिकेत असलेला तोशिबा इ स्टृडिओ–१६० या प्रिंटर कॉपीयर मशिनसाठी साहित्य, देखभाल व दुरुस्तीकामी प्रशासनास मे. एचसीएल इनफिट लिमिटेड यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–**पास–पास........

मा. सभापती :— सदरचा विषय सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

विषय क्र. ७ :— महापालिकेत असलेला तोशिबा इ स्टृडिओ—१६० या प्रिंटर कॉपीयर मशिनसाठी साहित्य, देखभाल व दुरुस्तीकामी प्रशासनास मे. एचसीएल इनफिट लिमिटेड यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस, प्राधिकृत करणे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील विविध विभागात एकूण पाच तोशिबा इ—स्टुडियो— १६० या प्रिंटर कॉपीयर मशिन्स घेण्यात आलेले आहे. सदर मशीन ही M/s HCL Infint LTd. या उत्पादक / वितरक कंपनीकडून घेण्यात आलेले आहे. सदर कंपनीने या पाच मशीनसाठी C.S.M.S. (Comprehensive Service Maintenace Contract) करणेबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेत दिलेला आहे. या आधी महानगरपालिकेमार्फत सदर मशिनसाठी टोनर /लॅम्प/ड्रम किट / हिटर किट इ. Consumbales विकत घेण्यात येत होते. सदर Consumables विकत घेवून महानगरपालिकेमार्फत मशिन्य वापरल्यानंतर प्रति पान खर्च रुपये ०.५८७९ इतकी येत आहे. याचे सविस्तर कॅलक्युलेशन्स खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Item Description | Cost | Yield | Cost per page |
|---|---|---|---|---|
| 1. | Toner | Rs. 1,903.61 Dealer cost (Rs. 1,400.00 as per annual Tender of UMC) | 5,500 Copies | Rs. 0.254 |
| 2. | Drum | Rs. 3,244.00 | 60,000 Copies | Rs. 0.054 |
| 3. | Blade | Rs. 1,081.00 | 60,000 Copies | Rs. 0.0180 |
| 4. | Developer | Rs. 3,785.00 | 60,000 Copies | Rs. 0.0630 |
| 5. | Pressure Roller | Rs. 7,030.40 | 1,00,000 Copies | Rs. 0.0703 |
| 6. | Heat Roller | Rs. 4,218.00 | 1,00,000 Copies | Rs. 0.0421 |
| 7. | Lamp | Rs. 20,442.24 | 10,00,000 Copies | Rs. 0.0204 |
| 8. | AMC Contract per Year | Rs. 6,612.00 per machine | 1,00,000 Copies | Rs. 0.0661 |
| Total | | | | Rs. 0.5879 |

कंपनीने दिलेल्या C.S.M.S. (Comprehensive Service Maintenace Contract) नुसार टोनर/ड्रम/ड्रम किट /ब्लेड/डेंव्हलपर/प्रेशर रोलर/हिट रोलर/लॅम्प या सर्वांचा खर्च कंपनी मार्फत होणार असून कंपनीने रुपये ०.४३५५ इतका दर प्रति पेज दिलेला आहे. याचे सविस्तर कॅलक्युलेशन्स खालीलप्रमाणे आहे.

१) प्रति पेल प्रिंट कॉपीचा खर्च रुपये —— ०.३८
२) सर्व्हिस टॅक्स —— १०.२ :
३) वर्क कॉन्ट्रॅक्ट —— ४ :

एकूण ०.४३५५

वरीलप्रमाणे कंपनीने दिलेला दर लक्षात घेता महानगरपालिकेची प्रती पेज रुपये ०.१५२४ इतकी बचत होणार आहे. त्याचप्रमाणे टोनर/ड्रम/ड्रम किट /ब्लेड/डेंव्हलपर/प्रेशर रोलर/हिट रोलर/लॅम्प इ. चा संपुर्ण खर्च कपंनी मार्फत होणार आहे.

वरील प्रमाणे M/s HCL Infint LTd. यांच्याशी तोशिबा इ–स्टुडिओ–१६० या प्रिंटर कॉपीयर याबाबत C.S.M.S. (Comprehensive Service Maintenace Contract) हे महानगरपालिकेच्या दृष्टीने तांत्रिक व आर्थिक दृष्टया फायदेशीर होणार आहे. याप्रमाणे पाच ही विभागातील प्रिंटींग / कॉपीयर याचा लोड विचारात घेता रुपये १,७५,०००/– इतका खर्च अपेक्षित आहे.

वरील बाबी लक्षात घेता प्रशासनाला डध्े भ्ब्स् प्दपिदज स्ज्कण यांच्याकडुन C.S.M.S. (Comprehensive Service Maintenace Contract) करण्याकरीता प्राधिकृत करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २ (२) अन्वये मंजुरीसाठी लागणा–या अंदाजित खर्च रुपये १,७५,०००/– मान्यतेसाठीचा प्रस्ताव स्थायी समिती पटलावर सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ११** **दिनांकः– ३०.५.२००५**

सुचकाचे नाव :– श्री. राजु जग्याशी

अनुमोदकाचे नाव :– श्री. गणपत एडके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणामुळे महापालिकेत असलेल्या तोशिबा इ स्टृडिओ–१६० या प्रिंटर कॉपीयर मशिनसाठी साहित्य देखभाल व दुरुस्ती कामी प्रशासनास मे. एचसीएल इंनफिनिट लिमिटेड, यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे. व अंतर्भूत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

सभापती /पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. प्रभारी सचिव :–</u>विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. ८ :–** महानगरपालिकने परवाना दिलेल्या फेरीधारकाकडुन दैनिक शुल्क वसुली व दंडनीय शुल्क वसुली करणे कामी दुस–या क्रमांकावरील निविदाकार मे. जय साईराम इन्टरप्रायझेस यांचेशी संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u>पास–पास.......

<u>मा. सभापती :–</u> सदरचा विषय सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना</u>

<u>विषय क्र. ८ :–</u> महानगरपालिकने परवाना दिलेल्या फेरीधारकाकडुन दैनिक शुल्क वसुली व दंडनीय शुल्क वसुली करणे कामी दुस–या क्रमांकावरील निविदाकार मे. जय साईराम इन्टरप्रायझेस यांचेशी संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

महानगरपालिकेने परवाना दिलेल्या फेरीधारकांकडुन दैनिक शुल्क वसुली व दंडनिय शुल्क वसुली करणेकामी अभिकत्र नेमणुकी बाबत, दैनिक सकाळ व दैनिक लोकमत या वृत्तपत्रांमध्ये दिनांक ८/३/२००५ रोजी निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आलेली होती. या निविदेस अनुसरुन अंतिम दिनांकापर्यंत खालीलप्रमाणे एकुण ७ मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्या ज्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

मे. ईगल कन्स्ट्रक्शन कंपनी
नवी मुंबई ओटो ट्रेडर्स
कुमार इंटरप्रायझेस
जय साईराम इंटरप्रायझेस
सुयश इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि.
जय अंबे कन्स्ट्रक्शन
श्रीम. इंदिरा गांधी मागासवर्गीय संस्था

सदर प्राप्त मोहोरबंद निविदा उपस्थित निविदाधारक तसेच मा. उप–आयुक्त (शहर) , मा. लेखा परिक्षक, मा. मुख्य लेखा परीक्षक, मा. मालमत्ता व्यवस्थापक यांचे समक्ष दिनांक ४/४/२००५ रोजी सकाळी ११.३० वाजता उघडण्यात आल्या.

निविदा सुचनेतील अटी व शर्तीनुसार प्रथमत: निविदाकारांनी सादर केलेले लखोटा क्र. १ उघडण्यात आले. व त्याचा छाननी अहवाल सोबत माहितीस्तव सादर केलेला आहे.

वरीलपैकी श्रीम. इंदिरा गांधी मागासवर्गीय संस्था, ठाणे या संस्थेच्या दोन्ही लखोटयांवर कोणतेही निर्देश नसल्याने सदर संस्थेची निविदा अपात्र ठरवून उघडण्यात आलेली नाही. ती सर्वांसमक्ष मोहोरबंद करुन ठेवण्यात आली.

उर्वरीत निविदांपैकी सोबत जोडलेल्या तुलनात्मक तक्त्यात निविदाकारांनी निविदेत टक्केवारी नमुद केली आहे. त्यापैकी मे. ईगल कन्स्ट्रक्शन कंपनीने एकुण अपेक्षित दैनिक शुल्क वसुली ८५ टक्के व अपेक्षित दंडनीय शुल्क वसुली ८५ टक्के अशी निविदा सादर केली आहे. इतर निविदाधारकांनी नमुद केलेल्या टक्केवारीपेक्षा त्यांची निविदा टक्केवारी जास्त असलेने मे. ईगल कन्स्ट्रक्शन कंपनी, उल्हासनगर यांची अभिकर्ता म्हणुन नियुक्ती करणेसाठी कार्यालयीन शिफारस करण्यात आलेली होती.

तथापि, मे. ईगल कन्स्ट्रक्शन कंपनी, यांचेकडील दिनांक ५/५/२००५ चे पत्रान्वये मे. ईगल कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी सादर केलेली निविदा चुकीने जादा दराने भरणा केलेली असल्याचे नमुद करुन त्यांची निचिदा ऑफर मागे घेत असलेबाबत कळविलेले आहे. व त्यांची बयाणा रक्कम परत करणेंची विनंती केलेली आहे. निविदा प्रपत्रातील अट क्र. ३.३.५ नुसार निविदा सादर केल्यानंतर निविदाधारकाने आपली निविदा मागे घेतल्यास किंवा तसे कळविल्यास संबंधीत निविदाधारकाने भरणा केलेली बयाणा रक्कम जप्त करण्याची तरतुद आहे. त्यामुळे संबंधीत निविदाधारकाची बयाणा रक्कम ही परत करता येणार नाही. त्यामुळे मे. ईगल कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी भरणा केलेली बयाणा रक्कम जप्त करुन महानगरपालिका निधित जमा करणेस२ मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच ईगल कन्स्ट्रक्शन कंपनीतर्फे श्री. उध्दव एम. रुपचंदानी यांनी समक्ष कार्यालयात येवुन सदरचे पत्र त्यांनीच सादर केल्याबाबत पत्रावर पुन्हा स्वाक्षरी केलेली आहे.

या टेंडरकामी एकुण ६ निविदाकारांचे देकार उघडण्यात आलेले असून दुस–या क्रमांकाचा देकार जय साईराम इंटरप्रायझेस यांचा अपेक्षित दैनिक शुल्काच्या ८५ टक्के व अपेक्षित दंडनीय शुल्काच्या ५० टक्के एवढा आहे. प्रथम क्रमांकाच्या सर्वोच्च निविदाकाराने आपली निविदा मागे घेतल्याने या कामी दुस–या क्रमांकाच्या निविदाधारकांस बोलावून तो सर्वोच्च दाने हे काम करण्यात तयार आहे किंवा कसे? यासाठी जय साईराम इन्टरप्रायेझेस यांना दिनांक १०/५/२००५ रोजी चर्चेसाठी बोलविणेत आले होते. त्यावेळी त्यांनी लेखी पत्रान्वये यापुर्वी निविदेसाठी मे. ईगल कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी नमुद केलेले दराने म्हणजेच एकुण अपेक्षित दैनिक शुल्क वसुली ८५ टक्के व अपेक्षित दंडनिय शुल्क वसुली ८५ टक्के प्रमाणे हे काम करण्यास तयार असल्याचे कळविलेले आहे. त्यामुळे सर्वाधिक बोली रक्कमेप्रमाणे दुस–या क्रमांकावरील निविदाकार जय साईराम इंटरप्रायझेस यांचे दर स्विकृत करण्यात आले असुन त्यांच्याशी संविदा करण्यास प्राधिकृत करण्यासाठी प्रस्ताव स्थायी समितीपुढे ठेवण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. १२** दिनांक:–३०/५/२००५

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. सुरेश गायकवाड

ही स्थायी समिती वरील प्रस्तावानेत नमुद केलेल्या कारणांमुळे महापालिकेने परवाना दिलेल्या फेरी धारकांकडून दैनिक शुल्क वसूली व दंडनिय शुल्क वसूली करणेकामी प्रशासनास दुस–या क्रमांकावरील निविदाकार मे.जय साईराम इंटरप्रायझेस संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती /पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. प्रभारी सचिव :–विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ९ :– उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत २९ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

काही सदस्य :–पास–पास.......

मा. सभापती :– सदरचा विषय सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

विषय क्र. ९ :– उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत २९ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् २००४–२००५ च्या निधीतून मा. नगरसेवक यांनी कामे करणेसाठी विनंती केलेली आहे.

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर– येथील प्र क्र. २ बॅ नं. १९, २०, २१ जवळ सी सी एम –२५० ने रस्ता बांधणे व नाली बांधणे (नगरसेवक निधी ९४७) | १९९५००/– | २४.२.०५ | मे प्रतिभा म. का. सोसा. |
| २ | उल्हासनगर–१ येथील बॅ नं २९९, ३०० ते ३०६, २७८, २७९, २८६ डी के अपार्टमेंट समोर गार्डन मागे सी सी एम–२५० व नाली बांधणे. प्रभाग क्र. ५ (नगरसेवक निधी ७९०) | १९९८७५/– | १९.२.०५ | मे स्वराज म. का. सोसा. |
| ३ | उल्हासनगर–२ पॅनेज नं ५, फौजदार यादव, राजवती पाल ते निर्मल डायवर पर्यत मिठाईलाल यादव, जोगेंद्र मिस्त्री , राजेश मौर्य यांच्या जवळ सी सी व नाल्या | १९९१५०/– | १९.२.०५ | मे रिफ्युजी म. का. सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | बांधणे (हनुमाननगर)(नगरसेवक निधी ८०३) | | | |
| ४ | उल्हासनगर–२ प्रभाग क्र. २९, बॅ नं ७२, ६४, ६५, ३६ येथील ठिकाणी सी सी पायवाट व नाली बनविणे (नगरसेवक निधी १२४९) | २०००००/– | १९.२.०५ | मे ओम म. का. सोसा. |
| ५ | उल्हासनगर–१ प्रभाग क्र. २ बॅ नं ३९० ते ३९१ साईनाथ कॉलनी जवळ सी सी एम–२५० रोड बनविणे (नगरसेवक निधी १३०६) | १९९७००/– | १९.२.०५ | मे अलका म. का. सोसा. |
| ६ | उल्हासनगर–३ वार्ड ३५ येथील दसरा मैदान येथील बगीच्यामध्ये पेवर ब्लॉक बसविणे (नगरसवेक निधी १३४६) | १९९९००/– | १९.२.०५ | मे हरे रामा म. का. सोसा. |
| ७ | उल्हासनगर–५ येथील गोपी कॉलोनी पॅनल क्रमांक १३ येथे नाला बांधणे (गलिच्छ वस्ती १३२९) | १९९९००/– | २८.२.०५ | मे सुर्य ज्योत म. का. सोसा |
| ८ | उल्हासनगर–४ येथील प्रभाग क्र. १३ मधील स्वामी बोधराम उद्यानात परिसरातील सी सी एम २५० ने रस्ता बनविणे. (महापालिका निधी १३३३) | १९९८५०/– | २८.२.०५ | मे मधू सुदन म. का.सोसा. |
| ९ | उल्हासनगर–५ येथील प्रभाग क्र. १३ मधील गोकूलनगर मध्ये नाल्याची दुरूस्ती करणे. (गलिच्छ वस्ती निधी १३५४) | १०००००/– | २८.२.०५ | मे. लुनंगदेव म का सोसा |
| १० | उल्हासनगर–४ प्रभाग क्र १८ मध्ये शाळा नं १४ च्या मागे गाडे गरूजी उलहसनगर पगारे व मुमताज यांचे घराजवळ सी सी पॅसेज व नाली बनविणे (नगरसेवक निधी १३४२) | ९८३००/– | ८.३.०५ | मे माजी सैनिक म का. सोसा |
| | | | | |
| ११ | उल्हासनगर–४ येथील प्रभाग क्र. ९ मधील डिफेन्सा कॉलनी येथे जसवंती किराणा स्टोअर्स व रामजी आंबेडकर नगर मधील प्रिया म्हस्के यांच्या घरापासून ते मुकादम यांच्या घरापर्यंत सी सी पायवाट बांधणे (नगरसेवक निधी १३६४) | १०००००/– | ५.३.०५ | मे मधुसुदन म. का. सोसा |
| १२ | उल्हासनगर–५ प्रभाग क्रमांक १५ मधील वाल्मीकीनगर येथे महापौर निधितून सी सी पायवाटा, नाली व चेकर्स टाईल्सचे काम करणे. (मा. माहपौर निधी १३६५) | ९८३००/– | ५.३.०५ | मे मधूसुदन म. का. सोसा |
| १३ | उल्हासनगर–२ प्रभाग क्र २ मधील जेठाणी हयांच्या घराजवळ व बॅरेक नं ३९ येथील एम–२५० रोड व नाली बनविणे (मा. महापौर निधी १४४३) | १७३०००/– | ११.३.०५ | मे श्रीलक्ष्मी नारायण म. का. सोसा. |
| १४ | उल्हासनगर–३ येथील शास्त्रीनगर येथील व्यायामशाळा व वाचनालयाच्या जागेवर (नगरसेवक निधी २००२) ऐवजी गुप्ता किराणा स्टोर ते चितनु किराणा स्टोर व्हाया मज्जीद व शिवसेना ऑफिस येथील सिमेंट पायवाटा व नाल्या बनविणे. (नगरसेवक निधी १४११) | २०००००/– | ११.३.०५ | मे माजी सैनिक म. का. सोसा |
| १५ | उल्हासनगर–३ वार्ड ६ येथील रातांबे यांच्या घरापासून मार्बल गोडावून पर्यत सी सी रस्ता बनविणे (नगरसेवक निधी १४१३) | १०००००/– | ११.३.०५ | मे शिवानी म. का. सोसा |
| १६ | उल्हासनगर–३ शास्त्रीनगर येथील बंगाली यांच्या घरापासून श्रीवास्तव यांच्या घरापर्यत व रंजना कसबे यांच्या घरापासून नाल्यापर्यत व राजेंद्र यांच्या घराजवळ सी सी पायवाटा व नाल्या बनविणे (नगरसेवक निधी १४१०) | २०००००/– | ११.३.०५ | मे धनलक्ष्मी म. का. सोसा. |
| १७ | उल्हासनगर–२ येथील वार्ड २२ गोविंद पॅलेस समोर जॉगिंग ट्रॅक्स तयार करणे(नगरसेवक निधी १४४१) | १९९९००/– | १६.३.०५ | मे सुर्यज्योत म. का. सोसा. |
| १८ | उल्हासनगर–३ शास्त्रीनगर वार्ड ६ येथील श्यामकुमार | २०००००/– | ५.४.०५ | मे श्रीलक्ष्मी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | यांचे घरापासून शंकर मंदिर व अनिरूध्द यांच्या घरापासून वर्मा यांच्या घरापर्यंत यादव यांचे घरापासून अमित ज्वेलरपर्यंत सिमेंट पायवाटा व नाल्या बनविणे. (नगरसेवक निधी १४४९) | | | नारायण म का सोसा |
| १९ | उल्हासनगर–५ येथील प्रभाग क्र १३ मध्ये हिरापुरी चौक ते श्रीरामनगरपर्यंत ब्लॉक अे ६९९ ते ब्लॉक अे ७०० पर्यंतचा रस्ता सी सी एम–२५० ने बांधणे (नगरसेवक निधी ९९५) | ३९९८५०/– | १९.२.०५ | मे आदर्श म. का. सोसा. |
| २० | उल्हासनगर–३ येथील वार्ड नं ६ काकराशी , बिल्डींग जवळ, कमलेश यांच्या घरापासून भारत मार्बल कंपनी ते रामभाऊ म्हाळगी चौकापर्यंत सिमेंट पायवाटा व नाल्या बनविणे (नगरसेवक निधी १४१२) | ९९९५०/– | ८.३.०५ | मे माजी सैनिक म. का सोसा |
| २१ | उल्हासनगर–५ येथील प्र क्र. १२ मधील बॅ नं १८१३ , १८२८ पर्यत सी सी पायवाटा व नाली बनविणे (मा.उप–महापौर निधी १३५०) | ९९९००/– | ५.४.०५ | मे धनलक्ष्मी म का सोसा. |
| २२ | उल्हासनगर–५ येथील प्र क्र. १२ मधील बॅ नं २८४७ , १८४८, १८४९ पर्यत सी सी पायवाटा व नाली बांधणे (मा. उप–महापौर निधि १३५२) | ९९६००/– | २.४.०५ | मे ओम म का सोसा |
| २३ | उल्हासनगर–२ प्र क्र. ५ भैयासाहेब आंबेडकर नगर येथे संतोष इंगळे ते डॉ आंबेडकर पुतळा समोरील मैदान चिरजी चंडालीया भवानी मंदिर जवळ कलाबाई ते रतन घोडके घरापर्यत सी सी पायवाटा व नाली बांधणे. (नगरसेवक निधी ११३२) | १९९९००/– | २९.३.०५ | मे कलश म का सोसा. |
| २४ | उल्हासनगर–४ येथील ओ टी सेक्शन बॅ नं १२८५ च्या मागे सी सी एम–२५० व नाली दुरूस्ती करणेबाबत (नगरसेवक निधी १३६६) | १९९९२३/– | ६.४.०५ | मे राजश्री म का सोसा |
| २५ | उल्हासनगर–५ येथील प्र क्र. १२ मधील बॅ नं १८२९, १८३० येथे सी सी पायवाटा व नाली बांधणे (मा उप–महापौर निधी १३५७) | ९९९००/– | २९.३.०५ | मे स्वप्नील म का सोसा. |
| २६ | उल्हासनगर–४ येथील प्र क्र. ९ मध्ये विक्रम शिळा कॉलनी जवळ श्री केदार यांचे घरापासून श्री बागूल यांचे घरापर्यत व श्री बागुल यांचे घरापासून वासनि यांचे घरापार्यतचा रस्ता सी सी एम –२५० ने बांधणे (मा. महापौर निधी ८२४) | १९९२५०/– | १९.२.०५ | मे भोलेनाथ म का सोसा. |
| २७ | उल्हासनगर–२ येथील प्रभाग क्र. ५ दुर्गामाता मंदिर ते बागुल घर दिनानाथ शर्मा ते रामदास यादव घर राजेंद्र जाधव रामधरी घराजवळ सी सी पायवाटा नाली बांधणे (नगरसेवक निधी १४३७) | २०००००/– | २४.२.०५ | मे श्रीलक्ष्मी नारायण म का सोसा. |
| २८ | उल्हासनगर–५ येथील प्र क्र. १२ मध्ये बॅ नं १७२० जवळ ४ सीटचे शौचालय बनविणे (उप–महापौर निधी १३२०) | २०००००/– | १९.२.०५ | मे धनलक्ष्मी म. का सोसा. |
| २९ | उल्हासनगर–५ येथील प्र क्र. १२ मधील बॅ नं १८२४, १८३२ महालक्ष्मी अपामेंट ते झुलेलाल बाजार पासुन ते दिलीप बनकर यांच्या घरापर्यत सी सी पायवाटा व नाली बनविणे (नगरसेवक निधी १३५३) | १०००००/– | २४.३.०५ | मे हरेरामा म का सोसा. |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप–निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप–निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर

कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. १३** **दिनांक:—३०/५/२००५**

सुचकाचे नाव :— श्री. सुरेश गायकवाड

अनुमोदकाचे नाव :— श्री. वाघे शामु

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत वरील २९ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती /पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. प्रभारी सचिव :—**विषय क्र. १० वाचुन दाखवितात.

**विषय क्र. १०:—** उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत २५ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

**मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :—** कुठला प्रस्ताव?

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—**माहितीसाठी आहे.

**मा. सभापती :—** सदरचा विषय सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

विषय क्र. १०:— उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत २५ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् २००४—२००५ च्या निधीतून मा. नगरसेवक यांनी कामे करणेसाठी विनंती केलेली आहे.

| अ.क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर—३ येथील बॅ नं ९०२ ते ९०४ पहलाज छाब्रिया गार्डन येथील उद्यानाला हरित, सुशोभिकरण व नुतनीकरणे करणे. (प्रभाग समिती निधी ९७२) | १०००००/— | ३०/४/०५ | मे सुर्य ज्योत म. का. सोसा. |
| २ | उल्हासनगर —३ येथिल ज्योती प्रेस ते महानगरपालिकेचे शौचालयापर्यत, प्रेस बाजार, प्रभाग क्रमांक ७, येथे कल्वर्ट, नाली व त्या लगतची सी सी दुरूस्ती करणेबाबत. (प्रभाग | ९९९७०/— | ३०/४/०५ | मे जय म. का. सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | समिती निधी ९८६) | | | |
| ३ | उल्हासनगर–५ येथील प्रभाग क्र. ११ मधील क्रांती नगर ते गणेश कृपा कॉलनी पर्यत नाली दुरूस्ती करणे व सी सी पायवाटा दुरूस्त करणे. (प्रभाग समिती निधी १२९८) | १०००००/– | ३०/४/०५ | मे धनलक्ष्मी म. का. सोसा. |
| ४ | उल्हासनगर– ५ येथील प्रभाग समिती ११ मधील बॅ नं २०२१, २०३१, २०८६ माता मंदिर जवळील नाली दुरूस्ती करणे. (प्रभाग समिती निधी १२९९) | १०००००/– | ३०/४/०५ | मे धनलक्ष्मी म. का. सोसा. |
| ५ | उल्हासनगर– ५ येथील प्रभाग समिती ११ मधील गायकवाड पाडा येथील नाली दुरूस्ती करणे व सी सी पायवाटा दुरूस्ती करणे. (प्रभाग समिती निधी १३१४) | ९८३००/– | ३०/४/०५ | मे मुंब्रादेवी म. का. सोसा. |
| ६ | उल्हासनगर–५ येथील प्रभाग क्र. ११ मधील बॅ नं १०७३ व २०९४ येथील नाली दुरूस्ती करणे व सी सी पायवाटा दुरूस्ती करणे (प्रभाग समिती निधी १३१८) | ९९९००/– | ३०/४/०५ | मे धनलक्ष्मी म. का. सोसा. |
| ७ | उल्हासनगर–५ येथील प्रभाग क्र. १२ मयये महाराजा अपार्टमेंट जवळ नाली दुरूस्ती करणे व सी सी पायवाटा दुरूस्ती करणे. (प्रभाग समिती निधी १३२२) | १०००००/– | ३०/४/०५ | मे धीरज म. का. सोसा. |
| ८ | उल्हासनगर–५ येथील प्रभाग क्र. १२ मधील चॉद राशन दुकान पासून अशोक पिकल जवळ नाली दुरूस्ती करणे व पायवाटा दुरूस्ती करणे. | १०००००/– | ३०/४/०५ | मे अल्का म. का. सोसा. |
| ९ | उल्हासनगर–१ येथील प्रभाग क्र. २० बॅ नं ७५७, ७५८, ७६० जवळ सी सी पायवाटा व नाल्यांच्या दुरूस्ती करणेबाबत(प्रभाग समिती निधी १३८६) | ९९६००/– | ३०/४/०५ | मे धनलक्ष्मी म. का. सोसा. |
| १० | उल्हासनगर–१ येथील प्रभाग क्र. २० मधील देवीमहल शाळ क्र. २४, जवळ पायवाटा व नाली दुरूस्ती करणे (प्रभाग समिती निधी १३८७) | ९९९००/– | ३०/४/०५ | मे जय म. का. सोसा. |
| ११ | उल्हासनगर–२ येथील प्रभाग क्र. २० येथील प्रीती अपार्टमेंट आणि बॅ नं ४५ च्या मागे किशोर पेटीसवालामागे सी सी पायवाटा व नाली दुरूस्ती करणे. (प्रभाग समिती निधी १३८८) | ९९७००/– | ३०/४/०५ | मे अल्का म. का. सोसा. |
| १२ | उल्हासनगर–३ येथील प्रभाग क्र. ६ मधील सिमेंट पायवाटा व नाली दुरूस्ती करणे नंदा सोनपाल हाऊस ते शिंदे हाऊस व्हाया एस टी डी वडार कॉलनी येथील (प्रभाग समिती निधी १३९२) | ९९६००/– | ३०/४/०५ | मे जय म. का. सोसा. |
| १३ | उल्हासनगर–३ येथील शास्त्रीनगर येथील सिमेंट पायवाटा व नाली दुरुस्त करणे बाबत सरोज कॉलनी व सरदार पाडा धोबीघाट येथील माता मंदीरजवळ जवळ (प्रभाग समिती निधी १३९३) | ९९७००/– | ३०/४/०५ | मे जय म. का. सहकारी संस्था |
| १४ | उल्हासनगर गांधेनगर येथील कृष्णासातपुते यांच्या घरापासून श्रीहरी शिंदे यांच्या घरापर्यंत व गुप्ता किराणा स्टोर पर्यंत सिमेंट पायवाटा व नाल्या दुरुस्ती करणे. (प्रभाग समिती निधी १३९४) | ९९७८०/– | ३०/४/०४ | मे.माजी सैनिक मजूर कामगार सहकारी संस्था |
| १५ | उल्हासनगर–२ वार्ड क्र.२२ येथील वंदना अपार्टमेंट बॅ.नं.५२७ येथील सिमेंट पायवाटा व नाल्या दुरुस्ती करणे (प्रभाग समिती निधी १४००) | ९९५००/– | ३०/४/०५ | मे.सुर्यज्योत मजूर कामगार सहकारी संस्था |
| १६ | उल्हासनगर–२ वार्ड क्र.२२ येथील आराधना डिपार्टमेंट समोर डॉ.विष्णू डिस्पेन्सरीजवळ व बॅ.नं.५२८ प्रेडवाली गलीसमोर पायवाटा व नाल्या दुरुस्तीकरणे (प्रभाग समिती निधी १४०१) | ९९५००/– | ३०/४/०५ | मे.सुर्यज्योत मजूर कामगार सहकारी संस्था |
| १७ | उल्हासनगर–२ वार्ड क्र.२२ येथील बॅ.नं.५२४,२५ येथील | ९९५००/ | ३०/४/० | मे.सुर्यज्योत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सिमेंट पायवाटा व नाल्या दुरुस्ती करणे. (प्रभाग समिती निधी १४०२) | — | ५ | मजूर कामगार सहकारी संस्था |
| १८ | उल्हासनगर—२ येथील रिजेन्सी हॉल मागील सी.सी.पायवाटा व नाल्या दुरुस्ती करण्याबाबत (प्रभाग समिती निधी १४०४) | ९९८००/— | ३०/४/०५ | मे.जय मजूर कामगार सहकारी संस्था |
| १९ | उल्हासनगर—४ पॅनल क्र.१५ मध्ये बॅ.नं.१३७४,१३७४ आशिर्वाद हॉस्पीटलच्या मागे सी.सी.पायवाटा व नाली बनविणे बाबत. (प्रभाग समिती निधी १४३४) | १९८८००/— | ३०/४/०५ | मे.महादेवकृपा मजूर कामगार सहकारी संस्था |
| २० | उल्हासनगर—५ प्रभाग क्र.१२ मध्ये बॅरेक क्र.१८२९,३० जवळ सी.सी.पायवाटा व नाली बांधणे (प्रभाग समिती निधी १३५७) | ९९९००/— | २९/३/०५ | मे.स्वप्नील मजूर कामगार सहकारी संस्था |
| २१ | उल्हासनगर—३ प्रभाग क्र.२०, बॅरेक क्र.७५७,७५८,७६२ जवळ सी.सी. पायवाटा व नाली दुरुस्त करणे (प्रभाग समिती निधी १३८६) | ९९६००/— | ३०/४/०५ | मे.धनलक्ष्मी |
| २२ | उल्हासनगर—२ प्रभाग क्र.५ दुर्गामाता मंदीर ते बंगाली हाऊस, दिनानाथ शर्मा हाऊस, रामदास जाधव हाऊस, राजेंद्र यादव हाऊस जवळ सी.सी.पायवाटा व नाली बांधणे. (नगरसेवक निधी १४३७) | २०००००/— | २४/३/०५ | मे.श्रीलक्ष्मी नारायण मजूर कामगार |
| २३ | उल्हासनगर—२ प्रभाग क्र.२२ मध्ये बॅरक नं.२४४,३२४,३०७ जवळ सी.सी.पायवाटा व नाली बांधणे (स्थायी समिती सभापती निधी १४४८) | १०००००/— | ५/४/०५ | मे.जय मजूर कामगार |
| २४ | उल्हासनगर—२ प्रभाग ६ शास्त्रीनगर मध्ये शामकुमार ते शंकर मंदीर, अमृत हाऊस, वर्मा हाऊस, यादव हाऊस ते अमित हाऊस जवळ सी.सी.पायवाटा व नाली बांधणे (नगरसेवक निधी १४४९) | २०००००/— | ५/४/०५ | मे.श्रीलक्ष्मी नारायण मजूर कामगार |
| २५ | उल्हासनगर—२ प्रभाग क्र.२२ बॅरेक क्र.५३०,५३२ ते ५३४ जवळ सी.सी.पायवाटा व नाली बांधणे (नगरसेवक निधी १४७६) | १०००००/— | ५/४/०५ | मे.शंकर महादेव मजूर कामगार सहकारी संस्था |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप—निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप—निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. १४** दिनांकः—३०/५/२००५

सुचकाचे नाव :—श्री. नथु सोनवणे

अनुमोदकाचे नाव :— श्री. संजय बठिजा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गतवरील २५ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती /पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. प्रभारी सचिव :—विषय क्र. ११ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ११:—ग्रे क्लॉथवरील आकारण्यात येणारा जकात कर शेजारील महापालिकेतर्फे आकारण्यात येत असलेल्या दराप्रमाणे आकारण्याबाबत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— हा प्रस्ताव पारीत केला जावा. परंतु आम्ही जसा ठराव देवु तसा ठराव पारीत केला जावा.

मा. सभापती :— ग्रे क्लाथवर वजनाच्या हिशोबाने जकात कर आकारला जावा.

मा. आयुक्त श्री. आर.के. सोनवणे :— ग्रे क्लॉथवर वजनाच्या हिशोबाने जकात कर न आकारता तो किंमतीच्या हिशोबाने आकारण्याबाबत ठराव करायचा आहे. अमुक ही जी एक वस्तु आहे, त्याची किंमत किती आहे. त्या किंमतीवर त्या वस्तुचा जकात कर आकारला जातो. किंमतीवर टक्केवारीच्या हिशोबाने जकात कर आकारला जातो. ग्रे क्लाथवर वजनाच्या हिशोबाने जकात कर आकारण्याची आवश्यकता नाही. कुणा एखादया आयातदाराकडे बिल नसेल तर नो बिल लिस्टच्या हिशोबाने जकात दर आकारला जातो. ग्रे क्लाथ तीन चार प्रकारचे असतात. (ग्रे प्लेन, ग्रे चिकन, मर्सराईजड्) ग्रे क्लॉथचे ८ ते १० मीटरचे गठ्ठे असतात. हा कपडा अलग—अलग दराचा असतो. कल्याणमध्ये ग्रे क्लॉथचे जकातीसाठी ३ स्लॅब केले आहेत. १२५, १७५, २२५, अशा तीन वेगवेगळया स्लॅबचे कपडे असतात. यामध्ये १२५ रुपयाच्या हिशोबाचा एकच कपडा नसल्याने वजनाच्या हिशोबाने जकात कर आकारता येणार नाही.

मा. सभापती :— या अगोदर ग्रे क्लॉथवर वजनाच्या हिशोबाने जकात कर आकारला जात होता.

मा. आयुक्त श्री. आर.के. सोनवणे :— ते चुकीचे होते. कल्याणमध्ये ग्रे क्लॉथचे जकातीचे ३ स्लॅब होते. प्रत्येक कपडा १२५ रुपयाच्या हिशोबाने जकात आकारणीसाठी घेतल्यास बरोबर होणार नाही.

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :— आम्ही ग्रे क्लॉथवरील जकात कराचा दर कमी करु इच्छित आहोत.

मा. आयुक्त श्री. आर.के. सोनवणे :— जर दर वाढला, उदया कपडयाचा दर ८ चा १५ झाला तर दराच्या हिशोबाने जकातीची रक्कम वाढेल. कल्याणमध्ये १०—१५ टन कपडा येत असतो.

याबाबत आम्हाला नंतर एक वेगळा आदेश काढावा लागेल. उल्हासनगर महानगरपालिकेच्या जकात नियमातील अनुसुची एक मधील बाब क्र. ६१ चे पुर्नवर्गीकरण करुन आपणांस दर निश्चित करायचा आहे. कोणकोणत्या वस्तुंवर / बाबींवर कोणत्या दराने जकात कर आकारायचा हे उल्हासनगर महानगरपालिकेने जकात नियम १९९६ च्या अनुसुची एक मध्ये दर्शविलेले आहे. बाब क्र. १ ते ८५ मध्ये ज्या वस्तुंचा उल्लेख आलेला नाही अशा वस्तुंवर बाब क्र. ८६ वर दर्शविल्याप्रमाणे जकात कर आकारला जातो.

मा. सभापती :— ग्रे क्लॉथवर वजनाच्या हिशोबाने जकात कर आकारला जावा.

मा. आयुक्त श्री. आर.के. सोनवणे :— ग्रे क्लॉथचे जकातीसाठी तीन वेगवेगळे स्लॅब आहेत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— हा प्रस्ताव दोन दिवसासाठी डिफर केला जावा. यापुर्वी नगरपालिकेच्या कालावधीत एक ठराव केला होता.

मा. आयुक्त श्री. आर.के. सोनवणे :— याबाबत १९७८ मध्ये तत्कालीन ठाणे नगरपालिकेने एक ठराव केला होता. जो चुकीचा होता. त्यानंतर १९९१ मध्ये हा ठराव रेक्टीफाय केला व यानंतर काही लोकांनी या बाबत सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. असता सर्वोच्च न्यायालयाने आमची बाजु ग्राहय धरली. त्यामुळे वजनाच्या हिशोबाने जकात कर आकारता येणार नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— आपण व्यापा—याच्या हिताचा निर्णय घेवू शकतो का?

मा. सभापती :— सदरचा विषय सर्वानुमते आजच्या सभेच्या कार्यसुचीवरुन वगळण्यात येत आहे.

विषय क्र. ११ :—ग्रे क्लॉथवरील आकारण्यात येणारा जकात कर शेजारील महापालिकेतर्फे आकारण्यात येत असलेल्या दराप्रमाणे आकारण्याबाबत.

मा. प्रभारी सचिव :—विषय क्र. १२ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १२: उल्हासनगर शहरामधील नाले सफाईचे काम प्रोक्लेन मशिनद्वारे करणेकामी प्रशासनास मे. महादेव इंटरप्रायझेस या न्युत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—या प्रस्तावात दर्शविलेले दर हे प्राकलनीय दरापेक्षा ५ टक्के जास्त आहे.

मा. आयुक्त श्री. आर.के. सोनवणे :— न्युनत्तम दराचे निविदाधारक मेसर्स महादेव इंटरप्रायझेस यांना वाटाघाटीकरीता बोलावून वाटाघाटी दरम्यान निविदा दरापेक्षा २३ टक्के जास्त दराऐवजी निविदा दरापेक्षा ५ टक्के जास्त दराने काम करण्यास निविदाकाराने संमती दर्शविली. मागील वर्षी डिझेलचा दर २२ रुपये प्रती लिटर होता या वर्षी डिझेलचा दर ३४ रुपये प्रती लिटर असा आहे. वाटाघाटी अंती दर २३ टक्क्यावरुन ५ टक्यापर्यंत आणले असल्याने या प्रस्तावास मंजुरी दिली जावी कारण आता लवकरच पाऊस चालु होईल त्या अगोदर हे काम झाले पाहिजे. पाऊस चालु झाल्यानंतर हे काम होवू शकणार नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— आज टॅकरवाले सुध्दा बोलत आहे की, डिझेलचे दर वाढले आहेत टॅकरचेही बरेचसे प्रस्ताव प्रलंबित आहेत. रेती, सिमेंटचेही भाव वाढले आहेत. त्यामुळे प्राकलनीय किंमत ५ टक्क्याने वाढविली पाहिजे.

मा. आयुक्त श्री. आर.के. सोनवणे :— प्रत्येक कामास या कामाशी जोडले जावू नये. रस्त्याचे काम असेल तर तेथे डांबर सिमेंट वगैरे लागते.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— त्यांचा सुध्दा कॉम्प्रेसर / मिक्सर डिझेलवरच चालतो. त्यांनाही दर वाढवुन दिले पाहिजे.

मा. सदस्या श्री. राजु जग्याशी :— पाणी पुरवठा विभागाशी संबंधीत आमची बरीचशी प्राकलने पडुन आहेत. बी.एस.आर.च्या दरापेक्षा दर वाढलेले आहेत. ठेकेदार काम करण्यास तयार नाहीत म्हणुन त्यांनाही दर वाढवुन दिले पाहिजेत.

मा. आयुक्त श्री. आर.के. सोनवणे :— यासाठीच आम्ही १५ टक्के दर वाढवुन दिले आहेत.

मा. सदस्या श्री. राजु जग्याशी:— आम्हांला टॅकर बंद करायचे आहेत म्हणून विभागाशी संबंधीत जे काही प्राकलने प्रलंबित आहेत ती मंजुर करुन दिली जावीत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— असे करु या दोन दिवसासाठी हा प्रस्ताव पुढे ढकलु या.

मा. सभापती :— सदरचा प्रस्ताव बहुमताने आजच्या सभेच्या कार्यसुचीवरुन वगळण्यात येत आहे.

**विषय क्र. १२:** उल्हासनगर शहरामधील नाले सफाईचे काम प्रोक्लेन मशिनद्वारे करणेकामी प्रशासनास मे. महादेव इंटरप्रायझेस या न्युत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

मा. प्रभारी सचिव :—विषय क्र. १३ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. १३:—प्रस्तावाची सुचना:**
**महापालिका आयुक्तांचे वापरासाठी सीटी होन्डा या कंपनीची कार पुरविणे कामी सन्मा.सदस्य श्री.राजु जग्यासी व श्री. किशोर वनवारी यांचा प्रस्ताव मान्य करणे.**

मा. आयुक्त श्री. आर.के. सोनवणे:—सभापती महोदया, माझी आपणांस विनंती आहे की, मी स्वत: प्रशासनाच्या वतीने या कामी प्रस्ताव आणु इच्छितो. मी अशी गाडी घेवू इच्छितो की, जी एक लिटर पेट्रोल मध्ये अधिकाधिक किलोमीटर धावु शकेल. जिचा देखभाल खर्च कमी असेल व जी अधिकाधिक काळ सुस्थितीत चालु शकेल.

मा. सदस्य श्री. राजु जग्याशी :— आम्ही जो प्रस्ताव दिला आहे त्याबाबत आपणांस काही हरकत आहे का?

मा. आयुक्त श्री. आर.के. सोनवणे :— तसे काही नाही. आपल्या महापालिकेची आर्थिक स्थिती फारशी चांगली नाही. महापालिकेची आर्थिक स्थिती जेव्हा सुस्थितीत येईल, तेव्हा नविन गाडी घेवू.

मा. सदस्य श्री. राजु जग्याशी :— आपली काम करण्याची क्षमता वाढली आहे.

मा. आयुक्त श्री. आर.के. सोनवणे :—माझी एकटयाचीच नाही, या महापालिकेतील प्रत्येक अधिका—याची कार्यक्षमता वाढली पाहिजे.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :— आपण प्रस्ताव पारित करु या. आयुक्तांना पाहिजे ती गाडी घेतील.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— आम्ही हा प्रस्ताव पारीत करतो. आपणांस हवी ती गाडी आपण घ्या. त्याचबरोबर गोषवा—यामध्ये एक चुक आहे ती सुधारुन हा प्रस्ताव पारीत केला जावा.

मा. आयुक्त श्री. आर.के.सोनवणे :— गोषवा—यात काय चुक आहे?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— जो प्रस्तावित ठराव आहे त्यामध्ये स्थायी समिती ऐवजी महासभेचा उल्लेख आलेला आहे.

आपली जी गाडी आहे ती आपण दुस—या अधिका—यास दया व आपणास योग्य वाटेल ती गाडी आपण घ्या.

मा. सभापती :— आयुक्तांना योग्य वाटेल अशा मॉडेलच्या गाडीची निवड करुन तसा प्रस्ताव त्यांनी स्थायी समितीपुढे सादर करावा. तोपर्यंत हा प्रस्ताव आजच्या सभेच्या कामकाजातुन वगळण्यात येत आहे.

सायंकाळी ५.३५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

(संजय दुसाने)
प्रभारी सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. आयुक्त श्री. आर.के. सोनवणे :–**माझी एकटयाचीच नाही, या महापालिकेतील प्रत्येक अधिका–याची कार्यक्षमता वाढली पाहिजे.

**मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :–** आपण प्रस्ताव पारित करु या. आयुक्तांना पाहिजे ती गाडी घेतील.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–** आम्ही हा प्रस्ताव पारीत करतो. आपणांस हवी ती गाडी आपण घ्या. त्याचबरोबर गोषवा–यामध्ये एक चुक आहे ती सुधारुन हा प्रस्ताव पारीत केला जावा.

**मा. आयुक्त श्री. आर.के.सोनवणे :–** गोषवा–यात काय चुक आहे?

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–** जो प्रस्तावित ठराव आहे त्यामध्ये स्थायी समिती ऐवजी महासभेचा उल्लेख आलेला आहे.

आपली जी गाडी आहे ती आपण दुस–या अधिका–यास दया व आपणास योग्य वाटेल ती गाडी आपण घ्या.

**मा. सभापती :–** आयुक्तांना योग्य वाटेल अशा मॉडेलच्या गाडीची निवड करुन तसा प्रस्ताव त्यांनी स्थायी समितीपुढे सादर करावा.

**विषय क्र. १३:–प्रस्तावाची सुचना:**

**महापालिका आयुक्तांचे वापरासाठी सीटी होन्डा या कंपनीची कार पुरविणे कामी सन्मा.सदस्य श्री.राजु जग्यासी व श्री. किशोर वनवारी यांचा प्रस्ताव मान्य करणे.**

सायंकाळी ५.३५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

(संजय दुसाने)
प्रभारी सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:–४ जुलै, २००५

## दि. ४.७.२००५ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक ४.७.२००५ रोजी सांयकाळी ४. ३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

१. मा. सभापती श्रीमती ज्योती सुरेश (पप्पु)कालानी
२. श्री. वनवारी किशोर नारायणदास
३. श्री. एडके गणपत गोविंद
३. श्री. गायकवाड सुरेश नामदेव
४. श्रीमती. जावळे संगिता रमेश
५. श्रीमती. वनवारी मोना अशोक
६. श्री. साधवानी मोहन रहंदोमल
७. श्री. सोनवणे नथु काशिराम

८. श्रीमती कृष्णानी रेखा हरेश
९. श्री जग्यासी राजु किशनचंद
१०. श्री. जाधव सुरेश मधुकर
११. श्रीमती मसंद माया घनश्यामदास
१२. श्री मोकल चंदाराम विठोबा
१३. श्री वाघे श्यामु बाबु
१४. श्रीमती ससाणे लक्ष्मी रोहिदास

तर,

१. मा. सदस्य श्री. बठिजा संजय रामचंद्र हे अनुपस्थित होते.

सांयकाळी ५–०० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

मा. सचिव :– विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. १ :–** मागील सभेचे दिनांक ३०/५/०५ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

मा. सदस्य श्री किशोर वनवारी :– मा. सभापती महोदया मागील बैठकीत माझ्या प्रभागातील गरीबनगर येथे शौचालय बनविण्याची आवश्यकता असल्याचे मी सांगितले होते, त्याचप्रमाणे गायकवाड पाडा येथे, श्री नथु सोनवणे यांच्या प्रभागात, अशा इतर ४–५ सदस्यांच्या प्रभागात शौचालयाची आवश्यकता असल्याचे सांगण्यात आले होते. श्री मोकल यांच्या प्रभागात देखिल जागृती शाळेच्या बाजुला, वाल्मीक नगर, श्री गणपत एडके यांच्या प्रभागात देखिल शौचालयाची आवश्यकता आहे. तर मी आयुक्तांना विनंती करेन की, त्यांनी पाहणी करुन जेथे शौचालय बनविणे आवश्यक आहे तेथे त्वरित बनवावे.

मा. आयुक्त :– मी बघतो.

काही सदस्य :– पास, पास............

मा. सभापती :– मागील सभेचे दिनांक ३०/५/२००५ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

मा. सचिव :– विषय क्र. २ वाचुन दाखवितात

**विषय क्र. २:–** महापालिका सेवेतील लाभार्थी कर्मचा–यांना रेनकोट पुरविणेकामी प्रशासनास मे. बेंगॉल वॉटर प्रुफ लिमिटेड किंवा त्यांचे अधिकृत विक्रेता मे. नॉव्हेल्टी फुट वेअर कंपनी मुंबई यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे व अंतर्भुत खर्चास मान्यता देणे.

मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :– नमुने आणले आहेत का दाखवायला.

मा. सदस्य श्री नथु सोनवणे :– दर किती आहे?

मा. सदस्य श्री किशोर वनवारी :– यापूर्वीही १–२ वेळा हा विषय वगळण्यात आलेला होता. तो याच कारणांसाठी वगळण्यात आला होता. परंतु काही नेत्यांनी वर्तमानपत्रांमध्ये विधाने केली की, सत्तापक्ष कर्मचा–यांना रेनकोटही देत नाही. सामना मध्येही तसे आले होते. आमचा रेनकोट द्यायला काही विरोध नाही परंतु काही समस्या होत्या म्हणुन आम्ही विषय वगळला होता. यावर देखिल राजकारण केले जाते. आता पास करा.

मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :– आमचाही याला विरोध नाही.

<u>मा. सदस्य श्री मोहन साधवानी :–</u> रेनकोट कोणाकोणाला देणार आहात? तसेच किती वर्षांनी रेनकोट देण्यात येतो?

<u>मा. आयुक्त :–</u> महापालिकेतील सर्व पात्र कर्मचा–यांना देण्यात येईल. दर दोन वर्षांनी रेनकोट देण्यात येतो.
<u>मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :–</u> आम्हाला नमुने दाखवा.
<u>मा. आयुक्त :–</u> तुमच्या समस्या नेमक्या काय आहेत ते सांगा. आम्ही या कामासाठी निविदा मागविली होती परंतु निविदेतील दरापेक्षा कमी दराने उत्पादन कंपनी पुरवठा करण्यास तयार आहे. यामुळे महापालिकेचा फायदाच होणार आहे.

<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी :–</u> रेनकोट चांगल्या प्रतीचा द्यायला हवा. यामध्ये राजकारण व्हायला नको.

<u>मा. सदस्य श्री मोहन साधवानी :–</u> कंपनी कोणती आहे?

<u>मा. आयुक्त :–</u> डकबॅग कंपनीचे रेनकोट देणार आहोत. यासाठी आपणांस निविदेपेक्षा कमी दरात पुरवठा करण्यात येणार आहे. यापेक्षा स्वस्त कोणी देत असेल तर सांगा आपण त्याला हे काम देवु.

<u>मा. सभापती :–</u> गुणवत्तेमध्ये तडजोड करण्यात येवु नये.

<u>मा. सदस्य श्री मोहन साधवानी :–</u> आपण सफाई कामगारांना जे रेनकोट देतो तर त्यांना कामावर असताना ते रेनकोट घालायला सांगा अन्यथा पाऊस असल्यास ते काम करण्यास नकार देतात. रेनकोट घरीच ठेवुन येतात.

<u>काही सदस्य :–</u>पास, पास ......

<u>मा. सभापती :–</u>सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

<u>प्रस्तावना :</u>

**विषय क्र. २:–** महापालिका सेवेतील लाभार्थी कर्मचा–यांना रेनकोट पुरविणेकामी प्रशासनास मे. बेंगॉल वॉटर प्रुफ लिमिटेड किंवा त्यांचे अधिकृत विक्रेता मे. नॉव्हेल्टी फुट वेअर कंपनी मुंबई यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे व अंतर्भुत खर्चास मान्यता देणे.

उल्हासनगर महानगरपालिका विविध विभागाच्या आस्थापनेवर स्थायी सेवेतील पात्र लाभार्थी कर्मचा–यांना महानगरपालिकाद्वारा दर ३ वर्षातून एकदा रेनकोट वाटप करावा लागतो. सन २००३–२००४ वर्षामध्ये रेनकोट वाटपाबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीसमोर मान्यतेसाठी पाठविलेला होता. मात्र पावसाळा संपत आल्या कारणाने सदरचा प्रस्ताव प्रलंबित ठेवणेत आला होता.

सन २००४–२००५ मध्ये एकूण २०५९ लाभार्थी कर्मचा–यांना रेनकोट पुरविणेबाबत दिनांक १९/६/२००४ रोजी दैनिक सकाळ (मराठी) या राष्ट्रीय वृत्तपत्रामार्फत जाहिर निविदा मागविणेत आलेल्या होत्या. दिनांक २८/६/२००४ रोजी दुपारी ४.३० वाजता उप–आयुक्त (भांडार) यांचे दालनामध्ये प्राप्त झालेल्या निविदा उपस्थित निविदाकारासमक्ष उघडण्यात आल्या त्याचा तपशिल व तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | तपशिल (रेनकोट) कंपनी व साईज | मे. अे.एम. हसनअली ॲन्ड सन्स मुंबई | मे. भारमल टेडर्स ठाणे | मे.प्लस सप्लायर्स ठाणे |
|---|---|---|---|---|
| | | दर प्रति नग | दर प्रति नग | दर प्रति नग |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | रेनकोट (पुरुषांसाठी) | | | |
| | १) डकबॅक क. (रबराईजड्) साईज | | | |
| | अ) स्मॉल | ५०२ | ५१० | ५०८ |
| | ब) मिडियम | ५२२ | ५३० | ५३२ |
| | क) लार्ज | ५५० | ५५२ | ५५६ |
| | ड) एक्ट्रा लार्ज | ५७६ | ५८५ | ५८० |
| | रिलायबल (रबराईजड) साईज | | | |
| | अ) स्मॉल | ३८५ | ३९२ | ४०० |
| | ब) मिडियम | ४०० | ४०८ | ४१५ |
| | क) लार्ज | ४२१ | ४३५ | ४३६ |
| | ड) एक्ट्रा लार्ज | ४४१ | ४६० | ४५५ |
| | रेनसुट (पुरुषांसाठी) | | | |
| | अ) डकबॅक (क) | ८१५ | ८२२ | ८२० |
| | ब) रिलायबल (क) | ६१८ | ६२२ | ६२० |
| २. | रेनकोट (महिलांसाठी) | | | |
| | अ) डकबॅक कंपनी मॉडेल परिसीयन | ८०५ | ८१० | ८१५ |
| | ब) रिलायबल (रबर) | ६१५ | ६३० | ६४० |

रेनकोटच्या दोन उत्पादक कंपनी असून डकबॅक कंपनीचे दर रिलायबल कंपनीच्या दरापेक्षा अधिक असल्याकारणाने तसेच मे. ए. एम. हसन अली, मुंबई या कंपनीचे दर सर्वात न्युनतम असल्याकारणाने या कंपनी बरोबर उप–आयुक्त (मुख्यालय), उप–आयुक्त (आरोग्य) आणि मुख्य लेखा अधिकारी, यांचे समितीने दिनांक २/७/२००४ रोजी दर कमी करण्यासाठी चर्चा करणेत आली त्यावेळेस मे. ए.एम. हसन.अली, मुंबई या पुरवठादाराने सर्व प्रकारच्या रेनकोट दरामध्ये रक्कम रुपये १०/– कमी करणेबाबतचे पत्र दिलेले आहे. रेनकोटचे वाटाघाटी करुन परत कमी करणेसाठी दिनांक १२/७/२००४ रोजी आयुक्त, उप–आयुक्त (मुख्यालय) यांचे समवेत चर्चा झाली चर्चा अंती मे. ए.एम.हसन अली, मुंबई, यांना लेखी पत्राद्वारे पुढिल प्रमाणे रेनकोट दर कमी केलेले आहेत.

| अ.क्र. | तपशिल (रेनकोट) | पुर्वीचा दर | वाटाघाटी दर | फरक प्रतिनग |
|---|---|---|---|---|
| १. | रेनसुट (Duck Back) | ८१५/– | ७१५/– | १००/– |
| २. | रेनकोट (Duck Back) | ५५०/– | ५००/– | ०५०/– |
| ३. | रेनकोट(Pere) | ८०५/– | ७५५/– | ०५०/– |

दिनांक २२/७/२००४ रोजीच्या आयुक्ताचे आदेशानुसार थेट उत्पादक कंपनीकडुन रेनकोटचे दर मागविणेत आलेले आहेत. मे. ए.एम.हसन अली, मुंबई यांनी अंतिम वाटाघाटी अंती दिलेले न्युनतम दर व उत्पादक कंपनीने दिलेले दर यांचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

| रेनकोटचे नाव | आवश्यक नग | उत्पादक कंपनीने दिलेला दर प्रती नग | एकूण रक्कम रुपये | वाटाघाटी अंती ठरविण्यात आलेला दर प्रती नग | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| रेनकोट पुरुष(Champion) | ६३६ | रु. ४२३/– | २,६९,०२८/– | ५००/– रु. | ३,१८,००० |
| रेनसुट (पुरुष) | ७७९ | रु. ६३१/– | ४,९१,५४९/– | ७१५/– रु. | ५,५६,९८५ |
| रेनकोट (परसियन) महिलांसाठी | ६४४ | रु. ५८४/– | ३,७६,०९६/– | ७५५/– रु. | ४,८६,२२० |
| **एकुण** | **२०५९** | —— | **११,३६,६७३/–** | —— | **१३,६१,२०५** |

अधिक ४ टक्के दराने मुल्यावर्धीत कर (VAT) रुपये ४५,४६७/– एकुण रक्कम रुपये ११,८२,१४०/–

में. बेगॉल वॉटर प्रुफ लिमिटेड कंपनी मुंबई या उत्पादक यांचेकडुन थेट करावयाची असल्यास देयक अदा करावयाची पध्दती (Mode Of Payment) पुढिल असल्याचे दिनांक ३०/८/२००४ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे.

१) एकूण रेनकोटची मागणी किती? नुसार मालाचा पुरवठयाबाबत. कालवधी निश्चित केला जाईल.

२) रेनकोट / रेनसुटची किंमत ही सादर केलेल्या दरपत्रकानुसारच राहील परंतु सदर रेनकोट / रनेसुट हे कंपनीचे भिंवडी येथिल गोडावुन पर्येतच राहिल तेथून माल आणण्याची जबाबदारी महापालिकेची राहील.

३) रेनकोट व रेनसुटचा पुरवठा करतेवेळी त्वरीत रक्कम (Payment) हया स्वरुपात राहील.

४) आयात करतेवेळेस रेनकोटवर जकात कर आकारणी न करणे बाबत उल्हासनगर महानगरपालिकेकडुन जकात माफीचा दाखला देण्यात यावा.

निविदादाराकडुन प्राप्त झालेल्या दराने रेनकोट खरेदी केल्यास एकुण खर्च १३,६१,२०५/— असून उत्पादक कंपनीकडुन त्याचे (Mode Of Payment) नुसार थेट खरेदी केल्यास एकुण खर्च ११,८२,१४०/— एवढा होणार आहे. त्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेस उत्पादक कंपनी कडुन त्यांनी नमूद केलेल्या अटी व शर्तीप्रमाणे व मे. नॉव्हेल्टी फुट वेअर, भांडुप, मुंबई या कंपनीच्या अधिकृत विक्रेता मार्फत थेट रेनकोट खरेदी करणेस प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणेस मा. स्थायी समितीसमोर प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. १५</u> <u>दिनांकः— ४/७/२००५</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजु जग्याशी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती रेखा कृष्णानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव महापालिका सेवेतील लाभार्थी कर्मचा—यांना रेनकोट पुरविणेकामी प्रशासनास मे. बेंगॉल वॉटर प्रुफ लिमिटेड किंवा त्यांचे अधिकृत विक्रेता मे. नॉव्हेल्टी फुट वेअर कंपनी, मुंबई यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे तसेच अंतर्भुत खर्च रु. ११,८२,१४० यांस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती /पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

**विषय क्र. ३** :—आमदार निधीतुन प्रभाग समिती क्र. १ ते ४ मधील रस्त्यांची दुरुस्ती व देखभाल करणे कामीप्रशासनाने मे. जय भारत कंन्स्ट्रक्शन या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

<u>मा. आयुक्त :—</u> या प्रस्तावात चुकून प्रभाग समिती निधी ऐवजी आमदार निधी असा उल्लेख झालेला आहे, तरी कृपया त्याप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

<u>काही सदस्य :—</u>पास, पास ......

<u>मा. सभापती :—</u>सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

<u>प्रस्तावना</u>

**विषय क्र. ३** :—प्रभाग समिती निधीतुन प्रभाग समिती क्र. १ ते ४ मधील रस्त्यांची दुरुस्ती व देखभाल करणे कामीप्रशासनाने मे. जय भारत कंन्स्ट्रक्शन या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेले काम करणेसाठी मा. आयुक्तांनी अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या निधितून काम करणेसाठी मान्यता प्रदान केली आहे.

| अ.क्र. | कामांचे नाव | प्राकलनीय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | प्रभाग समिती १ मध्ये रस्त्यांची दुरुस्ती व देखभाल करणे (प्रभाग समिती निधी ४७) | ९,५०,०००/— | २४/५/२००५ | मे. जयभारत कंन्स्ट्रक्शन |
| २. | प्रभाग समिती २ मध्ये रस्त्यांची दुरुस्ती व देखभाल करणे (प्रभाग समिती निधी ४८) | ९,५०,०००/— | २४/५/२००५ | मे. जयभारत कंन्स्ट्रक्शन |
| ३. | प्रभाग समिती ३ मध्ये रस्त्यांची दुरुस्ती व देखभाल करणे (प्रभाग समिती निधी ४९) | ९,००,०००/— | २४/५/२००५ | मे. जयभारत कंन्स्ट्रक्शन |
| ४. | प्रभाग समिती ४ मध्ये रस्त्यांची दुरुस्ती व देखभाल करणे (प्रभाग समिती निधी ५०) | ९,००,०००/— | २४/५/२००५ | मे. जयभारत कंन्स्ट्रक्शन |

उपरोक्त कामाच्या निविदा, निविदेच्या दरावर आहे. सदर निविदांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (डी) अंतर्गत प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १६ — दिनांकः— ४/७/२००५

सुचकाचे नाव :— श्री. गणपत एडके

अनुमोदकाचे नाव :—श्री. सुरेश गायकवाड

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार प्रभाग समिती क्र. १ ते ४ मधील रस्त्यांची दुरुस्ती व देखभाल करणे कामी प्रशासनाने मे. जय भारत कंन्स्ट्रक्शन या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती /पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :— विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

**विषय क्र.** ४ :— केंद्र शासनाच्या आर्थिक सहाय्याने १० कि. वॉ. च्या पवन सौर संकरीत ऊर्जा प्रकल्पासाठी प्रशासनास मे. एक्साईड इंडस्ट्रीज लिमिटेड या लघुत्तम दराच्या निविदाकाराची संविदेस व अंतर्भुत खर्चास मान्यता देणे.

काही सदस्य :—पास, पास ......

मा. सभापती :—सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

प्रस्तावना

**विषय क्र.** ४ :— केंद्र शासनाच्या आर्थिक सहाय्याने १० कि. वॉ. च्या पवन सौर संकरीत ऊर्जा प्रकल्पासाठी प्रशासनास मे. एक्साईड इंडस्ट्रीज लिमिटेड या लघुत्तम

दराच्या निविदाकाराची संविदेस व अंतर्भुत खर्चास मान्यता देणे.

१० कि. वॉ. चा सोलार– विंड हायब्रिड प्रोजेक्ट महाउर्जा कडे मंजुरी साठी दिनांक १४/७/०४ रोजी महाउर्जा कडे पाठविण्यात आला. दरम्यान स्थायी समितीने ठराव क्र. ७० दिनांक १९/७/०४ च्या अन्वये पुढील प्रमाणे पारीत केला.

'ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार पवन सौर संकरीत उर्जा प्रकल्प, टप्पा क्र. २ महापालिका मुख्यालयाच्या दुस–या विंगमध्ये राबविणेकामी महाउर्जाकडे अर्ज व रु. ८०,००० एवढे शुल्क अदा करण्यास मान्यता देत आहे व केंद्र शासनाकडुन आर्थिक सहायय् मिळाल्यानंतर प्रशासनास मे. टाटा बी. पी. सोलार इं. लि. यांचेशी पूर्वीच्या करारातील अटी, शर्ती व दरानुसार निविदेशिवाय थेट संविदेस मान्यता देत आहे.'

महापालिकेच्या १४/७/०४ च्या पत्रात उतरादाखल महाउर्जा यांनी २८/१/०५ रोजी पुढील प्रमाणे सुचना दिली की

"With reference to above cited subject, we have received your proposal of Wind-Solar Hybrid System vide letter under ref. MoNES has sanctioned the subsidy for the proposal of 10 kw Wind-Solar Hybrid System.

Total Project Cost : - Rs. 28,16,783/-
Ex- Work Cost : - Rs. 26,96,783/-
MoNES subsidy : - Rs. 20,00,000/-
User Share : - Rs. 8,16,783/-

You are requested to finalize the contractor in line with the administrative procedure of Ulhasnagar Municipal Corporation and send us copy of work order at the earliest for further necessary action."

सदर स्थायी समिती ठरावा नुसार मे. टाटा बी. पी. सोलार इंडिया लिमिटेड यांना पूर्वीच्या दिनांक ११/२/२००३ रोजीच्या झालेल्या करारा नुसार स्वीकृती पत्र देण्यात आले.

मे. टाटा बी. पी. सोलार इंडिया लिमिटेड यांनी दिनांक २१/३/२००५ रोजी फॅक्स द्वारे कळवले की

*"Please refer to the work order by MEDA giving the sanction to the project "Fabrication, Testing, Installation and commissioning of wind SPV hybrid system, capacity 10 KW at UMC building at Ulhasnagar.*

*MEDA has sanctioned the subsidy for this project and <u>we are happy to take up this job as a repeat order from UMC.</u>*

*Currently, as we are approaching the financial year end and there are few things to be resolved regarding the already done subsidy projects, we are requesting you herewith to bear with us till such time that we are able to sign the agreement with you and start the work of manufacturing and on site.*

*I am confident that these issues will be solved soon and <u>we will be able to comply with your end orders terms and conditions in short period; definitely in this month.</u>*

*I will confirm to you the date on which we will execute the agreement and come there ready with all formalities.*

*Hoping for your continued support and cooperation".*

त्या नंतर दिनांक ११/४/०५ च्या पत्रान्वये मे. टाटा बी. पी. सोलार इंडिया लिमिटेड नी असे पुढील कळविले कि

*"Please refer to the work order by MEDA giving the sanction to the Project "Fabrication, Testing, Installation and commissioning of wind-SPV hybrid system, capacity 10 KW at UMC building at Ulhasnagar.*

*MEDA has sanctioned the subsidy for this project and we are happy to take up this job as a repeat order from UMC.*

*Currently as the new tax structure has been announced by government by introducing VAT and abolishing all the exemption under BST, the solar also comes under the structure with 4% VAT / 10% CST, depending on the address of the manufacturer and the customer.*

*This has compelled us to request you to provide us with the D From to avail 4% CST or else avail only the full rate of 10% CST. This amount will be extra than the project*

*amount already confirmed mutually. Please give us the confirmation to this effect of agreement to pay this VAT/CST extra.*

*If this is not possible due to the policies of the UMC, we regret to inform you that the project cannot be executed under the present terms and conditions and prices. Hence, I suggest you to float the tender for this project"*

सदर बाब लक्षात घेता मा. आयुक्त यांची मंजुरी घेउन वर्तमान पत्रात सदर कामासाठी निविदा सूचना प्रसिद्ध करण्यात आली त्या सूचनेच्या प्रतिसाद १) मे. विस्टार इलेक्ट्निकस (प्रा) लिमिटेड, पुणे २) मे. यूनिटॉन एनर्जी सिस्टम, पुणे ३) मे. एक्साईड इनड्टिज लिमिटेड, पूणे यांनी निविदाचे कोरे प्रपत्र खरेदी केले व तीनही निविदा धरकांनी वेळेवर म्हणजे २/५/०५ रोजी दुपारी ३.०० वाजे पर्यंत भरलेली निविदा सादर केली.

ती निविदा दिनांक २/५/०५ रोजी सांयकाळी १६.२० वाजता उघडण्यात आली त्याचा तुलनात्मक तक्ता पुढील प्रमाणे आहे.

१. मे. विस्टार इलेक्ट्निकस (प्रा) लिमिटेड, पुण, अंदाज पत्रकीय रक्कम रुपये २८,१६,७८३/— नुसार (AT PAR)
२. मे. यूनिटॉन एनर्जी सिस्टम, पुणे, अंदाज पत्रकीय रक्कम रुपये २८,१६,७८३/— पेक्षा ३% कमी.
३. मे. एक्साईड इनड्टिज लिमिटेड, पूणे अंदाज पत्रकीय रक्कम रुपये २८,१६,७८३/— पेक्षा ७% कमी.

सदर तुलनात्मक तक्त्या नुसार मे. एक्साईड इनड्टिज लिमिटेड, पूणे यांचे दर अंदाज पत्रकीय रक्कम रुपये २८,१६,७८३/— पेक्षा ७% कमी आहे ते सर्वात कमी असुन त्याला वाटाघाटी साठी बोलवण्यात आले.

मे. एक्साईड इनड्टिज लिमिटेड, पुणे यांच्याशी दिनांक ३०/५/०५ रोजी मा. आयुक्त यांच्याशी झालेल्या वाटाघाटी मध्ये सदर कंपनी आजुन ०.५ टक्के अंदाज पत्रकिय रक्कमेवर कमी करण्यास तयार झाली आहे म्हणजेच अंदाजपत्रकिय रक्कम रुपये २८,१६,७८३/— पेक्षा ७.५ टक्के कमी दराने काम करण्यास तयार आहे व ते वाजवी आहे.

केंद्रशासन (MoNES) सदर सौर उर्जा प्रकल्पा साठी १८,७०,८९३ रुपयाची अनुदान मिळणार आहे व महानगरपालिकेला या प्रकल्पासाठी रु. ७,४३,६३१ खर्च करावे लागणार आहे. सदर सर्व लक्षात घेउन मे. एक्साईड इनड्टिज लिमिटेड, पुणे यांच्याशी करार करण्यास मंजुरी देउन लागणा—या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यते साठी स्थायी समिती पुढे सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र. १७</u> <u>दिनांकः— ४/७/२००५</u>

सुचकाचे नाव :— श्री. सुरेश गायकवाड

अनुमोदकाचे नाव :—श्री. नथु सोनवणे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव केंद्र शासनाच्या आर्थिक सहाय्याने १० कि. वॉ. च्या पवन सौर संकरीत ऊर्जा प्रकल्प राबविणेसाठी प्रशासनास मे. एक्साईड इंडस्ट्रीज लिमिटेड या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करण्यास व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती /पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

**विषय क्र.** ५ :— उल्हासनगर महापालिके मार्फत देण्यात येणा—या नविन नळ

परवानाधारककाकरीता परवाना शुल्क रुपये ५,०००/— व

नुतनीकरण शुल्क रुपये १,०००/— निश्चित करणे.

काही सदस्य :—पास, पास ......

मा. सभापती :—सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

प्रस्तावना

**विषय क्र.** ५ :— उल्हासनगर महापालिके मार्फत देण्यात येणा—या नविन नळ परवानाधारककाकरीता परवाना शुल्क रुपये ५,०००/— व नुतनीकरण शुल्क रुपये १,०००/— निश्चित करणे.

उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत पाणी पुरवठा विभागामार्फत नविन नळजोडणी कारागीर परवाना देण्यात येतो.

मा. स्थायी समिती ठराव क्र. ६३, दिनांक ८/८/१९९५ नुसार नविन नळ कारागीर परवाना शुल्क म्हणुन रुपये १०००/— (एक हजार मात्र) व नुतनीकरण शुल्क प्रत्येक वर्षाला रुपये २००/— (दोनशे मात्र) स्विकारण्यात येते. व संदर्भ क्र. २ अन्वये नुतनीकरण शुल्क रुपये २००/— ऐवजी रुपये ३००/— आकारण्यात येते.

सदर नविन नळ कारागीर शुल्क रक्कम दिनांक ८/८/१९९५ पासुन आजपर्यंत वाढविण्यात आलेली नाही. महापालिकेच्या महसुलात वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून सध्या घेण्यात येणारी परवाना शुल्क रक्कम व नुतनीकरण शुल्क वाढविणे गरजेचे आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २२ कलम ३७४ अन्वये नविन नळ कारागीर शुल्क व नुतनीकरण शुल्क वाढविण्याचे अधिकार मा. स्थायी समितीस देण्यात आलेले आहेत.

सबब नविन नळजोडणी परवाना शुल्क रुपये ५०००/— (पाच हजार मात्र) व नुतनीकरण शुल्क रुपये १०००/— (एक हजार मात्र) वाढविण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

सदर प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १८ दिनांक:— ४/७/२००५

सुचकाचे नाव :— श्री. राजु जग्याशी

अनुमोदकाचे नाव :— श्री. मोहन साधवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर महापालिके मार्फत देण्यात येणा—या नविन नळ जोडणी कारागीर परवान्याकरिता परवाना शुल्क रुपये ५,०००/— व नुतनीकरण शुल्क रुपये १,०००/— एवढे निश्चित करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती /पीठासीन अधिकारी

मा. सचिव :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

**विषय क्र. ६** :— बॅरेक नं. ५४३ व ५४८, उल्हासनगर—२ येथिल सार्वजनिक
शौचालयाच्या विनियोगास मान्यता द्यावी किंवा न द्यावी.

मा. सदस्य श्री नथु सोनवणे :— गेल्या ४ महिन्यांपासुन मी बॅ.क्र. ४९९ व ५०१ जवळील शौचालय तोडण्यासाठी अर्ज करीत आहे परंतु आमच्या प्रस्तावांचा गोषवारा येथे का आणला जात नाही? प्रत्येकवेळी सांगतात आणु परंतु प्रत्यक्षात येथे प्रस्तावच आणत नाही.

मा. सदस्या श्रीमती रेखा कृष्णानी :— माझ्या प्रभागातील बॅ.क्र. १४३१ येथील एक शौचालय देखिल तोडायचे आहे.

मा. सदस्य श्री मोहन साधवानी :— मी देखिल ४ महिन्यात ४ अर्ज दिले परंतु काम होत नाही.

मा. आयुक्त :— मी याबद्दल आपणांस सांगु इच्छितो की, यापूर्वी येथे जे शौचालय तोडण्याचे प्रस्ताव मंजुर झाले होते त्याबद्दल आमच्याकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत की, काही व्यक्ती तेथे अनधिकृत बांधकाम करुन जागा बळकावतात अथवा सनद काढुन घेतात. यासाठी आधी जे शौचालय तोडले आहेत ते ताब्यात घेवुन त्या ठिकाणी आवश्यकतेनुसार शौचालय, मुतारी बांधण्यात येईल अथवा चांगला उपयोग करुन घेण्यात येईल. यासाठी आता आम्ही येथे प्रस्ताव कमी आणत आहोत.

मा. सदस्या श्रीमती रेखा कृष्णानी :— माझ्या प्रभागातील शौचालयाची अवस्था अत्यंत खराब आहे.
मा. सदस्य श्री किशोर वनवारी :— आयुक्त साहेब श्रीमती कृष्णानी यांच्या प्रभागातील शौचालयाची अवस्था खरोखर खराब आहे, त्यांनी ब—याच वेळा अर्ज दिले आहेत.

मा. आयुक्त :— जेथे अत्यंत वाईट अवस्था असेल तेथील शौचालय तोडण्यात येतील.

मा. सदस्य श्री किशोर वनवारी :— आयुक्त साहेब या प्रस्तावामध्ये प्रशासनाने आपला स्पष्ट अभिप्राय दिलेला नाही. स्थायी समिती सदस्यांनी निर्णय घ्यावा असे मत दिले आहे. यासाठी आम्ही हा विषय वगळीत आहोत, आधी आपण आपले स्पष्ट मत द्या त्यानंतरच हा प्रस्ताव येथे आणावा.

मा. सभापती :— सदरचा विषय सर्वानुमते कार्यसूचीवरुन वगळण्यात येत आहे.

✂ **विषय क्र. ६** :— बॅरेक नं. ५४३ व ५४८, उल्हासनगर—२ येथिल सार्वजनिक शौचालयाच्या विनियोगास मान्यता द्यावी किंवा न द्यावी.

मा. सचिव :— विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

**विषय क्र. ७** :— नविन नळ जोडणी देतांना व जुनी नळ जोडणी स्थलांतरीत करतांना दारिद्रय रेषेखालील लोकांकडुन रस्ता खोदाई व दुरुस्ती फी रुपये ७००/— न आकारणे कामी पुर्वीच्या स्थायी समिती ठराव क्र. १९४ (अ) दिनांक १२.२.२००० मध्ये अंशतः बदल करणे.

**मा. सदस्य श्री किशोर वनवारी :—** मा. सभपती महोदया आम्ही या विषयाशी सहमत नाही. यांनी फक्त दारिद्रय रेषेखालील व्यक्तिंनाच फायदा देण्यात येईल असे लिहीले आहे. परंतु आमच्या विभागात देखिल बरेच लो खड्डा न करता नळ जोडणी घेत असतात यासाठी त्यांना देखिल याचा फायदा देण्यात यावा.

**मा. आयुक्त :—** असे केले तर सर्व लोक वरुनच नळ कनेक्शन टाकतील. झोपडपट्टीमध्ये मुख्य जलवाहिनी जमिनीवरुन गेलेली असते, तेथे खड्डा करण्याची आवश्यकता भासत नाही. यामुळे तेथील लोकांना नाहक शुल्क भरावे लागते, यासाठी येथे प्रस्ताव आणलेला आहे.

**मा. सदस्य श्री किशोर वनवारी :—** सर्व शहराला सवलत द्या. यामध्ये भेदभाव करु नका.

**मा. सभापती :—** जेथे जेथे खड्डा करण्याची आवश्यकता नसेल तेथुन शुल्क घेवु नका.

**मा. सदस्य श्री मोहन साधवानी :—** जर रस्त्याच्या बाजुला मुख्य जलवाहिनी असेल व रस्ता खोदला नाही तरी देखिल शुल्क घेतले जाते का?

**मा. आयुक्त :—** होय.

**मा. सदस्य श्री किशोर वनवारी :—** यासाठी सर्व ठिकाणी एकच न्याय लावला जावा. जेथे खड्डा खोदण्याची आवश्यकता नाही तेथील शाखा अभियंता अथवा उपअभियंता तसे लिहुन देतील मग त्या व्यक्तीकडुन शुल्क घेण्यात येवु नये.

**मा. आयुक्त :—** असे केले तर खड्डा खोदला जाईल परंतु खोदल्याचे दाखविण्यात येणार नाही.

**मा. सदस्य श्री किशोर वनवारी :—** आमचा अधिका—यांवर पुर्ण विश्वास आहे. जो माणुस नळजोडणीसाठी खड्डा करेल त्याच्याकडुन शुल्क घेण्यात यावे परंतु जो खड्डा करणार नाही त्याला मात्र सवलत द्यायला हवी. आपण टॅकरचेही असेच केले होते. आधी फक्त झोपडपट्टीला मोफत दिला होता परंतु नंतर ठराव करुन सर्वांना मोफत केला.

**मा. आयुक्त :—** जर आपणांस आपल्या ठरावाची अंमलबजावणी व्हावी असे वाटत असेल तर प्रशासनाचा जो प्रस्ताव आहे त्याला सुसंगत ठराव पास करा. मी आपल्या माहितीसाठी सांगु इच्छितो की, मीरा भाईंदर महापालिकेत नळजोडणीसाठी अनामत रक्कम रु २५००० एवढी घेतली जाते. आपल्या येथे तर एवढीही नाही. तरी देखिल तेथे लोक पैसे भरुन नळजोडणी घेतात.

**मा. सदस्य श्री किशोर वनवारी :—** आमचा झोपडपट्टीला माफ करण्यास विरोध नाही परंतु जो माणुस खड्डा करणार नाही त्याला देखिल शुल्क माफ करायला हवे. जी.आय जलवाहिनीवरुन जो नळजोडणी घेईल त्याच्याकडुन शुल्क घेण्यात येवु नये जो माणुस सी.आय जलवाहिनीवरुन नळजोडणी घेईल त्याच्याकडुन शुल्क घेण्यात यावे. सध्या चाचणीसाठी आपण असा प्रस्ताव पास करुया. आवश्यकता वाटली तर पुढील वर्षीच्या बजेटमध्ये तरतुद करु. हवे असेल तर अनधिकृत नळजोडण्या असलेल्या व्यक्तिंकडुन दंड वसुल करा.

**मा. आयुक्त :—** या आधी आम्ही ती योजना काढली तर फक्त ३२०० लोक पुढे आले होते.

**मा. सदस्य श्री किशोर वनवारी :—** आम्ही सर्व पक्षाच्या नेत्यांची एक बैठक घेवुन त्यामध्ये निर्णय घेवु, तोपर्यंत हा विषय वगळण्यात यावा.

**काही सदस्य :—**सदरचा विषय वगळावा.

**मा. सभापती :—** सदरचा विषय सर्वानुमते कार्यसूचीवरुन वगळण्यात येत आहे.

**विषय क्र. ७ :—** नविन नळ जोडणी देतांना व जुनी नळ जोडणी स्थलांतरीत करतांना दारिद्रय रेषेखालील लोकांकडुन रस्ता खोदाई व दुरुस्ती फी रुपये ७००/— न

| |
|---|
| आकारणे कामी पुर्वीच्या स्थायी समिती ठराव क्र. १९४ (अ) दिनांक १२.२.२००० मध्ये अंशत: बदल करणे. |

मा. सचिव :— विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

**विषय क्र. ८ :—** जकात विभागात कार्यरत असणा—या कर्मचा—यांना उद्दीष्ट पुर्ततेनंतर प्रोत्साहनपर बक्षीस देण्यास मान्यता देणे.

काही सदस्य :—पास, पास ......

मा. सभापती :—सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

**विषय क्र. ८ :—** जकात विभागात कार्यरत असणा—या कर्मचा—यांना उद्दीष्ट पुर्ततेनंतर प्रोत्साहनपर बक्षीस देण्यास मान्यता देणे.

सन २००५—२००६ साठी जकातीची वसुली उल्हासनगर महानगरपालिकेच्या कर्मचा—यांमार्फत करीत आहे. त्यासाठी वार्षिक वसुलीचे उदिष्ट रुपये ८० कोटी असे आहे. माहे एप्रिलमध्ये रुपये ५.२४. कोटी व माहे मे मध्ये ५.५७ कोटी इतकी वसुली झालेली आहे. वरील बाबी तसेच महिन्यातील सुट्टया व सार्वजनिक उत्सव विचारात घेता खालीलप्रमाणे मासिक इष्टांक निश्चित करावा असे मत आहे.

| अ.क्र. | महिना | मासिक इष्टांक (आकडेवारी कोटीत) | | |
|---|---|---|---|---|
| १ | एप्रिल | ५.२४ | ५.२४ | ५.२४ |
| २ | मे | ५.५७ | ५.५७ | ५.५७ |
| ३ | जून | ६.२५ | ६.५० | ७.०० |
| ४ | जुलै | ६.२५ | ६.५० | ७.०० |
| ५ | ऑगस्ट | ६.०० | ६.५० | ७.०० |
| ६ | सप्टेंबर | ६.०० | ६.२५ | ६.७५ |
| ७ | ऑक्टोंबर | ७.०० | ७.२५ | ७.७५ |
| ८ | नोव्हेंबर | ६.०० | ६.२५ | ६.७५ |
| ९ | डिसेंबर | ६.०० | ६.५० | ७.०० |
| १० | जानेवारी | ६.०० | ६.२५ | ६.७५ |
| ११ | फेब्रुवारी | ५.७५ | ५.७५ | ६.२५ |
| १२ | मार्च | ६.०० | ६.५० | ७.०० |
| एकुण:— | | ७२.०६ | ७५.०६ | ८०.०६ |

यापुर्वी जकात कराची वसुली खाजगी अभिकर्त्यामार्फत करण्यात येत होती. खाजगी अभिकर्त्यापेक्षा जकातीच्या उत्पन्नात वाढ होणेकामी महानगरपालिका कर्मचा—यांना प्रोत्साहनपर बक्षीस योजना लागू केल्यास जकातीच्या होणा—या चोरीचे प्रमाणे कमी होईल व जकात कराच्या उत्पन्नात वाढ होईल. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

१) वार्षिक उत्पन्न रुपये ७२ कोटी पेक्षा कमीपर्यंत आल्यास प्रोत्साहनपर बक्षीस अनुज्ञेय असणार नाही.

२) वार्षिक उत्पन्न रुपये ७२ ते ७५ कोटी पर्यंत झाल्यास वाढीव उत्पन्नाच्या १० टक्के रक्कम प्रोत्साहनपर बक्षीस म्हणून देण्यात यावे.

३) वार्षिक उत्पन्न रुपये ७५ ते ८० कोटी पर्यंत झाल्यास वाढीव उत्पन्नाच्या १५ टक्के रक्कम प्रोत्साहनपर बक्षीस म्हणुन देण्यात यावे.

४) वार्षिक उत्पन्न रुपये ८० कोटी पेक्षा जास्त झाल्यास वाढीव उत्पन्नाच्या २० टक्के रक्कम प्रोत्साहनपर बक्षीस म्हणुन देण्यात यावे.

त्याचे वितरण खालीलप्रमाणे राहील.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | शिपाई / कामगार/ सुरक्षा रक्षक | :— | २ टक्के |
| ब) | लिपिक | :— | ४ टक्के |
| क) | निरिक्षक / तपासणीस | :— | २ टक्के |
| ड) | अधिक्षक | :— | १ टक्का |
| इ) | अधिकारी वर्ग १ व २ | :— | १ टक्के |

वरील रक्कमांचे वितरण करतांना वर नमुद केलेली टक्केवारी निहाय रक्कमांचे वितरण एकूण वार्षिक वसुली विचारात घेवुन करण्यांत यावे.

वरील बाबी व्यतिरिक्त दक्षता पथकाकडुन जी जकात चोरी पकडली जाईल त्यावर वसुल दंडाच्या रक्कमांच्या १० टक्के रक्कम प्रोत्साहनपर बक्षीस म्हणून वितरण करण्यांत यावी. त्याचे वितरण खालीलप्रमाणे राहील.

अ) दक्षता पथातील संबंधीत अधिकारी ५ टक्के
ब) सुरक्षा रक्षक, वाहन चालक २ टक्के
क) जकात विभागातील वरीष्ठ अधिकारी यांना ३ टक्के

सदर प्रस्तावाची मुख्य लेखा अधिकारी / मुख्य लेखा परिक्षक यांनी छाननी केली असुन प्रस्ताव मंजुरीची शिफारस केली आहे.
सबब, उक्त प्रस्ताव मंजुरीसाठी स्थायी समितीपुढे ठेवण्यात यावा.

स्थायी समिती ठराव क्र. १९ दिनांकः— ४/७/२००५

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती संगिता जावळे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद कलेल्या कारणास्तव उल्हासनगर महापालिका जकात विभागात कार्यरत असलेल्या पात्र कर्मचा—यांना उद्दीष्ट पुर्ततेनंतर वरीलप्रमाणे प्रोत्साहनपर बक्षिस देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती /पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :— विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

**विषय क्र. ९** :— महापालिका सभागृह, स्थायी समिती सभागृह यांच्या देखभाल व साफसफाई कामी प्रशासनास मा शेरावाली या न्युनतम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :— आधी साफसफाई कसे करायचे?
मा. सचिव :— आधी महापालिका कर्मचा—यांमार्फत करायचो, परंतु त्यांचे काम समाधानकारक नसल्याने खाजगीकरणामार्फत करायचा प्रस्ताव आणलेला आहे.

काही सदस्य :—पास, पास ......

मा. सभापती :—सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

## प्रस्तावना

**विषय क्र. ९** :— महापालिका सभागृह, स्थायी समिती सभागृह यांच्या देखभाल व साफसफाई कामी प्रशासनास मा शेरावाली या न्युनतम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील महासभा सभागृह, स्थायी समिती सभागृह यांच्या देखभाल व साफसफाई कामी ३ वर्षासाठी ठेकेदाराची नियुक्ती करणेसाठी दिनांक ११/४/२००५ रोजी विविध वर्तमानपत्रामध्ये निविदा सुचना प्रसिध्द करण्यांत आली होती. सदर सुचनेस प्रतिसाद मिळून दिनांक २०/४/२००५ पर्यंत खालील निविदाकारांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले होते.

१. कुशांग सिक्युरिटी ॲण्ड प्रोटेक्शन सर्व्हिसेस
२. विशाल सुपर सर्व्हिसेस
३. सिध्दनाथ मजूर कामगार सहकारी संस्था
४. मॉ शेरावाली कन्स्ट्रक्शन कंपनी
५. मेसर्स डिलक्स कन्स्ट्रक्शन कंपनी

दिनांक २१/४/२००५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत निविदा फॉर्म सादर करण्याची वेळ देण्यात आली होती. विहित मुदतीत पाच निविदाकारांनी त्याच्या निविदा सिलबंद लखोटयामध्ये सादर केल्या होत्या. त्यातील मेसर्स डिलक्स कन्स्ट्रक्शन कंपनी या निविदाकाराने संबंधीत कामाच्या अनुभवाचा दाखला न जोडल्याचे त्यांची निविदा बाद ठरविण्यात आली.

इतर चार निविदाधारकांनी भरलेले देकार पुढील प्रमाणे.

| | |
|---|---|
| १. कुशांग सिक्युरिटी ॲण्ड प्रोटेक्शन सर्व्हिसेस | रुपये ७,६५,६६२/— |
| २. विशाल सुपर सर्व्हिसेस | रुपये ३,५३,०००/— |
| ३. सिध्दनाथ मजूर कामगार सहकारी संस्था | रुपये ६,८१,४००/— |
| ४. मॉ शेरावाली कन्स्ट्रक्शन कंपनी | रुपये १,८१,९९०/— |

तुलनात्मक तक्त्यानुसार मॉ शेरावाली कन्स्ट्रक्शन कंपनी यांची लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असून प्रशासनास त्यांच्याशी संविदेस मान्यता करीता स्थायी समितीपुढे प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. २०** — दिनांकः— ४/७/२००५

सुचकाचे नाव :— श्रीमती माया मसंद

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती रेखा कृष्णानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महापालिका सभागृह, स्थायी समिती सभागृह यांच्या देखभाल व साफसफाई कामी प्रशासनास मॉ शेरावाली या न्युनतम दराच्या निविदाकाराशी संविदा करण्यास व अंतर्भुत खर्च रु १८१,९९०/— यांस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती /पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :— विषय क्र. १० वाचुन दाखवितात

**विषय क्र. १०** :— उल्हासनगर शहरातील विद्युत विभागांतर्गत ८ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

काही सदस्य :—पास, पास ......

मा. सभापती :—सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

## प्रस्तावना

**विषय क्र. १०** :— उल्हासनगर शहरातील विद्युत विभागांतर्गत ८ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर महानगरपालिका विदयुत विभागाचे कामास दिलेल्या मंजुरीची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (डी) नुसार पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामांचे नाव | मंजुर निविदा रक्कम | मंजुरी दिनांक | एजंन्सीचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | विदयुत विभागासाठी शहरातील रस्त्यावरील दिवाबत्ती यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी खरेदी केलेल्या २ हैड्रोलिक प्लॉटफार्म वाहन चालविणे व त्यांची देखभाल करण्यासाठी ऑरेटर कॉन्ट्रक्ट पध्दतीने ५ वर्षासाठी ठेका देणे. | ५,०७,४८०/— | ११/४/०५ | मे. के. के. हायड्रोलिक |
| २ | मा.आयुक्त यांच्या दालनात विदयुतीकरण करण्याबाबत. | १,९०,६००/— | ३०/४/०५ | मे. जयहिंद मजुर कामगार सहकारी संस्था |
| ३ | पॅनल क्र. १२ मध्ये उप—महापौर निधितुन दिवाबत्ती लावणे. | १,५०,०००/— | ४/३/०५ | मे. गावदेवी मजुर कामगार संस्था |
| ४ | उल्हासनगर—४ व्ही.टी.सी. क्रीडा संकुल बैडमिंटन कोर्ट येथे सुशोभिकरण करणे. | १,२५,०००/— | २८/१/०५ | मे. प्रतिभा मजुर कामगार सहकारी संस्था |
| ५ | वित्तीय वर्ष २००५—२००६ मध्ये फेब्रीकेशन साहित्य खरेदी करणेस. | ७,४१,१२५/— | २८/४/०५ | १. मे. सीमरन टेक्नोर्कफट<br>२. मे. मेटलर्कफ इन्जीनिअर<br>३. मे. साईदिप इन्टरप्राईजेस |
| ६ | विदयुत निरिक्षकांनी दिलेल्या ऑबसरवेशन व विशेष कार्य इत्यादीसाठी मागविलेली निविदा. | ९,९१,९८०/— | २७/४/०५ | मे. जाधव आणि संन्स |
| ७ | वर्ष २००५—२००६ करीता मार्ग | ९,९९,८५०/— | १६/४/०५ | मे. जे.डी. इलेक्ट्रीक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | प्रकाशासाठी, उदयानात बसविलेल्या दिवाबत्ती खांब दुरुस्ती कार्यासाठी निविदा. | | | वार्क |
| ८ | शिवाजी चौक ते संतु बिल्डींग व जोड रस्ता नारायण दास जग्यासी मार्ग रस्त्यांवर दिवाबत्ती सोय करण्याबाबत. | ७,३५,८३८.५० | ९/६/०५ | मे. दामाणी इन्टरप्राईजेस |

तर सदरची माहिती कृपया स्थायी समिती अवलोकनार्थ प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. </u> २१      <u>दिनांकः— ४/७/२००५</u>

सुचकाचे नाव :— श्रीमती मोना वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. वाघे शामु

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरात विद्युत विभागांतर्गत करण्यात आलेल्या ८ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती /पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

**विषय क्र. ११** :— मोकाट कुत्रे पकडुन त्यांची शस्त्रक्रिया करणेकामी प्रशासनास मे. ॲनीमल वेल्फेअर सोसायटी, अंबरनाथ या न्युनतम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

<u>मा. सदस्य श्री नथु सोनवणे :—</u> यांचा रेकॉर्ड कोण ठेवणार? जे कुत्रे पकडण्यात येतील त्यांच्या गळयात पट्टा बांधला जावा.

<u>काही सदस्य :—</u>पास, पास ......

<u>मा. सभापती :—</u>सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना</u>

**विषय क्र. ११** :— मोकाट कुत्रे पकडुन त्यांची शस्त्रक्रिया करणेकामी प्रशासनास मे. ॲनीमल वेल्फेअर सोसायटी, अंबरनाथ या न्युनतम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील भटक्या कुत्र्यांवर शस्त्रक्रिया करुन त्यांना रेबिज लस देण्याची जाहिर सुचना मा. आयुक्त यांचे मान्यतेनुसार दि. १८/५/२००५ रोजी दै. नवाकाळ, दै. नवभारत, दै. हिंदू व दै. उल्हास विकास या वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर प्राप्त निविदा दि. २६/५/२००५ रोजी दुपारी ३.०० वाजता वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचे दालनात वैद्यकीय आरोग्य अधिकारी, मुख्य लेखा

परिक्षक व मुख्य लेखा अधिकारी यांचे उपस्थितीत निविदाकारांचे प्रतिनिधींचे उपस्थितीत उघडण्यात आली. सदर निविदांमध्ये खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ. क्र | कामाचे स्वरुप | निविदाकाराचे नाव | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, अंबरनाथ | मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, ठाणे | मे. लोकमान्य टिळक ग्रामीण सर्व सेवा संस्था, श्रीरामपुर | मे. ॲनिमल प्लॅनेट, उल्हासनगर |
| १ | मोकाट कुत्रे पकडणे | रु १३२०/– प्रति श्वान | रु १४००/– प्रति श्वान | रु १४६०/– प्रति श्वान | कागदपत्रांची पुर्तता न झाल्याने वित्तीय लिफाफा उघडण्यात आला नाही. |
| २ | पकडून सदरचे कुत्रे शस्त्रक्रिया ठिकाणी नेणे | | | | |
| ३ | प्रजनन शस्त्रक्रिया करणे व श्वानदंश लस देणे | | | | |
| ४ | शस्त्रक्रिया केलेल्या या कुत्र्यांवर बरे होईपर्यंत औषधोपचार व खानपान व्यवस्था करणे. | | | | |
| ५ | टेटॉईंग (शस्त्रक्रिया केल्याचे ओळखचिन्ह) करणे. | | | | |
| ६ | प्रजनन शस्त्रक्रिया झाल्यावर ज्या जागेवरुन पकडली तेथे नेऊन सोडणे | | | | |

उक्त प्राप्त निविदांपैकी मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, अंबरनाथ यांचा दर हा न्युनतम आहे. उपरोक्त न्युनतम दराच्या निविदाकाराशी वाटाघाटी करणत आल्या व वाटाघाटीअंती निविदाकाराने र १०० रु नी कमी करण्याचे मान्य केले. म्हणजेच वाटाघाटीअंती निविदाकार १२२०/– दराने काम करण्यात तयार झाला आहे. उपरोक्त दर हा अपेक्षित खर्चापेक्षा केवळ १.७० % ने जास्त आहे. तरी उपरोक्त न्युनतम दराची निविदा स्विकारण्यास हरकत नसावी. सन २००५ – ०६ या वर्षात अंदाजे २००० कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्याचे प्रस्तावित करण्यात येते. त्याकरिता सी – २ (ix) श्वान निर्बिजीकरण कार्यक्रम या लेखाशिर्षाखाली २५,००,००० रु तरतुद उपलब्ध आहे. तरी प्रति श्वान रु १२२०/– याप्रमाणे एकुण होणा–या २४,४०,०००/– रु खर्चास मान्यता मिळून वरील नमुद लघुत्तम निविदकार मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, अंबरनाथ यांचेशी प्रशासनास संविदा करण्यास मा. स्थायी समितीची वित्तीय व प्रशासकीय मान्यता मिळावी, ही विनंती.

स्थायी समिती ठराव क्र. २२ दिनांकः– ४/७/२००५

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. नथु सोनवणे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मोकाट कुत्रे पकडुन त्यांची शस्त्रक्रिया करणेकामी प्रशासनास मे. ॲनीमल वेल्फेअर सोसायटी, अंबरनाथ या न्युनतम दराच्या निविदाकाराशी संविदा करण्यास व अंतर्भुत खर्च रु. २४,४०,०००/– यांस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती /पीठासीन अधिकारी

<u>मा. सचिव :–</u> विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

**विषय क्र. १२** :– श्वानदंशावरील लस पुरविणेकामी प्रशासनास मे. एव्हीटीज फार्मा लिमिटेड, यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

<u>काही सदस्य :–</u>पास, पास ......

<u>मा. सभापती :–</u>सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना</u>

**विषय क्र. १२** :– श्वानदंशावरील लस पुरविणेकामी प्रशासनास मे. एव्हीटीज फार्मा लिमिटेड, यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

अधिक्षक, मध्यवर्ती रुग्णालय यांनी उल्हासनगर कार्यक्षेत्रातील श्वानदंश झालेले सरासरी नविन १० ते १५ रुग्ण व जुने ३५ ते ४० रुग्ण दररोज उपचारास्तव येत असतात.

सदर रुग्णांवर योग्य तो औषधोपचार करुन ए.आर.व्ही.चे इंजेक्शन देण्यात येते. सदर लसीचा पुरवठा हाफकिन संस्था, परळ, मुंबई यांचेमार्फत या रुग्णालयासाठी करण्यात येतो.

सद्यस्थितीत हाफकिन संस्था, परळ, मुंबई यांनी ए.आर.व्ही. लसीचे उत्पादन बंद केल्यामुळे या रुग्णालयाने सदर लसीचा पुरवठा त्यांचेकडुन होत नाही. त्यामुळे रुग्णांची गैरसोय होवुन प्रसार माध्यमे, वृत्तपत्रे तसेच लोकप्रतिनिधी यांच्याकडुन तक्रारी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी वरील नमुद रुग्णालयाने महानगरपालिकेकडुन ॲण्टी रेबिज लसीची मागणी केली होती.

शासकिय रुग्णालयात श्वानदंश उपचाराकरीता लागणारे ए.आर.व्ही. इंजेक्शन फक्त दारिद्रेषेखालील रुग्णांना तसेच शासन निर्णय क्र. जिरुफी/१०.००/प्र.क्र. ९०/२०००/आरोग्य–३ दिनांक १०/७/२००१ अन्वये मान्य करण्यात आला आहे.

मा. महासंचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांनी श्वान दंशावरील लस भावबंद करार (Rate Contract) असलेल्या दरकरारावरील संस्थेकडुन खरेदी करण्याचे सुचविले आहे. त्यांचे त्यांनी पत्र क्र. संआसे/ए.आर.व्ही./इंजेक्शन/कक्ष–३/२००५, दिनांक २/५/२००५ अन्वये सुचविले आहे.

मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र. राविशिवस/सौखक/ए.आर.व्ही/११३७/२००५, दिनांक ११/५/२००५ अन्वये सदर औषधाची खरेदी ही शासनाचा दरकरार बी.एम.सी. इ.एस.आय.सी., डी.जी.एस.डी. यांच्या दरकरारावर असलेल्या पुरवठादार कंपनीकडुन न्युनत्तम दराने खरेदी करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

इ.एस.आय.सी. चे पत्र क्र. २५/१२/१२४ आणि १२५/०–१ आर.सी.सेल. दिनांक १७/५/२००५ अन्वये रेबिपुर इंजेक्शनच्या दरकरारास दिनांक १ जुलै, २००५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यानुसार रेबिपुर इंजेक्शन (श्वान दंशावरील लस) मे. एव्हटीज फार्मा लिमिटेड यांच्याकडुन ८०० व्हॉयल्स खरेदी करुन त्याचा पुरवठा उल्हासनगर शहरातील मध्यवर्ती रुग्णालय यांना ५०० व्हॉयल्स व शासकिय प्रसृतीगृह येथे ३०० व्हॉयल्स याप्रमाणे पुरवठा करण्यात आले आहे. तसेच वरील नमुद कंपनीस १०० व्हॉयल्सच्या खरेदीवर फक्त ८२ व्हॉयल्सचे देयक देय आहे. तातडीची बाब म्हणुन रुपये १७६.८७/– प्रति व्हॉयल्स या दराने एकूण ८०० व्हायल्स खरेदी करण्यात आली असून सदर ॲण्टी रेबिज लस खरेदी करण्याकरीता रुपये १,१६,०२६.७२/– एवढा खर्च झाला आहे. सदर लस खरेदी करणेकरीता वित्तीय वर्ष २००५–२००६ आर्थिक अंदाजपत्रकात सी–२ (vi) कुत्रांच्या दंशावर औषधोपवार खर्च या लेखाशिर्षाखाली रुपये १,५०,०००/– तरतुद उपलब्ध आहे. तरी मे. एव्हीटीज फार्मा लिमिटेड यांचेशी शासनाच्या दरकरारानुसार निविदेशिवाय थेट संविदा करण्यात आली आहे. तरी कृपया मा. स्थायी समितीच्या मान्यतेकरीता सदरचा विषय मुंबई महानगरपालिका अधिनियम ५ (२) (२) अन्वये मा. स्थायी समितीसमोर सविनय सादर.

<u>स्थायी समिति ठराव क्र. २३</u> <u>दिनांक:– ४/७/२००५</u>

सुचकाचे नाव :— श्री. सुरेश जाधव

अनुमोदकाचे नाव :— श्री. मोकल चंदाराम

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव श्वानदंशावरील लस पुरविणेकामी प्रशासनाने मे. एव्हीटीज फार्मा लिमिटेड, यांच्याशी केलेल्या निविदेशिवाय थेट संविदेस कायम करीत आहे व अंतर्भुत खर्च रु. ११६,०२७/— यांस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती /पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

**विषय क्र. १३**:— महापालिकेच्या विविध कार्यालयात संगणक व संबधित साहित्य पुरविणेकामी प्रशासनास DGS&D किंवा CSPO मंजुर दराने त्यांच्या मान्यताप्राप्त कंपनीशी, उत्पादक कंपनीकडुन किंवा त्यांच्या प्राधिकृत विक्रेत्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

<u>काही सदस्य :—</u>पास, पास ......

<u>मा. सभापती :—</u>सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

## <u>प्रस्तावना</u>

**विषय क्र. १३**:— महापालिकेच्या विविध कार्यालयात संगणक व संबधित साहित्य पुरविणेकामी प्रशासनास DGS&D किंवा CSPO मंजुर दराने त्यांच्या मान्यताप्राप्त कंपनीशी, उत्पादक कंपनीकडुन किंवा त्यांच्या प्राधिकृत विक्रेत्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

शासनाच्या दिनांक २७/२/२००३ च्या निर्णयानुसार महानगरपालिकेने ठराव क्र. ४, दिनांक २५/४/२००३ अन्वये महानगरपालिकेने संगणकीकरण करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे.

सदर धोरणात्मक निर्णयाच्या अंतर्गत महापालिकेत नागरीक सुविधा केंद्र हे दिनांक १५/६/२००४ रोजी चाचणी तत्वावर सुरु झालेले आहे. सध्या १५० पेक्षा जास्त नागरीक या सुविधा केंद्राचा दररोज लाभ घेत आहेत. नागरीकांसाठी एकुण ६८ सेवा व १४२ तक्रारी उपलब्ध आहेत.

सदरचे सेवा, तक्रारी, जन्म मृत्यु दाखले, मालमत्ता कर भरणा (Receipt) इत्यादी कामे संगणकावर दाखल करण्यात आलेले आहेत. याप्रमाणे रोज नागरीक सुविधा केंद्रात येणा—या नागरीकांचा डेटा संगणकामध्ये

साठविला जात आहे. सदरचा डेटा हा महापालिकेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असल्याने हा साठविण्यासाठी नागरीक सुविधा केंद्रामार्फत DGS & D अंतर्गत व संगणक साहित्य खरेदी करण्यात आलेली होती.

सदरचे संगणक व प्रिंटर हे आयुक्त यांच्या परवानगीने महापालिकेतील विविध विभाग व प्रभाग क्षेत्र अधिकारी यांच्या गरजेनुसार त्यांना उपलब्ध करुन देण्यात आले. तसेच सदय स्थितीत मा. महापौर, मा. उप–महापौर, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्षनेता यांनी संगणक व प्रिंटर यांची मागणी केलेली आहे.

त्याचप्रमाणे नागरीक सुविधा केंद्रातील दहा संगणक व प्रिंटर हे महापालिकेतील काही विभाग व प्रभाग क्षेत्र अधिकारी यांचेकडे दिले असल्याने DGS & D रेट कॉन्ट्रक्ट वर संगणक व प्रिंटर इत्यादींची खरेदी करणे प्रस्तावित करणेत येत आहे. हे खरेदी करण्याकरीता भारत सरकारने DGS & D द्वारा कंपन्या व त्यांचे दर खरेदी करीता मंजुर केलेले आहेत. तसेच महाराष्ट्र शासनाने पण CSPO द्वारे काही कंपन्या व त्यांचे दर खरेदी करीता मंजुर केलेले आहेत.

सदरचे संगणक व संगणक साहित्य खरेदी करण्याकरीता सदर दोन्ही संस्था मार्फत मंजुर केलेल्या दरानुसार त्यांच्याकडील मंजुर कंपन्याकडुन हे साहित्य खरेदी करणे योग्य राहील. कारण DGD & D किंवा CSPO मोठया प्रमाणावर निविदा मागुन दर ठरवितात, त्यामुळे ते वाजवी असतात. तसेच गुणवत्ता चाचणी DGS & D किंवा CSPO द्वारा प्रमाणीत करण्यात येतात व त्यांनी ठरविलेल्या कंपन्या नामवंत असतात. त्यामुळे त्यांच्याकडुन थेट खरेदी करण्यात वाजवी दर, प्रमाणीकता ही नक्की होत आहे. त्यामुळे सदरचे संगणक व संगणक साहित्य हे थेट उत्पादक कंपन्याकडुन किंवा त्यांच्या प्राधिकृत विक्रेतेकडुन थेट खरेदी करणे रास्त राहील, कारण महापालिकेने निविदा मागवुन हार्डवेअर खरेदी करण्यात लागणारा कालावधी प्रशासकिय खर्च पण वाचेल. सदर खरेदीकरीता अंदाजित खर्च रुपये १० लाख अपेक्षित आहे. व वित्तीय वर्ष २००५–२००६ च्या अंदाजपत्रकात संगणक व संगणकीय साहित्य खरेदीसाठी रुपये २० लाखाची तरतुद आहे व त्यात पुरेशी तरतुद शिल्लक आहे.

वरील बाबी लक्षात घेता प्रशासनाला DGS & D किंवा CSPO मंजुर दराला त्यांच्या मान्यताप्राप्त कंपन्याकडुन, तसेच आयटमचे DGS & D किंवा CSPO नसेल ते थेट उत्पादकाकडुन किंवा त्यांच्या प्राधिकृत विक्रेत्यांकडुन खरेदी करण्याकरीता मंजुरीसाठी व लागणा–या अंदाजे खर्च रुपये १० लाख मान्यतेसाठीचा प्रस्ताव स्थायी समिती पटलावर सादर.

<u>स्थायी समिति ठराव क्र.</u> २४ <u>दिनांकः– ४/७/२००५</u>

सुचकाचे नाव :– श्री. मोहन साधवानी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव महापालिकेच्या विविध कार्यालयात संगणक व संबधित साहित्य पुरविणेकामी प्रशासनास DGS&D किंवा CSPO मंजुर दराने त्यांच्या मान्यताप्राप्त कंपनीशी, उत्पादक कंपनीशी किंवा त्यांच्या प्राधिकृत विक्रेत्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे व अंतर्भुत खर्च रु १० लाख यांस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

सभापती /पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :–</u> विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

**विषय क्र. १४:–** सन २००५ मध्ये श्री गणेश दर्शन प्रतियोगिता आयोजित करणेकामी प्रशासनास फायदेशिर कंत्राटदाराशी निविदेशिवाय थेट संविदेस व

अंतर्भुत खर्चास मान्यता देणे.

<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी :—</u> माझी एक विनंती आहे, मागील वर्षी ज्या ठेकेदाराने काम केले होते त्या ठेकेदाराने या वर्षीदेखिल त्याच दराने काम करण्यास संमती दर्शविली असुन तसे पत्रही दिले आहे. यावर प्रशासनाने योग्य तो निर्णय घ्यावा. मागील वर्षी आचारसंहिता असल्याने अधिका—यांची समिती बनविण्यात आली होती. अजुनही मागील वर्षीचे बक्षिस वितरण झालेले नाही. जर मागील वर्षीच्या ठेकेदाराने योग्य दर दिले असतील तर त्यालाच काम द्या. यामुळे आपला जाहिरात काढण्याचा खर्चही वाचेल.

<u>मा. सदस्य श्री मोहन साधवानी :—</u> दुस—या ठेकेदाराचे दर आले नाहीत तर कसे काय कळेल?

<u>काही सदस्य :—</u>पास, पास ......

<u>मा. सभापती :—</u>सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

<u>प्रस्तावना</u>

**विषय क्र. १४:—** सन २००५ मध्ये श्री गणेश दर्शन प्रतियोगिता आयोजित करणेकामी प्रशासनास फायदेशिर कंत्राटदाराशी निविदेशिवाय थेट संविदेस व अंतर्भुत खर्चास मान्यता देणे.

सालाबाद प्रमाणे वर्ष—२००५ मध्ये येणा—या गणेश उत्सवात उल्हासनगर महानगरपालिकेच्या क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतीक समितीतर्फे सार्वजनिक गणेण उत्सव मंडळाची स्पर्धा आयोजीत करण्यात येणार आहे. या वर्षी दिनांक. ७ सप्टेंबर,२००५ ते १७ सप्टेंबर,२००५ पर्यंत श्री गणेश उत्सव साजरा होणार आहे. सदर स्पर्धेत अंदाजे २०० पेक्षा अधिक सार्वजनिक मंडळे भाग घेत असतात त्यांना पुढिल प्रकारात पारितोषके दिलेली जातात.

१) उत्कृष्ट श्री गणेश मुर्ती (विजेता क्रमांक. १ ते ४)
२) उत्कृष्ट सजावट (विजेता क्रमांक. १ ते ४)
३) उत्कृष्ट राष्ट्रीय एकात्मता देखावा (विजेता क्रमांक. १ ते ४)
४) उत्कृष्ट विषय वातावरण (विजेता क्रमांक. १ ते ४)
५) उत्कृष्ट विषय (विजेता क्रमांक. १ ते ४)
६) उत्कृष्ट स्वच्छता (विजेता क्रमांक. १ ते ४)
७) उत्कृष्ट शिष्टाचार (विजेता क्रमांक. १ ते ४)
८ उत्कृष्ट देखावा (विजेता क्रमांक. १ ते ४)
९) उत्कृष्ट चलचित्र देखावा (विजेता क्रमांक. १ ते ४)
१०) उत्कृष्ट विशेष प्रदर्शन (विजेता क्रमांक. १ ते ४)

उपरोक्त नमूद पारितोषके महानगरपालिकेतर्फे देण्यात येत असतात. या वर्षापासून शहरातील सर्व सार्वजनिक श्री गणेश उत्सव मंडळातून एका मंडळाचा मुर्तीची उल्हासनगरचा राजा म्हणून निवड करुन त्यांना एक वेगळे पारितोषक देण्याबाबत समितीचा मनोदय आहे.

या स्पर्धेमध्ये साहित्याचा खर्च खालील प्रमाणे अंदाजीत आहे.

## (१) <u>पारितोषेक:</u>

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) | १५ इंच X १५ इंच | —— | ९ नग नमुन्याप्रमाणे | —— | ०,४८,०००/—रु. |
| (२) | १२ इंच X १२ इंच | —— | ९ नग नमुन्याप्रमाणे | —— | ०,४०,०००/—रु. |
| (३) | १० इंच X १० इंच | —— | ९ नग नमुन्याप्रमाणे | —— | ०,३५,०००/—रु. |
| (४) | ०८ इंच X ०८ इंच | —— | ९ नम नमुन्याप्रमाणे | —— | ०,३०,०००/—रु. |
| (५) | १८ इंच X १८ इंच | —— | १ नग नमुन्याप्रमाणे | —— | ०,०७,०००/—रु. |
| (६) | ०६ इंच X ०६ इंच | —— | १०० नग नमुन्याप्रमाणे | —— | ०,२०,०००/—रु. |

\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\- एकूण
रुपये १,८०,०००/—रु.

\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-

(२) <u>व्हिडोयो कॅमेरा चित्रकरन व संकलन:</u>
(ध्वनीसह) १० दिवसासाठी संकलन आणि ध्वनीसह —— ०,४५,०००/—

(३) <u>फोटो ग्राफी:</u>
८० फोटो प्रत्येक दिवशी १० दिवस —— ०,२०,०००/—रु.
(६''X ४'') साईजचे व अंतीम दिवशी पारितोषक वितरण
१०० फोटो **(एकूण ९०० फोटो)**

(४) <u>छपाई खर्च:</u>

| | | | |
|---|---|---|---|
| प्रमाण पत्र ३ प्रकारची | ३०० नग | —— | ०३,०००/—रु. |
| निमंत्रण पत्रिका कवरसह | २०० नग | —— | ०२,०००/—रु. |
| गुण पत्रिका (रु.१ प्रत्येकी) | २५०० नग | —— | ०२,५००/—रु. |
| कापडी फलक (३ ग ९) एकूण | ३ नग गणेश कमिटी मेंबरसाठी | —— | ०२,०००/—रु. |
| २१ पेन, २१ फाईल, २१ बॅजेस् प्रत्येकी रु.१५०/—प्रमाणे | | —— | ०३,५००/—रु. |
| | एकूण रक्कम | —— | १३,०००/—रु. |

(५) <u>चहा व जेवणखर्च:</u>
एकूण २१ सदस्य, दोन वाहन चालक, व दोन कर्मचारी दोन मुव्ही
कैमेरा वाले, एकूण २७ व्यक्ती दोन वेळ चहा व एक वेळ जवेण
अंदाजीत खर्च रु.१,८००/— एक दिवसाचे खर्च एकूण १० दिवसाचा—— १८,०००/—रु.

(६) <u>मुर्तीकार सजावटकार (मानधन)</u>
मुर्तीकार व सजावट कार यांचे मानधन प्रत्येकी रु.३००/—रोजप्रमाणे
रु.६००/— दोन व्यक्तीचे असे १० दिवसासाठी
एकूण रक्कम —— ०६,०००/—रु.

(७) <u>पारितोषक वितरणाचा खर्च:</u>

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | खुर्ची प्रत्येक रु.५/—प्रमाणे ३०० खुर्ची | —— | ०१,५००/—रु. |
| (२) | टेबल १० नग कवरसह प्रत्येकी रु.३०/— | —— | ००,३००/—रु. |
| (३) | ध्वनी क्षेपण व्यवस्था एक दिवस (२ माईकासह) | —— | ०१,०००/—रु. |
| (४) | नारळ ५० नग रु.१०/—प्रत्येकी | —— | ५००/—रु. |
| (५) | हार ५० नग रु.३०/—प्रत्येकी | —— | १८००/—रु. |
| (६) | शाल ५० नग रु.१५०/—प्रत्येकी | —— | ७५००/—रु. |
| | **एकूण रक्कम** | —— | **१२,६००/—रु.** |

वरील गणेशदर्शन प्रतियोगीता — २००५ या कार्यक्रमासाठी एकूण अंदाजीत खर्च रुपये <u>२,९४,६००/</u>—**(दोन लाख चौ—यान्नव हजार सहाशे रु.मात्र)** आहे खर्च अंदाजित लेखाशिर्ष सी—४ च्या उपशिर्ष—५ सांस्कृतीक कार्यक्रम व इतर खर्च शिर्षातील रु.१०,००,०००/—निधी मधून करावयाचा आहे.

सदरचा अंदाजीत खर्च रु.<u>२,९४,६००/</u>—मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सविनय सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र. २५</u> <u>दिनांकः— ४/७/२००५</u>

सुचकाचे नाव :— श्रीमती मोना वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती संगिता जावळे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव सन २००५ मध्ये श्री गणेश दर्शन प्रतियोगिता आयोजन करण्यास व अंतर्भुत खर्च रु २९४,६००/— यांस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती /पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. १५ वाचुन दाखवितात

**विषय क्र. १५:—** उल्हासनगर शहरातील मालमत्तांचे व नळजोडण्यांचे सर्वेक्षण व नंबरींग पध्द्त विकसीत करणेकामी प्रशासनास न्युनतम दराचे निविदाकार मे. बियॉड सॉफ्टवेअर प्रा.लि., यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

<u>मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :—</u> बजेटमध्ये या कामासाठी तरतुद उपलब्ध आहे काय?

<u>मा. आयुक्त :—</u> २० लाखांची तरतुद उपलब्ध आहे उर्वरित १० लाखांसाठी सुधारित अर्थसंकल्पात तरतुद करावी लागेल.

<u>काही सदस्य :—</u>पास, पास ......

<u>मा. सभापती :—</u>सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

<u>प्रस्तावना</u>

**विषय क्र. १५:—** उल्हासनगर शहरातील मालमत्तांचे व नळजोडण्यांचे सर्वेक्षण व नंबरींग पध्द्त विकसीत करणेकामी प्रशासनास न्युनतम दराचे निविदाकार मे. बियॉड सॉफ्टवेअर प्रा.लि., यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील अंदाजे १,४२,००० असणाऱ्या मालमत्तांमध्ये खालील दोषामुळे महानगरपालिकेच्या मागणी व वसुलीत परिणाम होतो.

१. एकाच मालमत्तेची दुबार नोंद
२. अस्तिवात नसलेल्या मालमत्तांची नोंद
३. आकारणी योग्य असलेल्या परंतु आकारणी न केलेल्या
४. बांधकाम वापर व स्वरूप बदल
५. कायम स्वरूपी घर क्रमांक नाही.

यासाठी भौगोलिक माहिती सुचना प्रणालीचा वापर करून अशा मालमत्ता निष्चित करणे त्याचप्रमाणे या माहितीच्या आधारे सर्व अस्तिवातील मालमत्तांसाठी नंबरीग पद्धती विकसित करणे आवश्यक असल्याने दि. ६/५/२००५ रोजी दैनिंक 'लोकमत' व 'द फ्रि प्रेस जर्नल' या वृत्तपत्रात सदर बाबतची जाहीर निविदा नोटीस प्रसिद्ध करण्यात आली होती.

या निविदेनुसार खालीलप्रमाणे निविदाधांरकांकडुन अतिम मुदतीच्या आत निविदा सादर करण्यात आल्या होत्या.

१. मे. रोल्टा इंडिया लि. अंधेरी, मुंबई
२. मे. स्पिक सिस्टिम लि. सिकंदराबाद
३. मे. बियॉड सॉप्टवेअर, प्रा. लि. डोंबिवली
४. मे. झिंथ टेक्नॉलोजिस, विशाखापट्टणम
५. मे. सी. ई इन्फो सिस्टीम प्रा. लि. न्यु दिल्ली

वर नमुद निविदाधारकांनी सादर केलेल्या निविदा त्याच दिवषी संबंधित निविदाधारकाचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आल्या.

निविदेत सादर केलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | निविदाधारकाचे नाव व पत्ता | प्रति मालमत्ता रू. | नळ जोडणी रू. |
|---|---|---|---|
| १ | मे. रोल्टा इंडिया लि. अंधेरी, मुंबई | २४ | ९ |
| २ | मे. स्पिक सिस्टिम लि. सिकंदराबाद | ७२ | १८ |
| ३ | मे. बियॉड सॉप्टवेअर, प्रा. लि. डोंबिवली | १७ | १२ |
| ४ | मे. झिंथ टेक्नॉलोझिस, विशाखापट्टणम | २५ | ५ |
| ५ | मे. सी. ई इन्फो सिस्टीम प्रा. लि. न्यु दिल्ली | १९.९० | ९.९० |

उपरोक्त निविदाधारकांनी सादर केलेल्या व उघडण्यात आलेल्या निविदांची छाननी करणेसाठी कार्यालयीन आदेष क्र. जा.क्र. उमपा/करवि/५१/०५, दि. ९/५/२००५ अन्वये या बाबीशी संबंधित अधिकाऱ्यांची खालीलप्रमाणे समिती गठण करण्यात आली होती.

१. उप आयुक्त (शहर)
२. कर निर्धारक व संकलक
३. मुख्य लेखा अधिकारी
४. मुख्य लेखा परिक्षक
५. संगणक प्रोग्रामर
६. कार्यकारी अभियंता (विद्युत)

समितीने दि. ३१/५/२००५ रोजी सकाळी ११.०० वा. उप आयुक्त (शहर) यांचे दालनात कामाचे तांत्रिक व आर्थिक बाबीचा आढावा घेतला. मे. बियॉड सॉप्टवेअर, प्रा. लि. डोंबिवली यांनी सादर केलेले दर न्युनतम असल्याने त्यांना दि. ६/६/२००५ रोजी कामाची पद्धत, कालावधी, मनुष्यबळ इ. बाबत वेळापत्रक व संगणकीय सादरीकरण करण्याचे समितीद्वारा कळविण्यात आले.

त्यास अनुसरून मे. बियॉड सॉप्टवेअर, प्रा. लि. डोंबिवली यांनी कामाची पद्धत, कालावधी, मनुष्यबळ इ. बाबत वेळापत्रक व संगणकीय सादरीकरण समाधानकारक असल्याचे समितीद्वारा सुचित करण्यात आले.

तथापि, नळजोडणी करीता मे. बियॉड सॉप्टवेअर, प्रा. लि.डोंबिवली यांनी रू. १२/– व मे. झिंथ टेक्नॉलोझिस, विशाखापट्टणम यांनी रू. ५/– असे दर सादर केलेले होते. हे दर पाहता मे. बियॉड सॉप्टवेअर, प्रा. लि.डोंबिवली यांनी सादर केलेले दर जास्त होते. त्यात चर्चा करून दर कमी करणेबाबत अहवाल समितीने सादर केलेला होता.

मे. बियॉड सॉप्टवेअर, प्रा. लि.डोंबिवली यांनी नळ जोडणी करीता सादर केले दर रू. १२/— हे कमी करणेसाठी जा. क्र. उमपा/करवि/७९/०५, दि. १५/६/२००५ रोजी चर्चेसाठी बोलविण्यात आलेले होते.

सदर चर्चेनुसार मे. बियॉड सॉप्टवेअर, प्रा. लि. डोंबिवली यांनी दि. १७/६/२००५ च्या पत्रान्वये प्रति नळ जोडणी चे कामाकरीता रू. ७.५०/— या दराने काम करण्यास तयार असलेचे कळविले आहे.

भौगोलिक माहिती सुचना प्रणालीचा वापर करून अशा मालमत्ता निष्चित करणे त्याचप्रमाणे या माहितीच्या आधारे सर्व अस्तिवातील मालमत्तांसाठी नंबरीग पद्धती विकसित करणेकामी महानगरपालिका क्षेत्रातील अंदाजे १,४२,००० असणाऱ्या मालमत्ता व नळजोडणी ४५००० साठी अंदाजे रू. ३० लाख खर्च अपेक्षित आहे.

सन २००५—२००६ च्या अंदाजपत्रकात ***l.3 .गप्*** या लेखाशीर्षा अंतर्गत रू. २० लाख स्टेशनरी व प्रिटींगसह संगणकीय खर्च (कर व पगार बिले ई.) करण्याची तरतुद आहे. उर्वरीत रक्कमेची तरतुद सुधारीत अंदाजपत्रकात करण्यात येईल.

महानगरपालिकेकडुन खालील दराने मे. बियॉड सॉप्टवेअर, प्रा. लि. डोंबिवली यांना सदर कामकाजासाठी प्राधिकृत करण्यास व येणाऱ्या खर्चास तसेच सुधारीत अंदाजपत्रकात वाढीव तरतुद करणेचे अधिन राहुन मान्यता देणेबाबत निविदा मंजुर करणेसाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| निविदाधारकाचे नाव व पत्ता | प्रति मालमत्ता रू. | प्रति नळ जोडणी रू. |
|---|---|---|
| मे. बियॉड सॉप्टवेअर, प्रा. लि. डोंबिवली | १७.०० | ७.५० |

स्थायी समिती ठराव क्र. २६ — दिनांकः— ४/७/२००५

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. नथु सोनवणे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव व आवश्यक रक्कम सन २००५—०६ चे अर्थसंकल्पीय अनुदानात सुधारणेस अधिन राहुन उल्हासनगर शहरातील मालमत्तांचे व नळजोडण्यांचे सर्वेक्षण व नंबरींग पध्द्त विकसीत करणेकामी प्रशासनास न्युनतम दराचे निविदाकार मे. बियॉड सॉफ्टवेअर प्रा.लि., यांच्याशी संविदेस व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती /पीठासीन अधिकारी<br>
स्थायी समिती सभा<br>
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :–</u> विषय क्र. १६ वाचुन दाखवितात

**विषय क्र. १६ :–** उल्हासनगर शहरामधील नाले सफाईचे काम प्रोक्लेन मशीनद्वारे करण्याकामी प्रशासनास मेसर्स महादेव इन्टरप्रायझेस या न्युनत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे

<u>काही सदस्य :–</u>पास, पास ......

<u>मा. सभापती :–</u>सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

<u>प्रस्तावना</u>

**विषय क्र. १६ :–** उल्हासनगर शहरामधील नाले सफाईचे काम प्रोक्लेन मशीनद्वारे करण्याकामी प्रशासनास मेसर्स महादेव इन्टरप्रायझेस या न्युनत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे

महापालिका क्षेत्रातील नालेसफाईचे रु.९,९६,०००/–खर्चाचे काम पावसाळयापूर्वी पूर्ण करणेकरिता जाहिर निविदा मागविण्यात आल्या होत्या. या कामासाठी एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या असून त्यातील दर पुढिल प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मे. महादेव इंटरप्रायझेस | निविदा दरापेक्षा | २३ % जादा दराने |
| २) | मे. ईगल कस्ट्रक्शन | निविदा दरापेक्षा | ३० % जादा दराने |

वरील पैकी न्युनतम दराचे निविदाधारक मे. महादेव इंटरप्राईजेस यांना दिनांक. २४/५/२००५ रोजी वाटाघाटीकरिता बोलविण्यात आले होते. वाटाघाटी दरम्यान निविदादर कमी करुन २३ % ऐवजी ५ % जादा दराने म्हणजेच रु. १०,४५,०००/– काम करण्यास ठेकेदाराने संमती दर्शविली आहे. याबाबत मे. महादेव इंटरप्राईझेस यांनी तसे लेखी संमतीपत्र दिलेले आहे. सदर काम तातडीने पुर्ण करणेसाठी ठेकेदारास स्विकृतीपत्र देऊन कामाचे कार्यादेश देणे आवश्यक आहे.

तरी सदर कामास स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

<u>**स्थायी समिती ठराव क्र.**</u> २७ <u>दिनांकः– ४/७/२००५</u>

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. गणपत एडके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील कॅम्प नं. १ ते ५ मधील नाले सफाईचे काम प्रोक्लेन मशिनद्वारे पावसाळयापूर्वी पूर्ण करणेकामी प्रशासनास मे. महादेव इंन्टरप्रायझेस या न्युनतम दराच्या निविदाकाराशी संविदेस व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

सभापती /पीठासीन अधिकारी

**मा. आयुक्त :—** याशिवाय प्रशासनाच्या वतीने आयत्या वेळचा प्रस्ताव म्हणुन एक विषय आणण्यात आला आहे, आपली अनुमती असल्यास तो आजच्या सभेच्या कामकाजात आयत्या वेळचा विषय म्हणुन सामावुन घेता येईल.

**विषय** :— महापौर, उप—महापौर व इतर पदाधिकारी कार्यालयांच्या अतिथी भत्तामध्ये वाढ करण्यास मंजुरी देणे.

**मा. सभापती :—** सदरचा प्रस्ताव आयत्या वेळचा विषय म्हणुन सर्वानुमते सभेच्या कामाकाजात समाविष्ट करण्यात येत आहे.

**मा. सचिव :—** आयत्या वेळचा विषय क्र. १७ वाचुन दाखवितात

*आयत्यावेळचा विषय*

**विषय क्र. १७** :— महापौर, उप—महापौर व इतर पदाधिकारी कार्यालयांच्या अतिथी भत्तामध्ये वाढ करण्यास मंजुरी देणे.

**मा. सदस्य श्री राजु जग्यासी :—** मा. महापौरांनी रु ७५००, उपमहापौरांना रु ३७००, स्थायी समिती सभापती रु ३७००, सभागृह नेता रु १५०० व विरोधी पक्षनेता यांना १५०० याप्रमाणे भत्ता देण्यात यावा अशी आमची शिफारस आहे.

**काही सदस्य :—**पास, पास ......

**मा. सभापती :—**सदरचा विषय पुढीलप्रमाणे सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

**प्रस्तावना**

*आयत्यावेळचा विषय*

**विषय क्र. १७** :— महापौर, उप—महापौर व इतर पदाधिकारी कार्यालयांच्या अतिथी भत्तामध्ये वाढ करण्यास मंजुरी देणे.

शहराचा प्रथम नागरीक महापौर या नात्याने महापौर यांचे कार्यालयामध्ये तसेच उप—महापौर आणि स्थायी समिती सभापती यांचे कार्यालयामध्ये विविध मान्यवर नेतागण विशेष अतिथी शासकिय अधिकारी, महापौर कार्यालय, उप—महापौर कार्यालय आणि स्थायी समिती कार्यालयामध्ये विविध विषयावर चर्चासत्र व आयोजित बैठकीसाठी येत असतात. महापौर कार्यालय, उप—महापौर कार्यालय आणि स्थायी समिती कार्यालयामध्ये येणारे मान्यवर अतिथी व शासकिय अधिकारी यांना बैठकीचे वेळेस चहा, कॉफी, थंड पेये इत्यादीसाठी होणा—या खर्चाची सध्याची तरतुद पुरेशी पडत नाही. त्यामुळे इतर महानगरपालिका प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये मा. महापौर, मा. उप—महापौर व इतर पुढील सर्व पदाधिकारी यांना पुढीलप्रमाणे अतिथी भत्ता स्थायी समितीच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

| | | प्रचलित अतिथी भत्ता (दरमहा) | प्रस्तावित अतिथी भत्ता (दरमहा) |
|---|---|---|---|
| १. मा. महापौर | —— | रुपये ५, ०००/— | रुपये ०७, ५००/— |
| २. मा. उप—महापौर | —— | रुपये १, ५००/— | रुपये ०३, ०००/— |
| ३. मा. सभापती स्थायी समिती | —— | रुपये १, ५००/— | रुपये ०३, ०००/— |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. मा. सभागृह नेता | —— | रुपये ५००/— | रुपये ०१, ०००/— |
| ५. मा. विरोधी पक्ष नेता | —— | रुपये ४५०/— | रुपये ०१, ०००/— |

वरील प्रस्तावित सुधारीत अतिथी भत्ता स्थायी समिती व मा. महासभेच्या मंजूरी नंतर, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १९(अ) (२) मधील तरतुदी नुसार राज्य शासनाच्या मान्यतेनंतर अदा करणेत यावा असे प्रस्तावित करण्यात येत आहे.

सदर प्रस्तावात चर्चेअंती स्थायी समिती सदस्यांनी उपसूचना मांडली असुन पुढीलप्रमाणे भत्त्यात वाढ करणेबाबत प्रस्तावित केले आहे.

| | | प्रचलित अतिथी भत्ता (दरमहा) | स्थायी समिती सदस्यांनी प्रस्तावित केलेला अतिथी भत्ता (दरमहा) |
|---|---|---|---|
| १. मा. महापौर | —— | रुपये ५, ०००/— | रुपये ०७, ५००/— |
| २. मा. उप—महापौर | —— | रुपये १, ५००/— | रुपये ३७५०/— |
| ३. मा. सभापती स्थायी समिती | —— | रुपये १, ५००/— | रुपये ०३, ७५०/— |
| ४. मा. सभागृह नेता | —— | रुपये ५००/— | रुपये ०१, ५००/— |
| ५. मा. विरोधी पक्ष नेता | —— | रुपये ४५०/— | रुपये ०१, ५००/— |

<u>स्थायी समिती ठराव क्र. २८</u> <u>दिनांकः— ४/७/२००५</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी
अनुमोदकाचे नाव :— श्री. गणपत एडके

ही स्थायी समिती महापालिकेच्या व शासन मंजुरीस अधिन राहुन वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे महापौर, उपमहापौर, सभापती स्थायी समिती, सभागृह नेता व विरोधी पक्ष नेता यांच्या कार्यालयासाठी खालीलप्रमाणे अतिथी भत्ता मान्य करीत आहे.

| | | अतिथी भत्ता (दरमहा) |
|---|---|---|
| १. | मा. महापौर | रुपये ०७, ५००/— |
| २. | मा. उप—महापौर | रुपये ३७५०/— |
| ३. | मा. सभापती स्थायी समिती | रुपये ०३, ७५०/— |
| ४. | मा. सभागृह नेता | रुपये ०१, ५००/— |
| ५. | मा. विरोधी पक्ष नेता | रुपये ०१, ५००/— |

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती /पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५–४० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

**(प्रकाश पं. कुकरेजा)**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः–१२ ऑगस्ट, २००५

दि. १२.८.२००५ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिति सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक १२.८.२००५ रोजी सांयकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

८. *मा. सभापती – श्रीमती ज्योती सुरेश (पप्पु)कालानी*
१. श्री. वनवारी किशोर नारायणदास
३. श्री. एडके गणपत गोविंद
४. श्री. गायकवाड सुरेश नामदेव
५. श्रीमती जावळे संगिता रमेश
६. श्रीमती वनवारी मोना अशोक
७. श्री. साधवानी मोहन रहंदोमल
८. श्रीमती कृष्णानी रेखा हरेश
९. श्री जग्यासी राजु किशनचंद
१०. श्री. जाधव सुरेश मधुकर
११. श्रीमती मसंद माया घनश्यामदास
१२. श्री मोकल चंदाराम विठोबा
१३. श्री वाघे श्यामु बाबु
१४. श्रीमती ससाणे लक्ष्मी रोहिदास

तर,

मा. सदस्य श्री. बठिजा संजय रामचंद्र व श्री. सोनवणे नथु काशिराम हे अनुपस्थित होते.

सायंकाळी ४–५० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

मा. आयुक्त श्री. आर.के.सोनवणे हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या जागी श्री उत्तम लोणारे, उपायुक्त (मुख्यालय) हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन उपस्थित होते.

**मा. सचिव :–** विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :–** मागील सभेचे दिनांक ४/७/०५ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>मा. सदस्य श्री मोहन साधवानी :—</u> आपल्या कर्मचा—यांना जे रेनकोट देण्यात आले आहेत त्यावर महापालिकेचे नांव टाकलेले नाही, नांव टाकले असते तर चांगले झाले असते. नांव न टाकल्याने ते रेनकोट विकु देखिल शकतात.

<u>श्री. उत्तम लोणारे, आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी :—</u> ही चांगली सूचना आहे, पुढील वेळी यावर नक्कीच विचार करण्यात येईल.

<u>काही सदस्य :—</u> पास, पास...........

<u>मा. सभापती :—</u> मागील सभेचे दिनांक ४/७/२००५ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ <u>विषय क्र. २ :—</u> उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ३७ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास, पास ......

<u>मा. सभापती :—</u>सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

<u>प्रस्तावना</u>

**विषय क्र. २ :—**उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ३७ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् 2004-2005 च्या निधीतून मा. नगरसेवक यांनी कामे करणेसाठी विंनती केलेली आहे.

| अ.क. | | कामांचे नाव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1319 | उल्हासनगर-2 येथील प्रभाग क. 23 मध्ये निर्मल अपार्टमेंट ते झुलेलाल शाळेपर्यत व यात्रीनिवास ते शांतीपॅलेस येथील गतिरोधकांना शर्मा प्लास्टिक करणे बाबत (महानगरपालिका निधी 1319) | 60732 | 22/3/2005 | धनलक्ष्मी मजूर कामगार सहकारी संस्था |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 417 | उल्हासनगर- येथील प्रभाग क्र. 25 मध्ये साकव बांधेणे राधाकृष्ण चौक येथे (नगरसेवक निधी 1117) | 199000 | 27/5/2005 | मे मुंब्रादेवी म. का सोसा. |
| 3 | 863 | उल्हासनगर-3 येथील बॅ नं 506, च्या बाजूला प्रभाग क्र. 23 मध्ये जुन्या शौचालयाच्या जागेवर समाज मंदिर बांधणे (नगरसेवक निधी 863) | 198500 | 29/4/2005 | मे कलश म. का. सोसा. |
| 4 | 891 | उल्हासनगर-3 वार्ड नं 19, गजानंद महाराज मंदिर साईबाबा नगर येथे नाली बांधणे (प्रभाग समिती निधी 891) | 49723 | 27/5/2005 | मे वडार म. का. सोसा. |
| 5 | 989 | उल्हासनगर-4 येथील प्र क्र. 9 मधील कुर्ला कॅम्प परिसरातील पांडू फुलोरे यांच्या घराजवळील बावडीजवळ सिमेंट पायवाटा व नाली पुनर्बांधणी करणे. (नगरसेवक निधी 989) | 99600 | 8/6/2005 | मे खंडेराव म का सोसा |
| 6 | 1004 | उल्हासनगर- येथील प्रभाग क्र. 2 मधील उद्यानाचे नुतनीकरण व सुशोभिकरण करणे. (मा. महापौर निधी 1004) | 199550 | 27/5/2005 | मे हरे रामा म. का. सोसा |
| 7 | 1014 | उल्हासनगर-3 येथील प्र क्र. 25 मध्ये फॉलवर लाईन येथील सोपान हाऊस ते प्रेमबत्ती यांच्या घरापर्यत बॅ नं 1130, 31, 32 येथील सिमेंट पायवाटा व नाल्या दुरूस्ती करणे. (प्रभाग समिती क्र. 2 निधी 1404) | 199840 | 8/6/2005 | मे भोलेनाथ म. का. सोसा |
| 8 | 1047 | उल्हासनगर-5 येथील समशान भूमी मध्ये लाकडाचा साठी ठेवण्याकरिता रोड बनविणे व मुख्य रस्ता बनविणेबाबत (1047) | 499965 | 8/6/2005 | मे सप्तश्रृंगी म का सोसा |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 9 | 1114 | उल्हासनगर-4 येथील प्रभाग क्र. 15 मधील बॅ नं 1320 ते 1322 व 1309, 1310, 1354, 1342, 1396 समोर कच्छपाडा आयुष्यमाननगर पर्यत सी सी एम-250 ने पायवाटा बांधणे. (नगरसेवक निधी 1114) | 199639 | 27/5/2005 | मे श्री मॉ म. का. सोसा. |
| 10 | 1230 | उल्हासनगर-3 येथिल प्रभाग क्र 23 येथील भारतीय हिंन्दी शाळेजवळ, एम-350 ने रस्ता बनविणे व नाली बनविणे (नगरसेवक निधी 1230) | 199600 | 27/5/2005 | मे. कलश म का सोसा. |
| 11 | 1330 | उल्हासनगर- 5 येथील प्रभाग क्र. 13 मधील शिव पॅलेस द्रोपती अपार्टमेंट आणि हिरापुरी चौकच्या बाजुची नाली दुरूस्ती करणे व सी सी पायवाटा दुरूस्ती करणे (प्रभाग समिती क्र 4 निधी 1330) | 100000 | 27/5/2005 | मे धीरज म. का. सोसा. |
| 12 | 1332 | उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र. 13 मधील बॅ नं 1694, 95, 96, महाविर हॉस्पिटल पर्यत नाली दुरूस्ती करणे व सी सी पायवाटा दुरूस्ती करणे. (प्रभाग समिती क्र. 4 निधी 1332) | 100000 | 27/5/205 | मे अमेय म. का सोसा |
| 13 | 1355 | उल्हासनगर-4 येथील प्रभाग क्र. 14 मधील नेताजी विभागातील प्रकाश फ्रुट जवळ व पिसपार्क उद्यानाजवळील पायवाटा व नाली दुरूस्ती करणे. (प्रभाग समिती क्र. 4 निधी 1355) | 99400 | 27/5/205 | मे. कलश म का सोसा. |
| 14 | 1356 | उल्हासनगर-3 येथील बॅ नं 631, 679, 677, 566, 555, 561, सी सी पायवाटा व नाली बनविणे (नगरसेवक निधी 1356) | 200000 | 27/5/205 | मे. गुरूदेव म. का. सोसा. |
| 15 | 1357 | उल्हासनगर-3 येथील बॅ नं 659, 60, 61, 62, 744 मध्ये सी सी पायवाटा व नाली बनविणे. (नगरसेवक निधी 1357) | 150000 | 27/5/205 | मे ओम म. का. सोसा. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 16 | 1382 | उल्हासनगर-1 येथील प्रभाग क्र. 4 मधील बॅ नं 129, मागे हर्षवर्धननगर येथील गायकवाड किराणा जवळ, तबेला जवळील सी सी पायवाट व नाल्या दुरूस्ती करणे. (प्रभाग समिती क्र 1 निधी 1382) | 100000 | 27/5/205 | मे मुंब्रादेवी म. का सोसा. |
| 17 | 1396 | उल्हासनगर-3 येथील सिमेट पायवाटा व नाल्या दुरूस्त करणे, आण्णा यांचे घर गुजराथी पाडा टी सी दास ते आईस फॅक्टरी जवळ प्रभाग क्र.7 | 99800 | 27/5/205 | मे शिवअमृत म. का. सोसा |
| 18 | 1397 | उल्हासनगर-3 प्र. क्र. 7 सिमेंट पायवाटा व नाल्या दुरूस्त करणे राज याचे घर ते यादव यांचे घर व राजपूत किराणा स्टोर, राम मटेरियल सप्लायर ते साकव सुभाषनगरमधे (प्रभाग समिती क्र 2 निधी 1397) | 99800 | 27/5/205 | मे शिवअमृत म. का. सोसा |
| 19 | 1403 | उल्हासनगर-3 मध्ये गोरखापाडा येथील सिमेंट पायवाटा व नाल्या दुरूस्ती करणे. (प्रभाग समिती क्र 2 निधी 1403) | 99900 | 27/5/205 | मे साहिल म. का. सोसा |
| 20 | 1405 | उल्हासनगर-2 प्र. क्र. 23 मध्ये सिमेंट पायवाटा व नाल्या दुरूस्ती करणे (प्रभाग समिती क्र. 2 निधी 1405) | 99900 | 27/5/205 | मे भोलेनाथ म. का. सोसा |
| 21 | 1409 | उल्हासनगर-3 प्र.क्र.25 मध्ये सोपन हाउस ते प्रेमबती हाउस बॅरेक क्र. 1130, 1131, 1132 जवळ सी. सी. पायवाटा व नाली दुरुस्त करणे (प्रभाग समिती निधी 1409 | 99800 | 27/5/2005 | भोलेनाथ मजूर कामगार |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 22 | 1416 | उल्हासनगर-2 येथील प्रभाग क्र. 21 येथिल बॅ नं 173, 165, 167, साईधाम साई रचना आणि चंदर पॅलेस येथे सी सी पायवाटा व नाली बनविणे (नगरसेवक निधी 1416) | 199500 | 2/6/2005 | मे महादेवकृपा म. का सोसा |
| 23 | 1417 | उल्हासनगर-3 येथील प्र क्र. 25 बॅ नं 1050 , 51 मधील व बॅ न 1000, 1001, 1003, 1004 परिसरात सिमेंट पायवाटा व नाल्या बनविणे. (नगरसेवक निधी 1417) | 199700 | 27/5/205 | मे भोलेनाथ म. का. सोसा |
| 24 | 1421 | उल्हासनगर-4 येथील प्र क्र. 14 मधील पत्रकार विसपुते यांच्या घराजवळ नाला बांधणे (नगरसेवक निधी 1421) | 50000 | 27/5/205 | मे भोलेनाथ म. का. सोसा |
| 25 | 1423 | उल्हासनगर-4 येथील प्र क्र. 15 मधील डी सदाफुले यांच्या हॉस्पिटलमागे सी सी रोड व नाली बनविणे (नगरसेवक निधी 1423) | 198800 | 27/5/205 | मे महादेवकृपा म. का सोसा |
| 26 | 1425 | उल्हासनगर-4 बॅ नं 1638 ते 1645, शोभा मेडीकल येथे सी सी रोड व नाली बनविणे. (प्रभाग समिती क्र. 3 निधी 1425) | 98300 | 27/5/205 | मे हरे रामा म. का. सोसा |
| 27 | 1433 | उल्हासनगर-3 येथील भैरवनाथ कॉलनी, नागसेन कॉलनी आणि भगवान बाबा कॉलनी या ठिकाणी सी सी रोड व नाली बनविणे (प्रभाग समिती निधी 1433) | 198800 | 8/6/2005 | मे स्वामी समर्थ म. का. सोसा. |
| 28 | 1477 | उल्हासनगर-3 येथील प्र क्र. 24, मध्ये पमनानी हाऊस ते क्रिस्टी क्लासेस, क्रिस्टी क्लासेस ते सपना हॉटेल सि 48, 49 येथे एम-250 रोड व नाली बनविणे (नगरसेवक निधी 1477) | 199930 | 27/5/205 | मे कलश म. का. सोसा. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 29 | 1480 | उल्हासनगर-1 येथील प्रबुध्दनगर मध्ये प्लायवुड कंपनी ते गॅस गोडावून पर्यत खंडीकरण करणेबाबत(नगरसेवक निधी 1480) | 199800 | 8/6/2005 | मे जनसेवा म. का सोसा |
| 30 | 1481 | उल्हासनगर-1 येथील प्रबुध्दनगर मध्ये मोहन डेकोरेटर ते महाराज कंपाऊंडपर्यत रस्त्याचे रूंदीरकरण करणे. (नगरसेवक निधी 1481) | 199700 | 8/6/2005 | मे शिवानी म का सोसा |
| 31 | 1482 | उल्हासनगर-2 येथील गुरूकृपा रोड इंडस्ट्रियलच्या बाजूला व स्मशानभुमीच्या बाजूस सिमेंट पायवाटा व नाल्या बनविणे (नगरसेवक निधी 1482) | 199900 | 27/5/2005 | मे मुंब्रादेवी म. का सोसा. |
| 32 | 1483 | उल्हासनगर-2 येथील इंडस्ट्रियल विभागामध्ये फरसाणाच्या दुकानाजवळ चौकपटी कारखान्यापर्यत स्मशानभुमीच्या बाजूस सिमेंट पायवाटा व नाल्या बनविणे (नगरसेवक निधी 1483) | 199800 | 27/5/2005 | मे श्रीसिध्दीविनायक म का सोसा |
| 33 | 1485 | उल्हासनगर-3 येथील सुभाषनगर मध्ये सी सी पायवाटा व नाली बांधणे (नगरसेवक निधी 1485) | 200000 | 27/5/2005 | मे राजलक्ष्मी म का सोसा |
| 34 | 1488 | उल्हासनगर-4 येथील प्र क्र. 9 मध्ये ब्लॉक नं 125 ते ब्लॉक नं 129 पर्यत सी सी एम 250 रस्ता बनविणे (नगरसेवक निधी 1488) | 199800 | 27/5/2005 | मे रचना म का सोसा |
| 35 | 1489 | उल्हासनगर-4 येथील प्र क्र. 9 मध्ये ब्लॉक नं 119 ते ब्लॉक नं 124 पर्यत सी सी एम 250 रस्ता बनविणे (नगरसेवक निधी 1489) | 199950 | 27/5/2005 | मे रचना म का सोसा |
| 36 | 1517 | उल्हासनगर-3 मुख्यालय इमारतीत मा.आयुक्त साो.यांचे दालनात फ्रेंच खिडक्या, दरवाजे व फर्निचर बनविणे (महानगरपालिका निधी 1517) | 298500 | 16/4/2005 | सिध्दनाथ मजूर कामगार |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 37 | 1518 | उल्हासनगर-3 मुख्यालय इमारतीत मा.आयुक्त सो.यांचे चेंबरचे रंगरंगोटी व नुतनीकरण करणे (महानगरपालिका निधी 1518) | 300000 | 16/4/2005 | सिध्दनाथ मजूर कामगार |

उपरोक्त कामांना मा.आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचकडे मजूर कामगार संस्थेला काम वाटप करुन देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करुन दिल्यानंतर सदर मजूर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> २९ <u>दिनांक :— १२/८/२००५</u>

सुचकाचे नाव :—श्रीमती माया मसंद

अनुमोदकाचे नाव :—श्रीमती रेखा कृष्णानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत करण्यात आलेल्या ३७ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही /—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

⇨ <u>विषय क्र. ३ :—</u> उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ५८ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

<u>काही सदस्य :—</u>पास, पास ......

मा. सभापती :—सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

☑

प्रस्तावना

विषय क्र. ३ :— उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ५८ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् 2004-2005 च्या निधीतून मा. नगरसेवक यांनी कामे करणेसाठी विंनती केलेली आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | प्राकलनिय किंमत | दिनांक | सोसायटी नांव |
|---|---|---|---|---|
| 1 | उल्हासनगर-3 येथील ब नं 861 ते 862 सेक्शन 19 आणि 891 सेक्शन 20 येथे एम -250 ने रस्ता आणि गटारी पुणर्बांधणी (नगरसेवक निधी 1942) | 199687 | 6/7/2005 | मे भोलेनाथ म का सोसा. |
| 2 | उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र. 13 मधील गणपती मंदिर जवळ ब्लॉक अे 777 पर्यतचा रस्ता सी सी एम 250 ने बांधणे (नगरसेवक निधी 1106) | 151300 | 15/7/2005 | मे कपलेश्वर म का सोसा |
| 3 | उल्हासनगर-5 येथील प्र क्र. 13 मधील ब्लॉक नं 2119 ते मिनरवा अपार्टमेंट पर्यत सी सी पायवाटा बनविणे. (नगरसेवक निधी 1107) | 80000 | 15/7/2005 | मे वैशाली म का सोसा |
| 4 | उल्हासनगर-3 सुभाषनगर येथील सरदार यांच्या घरापासुन राजू यांचे घराजवळ सिमेंट पायवाटा व नाल्या बनविणे (नगरसेवक निधी 1160) | 199700/- | 6/7/2005 | मे साई लक्ष्मी म का सोसा. |
| 5 | उल्हासनगर-3 येथिल प्र क्र. 8 आधिर्वाद सोसायठी व रेणूका सांसा. येथील शशीकांत वाणी ते शिवाजी साळुंखे ते बेंडशे पालीस यांच्या घरापर्यत सी सी बनविण व मधूकर साळंखे यांच्या घरामाग नाली बनविणे विठठ्ल मंदिराच्या बाजूचा सिमेंट पायवाटा व नाल्या बनविणे (उप-महापौर निधी 166) | 199900/- | 6/7/2005 | मे. ओम साई म. का सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6 | उल्हासनगर-4 येथील प्रभाग क्र. 2 9 मधील महात्माफुले कॉलनी मध्ये पांडू पवार यांच्या घरापासून भावेश खोब्रागडे यांच्या घरापर्यत नाला बांधणे व त्यावर स्लॅब टाकणे (नगरसेवक निधी 1184) | 198800/- | 7/7/2005 | मे श्री लक्ष्मीनारायण म का सोसा. |
| 7 | उल्हासनगर-5 येथील प्र क्र. 13 मध्ये पटेलनगर येथील रायगड मित्र मंडळ पासून नाल्यापर्यत सी सी एम-250 ने रस्ता व नाला बनविणे (नगरसेवक निधी 1184) | 99300/- | 16/7/2005 | मे ओम म का सोसा |
| 8 | उल्हासनगर-5 येथील प्र क्र. 13 मधील महात्मा फुलेनगर येथील म्युनिसीपल शौचालय पासून वॉटर सप्लार्यस कंम्पाऊंडच्या मेन दरवाजापर्यत सी सी एम -250 ने रस्ता व नाली बनविणे (नगरसेवक निधी 1189) | 100000/- | 16/7/2005 | मे ओम म का सोसा |
| 9 | उल्हासनगर- यथील प्र क्र. 15 मधील अंबिका नगर येथील विविध ठिकाणातील गटारांची पुर्नबांधणी करणे. (नगरसेवक निधी 1188) | 199443/- | 7/7/2005 | मे गुरूदेव म का सोसा. |
| 10 | उल्हासनगर-3 प्र क्र. 23 सपना उद्यानाजवळ, हरेकृष्णा अपार्टमेंट समोर एम -350 ने रस्ता बनविणे नाली बनविणे व पायवाटा (नगरसेवक निधी 1231) | 199900/- | 6/7/2005 | मे कलश म का सोसा. |
| 11 | उल्हासनगर-4 येथील प्र क्र. 9 मधील नागसेक नगर यथिल बुध्द विहार ते श्रीवास्तव यांचे घरापर्यत व सोनवणे यांचे घरापासून राजूपत यांचे घरापर्यत नाली दुरूस्ती करेण. (प्रभाग समिती क्र. 4 निधी 1133)) | 100000/- | 16/6/2005 | मे भोलेनाथ म का सोसा. |
| 12 | उल्हासनगर-1 प्र क्र. 20 ग्रिनलॅन्ड, सुपस्टार आणि अे 46 येथे सी सी पायवाट व नाली बनविणे (नगरसेवक निधी 1271) | 199800/- | 5/7/2005 | मे ओम म का सोसा |
| 13 | उल्हासनगर-5 येथील प्र क्र. 12 मधील स्वामी शांन्ती प्रकाश उद्यानाचे दुरूस्ती करणे (प्रभाग समिती क्र. 4 निधी 1323) | 100000/- | 6/7/2005 | मे शिवशंकर म का सोसा |
| 14 | उल्हासनगर-5 येथील प्र क्र. 12 मधील ब्लॉक नंबर सी 14 व सी 5 च्या बाजूला उद्यानाचे दुरूस्ती करणे. (प्रभाग समिती क्र. | 99900/- | 6/7/2005 | मे रिफ्युजी म का सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | 4 निधी 1324) | | | |
| 15 | उल्हासनगर-4 येथील प्र क्र. 14 मधील दत्तगुरू सोसायटी येथे सी सी पायवाटा व नाल्या बनविणे व्ही शेरखाने यांच्या घराजवळ व लाड यांच्या घरामागे (प्रभाग समिती क्र. 4 निधी 1335) | 100000/- | 6/7/2005 | मे कपलेश्वर म का सोसा |
| 16 | उल्हासनगर- प्र क्र. 14 मधील हनुमान टेकडी झोपडपटी मध्ये श्री सिंग यांच्या घरापासून व श्री गुप्ता यांच्या घराजवळ सी सी पायवाटा व नाल्या बांधणे (प्रभाग समिती क्र. 4 निधी 1336) | 100000/- | 6/7/2005 | मे कपलेश्वर म का सोसा |
| 17 | उल्हासनगर-4 येथील प्र क्र. 17 मध्ये शिवम टेलर, मेलवानी घर, शर्मा घर व दत्तमंदिराच्या मागे सी सी पायवाटा व नाली बनविणे (प्रभाग समिती क्र. 3 निधी ) | 198800/- | 16/6/2005 | मे चंदा म का सोसा |
| 18 | उल्हासनगर-3 येथील प्र क्र. 25 येथील दसरा मैदान येथील बगीच्यामध्ये पेवर ब्लॉक बनविणे (नगरसेवक निधी 1346) | 199900/- | 19/2/2005 | मे हरे रामा म. का सोसा |
| 19 | उल्हासनगर-4 येथील प्र क्र 17 मध्ये राजेंद्र यांच्या घराजवळ, यादव घर व बागवे चौधरी योंच्या घरासमोर सी सी पॅसेज व नाली बनविणे (नगरसेवक निधी 1362) | 198800/- | 16/6/2005 | मे चंदा म का सोसा |
| 20 | उल्हासनगर-1 प्र क्र. 2 मधील बॅ नं 384 ते 387 पर्यतच्या सी सी पायवाटा व नाल्या दुरूस्ती करणे. (प्रभाग समिती क्र. 1 निधी 1380) | 99400/- | 28/6/2005 | मे मुंब्रादेवी म का सोसा. |
| 21 | उल्हासनगर-1 प्र क्र. 5 फकडमंडली जवळील बॅ नं 575 जवळ सी सी नाली दुरूस्ती करणे (प्रभाग समिती क्र. 1 निधी 1383) | 97400/- | 6/7/2005 | मे श्री भोलेनाथ म का सोसा |
| 22 | उल्हासनगर-2 प्र क्र. 5 मधील बॅ नं 612, 614, 621, 293 जवळील सी सी पायवाटा व नाल्याची दुरूस्ती करणे. (प्रभाग समिती क्र. 1 निधी 1385) | 99500/- | 6/7/2005 | मे चंदा म का सोसा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 23 | उल्हासनगर-1 येथील प्र क्र. 21 मधील बॅ नं 160, 178 जवळील सी सी पायवाटा व नाली दुरूस्ती करणे (पभाग समिती क्र. 1 1389) | 99500/- | 13/7/2005 | मे अल्का म का सोसा |
| 24 | उल्हासनगर-3 प्र क्र. 8 आनंदनगर येथील शौचालयाच्या मागे सिमेंट पायवाटा व नाल्या दुरूस्ती करणे. (प्रभाग समिती क्र. 2 निधी 1395) | 99600/- | 6/7/2005 | मे चंदा म का सोसा |
| 25 | उल्हासनगर-3 यथिल प्र क्र. 7 सिमेंट पायवाटा बनविणे बॅ नं 1147 मागील बाजूस नाला सी सी दुरूस्ती करणे (प्रभाग समिती क्र. 2 निधी 1398) | 99670/- | 8/7/2005 | मे साहिल म का सोसा |
| 26 | उल्हासनगर-3 प्र क्र. 25 मध्ये सिमेंट पायवाटा व नाल्या दुरूस्ती करणे (प्रभाग समिती क्र. निधी 1406) | 99600/- | 15/7/2005 | मे महादेव क्रिपा म का सोसा. |
| 27 | उल्हासनगर- प्र क्र. 25 मध्ये सिमेंट पाचवाटा व नाली दुरूस्ती करणे (प्रभाग समिती क्र. 2 निधी 1407) | 99600/- | 15/7/2005 | मे महादेव क्रिपा म का सोसा. |
| 28 | उल्हासनगर-3 येथील प्र क्र. 25 मधील बॅ नं 1013, 14, 17 जचळील सिमेंट पायवाटा व नाल्या दुरूस्त करणे. (प्रभाग समिती क्र. 2 निधी 1408) | 99600/- | 15/7/2005 | मे महादेव क्रिपा म का सोसा. |
| 29 | उल्हासनगर-3 येथील प्र क्र. 19 मधील देवले, तुकाराम भोईल यांच्या घरासमोर सी सी एम 250 व नाली दुरूस्त करणे (नगरसेवक निधी 1415) | 199950/- | 16/6/2005 | मे चंद्रभागा म का सोसा |
| 30 | उल्हासनगर-4 समता कॉलनी, बॅ नं 1360, मराठा सेक्शन दिनेश कनोजे यांचे घर येथे सी सी रोड व नाली बनविणे (प्रभाग समिती क्र. 3 निधी 1424) | 198800/- | 16/6/2005 | ूमे. भोलेनाथ म का सोंसा |
| 31 | उल्हासनगर-4 येथील बॅ नं 1502, 1503 येथील गार्डन दुरूस्ती व बॅ नं 1466, 1456 येथे सी सी पैसेज बनविणे (प्रभाग समिती क्र. 3 निधी 1428) | 199910/- | 6/7/2005 | मे शालीनी म का सोसा. |
| 32 | उल्हासगनर-4 येथील मिलींदनगर न्यु रूकनी केदार चाळ शाळा क्र. 14 च्या मागे सी सी पॅसेज व नाली बनविणे (प्रभाग समिती क्र. 3 निधी 1430) | 199800/- | 28/6/2005 | मे संकल्पसिध्दी म का सोसा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 33 | उल्हासनगर-1 सी सी (एम 250) रस्ता व नाली बनविणे बॅ नं 113 रूम नं 1 ते 13 बॅ नं 171 रूम नं 1 ते भाटीयाचे घर व बॅ नं 114 पॅनल नं 21 (नगरसेवक निधी 1434) | 1998800/- | 30/4/2005 | मे श्री लक्ष्मीनारायण म का सोसा. |
| 34 | उल्हासनगर-4 बॅ नं 1286 ओ टी सेक्शन येथे सी सी व नाली बनविणे (प्रभाग समिती क्र. 2 निधी1435) | 199910/- | 6/7/2005 | मे कलश म का सोसा. |
| 35 | उल्हासनगर-3 प्र क्र. 1 मधील ब्राम्हणपाडा, रमाबाई आंबेडकरनगर येथील प्लायवूड कंपनी ते स्त्रीयांचे शौचालयापर्यत सी सी 250 ने रस्ता व नाली बांधणे (नगरसेवक निधी 1436) | 199000/- | 28/6/2005 | मे आशा म का सोसा. |
| 36 | उल्हासनगर-1 सी सी एम-250 रस्ता व नाली बनविणे बॅ नं 114 रूम नं 1 ते 13 बॅ नं 171 रूम नं 1 ते भाटीया यांचे घर व बू नं 114 पॅनल नं 21 (नगरसेवक निधी | 199300/- | 6/7/2005 | मे साई लक्ष्मीनारायण म का सोसा. |
| 37 | उल्हासनगर-5 येथील प्र क्र 10 मध्ये कुर्ला कॅम्प येथे गुजरातीपाडा व कालीमाता मंदिर जवळ नाला दुरूस्ती व पुनर्बांधणे करणे (नगरसेवक निधी 1440) | 99800/- | 6/7/2005 | मे अल्का म का सोसा |
| 38 | उल्सहासनगर-3 येथील बॅ नं 1050-1051 व बॅ नं 1000, 1001, 1003, 1004 मधील सिमेंट पायवाटा व नाल्या बनविणे (नगरसेवक निधी 1442) | 200000/- | 25/6/2005 | मे महादेव क्रिपा म का सोसा. |
| 39 | उल्हासनगर-3 येथील प्र क्र. 8 संतोष नगर येथे गणपती मंदिराच्या पाठीमागे नजीरीााई यांचे घरासमोरील ते रतन यांचे घरापर्यत व कृष्णमंदिर मागील परिसरामध्ये पायवाटा व नाल्या बनविणे (नगरसेवक निधी 1450) | 200000/- | 6/7/2005 | मे कपलेश्वर म का सोसा |
| 40 | उल्हासनगर-3 येथील प्र क्र. 8 येथील बॅ नं 1092 व 1093 येथे सिमेंट पायवाट व नाल्या बनविणे (नगरसेवक निधी 1487) | 100000/- | 13/2/2005 | मे मुंब्रादेवी म का सासा |
| 41 | उल्हासनगर-5 येथील प्र क्र. 12 मध्ये गाऊन बाजार येथे बॅ नं 1828 जवळ, संडासात टाईल्स बसविणे व पाण्याची टाकी बसविणे (उप-महापौर निधी 1491) | 100000/- | 6/7/2005 | मे हरे रामा म. का सोसा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 42 | उल्हासनगर-5 येथील प्र क्र 12 मधील खुशबू अपार्टमेंटच्या मागे महाराजा अपार्टमेंट व ब्लॉक ब 48 जवळ सी सी पायवाटा बाधंणे (उप महापौर निधी 1492) | 144200/- | 28/6/2005 | मे हरेक्रिष्णा म का सोसा. |
| 43 | उल्हासनगर-1 प्रभाग क.20 येथील बॅरेक क.413 व रामचंद्र अपार्टमेंट मागिल सी.सी. पायवाटा व नाली बनविणे (नगरसेवक निधी 1493) | 199900/- | 27/5/2005 | मे. हरे रामा मजूर कामगार सोसा. |
| 44 | उल्हासनगर-3 प्र क्र 23 सपना उद्यानामध्ये रेलींग शेड फ्लोवर स्पॉट बनविणे नगरसेवक निधी 1496) | 199600/- | 6/7/2005 | गुरूदेव म. का.सोसा |
| 45 | उल्हासनगर-2 प्र क्र. येथील बॅ नं 137, 138 या पाठीमागे बॅ नं 138 जवळ बॅ नं 147 /15 च्या मागे हर्षवर्धन नगर मोती सोसायटी जवळ व सुरी पॅलेस उल्हासनगर-2 येथील नाल्या व चेंबर बनविणे (नगरसेवक निधी 1504) | 200000/- | 6/7/2005 | मे मधूसुदन म का सोसा |
| 46 | उल्हासनगर-3 प्र क्र. 18 मधील सरस्वती व वासवाणी यांच्या बगल्याजवळ सी सी व नाली दुरूस्ती करणे (नगरसेवक निधी 1511) | 199650/- | 16/6/2005 | मे शुभलक्ष्मी म का सोसा. |
| 47 | उल्हासनगर-1 पॅनल नं 21 मधील बॅ नं 34, 35 व 36 (अ) आणि (ब) देवी भवानी मंदिराजवळ सी सी पायटवा व नाली बनविणे (नगरसेवक निधि (1513) | 200000/- | 13/7/2005 | मे गांवदेवी म का सोसा. |
| 48 | उल्हासनगर-1 प्र क्र. 4 येथील बॅ नं 139 बॅ नं 137, 138 च्या मागे व मोंती सोसायटी जवळ सिमेंट पायवाटा व चेंबर , नाली बनविण(नगरसेवक निधी 1516) | 199800/- | 6/7/2005 | मे मधुसूदन म का सोसा. |
| 49 | उल्हासनगर-1 प्र क्र 3 येथील तानाजीनगर येथे विविध ठिकाणी सी सी पेव्हमेंट व नाल्या बनविणे मनोज भोइर सुधार शेटटी व शाळा नं 24 (नगरसेवक निधी 1519) | 200000/- | 15/7/2005 | मे शुभ लक्ष्मी म का सोसा |
| 50 | उल्हासनगर-3 प्र क्र. 21 मध्ये बॅ नं 1013 1015 मधील व 1015, 1017 आणि बू नं 969 येथे सिमेंट पायवाट व नाल्या बनविणे (नगरसेवक निधी 1537) | 200000/- | 29/6/2005 | मे जय म का सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 51 | उल्हासनगर-3 महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाच्या स्टाफ क्लार्टर इमारतीच्या दुरूस्तीची काम करणे (महापालिका निधी 1512) | 231500/- | 29/6/2005 | मे जय म का सोसा. |
| 52 | उल्हासनगर महानगरपालिकेतील मा.महापौर कार्यालय व सभागृहाचे नुतनीकरण व सुशोभिकरण करणे (महानगरपालिका निधी 1544) | 294925/- | 3/6/2005 | सिध्दनाथ मजूर कामगार सोसा. |
| 53 | उल्हासनगर महानगरपालिकेतील मा.महापौर कार्यालयात पॅनलिंग बनविणे (महानगरपालिका निधी 1545) | 297529/- | 3/6/2005 | जयमजूर कामगार सोसा. |
| 54 | उल्हासनगर-3 येथील प्र क्र. 24 मधील रोटरी गार्डनची डेव्हलपमेंट करणे (वार्ड कमीटी 4 निधी 1554) | 99250/- | 7/7/2005 | मे कलश म का सोसा. |
| 55 | उल्हासनगर-4 येथील कच्छीपाडा गणपती मंदिरासमोर, आयुष्यामाननगर बॅ नं 1374, 1375 आशिर्वाद हॉस्पिटल मागे चॅम्पीयन वेफर मागे बॅ नं 1352 जवळ ज्योती अपार्ट. जवळ 250 सी सी, नाली बनविणे (नगरसेवक निधी 1555) | 199900/- | 7/7/2005 | मे पंचशिल म का सोसा |
| 56 | उल्हासनगर महानगरपालिके मागील स्वीमिंग पुलाजवळील सॅनिटरी गोडावून ची रिपेरिंग करणे (महापालिका निधी 1559) | 74900/- | 7/7/2005 | मे ओम म का सोसा |
| 57 | उल्हासनगर-1 येथील मैदान येथे साधू वासवाणी उद्यानात स्वातंत्रता सेनानी यांचे नामफलक बनविणे (1562ृ) | 132400/- | 13/7/2005 | मे श्री मॉ म का सोसा |
| 58 | म्हारळ येथील डंम्पिंग ग्राऊडचा रस्ता दुरूस्ती करणे (नगरसेवक 1567) | 499800/- | 6/7/2005 | मे श्री मॉ म का सोसा |

उपरोक्त कामांना मा.आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचकडे मजूर कामगार संस्थेला काम वाटप करुन देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करुन दिल्यानंतर सदर मजूर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ३०      दिनांक :– १२/८/२००५

सुचकाचे नाव :—श्री. सुरेश गायकवाड

अनुमोदकाचे नाव :—श्री. मोहन साधवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत करण्यात आलेल्या ५८ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही /—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

⇨ <u>विषय क्र. ४ :—</u> उल्हासनगर शहरात विद्युत विभागा अंतर्गत २ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

---

<u>मा. सदस्य श्री मोहन साधवानी :—</u> निधी कोणता आहे?

<u>कार्यकारी अभियंता (विद्युत)(श्री. मुकेश आयलानी) :—</u> स्थायी समिती सभापती यांचा निधी आहे.
<u>काही सदस्य :—</u>पास, पास ......

<u>मा. सभापती :—</u>सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

<u>प्रस्तावना</u>

**विषय क्र. ४:—** उल्हासनगर शहरात विद्युत विभागा अंतर्गत २ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर महानगरपालिका विद्युत विभागा चे कामास दिलेल्या मंजुरीची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अं. क्रं. | कामांचे नांव | मंजुर निविदा रक्कम | मंजुरी दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १. | उल्हासनगर —३ मधील शामा प्रसाद मुखर्जी चौक व उल्हासनगर ४/५ काली बारी चौक येथे हायमस्ट लाईट बसविणे. | 34.5% below the estimated value of Rs. 8,52,450/- | ११/७/०५ | मे. बजाज इलेक्ट्रीकलस लि. मुंबई |
| २. | प्रोव्हायडींग रुम एअर कंडीशन इन व | २,७१,०००/— | २/६/०५ | मे.पंचशिल मजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | चेंबर ऑफ मा. उप महापौर, मा. आयुक्त, लेबोरेटरी ऑफ इलेक्ट्रीक डिपार्ट व बैकअप सर्वर रुम | | | कामगार सहकारी संस्था |

सदरची माहिती स्थायी समिती, यांनी अवलोकन करणे करिता प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ३१ दिनांक :— १२/८/२००५

सुचकाचे नाव :—श्री. वाघे शामु

अनुमोदकाचे नाव :— श्री. मोहन साधवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरात विद्युत विभागांतर्गत करण्यात आलेल्या २ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही /—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

⇨ विषय क्र. ५ :— शिवाजी चौक ते उल्हासनगर स्टेशन व्हाया सन्तु बिल्डींग या रस्त्यावरील म.रा.वि. मंडळाचे पोल्स व रोहित्र हलविणेकामी प्रशासनास मेसर्स एक्स के इंजिनिअरींग सर्विसेस, कल्याण या न्युनतम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे

काही सदस्य :—पास, पास ......

मा. सभापती :—सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

प्रस्तावना

**विषय क्र.** ५ :— शिवाजी चौक ते उल्हासनगर स्टेशन व्हाया सन्तु बिल्डींग या रस्त्यावरील म.रा.वि. मंडळाचे पोल्स व रोहित्र हलविणेकामी प्रशासनास मेसर्स एक्स के इंजिनिअरींग सर्विसेस, कल्याण या न्युनत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे

महानगरपालिकेने बांधकाम विभागाच्या विनंती नुसार म.रा.वि. मंडळाला शिवाजी चौक ते उल्हासनगर स्टेशन वाया सनतू बल्डींग येथे म.रा.वि. मंडळाचे पोल व ट्रान्सफॉमर योग्य ठिकाणी हलविण्यासाठी विनंती करण्यात आली.

मुख्य अभियंता म.रा.वि. मंडळ यांनी पत्र  क्रमांक २१७४ दिनांक १६/६/०४ अन्वये शिवाजी चौक ते उल्हासनगर स्टेशन वाया सनतू बल्डींग येथे म.रा.वि. मंडळाचे पोल हलविण्या करीता रुपये ११,५४,०००/— च्या प्रस्तावास ७.५ टक्के सुपरविझजन चार्ज अंर्तगत मंजुरी दिली.

त्यानंतर म.रा.वि. मंडळाकडून मंजूर प्राकलनामध्ये साहित्य . मजुरी . वाहतुक खर्च . टी एन. पी. चार्जेस. जुने साहित्य काढण्याचे चार्जेस घेवून निविदा रक्कम रुपये १०,७४,९१९.०३५ निरधारीत करुन सहाव्या वेळी निविदा बोलवण्यात आली त्याच्या प्रतिसादात चार विविध कंपन्यांनी निविदा खरेदी केले आणि वेळेवर इसारा रक्कमे सह सादर केल्या.

त्याचा तुलनात्मक तक्ता पुढील प्रमाणे आहे.

१. मे. एक्स के इंजिनिअरींग सर्विसेस कल्याण यांनी एकूण कार्यासाठी रु. १७१३२६०.५ रु. १७१४६५३.५ अशी रक्कम दिली आहे.

२. मे. आर. टी. इलेक्ट्रीकल्स ॲन्ड इंजिनिअरींग सर्विसेस यांनी एकूण कार्यासाठी रु १७२४३३२५ रु. १७२३१२७.५ अशी रक्कम दिली आहे.

३. मे. विश ऑन इंटरप्रायझेस यांनी एकूण कार्यासाठी रु. १४७०११८ अशी रक्कम दिली आहे.

४. मे. सैनी इलेक्ट्रीकल्स यांचे लखोटा क्र. (अ) मध्ये अपूर्ण कागद असल्याने निविदा उघडण्यात आली नाही.

सदर तुलनात्मक तक्त्यानुसार मे. विश ऑन इंटरप्रायझेस यांनी संपूर्ण कार्यासाठी एकूण रक्कम रु. १४७०११८ सर्वात कमी व अंदाज पत्रकीय रक्कम रु.१०७४९१९.०४ पेक्षा ३६.८ टक्के जास्त आहे.

सदर निविदा आयटम रेट नुसार बोलविण्यात आलेले होती.  जे एकूण रक्कमेत सर्वात कमी आहे त्याच्या पेक्षा जास्त दराच्या निविदा धारकांने काही आयटम मध्ये मे. विश ऑन इंटरप्रायझेस (जे एकूण रक्कमेत कमी आहे) पेक्षा दर कमी आहे व जर सर्व कमी दर टोटल केले तर एकूण कार्याची रक्कम रु. १४११९३२ असे येते. ती अंदाजपत्रीकय रक्कम रु. १०७४९१९.०४ पेक्षा ३१.२८ टक्केने जास्त आहे.

वरील बाबी  लक्षात घेता सर्वात कमी दराचे निविदा धारक मे. विश ऑन इंटरप्रायझेस यांना वाटाघाटी साठी दिनांक ९/६/२००५ रोजी बोलविण्यात आले व त्यांनी काही कमी करण्यासाठी नकार दिले.

तदनंतर तिन्ही निविदाधारक यांच्याकडून सुधारीत दर देण्यासाठी पत्र क्र. उमपा/विद्युत/२/८६ दिनांक ३/६/०५ अन्वये विनंती करण्यात आली.

त्याच्या प्रतिसादात त्यांनी सुधारीत दर सीलबंद लखोट्यात प्रत्येक आयुटमचे दिनांक ५/७/०५ रोजी सादर केले व ते त्यांच्या समोर दिनांक ५/७/०५ रोजी सांयकाळी ४.१५ मि. उघडण्यात आले  आणि एकूण कार्याच्या रक्कमेचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

१. मे. एक्स. के. इंजिनिअरिंग सर्विसेस कल्याण यांनी एकूण कार्यासाठी रुपये. १४,०६,२०८/— अशी सुधारीत रक्कम दिलेली आहे.

२. मे. आर. टी इलेक्ट्रोकल्स ॲन्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस यांनी  एकूण कार्यासाठी रुपये १५,०३,४२६/— अशी सुधारीत रक्कम दिलेली आहे.

३. मे. विश ऑन एन्टरप्राइझेस यांनी एकूण कार्यासाठी रुपये १६,४८,७९२/— अशी सुधारीत रक्कम दिलेली आहे.

सदर सुधारीत दराच्या तुलनात्मक तक्त्यानुसार मे. एक्स. के. इंजिनिअरींग सर्व्हीसेस यांचे दर प्रत्येक आयट्म मध्ये सर्वात कमी आहे परंतु अंदाजपत्रकीय रक्कम  रुपये १०,७४,९१९/— पेक्षा ३०.८२ टक्के जास्त आहे तरी देखील हे वाजवी आहे कारण

१. म.रा.वि. मंडळानी दिनांक १६/६/२००४ च्या पत्राअन्वये अंदाजपत्रक पाठविलेले आहे ते अंदाजपत्रकीय दर त्या तारखे पुर्वीच्या शेडयूल प्रमाणे आहे.  दरम्यान ही लोखंडाचे दर वाढले आहे.

२. सदर कार्यात ८० टक्के लोखंडाचा वापर आहे.

३. अधिक्षक अभियंता कल्याण म.रा.वि. मंडळ यांनी त्याच्यांशी झालेल्या एका बैठकित असे मत व्यक्त केले होते की, उ.म.पा. ला म.रा.वि. मंडळाच्या दर अनुसार सामान मिळणे कठीण आहे कारण म.रा.वि. मंडळ मोठया प्रमाणात खरेदी करतात.

४. जवळपासच्या महानगरपालिकेतून चौकशी केल्यानंतर असे माहीत पडले की  १. भिवंडी निजामपूर महानगरपालिकेत अशा प्रकारचे कार्य ४८ टक्के ते ५७ टक्के पर्यंत जास्त दराने आलेले आहे. २. नवी मुंबई महानगरपालिकेतही दर ४० ते ४५ टक्के म.रा.वि मंडळाच्या अंदाजित रक्कमे पेक्षा जास्त आलेले आहे.    ३. कल्याण — डोबिविली महानगरपालिकेत ही दर २२ टक्के जादा ने

मंजुर केलेले आहे व ही माहिती ऑगस्ट २००४ ते ऑटोबर २००४ च्या दरम्यान ची आहे. त्यानंतर ही परत लोखंडाचे भावात वाढ झालेली आहे.

५. हि निविदाचे सहा वेळा मागविण्यात आली आहे व यापूर्वी सर्वात कमी दर अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १०७४९१९ पेक्षा ३३.९७ टक्के जास्त आले होते.

वरील सर्व लक्षात घेता म.रा.वि मंडळा कडे रुपये ७९,४००/– इतकी सुपरविझन चार्जेस ही भरण्याची मंजुरी मिळावी. तसेच मे. एक्स के. इंजिनिअरींग सर्व्हिसेस कल्याण यांनी दिलेले सुधारीत दराला मंजुरी दिलेली असून एकूण खर्च रुपये. १४०६२०८/– यास मंजुरी साठी आणि करार करण्याच्या मान्यते साठी स्थायी समिती पुढे सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ३२ <u>दिनांक :– १२/८/२००५</u>

सुचकाचे नाव :– श्री. चंदाराम मोकल

अनुमोदकाचे नाव :–श्री. मोहन साधवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार शिवाजी चौक ते उल्हासनगर स्टेशन व्हाया सन्तु बिल्डींग या रस्त्यावरील म.रा.वि. मंडळाचे पोल्स व रोहित्र हलविणेकामी प्रशासनास मेसर्स एक्स के इंजिनिअरींग सर्विसेस, कल्याण या न्युनतम दराच्या निविदाकाराशी संविदा करण्यास व अंतर्भुत खर्च रु. १४,०६,२०८/– यांस मान्यता देत आहे.

सुचकाची सही /–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :–</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ <u>विषय क्र. ६ :–</u> आयात होणा–या ग्रे क्लॉथवर सवलतीचा जकात दर आकारणे.

---

<u>मा. सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u> विषय नेमका काय आहे?

<u>मा. सचिव :–</u> ग्रे क्लॉथवर सवलतीचा जकात दर आकारायचा आहे. येथे मंजुर झाल्यानंतर हा विषय मान्यतेसाठी महासभेपुढे जाईल.

<u>मा. सदस्य श्री मोहन साधवानी :–</u> यामुळे महापालिकेचे किती नुकसान होणार आहे?

<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी :–</u> या विषयावर अंतिम निर्णय महासभा घेणार आहे. आपण येथे मंजुर करु त्यानंतर तेथे सविस्तर माहिती द्यावी.

यावेळी मा. आयुक्त श्री आर.के.सोनवणे यांनी सभागृहात प्रवेश केला व त्यांच्या जागी आसनस्थ झाले.

<u>मा. आयुक्त :—</u> निर्णय आपणांस घ्यायचा आहे. आपण सूचविल्याप्रमाणे आम्ही येथे प्रस्ताव आणलेला आहे. आपल्या येथे याचे किती युनिट्स आहेत, कपडा किती येतो याची सध्या आमच्याकडे काहीही माहिती उपलब्ध नाही. कल्याण डोंबिवली महापालिकेत ग्रे क्लॉथवर ०.५ टक्के जकात कराची आकारणी करण्यात येते. तसेच अंबरनाथ येथे जकात कराची आकारणी करण्यात येत नाही. त्यामुळे आपल्या येथील उद्योजकांना त्यांच्या दरांशी स्पर्धा करता येत नाही. दर कमी असल्याने अंबरनाथ व कल्याण येथे बहुतेक काम दिले जाते. जर आपणही कल्याणप्रमाणे दर १.८० वरुन ०.५० टक्के केला तर आपल्या शहरात डाईंग व ब्लीचींगसाठी जास्त कपडा येवु शकतो. आज सर्व जगात टेक्सटाईल इंडस्ट्रीमध्ये मंदी आहे, उल्हासनगर मध्ये देखिल हा उद्योग मोठया प्रमाणावर चालतो. जर आपण दर कमी केले तर हा उद्योगधंदा टिकु शकतो. परंतु यापासुन महापालिकेस किती तोटा होईल, किती माल येतो याची माहिती आमच्याकडे सध्या उपलब्ध नाही.

<u>मा. सभापती :—</u> दर कमी केले तर जास्त माल येवुन महसुल देखिल वाढु शकतो.

<u>मा. आयुक्त :—</u> समजा जर आपणांस आज १० रु प्राप्त होत असतील तर ०.५ टक्के दर केला तर ३—४ रुपयापर्यंत प्राप्त होतील असा अंदाज आहे.

<u>मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :—</u> आधीच महापालिकेला अतिवृष्टीमुळे बरेच नुकसान सोसावे लागले आहे. दर कमी केले तर अजुन नुकसान होईल, त्यामुळे आता दर कमी न करता विषय पुढे ढकलण्यात यावा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> यावर महासभा निर्णय घेणार आहे. आपण येथे आता विषय मंजुर करु त्यानंतर महासभेत सविस्तर माहिती देण्यात यावी.

<u>मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :—</u> महासभेत विषय आणा.

<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी :—</u> महासभेत ७६ नगरसेवक यावर निर्णय घेतील.

<u>काही सदस्य :—</u>पास, पास ......

<u>मा. सभापती :—</u>सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

<u>प्रस्तावना</u>

**विषय क्र. ६** :— आयात होणा—या ग्रे क्लॉथवर सवलतीचा जकात दर आकारणे.

उपरोक्त विषयांकित कामी सचिव, क्लॉथ डाईंग ॲन्ड प्रोसेसर्स असोशिएशन, उल्हासनगर यांनी त्यांच्या दिनांक १४/४/२००५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे की, कल्याण—डोंबिवली महानगरपालिका येथे ग्रे क्लॉथवर ०.५० टक्के प्रमाणे जकात कर आकारणी केली जाते. उल्हासनगर महानगरपालिकेत सदर मालावर यापुर्वी १.६० टक्के प्रमाणे आकारणी केली जात होती. त्या वाढ करुन दिनांक १/४/२००५ रोजीपासुन १.८० टक्के प्रमाणे जकातीची आकारणी करण्यात येत आहे. आता १.८० टक्के यथा मुल्यवरुन ०.५० टक्के या दराने आकारणी करावयाची झाल्यास उल्हासनगर महानगरपालिकेच्या जकात नियमात अनुसुची १ बाब क्र. ६१ चे पुर्नवर्गीकरण, नियम ५ मधील तरतुदीनुसार करणे आवश्यक आहे.

सबब मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ९९ व जकात नियम १९९६ नियम ५ मधील तरतुदीनुसार उक्त प्रस्ताव मंजुरीसाठी स्थायी समिती व महासभेच्या पटलावर ठेवण्यात यावा.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ३३ <u>दिनांक:—१२/८/२००५</u>

सुचकाचे नाव :— श्री. गणपत एडके

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती लक्ष्मी ससाणे

ही स्थायी समिती महासभेच्या मंजूरीच्या आधिन राहून शहरात आयात होणा—या ग्रे क्लॉथवर ०.५० टक्के प्रमाणे जकात कर आकारणेस शिफारस करित आहे व उल्हासनगर महानगरपालिकेचे जकात नियम अनुसूची १ मधील बाब क्र. ६१ चे पुर्नवर्गीकरण करणेकामी नियम ५ चे अनुषगांने शिफारस करित आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती /पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ <u>विषय क्र. ७ :—</u> नविन नळ जोडणी देतांना व जुनी नळ जोडणी स्थलांतरीत करतांना दारिद्रय रेषेखालील लोकांकडुन रस्ता खोदाई व दुरुस्ती फी रुपये ७००/— न आकारणे कामी पुर्वीच्या स्थायी समिती ठराव क्र. १९४ (अ) दिनांक १२.२.२००० मध्ये अंशत: बदल करणे.

---

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> मागील वेळी देखिल या विषयावर मी बोललो होतो. जर झोपडपट्टीत शुल्क माफ करण्यात येणार असेल तर शहरात इतर ठिकाणी देखिल जेथुन जी.आय जलवाहिनीवरुन जोडणी घेण्यात येईल तेथेही शुल्क माफी देण्यात यावी. ब—याचशा नळजोडण्या या रस्त्याच्या कडेने अथवा जमिनीवरुनच घेण्यात येतात, तर याचा फायदा सर्वांना द्यायला हवा. त्याचप्रमाणे बी.पी.एल चे १२००० अर्ज प्रलंबित आहेत, त्यावरही लवकर निर्णय घेण्यात यावा.

<u>मा. सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u> मी श्री किशोर वनवारी यांच्याशी सहमत आहे.

<u>मा. आयुक्त :—</u> जर अशाप्रकारे आपण सवलत दिली तर यापुढे सर्व नळजोडण्या जमिनीवरुनच घेतल्या जातील. आज आपण शहरातील परिस्थिती पाहिली तर दिसुन येईल की, ३० ते ४० टक्के नळजोडण्या या जमिनीवरुन घेतल्या जातील. त्यामुळे गळती होते. फुटलेल्या, गळती झालेल्या जलवाहिनींमध्ये बाहेरुन दुषित पाणी झिरपुन कावीळ व विषमज्वरासारखे रोग पसरतात. यामुळे जलवाहिनी ही जमिनीखालुनच घ्यायला हवी. आपण जर अशाप्रकारे शुल्क माफी केली तर पुढे जावुन याचा त्रास होवु शकतो. जमिनीवरुनच नळजोडणी घेण्याची प्रवृत्ती वाढेल.

<u>मा. सदस्य श्री राजु जग्यासी :—</u> सगळया ठिकाणी जमिनीवरुन नळजोडणी घेण्यात येणार नाही, जेथे आवश्यकता असेल तेथेच घेण्यात येईल. आपल्या विभागाचे लोक बघतील त्यानंतरच नळजोडणी देण्यात येईल. मंजुर तर आपले अधिकारी करणार आहेत, लोक ठरविणार नाहीत.

<u>मा. आयुक्त :—</u> पाणी पुरवठा विभागाच्या अधिका—यांवर यासाठी दबाव आणण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री राजु जग्यासी :—</u> आपले अभियंता आधी पाहणी करतील.

<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी :—</u> हा मुळ ठराव २००० मध्ये मंजुर झाला आहे, आता ५ वर्षांनी सुधारणा करण्यासाठी तो येथे आणला आहे. आम्ही सर्वांच्या बाजुने आहोत, सर्वांना फायदा द्यायला हवा. खड्डा केला

नाही तर शुल्क कोणाकडुनही घ्यायला नको. पाच वर्षांपासुन आपण खड्डा केला नाही तरी देखिल शुल्क घेतच आहोत. कायदा सर्वांना एकच ठेवा, दोन दोन कायदे नकोत.

<u>मा. सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u> अधिका–यांची देखिल जबाबदारी आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> सर्वांना याचा फायदा देण्यात यावा.

<u>काही सदस्य :–</u>पास, पास ......

<u>मा. सभापती :–</u>सदरचा विषय पुढीलप्रमाणे सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

<u>प्रस्तावना</u>

**विषय क्र.** ७ :– नविन नळ जोडणी देतांना व जुनी नळ जोडणी स्थलांतरीत करतांना दारिद्रय रेषेखालील लोकांकडुन रस्ता खोदाई व दुरुस्ती फी रुपये ७००/– न आकारणे कामी पुर्वीच्या स्थायी समिती ठराव क्र. १९४ (अ) दिनांक १२.२.२००० मध्ये अंशत: बदल करणे.

पाणी पुरवठा विभागामार्फत नविन नळजोडणी मंजुर करणे तसेच जुनी नळजोडणी स्थलांतरीत करणेची परवानगी देण्यात येते. मा. स्थायी समिती ठराव क्र. १९४ (अ) दिनांक १२.२.२००० अन्वये नविन नळजोडणी व जुनी नळजोडणी स्थलांतरीत करण्याकरीता रस्ता खोदाई व दुरुस्ती फी सर्व रस्त्यासाठी एप्रिल २००२ पासुन रुपये ७००/– (सातशे मात्र) आकारणी करण्यात येते.

झोपडपट्टीतील बरेचशे लोक दारिद्रय रेषेखालील व आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील असल्यामुळे सदर खर्च त्यांच्या आर्थिक कुवतीपलिकडचा आहे.

काही झोपडपट्टयांमध्ये मुख्य जलवाहिनी जमिनीच्या वरती आहे. त्यामुळे सदर ठिकाणी नविन नळजोडणी करण्याकरीता कोणत्याही प्रकारचा खड्डा न करताच नळजोडणी करता येणे शक्य आहे. अशा नळजोडणीकरीता खड्डयाची फी रुपये ७००/– खालील शर्तीची पूर्तता करणा–या अर्जदाराकडुन आकारु नये असे प्रस्तावित आहे.

१) दिनांक १/१/९५ पूर्वीच्या संरक्षित भोगवटादार असावा.

२) B.P.L. (दारिद्रय रेषेखालील) किंवा EWS ( आर्थिक दृष्टया दुर्बल घटक)

सभेतील चर्चेअंती असे निष्पन्न झाले आहे की, ही सवलत फक्त दारिद्रय रेषेखालील लोकांना न देता सर्व वर्गातील लोकांना देण्यात यावी.

म्हणुन स्थायी समितीपुढे प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ३४ <u>दिनांक:– १२/८/२००५</u>

सुचकाचे नाव :– श्री. सुरेश जाधव

अनुमोदकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

ही स्थायी समिती वरील प्रस्ताव विचारात घेता नळ जोडणी देतांना व जुनी नळ जोडणी स्थलांतरीत करतांना जे अर्जदार रस्ता खोदाई करणार नाही त्यांच्याकडुन रस्ता खोदाई व दुरुस्ती फी रुपये ७००/– न आकारणे कामी पुर्वीच्या स्थायी समिती ठराव क्र. १९४ (अ) दिनांक १२.२.२००० मध्ये अंशत: बदल करीत आहे व नवीन नळजोडणी घेणेकरिता पुढील अटींची पुर्तता करण्या–या व्यक्तिंना रस्ता खोदाई व दुरुस्ती फी माफ करण्यास मान्यता देत आहे.

१) अर्जदार दिनांक १/१/९५ पूर्वीचा संरक्षित भोगवटादार असावा.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती /पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सदस्य श्री राजु जग्यासी :— आयुक्त साहेब अजुन एक विषय आहे. माझ्या प्रभागात पुजा हॉटेलच्या शेजारी नदीवर जो पुल आहे, त्याची अवस्था फार खराब झाली आहे. त्याचे तात्काळ सर्वेक्षण करुन त्वरित दुरुस्ती करायला हवी, नाहीतर तेथे मोठा अपघात होवु शकतो.

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी :— काही दिवसांपूर्वी जो पाऊस झाला त्यामुळे बरेचसे छोटे छोटे साकव, पुल, नाले यांचे नुकसान झाले आहे. त्यांची प्राथम्याने दुरुस्ती करायला हवी.

मा. आयुक्त :— आम्ही शासनाकडे रु ४९ कोटींचा एक प्रस्ताव पाठविला आहे. त्यामध्ये रु ३८ कोटींचे जे नुकसान झाले आहे त्याची व इतर रु ११ कोटी असे एकुण रु ४९ कोटींचा प्रस्ताव पाठविला आहे. ते प्राप्त होताच ही सर्व कामे करण्यात येतील.

मा. सदस्य श्री. राजु जग्यासी :— वडोळ गांव येथील पुलाचे देखिल नुकसान झाले आहे. तेथुन शाळेची मुले ये जा करतात, त्याचेही काम तातडीने करायला हवे.

मा. सचिव :— आपल्या महापालिकेत मुख्य लेखा अधिकारी या पदावर श्री अनुदिप दिघे यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती झालेली आहे, ते त्यांचा परिचय आपणा सर्वांना करुन देतील.

मुख्य लेखा अधिकारी (श्री अनुदिप दिघे):— माझे नांव अनुदिप दिघे आहे. यापूर्वी ४ वर्षे मी बांद्रा येथील कोषागार कार्यालयात कार्यरत होतो. तसेच २ वर्षे मी नवी मुंबई येथील स्थानिक निधी लेखा परिक्षण कार्यालयात काम केलेले आहे. आतापर्यंत माझी ७ वर्षे शासकीय सेवा झालेली आहे. १०—१५ दिवसांपूर्वीच मी महापालिकेत हजर झालेलो आहे. माझी आपणा सर्वांना विनंती आहे की, आपण मला सहकार्य द्यावे, मी देखिल माझ्याकडुन आपणांस सर्व सहकार्य देईन. धन्यवाद !

मा. सदस्या श्रीमती लक्ष्मी ससाणे :— पावसामुळे आमच्या प्रभागात बरेच नुकसान झाले आहे. तर आपण आमच्या प्रभागात औषधे उपलब्ध करुन द्यावीत.

मा. आयुक्त :— आम्ही आतापर्यंत विविध ठिकाणी खाजगी डॉक्टरांमार्फत २५ कॅम्प लावलेले आहेत.

मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :— ॲथनीचा ठेका रद्द करायला हवा. अजुनही आमच्या प्रभागात कचरा साठलेला आहे, तुम्ही येवुन पाहु शकता. तसेच जी १० माणसे नाले सफाईसाठी दिली होती ती देखिल अजुन एक महिना ठेवायला हवीत. ब—याच ठिकाणी कचराही साठलेला आहे.

मा. आयुक्त :— अजुन १५ दिवस ती माणसे राहतील. तसेच कोणत्या ठिकाणी कचरा साठला आहे ते सांगावे.

मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :— करोतिया नगर, गौतम नगर, क्रांती नगर या ठिकाणी कचरा साठलेला आहे.

सायंकाळी ५—१५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२७ ऑक्टोबर, २००५

दि. २७.१०.२००५ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरुवार दिनांक २७.१०.२००५ रोजी सायंकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

*१०. मा. सभापती — श्रीमती ज्योती सुरेश (पप्पु)कालानी*
*११.* श्री. वनवारी किशोर नारायणदास
३. श्री. एडके गणपत गोविंद
८. श्री. गायकवाड सुरेश नामदेव
९. श्रीमती जावळे संगिता रमेश
१०. श्रीमती वनवारी मोना अशोक
११. श्री. साधवानी मोहन रहंदोमल
१२. श्री. सोनवणे नथु काशिराम
९. श्रीमती कृष्णानी रेखा हरेश
१०. श्री जग्यासी राजु किशनचंद
११. श्री. जाधव सुरेश मधुकर
१२. श्रीमती मसंद माया घनश्यामदास
१३. श्री मोकल चंदाराम विठोबा
१४. श्री वाघे श्यामु बाबु
१५. श्रीमती ससाणे लक्ष्मी रोहिदास

तर,

मा. सदस्य श्री. बठिजा संजय रामचंद्र हे अनुपस्थित होते.

सायंकाळी ५—०० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

मा. आयुक्त श्री. आर.के.सोनवणे हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या जागी श्री उत्तम लोणारे, उपायुक्त (मुख्यालय) हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन उपस्थित होते.

मा. सचिव :— विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १ :— मागील सभेचे दिनांक १२/०८/०५ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

मा. सभापती :— सर्वप्रथम मी सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा देते. आपणा सर्वांना ही दिवाळी सुखाची व समृध्दीची जावो.

**मा. सचिव :—** मागील सभेच्या इतिवृत्तात पृष्ठ क्र. १ वर ४/७/२००५ ऐवजी १२/८/२००५ असा चुकीने उल्लेख झाला आहे. तरी त्या प्रयोजनार्थ सुधारणा करण्यासाठी विनंती आहे.

**काही सदस्य :—** पास, पास...........

**मा. सभापती :—** मागील सभेचे दिनांक १२/०८/२००५ रोजीचे इतिवृत्त वर सुचविलेल्या सुधारणेसह सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

**मा. सचिव :—** विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २ :—** उल्हासनगर शहरात अतिवृष्टीमुळे निर्माण झालेली पुर परिस्थिती, त्यावर केलेली उपाययोजना, मदत व पुनर्वसन कार्य आणि साथरोग परिस्थिती याबाबतच्या अहवालाची माहिती नोंद करणे.

---

**काही सदस्य :—**पास, पास ......

**मा. सभापती :—**सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

**प्रस्तावना:—**

**विषय क्र.२ :—** उल्हासनगर शहरात अतिवृष्टीमुळे निर्माण झालेली पुर परिस्थिती, त्यावर केलेली उपाययोजना, मदत व पुनर्वसन कार्य आणि साथरोग परिस्थिती याबाबतच्या अहवालाची माहिती नोंद करणे.

दिनांक २६ व २७ जुलै, २००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे निर्माण झालेली पुरपरिस्थिती व महापालिकेने केलेल्या त्यावरील उपाययोजना, पूरपरिस्थितीनंतरचे मदत व पुर्नवसन कार्य आणि त्यानंतर साथरोगाची परिस्थिती याबाबतचा अहवाल स्थायी समितीसमोर ठेवण्यात येत आहे.

सदर आपत्कालीन परिस्थितीत आपादग्रस्त नागरीकांना मदत करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये आयुक्तांना प्राप्त झालेल्या अधिकारात आवश्यक साधनसामुग्री खरेदी करण्यात आली. त्याचा तपशिल स्वतंत्रपणे सादर करण्यात येत आहे. उक्त अहवाल स्थायी समितीसमोर माहितीसाठी प्रस्तुत करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ३५ **दिनांक:—२७/१०/२००५**

सुचकाचे नाव :— श्री. चंदाराम मोकल
अनुमोदकाचे नाव :— श्री. नथु सोनवणे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरात अतिवृष्टीमुळे निर्माण झालेली पुर परिस्थिती, त्यावर केलेली उपाययोजना, मदत व पुर्नवसन कार्य आणि साथरोग परिस्थिती याबाबतचा सोबत जोडलेला पृष्ठ क्रमांक १ ते ११ वरील अहवालाची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

## नैसर्गिक आपत्ती निवारण – २००५
## दिनांक २५/७/२००५ ते २८/७/२००५ दरम्यान
## झालेल्या अतिवृष्टीमुळे उद्‌भवलेल्या पुर परिस्थीतीतील
## मदत व पुर्नवसन कार्याचा अहवाल

<u>उल्हासनगर शहरातील पूरपरिस्थिती – स्वरुप व व्याप्ती</u>

उल्हासनगर शहर हे उल्हास व वालधुनी नदी काठावर वसलेले असून, शहराचे एकुण क्षेत्रफळ १३ चौ. कि.मी. इतके असून लोकसंख्या ४.७२ लक्ष इतकी आहे. वालधुनी नदी शहराच्या मध्यातून वाहत असून उल्हास नदी ही महापालिकेची उत्तरपुर्व सिमा आहे.

प्रतिवर्षी पावसाळयात या नद्यांना पूर येतो. यापुर्वी देखील पुरामुळे जीवित व वित्त हानी झालेली आहे. परंतू दि. २५ ते २८ जुलै या दरम्यान मुसळधार वृष्टीमुळे वालधुनी नदीवरील चिखलोली धरण व उल्हासनदी वरील बारवी धरणाच्या साठयात वाढ झाली. धरणातून सोडण्यात येणारे पाणी व अरबी समुद्रातील खाडीला येणारी भरतीची वेळ एकच झाल्यास उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील काही भाग जलमय होतो. परंतू, दि. २६ व २७ जुलै रोजी विक्रमी पाऊस झाल्यामुळे महापालिका क्षेत्रापैकी सुमारे ३.१९ चौ.कि.मी. चा परिसर पुर्णपणे जलमय झालेला होता. परिणामी नदीपात्रात किना–यावर असलेल्या मानवी वस्त्या जलमय होवुन त्या ठिकाणी मोठया प्रमाणावर जीवित व वित्त हानी झाली.

महानगरपालिकेने केलेल्या बचाव व मदत कार्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

<u>(अ) मदत व बचाव कार्य</u>

- दिनांक २५/७/२००५ ते २७/७/२००५ या कालावधीत नियमीतपणे शहरांतील नदीकाठावरील व सखल भागातील नागरिकांना महापालिकेमार्फत ध्वनीक्षेपक व प्रत्यक्ष कर्मचा–यादवारे पूर्वसूचना देण्यात आलेली होती. त्यानंतर वेळोवेळी विविध भागात नागरिकांना पूर्वसूचना व सावधानतेचा इशारा देण्यात आलेला आहे.
- दिनांक २६/७/२००५ रोजी अंदाजे ५०० नागरीकांचे स्थलांतर. अंदाजे ३०० नागरीकांना पुरातून वाचविण्यात आले, जीवित हानी नाही.
- दिनांक २६/७/२००५ रोजी रात्री बारवी धरणाचे अतिरीक्त पाणी सोडल्यामुळे शहरातील नदी काठचा ३.१९ चौ.कि.मी. भाग जलमय झालेला होता. दिनांक २७/७/२००५ रोजी परिस्थितीचे गांर्भीय ओळखून तात्काळ मदत कार्य सुरु करण्यात आले. समुद्राची भरती व धरणातून सोडले जाणारे पाणी यामुळे परिस्थिती क्षणाक्षणाला नियंत्रणाबाहेर जात होती. शहरातील ३२ वस्त्या जलमय झाल्या. (सोबत प्रपत्र १)
- महापालिका आपत्कालीन पथक व अग्निशमन पथकातील सर्व अधिकारी व कर्मचारी मदत कार्यात सहभागी झाले त्याचबरोबर इतर विभागातील अधिकारी व कर्मचा–यांनी मदतकार्यात आपल्या पुर्ण क्षमतेने काम केले.
- स्थानिक पोलिस प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी व सर्व कर्मचारी परिस्थितीवर नियंत्रण ठेवुन बचाव कार्यात सक्रीय होते. काही पोलिस अधिका–यांनी आपल्या प्राणाची पर्वा न करता पूरग्रस्त व्यक्तींचा जीव वाचविला.
- स्थानिक प्रशासनाकडील अपुरी साधनसामुग्री व मनुष्यबळाची जाणीव झाल्यामुळे अनेक लोकप्रतिनिधी, समाजसेवक व नागरीक यांनी बचाव कार्यात आपल्या संपुर्ण शक्तीनिशी प्रशासनास सहकार्य केले.
- जिल्हा प्रशासनाकडून दोन बोटी मदत कार्यासाठी उपलब्ध झाल्याने शेकडो अपदग्रस्तांचे प्राण वाचू शकले.
- सुमारे ६००० नागरीकांची सुटका व सुमारे ३००० पेक्षा जास्त व्यक्तींचे प्राण वाचविले

(क) मदत व पुनर्वसन कार्य

- तात्पुरत्या संक्रमण शिबिरांची संख्या – १०

- संक्रमण शिबिरात आश्रय घेतलेल्या व्यक्तीची संख्या – ६,०००
- संक्रमण शिबिरात पुरविण्यात आलेल्या सेवा – भोजन, निवास व वैद्यकीय उपचार व्यवस्था
- दि. २५/७/२००५ ते दि. ४/८/२००५ पर्यंत संक्रमण शिबिरे व विविध वसाहतीतील बाधित १० ते १२ हजार व्यक्तींना प्रतिदिन महापालिकेमार्फत भोजनाची व्यवस्था करण्यात आली.

(ड) जिवीत व वित्त हानी –

- एकुण बाधित व्यक्ती – १२७०००
- बाधित कुटूंबाची संख्या (अंदाजे ) – २५००० पेक्षा जास्त.
- मृतांची संख्या – १६ (पैकी स्त्रिया ४) (सोबत प्रपत्र २)
- मृत जनावरे – ३६ म्हैशी
- बेपत्ता व्यक्तींची संख्या – ४ (पैकी स्त्री १)
- वित्तीय हानी –

| | |
|---|---|
| महानगरपालिका मालमत्ता | रु. ४८.८७ कोटी. |
| खाजगी मालमत्ता | रु. २०० ते २५० कोटी |

(इ) बाधित अथवा खंडीत सेवा

- घनकचरा संकलन व वाहतूक
- पाणीपुरवठा
- इंधनपुरवठा
- दुरध्वनी यंत्रणा
- पथदिवे

(ई) बाधित सेवा पुर्ववत करण्यासाठी केलेल्या उपाययोजना –

१) घनकचरा संकलन व वाहतूक –

- पर्यायी व्यवस्था म्हणून अभिकर्त्याने जेसीबी व डंपर खाजगी व्यक्तींकडून भाडयाने उपलब्ध करुन घेतले.
- मा. जिल्हाधिकारी, ठाणे. यांचेकडून एकुण ६ जेसीबी व ३० डंपर / ट्रक्स् अधिग्रहीत करुन उपलब्ध करुन घेण्यात आल्या.
- उपलब्ध साधनसामग्रीने प्रथमतः जनावरांची प्रेते व रस्त्यावर टाकलेली कुजलेले अन्न पदार्थ व धान्य यांची प्राधान्याने विल्हेवाट लावण्यात आली.
- दिनांक २९ जुलै २००५ पासून अहोरात्र काम करुन १६०० मेट्रीक टन पेक्षा जास्त कचरा निर्मुलन. त्याचप्रमाणे कचरा उचललेल्या जागेवर टी.सी.एल पावडरची धुरळणी करण्यात आली.
- अभिकर्त्याकडील कचरा वाहतूकीसाठी तैनात नादुरुस्त वाहनांची दुरुस्ती.
- जिल्हा हिवताप निर्मुलन अधिका–यांशी सपर्क साधून जंतुनाशक फवारणीचे काम सुरु करण्यात आले.
- बाधित भागातील सर्व सार्वजनिक शौचालयांची स्वच्छता करुन जंतुनाशकांची फवारणी करण्यात येत आहे.

२ ) पाणी पुरवठा व्यवस्थापन

आपत्कालीन वितरण –

- शहरास पाणी पुरवठा करणारे म.औ.वि.महामंडळाचे पाणी पुरवठा केंद्र पाण्याखाली गेल्यामुळे बंद पडले होते. दि २७.७.०५ रोजी होणा–या अतिवृष्टीचे गांभीर्य लक्षात घेवून, अस्तित्वातील साठवण

टाक्यात सुमारे ४० लक्ष लिटर्स पाण्याचा साठा करून राखीव ठेवण्यात आला होता. टंचाई कालावधीत साठविलेले हे पाणी टॅकरद्वारे प्रत्येक भागात वितरीत करण्यात आले.

- वीजपुरवठा बंद असल्याच्या कालावधीत पाणीपुरवठा विभागास पर्यायी व्यवस्था म्हणून टॅकरवरील डिझेल पंप सेटचा वापर टॅंकर भरण्यासाठी करण्यात आला.
- महानगरपालिकेद्वारा एकूण २२ टॅंकर्स व जिल्हाधिकारी कार्यालयाने अधिग्रहीत करुन दिलेल्या १२ टॅकर्सने दि २९.७.०५ पासून दिनांक १.८.०५ पर्यत एकूण ५१८ टॅंकर्स (फेरे) द्वारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

पाणीपुरवठा पुर्ववत सुरु.

- दि ३०.७.०५ पासून म.औ.वि.महामंडळाच्या पाणी पुरवठा अंशत: सुरू
  दिनांक ३१/७/२००५ च्या सायंकाळी म.औ.वि.महामंडळाचा शहाड येथील पाणीपुरवठा केंद्र कार्यान्वित झाल्यामुळे संपुर्ण शहराचा पाणी पुरवठा सुरळीत झाला.

शुध्द पेयजल पुरवठा करण्यासाठीची दक्षता –

- नळाद्वारे पाणीपुरवठा सुरु करतांनो **नचमत बीसवतपदंजपवद** करण्यात आले
- सुमारे १९७३ विविध ठिकाणांच्या नळजोडणीद्वारे होणा–या पाणीपुरवठयातील क्लोरिनची मात्रा तपासण्यात आली असून ती योग्य असल्याची आढळून आलेली आहे.
- जलवाहिन्या व नळजोडण्यांवरील ८५० ठिकाणच्या गळत्या काढण्यात आलेल्या आहेत.

३)इंधन पुरवठा

महानगरपालिका वाहनांना इंधन पुरवठा करणारा पेट्रोल पंप पाण्याखाली गेल्याने अत्यावश्यक सेवेसाठी इंधन टंचाई निर्माण होवू नये म्हणून इंधन उपलब्ध असलेल्या पंपावरील शासनाचा राखीव कोटयातील इंधन साठा उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशाने अधिग्रहीत करण्यात आला.

४) दुरध्वनी यंत्रणा

पुरपरिस्थितीत संपुर्ण शहरातील दुरध्वनी यत्रंणा बंद पडल्याने प्रशासनातील अधिका–यांना परस्परांशी समन्वय साधून मदत कार्य गतीमान करण्यासाठी सर्व नियंत्रक व अंमलबजावणी अधिकारी यांना तात्काळ पर्यायी व्यवस्था म्हणून एअरटेल व रिलायन्स मोबाईल कंपन्यांचे एकुण ३९ मोबाईल संच पुरविण्यात आले.

५)पथदिवे दुरुस्ती

शहरातील एकूण १४,००० पथदिव्यांपैकी नादुरुस्त झालेल्या ११०० पथदिव्यांपैकी ८० टक्के इतके पथदिवे विद्युत विभागामार्फत पूर्ववत सुरु केले.

(फ) १. साथरोग नियंत्रणासाठी महानगरपालिकेने केलेल्या उपाययोजना व अंमलबजावणी

- आपादग्रस्त भागातील सद्यस्थितीत निवास करीत असलेल्या व्यक्तींना भेटी देवुन रोगाची लक्षणे आढळलेल्या संभावित रुग्णांना प्राथमिक औषधोपचार व या दरम्यान घ्यावयाच्या खबरदारीबाबत मौखिक सुचना.
- फिरते वैद्यकीय पथकाची निर्मिती
- महानगरपालिकेकडून ६ आरोग्य केंद्रामार्फत सेवा सुरु
- दि. २८ जुलै रोजी अधिक्षक, मध्यवर्ती शासकीय रुग्णालय . यांचेशी समन्वय साधून साथरोगाचा धोका लक्षात घेवुन एकुण उपलब्ध २०० खाटांपैकी ५० खाटांचा स्वतंत्र कक्ष निर्माण केला.
- मध्यवर्ती रुग्णालयातील अपुरा औषधसाठा लक्षात घेवुन महानगरपालिकेडून अतिआवश्यक औषधसाठा उपलब्ध करुन देण्यात आला.
- उल्हासनगर मेडीकल असोशिएशन व इंडियन मेडीकल असोशिएशनच्या पदाधिका–यांसमवेत दि. २८ जुलै रोजी बैठक घेवुन मानद वैद्यकीय सेवा पुरविण्याची विनंती केल्यामुळे २५ खाजगी दवाखान्यात मोफत उपचाराची व्यवस्था करण्यात आली. रुग्णांसाठी आवश्यक औषध पुरवठा महानगरपालिकेकडून करण्यात आला.

- साथरोगाचा धोका टाळण्यासाठी महापालिकेने केलेल्या उक्त उपाययोजनांची माहिती आपादग्रस्तांना होण्यासाठी ध्वनिक्षेपकाद्वारे सूचित करण्यात आले.
- मध्यवर्ती रुग्णालयातील खाटांची संख्या लक्षात घेवुन राज्य कामगार विमा योजना रुग्णालयात ५० खाटांचा स्वतंत्र कक्ष स्थापित करण्याच्या सूचना रुग्णालय अधिक्षकांना दिल्या.
- याऊपरही आवश्यकता पाहून तातडीच्या स्थितीत वाढीव खाटा उपलब्ध होण्यासाठी सर्वानंद हॉस्पीटल या खाजगी रुग्णालयाशी संपर्क साधून वाढीव ५० खाटा उपलब्ध करण्याचा निर्णय घेतला.
- पुरपरिस्थिती निर्माण झालेल्या भागात साचलेल्या पाण्यात डासअळीनाशके टाकणे सुरु आहे.
- पाणी निर्जंतुकीकरण करण्यासाठी क्लोरीन गोळयांचे वाटप सुरु केले.
- पाणी उकळून  पिण्याबाबत माईकवरुन उद्घोषणा सुरु.
- साथरोग टाळण्यासाठी हातगाडीवरील अन्नपदार्थ विक्रीस बंदी व या आदेशाविरुध्द विक्री करणा—या व्यावसायिकांच्या हातगाडया जप्त करण्याची मोहीम सुरु केली.
- घनकच—यामधील भंगार, प्लॅस्टिक व रद्दी संकलीत करुन ती विक्री करण्या—या महिलांना जंतू संसर्ग होवू नये म्हणून अशा वस्तूंच्या खरेदीस पायबंद घालण्यासाठी भंगार व रद्दी विक्री केंद्र अधिनियमातील तरतुदीनुसार नोटीस देवुन बंद केले.

**(फ) २. साथरोगाचे निदान व नियंत्रणासाठी दैनंदिन सर्वेक्षण व औषधोपचार हाती घेण्यात आली. त्याचा तपशिल प्रपत्र २ अ मध्ये जोडला आहे.  (सोबत प्रपत्र २ अ )**

(ग) <u>दारिद्रय रेषेखालील व आर्थिकदृष्टया कमकुवत वर्गातील पूरग्रस्त व बेघर व्यक्तींना जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा</u> —

- आर्थिकदृष्टया कमकूवत व दारिद्रय रेषेखालील बाधित सुमारे १६,००० कुटूबांना महानगरपालिकेमार्फत प्रत्येकी १० कि.ग्रॅम तांदूळ, २ कि. ग्रॅ. दाळ, १ कि. ग्रॅम तेल व मीठ पुरवठा करण्यात आला.
- १३००० कुटूंबाना चटई / चादर पुरविण्यात आली.
- प्राथमिक शाळेत शिक्षण घेणा—या बाधित कुटूंबातील विद्यार्थ्यांना पाठयपुस्तके वहया व गणवेश यांचे मोफत वितरण करण्याचे प्रस्तावित .

(ह) <u>मदत व पुनर्वसन कामात आलेल्या अडचणी व त्यावरील उपाययोजना</u> —

- कर्मचा—यांची अनुपस्थिती — आरोग्य विभागातील कर्मचा—यांची मोठया प्रमाणावरील अनुपस्थीती लक्षात घेवुन कर्मचा—यांना परिस्थितीचे गांभीर्य व त्यांच्या कर्तव्याची जाणीव करुन देण्यासाठी कामगार संघटनांच्या सहकार्याने सफाई कामगार, मुकादम व स्वच्छता निरिक्षक यांची जाहिर सभा घेवुन त्यांना कामावर उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले. सदर आवाहनास अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यामुळे .अनुपस्थितीत कर्मचा—यांवर अत्यावश्यक सेवा अधिनियम व महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतुदीन्वये शिस्तभंगाची  कारवाई करण्याची ताकीद देण्यात आली. काही कामगार निलंबित केले त्यामुळे  दि. ३०/७/२००५ कर्मचा—यांच्या उपस्थितीत वाढ झाली. आरोग्य खात्यातील ७० मुकादम व १८ स्वच्छता निरिक्षक यांना रात्री मुख्यालयातच उपस्थित राहणे अनिर्वाय केले.
- अत्यावश्यक सेवेतील यंत्रसामुग्रीमधील बिघाड — महापालिका सध्या खाजगी अभिकर्त्याच्या अत्याधुनिक वाहनाद्वारे कच—याची वाहतूक करते परंतू त्या अभिकर्त्याच्या ताफ्यातील  कॉम्पॅक्टर्स, स्कीप लोडर्स व टिपर्स याप्रकारची १५ वाहने पुर्णपणे पाण्याखाली गेल्याने नादुरुस्त झाल्यामुळे घनकचरा वाहतूकीस विलंब झाला. त्यावर मात करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी कार्यालय, परिवहन विभाग. यांच्या समन्वयाने इतर शासकीय विभागांची तसेच खाजगी वाहने अधिग्रहीत करण्यात आली.

(ज) <u>मदत कार्यातील समन्वय व मार्गदर्शन</u>

- **महापालिका स्तरावरील समन्वय**

- दिनांक २६ जुलै रोजी उद्भवलेली पूर परिस्थिती व त्यानंतरचा पावसाचा इशारा लक्षात घेता दि. २६ जुलै २००५ रोजी उशिरा रात्री सर्व विभागप्रमुखांची बैठक घेवुन शासन मार्गदर्शक सूचनांनुसार तयार करण्यात आलेल्या कृती आराखडयाची तंतोतंत अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या.

- आपत्कालीन कृती आराखडयानुसार मदत व पुर्नवसन कार्य शीघ्र गतीने करण्यासाठी आपत्कालीन मदत पथकाशिवाय इतर वरिष्ठ अधिका—यांना परिस्थिती नियंत्रणात येईपर्यंत २४ तास मुख्यालयात उपस्थित राहण्याच्या सूचना दिल्या.
- मदत व पुनर्वसनाच्या कालावधीत दररोज रात्री उशिरा दिवसभरात झालेल्या कामाचा आढावा व पुढील दिवसाचे नियोजनासाठी सर्व नियंत्रक व अंमलबजावणी अधिका—यांची बैठका नियमित घेण्यात आल्यात.
- मा. महापौर यांना लेखी विनंती करुन दि. २८ जुलै रोजी आपत्कालीन परिस्थितीबाबत सकाळी ११.०० वा. पदाधिका—यांची बैठक बोलावली.
- मा. महापौरांच्या अध्यक्षतेखाली दि. २८ जुलै रोजी दु. ४.०० वाजता सर्व नगरसेवकांशी विशेष अनौपचारिक सभेद्वारे चर्चा करुन आपत्ती निवारणाच्या उपाययोजनाबाबतचा धोरणात्मक निर्णय घेतला.
- सर्व पक्षीय लोकप्रतिनिधींना मदत व पुनर्वसन कार्यात सहभागी करुन घेंण्यात आले.
- मा. महापौर श्रीमती. ज्योति सुरेश (पप्पू) कालानी, उपमहापौर श्री. विनोद तलरेजा, सभागृह नेता श्री. किशोर वनवारी, विरोधी पक्ष नेता श्री. धनजंय बोडारे , सर्व पक्षीय गटनेते व इतर सर्व लोकप्रतिनिधींनी मदत व पुर्नवसन कार्यात सक्रीय सहभाग घेवुन प्रशासनास मदत केल्याने या संकटावर मात करता आली.

### शासन स्तरावरील समन्वय

- दि. २८ जुलै, २००५ रोजी मा.ना. श्री. विलासरावजी देशमुख, मुख्यमंत्री यांनी दुरध्वनीवरुन आयुक्तांशी थेट संपर्क करुन परिस्थितीची माहिती घेतली. तसेच मदत व पुर्नवसन कार्याबाबत त्यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात आली.
- अडचणीच्या प्रसंगी मा श्री नानासाहेब पाटील. भा.प्र.से. प्रधान सचिव, नवि २, यांचे मार्गदर्शन घेवून त्यातून मार्ग काढला.
- मा.श्री. उमेशचंद्र सारंगी भा.प्र.से., मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव यांना परिस्थितीचे आकलन होण्यासाठी वेळोवेळी माहिती देवुन त्यांच्या मार्गदर्शक सूचंनानूसार कार्यवाही केली.
- मा. श्री. विश्वासराव धुमाळ, भा.प्र.से. प्रधान सचिव, पाणीपुरवठा. यांना परिस्थितीचे आकलन होण्यासाठी वेळोवेळी माहिती देवुन त्यांच्या मार्गदर्शक सूचंनानूसार कार्यवाही केली.
- जिल्हा संपर्क सचिव मा. मुकेश खुल्लर भा.प्र.से., यांचेशी सतत संपर्क ठेवून पाणीपुरवठा पुर्ववत करणे व घनकच—याची विल्हेवाट लावण्यासाठी त्यांनी दिलेल्या सूचंना बरहूकुम अंमलबजावणी.

### जिल्हा प्रशासनाशी समन्वय

- दि. २६ जुलै रोजी जिल्हाधिकारी, ठाणे. यांना शहरातील परिस्थिती व महापालिका प्रशासन महसूल व पोलिस विभागाच्या मदतीने करीत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली.
- दि. २७ जुलै रोजी जिल्हाधिकारी, ठाणे. यांना शहरातील परिस्थितीची माहिती देवुन बचाव कार्यात आवश्यक साधनसामुग्री प्राप्त करुन घेतली त्यामुळे जीवितहानी टळली.
- दि. २८ जुलै रोजी घनकचरा निर्मुलन व पाणीपुरवठा करण्यासाठी आवश्यक वाहने अधिग्रहीत करण्याची विनंती करुन ती प्राप्त करुन घेतली त्यामुळे परिस्थितीवर नियंत्रण करणे शक्य झाले
- जिल्हा प्रशासनातील इतर अधिका—यांशी सतत संपर्क प्रस्थापित करुन समन्वय साधण्यात आला.

### जिल्हा व स्थानिक पोलिस प्रशासनाशी समन्वय

- दि. २६ व २७ जुलै रोजीची पूरपरिस्थिती हाताळण्यात स्थानिक पोलिस यंत्रणेचे सक्रीय सहभागामुळे शेकडो लोकांचे प्राण वाचू शकले
- आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध झाल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती नियंत्रणात राहीली.
- दंगल सदृश्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेवुन पोलिस आयुक्त, ठाणे. यांना राज्य राखीव पोलिस दल अथवा शीघ्र कृती दल तैनात करण्याची विनंती केली.
- सदर विनंतीनुसार अतिरिक्त पोलिस आयुक्त यांनी स्वत: उल्हासनगर शहरास भेट देवुन उपायुक्त, परिमंडळ ४ कार्यालयात महापालिका आयुक्त, पोलिस उपायुक्त, सहा. आयुक्त आणि उपविभागीय अधिकारी. यांचेशी शहरातील परिस्थितीबाबत विचारविनिमय केला

- शहरात शीघ्र कृतीदल तैनात करण्यात येवुन शीघ्र कृती दलाचे संचलन करण्यात आले.

- उल्हासनगरसारख्या संवेदनशील शहरात कोणतीही अप्रीय घटना घडली नाही.

❑ **प्रसारमाध्यमांशी समन्वय**

- प्रसारमाध्यमांशी कमीत कमी संपर्क ठेवला
- तथापि त्यांना प्रत्यक्ष घटनास्थळी जावुन महापालिका करीत असलेल्या प्रयत्नांची वस्तुनिष्ठ माहिती घेण्याचे आवाहन करण्यात आले.त्यामुळे प्रसारमाध्यंमधून कोणतेही प्रतिकुल वृत्त प्रसिध्द झालेले नाही.

❑ **इतर विभागाशी समन्वय**

विद्युत मंडळ व म.औ.वि महामंडळाशी संपर्क साधून शहरातील विद्युत व पाणीपुरवठा व्यवस्था सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले.

❑ **नागरीकांशी समन्वय**

- दिनांक २८ व २९ जुलै रोजी पाणीपुरवठा व घनकचरा व्यवस्थापन याबाबत नागरीकांच्या तक्रारी लोकप्रतिनिधी व समाजसेवक यांच्या नेतृत्वाखाली अनेक शिष्टमंडळे समस्या घेवून येत होती. त्यांच्या समस्या जाणून घेवुन त्यावर वेळीच उपाययोजना करण्याचत येत आल्यामुळे प्रशासन व नागरीक यांच्यात परस्पर सामंजस्य व विश्वासाचे वातावरण निर्माण झाले.
- दि. २८ जुलै रोजी धरण फुटल्याचे वृत्त पसरल्यामुळे नागरीकांमध्ये भिती व घबरात निर्माण झाल्याचे लक्षात येताच पोलिस विभागाशी संपर्क साधून सदर वृत्तात तथ्य नसल्याची खात्री करुन नागरीकांना महापालिका व पोलिस विभागाने ध्वनिक्षेपकाद्वारे सदर वृत्त अफवा असल्याचे निवेदीत केले त्यामुळे समाजकंटकांचा विघातक प्रयत्न विफल झाला.
- पाणीपुरवठा सुरळीत होताच नागरीकांचा प्रशासनावरील विश्वास वाढला त्यामुळे घनकचरा निर्मुलनासाठी नागरीकांनी स्वत:हून पुढाकार घेतला व मोठया प्रमाणावरील कच—याचे ढीग हटविण्यास मदत केली.

❑ **मदत व पुनर्वसन कार्यात मार्गदर्शन व भेटी**

मा. ना. श्री. विलासरावजी देशमुख, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य. यांनी दि. २/८/२००५ रोजी मदत व पुर्नवसन कार्याची पाहणी करण्यासाठी उल्हासनगर शहरास भेट दिली व तद्नंतर सायंकाळी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कार्यालयात झालेल्या बैठकीत सदर कामाबद्दल समाधान व्यक्त केले.

मा. ना. श्री. गणेशजी नाईक, पालकमंत्री. यांनी आपातकालीन परिस्थितीत वेळोवेळी शहरास भेटी देवुन व दुरध्वनीद्वारे मदत व पुर्नवसन कार्याबाबत प्रशासनास मार्गदर्शन केले व त्यांच्या सहकार्यामुळेच महानगरपालिकेस शासनाच्या विविध विभागांकडून आवश्यक ती यंत्रसामुग्री व मदत वेळीच प्राप्त होवू शकली ज्यामुळे परिस्थिती नियंत्रणास आणण्यास मोलाची मदत झाली.

मा. मुख्यमंत्री यांचे व्यतिरिक्त मा. उपमुख्यमंत्री, मा. पालकमंत्री, व मंत्रीमंडळातील विविध मंत्री, मा. उपसभापती, विधान परिषद, मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद व स्थानिक खासदार व आमदार यांनी वेळोवळी भेटी देवुन मदतकार्याबाबत मार्गदर्शन व सूचना केल्यात त्यानुसार मदत व पुर्नवसन कार्य अद्यापही सुरु आहे.

<u>सद्यस्थिती</u>

दि. १/८/२००५ पासून दैनंदिन जनजीवन पुर्वपदावर आले आहे. साथरोग नियंत्रणात ठेवण्यासाठी महानगरपालिका यशस्वी झाल्यामुळे राज्य शासन व महापालिकेची विश्वासार्हता वाढली आहे.

(रामनाथ सोनवणे)
दिनांक : १६/८/२००५ आयुक्त,
उल्हासनगर महानगरपालिका

**प्रपत्र — १**

**पुरामुळे बाधीत झालेल्या वस्त्यांची यादी**

| अ.क्र. | बाधित वस्त्या | अंदाजे बाधित लोकसंख्या |
|---|---|---|
| १ | सम्राट अशोक नगर | १५०० |
| २ | रेणुका सोसायटी | ५०० |
| ३ | आर्शिवाद कॉलनी | ८०० |
| ४ | आयोध्या नगर | ३४५० |
| ५ | शांति नगर | ५५०० |
| ६ | सेक्शन २० | ३५०० |
| ७ | राजीव गांधी नगर | १५०० |
| ८ | गुलशन नगर | १००० |
| ९ | क्रांती नगर | ५०० |
| १० | धोबी घाट, संभाजी नगर, कमला नेहरु नगर | ३००० |
| ११ | रमाबाई आंबेडकर नगर | २००० |
| १२ | लेप्रसी कॉलनी, साईबाबा नगर | ५०० |
| १३ | भारत नगर, तानाजी नगर | ५००० |
| १४ | रविंद्र नगर | २००० |
| १५ | पांडव नगर | ५०० |
| १६ | वाको कम्पाऊंड | २००० |
| १७ | करोतिया नगर | ८०० |
| १८ | वडोल गांव | १००० |
| १९ | संजय गांधी नगर | ४०० |
| २० | उल्हासनगर रेल्वे स्टेशन परिसर | ५००० |
| २१ | चांदीबाई कॉलेज परिसर | २००० |
| २२ | गणेश नगर, शिवाजी नगर | १००० |
| २३ | हिरा घाट, भैयासाहेब आंबेडकर नगर | ८००० |
| २४ | वालधुनी नाल्याच्या दोन्ही बाजू | ८००० |
| २५ | भौजी नगर, काजल पेट्रोल पंप | ४००० |
| २६ | वाघेला नगर | ५०० |
| २७ | विठ्ठलवाडी स्टेशन परिसर | २००० |
| २८ | मिनाताई ठाकरे नगर | १००० |
| २९ | खन्ना कंपावड | ३००० |
| ३० | स्टेट बॅंक ते शांतिनगर नाका, कल्याण – अंबरनाथ रस्त्याच्या दोन्ही बाजूची दुकाने व घरे. | १६००० |
| ३१ | कैलास कॉलनी, गौतम नगर | ३००० |
| ३२ | आम्रपाली नगर | १००० |
| | **एकुण** | ८९९५० |

प्रप़त्र — २

पुरात मृत पावलेल्या व्यक्तींची यादी

| अ.क्र | मृत व्यक्तीचे नांव | लिंग | वय |
|---|---|---|---|
| १ | नरेंद्र चौरोमल दोडेजा | पुरुष | ५० |
| २ | गोविंद सुपडू महाले | पुरुष | ७० |
| ३ | नैमूददीन इसामुददीन शेख | पुरुष | २२ |
| ४ | रंभाव पी. यादव | पुरुष | ३० |
| ५ | पराग नाथा वाधेला | पुरुष | ६० |
| ६ | गीता रवि जोगू | स्त्री | ०४ |
| ७ | वर्षा रवी जोगू | स्त्री | १० महिने |
| ८ | हरिशंकर बी. यादव | पुरुष | २५ |
| ९ | समाधान भास्कर शिवडे | पुरुष | २९ |
| १० | जनाबाई मसू अभिमन्यू | स्त्री | ६० |
| ११ | सुखदेव हिंमत वाघ | पुरुष | ४५ |
| १२ | रामसिंग | पुरुष | ४५ |
| १३ | महमंद वासीम इस्माइल खान | पुरुष | २० |
| १४ | फिरोज शमीम खान | पुरुष | २६ |
| १५ | अनोळखी | पुरुष | ३५ |
| १६ | धनवंती रुपचंद असरानी | स़्त्री | ६२ |

स्त्रोत :— मध्यवर्ती रुग्णालय

उल्हासनगर महानगरपालिका उल्हासनगर
साथरोग व्यवस्थापन अहवाल

( दिनांक २६ /७/२००५ ते १६/८/२००५ पर्यंतचा तपशिल )

प्रपत्र – २ अ

| सर्वेक्षण/ रुग्णालय | सर्वेक्षण केलेली लोकसंख्या | गॅस्ट्रो | | कॉलरा | | अतिसार | | हगवण | ताप | लेप्टो | डेंग्यू | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लागण | मृत | लागण | मृत | लागण | मृत | | | | | |
| आरोग्य कर्मचा–यांकडून घरोघरी सर्वेक्षण | ८५३१९८ | १२ | ० | ० | ० | २६०० | ० | १२० | ५२०२ | ० | ० | ० |
| मध्यवर्ती रुग्णालय | ० | १०० | ० | २३ | १ | ५९ | ० | ९ | १०६ | २* | २@ | ० |
| शासनाकडील फिरती वैद्यकीय पथके (२) | ० | ० | ० | ० | ० | ४१ | ० | ९१ | ७८३ | ० | ० | ४७१ |
| २५ खाजगी वैद्यकीय व्यावसायिक | ० | १४४ | ० | ० | ० | ७२५ | ० | ० | १७६० | ० | ० | १० |
| एकुण | ८५३१९८ | २५६ | ० | २३ | १ | ३४२५ | ० | २२० | ७८५१ | २ | २ | ४८१ |
| बरे झालेले रुग्ण | | २२९ | ० | २२ | ० | ३०६५ | ० | २०१ | ६७८६ | १ | १ | ४८१ |

टीप :–

* लेप्टोस्पायरोसिसने एका रुग्णाचा दि. १३/८/२००५ रोजी मृत्यू.

@ संशयित रुग्ण.

मा. सचिव :— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

विषय क्र. ३ :— उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १२० विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

काही सदस्य :—पास, पास ......

मा. सभापती :—सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:—

विषय क्र. ३ :— उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १२० विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् 2004-2005 च्या निधीतून मा. नगरसेवक यांनी कामे करणेसाठी विनंती केलेली आहे.

| अ.क्र | कामाचे ठिकाण | प्राकलनीय किंमत | करारनामा दिनांक | एजन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| 1 | उल्हासनगर-1 येथील पॅनल क्र. 1 राजीव गांधी नगर, येथील विजय झा ते गुप्ता किराणापर्यंत, अे ब्लॉक 21 जवळ सी सी पायवाटा व नाल्या बांधणे(नगरसेवक निधी 791) | 199875/- | 2/9/05 | मे लक्ष्मी म. का. सोसा. |
| 2 | उल्हासनगर-3 प्रभाग क्र. 19 मधील वाघेलानगर येथे सी सी पायवाटा व नाल्या बनविणे (नगरसेवक निधी 1194) | 199655/- | 2/9/05 | मे लक्ष्मी म. का. सोसा. |
| 3 | उल्हासनगर-5 येथील प्र क्र 13 मधील विनोद अपार्टमेंट चौकापासुन महेक अपार्टमेंटपर्यत एम 350 ने रस्ता बनविणे (महापालिका निधी 1328) | 299000/- | 2/9/05 | मे स्वप्नील म का सोसा. |
| 4 | उल्हासनगर-4 प्र क्र. 17 मधील श्रीरामनगर पुनम लॉज ते बापू सावंत यांच्या घरापर्यत एम 250 रोड व नाली बनविणे (नगरसेवक निधी 1532) | 347640/- | 2/9/05 | मे हरे क्रिष्णा म का सोसा |
| 5 | उल्हसनगर-3 हिराघाट जवळ बोट क्लबमध्ये गणपती विसर्जनासाठी दुरूस्ती करणे (महापालिका निधी 1592) | 448380/- | 3/9/05 | मे श्री मॉ म का सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6 | उल्हासनगर-2 वार्ड 22 येथील नाना नानी पार्कमध्ये विकास कामासाठी (कारेजे बसविण) (मा. महापौर निधी 1199) | 299700/- | 5/9/05 | मे श्रीसिध्दनाथ म का सोसा. |
| 7 | उल्हासनगर-4 येथील एकविरा कॉलनी, गुरूकृपा कॉलनी, दासुमल नगर येथे सी सी रोड व नाली बनविणे (प्रभाग समिती क्र. 3 निधी 1426) | 98300/- | 6/9/05 | मे भोलेनाथ म. का. सोसा. |
| 8 | उल्हासनगर-1 वार्ड नं 3 येथील शिवनेरीनगर व कमलानेहरू नगर मध्ये विलास सावंत यांच्या घरापासून शाबाजी मोर, विरचंद यादव जे एम यादव, मनोहर झगड, पाटील, श्रीराम सिंग बाळं शिंदे यांच्या घराजवळ सिमेंट पायवाटा व नाल्या बनविणे (नगरसेवक निधी 1501) | 200000/- | 9/9/05 | मे सिध्दनाथ म का सोसा |
| 9 | उल्हासनगर-3 गोपाळवाडी, विठठ्लवाडी येथील उद्यानाला हरित सुशोभिकरण व नुतनीकरण करणे (प्रभाग समिती निधी 976) | 100000/- | 12/9/05 | मे श्रीलक्ष्मीनारायण आदि म का सोसा. |
| 10 | उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र. 12 ब मध्ये ब्लॉक क्र. 939 ते 845 पर्यत व बॅ नं 1724 आणि बॅनं 1788 जवळ, मसंद यांच्या घरापासून मटलानी यांच्या घरापर्यत नाली पुर्ण बांधणे (नगरसेवक निधी 993) | 59850/- | 12/9/05 | मे कलश म. का. सोसा. |
| 11 | सी सी पॅसेज व नाली बनविणे , तिवारी हाऊस , घनशाम दुबे, मनु कॉम्पलेक्स ते डौ अशोक, सुयीान सिंग एम आय डी रोड लगत पॅनेल नं 4 उल्हासनगर-1 (महापालिका निधी 1151) | 74041/- | 12/9/05 | मे अमेय म का सोसा. |
| 12 | उल्हासनगर-3 वार्ड 7 येथील टेक्नीकल शाळेजवळ, नवजीवन बँकेसमोर व टाऊन हॉल जवळ, नवीन मुतारी बनविणे व जवाहर हॉटेल जवळ मुतारी नुतनीकरण करणे (महापालिका निधी 1164) | 99000/- | 12/9/05 | मे श्री विनायक म का सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 13 | उल्हासनगर-4 प्रभाग क्र. 16 मध्ये बॅ नं 1545, 1543, 1544 येथे सी सी पायवाटा बॅ नं 1610 येथे ड्रेनेज चेंबर आणि एस डब्ल्यू पाईप लाईन बनविणे (नगरसेवक निधी 1189) | 199539/- | 12/9/05 | मे शिलालेख म. का. सोसा.. |
| 14 | उल्हासनगर-3वार्ड 7 येथील सुभाषनगरमध्ये गणेशमंदिर ते महापालिकेच्या शौचालयापर्यत आफफिस ते आर आर सिंग यांच्या घरापर्यत गंजराथीपाडा ते कुलदीपसिंग यांच्याद घरापर्यत , राजेश सलुन ते मडपवा शर्मा यांच्या घरापासुन कृष्णा किराणा स्टोरपर्यत नाल्या बनविणे (महापालिकानिधी 1295) | 187625/- | 12/9/05 | मे जय म. का सोसा. |
| 15 | उल्हासनगर-4 येथील प्रभाग क्र. 14 अ, मधील मिनाक्षी अपार्टमेंट ते गणेश विष्णु तरे यांच्या घरापर्यत रस्त्याचे काफक्रिटीकरण करणे. (महापालिका निधी 1301) | 299800/- | 12/9/05 | मे भोलेनाथ म. का. सोसा. |
| 16 | उल्हासनगर-3 खन्ना कंपाऊंड येथे चाळ क्र. ए व बी येथे सी सी रोड व नाली बांधणे (प्रभाग समिती क्र. 3 निधी 1372) | 98300/- | 12/9/05 | मे अमेय म का सोसा. |
| 17 | उल्हासनगर-2 येथील गौतम वासवानी यांच्या घरापासून ब नं 744 येथील नाला (संरक्षण भिंत ) दुरूस्ती करणे (वार्ड 23) (महापालिका निधी 1373) | 69900/- | 12/9/05 | मे ओम म. का सोसा. |
| 18 | उल्हासनगर-1 प्रभाग क्र. 1 ब्राम्हणपाडा व आंबेडकरनगर,येथील बबन साठे यांचे घर, बावीस्करभिमराव यांचे घर, राजानी नागवेकर, विठठ्ल मंदिर जवळ खैरनार व मोरेबाबा यांचे घराजवळ सी सी पायवाटा व नाल्या दुरूस्तीकरणे (प्रभाग समिती निधी 1376) | 99800/- | 12/9/05 | मे श्री मॉ म का सोसा. |
| 19 | उल्हासनगर-3 प्रभाग क्र. 1 ब्राम्हणपाडा येथील यंशवंत जाधव, चापडा कोर्टाच्या मागे पानसरे छत ते नागपुरे यांच्या घराजवळ सी सी व नाल्या दुरूस्ती करणे (प्रभाग समिती निधी 1378) | 99900/- | 12/9/05 | मे ओम म. का सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 20 | उल्हासनगर-4 येथील हनुमान मंदिर जवळ अलंकार सोसायटी जॉनी मार्केट समोर बॅ नं 1386, 94, 95 येथे सी सी रोड व नाली बनविणे (प्रभाग समिती 3 निधी 1427) | 98300/- | 12/9/05 | मे शिलालेख म. का. सोसा.. |
| 21 | उल्हासनगर-1 वार्ड क्र. 4 येथील बॅ नं 257, 259, 214, 218, 262, 208 मागील सिमेंट पायवाटा व नाल्या बनविणे (नगरसेवक निधी 1503) | 200000/- | 12/9/05 | मे अल्का म का सोसा |
| 22 | उल्हासनगर-4 येथील सेक्शन 25 दुल्हारी पाडा येथे सी सी पॅसेस व नाली दुरूस्ती करणे. (नगरसेवक निधी 1510) | 148700/- | 12/9/05 | मे अल्का म का सोसा |
| 23 | उल्हासनगर-1 वाड क्र. 2 येथील खुनीखडडयाजवळ व राम ट्रेडींगजवळ नाला बनविण. (नगरसेवक निधी 1523) | 200000/- | 12/9/05 | मे साई लक्ष्मी म का सोसा. |
| 24 | उल्हासनगर स्टेशन जवळील गणेश विसर्जन कुंडास पुरक कामांसाठी(सुशोभिकरणासाठी) (नगरसेवक निधी 1561) | 200000/- | 12/9/05 | मे शिव म `का सोसा |
| 25 | उल्हासनगर-3 स्मशान भुमी य्रथे संरक्षण भिंत बनविणेबाबत.(महापालिका निधी 1582) | 498570/- | 12/9/05 | मे ओम साईराम म का सोसा. |
| 26 | उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालय इमारतीच्या छताला वॉटर प्रुफिंग करणे (महापालिका निधी 1599) | 105070/- | 12/9/05 | मे श्री मॉ म का सोसा. |
| 27 | उल्हासनगर-2 वार्ड 23 येथे व्हाईट हाऊस जवळ कलव्हर्ट स्लॅब बनविणे (महापालिका निधी 1599) | 297650/- | 12/9/05 | मे भोलेनाथ म. का. सोसा. |
| 28 | उल्हासनगर-2, ॲटलांटा अपार्टमेंटच्या मागे व महाराजा हॉल जवळ नाला बनविणे. (महापालिका निधी 938) | 69910/- | 13/9/05 | मे. श्रीलक्ष्मीनारायण आदि म. का. सोसा |
| 29 | उल्हासनगर-1 प्रभाग क्र. 4 सभाजीनगर येथे मानसिंग तबेला जवळ व मानसिंग चव्हाण यांच्या घराजवळ नाला बनविणे (महापालिका निधी 1015) | 172900/- | 13/9/05 | मे हरे क्रिष्णा म का सोसा |
| 30 | उल्हासनगर-3 येथील सेवासदन कॉलेज ते मयुर हॉटेल पर्यत साईट पटटया व नाल्या बनविणे (महापालिका निधी 1140) | 94600/- | 13/9/05 | मे. श्वेता म का सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 31 | उल्हासनगर-3 येथील सुभाषनगर येथे सकट यांच्या घरापासून मुदलीयार यांच्या घरापर्यत टी सोघर मनोज यांच्या घर आर आर सिंग घरापासून अनिता किराणा स्टोरपर्यत व नराल्या बनविणे (गलिच्छ वस्ती निधी 1309) | 64400/- | 13/9/05 | मे श्रीलक्ष्मीनारायण आदि म का सोसा. |
| 32 | सी सी ॲण्ड ड्रेन फ्रॉम सुभाष पवार हाऊस टू स्वामी मंदीर सुयीाान पवार ट लॅटरीन ॲण्ड नियर सुभाष नरसाळे हाऊस ॲट गांधीनगर गरीब नगर वार्ड 6 (नगरसेवक निधी 1484) | 200000/- | 13/9/05 | मे ज्योती म का सोसा. |
| 32 | उल्हासगर-3 वार्ड नं 25, दसरा मैदान मध्ये ग्रील व कर्बिन बसवुन सुशोभिकरण करणे. (महापौर निधी 1557) | 200000/- | 13/9/05 | मे दत्त म. का सोसा |
| 33 | उल्हासनगर-3 येथील वार्ड 6 आझादनगर मध्ये संतोष यादव , संतोषीमाता मंदिर जवळ ते तिवारी व दुबे यांच्या घरापय्रत सिमेंट पायवाटा ढम 250 व नाल्या बनविणे (महापालिका निधी 1558) | 150100/- | 13/9/05 | मे माजीसैनिक म का सोसा |
| 34 | उल्हासनगर-3, हिराघाट येथील पुलाची संरक्षण भिंत व फुटपाथची पुनर्बांधनी करणे. (महापालिका निधी 1583) | 499630/- | 13/9/05 | मे चंदा म का सोसा |
| 35 | उल्हासनगर-3 वार्ड 2 चाळीस कोठी सतनाम कॉलनी येथे संरक्षक भिंत बनविणेबाबत (महापालिका निधी 1598) | 135400/- | 14/9/05 | मे सुर्य ज्योत म का सोसा. |
| 36 | उल्हासनगर-2 , साकी पॅलेसच्या मागे व बाजूला नाली बनविणे (महापालिका निधी 940) | 99750/- | 16/9/05 | मे शरप्रभा म. का. सोसा. |
| 37 | उल्हासनगर-3 ओमकार हॉस्पिटल ते परमार यांच्या घरापर्यत नाला व नाली बांधणे (दुर्बलघटक निधी 955) | 128250/- | 16/9/05 | मे ज्योती म का सोसा. |
| 38 | उल्हासनगर-3 शास्त्रीनगर , विठठ्लवाडी, येथील उद्यानाला हरित, सुशोभिकरण व नुतनीकरण करणे (प्रभाग समिती निधी 975) | 200000/- | 16/9/05 | मे भोलेनाथ म. का. सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 39 | उल्हासनगर-1 प्र.क्र.1 मधील रेड्डी यांचे आर.आर.व्ही. इंडस्ट्री कंम्पांउंला लागून असलेल्या नाल्यावर साकव (कलव्हर्ट) बनविणे.(महापालिका निधी 1144) | 188000/- | 16/9/05 | मे.अलका म.का. सोसा. |
| 40 | उल्हासनगर-1 प्र.क्र.2 मधील महालक्ष्मी मार्केट शिवरोड जवळ नाला बांधणे आणि बॅ.क्र.13 जवळ साकव (कलव्हर्ट) बनविणे. (महापालिका निधी 1146) | 106500/- | 16/9/05 | मे.अमेय म.का. सोसा. |
| 41 | उल्हासनगर-5 येथील प्र क्र. 11 मधील सेक्शन 36 मधील बॅ नं 2058 जवळ सोकव बांधणे व नाली बांधणे (महापालिका निधी 1227) | 150000/- | 16/9/05 | मे धनलक्ष्मी. का सोसा. |
| 42 | प्रभाग क्र. 9 मधील श्री गायकवाड यांच्या घरापासून रोडपर्यंत व अशोक पवार यांच्या घरामागे श्री कांबळे ते श्री शिखेर यांच्या घरापर्यंत श्री निकम यांच्या घरामागे सी सी पायवाटा व नाली दुरूस्ती करणे. (प्रभाग समिती निधी 1260) | 100000/- | 16/9/05 | मे हरे क्रिष्णा म का सोसा |
| 43 | उल्हासनगर-1 प्रभाग क्र.2 बॅ.क्र.8 पुष्पांजली कंपाउंड ते सोमेफरम घरापर्यंत सी.सी.पायवाटा व नाली बांधणे.(महापालिका निधी 1293) | 80200/- | 16/9/05 | मे.मुंब्रा देवी म. का.सोसा. |
| 44 | उल्हासनगर-1 प्रभाग क्र. 4 येथील शाळाा क्र. 20 च्या समोर साकव बांधणे आणि तबेल्याच्या जवळ नाला बांधणे (महापालिका निधी 1294) | 195200/- | 16/9/05 | मे अल्का म का सोसा. |
| 45 | उल्हासनगर-3 गरीबनगर वार्ड क्र.6 येथील अशोक परमार यांचे घरापासून ठगाजी ससाणे यांच्या घरापर्यंत व पांडूरंग पवार यांचे घरापासून मराठे यांचे घरापर्यंत आणि पांडूरंग कांबळे यांच्या घरापासून वसंत गुडेकर यांच्या घरापर्यंत नाल्या दूरूस्ती व बनविणे. (महापालिका निधी 1308) | 116600/- | 16/9/05 | मे.लक्ष्मीनारायण म.का.सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 46 | उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र. 11 मधील कैलास कॉलनी मधील नविन नाका नं 9 ते जल आश्रम , महापालिका हद्दीपर्यत पी सी ओ मार्गे जाणारा रस्ता सी सी एम 350 ने बांधणे (महापालिका निधी 1316) | 299000/- | 16/9/05 | मे वडार म का सोसा. |
| 47 | उल्हासनगर-5 येथील प्र क्र. 11 येथील कैलास कॉलनी बस स्टॉप ते राजाराम पाटील यांच्या घरापर्यतचा रस्ता सी सी एम 350 ने बांधणे (गलिच्छ वस्ती निधी 1317) | 299000/- | 16/9/05 | मे मुंब्रादेवी म का सोसा. |
| 48 | उल्हासनगर-2 येथील वार्ड 23 कल्वर्ट जवळ शांती पॅलेस व लाकडाच्या वखारीसमोर सिमेंट कॉक्रीट रस्ता दुरूस्ती व नाली बनविणे (महापालिका निधी 1344) | 90600/- | 16/9/05 | मे हरे रामा म का सोसा. |
| 49 | उल्हासनगर-2 वार्ड 23 येथील बॅ नं 631 खेमानी येथील देवी मेडीकल व जनरलस्टोर जवळ साकव बांधणेबाबत (महापालिका निधी 1345) | 65000/- | 16/9/05 | मे श्री गेगा म का सोसा. |
| 50 | उल्हासनगर- 3 येथील प्रबुध्दनगर, करोतीया नगर आणि गौतमनगर येथील प्र क्र. 1 मधील सी सी पायवाटा व नाली दुरूस्ती करणे. (प्रभाग समिती निधी 1377) | 99700/- | 16/9/05 | मे. अल्का म का सोसा. |
| 51 | उल्हासनगर-3 वार्ड क्र. 7 मध्ये ॲडनन्स कंपाऊंडच्या बाजूला आचारवाली गल्ली येथे दोन शिटचे शौचालय बनविणे (गलिच्छ वस्ती निधी 1419) | 148500/- | 16/9/05 | मे वर्षा म का सोसा. |
| 52 | उल्हासनगर-3 येथील सी सी पायवाटा व नाली बनविणे पंजाबी कॉलनी येथे गुरूद्वाराजवळ भवानीनगर वार्ड नं 7 सी (नगरसेवक निधी 1486) | 100000/- | 16/9/05 | मे धनलक्ष्मी म. का सोसा. |
| 53 | उल्हासनगर-5 प्र क्र. 19 मधील 2) आग्नीशामन दलाच्या बिल्डींगच्या मागे 2) गुडदाड सिंगच्या घराच्या दद्यानाजवळ 3) अभिलाशा अपार्टमेंट जवळ 4) ट्रान्सफार्मर ते हरेश महाराज यांच्या घरापर्यत रस्ता बी एम एसी ने विकसित करणे (मा. उप-महापौर निधी 1490) | 250000/- | 16/9/05 | मे अल्का म का सोसा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 54 | उल्हासनगर-3 वार्ड क्र. 23 येथील सपना उद्यानामध्ये झरणे व विविध ठिकाणी सुंदरीकरण करणे (नगरसेवक निधी 1495) | 200000/- | 16/9/05 | मे गुरूदेव म का सोसा |
| 55 | उल्हासनगर-1 येथील आरती अपार्टमेंट ते लक्ष्मी अपार्टमेंट मार्गे बॅ नं 402 येथील सिमेंट पायवाटा व नाल्या बनविणे (महापालिका निधी 1497) | 150000/- | 16/9/05 | मे ओम साईराम म का सोसा |
| 56 | उल्हासनगर-1 येथील वार्ड 3 शहाड गावठाण येथे इंदर मढवीव भगवान नाना मढवी यांच्या घरापर्यंत सिमेंट पायवाटा व नाल्या बनविणे (नगरसेवक निधी 1502) | 200000/- | 16/9/05 | मे अल्का म का सोसा |
| 57 | उल्हासनगर-3 येथील कमू कलानी चाळ, सोनार गल्ली,अस्वरे यांच्या घराजवळ लिंबा पवार यांच्या घराशेजारील परिसर, सरदार पाडा येथील गरिबनगर व गांधीनगर येथे सिमेंट पायवाटा व नाल्या बनविणे (नगरसेवक निधी 1524) | 200000/- | 16/9/05 | मे ज्योती म का सोसा. |
| 58 | उल्हासनगर-3 येथील रेणूका सोसायटी गेट पासून विठठ्ल मंदिरापर्यंत व पाटणकर यांच्या घराजवळ नाली व सिमेंट पायवाटा आशिर्वाद सोसायटी येथे बनविणे (नगरसेवक निधी 1525) | 200000/- | 16/9/05 | मे ज्योती म का सोसा. |
| 59 | उल्हासनगर- 3 वार्ड नं 8 येथील जगन्नाथ गुप्ता यांच्या घराजवळील परिसर गल्ली नं 2 रेणूका सोसायटी येथे सिमेंट पायवाटा व नाल्या बनविणे (नगरसेवक निधी 1526) | 200000/- | 16/9/05 | मे ज्योती म का सोसा. |
| 60 | उल्हासनगर-3 वार्ड नं 23 येथे तबेला ते साकवपर्यंत नाला बांधणेबाबत (नगरसेवक निधी 1542) | 200000/- | 16/9/05 | मे श्रीविनायक म का सोसा |
| 61 | उल्हासनगर-3 वाड नं 23 येथे तबेला ते साकवपर्यंत नाला बांधणेबाबत (नगरसेवक निधी 1542) | 200000/- | 19/9/05 | मे श्रीविनायक म का सोसा |
| 62 | उल्हासनगर-3 येथील रेजन्सी हॉल ते सपना गार्डनच्या मागील बाजूपर्यंत सी सी एम-250 रोड बनविणे (महापालिका निधी 842) | 299850/- | 20/9/05 | मे भोलेनाथ म. का. सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 63 | उल्हासनगर-1 पॅनल नं 3 धोबीघाटख ओम साईनगर, सेंच्युरी शाळेसमोर अशोक गुजर ते सुभाष यशवंते व्हाया गोविंद सुर्वे यांच्या घराजवळ नाला बांधकाम करणे (दुर्बल घटक निधी 1011) | 199381/- | 20/9/05 | मे गावदेवी म का सोसा |
| 64 | उल्हासनगर-2 प्र क्र. 5 बॅ नं 628, 626, 629, 676, 586, 589 अनिल पॅलेस जवळ सी सी पायवाटा व नाल्या बांधणे. (नगरसेवक निधी 1131) | 199800/- | 20/9/05 | मे धन लक्ष्मी म का सोसा |
| 65 | उल्हासनगर-4 येथील प्रभाग क्र. 15 मधील मद्रासीपाडा येथे नाला बनविणे (महापालिका निधी 1138) | 99340/- | 20/9/05 | मे मानसी म का सोसा |
| 66 | उल्हासनगर-3 प्र क्र 8 मध्ये सिध्दार्थ बालवाडी व शौचालयाजवळ एम 250 ने रस्ता बनविणे (दुर्बलघटक निधी 1167) | 149850/- | 20/9/05 | मे चंदा म का सोसा |
| 67 | उल्हासनगर-4 येथील प्र क्र. 9 मधील महात्मा फुले कॉलनी मधील आरूण कांबळे यांच्या घरापासून पाडू पवार यांच्या घरापर्यत नाली बांधणे व पायवाटा बांधणे. (नगरसेवक निधी 1169) | 101200/- | 20/9/05 | मे श्री क्रिपा म का सोसा. |
| 68 | उल्हासनगर-3 प्र क्र. 24, येथे बॅ नं 862 समोर आणि 866 मध्ये सी सी पॅसेज बनविणे (नगरसेवक निधी 1200) | 199988/- | 20/9/05 | मे मुंब्रादेवी म का सोसा. |
| 69 | उल्हासनगर-1 प्र क्र. 21 बॅ नं 35, 36, 33, 34ब, 32, 33अ येथे सी सी पायवाट व नाली बनविणे (नगरसेवक निधी 1250) | 200000/- | 20/9/05 | मे ओम म. का सोसा. |
| 70 | उल्हासनगर-3 येथील प्र क्र. 24 मधील जग्याशी हॉस्पिटल जवळ बॅ नं 899, 900, 901 येथे सी सी एम 250 रोड व नाली दुरूस्ती करणे (महापालिका निधी 1358) | 199745/- | 20/9/05 | मे अल्का म का सोसा |
| 71 | उल्हासनगर-3 प्र क्र. 24 मधील बॅ नं 885, 877, 878 जवळ सी सी एम 250 रोंड व नाली दुरूस्ती करणे (महापालिका निधी 1359) | 258818/- | 20/9/05 | मे भोलेनाथ म. का. सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 72 | उल्हासनगर-1 प्र क्र. 5 हनुमानगर मधील बुध्दविहार ते तेजू पासवान सुरेश गावरे ते महेश पेंटर आणि विश्वकर्मा यांच्या घराजवळ सी सी पायवाटा व नाल्या दुरूस्ती करणे (प्रभाग समिती निधी 1384) | 100000/- | 20/9/05 | मे धन लक्ष्मी म का सोसा |
| 73 | उल्हासनगर-4 येथील व्ही टी सी गार्डन मध्ये जॉग्गिंग ट्रॅक बनविणे बाबत (महापालिका निधी 1445) | 59500/- | 20/9/05 | मे कपिलेश्वर म का सोसा |
| 74 | उल्हासनगर-4 प्रभाग क्र. 15 मधील बॅ नं 1323, 1324, 1325, 1352, 1354, 1455, 1361, 1358, 1359 वाल्मीकीनगर, कच्चीपाडा येथे सी सी व नाली दुरूस्ती करणे (नगरसेवक निधी 1509) | 100000/- | 20/9/05 | मे ओम साईराम म का सोसा. |
| 75 | उल्हासनगर-3 वाड 20 मधील बॅ नं 776 व समाजमंदिर सेवानिकेतन साई कुंज आणि डंबाणा अपार्ट जवळ सिमेंट पायवाटा व नाल्या बनविणे (नगरसेवक निधी 1512) | 100000/- | 20/9/05 | मे हारी ओम म का सोसा |
| 76 | उल्हासनगर-4 येथील प्र क्र. 15 मधील सीतारामनगर व गजानन नगर येथे सी सी एम 250 ने रोड बनविणे व नाली बनविणे (ञगरसेवक निधी 1520) | 199930/- | 20/9/05 | मे गुरूदेव म का सोसा |
| 77 | उल्हासनगर-3 बॅ.क्र.509 येथे शौचालयाची दुरूस्ती करणे बाबत(महापालिका निधि 874) | 57800/- | 21/9/05 | मे.कलश म.का. सोसा. |
| 78 | उल्हासनगर-3प्र.क्र.8 येथील बॅ.नं. 1080,1085,1086,1087व सतगुरू स्टील ते विजय प्लॉस्टीक कारखाना येथील सिमेंट पायवाटा व नाल्या, नाला एम.250ने बनविणे. (महापालिका निधी 1258) | 140200/- | 21/9/05 | मे.माजी सैनिक म.का.सोसा. |
| 79 | उल्हासनगर-3 वडालगांव वाड 8 येथील राहूल जाधव यांचे घरापासून बालकिशन गायकवाड आनंद मिस्त्री व भगवान जाधव यांच्या घराजवळ नाल्या बनविणे (गलिच्छ वस्ती निधी 1296) | 199850/- | 21/9/05 | मे चंदा म का सोसा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 80 | उल्हासनगर-4 येथील प्र क्र. 15 मधील स्वातंत्र सेनानी दत्ताराम भाऊ कोयेडे पुतळयाजवळ कारंजे बसविणे (महापालिका निधी 1338) | 93700/- | 21/9/05 | मे स्वप्निल म का सोसा. |
| 81 | उल्हासनगर-4 येथील प्र क्र. 14 मधील जे के ट्रेडर्स पासुन शारदा फुटवेअर दुकानापर्यतचा रस्ता सी सी एम 250 ने बांधणे (महापालिका निधी 1444) | 299000/- | 21/9/05 | मे चंदा म का सोसा |
| 82 | उल्हासनगर-4 येथील प्र क्र. 17 मधील गिता कॉलनी येथे एम 250 रोड व नाली बनविणे (महापालिका निधी 1446) | 299650/- | 21/9/05 | मे चंदा म का सोसा |
| 83 | उल्हासनगर-4 प्र क्र. 17 मधील बंजारा कॉलनी पेन्सील फॅक्टरी जवळ एम 250 रोउ व नाली बनविणे (महापालिका निधी 1447) | 299650/- | 21/9/05 | मे कपिलेश्वर म का सोसा |
| 84 | उल्हासनगर-2 प्र क्र. 5 मधील बाळु तरे राजेंद्र तांबे आशोक कोंबळे , चव्हाण भाजीवाटला, आशिर्वाद महाले यांचे घरापर्यत सी सी पायवाटा व नाली बाधंणे (महापालिका निधी 1153) | 298300/- | 22/9/05 | मे तिरूपती म का सोसा |
| 85 | उल्हासनगर-1 प्र.क्र.2 बॅ.क्र.85अे.बी., व 15 नं.बगीचा मागे, बी.एस.अहिरे यांच्या घराजवळ सी.सी. पायवाटा आणि नाली बांधणे. (महापालिका निधी 1292) | 100500/- | 22/9/05 | मे. गुरूदेव म. का.सोसा. |
| 86 | उल्हासनगर-3 वाड 8 येथील वडालगांव येथे सेंन्ट जोसेफ शाळेसमार सिमेंट कॉक्रीटीकरण करणे (गलिच्छ वस्ती निधी 1297) | 238100/- | 22/9/05 | मे चंदा म का सोसा |
| 87 | उल्हासनगर-2 प्र.क्र.1 मधील बॅ.क्र.400 जवळ कल्व्हर्टला लागून नामदेववाडी समोर ते पोस्ट ऑफीस रोडवर सी.सी. एम.250 रोड बनविणे (महापालिका निधी 1307) | 66700/- | 22/9/05 | मे.मुंब्रा देवी म. का.सोसा. |
| 88 | उल्हासनगर-3 येथील मेनरोड पंचवटी स्टील ते राजीव गांधी चौक पर्यत नाली दुरूस्त करणे.(महापालिका निधी 1370) | 154600/- | 22/9/05 | मे.लक्ष्मीनारायण म.का.सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 89 | उल्हासनगर-2 प्र.क्र.1 मधील कोमल पार्क इमारतीजवळ बगीचा (उद्यान)बांधणे (प्रभाग समिती निधी 1375) | 100000/- | 22/9/05 | मे.मुंब्रा देवी म. का.सोसा. |
| 90 | उल्हासनगर-1 प्र.क्र.2 मधील रवी बागूल यांच्या घराजवळ नित्यांनंद टायर वर्क्स ते चक्र, अबीका ट्रॉव्हलर भिमनगरचा नाला,बुदधमंदीर पर्यंत सी.सी. व नाल्या दुरूस्ती करणे.(प्रभाग समिती निधी 1379) | 99000/- | 22/9/05 | मे.मुंब्रा देवी म. का.सोसा. |
| 91 | उल्हासनगर-4 प्र क्र. 17 मध्ये सी सी पॅसेज व नाली बनविणे (प्रभाग समिती निधी 1431) | 198800/- | 22/9/05 | मे चंदा म का सोसा |
| 92 | उल्हासनगर वार्ड 22येथील बॅ.क्र.522,553,554, कैलास कॉ.ऑ.सो.भारत अपार्ट.शिवमंदीर जयराम हाउस तेडा पॅलेस, शेरावाली पॅलेस येथे सिंमट पायवाटा व नाल्या बनविणे. (महापालिका निधी 1439) | 228000/- | 22/9/05 | मे.जय शंकर म. का.सोसा. |
| 93 | उल्हासनगर-1 वार्ड नं 2 येथील बॅ.क्र.213 जवळ (दत्तवाडी) हरमन मोहता कंपाउंड जवळ मुतारी बनविणे व जनता मित्र मंडळ पायवाटा व नाल्या बनविणे (नगरसेवक निधी 1499) | 140000/- | 22/9/05 | मे.मुंब्रा देवी म. का.सोसा. |
| 94 | उल्हासनगर-1 वार्ड क्र.2 येथील बॅ.क्र.19,20 समोर सी.सी. पायवाटा व नाल्या बनविणे व क्रिपाल निवास ते डॉ.लखाणी पर्यंत नाली दूरूस्ती करणे.(नगरसेवक निधी 1500) | 200000/- | 22/9/05 | मे.मुंब्रा देवी म. का.सोसा. |
| 95 | उल्हासनगर-1 वाड्र क्र.20 येथील मुकुंदनगर व गोपालनगर बॅ.क्र.63,64, 110 येथील सिमेंट पायवाटा व नाल्या बनविणे.(नगरसेवक निधी 1514) | 149500/- | 22/9/05 | मे.मुंब्रा देवी म. का.सोसा. |
| 96 | उल्हासनगर-2 शनिमंदीरासमोर बॅ.क्र 547 येथे बगीचा (उद्यान)बनविणे बाबत.(नगरसेवक निधी 1515) | 200000/- | 22/9/05 | मे.जय शंकर म. का.सोसा. |
| 97 | उल्हासनगर -3 येथील खन्ना कंपाउंड सी.सी पायवाटा व नाली दुरूस्ती करणे (नगरसेवक निधी 1534) | 100000/- | 22/9/05 | ज्योती म.का. सोसा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 98 | उल्हासनगर-3 वार्ड क्र.8 येथील पाणी पुरवठा कंपाउंड येथे संरक्षक भिंत बांधणेबाबत. (महापालिका निधी 1546) | 287700/- | 22/9/05 | श्री.सिध्दनाथ म. का.सोसा. |
| 99 | उल्हासनगर येथील बॅ.क्र 1150 जवळ बोट क्लब उद्यानमध्ये संरक्षण भिंत बनविणे (महापालिका निधी 1560) | 279200/- | 22/9/05 | मे जयश्री म का सोसा. |
| 100 | उल्हासनगर-1 येथील बॅ नं 38, 39 समोर जुन्या मिलीटरी शौचालयाच्या जागेवर नवीन चार शिटचे शौचालय बनविणे (उप-महापौर निधी 1564) | 196920/- | 22/9/05 | मे मुंब्रादेवी म का सोसा |
| 101 | उल्हासनगर-5येथील प्र.क्र.11 मधील गायकवाडपाडा येथील बॅ.क्र.2076,2077 पं हिराबाई यांच्या घरापासून ते पटेल यांच्या घरापर्यंत सी.सी.पायवाटा व नाली बांधणे. (नगरसेवक निधी 1569) | 200000/- | 22/9/05 | मे.धनलक्ष्मी म. का.सोसा. |
| 102 | उल्हासनगर-5 येथील ठाकूर एस.टी.डी.बूथ ते मुरली तन्ना हाउस सुरश साईनाथ हाउस ते सूनिल डसोजा हाउस बॅ.नं. 2027 ते आत्माराम अपार्ट. एएम.250 पॅसेज व नाली बाधणे.(नगरसेवक निधी 1517) | 200000/- | 22/9/05 | मे.आदिशक्ती म. का.सोसा. |
| 103 | उल्हासनगर-5 येथील प्र.क्र.11 मधील नेहरू नगर मध्ये बॅ.क्र.1955 ते मनीला अपार्ट.व राजेश गुप्ता यांच्या घरापासून ते दारा यांच्या घरापर्यंत सी.सी.एम.250 ने रस्ता बनविणे. (नगरसेवक निधी 1578) | 200000/- | 22/9/05 | मे.धनलक्ष्मी म. का.सोसा. |
| 104 | मा.विरोधी पक्षनेता यांच्या कार्यालयाचे नुतनीकरण करणे.(महापालिका निधि 1619) | 297000/- | 22/9/05 | मे.धनलक्ष्मी म. का.सोसा. |
| 105 | मा.सभागृह नेता यांच्या कार्यालयाचे नुतनीकरण करणे.(महापालिका निधि 1620) | 299300/- | 22/9/05 | मे.धनलक्ष्मी म. का.सोसा. |
| 106 | प्रभाग क्र. मध्ये विदर्भवाडी ते शिवकपा बिल्डींग पर्यंत सी सी व नाली बांधणे. (प्रभाग समिती निधी 980) | 99500/- | 26/9/05 | मे.ओम म.का. सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 107 | प्र.क्र.2 मध्ये किशोर मुव्ही ते पुष्पांजली सोसा. ते साई श्रध्दा अपार्ट.ते रिटा साकव ते जनता मित्र मंडळ पर्यंत सी.सी. नाली,नाली बांधणे.(प्रभाग समिती निधी 984) | 99500/- | 26/9/05 | मे.ओम म.का. सोसा. |
| 108 | उल्हासनगर-1 प्र.क्र.2 बॅ.क्र.31अे.बी., 38अे. बी., 39अे.बी.जवळ सी.सी. पायवाटा आणि नाल्या बांधणे. (नगरसेवक निधी 1145) | 196920/- | 26/9/05 | मे.मुंब्रा देवी म. का.सोसा. |
| 109 | उल्हासनगर-5 वार्ड क्र.13 मध्ये महात्मा फुले नगर येथील अहमद यांच्या घरापासून श्री.वाघ यांच्या घरापर्यंत नाली बनविणे बाबत. (नगरसेवक निधी 1506) | 100000/- | 26/9/05 | मे.अलका म.का. सोसा. |
| 110 | उल्हासनगर-1 मध्ये गुरूकपा अपार्ट.बॅ.क्र.31 अे.32,38,39 जवळ सी.पायवाटा आणि फुटपाथ बनविणे बाबत. (उप महापौर निधी 1543) | 100000/- | 26/9/05 | मे.मुंब्रा देवी म. का.सोसा. |
| 111 | प्रभाग क्र.3 मधील बॅ.क्र.119 समोर रामभाउ घराजवळ हनूमान नगर उल्हासनगर-1 असलेला डोंगराळ भाग ढासळत असल्याने जिवित वित्त हानी होण्याची शक्यता असल्याने उपाय योजना करणे. (महापालिका निधी ) | 86770/- | 26/9/05 | मे.श्री.मॉ. म.का. सोसा. |
| 112 | उल्हासनगर-1 येथील रिईन्टमेंट ऑफ टेंचेस डॅगेड बाय टेलिफोन डिपार्टमेंट आया ई बीएसएनएल रोड पासून निरंकारी हॉल ते साधूबेला स्कूल (महापालिका निधि 272) | 2621250/ | 28/9/05 | मे.सिध्दनाथ म. का.सोसा. |
| 113 | उल्हासनगर-4 येथील चांगले यांच्या घराजवळ शिवनगर, गणेश चाळ वसिटा कॉलनी बॅ.क्र. 1249 रूम नं.12 येथे एम.250 सी.सी. पॅसेज,ड्रेन दुरूस्ती व पूर्नबांधणी करणे. (नगरसेवक निधी 937) | 199480/- | 28/9/05 | मे.शिलालेख म. का.सोसा. |
| 114 | उल्हासनगर-1 प्र.क्र.3 येथील रघूनाथ मिश्रा, नरेंद्र सिंग, श्रीपत बाले, कुंदन किराणाच्या बाजूला सी.सी.पॅसेज व नाली बनविणे.(दुर्बल घटक निधी 1009) | 126760/- | 28/9/05 | मे.गांव देवी म. का.सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 115 | उल्हासनगर-1 शांताराम मडावी यांच्या घराजवळ नाली बांधकाम गणेश किराणा ते सेंन्चूरी रेयॉन कंपाउंड भिंत दत्तमंदीराच्या समोर, पॅनल नं.3 (दुर्बल घटक निधी 1011) | 122573/- | 28/9/05 | मे.जनसेवा म.का. सोसा. |
| 116 | उल्हासनगर-4 प्र.क्र.18 मधील बॅ.क्र.1249 साईबाबा मंदिराजवळ येथील सार्वजनिक शौचालय (4 शिटचे) तोडून नविन बांधणे. (नगरसेवक निधी 1193) | 199715/- | 28/9/05 | मे.सिध्दनाथ म. का.सोसा. |
| 117 | उल्हासनगर-5 येथील प्र.क्र 12 मधील स्वामी शांती प्रकाश उद्यानाचे शेड बसविणे. (उप महापौर निधी 1321) | 223900/- | 28/9/05 | मे.प्रियजन म.का. सोसा. |
| 118 | उल्हासनगर-3 प्र.क्र.24 मधील बॅ.क्र.906, 868 व शिव मुदीराच्या पाठीमागे सी.सी.एम. 250 व नाली दुरूस्ती करणे.(महापालिका निधी 1361) | 199365/- | 28/9/05 | मे.अलका म.का. सोसा. |
| 119 | उल्हासनगर-4 येथील प्र.क्र.14 मधील राहूलनगर येथे मुख्य रस्त्यापासून ते बुदधविहार तेसेच के.एम.ससाने यांच्या घरापासून ते प्रधान यांच्या घरापर्यंत सी.सी.एम 250 ने सिमेंट कॉंक्रीट रस्ता बनविणे. (नगरसेवक निधी 1507) | 200000/- | 29/9/05 | मे.शारदा.म.का. सोसा. |
| 120 | उल्हासनगर4 प्र.क्र.14 मधील काजोल कॉर्नर इमारती मागून ते जयबाबा धाम आश्रम पर्यंत तसेच शिवलीला आर्केड ते व्हाईट होउस पर्यंत नाली बनविणे.(नगरसेवक निधी 1508) | 100000/- | 29/9/05 | मे.शारदा.म.का. सोसा. |

उपरोक्त कामांना मा.आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप–निबंधक यांचकडे मजूर कामगार संस्थेला काम वाटप करुन देण्यासाठी शिफारस केली होती व उप–निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करुन दिल्यानंतर सदर मजूर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ३६ दिनांकः– २७/१०/२००५

सुचकाचे नाव :– श्री. मोहन साधवानी
अनुमोदकाचे नाव :– श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत करण्यात आलेल्या १२० विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :– विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. ४ :– उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ७ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

---

मा. सभापती :–सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

विषय क्र. ४ :– उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ७ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् २००४–२००५ च्या निधीतून मा. नगरसेवक यांनी कामे करणेसाठी विनंती केलेली आहे.

| अ.क्र | कामाचे ठिकाण | प्राकलनीय किंमत | करारनामा दिनांक | एजन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर—३ येथील ओ टी सेक्शन व वडोलगांव यांचे दरम्यान वालधुनी नदीवरील पुलावर रेलींग बसविणेबाबत. (महापालिका निधी १५७२) | २२९७२८/— | १२/८/०५ | मे स्वामी समर्थ म का सोसा |
| २ | उल्हासनगर—५ येथील प्रभाग क्र. १३ मधील नाना भोईर चाळ ते गोकुळनगर समोर देवीदर्शन अपार्टमेंट पर्यत सी सी एम २५० ने रस्ता व नाली बनविणे (महापालिका निधी १२३८) | २०००००/— | १८/८/०५ | मे ओम म. का सोसा. |
| ३ | उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयात मा. आयुक्त यांचे दालनात प्लास्टरींग, पेनलींग दरवाजे फ्रेम व इतरी कामे करणे (महापालिक निधी १५७५) | २२६४६२/— | १८/८/०५ | मे जय मजूर का सोसा |
| ४ | उल्हासगर—३ हिराघाट जवळ पुलाचे मध्येभागात सुरक्षण भिंत बांधणे (महापालिका निधी १५७६) | २५२४४५/— | १८/८/०५ | मे कपिलेश्वर मजूर का सोसा |
| ५ | उल्हासनगर—३ राजीव गांधी चौक जवळ, शांतीनगर येथील पुलाचा कठडा (Railing) बनविणे बाबत (महापालिका निधी १५७७) | १६३५१०/— | १९/८/०५ | मे हरे क्रिष्णा म का सोसा |
| ६ | उल्हासनगर—३ वार्ड क्र. ८ वडोल गांव येथे जकात नाक्याचे पुर्नबांधकाम करेणबाबत(महापालिका निधी १५८१) | ५५२००/— | २०/८/०५ | मे स्वामी समर्थ म का सोसा |
| ७ | उल्हासनगर—३ वार्ड क्र. ८ वडोल गांव येथील वालधूनी नाल्याच्या कडेची संरक्षण भिंतीचे पुर्नबांधकाम करणे बाबत. (महापालिका निधी १५८४) | २०५५५०/— | २०/८/०५ | मे स्वामी समर्थ म का सोसा |

उपरोक्त कामांना मा.आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप—निबंधक यांचकडे मजूर कामगार संस्थेला काम वाटप करुन देण्यासाठी शिफारस केली होती व उप—निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करुन दिल्यानंतर सदर मजूर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिति ठराव क्र. ३७ दिनांकः– २७/१०/२००५

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :– श्री. राजु जग्यासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत करण्यात आलेल्या ७ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :– विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ५ :– उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ५ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

---

काही सदस्य :– पास–पास.........

मा. सभापती :–सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

प्रस्तावना:–

विषय क्र. ५ :– उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ५ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् २००४–२००५ च्या निधीतून मा. नगरसेवक यांनी कामे करणेसाठी विनंती केलेली आहे.

| अ.क्र | कामाचे ठिकाण | प्राकलनीय किंमत | करारनामा दिनांक | एजन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर–३ महानगरपालिका मुख्यालयाच्या इमारतीत उप–महापौर यांचे दालनाचे नुतनीकरण करणे (महापालिका निधी १५५६) | १६११००/– | २९/६/०५ | मे श्री मॉ म का सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | उल्हासनगर– ४ कुर्लॉ कॅम्प शिवसेना शाखेजवळ समाज मंदिरामध्ये बदल करणे (महापालिका निधी १५७३) | १२९०००/– | ६/७/०५ | मे श्री मॉ म का सोसा. |
| ३ | उल्हासनगर– येथील प्रभाग क्र. ३ कमला नेहरू नगर मध्ये पारस किराणा ते सेनेटरी ऑफिस व भैरवनाथ किराणा ते विवरे हाऊस किर्तीपथ येथे सी सी व नाली दुरूस्ती करणे. (प्रभाग समिती निधी १३८१) | ९९६००/– | १६/७/०५ | मे माजीसैनिक म का सोसा |
| ४ | उल्हासनगर–३ प्रभाग क्र. १९ मध्ये खन्ना कंपाऊंडमध्ये सी सी पायवाटा व नाली बांधणे (प्रभाग समिती निधी १४२२) | ९८३००/– | १६/७/०५ | मे अलका म का सोसा |
| ५ | उल्हासनगर–२ प्रभाग क्र. ६ येथे आझादनगरमध्ये माली वारा हाऊस व परिसर येथे सी सी पायवाटा व नाली बांधणे (नगरसेवक निधी १५४९) | १०००००/– | २१/७/०५ | मे स्वामी समर्थ म का सोसा |

उपरोक्त कामांना मा.आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप–निबंधक यांचकडे मजूर कामगार संस्थेला काम वाटप करुन देण्यासाठी शिफारस केली होती व उप–निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करुन दिल्यानंतर सदर मजूर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ३८ दिनांक:–२७/१०/२००५

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :– श्री. गणपत एडके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत करण्यात आलेल्या ५ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :– विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ६ :—** एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत विकसीत केलेल्या रस्त्यांची वार्षिक दुरुस्ती व देखभाल करणे कामी न्युनतम दराचे निविदाकार मे. माधव कन्सट्रक्शन कंपनी यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

---

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—** हा विषय त्वरित मंजुर करण्यात यावा. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाला आदेश देण्यात येतात की, त्यांनी शहरातील रस्त्यावरील खड्डे भरण्याची कार्यवाही त्वरित करावी. आता तर मा. उच्च न्यायालयाने देखिल रस्त्यांवरील खड्डे भरण्यासाठी आदेश दिलेले आहेत.

**मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :—** जे गतीरोधक तोडले होते. ते पण सपाट करुन घ्या.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—** पावसाळयापूर्वी जुन, जुलै मध्ये खड्डे भरण्याचे काम करण्यात आले होते. परंतु सदरचे काम बरोबर न केल्याने रस्त्यांमध्ये पुन्हा खड्डे पडले आहेत. त्या ठेकेदारांना ते काम पुन्हा करण्यासाठी आदेश द्यावेत अन्यथा त्यांच्याकडुन दंड वसुल करण्यात यावा.

**मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—** १० नंबरच्या जकात नाक्याजवळही फार खड्डे पडले आहेत, त्यांचे देखिल काम करण्यात यावे.

**मा. सभापती :—**सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. ६ :—** एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत विकसीत केलेल्या रस्त्यांची वार्षिक दुरुस्ती व देखभाल करणे कामी न्युनतम दराचे निविदाकार मे. माधव कन्सट्रक्शन कंपनी यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

**प्रस्तावना:—**

| | | |
|---|---|---|
| 1 | कामाचे नांव | एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत विकसित केलेल्या रस्त्यांच्या दुरुस्ती देखभालीकरीता वार्षिक निविदा काढणेकरीता |
| 2 | प्राकलनाची किंमत | 49,98,450/- |
| 3 | तांत्रिक मंजुरी देणा-या अधिका-याचे पदनाम | शहर अभियंता |
| 4 | निविदा सुचना क्रमांक व दिनांक | क्र. 2 दिनांक 30/04/2005 |
| 5 | विक्री केलेल्या निविदा फॉर्म्सची संख्या | 7 |
| 6 | अंतिम दिवशी प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | 2 |
| 7 | निविदा उघडल्याचा दिनांक | दिनांक 10/05/2005 |
| 8 | निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता | |

| अनु | निविदाधारकाचे नांव | |
|---|---|---|
| 1 | मे. माधव कन्स्ट्रक्शन | 6.30 टक्के कमी |
| 2 | मे. जयभारत कन्स्ट्रक्शन | 5.00 टक्के कमी |
| 9 | निविदाधारकाशी वाटाघाटी केल्या असल्याचा त्याचा तपशिल | दि. 06/06/05 रोजी सकाळी 11.00 वाजता मा. शहर अभियंता यांचेकडे मे. माधव कंन्स्ट्रक्शन यांना वाटाघाटीकरिता बोलविण्यात आले होते. मे. माधव कंन्स्ट्रक्शन यांनी त्याचे पुर्वीचे 6.30 टक्के कमी दरामध्ये आणखी 2.70 टक्के सवलत दिल्यानंतर (Rebet) आता वाटाघाटीनंतर सदर निविदेच्या अंतिम दर प्राकलनीय दरापेक्षा 9.00 टक्के कमी होत आहे. |
| 10 | लेखा शिर्षाचे नांव | सी-4(iii) पी-2 रस्तें प्रवास व पुल इत्यादी सुधारणे व नवीन बांधणे. |

उक्त नमूद केल्याप्रमाणे मे माधव कंन्स्ट्रक्शन यांचे वाटाघाटी अंती प्राकलनिय दरापेक्षा 9.00 टक्केने कमी असलेली निविदा वाजवी असल्याने व आर्थिकदृष्ट्या महानगरपालिकेसाठी फायदेशिर असल्याने मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांच्या शिफारसीनुसार दर स्वीकृत करण्यात आले आहेत. सबब, निविदाधारक मे माधव कंन्स्ट्रक्शन यांचेशी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(क) अन्वये संविदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करणेसाठी रु.49,98,450/- प्राकलनिय किंमती प्रमाणे खर्च करण्यास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणे करीता स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यासाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ३९ दिनांकः— २७/१०/०५

सुचकाचे नाव :— श्री. मोहन साधवानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. नथु सोनवणे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत विकसीत केलेल्या रस्त्यांची वार्षिक दुरुस्ती व देखभाल करणे कामी प्रशासनास मेसर्स माधव कन्स्ट्रक्शन कंपनी या न्युनतम दराच्या निविदाकाराशी संविदा करण्यास व अंतर्भुत खर्च रु. ४९,९८,४५०/— यांस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :— विषय क्र. ७ वाचुन दाखवितात
————————————————————————————————————————

विषय क्र. ७ :— प्रभाग क्र. १३ येथे स्वामी शांतीप्रकाश योग आश्रमाजवळ साकवाची पुनर्बांधणी करणेकामी न्युनतम दराचे निविदाकार मे. श्रीकृष्ण कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

————————————————————————————————————————————

काही सदस्य :— पास—पास.........

मा. सभापती :—सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

प्रस्तावना:—

विषय क्र. ७ :— प्रभाग क्र. १३ येथे स्वामी शांतीप्रकाश योग आश्रमाजवळ साकवाची पुनर्बांधणी करणेकामी न्युनतम दराचे निविदाकार मे. श्रीकृष्ण कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

| | | |
|---|---|---|
| 1 | कामाचे नांव | स्वामी शांतीप्रकाश योग आश्रम जवळ, वार्ड - 13 येथिल कल्वर्टची पुनर्बांधणी करणे. |
| 2 | प्राकलनाची किंमत | 990000/- |
| 3 | तांत्रिक मंजुरी देणा-या अधिका-याचे पदनाम | कार्यकारी अभियंता |
| 4 | तांत्रिक मंजुरी मिळाल्याचा क्र. व दिनांक: | क्र. 4062 दि. 01/08/2005 |
| 5 | प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळाल्याचा क्र व दिनांक | ---- |
| 6 | निविदा सुचना क्रमांक व दिनांक | क्र. 10 दिनांक 16/8/2005 |
| 7 | विक्री केलेल्या निविदा फॉर्म्सची संख्या | 1 |
| 8 | अंतिम दिवशी प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | 1 |
| 9 | निविदा उघडल्याचा दिनांक | दिनांक 29/08/2005 |
| 10 | निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता | |
| अनु | निविदाधारकाचे नांव | |
| 1 | मे. श्रीकृष्णा कंन्स्ट्रक्शन | 10.00 टक्के जास्त |
| 12 | निविदाधारकाशी वाटाघाटी केल्या असल्याचा त्याचा तपशिल | दि. 30/08/05 रोजी दुपारी 12.00 वाजता मा. शहर अभियंता यांचेकडे मे. श्रीकृष्णा कंन्स्ट्रक्शन यांना वाटाघाटीकरिता बोलविण्यात आले होते. मे.श्रीकृष्ण कंन्स्ट्रक्शन यांनी त्याचे पुर्वीचे 17.00 टक्के जास्त दरामध्ये 12.50 टक्के सवलत दिल्यानंतर (Rebet) आता वाटाघाटीनंतर सदर निविदेच्या अंतिम दर प्राकलनीय दरापेक्षा 4.50 टक्के जास्त होत आहे. |
| 12 | लेखा शिर्षाचे नांव | सी-4(iii) पी-2 रस्तें प्रवास व पुल इत्यादी सुधारणे व नवीन बांधणे. |

उक्त नमूद केल्याप्रमाणे मे श्रीकृष्णा कंस्ट्रक्शन यांचे वाटाघाटी अंती प्राकलनिय दरापेक्षा 4.50 टक्केने जास्त असलेली निविदा वाजवी असल्याने व आर्थिकदृष्टया महानगरपालिकेसाठी फायदेशिर असल्याने मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांच्या शिफारसीनुसार दर स्वीकृत करण्यात आले आहेत. सबब, प्रस्तावित स्वामी शांती प्रकाश योगा आश्रम जवळ प्र. क्र. 13 येथिल कल्व्हर्टची पुर्नबांधणी करणे या कामास प्रशासकिय व वित्तीय मंजूरीसह 4.50 जास्त दराच्या रुपये 10,34,550/- किंमतीची मे श्रीकृष्ण कंस्ट्रक्शन यांची निविदा स्विकृत करुन त्यांचेशी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(क) अन्वये संविदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करणेसाठी स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यासाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ४०      <u>दिनांकः— २७/१०/२००५</u>

सुचकाचे नाव :— श्री. गणपत एडके
अनुमोदकाचे नाव :— श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार प्रभाग क्र. १३ येथे स्वामी शांतीप्रकाश योग आश्रमाजवळ साकवाची पुनर्बांधणी करणेकामी प्रशासनास मेसर्स श्रीकृष्ण कन्स्ट्रक्शन कंपनी या न्युनतम दराच्या निविदाकाराशी संविदा करण्यास व अंतर्भुत खर्च रु. १०,३४,५५०/— यांस मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ <u>विषय क्र. ८</u> :— उल्हासनगर—३ येथील रेल्वे स्टेशन जवळ वालधुनी नाल्यावरील पुलाची दुरुस्ती करणेकामी न्युनतम दराचे निविदाकार मे. जी.आर. कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

---

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> हे काम देखिल लवकर करण्यात यावे, लोकांचे फार हाल होत आहेत.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :—</u> पुल दुरुस्त करु नका, नवीनच तयार करा.



<u>मा. सभापती :—</u>सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

☑

<u>विषय क्र. ८</u> :— उल्हासनगर—३ येथील रेल्वे स्टेशन जवळ वालधुनी नाल्यावरील पुलाची दुरुस्ती करणेकामी न्युनतम दराचे निविदाकार मे. जी.आर. कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना:—</u>

| | | |
|---|---|---|
| 1 | कामाचे नांव | वालधुनी नाला, उल्हासनगर रेल्वे स्टेशन जवळ, उल्हासनगर-3 येथिल पूलाची दुरुस्ती करणे. |
| 2 | प्राकलनाची किंमत | 1502235/- |
| 3 | तांत्रिक मंजुरी देणा-या अधिका-याचे पदनाम | शहर अभियंता |
| 4 | तांत्रिक मंजुरी मिळाल्याचा क्र. व दिनांक: | क्र. 4091 दि. 16/08/2005 |
| 5 | प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळाल्याचा क्र व दिनांक | ---- |
| 6 | निविदा सुचना क्रमांक व दिनांक | क्र. 10 दिनांक 16/8/2005 |
| 7 | विक्री केलेल्या निविदा फॉर्म्सची संख्या | 1 |
| 8 | अंतिम दिवशी प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | 1 |
| 9 | निविदा उघडल्याचा दिनांक | दिनांक 29/08/2005 |
| 10 | निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता | |
| अनु | निविदाधारकाचे नांव | |
| 1 | मे. श्रीकृष्णा कंन्स्ट्रक्शन | 5.00 टक्के जास्त |
| 12 | निविदाधारकाशी वाटाघाटी केल्या असल्याचा त्याचा तपशिल | दि. 30/08/05 रोजी सकाळी 11.00 वाजता मा. शहर अभियंता यांचेकडे मे. जी.आर कंन्स्ट्रक्शन यांना वाटाघाटीकरिता बोलविण्यात आले होते. मे. जी.आर. कंन्स्ट्रक्शन यांनी त्याचे पुर्वीचे 5.00 टक्के जास्त दरामध्ये 0.5 टक्के सवलत दिल्यानंतर (Rebet) आता वाटाघाटीनंतर सदर निविदेच्या अंतिम दर प्राकलनीय दरापेक्षा 4.50 टक्के जास्त होत आहे. |
| 12 | लेखा शिर्षाचे नांव | सी-4(iii) पी-2 रस्तें प्रवास व पुल इत्यादी सुधारणे व नवीन बांधणे. |

उक्त नमूद केल्याप्रमाणे मे जी.आर. कंस्ट्रक्शन यांचे वाटाघाटी अंती प्राकलनिय दरापेक्षा 4.50 टक्केने जास्त असलेली निविदा वाजवी असल्याने व आर्थिकदृष्टया महानगरपालिकेसाठी फायदेशिर असल्याने मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांच्या शिफारसीनुसार दर स्वीकृत करण्यात आले आहेत. सबब, प्रस्तावित उल्हासनगर-3 येथिल उल्हासनगर रेल्वे स्टेशन जवळील पादचारी पुलाची दुरुस्ती करणे या कामास प्रशासकिय व वित्तीय मंजूरीसह 4.50 जास्त दराच्या रुपये 15,69,836/- किंमतीची मे जी.आर. कंस्ट्रक्शन यांची निविदा स्विकृत करुन त्यांचेशी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(क) अन्वये संविदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करणेसाठी स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यासाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ४१ दिनांकः—२७/१०/२००५

सुचकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी
अनुमोदकाचे नाव :— श्रीमती संगिता जावळे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर—३ येथील रेल्वे स्टेशन जवळ वालधुनी नाल्यावरील पुलाची दुरुस्ती करणेकामी प्रशासनास मेसर्स जी.आर कन्स्ट्रक्शन कंपनी या न्युनतम दराच्या निविदाकाराशी संविदा करण्यास व अंतर्भुत खर्च रु. १५,६९,८३६/— यांस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :— विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

—————————————————————————————

⇨ विषय क्र. ९ :—संतू बिल्डिंग ते शिवाजी चौक रस्त्यामध्ये संत कंवाराम पुतळयाच्या भोवताली उद्यान व कारंजे उभारुन सुशोभिकरण करणेकामी सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे तसेच प्रशासनास सध्या कार्यरत असलेले ठेकेदार मे. महालक्ष्मी म.का.स.सं यांचेशी वाढीव कामासाठी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

—————————————————————————————

काही सदस्य :—पास—पास............

मा. सभापती :—सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

विषय क्र. ९ :—संतू बिल्डिंग ते शिवाजी चौक रस्त्यामध्ये संत कंवाराम पुतळयाच्या भोवताली उद्यान व कारंजे उभारुन सुशोभिकरण करणेकामी सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे तसेच प्रशासनास सध्या कार्यरत असलेले ठेकेदार मे. महालक्ष्मी म.का.स.सं यांचेशी वाढीव कामासाठी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

प्रस्तावनाः—

उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे शिवाजी चौक ते संतु बिल्डींग या रस्त्याचे रुंदीकरण करुन सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्यात आले आहे. या रस्त्यामध्ये संत कंवाराम चौक असून या चौकामध्ये संत कंवाराम यांचा अर्धाकृती पुतळा आहे. या पुतळयाच्या सभोवताली पूर्वी तत्कालीन नगरपालिकेने बगीचा तयार केला होता. परंतू सदर ठिकाणी असलेल्या कचरा कुंडीमुळे कचरा टाकण्यात येत असल्याने या ठिकाणी पूर्वी बगीचा टीकत नव्हता. आता या ठिकाणी रस्ता रुंदीकरणानंतर याठिकाणी असलेली कचरा कुंडी हटविल्यानंतर नगरसेवक श्री. राहू जग्यासी व साई बलराम यांनी या ठिकाणी नव्याने बगीचा तयार करतांना सद्या असलेल्या अर्धाकृती पुतळयाच्या ठिकाणी संत कंवाराम यांचा पूर्णाकृती पुतळा त्यांचे

खर्चाने तयार करुन देण्यास तयार झाले आहेत. उक्त ठिकाणी सुशोभिकरण करण्याकरीता उल्हासनगर येथिल नामांकीत स्थापत्य विशारद यांचेकडुन त्यांनी या कामाचे नकाशे तयार करुन घेतले आहेत. तसेच सुशोभिकरणाच्या दृष्टीने या ठिकाणी पूर्वी प्रस्तावित असलेल्या सुशोभिकरणाच्या कामामध्ये काही फेरबदल जसे की, कारंज्यांची टाकी आर.सी.सी. ऐवजी पिंक सॅंड स्टोन या दगडावरती नक्शी काम करुन तयार करणे. या ठिकाणी संत कंवाराम यांचा पुर्णकृती उभरण्याकरीता चबुतरा व पाठीमागे भिंत व त्यावर ग्रेनाइट स्टोन इत्यादी काम करावे लागणार आहे. त्याशिवाय इतर सुशोभिकरणामध्ये कुपनाच्या भिंतीचे वाढीव कामे करावी लागणार आहे. या कामावर मुळे प्राकलनाप्रमाणे रुपये २,९९,६००/— खर्च होणार होता. परंतू उपरोक्त वाढीव कामांमुळे रु. २.०० लक्ष पर्यंत खर्च होणार होता. तितका निधी मा. नगरसेवक श्री. राजू जग्यासी व श्रीमती मीनु दासानी यांनी त्यांच्या नगरसेवक निधीतून प्रत्येकी १ लक्ष रुपये उपलब्ध करुन दिला आहे. तरी या वाढीव कामाची कार्यवाही करण्याकरीता मूळ प्राकलनास सुधारीत करुन उपरोक्त कामांच्या तरतूदीसह रुपये ४,९९,८५३/— खर्चाचे प्राकलन तयार करण्यात आले आहे. या प्राकलनास तांत्रिक मंजूरी देण्यात आलेली आहे. मूळ काम महानगरपालिकेच्या वर्ष २००४—२००५ च्या अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष अ अंदाजपत्रक भाग—२ रस्ते सुधारणा मधील तरतूदीमधून प्रस्तावित आहे. आता सुधारीत प्राकलनाप्रमाणे वाढीव रुपये २.०० लक्ष इतक्या खर्चाला उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे दोन नगरसेवकांनी त्यांचा नगरसेवक निधी उपलब्ध करुन दिला आहे.

तरी उपरोक्त कामाची स्थानिक लोकांची मागणी, शहर सुशोभिकरणाच्या दृष्टीने सदर कामाची आवश्यकता असल्याने रुपये ४,९९,८५३/— खर्चाच्या सुधारीत प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळून मूळ कामाची एजन्सी मे. महालक्ष्मी मजूर कामगार सहकारी संस्थेकडुन सदर सुधारीत प्राकलनाप्रमाणे कामाची कार्यवाही करण्यास मान्यता मिळण्यास प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** ४२ दिनांक:—२७/१०/२००५

सुचकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी
अनुमोदकाचे नाव :— श्रीमती रेखा कृष्णानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार संतू बिल्डिंग ते शिवाजी चौक रस्त्यामध्ये संत कंवाराम पुतळयाच्या भोवताली उद्यान व कारंजे उभारुन सुशोभिकरण करणेकामी सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे तसेच पूर्वीच्या करारातील अटी, शर्ती व दराने प्रशासनास सध्या कार्यरत एजन्सी मे. महालक्ष्मी म.का.स. संस्थेशी वाढीव कामासाठी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**मा. सचिव :—** विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १०**:— उल्हासनगर—३ शिवाजी चौक ते संतू बिल्डिंग या रस्त्याच्या कामामधील नारायणदास जग्यासी मार्ग या लिंक रस्त्यांचे रुंदीकरण व सिमेंट कॉंक्रिटीकरण करणेकामी प्रशासनास न्युनतम दराचे निविदाकार

मे. शंकर महादेव यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

**मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :–** या गोषवा–यामध्ये दिले आहे की, रस्त ३५ फुटांचा होता परंतु आता तो २२–२५ फुटापर्यंत होत आहे. आधी जेव्हा करार केला तेव्हा त्यामध्ये हे काम समाविष्ट होते, तर आता हे काम पुन्हा येथे का आणले आहे?

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–** या गोषवा–यामध्ये सविस्तर माहिती दिली आहे की, मुळ काम १८५ लाखांचे होते, त्यापैकी निविदा १६६ लाखांची होती, निविदा १६.२० टक्के कमी दराने आली होती. काम ११८ लाखांचे झाले आहे. मुळ कामामध्ये नारायणदास जग्यासी या लिंक रोडचे काम देखिल होते, परंतु रहदारीस दोन्ही रस्ते बंद करता येत नसल्याने त्यावेळी या रस्त्याचे काम हाती घेतले नव्हते. म्हणजेच याचे देखिल काम करणे आवश्यक होते. परंतु आता या रस्त्याचा ठेकेदार हे काम न करता पळुन जावु इच्छितो. स्थायी समितीची भुमिका अशी आहे की, या रस्त्याचे काम पुर्ण व्हायलाच हवे. अर्धा रस्ता सोडायचा नाही. आम्ही लोकांना आश्वासन दिले होते की, पुर्ण रस्त्याचे काम होईल, काम पुर्ण व्हायलाच हवे. यासाठी प्रशासनाने कारवाई करायला हवी.

**मा. सभापती :–** आपल्या महापालिकेत जे मोठे ठेकेदार आहेत, त्यांचे करोडो रुपये महापालिकेत बाकी आहेत. पैसे नसल्याने नाईलाजाने ते काम करीत नाहीत. आयुक्तांनी या ठेकेदाराला बोलावुन काम न करण्याचे कारण विचारावे व त्याच्या कडुन काम पुर्ण करुन घ्यावे. त्या ठेकेदाराकडे पैसे नसतील म्हणुन देखिल तो काम करीत नसेल. ब–याच ठेकेदारांचे पैसे बाकी आहेत, त्यांना पैसे देणे देखिल आवश्यक आहे.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–** आमचे म्हणणे असे आहे की, या रस्त्याचे काम न वगळता पुर्ण काम करुन घेण्यात यावे.

**मा. सभापती :–**सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. १०:–** उल्हासनगर–३ शिवाजी चौक ते संतू बिल्डिंग या रस्त्याच्या कामामधील नारायणदास जग्यासी मार्ग या लिंक रस्त्यांचे रुंदीकरण व सिमेंट कॉंक्रिटीकरण करणेकामी प्रशासनास न्युनतम दराचे निविदाकार मे. शंकर महादेव यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेने हाती घेतलेले शिवाजी चौक ते संतू बिल्डिंग या रस्त्याचे रुंदीकरण व सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे काम पूर्ण होत आलेले आहे. या रस्त्यास लागून असलेला एक वळण रस्ता (Link Road) नारायणदास जग्यासी मार्ग यांचे रुंदीकरण व सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे काम या कामामध्ये समाविष्ट आहे. उपरोक्त नारायणदास जग्यासी वळण रस्ता वाहतूकीकरीता खुला ठेवणे असल्याने या रस्त्याचे काम हाती घेण्यात आले नव्हते तसेच नगररचना विभागातर्फे त्यावेळी फक्त मुख्य रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या दुकानांना मार्कींग देऊन मुख्य रस्त्याचे रुंदीकरण करण्याकरीता सिमांकन करुन दिले होते. त्यामुळे उक्त वळण रस्त्याचे रुंदीकरण अद्याप होणे बाकी आहे. मुळ प्रस्तावात उक्त नारायणदास जग्यासी वळण रस्ता मुख्य रस्त्याप्रमाणे ३५ फूट रुंद करण्याकरीता प्रस्तावित आहे.

मुख्य रस्त्याचे काम आता पूर्ण होत असल्याने मे. शंकर महादेव यांनी त्यांचे काम फायनल करण्याकरीता विनंती केली आहे. मे. उत्तम इंजिनिअरींग यांनी त्यांच्या या कामाच्या आर्थिक स्थितीबाबत अहवाल पाठविला आहे. त्याप्रमाणे या कामाच्या निविदेप्रमाणे खालीलप्रमाणे काम झालेले आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | कामाची प्रशासकिय मंजूरीची किंमत | रुपये १८५.०७ लक्ष |
| २. | स्थापत्य कामाची प्राकलनिय किंमत | रुपये १६६.९० लक्ष |
| ३. | निविदेची किंमत | रुपये १४२.९२ लक्ष |

४. मे. शंकर महादेव यांच्या १६.२० कमी दराने कामाची किंमत रुपये ११८.७७ लक्ष
५. या कामाची आतापर्यंत झालेली किंमत रुपये ११८.०० लक्ष

उपरोक्त अनु.क्र. ५ वर नमुद केल्याप्रमाणे सद्यस्थितीत या कामातील प्रमुख काम शिवाजी चौक ते संतु बिल्डिंग या रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. आतापर्यंत झालेल्या कामावर रुपये ११२.०० लक्ष इतका खर्च झाला आहे. त्यामुळे मुळ मंजूरी प्राप्त निविदेच्या रक्कमेपेक्षा खर्चात बचत आहे. तसेच या रस्त्याच्या स्थापत्य कामाच्या प्रशासकिय व वित्तीय मंजुरी प्राप्त प्राकलनिय रक्कमेपेक्षा (रु. १६६.९२ लक्ष) पेक्षा प्रत्यक्ष झालेला खर्च कमीत आहे. त्यामुळे उक्त लिंक रस्त्याचे काम करता येऊ शकते.

सदर लिंक रस्त्याचे सिमेंट कॉक्रिटीकरणाचे काम करण्याकरीता प्लेन टेबल सर्वेशिटवर सदर रस्त्याची आखणी व जागेवर मार्किंग नगररचना विभागाकडुन करुन मिळणे करीता सार्वजनिक बांधकाम खात्याने सादर केले आहे.

सदर नारायणदास जग्यासी लिंक रस्त्याचे जागेवर सिमांकन करुन देणेकरीता नगररचना विभागाने सादर केलेल्या सुपरइंपोझ शिटच्या उता—यावर सदर मार्ग दर्शविला असून त्यामध्ये नोंद असलेली १९ बांधकामे बाधित होत असल्याचे नमूद केलेले आहे. ही सर्व बांधकामे जुनी असून निष्कासित केल्यास त्यांच्या पूनर्वसनाचा प्रश्न येऊ शकतो.

मा. आयुक्त सो., मा. शहर अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी या रस्त्याची पहाणी केलेली आहे. मुळ प्रस्तावात उक्त लिंक रस्ता मुख्य रस्त्याच्या रुंदी इतका म्हणजे ३५ फुट रुंद करणे करीता प्रस्तावित आहे. शिवाजी चौक ते संतु बिल्डिंग या रस्त्याचे रुंदीकरण करते वेळी दुतर्फा असलेलया बहूमजली इमारतींमुळे रस्ता रुंदीकरणात खुप अडथळे आलेले आहेत. तशातच उक्त नारायणदास लिंक रस्त्याची रुंदी सद्यस्थितीत २२ फुट ते २४ फुट इतकी आढळते. या रस्त्याच्या दुतर्फा दोन बहुमजली इमारतीही आहेत तसेच काही तळमजला + एक मजल्याच्या इमारती आहेत. त्यामुळे सदर रस्त्याचे ३५ फुट इतके रुंदीकरण करण्यास अडचण येणार आहे. तसेच या रस्त्यामध्ये पृष्ठभागावर तसेच पृष्ठभागाच्या खाली पाण्याच्या वाहिन्या अस्ताव्यस्त गेलेल्या आहेत. रस्त्याच्या खोदकामामुळे या वाहिन्या तुटणार आहेत. त्यामुळे त्यांचे स्थलांतर करुनच रस्त्याचे कॉक्रिटीकरण करावे लागेल. या कामावरील काही अतिरिक्त निधी पाणीपुरवठा विभागाकडुन खर्च करावा लागणार आहे. तसेच या कामासाठी बराच कालावधी लागणार आहे.

महानगरपालिकेची आर्थिक स्थिती व मे. शंकर महादेव यांच्या ठेक्याची संपलेली मुदत, तसेच हा रस्ता अंतर्गत रस्ता असल्याने त्यावर वाहतूकीचे प्रमाणही अत्यल्प आहे. सध्या सुरु असलेला पावसाळा हंगाम या सर्व बाबी लक्षात घेता सदर लिंक रस्त्याचे काम सद्यस्थितीत हाती न घेता भविष्यात घ्यावे असे मत आहे. परंतू सद्या कार्यरत असलेले ठेकेदार मे. शंकर महादेव यांच्या १६.१० टक्के कमी दराचा लाभ घेऊन उक्त काम हाती घेतल्यास या कामाची किंमत कमी होणार आहे. त्यामुळे महानगरपालिकेची आर्थिक बचत होणार आहे.

या सर्व बाबींचा विचार करता उक्त रस्त्याचे काम वगळावे अथवा मे. शंकर महादेव यांना मुदतवाढ देऊन त्यांचे मार्फत कार्यवाही करावी किंवा कसे याबाबत लेखा विभागाकडुन आर्थिक स्थिती बाबत अभिप्राय घेऊन पुढील आदेशाकरीता सादर करण्यात आले होते.

महानगरपालिकेच्या आर्थिक स्थिती बाबत मुख्य लेखा अधिक्षक व मुख्य लेखा परिक्षक यांनी सार्वजनिक बांधकाम खात्याने नमुद केलेले मुद्ये विचारात घेऊन सदर लिंक रस्त्याचे काम वगळण्यास हरकत नसल्याचे नमुद केले आहे. तरी या विषयी स्थायी समितीकडुन निर्णय होणेकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ४३ <u>दिनांक:— २७/१०/२००५</u>

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर—३ शिवाजी चौक ते संतू बिल्डिंग या रस्त्याच्या कामामधील नारायणदास जग्यासी मार्ग या लिंक रस्त्याचे रुंदीकरण व सिमेंट कॉंक्रिटीकरण करणेकामी प्रशासनास सध्या कार्यरत असलेले ठेकेदार मे.शंकर महादेव कंपनी यांच्याशी पूर्वीच्या संविदेतील अटी, शर्ती व दराने वाढीव कामासाठी निविदेशिवाय थेट संविदा करण्यास तसेच अंतर्भुत खर्चास व प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती /पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

<u>विषय क्र. ११ :—</u> उल्हासनगर कॅम्प नं १ ते ५ मधील रस्त्यावरील ट्युबलर विद्युत खांब व खांबांना रंग लावणेकामी सुधारित प्राकलनास व प्रशासनाने मे. जयहिंद म.का.स.सं. यांच्याशी केलेल्या थेट संविदेस कार्योत्तर मंजुरी देणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास.......

<u>मा. सभापती :—</u>सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

<u>विषय क्र. ११ :—</u> उल्हासनगर कॅम्प नं १ ते ५ मधील रस्त्यावरील ट्युबलर विद्युत खांब व खांबांना रंग लावणेकामी सुधारित प्राकलनास व प्रशासनाने मे. जयहिंद म.का.स.सं. यांच्याशी केलेल्या थेट संविदेस कार्योत्तर मंजुरी देणे.

<u>प्रस्तावना:—</u>

उल्हासनगर — १ ते उल्हासनगर— ५ पर्यंत रस्त्यांवर उभे केलेले स्टील टयुबलर विद्युत खांबला पेंटिंगची कामे ज्याची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४,८६,०००/— होती. हे काम मे. जयहिंद लेबर को. आ. सोसायटी लि. यांना AT PAR मध्ये दिले होते.

अंदाजपत्रकीय रक्कम ४,८६,०००/— ठरविण्यानंतर पेटिंग सुरु केल्यानंतर ६ मि. जी. आई. पोल मध्ये येत होते, ते पेंटिंग न केल्यावर फार वाईट वाटत होते त्यानंतर ते ही पेंटिंग करण्यात आले व सुधारित अंदाजपत्रक बनविण्यात आले व ते रुपये ६,०७,०००/— आहे.

सदर सुधारित प्राकलनाला मान्यता देवून झालेल्या कामास कार्योत्तर मंजुरीसाठी स्थायी समिती पुढे सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ४४ दिनांक:— २७/१०/२००५

सुचकाचे नाव :— श्री. सुरेश गायकवाड
अनुमोदकाचे नाव :— श्रीमती संगिता जावळे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर कॅम्प नं १ ते ५ मधील रस्त्यावरील ट्युबलर विद्युत खांब व खांबांना रंग लावणेकामी सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व प्रशासनाने मे. जयहिंद म.का.स.सं. यांच्याशी निविदेशिवाय केलेल्या थेट संविदा कायम करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :— विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. १२ :— विविध बुस्टर पंपिंग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे तसेच सदर कामी प्रशासनास सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदाराशी नवीन निविदा अंतिम होईपर्यंत मुदतवाढीच्या संविदेस कायम करणे.

---

काही सदस्य :—पास—पास.......

मा. सभापती :—सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

विषय क्र. १२ :— विविध बुस्टर पंपिंग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे तसेच सदर कामी प्रशासनास सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदाराशी नवीन निविदा अंतिम होईपर्यंत मुदतवाढीच्या संविदेस कायम करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरात पाणी वितरण व्यवस्थेसाठी विविध भागात बसविण्यात आलेली एल.टी. बुस्टर पंपिंग मशिनरी पुढील बारा महिन्यांच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्द्तीने चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणे करिता रु २१,०६,०००/— मात्र अंदाजित खर्चाचे प्राकलन तयार करण्यात आले असुन

त्यांस मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (डी) अंतर्गत मान्यता दिलेली आहे.

सध्या हे काम ठेकेदार मे. कल्पतरु इंजिनिअर्स, मुंबई यांना कार्यादेश क्र युएमसी/डब्ल्युएसएसडी/मेक/१९३४, दिनांक १४/९/२००४ नुसार दिनांक १६/९/२००४ पासुन देण्यात आलेले असुन सदर कामाची मुदत दिनांक १५/९/२००५ रोजी संपली आहे. तथापि निविदेतील अटीनुसार नविन ठेकेदार नियुक्त होईपर्यंत पुर्वीच्याच ठेकेदाराने त्यांच्या मंजुर निविदा दराने पुढे काम सुरु ठेवले आहे.

म्हणुन उपरोक्त कामासाठी पुढील बारा महिन्यांच्या कालावधी करिता निविदा मागवुन नविन ठेकेदार नियुक्त करण्यासाठी तसेच सदर कामास तीन महिने मुदतवाढ देण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे. तरी सबब सदर प्रस्ताव स्थायी समिती समोर प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ४५ दिनांकः— २७/१०/२००५

सुचकाचे नाव :—श्री. चंदाराम मोकल
अनुमोदकाचे नाव :— श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे विविध बुस्टर पंपिंग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे तसेच दिनांक १६/९/२००५ पासून नवीन निविदा अंतिम होईपर्यंत प्रशासनास सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदाराशी पूर्वीच्या संविदेतील अटी, शर्ती व दराने वाढीव मुदतीसाठी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :— विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

————————————————————————————————

विषय क्र. १३ :— सिवेज पंपिंग स्टेशन क्र. २ शांतीनगर व क्र. ३ नेहरुनगर चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे तसेच सदर कामी प्रशासनास सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदाराशी नवीन निविदा अंतिम होईपर्यंत मुदतवाढीच्या संविदेस कायम करणे.

————————————————————————————————

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— सदरचा विषय सभा सूचनेवरुन वगळण्यात यावा.

काही सदस्य :— विषय वगळण्यात यावा.

मा. सभापती :— सदरचा विषय सर्वानुमते वगळण्यात येत आहे.

————————————————————————————————

☒ **विषय क्र. १३ :—** सिवेज पंपिंग स्टेशन क्र. २ शांतीनगर व क्र. ३ नेहरुनगर चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे तसेच सदर कामी प्रशासनास सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदाराशी नवीन निविदा अंतिम होईपर्यंत मुदतवाढीच्या संविदेस कायम करणे.

---

**मा. सचिव :—** विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १४ :—** उल्हासनगर शहरातील विंधन विहीरींवरील हातपंप दुरुस्त करणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

---

**मा. सदस्य श्री. मोहन साधवानी :—** हे काम या आधी कोण करीत होते? आमच्या प्रभागातील बोअरवेल दुरुस्तीचे एकही काम झालेले नाही. वारंवार फोन करुन देखिल कोणी येत नाही.

**मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :—** या आधी किती वेळा दुरुस्तीचे काम केले आहे?

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—** यापूर्वीच्या कामाची मुदत संपलेली आहे. आता नवीन निविदा काढण्यासाठी प्रस्ताव आहे. त्यानंतर सर्वांची कामे होतील.

**मा. सभापती :—**सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. १४ :—** उल्हासनगर शहरातील विंधन विहीरींवरील हातपंप दुरुस्त करणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

**प्रस्तावना :**

उल्हासनगर शहरातील ठिक ठिकाणी पाणी टंचाई ग्रस्त भागात पर्यायी तातडीची उपाय योजना म्हणुन पाणी पुरवठयासाठी विंधन विहीरी घेवून त्यावर हातपंप बसविण्यात आले आहेत. त्यांचा दैनंदिन वापरामुळे ते वारंवार नादुरुस्त होत असल्याने तातडीची दुरुस्ती करण्याकरिता रु ४९९,२१०/— खर्चाचे प्राकलन तयार करण्यात आलेले आहे.

वार्षिक हात पंप दुरुस्तीची निविदा मुदत दि. २०/७/२००५ रोजी संपली आहे. तथापि, शहरातील नादुरुस्त हातपंप तातडीने दुरुस्त करणे गरजेचे असल्यामुळे सदर कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेकरिता स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर करण्यात येत आहे. मंजुरी नंतर हे काम जिल्हा उपनिबंधक, ठाणे यांच्या शिफारसीनुसार मान्यताप्राप्त मजुर कामगार सहकारी संस्थेमार्फत करण्यात येईल.

**स्थायी समिती ठराव क्र.** ४६ **दिनांक:— २७/१०/२००५**

सुचकाचे नाव :—श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील विंधन विहीरींवरील हातपंप दुरुस्त करणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे तसेच कामाची निकड पाहता प्रशासनास योग्य मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :— विषय क्र. १५ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. १५ :— उल्हासनगर शहरात अतिवृष्टीमुळे महापालिका सेवेत १५ दिवसांसाठी नेमण्यात आलेल्या तात्पुरत्या सफाई कामगारांच्या नेमणुकीस व त्यांच्या वेतनापोटी खर्चास मान्यता देणे.

---

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— श्री खरात साहेब, या सफाई कामगारांना दिवाळीपूर्वी पगार देण्यात यावा. त्यांनी ३० दिवस काम केलेले आहे. इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता त्यांना दिवाळीपूर्वी पगार देण्यात यावा.

मा. सभापती :—सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

विषय क्र. १५ :— उल्हासनगर शहरात अतिवृष्टीमुळे महापालिका सेवेत १५ दिवसांसाठी नेमण्यात आलेल्या तात्पुरत्या सफाई कामगारांच्या नेमणुकीस व त्यांच्या वेतनापोटी खर्चास मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील लहान—मोठे नाले पावसाळयापूर्वी सफाई करणे आवश्यक असते. त्या अनुषंगाने स्थायी समिती ठराव क्र. ४ दिनांक २५/४/२००५ अन्वये ७६० हंगामी रोजंदारी कामगार दोन महिन्यासाठी (६० दिवसांसाठी) पावसाळयापूर्वी पालिका कार्यक्षेत्रातील सर्व प्रभागातील लहान—मोठे नाले गटारे सफाई कामासाठी नेमणुकीस मान्यता दिलेली आहे.

परंतु दिनांक २६ ते २८ जुलै, २००५ या कालावधीत अतिवृष्टी झाल्यामुळे सदरच्या काळात पुरपरिस्थितीच्या पाण्यामुळे धान्य, कपडे व इतर सामग्री खराब होवून रोगराई होण्याची दाट शक्यता निर्माण झाली होती. अशा वेळी सफाई कामगारांची गरज लक्षात घेवुन त्यांना दिनांक १२/८/२००५ पासून २६/८/२००५ पर्यंत कामास लावण्यात आले होते. सदर कामगारांचा काम केलेल्या दिवसांची त्यांना देय असलेली रक्कम अंदाजे रुपये १२ लाख इतकी होत असून सदर प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीसाठी

स्थायी समिती पुढे ठेवण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे या प्रमाणे देयक मंजुरीसाठी मा. स्थायी समिती समोर सदरचा प्रस्ताव प्रस्तावित आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ४७ **दिनांकः— २७/१०/२००५**

सुचकाचे नाव :—श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :— श्रीमती रेखा कृष्णानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव अनुसार उल्हासनगर शहरात अतिवृष्टीमुळे महापालिका सेवेत दिनांक १२/८/२००५ ते २६/८/२००५ पर्यंत १५ दिवसांसाठी प्रशासनातर्फे थेट नेमण्यात आलेल्या तात्पुरत्या सफाई कामगारांच्या नेमणुकीस तसेच अंतर्भुत खर्च रु १२ लाख मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**मा. सचिव :—** विषय क्र. १६ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————

**विषय क्र. १६ :—** : सार्वजनिक बांधकाम विभागासाठी सॉफ्टवेअर पॅकेज पुरविणेकामी प्रशासनास सॉफ्टटेक इं.प्रा.लि यांचेशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

————————————————————————————————————————**कका**

**ही सदस्य :—**पास—पास.....

**मा. सभापती :—**सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. १६ :—** : सार्वजनिक बांधकाम विभागासाठी सॉफ्टवेअर पॅकेज पुरविणेकामी प्रशासनास सॉफ्टटेक इं.प्रा.लि यांचेशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

**प्रस्तावना:—**

उपरोक्त विषयांकित सॉफ्टटेक इं. प्रा. लि. पुणे यांनी बांधकाम विभागासाठी असणारे सॉफ्टवेअर पॅकेज तयार केलेले आहे. सदर सॉफ्टवेअर पॅकेजमध्ये खालील बाबींचा समावेश आहे.

**१) STRUDS :**

सदर सॉफ्टवेअर मध्ये इमारतीचे पृथःकरण व आर सी सी डिझाईन व इतर डिझाईन सिझमिक व वींड लोड चा विचार करुन I.S.CODE च्या आधारावर तयार करणेत आले आहे. याचा उपयोग इमारतीचे आर.सी.सी स्ट्रकचरचे परिगणन करुन याच कपंनीच्या QE.Pro सॉफ्टवेअरशी संलग्न करुन प्राकलन,निविदा,देयके इ. तयार करण्याकरिता होवु शकतो सदरचे सॉफ्टवेअर सी.सी डिझाईनचे पडताळणीसाठी चांगला रिपोर्ट देवु शकतो. तसेच सदर सॉफ्टवेअर हे ऑटोकॅड सॉफ्टवेअरशी संलग्न आहे. त्यामफ्ळे ऑटोकॅड व्दारे सॉफ्टवेअरचे ड्रॉईंग उपलब्ध होउ शकतात.

**<u>२) QE:PRO :</u>**

सदर सॉफ्टवेअरमध्ये कोणतेही कामाचे प्राकलन तयार करणे, यामध्ये वापरण्यात येणा—या वस्तुचे दर ॲनालेसिस करणे, जिल्हा दर सुची वापरणे, तसेच त्यामध्ये वेळोवेळी लागणारी दुरुस्ती करणे, तसेच टेंडर फॉर्म तयार करणे त्याचे पृथःकरण करणे, रनिंग बिल व फायनल बिल तयार करणे इ. बांबीचा समावेश आहे. तसेच सदर सॉफ्टवेअरमधील बाबींसाठी Customization हे महापालिकेसाठी उपयुक्त ठरणारे आहे.

**<u>३) ESR/GSR :</u>**

यामध्ये I.S.CODE 3370 प्रमाणे Elevated Storage Reservoir/Ground Storage Reservoir चे डिझाईन करुन त्याप्रमाणे ॲटोकॅड मधुन तातडीने त्यांचे नकाशे होईल. सबब सदर सॉफ्टटेक इं. प्रा. लि. पुणे या कंपनीने सादर केलेले सॉफ्टवेअर हे स्थापत्य शाखेतील ज्या प्रयोजनार्थ तयार केलेले आहेत त्यासाठी तांत्रिक दृष्टया पाहता योग्य आहे.

सद्यपरिस्थितीमध्ये महानगरपालिका आर. सी. सी. बाबत पुर्ण डिझाईनिंग हे वेगवेगळे वास्तुविशारद यांचे स्ट्रक्चर इजिंनियर यांचे मार्फतच करतात. ते योग्य आहे किवां नाही हे तपासणेसाठी वरिल सॉफ्टवेअर उपयुक्त आहे. त्यामुळे हे सॉफ्टवेअर खरेदी करणे आवश्यक आहे.

सदर खरेदी करिता अंदाजित खर्च रु. १ लाख ८० हजार अपेक्षित आहे. व वित्तीय वर्ष २००५—०६ च्या अंदाजपत्रकात A-3 (xi) मध्ये संगणक व संगणकीय साहीत्य खरेदीसाठी रु. ३० लाखाची तरतुद आहे.

वरिल बाबी लक्षात घेता प्रशासनाला सॉफ्टटेक इं. प्रा. लि. पुणे या मान्यताप्राप्त कंपनीकडून सार्वजनिक बांधकाम विभागासाठी सदरचे सॉफ्टवेअर खरेदी करण्याकरिता प्राधिकृत करण्यासाठी मुबंई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २(२) अंतर्गत मंजुरीसाठी व लागणा—या अदांजे खर्च रु. १ लाख ८० हजार यास मान्यतेसाठीचा प्रस्ताव स्थायी समिती पटलावर सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ४८ दिनांकः— २७/१०/२००५

सुचकाचे नाव :—श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :— श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे महापालिकेतील सार्वजनिक बांधकाम विभागास सॉफ्टवेअर पॅकेज पुरविणेकामी प्रशासनास सॉफ्टटेक इं.प्रा.लि यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे व अंतर्भुत खर्च रु १.८० लाख यांस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :— विषय क्र. १७ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. १७ :— महापालिका पदाधिकारी व अधिकारी यांना महापालिकेच्या/कार्यालयीन कामकाजासाठी मोबाईल वापर खर्च प्रतिपूर्ती अनुक्रमे रु. १०००/— व रु. ५००/— मान्य करणे.

--- मा.

सदस्य श्री. मोहन साधवानी :— हा भत्ता कोणाला देणार आहात? आम्ही फोन करतो तर फोन बंद असतात. पुराच्या वेळी आम्ही या लोकांना फोन करण्याचा प्रयत्न करीत होतो त्यावेळी यांनी फोन बंद ठेवले होते. मग यांना भत्ता कशासाठी द्यायचा. त्यांना भत्ता देत असाल तर किमान फोन सुरु ठेवायला सांगा.

आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी (श्री. उत्तम लोणारे) :— आम्ही सर्वांना फोन चालु ठेवण्यासाठी सूचना दिलेल्या आहेत. आत पुन्हा एकदा सूचना देवु.

मा. सभापती :—सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

विषय क्र. १७ :— महापालिका पदाधिकारी व अधिकारी यांना महापालिकेच्या/कार्यालयीन कामकाजासाठी मोबाईल वापर खर्च प्रतिपूर्ती अनुक्रमे रु. १०००/— व रु. ५००/— मान्य करणे.

प्रस्तावना:—

दिनांक २६ व २७ जुलै, २००५ या कालावधीत शहरात मोठया प्रमाणात अतिवृष्टी होवून शहरात आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली होती. या काळात शहरातील संपर्क यंत्रणा संपुर्णतः कोलमडुन पडली. या आपत्कालीन परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करीत होते. अशा काळात शहरात फक्त एअर टेल व रिलायंन्स यांनी संपर्कयंत्रणा कार्यान्वित होती. म्हणून प्रशासनाने अशा आपत्कालीन परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचारी

यांचा एकमेकांशी योग्य संपर्क राहणेसाठी सिमकार्ड सहित ३९ मोबाईल संच खरेदी केले (९ मोबाईल एल.जी. बनावटीचे व ३० रिलायंन्स बनावटीचे ) आहेत.

सदरचे मोबाईल संच वेळोवेळी रिफील करावे लागतात त्यासाठी सदरचे मोबाईल संच रिफीलींग करणेकामी महापालिकेतर्फे ज्या विभागप्रमुख व कर्मचारी यांना मोबाईल संच पुरविण्यात आलेले आहेत. अशा विभागप्रमुख व कर्मचा—यांच्या वेतनात प्रत्येकी रुपये ५०० तर मा. महापौर, मा. उप—महापौर, मा. स्थायी समिती सभापती, मा. आयुक्त व उपायुक्त (मुख्यालय) यांचे वेतनात प्रत्येकी रुपये १००० वाढवुन मिळणेस मंजुरी मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीसमोर मंजुरीसाठी ठेवण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ४९</u> <u>दिनांकः— २७/१०/२००५</u>

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :— श्री. सुरेश जाधव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार महापालिका पदाधिकारी व अधिकारी यांना महापालिकेच्या/कार्यालयीन कामकाजासाठी मोबाईल वापर खर्च प्रतिपूर्ती अनुक्रमे दरमहा रु. १०००/— व रु. ५००/— मान्य करीत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. १८ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

<u>विषय क्र. १८ :—</u>शहरातील दुर्बल घटकातील महिलांना शिवणयंत्र वाटप करणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे.

——————————————————————————————————— <u>मा.</u>
<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u> यावेळी ज्या मशिन देणार आहात, त्या चांगल्या प्रतीच्या व नामांकित कंपनीच्या द्या. मागच्या वेळी ज्या मशिनी दिल्या होत्या त्या लगेच नादुरुस्त झाल्या होत्या. मला स्वत:ला त्या दुरुस्त करुन द्याव्या लागल्या. त्यामुळे चांगल्या कंपनीच्या मशिन घ्याव्यात अथवा थेट कंपनीकडुनच मशिनची खरेदी करण्यात यावी.

<u>मा. सभापती :—</u> या आधी अशी तक्रार आली नव्हती.

<u>मा. सदस्य श्री. गणपात एडके :—</u> मा. सभापती महोदया, माझी अशी सूचना आहे की, आम्हाला ४ च मशिन द्या परंतु त्या मोठया साईझच्या द्या. मागच्या वर्षी ज्या मशिन दिल्या होत्या त्या छोटया आकाराच्या होत्या, त्या मशिनवर मोटार बसत नाही. त्यामुळे ४ च द्याव्यात परंतु मोठया आकाराच्या द्याव्यात.

<u>मा. सभापती :—</u>सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. १८ :–**शहरातील दुर्बल घटकातील महिलांना शिवणयंत्र वाटप करणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे.

प्रस्तावना:–

महिला बाल कल्याण विभागाद्वारा सन २००५–२००६ करीता उल्हासनगर शहरातील दुर्बल घटकातील महिलांसाठी मोफत शिवणयंत्रे वाटप करण्याचे योजिले आहे. त्यानुसार प्रत्येक नगरसेवकांना त्यांचे प्रभागामध्ये प्रत्येकी ५ प्रमाणे ८१ वार्ड नुसार एकुण ४०५ शिवणयंत्राची मशीनची अंदाजे किंमत प्रति नग रुपये २१०० प्रमाणे एकुण ४०५ शिवणयंत्राची किंमत ८,५०,५००/– इतका खर्च होणार आहे.

सदर शिवणयंत्रे वाटप करणेकामी अंदाजित खर्च रक्कम रुपये ८,५०,५००/– हा महिला व बाल कल्याण विभागाच्या लेखा शिर्ष सी–४ (iii) खाली असलेल्या १५ लक्ष हया तरतुदी मधुन करावयाचा आहे.

सदरचे शिवणयंत्र खरेदीचा एकुण खर्च रुपये ८,५०,५००/– मा. स्थायी समितीच्या मंजुरी करीता सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ५० दिनांक:– २७/१०/२००५

सुचकाचे नाव :–श्रीमती मोना वनवारी
अनुमोदकाचे नाव :– श्रीमती माया मसंद

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार शहरातील दुर्बल घटकातील महिलांना शिवणयंत्र वाटप करणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :– विषय क्र. १९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १९ :–**जकात विभागातील दक्षता पथकासाठी पोलीस संरक्षण पुरविणेकामी प्रति महिना रु. २५,०००/– खर्च मान्य करणे.

---

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– हे जे पोलीस ठेवणार आहात, ते शासनाचे पोलीस असतील की खाजगी सुरक्षा रक्षक असतील?

आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी (श्री. उत्तम लोणारे) :– शासनाचे पोलीस असतील.

मा. सदस्य श्री चंदाराम मोकल :– हे पोलीस कसे काय ठेवणार, आपले १० नाके आहेत.

<u>**आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी (श्री. उत्तम लोणारे) :–**</u> हे पोलीस फक्त दक्षता पथकासोबत असतील, नाक्यावर असणार नाहीत.

<u>**मा. सदस्य श्री चंदाराम मोकल :–**</u> दिवसा पोलीस देण्याची आवश्यकता नाही, फक्त रात्रीच्या वेळी पोलीस उपलब्ध करुन द्यावेत. नाक्यावर पण रात्रीच्या वेळी पोलीस द्या.

<u>**आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी (श्री. उत्तम लोणारे) :–**</u> यापूर्वी दक्षता पथकातील कर्मचा–यांना मारहाण, दमदाटी देण्याचे प्रकार झाले आहेत, त्यामुळे दिवसभर पोलीस संरक्षण देणे आवश्यक आहे. नाक्यावर पोलीस देण्याची आवश्यकता नाही.

<u>**मा. सदस्य श्री चंदाराम मोकल :–**</u> दिवसा पोलीस देण्याची आवश्यकता नाही.

<u>**मा. सदस्य श्री किशोर वनवारी :–**</u> यांच्या सूचनेवर विचार करण्यात यावा.

<u>**मा. सभापती :–**</u>सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

<u>**विषय क्र. १९ :–**</u>जकात विभागातील दक्षता पथकासाठी पोलीस संरक्षण पुरविणेकामी प्रति महिना रु. २५,०००/– खर्च मान्य करणे.

<u>**प्रस्तावना :–**</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या जकात विभागाच्या जकात वसुलीचे रात्रं–दिवस ३ पाळींमध्ये काम चालु असते. जकात वसुलीच्या कार्यप्रणालीवर नियंत्रण ठेवून जकात वसुलीची कार्यवाही चोख बजावणे आवश्यक आहे. सदर काम करतांना जकात विभागांतर्गत कार्यरत दक्षता पथकातील कर्मचा–यांना जकात चोरीस आळा घालण्यासाठी अहोरात्र शहरात व वेळप्रसंगी शहराच्या हद्दीबाहेर जावे लागते. ही कार्यवाही करतांना महानगरपालिकेच्या हद्दीत व हद्दीबाहेर ट्रान्सपोर्टरच्या गाडया थांबवुन रात्री अपरात्री काळोखात कोठेही त्यांना विचारपुस करावी लागते. तसेच काही ट्रान्सपोर्टर यांच्या जकात नाक्यावर न थांबता निघुन / पळुन गेलेल्या गाडया यांची चौकशी करतांना अनुचित प्रकार घडण्याची शक्यता असते. अशा प्रकारच्या घटना या अगोदर घडल्या असुन त्यांची नोंद पोलिसात आहे.

सबब जकात विभागातील वरील प्रकारचे प्रसंग टाळण्यासाठी व संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांना कर्तव्य अधिक धाडसाने व काटेकोरपणे पार पाडण्यासाठी व सदर घटनाची पुनरावृत्ती होवू नये म्हणून जकात विभागाकडील दक्षता पथकास ३ पाळयामध्ये पोलिस संरक्षण पुरविण्यासाठी ०६ पोलिस कॉन्स्टेबलच्या सेवा घेण्याचे व त्यासाठी येणा–या मासिक रुपये २५०००/– इतक्या खर्चासाठी

मा. स्थायी समितीच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर संरक्षण प्रथम २ महिन्यासाठी घेण्यात येईल त्यानंतर आवश्यकतेनुसार मा. स्थायी समितीच्या मंजुरीने प्रस्ताव सादर करण्यात येईल.

तरी वरील प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सादर.

<u>**स्थायी समिती ठराव क्र.**</u> ५१ <u>दिनांक:– २७/१०/२००५</u>

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :– श्री. राजु जग्यासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे जकात विभागातील दक्षता पथकासाठी पोलीस संरक्षण पुरविणेकामी प्रति महिना रु. २५,०००/– खर्च मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. २० वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

⇨ <u>विषय क्र. २०:—</u> श्री. डी.आर.पाटील यांच्या अतिक्रमण विभागात विशेष कार्य अधिकारी या पदावरील तात्पुरत्या नेमणुकीस मान्यता देणे.

———————————————————————————————————————

<u>मा. सदस्य श्री चंदाराम मोकल :—</u> ६ महिन्यात यांनी काय काम केले याचा अहवाल येथे सादर करतील काय?

<u>आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी (श्री. उत्तम लोणारे) :—</u> आम्ही त्यांच्या कामाचा दैनिक अहवाल घेतो. यांच्या सेवेची सहा महिनेपण आवश्यकता भासणार नाही.

<u>मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :—</u> न्यायालयाने त्यांना ठेवण्यासाठी आदेश दिले आहेत काय? हे काम करण्यासाठी आपल्याकडे कर्मचारी नाहीत का?

<u>आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी (श्री. उत्तम लोणारे) :—</u> ब—याच ठिकाणी बिल्डरने दुस—याच्या नावाने इमारती बांधलेल्या आहेत. न्यायालयाने खरे विकासक शोधुन काढायला सांगितले आहेत, आमच्याकडे जेवढी माहिती होती तेवढी आम्ही न्यायालयात दिलेली आहे, आता हयांची नियुक्ती विकासक शोधुन काढण्यासाठी केलेली आहे.

<u>मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :—</u> आमचा या प्रस्तावाला विरोध आहे.

<u>आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी (श्री. उत्तम लोणारे) :—</u> हे एक चांगले अधिकारी आहेत, पोलीस दलातुन निवृत्त झालेले आहेत.

<u>मा. सदस्य श्री चंदाराम मोकल :—</u> त्यांच्या कामाबद्दलचा अहवाल स्थायी समितीसमोर सादर करायला हवा.

<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी :—</u> ६ महिन्यांपर्यंत नियुक्ती देण्याचे अधिकारी आयुक्तांना असतात, एक वर्षासाठी स्थायी समितीला व २ वर्षासाठी नियुक्ती देण्याचे अधिकारी महासभेला असतात. आयुक्तांनी त्यांच्या अधिकारात नियुक्ती केली आहे.

<u>मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :—</u> भाजपा—शिवसेनेचा हया प्रस्तावाला विरोध आहे.
<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> सर्व्हेक्षण करण्यासाठी या अधिका—याची नियुक्ती केली जात आहे. ६ महिन्यापर्यंत नियुक्ती देण्याचे अधिकार आयुक्तांना आहे. १२ महिन्यापर्यंत नियुक्तीचे अधिकार ते देवु शकत नाही.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—</u> ते काय काम करतात ते स्थायी समितीसमोर आले पाहिजे. तसेच ते जी माहिती गोळा करतील ती पारदर्शक असली पाहिजे.

<u>मा. सभापती :—</u>विशेष कार्य अधिकारी म्हणुन त्यांची नियुक्ती केली जाणार आहे त्यांनी काय काय काम केले त्याचा अहवाल स्थायी समितीला सादर केला जाईल.

<u>आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी (श्री. उत्तम लोणारे) :—</u> कायदेशीर बाबीशी संबंधीत आहे. सर्व माहिती न्यायालयासमोर जाणार आहे.
<u>मा. सचिव :—</u> पास? सर्व संमतीने? बहुमताने?
<u>मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :—</u> आमचा विरोध आहे.
<u>मा. सभापती :—</u> मी सदरचा विषय मतास टाकते.

<u>मा. सचिव :–</u>जे सन्माननिय सदस्य या प्रस्तावाच्या बाजूने आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या बाजूने ११ मते</u>

१. श्रीमती कालानी ज्योती
२. श्री. वनवारी किशोर
३. श्री. एडके गणपत
४. श्री. गायकवाड सुरेश
५. श्रीमती वनवारी मोना
६. श्री. साधवानी मोहन
७. श्री. जग्यासी राजु
८. श्री. जाधव सुरेश
९. श्री. मसंद माया
१०. श्री. मोकल चंदाराम
११. श्री. वाघे शामु

<u>मा. सचिव :–</u>जे सन्माननिय सदस्य या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या विरोधात ४ मते</u>

१. श्रीमती जावळे संगिता
२. श्री. सोनवणे नथु
३. श्रीमती कृष्णानी रेखा
४. श्रीमती ससाणे लक्ष्मीबाई

<u>मा. सभापती :–</u>सदरचा विषय बहूमताने संमत करण्यात येत आहे.

---

☑

<u>विषय क्र. २०:–</u> श्री. डी.आर.पाटील यांच्या अतिक्रमण विभागात विशेष कार्य अधिकारी या पदावरील तात्पुरत्या नेमणुकीस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना :–</u>

श्री. हरी तनवानी यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे उल्हासनगर शहरातील एकुण ८५५ इमारती निष्कासन करण्याबाबत जनहित याचिका क्र. १०५/२००३ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरुन मा. उच्च न्यायालयाने दिनांक २७/९/२००५ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरुन सदरील इमारतींचे विकासकांची नांवे मा. उच्च न्यायालयाला महानगरपालिकेकडील उपलब्ध रेकॉर्डवरुन सादर करण्यात आलेली आहेत.

परंतु उर्वरित नावांपैकी काही विकासकांची नावे शोधणे उपलब्ध रेकॉर्डवरुन अडचणीचे होत आहे. तसेच रेकॉर्डवरील नांवे जरी विकासकांची असली तरी उक्त इमारतीमध्ये वास्तव्य करीत असलेल्या सदनिकाधारकांच्या मते प्रत्यक्ष विकासक इतर व्यक्तीच आहेत.

सबब, उक्त सर्व इमारतींचे अनधिकृतबांधकाम करणा–या उपलब्ध रेकॉर्डवरील विकासंकाव्यतिरिक्त इतर व्यक्तिच सदर इमारतीच्या अनधिकृत बांधकामास जबाबदार असल्याचे दिसते. त्यामुळे व्यक्तीची नांवे शोधणे महानगरपालिकेकडील उपलबध अभिलेख व कर्मचा–यांकडुन अडचणीचे होत आहे व या कामी बराच कालावधी लागू शकतो. सबब या कामी निवृत्त शासकिय अधिका–याची नेमणुक केल्यास सदरचे काम तातडीने करणे सोईचे होईल. मा. न्यायालयास माहिती सादर करणे सुलभ होणेकामी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे नियम ५३ (३) मधील तरतुदीनुसार श्री. डी. आर. पाटील, निवृत्त

पोलिस निरिक्षक यांची विशेष कार्य अधिकारी (अतिक्रमण निर्मुलन) म्हणुन ६ महिन्यांसाठी नेमणुक करण्यात आली आहे. सबब, सदर प्रस्तावास खर्चासह मान्यता मिळावी असे प्रस्तावित आहे.

१) जनहित याचिका क्र. १०५ /२००३ मधील मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक २७/४/२००५ रोजीचे आदेशानुसार मूळ विकासकांची नांवे शोधणे.

२) या कामी शासकिय सेवा निवृत्त अधिका—याची नेमणुक करणे.

सदर प्रस्ताव मान्यतेसाठी मा. स्थायी समितीपुढे ठेवण्यात यावा.

**स्थायी समिती ठराव क्र.** ५२ **दिनांकः— २७/१०/२००५**

सुचकाचे नाव :—श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे श्री. डी.आर.पाटील यांच्या अतिक्रमण विभागात विशेष कार्य अधिकारी या पदावरील तात्पुरत्या नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**बहुमताने**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सायंकाळी ५—२० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—३१ ऑक्टोबर, २००५

## दि. ३१.१०.२००५ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक ३१.१०.२००५ रोजी सांयकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

*१२. मा. सभापती — श्रीमती ज्योती सुरेश (पप्पु)कालानी*
*१३.* श्री. वनवारी किशोर नारायणदास
३. श्री. एडके गणपत गोविंद
१३. श्री. गायकवाड सुरेश नामदेव
१४. श्रीमती जावळे संगिता रमेश
१५. श्रीमती वनवारी मोना अशोक
१६. श्री. साधवानी मोहन रहंदोमल
१७. श्री. सोनवणे नथु काशिराम
९. श्रीमती कृष्णानी रेखा हरेश
१०. श्री जग्यासी राजु किशनचंद

११. श्री. जाधव सुरेश मधुकर
१२. श्रीमती मसंद माया घनश्यामदास
१३. श्री मोकल चंदाराम विठोबा
१४. श्री वाघे श्यामु बाबु
१५. श्रीमती ससाणे लक्ष्मी रोहिदास
१६. श्री. बठिजा संजय रामचंद्र

सांयकाळी ४–५० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>मा. सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

**<u>विषय क्र. १ :–</u>** मागील सभेचे दिनांक २७/१०/०५ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>काही सदस्य :–</u>पास–पास……

<u>मा. सभापती :–</u> मागील सभेचे दिनांक २७.१०.२००५ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

<u>मा. सचिव :–</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————————————————————————————

**विषय क्र.२ :—** उल्हासनगर—२ येथील नेहरु चौक ते सिरु चौक या रस्त्याच्या दुतर्फा नाली व फुटपाथ बांधणे कामी न्युनतम दराचे निविदाकार मे. शैलेश कन्सट्रक्शन कंपनी यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

---

**काही सदस्य :—**पास, पास ......

**मा. सदस्या श्रीमती रेखा कृष्णानी :—**विरोधी पक्षाच्या सदस्यांची कामे आपण मंजुरीस्तव सभा सुचनेवर आणत नाहीत. प्रभाग क्र. ६ मधील बरीचशी कामे श्री. रामदास उमाप यांचे प्रभागातील आहेत ती कामे मंजुरीस्तव स्थायी समितीपुढे आणली नाहीत.

**मा. सभापती :—**ठेकेदारांना पैसे मिळत नसल्याने ते काम करण्यास तयार नाहीत. जी कामे करण्यासाठी ते तयार आहेत ती आता आम्ही येथे आणत आहोत. सर्वांची कामे होतील.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—** माझ्या प्रभागातील एक १० लाखाचे काम आहे. त्या कामाची निविदा ४ वेळा प्रसिध्द केली परंतु कुणीही ठेकेदार ते काम करण्यास तयार नाहीत. त्यामुळे येथे भेदभाव केला जातो असे म्हणणे योग्य नाही.

**काही सदस्य :—**पास—पास.......

**मा. सभापती :—** सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र.२ :—** उल्हासनगर—२ येथील नेहरु चौक ते सिरु चौक या रस्त्याच्या दुतर्फा नाली व फुटपाथ बांधणे कामी न्युनतम दराचे निविदाकार मे. शैलेश कन्सट्रक्शन कंपनी यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

**प्रस्तावना:—**

| | | |
|---|---|---|
| 1 | कामाचो नांव | उल्हासनगर-2 येथील रॉयल शॉप किपर्स असोसिएशन यांनी मागणी केलेले उल्हासनगर-2 नेहरु चौक ते सिरु चौक या रस्त्याच्या दुतर्फा नाली व फुटपाथ बांधणे या कामास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत |
| 2 | प्राकलनाची किंमत | 19,59,750/- |
| 3 | तांत्रिक मंजुरी देणा-या अधिका-याचे पदनाम | शहर अभियंता |
| 4 | तांत्रिक मंजुरी मिळाल्याचा क्र. व दिनांक: | क्र. 1923 दि. 15.05.2005 |
| 5 | प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळाल्याचा क्र व दिनांक | क्र. 47 दिनांक 07/06/2004 |
| 6 | निविदा सुचना क्रमांक व दिनांक | क्र. 282 दिनांक 10/12/2004 |
| 8 | विक्री केलेल्या निविदा फॉर्म्सची सांख्या | 2 |

| | | |
|---|---|---|
| 9 | अंतिम दिवशी प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | 2 |
| 10 | निविदा उघडल्याचा दिनांक | दिनांक 31/12/2004 |
| 11 | निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता | |
| अनु | निविदाधारकाचे नांव | |
| 1 | मे. शैलेश कन्स्ट्रक्शन कं. | 17.00 टक्के जास्त |
| 2 | मे. श्रीकृष्णा कन्स्ट्रक्शन | 15.00 टक्के जास्त |
| 12 | निविदाधारकाशी वाटाघाटी केल्या असल्याचा त्याचा तपशिल | दि. 04/07/05 रोजी सकाळी 11.00 वाजता मा. शहर अभियंता यांचेकडे मे. श्रीकृष्णा कंन्स्ट्रक्शन यांना वाटाघाटीकरिता बोलविण्यात आले होते. मे. श्रीकृष्ण कंन्स्ट्रक्शन हे वाटाघाटीकरीता आले नाही. त्यामुळे मे.शैलेश कंन्स्ट्रक्शन यांना वाटाघाटीकरीता बोलविण्यात आले. मे.शैलेश कंन्स्ट्रक्शन यांनी निविदेमध्ये भरलेल्या 17.00 टक्के जास्त दरामध्ये 3.37 टक्के सवलत दिल्यानंतर (Rebet) आता वाटाघाटीअंती मे.श्रीकृष्णा कंन्स्ट्रक्शन यांचा अंतिम दर प्राकलनीय दरापेक्षा 13.63 टक्केने जास्त होत आहे. व हा दर चालू दरसुचीवरील (2004-05) प्राकलनिय किंमती 5.00 टक्केने जास्त होत आहे. सदर काम दिवसा वाहतूक वर्दळ असल्याने रात्री करण्यात येईल. |
| 17 | लेखा शिर्षाचे नांव | सी-4(iii) पी-2 रस्तें प्रवास व पुल इत्यादी सुधारणे व नवीन बांधणे. |

प्रस्तावित काम उल्हासनगर शहरातील प्रमुख बाजारपेठेतील रस्त्यामध्ये करणे असल्याने दिवसभर लोकांची, वाहनांची अत्यंत वर्दळ असते. त्याशिवाय या रस्त्यावर पी-1 व पी-2 पार्कींग असते. त्यामुळे याठिकाणी दिवसाकामाची कार्यवाही शक्य वाटत नाही. रात्रीच्या वेळी तसेच साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी (मंगळवारी) कामाचा निपटारा निघू शकतो. रात्रीच्या वेळी मजूरीवरील खर्च वाढणार असल्याने व मे.शैलेश कंन्स्ट्रक्शन यांची 13.63 टक्के दराची निविदा वाजवी असल्याने व आर्थिकदृष्ट्या महानगरपालिकेसाठी फायदेशिर असल्याने मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांच्या शिफारसीनुसार दर स्वीकृत करण्यात आले आहेत. सबब, निविदाधारक मे शैलेश कंन्स्ट्रक्शन यांचेशी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(क) अन्वये संविदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करणेसाठी स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यासाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ५३

दिनांक:—३१/१०/२००५

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे

हीं स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर—२ येथील नेहरु चौक ते सिरु चौक या रस्त्याच्या दुतर्फा नाली व फुटपाथ बांधणे कामी प्रशासनास न्युनतम दराचे निविदाकार मे. शैलेश कन्सट्रक्शन कंपनी यांच्याशी संविदेस व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

मा. सचिव :— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————

⇨ विषय क्र. ३ :— उल्हासनगर—३ येथील प्रभाग क्र. २० मध्ये नेहरु चौक ते अमन टॉकीज रोड येथे फुटपाथ बनविणेकामी न्युनतम दराचे निविदाकार मे. संध्या कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

————————————————————————————————————————

काही सदस्य :—पास, पास ......

मा. सभापती :—सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

विषय क्र. ३ :— उल्हासनगर—३ येथील प्रभाग क्र. २० मध्ये नेहरु चौक ते अमन टॉकीज रोड येथे फुटपाथ बनविणेकामी न्युनतम दराचे निविदाकार मे. संध्या कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

प्रस्तावना:—

| | | |
|---|---|---|
| 1 | कामाचे नांव | उल्हासनगर-3 प्रभाग क्र.20 मधील नेहरु चौक ते अमन टॉकीज रोड येथे फुटपाथ बनविणे |
| 2 | प्राकलनाची किंमत | 9,49,800/- |
| 3 | तांत्रिक मंजुरी देणा-या अधिका-याचे पदनाम | कार्यकारी अभियंता |
| 4 | तांत्रिक मंजुरी मिळाल्याचा क्र. व दिनांक: | क्र. 3038 दि. .9/7/2004 |
| 5 | प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळाल्याचा क्र व दिनांक | क्र. 81 दिनांक 4/8/2004 |
| 6 | निविदा सुचना क्रमांक व दिनांक | क्र. 282 दिनांक 10/12/2004 |
| 8 | विक्री केलेल्या निविदा फॉर्म्सची संख्या | 3 |
| 9 | अंतिम दिवशी प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | 2 |
| 10 | निविदा उघडल्याचा दिनांक | दिनांक 31/12/2004 |
| 11 | निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता | |
| अनु | निविदाधारकाचे नांव | |
| 1 | मे. संध्या कन्स्ट्रक्शन | 9.99 टक्के जास्त |
| 2 | मे. श्रीकृष्णा कन्स्ट्रक्शन | 11.80 टक्के जास्त |
| 12 | निविदाधारकाशी वाटाघाटी केल्या असल्याचा त्याचा तपशिल | दि. 05/07/05 रोजी सकाळी 11.00 वाजता मा. शहर अभियंता यांचेकडे मे. संध्या कंन्स्ट्रक्शन यांना वाटाघाटीकरिता बोलविण्यात आले होते. मे. संध्या |

| | | |
|---|---|---|
| | | कंन्स्ट्रक्शन यांनी त्याचे पुर्वीचे 9.99 टक्के जास्त दरामध्ये 1.20 टक्के सवलत दिल्यानंतर (Rebet) आता वाटाघाटीनंतर सदर निविदेच्या अंतिम दर प्राकलनीय दरापेक्षा 8.97 टक्के कमी होत आहे. व हा दर चालू दरसुचीवरील (2004-05) प्राकलनिय किंमती 4.99 टक्केने जास्त होत आहे. सदर काम दिवसा वाहतूक वर्दळ असल्याने रात्री करण्यात येईल. |
| 17 | लेखा शिर्षाचे नांव | सी-4(iii) पी-2 रस्तें प्रवास व पुल इत्यादी सुधारणे व नवीन बांधणे. |

उक्त नमूद केल्याप्रमाणे मे संध्या कंन्स्ट्रक्शन यांचे वाटाघाटी अंती प्राकलनिय दरापेक्षा 8.97 **टक्केने** जास्त असलेली निविदा वाजवी असल्याने व आर्थिकदृष्टया महानगरपालिकेसाठी फायदेशिर असल्याने मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांच्या शिफारसीनुसार दर स्वीकृत करण्यात आले आहेत. सबब, निविदाधारक मे संध्या कंन्स्ट्रक्शन यांचेशी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(क) अन्वये संविदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करणेसाठी स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यासाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ५४ दिनांकः—३१/१०/२००५

सुचकाचे नाव :— श्री. संजय बठिजा
अनुमोदकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर—३ येथील प्रभाग क्र. २० मध्ये नेहरु चौक ते अमन टॉकीज रोड येथे फुटपाथ बनविणेकामी प्रशासनास न्युनतम दराचे निविदाकार मे. संध्या कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याशी संविदेस व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :— विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————

⇨ विषय क्र. ४ :— उल्हासनगर शहरात टंचाईग्रस्त भागात टॅकरने पाणी पुरवठा करणेकामी न्युनतम दराचे निविदाकार मे. श्वेता ट्रान्सपोर्ट, मे. जयराम वॉटर सप्लाय, मे. गायत्री वॉटर सप्लाय व मे. विजय वॉटर सप्लाय यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

———————————————————————————————————

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> या विषयावर चर्चा करावयाची आहे. मागील वेळेस आपण मे. श्वेता ट्रान्सपोर्ट, मे. जयराम वॉटर सप्लायर्स, मे. गायत्री वॉटर सप्लायर्स, मे. विजय वॉटर सप्लायर्स या पुरवठादारांना टॅकरद्वारे पाणी पुरवठयाचा ठेका दिला होता परंतु ज्या–ज्या वेळेस शहरामध्ये पाण्याची भिषण टंचाई/ समस्या निर्माण होते त्यावेळेस हे पाणी पुरवठादार टॅकरद्वारे करावयाचा पाणी पुरवठा बंद करतात. मात्र मे. श्वेता ट्रान्सपोर्ट या ठेकेदाराने पाणी टंचाईच्या काळात कधीही टॅकरने करावयाचा पाणी पुरवठा बंद केला नाही. भलेही त्यास वेळेवर देयक मिळाले असो अगर नसो त्याने कधीही टॅकरद्वारेचा पाणी पुरवठा बंद केला नाही. आमचे श्री. गोविंदराम लुंड यांनी प्रभाग समितीच्या बैठकीमध्ये ब–याचवेळा तक्रार केली आहे. मे. विजय वॉटर सप्लाय या ठेकेदाराचा टॅकरवरील ड्रायव्हर चांगला नाही. त्यास कामावर ठेवू नये याबाबत या ठेकेदारास सांगण्यात आले होते परंतु त्यांनी त्या ड्रायव्हरला आजपर्यंत कामावरुन काढले नाही. मे. श्वेता ट्रान्सपोर्ट वगळता हे चार टॅकरवाले टॅकरच्या फे–यांची संख्या जास्त दाखविण्यासाठी जाणीवपुर्वक लोकांना टॅकरद्वारे पाणी पुरवठा करीत असतात. मी महासभेमध्ये याबाबत प्रश्न विचारला होता परंतु त्यावर मी सविस्तर चर्चा केली नाही. या टॅकरवाल्यांच्या ड्रायव्हरला कुणी ५० रुपये दिले तर तो ड्रायव्हर कुणालाही पाण्याचा टॅकर देत असतो. त्यामुळे टॅकरच्या पाणी पुरवठयावर नियंत्रण राहत नाही. पाणी पुरवठयाच्या टॅकरच्या फे–यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी अधिकारी व नगरसेवक सांगतिल अशा ठिकाणी पाणी पुरवठा केला जावा. सर्वसामान्य जनतेच्या सांगण्यावरुन टॅकरद्वारे पाणी पुरवठा केला जावु नये. सध्या शहरात ८० टक्के पाणी पुरवठा सुरळीत आहे. २० टक्के विभागामध्ये पाण्याची समस्या असून तेथे टॅकरद्वारे पाणी पुरविले जाते. ७–७ दिवसापासुन माझ्या प्रभागामध्ये तसेच श्रीमती निता अहूजा, श्री. मोहन साधवानी यांच्या प्रभागामध्ये पाणी येत नाही. तसेच श्रीमती रेखा कृष्णानी यांच्याही घरी पाणी येत नाही. यासाठी एक आठवडाभर वॉटर शेडिंग बंद केले पाहिजे. व मे. श्वेता ट्रान्सपोर्ट या ठेकेदारास कॅम्प नं. १ ते ५ मधील टॅकरद्वारे पाणी पुरवठा करण्याचे काम दिले पाहिजे असे माझे मत आहे.

<u>मा. सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>मे. श्वेता ट्रान्सपोर्ट या ठेकेदाराकडे एवढे टॅकर्स आहेत काय? एखादा टॅकर खराब झाला तर त्याजागी पर्यायी व्यवस्थेसाठी त्याच्याकडे टॅकरची उपलब्धता आहे काय? हे जे चार टॅकर्स पुरवठादार आहेत ते जेवढे टॅकर्स पाणी पुरवठयाकामी वापरतात तेवढे टॅकर्स मे. श्वेता ट्रान्सपोर्टवाल्याकडे आहेत काय? संपुर्ण शहरामध्ये हा एकटा ठेकेदार टॅकरद्वारे पाणी पुरवठा करु शकेल एवढी त्याची क्षमता आहे काय?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> टॅकरच्या फे–यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग हे ठेकेदारास ताकिद देतील ते सांगतील त्याप्रमाणे व त्या विभागातच टॅकरद्वारे पाणी पुरवठा केला जावा. मे. जयराम व मे.विजय वॉटर सप्लायर्स हे ठेकेदार नगरसेवक व अधिकारी यांच्या सांगण्यानुसार टॅकर्स पुरवठा न करता एखादया सर्वसामान्य नागरीकाने त्यांच्या टॅकरच्या ड्रायव्हरला ५० रुपये दिले तर पाहिजे तेथे पाण्याचा टॅकर दिला जातो आणि अशा या प्रकारामुळे टॅकरच्या फे–यांची दिवसेंदिवस वाढ होत आहे. खरोखरच जेथे पाण्याची टंचाई आहे, आवश्यकता आहे तेथेच टॅकरद्वारे पाणी पुरवठा केला पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>पाणी टंचाई असलेल्या सर्व विभागामध्ये टॅकरद्वारे एक सारखा पाणी पुरवठा केला पाहिजे. माझ्या एका नातेवाईकाने सांगितले की, आमच्या विभागामध्ये पाणी येत नाही. मी टॅकरवाल्याला तो विभाग दाखविला व सांगितले की, या ठिकाणी टॅकरद्वारे पुरेसा पाणी पूरवठा केला जावा. परंतु तेथे पाणी पुरवठा न करता टॅकरवाल्याने दुस–याच विभागात पाणी पुरवठा केला. अधिकारी देखिल चुकीची माहिती देवून दिशाभुल करतात.

<u>मा. सभापती :–</u> अधिका–यांच्या कामाचे मी एक उदाहरण देते. माझी बहिण गोल मैदान येथे धिरज अपार्टमेंटमध्ये राहते. त्या इमारतीत पाण्याची फार मोठी समस्या आहे. इमारतीतील लोकांना ती सांगत असे की, माझी बहिण स्थायी समितीची सभापती आहे व आता महापौरही झाली आहे. तिने सांगितले तर पाहिजे तेवढा टॅकरद्वारे पाणी पुरवठा केला जावू शकेल. टॅकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी ती दररोज आमच्याकडे फोन करत असते. एक दिवशी आमदार साहेबांना खुप राग आला सकाळी ७ वाजता टॅकरवाल्यास फोन केला व विचारणा केली की, त्या विभागामध्ये पाण्याचा टॅकर पाठविला होता किंवा नाही? तर अधिका–यांनी सांगितले की, त्या इमारतीमध्ये पाणी पुरवठा व्यवस्थित होतो. आम्हांला आश्चर्य वाटलें की, बहिण आपल्याला असे का सांगते. त्यानंतर आपल्या महापालिकेतील पाणी पुरवठा विभागातील अधिका–यांना बोलावुन सांगितले की, त्या ठिकाणी जावुन पहा की, तेथे पाणी येत आहे किंवा नाही? अधिकारी तेथे जावुन पाहतात तर तेथे पाणी येत होते. त्या इमारतीच्या वॉचमनला विचारले पाणी येते किंवा नाही? त्याने सांगितले

पाणी बरोबर येते. परंतु त्यानंतर आम्ही तेथे जावुन बघितले तर पाण्याची एकदम बारीक धार येत होती. पाण्याला अजिबात दाब नव्हता. अधिकारी अशाप्रकारे दिशाभुल करतात.

<u>मा. सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>मे. विजय वॉटर सप्लायर्स हा ठेकेदार बोरवेअलचे पाणी टॅकरद्वारे पुरवत असतो. नंतर तेच टॅकर पुन्हा आपल्या कामासाठी वापरतात.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मे. श्वेता ट्रान्सपोर्ट या ठेकेदारास कॅम्प नं. १ ते ५ मध्ये टॅकरद्वारे पाणी पुरवठा करण्याचे काम दिले जावे कारण की तो कधीही टॅकर बंद करत नाही.

मा. सदस्या श्रीमती मोना वनवारी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>मा. सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>मे. गायत्री वॉटर सप्लायर्स, मे. जयराम वॉटर सप्लायर्स, मे. विजय वॉटर सप्लायर्स यांचे जेवढे टॅकर्स आहेत तेवढे टॅकर्स पाणी पुरवठयाकामी श्वेता ट्रान्सपोर्ट वाल्यांनी लावले पाहिजे. त्यापेक्षा कमी टॅकर्सची संख्या असता कामा नये.

<u>काही सदस्य :–</u> पास–पास............

<u>मा. सभापती :–</u>सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

<u>प्रस्तावना:–</u>

<u>विषय क्र. ४ :–</u> उल्हासनगर शहरात टंचाईग्रस्त भागात टॅकरने पाणी पुरवठा करणेकामी न्युनतम दराचे निविदाकार मे. श्वेता ट्रान्सपोर्ट, मे. जयराम वॉटर सप्लाय, मे. गायत्री वॉटर सप्लाय व मे. विजय वॉटर सप्लाय यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्राची भौगोलिक रचना उंच सखल आहे. तसेच उल्हासनगर महानगरपालिकेची ब्रिटिश कालीन पाणी पुरवठा योजना (जूनी) आहे. पाणी वितरण व्यवस्था अत्यंत जुनी असल्यामुळे व पाण्याचा दाब कमी असल्यामुळे उंचावरील व शेवटच्या टोकाला पाणी पुरवठा होत नाही. परिणामी सदर भागातील नागरीकांची पाण्याची गरज भागविण्याकरीता पर्यायी व तात्पूर्ती व्यवस्था म्हणुन काही भागात टॅकरने पाणी पुरवठा केला जातो. सदर टॅकरद्वारे पाणी पुरवठा करण्याकरीता दररोज सरासरी १५० खेपा करण्यात येतात. महानगरपालिकेच्या स्थायी समितीने मंजुर केलेल्या ठराव क्र. ८८, दिनांक ११.८.२००४ नुसार टॅकरद्वारे पाणी पुरवठा करण्याकरीता रितसर मोहरबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर जाहिरातीतील नमून्यानुसार खालील नमूद केलेल्या ठेकेदाराने मोहरबंद निविदा सादर केल्या होत्या. त्या नियमानुसार दिनांक ८.२.२००५ रोजी कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचे कार्यालयात मुख्य लेखा परिक्षक व संबंधीत ठेकेदार यांच्या उपस्थितीत उघडण्यात आल्या. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. श्वेता ट्रान्सपोर्ट | अंदाजित प्राकलनाच्या २० टक्के जादा |
| २. | मे. जयराम वॉटर सप्लाय | अंदाजित प्राकलनाच्या २२ टक्के जादा |
| ३. | मे. गायत्री वॉटर सप्लाअर्स | अंदाजित प्राकलनाच्या १९.७६ टक्के जादा |
| ४. | मे. एस.टी. तिवारी | अंदाजित प्राकलनाच्या २१ टक्के जादा |
| ५. | मे. विजय वॉटर सप्लायर्स | अंदाजित प्राकलनाच्या २२ टक्के जादा |

तसेच मे. शिव शंकर ॲण्ड कंपनी मे. ए.एम. रामचंदानी, व मे. राजुसिंग मंगलसिंग यांच्या निविदा योग्य कागदपत्रा अभावी उघडण्यात आल्या नाहीत.

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार मे. गायत्री वॉटर सप्लाअर्स यांचे दर सर्वात कमी असल्याने त्यांना वाटाघाटीकरीता दिनांक ७.३.२००५ रोजी बोलविण्यात आले होते. सदर बैठकीत मा. आयुक्त सो. यांनी त्यांना रुपये १७०/— प्रति टॅंकर या दराने काम करण्यास तयार असल्यास त्याबाबतचे पत्र देणे बाबत सांगितले. सदरच्या दरानुसार मे. गायत्री वॉटर सप्लायर्स काम करण्यास तयार नसल्याने त्यांनी कळविले. त्यानंतर मा. आयुक्त सो. यांच्या आदेशानुसार सर्व ठेकेदाराकडुन पुनश्च मोहरबंद लिफाप्यात दर मागविण्यात आले.

सदर मोहरबंद लिफाफे दिनांक ३०.५.२००५ रोजी मुख्य लेखा परिक्षक, कार्यकारी अभियंता (पा.पु.) व ठेकेदारांच्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आले. सदर लिफाप्यातील दर सर्व ठेकेदारांनी एकच रुपये २०२/— प्रति टॅंकर असे दिलेले आहेत. त्यानंतर त्यांना पुनश्च पत्र देवून रुपये १७०/— या दराने काम करण्यास तयार आहेत किंवा कसे असे विचारणा केली असता त्यावर त्या ठेकेदारांनी खालील प्रमाणे दर कळविले.

| | |
|---|---|
| १. मे. श्वेता ट्रान्सपोर्ट | दर २०२/— प्रति टॅंकर |
| २. मे. जयराम वॉटर सप्लाय | दर २०२/— प्रति टॅंकर |
| ३. मे. गायत्री वॉटर सप्लाअर्स | दर २०२/— प्रति टॅंकर |
| ४. मे. विजय वॉटर सप्लायर्स | दर २०२/— प्रति टॅंकर |
| ५. मे. एस.टी. तिवारी | दर २०५/— प्रति टॅंकर |

मे. एस.टी. तिवारी वगळता सर्व ठेकेदारांनी रुपये २०२ /— प्रति टॅंकर या दराने काम करणे बाबतचे पत्र दिले आहे.

सध्या मंजूर असलेला निविदेचा दर प्रति टॅंकर रुपये १७०/— इतका असून या कामाचा कार्यादेश दिनांक १५.६.२००३ रोजी देण्यात आला होता. त्यावेळी डिझेलचा दर रुपये २५.९८ इतका होता. सद्यस्थितीत डिझेलचा दर रुपये ३८.४६ इतका असून ही वाढ ४८ टक्के झाल्याचे दिसून येते.

डिझेलची झालेली दरवाढ लक्षात घेता वरील निविदा धारकांनी दिलेले दर रुपये २०२/— न्युनत्तम आहेत. खालील चारही ठेकेदारांनी समान दर दिलेले असल्याने काम समप्रमाणात विभागून देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १. मे. श्वेता ट्रान्सपोर्ट | २. मे. जयराम वॉटर सप्लाय |
| ३. मे. गायत्री वॉटर सप्लाअर्स | ४. मे. विजय वॉटर सप्लायर्स |

सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजूरीसाठी सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ५५</u> <u>दिनांकः—३१/१०/२००५</u>

सुचकाचे नाव :— श्री राजु जग्यासी
अनुमोदकाचे नाव :— श्री गणपत एडके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरात टंचाईग्रस्त भागात टॅंकरने पाणी पुरवठा करणेकामी प्रशासनास वाटाघाटीअंती खालील कारणामुळे न्युनतम दराचे निविदाकार मे. श्वेता ट्रान्सपोर्ट यांचेशी प्रतिखेप रु २०२/— या दराने पाणी पुरवठा करणे कामी संविदेस मान्यता देत आहे.

*<u>कारण :—</u>*

गतअनुभवाप्रमाणे इतर ठेकेदार टॅंकरने पाणी पुरवठा करण्याचे काम सुरळितपणे न करता सदर कामात कुचराई करतात.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–** आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य श्री. नाना पवार यांच्या प्रभागामध्ये आलेल्या पुराच्या पाण्यामुळे तेथिल दोन सार्वजनिक शौचालय पुर्णपणे तुटली आहेत. त्याठिकाणी दोन १०–१० शिटचे नविन सार्वजनिक शौचालय बांधणे अत्यंत जरुरीचे आहे. प्रशासनाच्या वतीने आयत्यावेळचा विषय म्हणुन याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे ठेवला जावा.

**मा. आयुक्त :–** प्रशासनातर्फे आजच्या सभेत आयत्यावेळचा विषय म्हणुन एक प्रस्ताव आणला आहे, आपली संमती असल्यास तो आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करुन घेता येईल.

**मा. सभापती:–** सदरचा विषय सर्वानुमते आयत्यावेळचा विषय म्हणुन दाखल करुन घेण्यात येत आहे.

**मा. सचिव :–** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

---

## आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. ५ :–** उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गतचे दोन विविध कामीचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

---

**मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :–** गोषवारा वाटप केला नाही. माझ्या प्रभागात सुध्दा सार्वजनिक शौचालयांचे नुकसान झाले आहे. तेथेही नविन सार्वजनिक शौचालय बांधणे आवश्यक आहे.

**काही सदस्य :–**पास–पास..........

**मा. सभापती :–** सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

## आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. ५ :–** उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गतचे दोन विविध कामीचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

**प्रस्तावना:–**

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली काम करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् 2005-2006 च्या निधीतून काम करण्यास प्राकलने तयार केलेली आहे.

| अ.क्र | कामाचे ठिकाण | प्राकलनीय किंमत |
|---|---|---|
| 1 | उल्हासनगर-3 येथील प्रभाग क्र. 2 मधील सम्राट अशोक नगर मधील वाघबाई यांचे घराजवळ 10 सिटचे शौचालय बांधणेबाबत. | 4,99,888/- |

| | | |
|---|---|---|
| 2 | उल्हासनगर -3 येथिल प्रभाग क्र. 2 सम्राट अशोक नगर येथे महादेव सोनवणे यांच्या घराजवळ 10 सिटचे शौचालय बांधणे बाबत. | 4,99,888/- |

उपरोक्त नमुद केलेल्या कामाच्या जागेवर जाऊन कनिष्ठ अभियंता व उप-अभियंता यांनी पहाणी करुन सदर प्राकलन तयार केले आहे. तरी सदर काम करुन घेणेसाठी प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळण्याकरीता स्थायी समिती सभेपुढे ठेवण्याकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ५६ दिनांकः–

३१/१०/२००५

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :– श्रीमती मोना वनवारी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उक्त दोन जागी १० सिटचे शौचालय बांधणेकामीचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सायंकाळी ५–०५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:–२० डिसेंबर, २००५

## दि. २०.१२.२००५ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा मंगळवार दिनांक २०.१२.२००५ रोजी सांयकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

*१४. मा. सभापती – श्रीमती ज्योती सुरेश (पप्पु)कालानी*

१५. श्री. वनवारी किशोर नारायणदास
३. श्री. एडके गणपत गोविंद
१८. श्री. गायकवाड सुरेश नामदेव
१९. श्रीमती जावळे संगिता रमेश
२०. श्रीमती वनवारी मोना अशोक
२१. श्री. साधवानी मोहन रहंदोमल
२२. श्री. सोनवणे नथु काशिराम
९. श्रीमती कृष्णानी रेखा हरेश
१०. श्री जग्यासी राजु किशनचंद
११. श्री. जाधव सुरेश मधुकर
१२. श्रीमती मसंद माया घनश्यामदास
१३. श्री मोकल चंदाराम विठोबा
१४. श्री वाघे श्यामु बाबु
१५. श्रीमती ससाणे लक्ष्मी रोहिदास
१६. श्री. बठिजा संजय रामचंद्र

सायंकाळी ४–५० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>मा. सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

<u>विषय क्र. १ :–</u> मागील सभेचे दिनांक ३१/१०/०५ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>मा. सभापती :–</u> मागील सभेचे दिनांक ३१.१०.२००५ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

<u>मा. सचिव :–</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

<u>विषय क्र.२ :–</u> कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करुन घेणा–या महापालिका क्षेत्रातील लाभार्थ्यांस हंडा व कळशी देणेकामी मान्यता देणे.

---

<u>मा. सदस्य श्री मोहन साधवानी :–</u> विषय काय आहे? ते समजावुन सांगा.

<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी :–</u> आम्हाला हंडा कळश्यांचे नमुने दाखवा.

<u>मा. सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u> तुम्ही याची माहिती कशी जमा करता? वाटपासाठी काय निकष आहेत?

<u>वैद्यकिय आरोग्य अधिकारी (डॉ.के.आर.खरात) :–</u> महापालिकेची आठ नागरी आरोग्य केंद्रे आहेत, तसेच महापालिकेची एक डिस्पेंसरी आहे. मध्यवर्ती रुग्णालय व कॅम्प नं ४ येथील रुग्णालयामध्ये या शस्त्रक्रिया केल्या जातात. त्यानंतर आम्ही तेथुन माहिती जमा करतो. आपल्याला नेमुन दिलेला इष्टांक आपण पुर्ण करु शकलेलो नाही. त्यामुळे लोकांना प्रोत्साहन मिळणेसाठी ही योजना सुरु केलेली आहे. मागील वर्षी मागविलेला काही माल भांडार विभागात शिल्लक आहे. त्यातुन देखिल वाटप करु शकतो. तसेच आवश्यकता भासल्यास नवीन खरेदी भांडार विभागामार्फत करण्यात येईल. आपणांस नमुना पहायचा असल्यास तो भांडार विभागात पाहु शकता.

मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :— २००५ ला जी खरेदी केली होती, त्यापैकी किती वाटप केले? तसेच किती शिल्लक आहे?

मा. सभापती :— आपण अजुन काय काय देतो?

वैद्यकिय आरोग्य अधिकारी (डॉ.के.आर.खरात) :— आपण फक्त हंडा व कळशी देतो.

मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :— आम्हाला आधी नमुना दाखवा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— हा विषय पास करा परंतु आम्हाला नमुना देखिल दाखवा.

काही सदस्य :—पास, पास ......

मा. सभापती :— सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

विषय क्र.२ :— कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करुन घेणा—या महापालिका क्षेत्रातील लाभार्थ्यांस हंडा व कळशी देणेकामी मान्यता देणे.

प्रस्तावना:—

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक. १/१/२००५ ते दिनांक.३१/३/२००५ या कालावधीत कुटूंबकल्याण शस्त्रक्रिया मोहिम उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात राबविण्यात आली. सदर मोहिमेअंतर्गत कुटुंबकल्याण शस्त्रक्रिया करुन घेणा—या लाभार्थींना प्रत्येकी रुपये २५०/— इतक्या रक्कमेची हंडा व कळशी वाटप महानगरपालिकेतर्फे करण्यात आले.

सदर प्रोत्साहनात्मक योजनेसाठी रुपये ५,००,०००/— मा. स्थायी समिति ठराव क्र. १५७ दिनांक २७/१/२००५ अन्वये मंजुरी देण्यात आली होती. त्याअनुषंगाने भांडार विभागाने निविदा सुचना प्रसिध्द करुन एकुण २००० भांडी खरेदी करण्यास मान्यता मिळवली असून त्यापैकी एकुण ३०० भांडी कुटुंबकल्याण शस्त्रक्रिया करणा—या लाभार्थींना देण्यात आली आहेत. तरी सन २००५—२००६ करीता २४३० कुटुंबकल्याण शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट असून अदयाप १५४३ कुटुंबकल्याण शस्त्रक्रिया होणे बाकी आहे. त्याकरीता रुपये २५०/— याप्रमाणे एकुण ३,८५,७५०/— (रुपये तीन लाख पंच्याऐंशी हजार सातशे पन्नास मात्र) एवढा खर्च अपेक्षित आहे. तरी कृपया उर्वरीत कुटुंबकल्याण शस्त्रक्रिया करुन घेणा—या महानगरपालिका क्षेत्रातील लाभार्थ्यांना हंडा व कळशी देण्याचे प्रस्तावित करणेत येते. तरी सदर प्रस्तावास मा. स्थायी समितीची प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळावी, ही विनंती.

स्थायी समिती ठराव क्र. ५७ दिनांक:—२०/१२/२००५

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :— श्रीमती संगिता जावळे

ही स्थायी समिति वरील प्रस्तावनेनुसार सन २००५—०६ मध्ये कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करुन घेणा—या महापालिका क्षेत्रातील लाभार्थ्यांस हंडा व कळशी देणेकामी मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

**मा. सचिव :–** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र.३ :–** मुख्य लेखा परिक्षकाकडुन आलेला माहे ऑक्टोबर २००५ पर्यंतचा जमा खर्चाचा अहवाल व त्यात विधी अग्राहय प्रकरणी योग्य आदेश करणे.

---

**मा. सदस्य श्री किशोर वनवारी :–** या अहवालानुसार वसुली कमी असल्याचे दिसुन येते. वास्तविक पाहता प्रशासनाने वसुली जास्त होण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे, परंतु तसे होत नाही. यावर्षी तर आम्ही बजेट देखिल कमी रकमेचे केले आहे. त्यामुळे वसुलीची आकडेवारी देखिल कमी आहे. तरीदेखिल जकात, मालमत्ता कर व पाणीपट्टीची वसुली कमी असल्याचे दिसुन येते. अजुनपर्यंत तर कराची व पाणीपट्टीची बिले देखिल निघाले नाहीत.

**कार्यकारी अभियंता, पा.पु (श्री.आर.आर.सावकारे ) :–** दिवाळीला आम्ही बिगर घरगुती वापर करणा–यांना बिले दिलेली आहेत.

**मा. सदस्य श्री मोहन साधवानी :–** कर विभागाचे काम कोण पाहते? कर वसुली फारच कमी आहे.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–** ब–याच कर्मचा–यांनी पैसे भरलेले नाहीत. यासाठी संबधित विभागप्रमुखांनी देखिल त्यांच्या विरुध्द् काहीही कारवाई केलेली नाही हे अहवालावरुन दिसुन येते.

**मुख्य लेखा परिक्षक (श्री.एस.के.बनसोडे ) :–** ज्या कर्मचा–यांनी पैसे भरलेले नाहीत त्यांना विभागप्रमुखांनी पैसे भरण्यासाठी आदेश देणे आवश्यक आहे. आम्ही अहवालामध्ये सर्वांची नांवे व सविस्तर माहिती दिलेली आहे.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–** अहवालावर विचार करुन पुढीलप्रमाणे आदेश देण्यात यावेत.

१) महापालिका उत्पन्नात वाढ होण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करावी.
२) उपरोक्त कर्मचा–यांकडुन अपहार केलेल्या रकमेचा व्याजासह भरणा करुन घेण्यात यावा.
३) उपरोक्त कर्मचा–यांची त्वरित विभागीय चौकशी करण्यात यावी.

४) आयुक्तांना खात्री वाटल्यास आवश्यकतेनुसार दोषी कर्मचा–यांविरुध्द् पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात यावा.
५) मुख्य लेखा परिक्षकांनी सूचना दिल्यानंतरही ज्या विभागप्रमुखांनी दोषी कर्मचा–यांविरुध्द् काहीही कारवाई केलेली नाही अशा विभागप्रमुखांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात यावी.

**मुख्य लेखा परिक्षक (श्री.एस.के.बनसोडे ) :–** ज्या कर्मचा–यांनी पैसे भरलेले नाहीत त्यांची नांवे विभागप्रमुखांना कळवु व त्यानंतर त्यांना पैसे भरण्यासाठी वेळ देवु. वेळेत पैसे भरले नाहीत तर त्यांच्या विरुध्द् कारवाई करण्यात यावी.

**काही सदस्य :–**पास, पास ......

**मा. सभापती :–** सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र.३ :–** मुख्य लेखा परिक्षकाकडुन आलेला माहे ऑक्टोबर २००५ पर्यंतचा जमा खर्चाचा अहवाल व त्यात विधी अग्राहय प्रकरणी योग्य आदेश करणे.

**प्रस्तावना:–**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसार माहे ऑक्टोंबर २००५ चा जमा खर्चाचा अहवाल.

वित्तीय वर्ष २००५–२००६ च्या "अ" व "क" अर्थसंकल्पात अंदाजित केलेले उत्पन्न व माहे ऑक्टोंबर २००५ मध्ये प्राप्त झालेले उत्पन्न हे पुढे दर्शविलिले आहे.

| अर्थसंकल्प | अपेक्षित जमा रूपये |
|---|---|
| १ | २ |
| "अ" | १२९,१९,९५,००० |
| "क" | ३३,६७,५५,००० |
| एकूण | १६२,८७,५०,००० |

अपेक्षित जमेमध्ये खालील बाबी अंर्तभूत आहेत.

| अ. क्र. | बाब | अपेक्षित जमा रूपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | महसूल जमा | १४३,५०,३१,००० |
| २ | शासकीय अनुदान | ७,०९,००,००० |
| ३ | अनामत रकमा/दायित्वे इ. | १२,११,५०,००० |
| | एकूण | १६२,७०,८१,००० |
| | प्रारंभिक शिल्लक | १६,६९,००० |
| | एकुण :– | १६२,८७,५०,००० |

वित्तीय वर्ष २००५–२००६ च्या अर्थसंकल्पात महसूल जमा रक्कम रूपये १४३,५०,३१,०००/– अपेक्षित धरलेली आहे. माहे ऑक्टोंबर २००५ पर्यंत समप्रमाणात रूपये ८३,७१,०२,०००/– महसूल उत्पन्न अपेक्षित होते. आरंभिची शिल्लक वगळता प्रत्यक्षात रू. ४४,८५,२८,०००/– ( एकूण महसूल जमेच्या ३१. २५ टक्के) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे ऑक्टोंबर २००५ पर्यंत अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष अर्थ संकल्प "अ" | | अंदाजित | माहे ऑक्टोंबर २००५ पर्यंत अपेक्षित | प्रत्यक्ष जमा (रू.१०००/–पुर्णाकांत) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | जकात | ८०,५०,००,००० | ४६,९५,८३,००० | ३८,५१,०५,००० | ८२.०० |
| २ | मालमत्ता कर | २६,५२,००,००० | १५,४७,००,००० | २,२५,१७,००० | १४.५५ |
| ३ | एम्. आर. टी. पी. वसूली | ९९,१०,००० | ५७,८१,००० | ३३,४०,००० | ५७.७७ |
| ४ | मार्केट उत्पन्न | १०,००,००० | ५,८३,००० | — | — |
| ५ | रूग्णालय फी | ८५,००० | ५०,००० | ३२,००० | ६४.०० |
| ६ | परवाना व इतर फी | २,३३,३५,००० | १,३६,१२,००० | २६,७०,००० | १९.६१ |
| ७ | संकीर्ण | ९२,४६,००० | ५३,९४,००० | १,३८,३८,००० | २५६.५४ |
| ८ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | २,२४,५०,००० | १,३०,९६,००० | १३,२२,००० | १०.०९ |
| | एकूण–अ | १,१३,६२,२६,००० | ६६,२७,९९,००० | ४२,८८,२४,००० | ६४.६९ |
| | अर्थसंकल्प "क" | | | | |
| १ | पाणी बिले वसुली | २४,००,००,००० | १४,००,००,००० | १,४४,७४,००० | १०.३३ |
| २ | मालमत्ता कर | ५,४६,००,००० | ३,१८,५०,००० | ४५,३२,००० | १४.२२ |
| ३ | परवाना/इतर फी | ४१,०५,००० | २३,९५,००० | ६,७५,००० | २८.१८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | संकीर्ण | १,००,००० | ५८,००० | २३,००० | ३९.६५ |
| | एकुण “क” | २९,८८,०५,००० | १७,४३,०३,००० | १,९७,०४,००० | ११.३० |
| | एकुण “अ” व “क” | १,४३,५०,३१,००० | ८३,७१,०२,००० | ४४,८५,२८,००० | ५३.५८ |

“अ” व “क” अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रू. १,६२,८७,५०,०००/—(प्रारंभिक शिल्लकेसह) अपेक्षित केलेले आहे. प्रत्यक्षात माहे ऑक्टोंबर २००५ मध्ये रू. ५०,१०,९४,५७२/— (प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे. उत्पन्नात वाढ होण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करणे आवश्यक आहे. पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पनाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही.

खर्च :—

माहे एप्रिल २००५ ते ऑक्टोंबर २००५ या कालावधीमध्ये रू. ४६,९९,९५,७४०/— खर्च लेखांकित झालेला आहे.
खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते तसेच लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकांचे प्रदान झालेले आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका—याच्या पूर्व मंजूरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदी अधिन आहे.

<u>निवृत्ती वेतन प्रकरणे :—</u> माहे ऑक्टोंबर २००५ मध्ये महापालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या/निधन पावलेल्या कर्मचा—यांची ४३ निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

<u>लेखा परिक्षणामध्ये निर्दशनास आलेल्या गंभीर बाबी (मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम १०६ (१) अ च्या तरतुदीप्रमाणे :—</u>

## मालमत्ता कर विभाग

विषय :— <u>घरपट्टीची वसूल केलेली रक्कम रूपये ५३९७/—महापालिका कोषागारात जमा न केल्याबाबत.</u>

कर विभागाचे सन २००४—२००५ चे लेखा परिक्षण केले असता, खालील कर्मचा—यांकडून रक्कम रूपये ५३९७/— (रूपये पाच हजार तीनशे सत्त्याण्णव फक्त) अपहार झाल्याचे दिसून आले आहे.
१) श्री. जी. आर. सावळे (लिपिक) याने घरपट्टी करापोटी रक्कम रूपये ८४५/—(रूपये आठशे पंचेचाळीस फक्त) पावती क्रमांक १७४३७३ दिनांक १४/०२/२००५ अन्वये स्वीकारली असून सदर रक्कम अद्याप महापालिका कोषागारात जमा केलेली नाही.
२) श्री. महेश उमाप (लिपिक) यांनी घरपट्टी करापोटी रक्कम रूपये २२४९/—(रूपये दोन हजार दोनशे एकोणपन्नास फक्त) पावती क्रमांक १४४६०९ दिनांक २८/०२/२००५ तसेच त्यांनी रक्कम रूपये २३०३/—(रूपये दोन हजार तीनशे तीन फक्त) पावती क्रमांक १९४६१८ दिनांक १७/०३/२००५ अन्वये संबंधित घरमालकाकडून वसूल केली आहे. तथापि सदर एकूण रक्कम रूपये ४५५२/—(रूपये चार हजार पाचशे बावन्न फक्त) अद्याप महापालिका कोषागारात जमा केलेली नाही. म्हणजेच सदर रक्कमेचा त्यांनी अपहार केल्याचे दिसून येते.

या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/करवि/लेपवि/असज्ञा/१२१/०५ दिनांक १३/१०/०५ अन्वये सदर बाब कर निर्धारिक व संकलक व उप—आयुक्त (शहर) उल्हासनगर महानगरपालिका यांचे निर्दशनास आणून दिले असून सदर रक्कम संबंधित लिपिकाकडून तीन दिवसाचे आत वसूल करून महापालिकेच्या कोषागारात जमा करणे बाबत सूचना दिलेली आहे. तथापि अद्याप त्यांचेकडून कोणतीही कारवाई केल्याचे अनुपालन अहवाल लेखा परिक्षण विभागास प्राप्त झालेला नाही.

<u>माहे फेब्रुवारी २००५ ते सप्टेंबर २००५ महापालिकेच्या सर्वसाधारण महासभेच्या विषय सूचिमध्ये समावेश न झालेल्या गंभीर बाबी बाबत:—</u>

महापालिकेचा मागील महिन्याचा मासिक जमा खर्चाचा अहवाल पुढील महिन्यात दरमहा स्थायी समितीस सादर केला जातो. लेखा परिक्षण विभागाने लेखा परिक्षणामध्ये आढळलेल्या गंभीर बाबींचा सदर अहवालामध्ये वेळोवेळी समावेश केलेला आहे व सदर अहवालाच्या दोन प्रती दर महा स्थायी समितीस सादर केल्या आहेत. परंतु स्थायी समितीकडून त्यापैकी एक प्रत सचिव कार्यालयास प्राप्त न झाल्यामुळे सदर गंभीर बाबींचा समावेश

महापालिकेच्या महासभेच्या सर्वसाधारण विषय सूचिमध्ये समावेश झालेला नाही. तरी कृपया सदर बाबींचा पुढील कार्यवाहीसाठी पुन्हा या अहवालात समावेश करण्यात येत आहे.

सदरच्या बाबी खालीलप्रमाणे :—

**माहे फेब्रुवारी २००५**

मालमत्ता कर विभाग

विषय :— रू.२३४०/— चा अपहार श्रीम. मीना शितलानी रोखपाल

आपल्या विभागाचे सन २००३—२००४ या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षणाचे वेळी असे निदर्शनास आले की, श्री. अे. एच्. परमार यांनी दिनांक १८/६/०३ रोजी गोवर्धन प्रितम बॅरेक नं. ११७६, रू.नं. १८, शॉप नं. १, पवई चौक उ.न. ३ यांचे कडून पुस्तक कमांक ८६९ मधील पावती कमांक ०८६८४८ अन्वये रू. २३४०/— (रूपये दोन हजार तीनशे चाळीस फक्त) स्विकारून सदरची रक्कम त्यांनी त्याच दिवशी कर विभागातील रोखपाल श्रीम. मिना शितलानी यांचेकडे जमा करून स्वाक्षरी घेतल्याचे दिसत आहे. परंतु श्रीम. मिना शितलानी यांनी सदरची रक्कम रू.२,३४०/— ही महापालिका कोषागारात भरणा केलेली नाही. तरी सदर रकमेचा सुकृत दर्शनी अपहार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी याबाबत योग्य ती शहनिशा करून खुलासा करावा. अन्यत: सदरची रक्कम संबंधितांकडून तात्काळ वसूल करून महापालिका कोषागारात जमा करून तसा अहवाल लेखा परिक्षणास द्यावा. असे या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/कर विभाग/असज्ञा/११७/०५ दिनांक १७/०२/२००५ अन्वये कर निर्धारक व संकलक, उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि सदर प्रकरणी कोणतीही कारवाई केल्याचे अनुपालन अद्याप प्राप्त झालेले नाही.

विषय :— न वटलेल्या धनादेशाची रक्कम रू.३४४५/—खातेदाराकडून वसूल करणेबाबत.

आपल्या विभागाचे सन २००४—२००५ या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण करताना असे निर्दशनास आले की, खालील टॅक्स वसुली लिपिक यांनी खालील प्रमाणे मालमत्ता कराची रक्कम धनादेशाव्दारे स्विकारली असून सदर धनादेश न वटता परत येऊनही व त्याबदल्यात रोख रक्कम वसूल केलेली नसतानाही खातेदाराच्या खात्यावर सदर रक्कम जमा केल्याची संगणकांत नोंद घेतली आहे.

| अ.क्र. | पुस्तक कमांक | दिनांक | रक्कम | धनादेश कमांक व दिनांक | टॅक्स वसुली काराचे नांव | धनादेश न वटता परत आल्याची दिनांक | पावती कमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | १६४१ | ५/११/०४ | ३४४५ | ८१६१०३ | श्री. एम. एम. पंजाबी | ४/८/०४ | १६४०७१ |

तरी सदर रक्कम रू.३४४५/—(रूपये तीन हजार चारशे पंचेचाळीस फक्त) धनादेश वटलेला नसताना खातेदाराच्या खात्यावर संगणकामध्ये रक्कम जमा कशी केलेली दाखविली आहे, याचा खुलासा करावा. तसेच न वटलेल्या धनादेशाच्या बदल्यात रोख रक्कम संबंधित खातेदाराकडून तात्काळ वसूल का करण्यात आली नाही. याबाबत खुलाशासह रक्कम त्वरीत वसूल करून वसूलीचा अहवाल लेखापरिक्षण विभागास द्यावा. असे या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/कर विभाग/असज्ञा/११६/०५ दिनांक १७/०२/२००५ अन्वये कर निर्धारक व संकलक, उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आलेले आहे. तथापि त्यांच्याकडून कोणतीही कारवाई केल्याचे अनुपालन या विभागास अद्याप प्राप्त झालेले नाही.

**माहे मार्च २००५**

कर विभाग

विषय :— श्री अशोक चांदवानी वसूली लिपिक कर विभाग यांनी अपहरित केलेली रक्कम रू. १३०००/— बाबत.

आपल्या विभागातील वसूली लिपिक श्री. अशोक चांदवानी यांनी पावती पुस्तक कमांक १६४० मधील पावती कमांक १६३९८१ दिनांक १६/०७/०४ अन्वये रू. १३०००/— (रू. तेरा हजार मात्र) खातेदार श्री. थारोमल डी. रोहरा (खाते कमांक वार्ड नं.३०/२५७७ अनुक्रमांक ३०/२३६८) यांचेकडून वसूल केली असून सदरच्या रकमेचा भरणा महानगरपालिका कोषागारात केलेला नाही.

त्यामुळे त्यांनी सदर रकमेचा कायमस्वरूपी अपहार केल्याचे दिसून येत आहे. तरी सदरची रक्कम संबंधितांकडून तात्काळ वसूल करून महापालिकेच्या कोषागारात जमा करावी.

तसेच सदर रकमेच्या अपहाराबद्दल संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्याबाबत अहवाल मा. आयुक्त यांना सादर करण्यात यावा व तसा अहवाल लेखा परिक्षण विभागास त्वरीत द्यावा. असे या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/कर विभाग/असज्ञा/११८/०५ दिनांक २६/०४/२००५ अन्वये कर निर्धारक व संकलक, उप—आयुक्त(शहर) उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि संबंधितांकडून वसूली केले बाबत कोणतीही कारवाई केल्याचे अनुपालन या विभागास अद्याप प्राप्त झालेले नाही.

## माहे एप्रिल २००५

### पाणी पुरवठा विभाग

**आक्षेप क्र. १ श्री. टी. एस्. राऊत(मजूर) यांनी पाणीपट्टी वसूलीची रक्कम रू.३५,२८५/— चा अपहार केल्याबाबत.**

पाणी पुरवठा विभागाने श्री. टी. एस्. राऊत(मजूर) यांस पाणीपट्टी वसुली लिपिकाचे काम देण्यात आले होते. माहे मे २००२ ते माहे आक्टोबर २००३ या कालावधीत पाणीपट्टीच्या देयकापोटी जमा केलेल्या रकमेपैकी रक्कम रू.३५,२८५/—(रूपये पस्तीस हजार दोनशे पंच्याऐंशी फक्त) अद्याप श्री. राऊत यांनी महापालिका कोषागारात जमा केलेली नाही. त्यामुळे त्यांचेकडून सदर रक्कम एक रकमी वसूल करून महापालिका कोषागारात जमा करणेबाबत तसेच सदर रक्कम भरणा करीपर्यंतच्या कालावधीसाठी द.सा.द.शे. १८ टक्के दंडनिय व्याजाची वसूली त्यांच्याकडून करावी. तसेच सदर रकमेचा अपहार केल्याप्रकरणी त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यासाठी मा. आयुक्त यांच्याकडे प्रस्ताव दाखल करणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/१२६ दि.२९/४/२००५ अन्वये कार्यकारी अभियंता व उप अभियंता(देयक) पााणी पुरवठा विभाग यांना कळविण्यात आले आहे. तथापि संबंधितांकडून वसूली केले बाबत कोणतीही कारवाई अनुपालन या विभागास अद्याप प्राप्त झालेले नाही.

**आक्षेप क्र. २ श्री. एन्.ए. डोंगरे(मजूर) पाणीपट्टी वसूलीची रक्कम विलंबाने भरल्यामुळे दंडनिय व्याजाची रक्कम रू.४७५०/— वसूल करणेबाबत.**

पाणी पुरवठा विभागातील श्री. एन्. ए. डोंगरे(मजूर) यांनी माहे एप्रिल २००१ ते डिसेंबर २००१ या कालावधीत वसूल केलेल्या रक्कमा ७ ते १४ महिन्यानंतर महापालिका कोषागारात जमा केल्या आहेत. वास्तविक पाहता श्री. डोंगरे यांनी पाणीपट्टी वसूलीच्या रकमा ज्या दिवशी वसूल केल्या त्याच दिवशी किंवा दुस—या दिवशी महापालिकेच्या कोषागारात जमा करणे आवश्यक होते. तथापि त्यांनी तसे न केल्यामुळे त्यांनी महापालिकेच्या रकमेचा तात्पुरत्या स्वरूपाचा अपहार केल्याचे दिसून येते. त्यामुळे विलंबाने भरणा केलेल्या रकमेवर द.सा.द.शे. १८ टक्के दराने व्याजाची रक्कम रू.४७५०/—(रूपये चार हजार सातशे पन्नास फक्त) त्यांच्याकडून वसूल करून महापालिका कोषागारात भरणा करणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/१२८/०५ दि.२९/४/२००५ अन्वये कार्यकारी अभियंता व उप अभियंता (देयक) पाणी पुरवठा विभाग यांना कळविण्यात आले आहे. तथापि संबंधितांकडून वसूली केले बाबत कोणतीही कारवाई केल्याचे अनुपालन या विभागास अद्याप प्राप्त झालेले नाही.

## माहे जुलै २००५

### पाणी पुरवठा विभाग

**मुद्दा क्र. १ :— पाणी पट्टी बिलाची रक्कम विलंबाने भरल्याने व्याजाची कमी वसूली केलेली रक्कम रूपये ७६,०९८/— वसूल करणे बाबत.**

पाणी पुरवठा विभाग उल्हासनगर — ५ कार्यालयाचे सन २००२—२००४ या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षण केले असता असे निर्दशनास आले की, एकूण ८६ पाणीपट्टी बिल ग्राहकानी पाणीपट्टी बिलाची रक्कम विलंबाने भरल्यामुळे त्यांचेकडून दर साल दर शेकडा रूपये १८ टक्के दराने विलंबाच्या कालावधीची रक्कम रूपये ७६०९८/—(रूपये शहात्तर हजार अठ्ठयाण्णव फक्त) संबंधित वसूली लिपिकांनी वसूल केल्याचे दिसून येत नाही. तरी सदर रक्कम संबंधित ग्राहकाकडून वसूल करून महापालिका कोषागारात जमा करणेबाबत व संबंधित वसूली लिपिकांनी सदर रक्कम वेळीच वसूल का केली नाही याबाबतच्या खुलाशासह

पुर्तता अहवाल सादर करणेबाबत या विभागाचे ज्ञापन जा.क्र. उमपा/लेपवि/पाणीपुरवठा विभाग/असज्ञा/१७५ /०५/दिनांक १६/७/२००५ अन्वये कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा व उप अभियंता पाणीपुरवठा(देयक) यांना कळविण्यात आले आहे. तथापि संबंधितांकडून वसूली केले बाबत कोणतीही कारवाई केल्याचे अनुपालन या विभागास अद्याप प्राप्त झालेले नाही.

**मुद्दा क्र. २ :— पाणीपट्टी बिलाची थकित रक्कम रूपये १,३१,२६९/— वसूल करणे बाबत.**

सन २००२—२००४ या वित्तीय वर्षाचे पाणी पुरवठा विभाग, उल्हासनगर — ५, या कार्यालयाचे लेखा परिक्षण करतांना असे निर्दशनास आले की, माहे मार्च २००० नंतर पाणीपट्टी बिलाच्या रकमेचा समावेश घरपट्टीच्या बिलामध्ये झाल्यामुळे माहे मार्च २००० पर्यंतच्या पाणीपट्टीच्या संपूर्ण रक्कमा संबंधित ग्राहकाकडून वसूल करणे आवश्यक होते. तथापि एकूण ८५ पाणीपट्टी ग्राहकाकडून रूपये १,३१,२६९/— (रूपये एक लाख एकतीस हजार दोनशे एकोणसत्तर फक्त) इतकी रक्कम थकीत असल्याचे संबंधित ग्राहकाचे संगणकीय खात्यावरून दिसून येते. तरी सदर थकित रक्कमांचे पाणीपट्टी ग्राहकांच्या घरपट्टी बिलामध्ये समायोजन करून वसूली का केली नाही. तसेच पाणीपट्टी बिलामध्ये थकीत रक्कमा न दर्शविता ग्राहकांना क्लिअर पावत्या कश्या देण्यात आल्या या बाबतच्या संबंधित वसूली लिपिकाच्या खुलाशासह सदर रक्कमा संबंधित ग्राहकाकडून द.सा.द.शे. १८ टक्के व्याज दराने वसूल करून महापालिका कोषागारात जमा करणेबाबतच्या खुलाशासह पुर्तता अहवाल सादर करणेबाबत या विभागाचे ज्ञापन क्र. उमपा/लेपवि/पाणी पुरवठा विभाग/असज्ञा/१७६/०५ दिनांक १६ जुलै २००५ अन्वये कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व उप अभियंता पाणी पुरवठा (देयक) यांना कळविण्यात आले आहे. तथापि संबंधितांकडून वसूली केले बाबत कोणतीही कारवाई केल्याचे अनुपालन या विभागास अद्याप प्राप्त झालेले नाही.

**माहे ऑगस्ट २००५**

## पाणी पुरवठा विभाग

१) **उल्हासनगर शहराच्या स्वच्छता कार्यक्रमात बाधा आणणा—या व्यक्तींकडून वाहतूक खर्च व प्रशासकीय आकार रक्कम रू. २७,२५०/— कमी वसूल केले बाबत.**

सन २००४—२००५ या वित्तीय वर्षाचे आरोग्य विभागाचे लेखापरिक्षण करतांना असे निर्दशनास आले की, मा. आयुक्त यांचा आदेश क्र. उमपा/आरोग्य/५०४ दिनांक २६ सप्टेंबर २००२ अन्वये शहराचे स्वच्छता कार्यक्रमात बाधा आणणा—या व्यक्तिकडून किमान व कमाल आकार वसूल करण्याची तरतुद केलेली आहे.

सदर आदेशास अनुसरून संबंधित प्रभागातील स्वच्छता निरीक्षकांनी स्वच्छतेस बाधा आणणा—या व्यक्तींकडून किमान आकार वसूल करणे अपेक्षित आहे. तथापि संबंधित स्वच्छता निरीक्षकांनी किमान रक्कमेपेक्षाही कमी रक्कम संबंधित व्यक्तिकडून वसूल केल्यामुळे महापालिकेच्या रू.२७,२५०/—(रूपये सत्तावीस हजार दोनशे पन्नास फक्त) इतक्या महसूलाचे नुकसान झाले आहे.

सबब किमान रक्कमेपेक्षा कमी भरून घेतलेली रक्कम संबंधित निरीक्षकांकडून वसूल करून महापालिकेच्या कोषागारात जमा करणेबाबत व दंडाची रक्कम कमी वसूल केल्याबाबतच्या त्यांच्या खुलाशासह वसूलीचा अहवाल लेखा परिक्षण विभागास कळविणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र. उमपा/लेपवि/आरोग्य विभाग/असज्ञा/६८/०५ दिनांक २३/०८/२००५ अन्वये उप—आयुक्त (आरोग्य विभाग) यांना कळविण्यात आले आहे. तथापि संबंधितांकडून वसूली केले बाबत कोणतीही कारवाई केल्याचे अनुपालन या विभागास अद्याप प्राप्त झालेले नाही.

**स्थायी समिती ठराव क्र.** ५८ दिनांक:—२०/१२/२००५

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :— श्री. नथु सोनवणे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे माहे ऑक्टोबर २००५ पर्यंतचा महापालिका लेख्यांची छाननी व मुख्य लेखा परीक्षकांचा विधी अग्राहय प्रकरणी अहवालाचा विचार करुन उपरोक्त कर्मचा—यां विरुध्द् कारवाईच्या दृष्टीने खालील आदेश देत आहे.

१) महापालिका उत्पन्नात वाढ होण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करावी.
२) उपरोक्त कर्मचा—यांकडुन अपहार केलेल्या रकमेचा व्याजासह भरणा करुन घेण्यात यावा.
३) उपरोक्त कर्मचा—यांची त्वरित विभागीय चौकशी करण्यात यावी.
४) आयुक्तांना खात्री वाटल्यास आवश्यकतेनुसार दोषी कर्मचा—यांविरुध्द् पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात यावा.

५) मुख्य लेखा परिक्षकांनी सूचना दिल्यानंतरही ज्या विभागप्रमुखांनी दोषी कर्मचा–यांविरुध्द् काहीही कारवाई केलेली नाही अशा विभागप्रमुखांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात यावी.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :– विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

विषय क्र.४ :– आदर्शनगर, उल्हासनगर रेल्वे स्टेशन जवळ, प्रभाग क्र १५, उल्हासनगर–४ या ठिकाणी प्रतिक सामाजिक प्रतिष्ठान या संस्थेस ''पैसे द्या व वापरा'' या तत्वावर शौचालय बनविण्यास मान्यता देणे.

---

काही सदस्य :–पास, पास ......

मा. सभापती :– सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

विषय क्र.४ :– आदर्शनगर, उल्हासनगर रेल्वे स्टेशन जवळ, प्रभाग क्र १५, उल्हासनगर–४ या ठिकाणी प्रतिक सामाजिक प्रतिष्ठान या संस्थेस ''पैसे द्या व वापरा'' या तत्वावर शौचालय बनविण्यास मान्यता देणे.

प्रस्तावना:–

प्रभाग क्र. १५, आदर्शनगर, उल्हासनगर रेल्वे स्टेशन जवळ, उल्हासनगर–४ येथे असलेल्या मोकळया जागेवर पैसे दया व वापरा तत्वावर शौचालय बनविणे बाबत मा. श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे, नगरसेविका उल्हासनगर महानगरपालिका यांनी विनंती केलेली आहे.

मा. श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे, नगरसेविका उल्हासनगर महानगरपालिका यांनी दिनांक २१/५/२००५ चे पत्रान्वये प्रतिक सामाजिक प्रतिष्ठान या संस्थेस शौचालयाचे काम देणेबाबत शिफारीश केलेली आहे. तसेच प्रतिक सामाजिक प्रतिष्ठान या संस्थेने प्रभाग क्र. १५, आदर्शनगर, उल्हासनगर रेल्वे स्टेशन जवळ, उल्हासनगर–४ येथे नविन शौचालयाचे बांधकाम करणेस तयार असलेबाबत दिनांक ८/११/०५ चे पत्रान्वये कळविलेले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

सबब, प्रभाग क्र. १५, आदर्शनगर, उल्हासनगर रेल्वे स्टेशन जवळ, उल्हासनगर–४ येथे असलेल्या मोकळया जागेवर महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार नविन शौचालयाचे बांधकाम करणेकरीता 'प्रतिक सामाजिक प्रतिष्ठान' या संस्थेस पैसे दया व वापरा तत्वावर देणेसाठी व अन्य प्रकारे विनियोग करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ५९ दिनांक:–२०/१२/२००५

सुचकाचे नाव :– श्री. चंदाराम मोकल
अनुमोदकाचे नाव :– श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार आदर्शनगर, उल्हासनगर रेल्वे स्टेशन जवळ, प्रभाग क्र १५, उल्हासनगर–४ या ठिकाणी प्रतिक सामाजिक प्रतिष्ठान या संस्थेस''पैसे द्या व वापरा'' या तत्वावर शौचालय बनविणेकामी मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :– विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र.५ :– उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात साफसफाई कामी जंतुनाशक औषधे पुरवठा करणेकामी प्रशासनास न्युनतम दराचे निविदाकारांशी संविदेस मान्यता देणे.

---

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी :– मी सांगु इच्छितो की, १० दिवसांपासुन आरोग्य विभागाच्या कार्यालयात जात आहे पण तेथे फिनायल, डीडीटी व इतर औषधे मिळत नाहीत. तेथे कधीही औषधे मिळत नाहीत. असे असेल तर ही औषधे जातात तरी कुठे? मी प्रभाग अधिकारी श्री. भदाणे यांना घेवुन आरोग्य विभागाच्या कार्यालयात गेलो होतो त्यावेळी श्री. हिबारे यांनी औषधे उपलब्ध नसल्याचे सांगितले.

वैद्यकिय आरोग्य अधिकारी (डॉ.के.आर.खरात) :– आपल्या मध्यवर्ती गोदामात औषधांचा साठा केलेला असतो. तेथुन संबधित स्वच्छता निरीक्षकाने औषधे घेवुन जायला हवीत. परंतु ते तसे करीत नाहीत. पुर परिस्थितीच्या वेळी आपण औषधे वापरली होती त्यामुळे साठा लवकर संपला.

मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :– वर्षाला किती माल येतो?

वैद्यकिय आरोग्य अधिकारी (डॉ.के.आर.खरात) :– रु २२ ते २३ लाख रुपयांची जंतुनाशक औषधे खरेदी करण्यात येतात.

मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :– ही औषधे कुठे ठेवता आणि कधी मागवता?

वैद्यकिय आरोग्य अधिकारी (डॉ.के.आर.खरात) :– आपण आवश्यकतेप्रमाणे औषधे मागवितो.

मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :– आमच्या झोपडपट्टी विभागात तरी कधीही औषधे मारण्यात येत नाहीत. डासांचा मोठया प्रमाणावर प्रादुर्भाव झाला आहे. तुम्ही ती औषधे आमच्याकडे द्या आम्ही प्रयोगशाळेत त्यांची चाचणी करु.

मा. सदस्य श्री मोहन साधवानी :– कोणत्या कंपनीकडुन ही औषधे मागविता?

वैद्यकिय आरोग्य अधिकारी (डॉ.के.आर.खरात) :– निविदा काढुन त्यानंतर औषधांची खरेदी होते.

मा. सदस्य श्री नथु सोनवणे :– ही जी औषधे आहेत ही कधी आमच्या घराच्या आजुबाजुला टाकतानाही कोणी दिसत नाही, तर सामान्य माणसाच्या घराच्या बाजुला कसे काय टाकणार? हा माल जातो तरी कुठे?

मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :– आम्हाला औषधांचा नमुना द्या.

**मा. सदस्य श्री नथु सोनवणे :—** तुम्ही औषधे टाकल्यानंतर तेथील नगरसेवकाची त्यासाठी स्वाक्षरी घ्यावी. माझा असा आरोप आहे की, ही औषधे इमारतींमध्ये विकली जातात. याचा गरीबांना काहीही फायदा होत नाही. यासाठी नगरसेवकाची स्वाक्षरी घ्यायला हवी.

**मा. सभापती :—** तुम्ही स्वच्छता निरीक्षकाला सांगा.

**मा. सदस्य श्री नथु सोनवणे :—** माझ्या प्रभागात तर एकदाही औषध टाकलेले नाही.

**मा. सभापती :—** शहरात डास फार झाले आहेत. आपल्याकडे फॉगिंग मशिन आहे अथवा नाही?

**वैद्यकिय आरोग्य अधिकारी (डॉ.के.आर.खरात) :—** आपल्याकडे जे फॉगिंग मशिन आहेत, त्यापैकी मोठी मशिन फार जुनी झाली आहे. ती नादुरुस्त आहे. एकच छोटी मशिन सुरु आहे. आता नवीन मशिन खरेदी करण्यासाठी आम्ही लवकरच येथे प्रस्ताव आणणार आहोत.

**मा. सदस्य श्री किशोर वनवारी :—** मशिन लवकरात लवकर दुरुस्त करा, तसेच नवीन मशिनसाठी येथे प्रस्ताव आणा.

**मा. सदस्य श्री नथु सोनवणे :—** ही एवढी महाग औषधे आहेत, परंतु एकदाही प्रभागात मारत नाहीत. यासाठी नगरसेवकाची स्वाक्षरी घ्यावी. ही औषधे आहेत तरी कुठे?

**वैद्यकिय आरोग्य अधिकारी (डॉ.के.आर.खरात) :—** आपण आमच्या गोदामात येवुन पाहु शकता.

**मा. सभापती :—** आरोग्य निरीक्षकाला सक्त सूचना देण्यात याव्यात.

**मा. सदस्य श्री नथु सोनवणे :—** सध्या शहरात डास फार झाले आहेत. एवढी महाग औषधे जातात तरी कुठे.

**मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :—** आम्हाला औषधांचे नमुने दाखवा.

**काही सदस्य :—**पास, पास ......

**मा. सभापती :—** सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र.५ :—** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात साफसफाई कामी जंतुनाशक औषधे पुरवठा करणेकामी प्रशासनास न्युनतम दराचे निविदाकारांशी संविदेस मान्यता देणे.

**प्रस्तावना:—**

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील साफसफाई कामी आवश्यक असणारे जंतुनाशके औषधे खरेदीची निविदा सुचना दिनांक ३/६/२००५ रोजी दै. नवभारत व दै. हिन्दु (सिंधी) या वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. तरी प्राप्त निविदा दिनांक १७/६/२००५ रोजी वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचे दालनात सकाळी ११.०० वाजता वैद्यकीय आरोग्य अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक व मुख्य लेखा अधिकारी व निविदाकारांचे प्रतिनिधी यांचे उपस्थितीत उघडण्यात आल्या. तरी सदर निविदाकारांनी दिनांक ११/७/२००५ रोजी वैद्यकीय आरोग्य अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी वाटाघाटी करुन खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

**तुलनात्मक तक्ता**

| अ क्र | जंतुनाशकाचे नाव | उत्पादक कंपनी | आवश्यक परिणाम | अंदाजित दर | मे. डॅपमन्स पेस्ट कंट्रोल | मे. डॉल्फिन सेल्स कॉर्पोरेशन | मे.रमेश ॲग्रो कम कॉर्पोरेशन | मे.रविराज केमिकल्स | मे.आर.बी. इंडस्ट्रिज | मे.सुमार्क एजन्सीज | वाटाघाटी नंतरचे दर | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | डेपनिका ५०:५० | हाफकिन अॅप्रुड कंनीकडुन कमाल घेण्यात यावा. | ५०० लिटर | ८५० प्रति लिटर | ८४० प्रति लिटर | अधिकृत विक्रेते असल्याचे प्रमाणपत्र नाही | दोन निविदादार भरल्याने निविदादार नाकारण्यात आले | ८३५ प्रति लिटर | अधिकृत विक्रेते असल्याचे प्रमाणपत्र नाही | अधिकृत विक्रेते असल्याचे प्रमाणपत्र नाही | ६४० प्रति लिटर | ३,२०,०००/— |
| २ | डेल्टा मेट्रीन आय. एस. आय. प्रमाणित | | ३०० लिटर | १२०० प्रति लिटर | १२५० प्रति लिटर | १०९० | | ११८५ प्रति लिटर | | | १०७५ प्रति लिटर | ३,२२,५००/— |
| ३ | डेल्टा मेथारीन आय. एस. आय. प्रमाणित | | ४५० लिटर | १२०० प्रति लिटर | ११८५ प्रति लिटर | ११३५ | | ११७५ | | | ११२०/- | ५,०४,०००/— |
| ४ | मॅलेरॉन पी ऑईल | एस.आर.बी. इंडस्ट्रिज | ५००० लिटर | ११३ प्रति लिटर | १३८ प्रति लिटर | — | | अधिकृत विक्रेते असल्याचे प्रमाणपत्र नाही | ११३ प्रति लिटर | अधिकृत विक्रेते असल्याचे प्रमाणपत्र नाही | ११० प्रति लिटर | ५,५०,०००/— |
| ५ | लॅबडा सायहैलोथ्रीन १० टक्के W.P. | टाटा रॅलीज | १५० किलो | ४००० प्रति किलो | अधिकृत विक्रेते असल्याचे प्रमाणपत्र नाही | अधिकृत विक्रेते असल्याचे प्रमाणपत्र नाही | | अधिकृत विक्रेते असल्याचे प्रमाणपत्र नाही | अधिकृत विक्रेते असल्याचे प्रमाणपत्र नाही | ३९०० | ३५५१ प्रति किलो | ५,३२,६५०/— |
| | | | | | | | | एकुण खर्च—— | | | | २२,२९,१५०/— |

तरी वरील प्राप्त निविदादरांत खालीलप्रमाणे निविदाकारांचे दर हे अंदाजित दरापेक्षा कमी आहेत.

मे. डॉल्फिन सेल्स कॉर्पोरेशन :— अनु. क्र. २ व ३
मे. रविराज केमिकल्स :— अनु. क्र. १
मे. एस.आर.बी. इंडस्ट्रिज :— अनु. क्र. ४
मे. सुमार्क एजन्सिज :— अनु. क्र. ५

वरील निविदाकारांपैकी मे. डॉल्फिन सेल्स कॉर्पोरेशन यांनी उर्वरीत डेपनिका ५०:५० इ.सी., मॅलेरॉन पी ऑईल व लॅबडा सायहेलोथ्रीन १० टक्के डब्ल्यु.पी. यांचे दराबाबत सुध्दा वाटाघाटी करण्यास बोलाविण्याची विनंती केली आहे. परंतु मे. डॉल्फिन सेल्स कॉर्पोशन यांनी निविदेमधील अटी व शर्तीनुसार मागणी केलेल्या डेपनिका ५०:५० इ.सी. या जंतुनाशकाची कंपनी डेपमन्स पेस्ट कंट्रोल या अधिकृत जंतुनाशकाचे दर न भरता नॅशनल पेस्टीसाईड कंपनी व मलेरिया ऑईलचे दर भरलेले आहेत जे निविदेमधील Specification प्रमाणे योग्य ठरत नाहीत. तसेच लॅबडा सायहैलाथ्रीन १० टक्के W.P. या जंतुनाशकाचे अधिकृत विक्रेते असल्याचे त्यांच्याकडे प्रमाणपत्र देखील नाही त्याचप्रमाणे वरील निविदाकारांनी वाटाघाटीनंतर त्यांचे दर मे. डॉल्फिन सेल्स कॉर्पोरेशन यांचेपेक्षा न्युनत्तम सादर केले आहेत.

तरी प्राप्त निविदादर स्विकारुन सदर जंतुनाशके औषधे खरेदी करण्याकरीता रुपये २२,२९,१५०/— (रुपये बावीस लाख एकोणतीस हजार एकशे पन्नास रुपये मात्र) एवढा खर्च अपेक्षित असून सदर जंतुनाशके औषधे खरेदी करण्याकरीता खालीलप्रमाणे वित्तीय वर्ष २००५—०६ चे अंदाजपत्रकात क—२ भाग—४ ''हिवताप व डेंग्यु प्रतिबंधन खर्च'' या लेखाशिर्षाखाली एकुण २५,००,०००/— तरतुद उपलब्ध आहे.

तरी वरील निविदेमध्ये प्राप्त झालेले दर वाजवी असल्याने स्विकृत करण्यात आले आहेत. सबब संबंधीत निविदादारकारांशी संविदा करण्यास प्राधिकृत करण्यासाठी मा. स्थायी समितीची मंजुरी मिळण्याकामी प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ६०                                                                     <u>दिनांकः—२०/१२/२००५</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी
अनुमोदकाचे नाव :— श्रीमती रेखा कृष्णानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात साफसफाई कामी जंतुनाशक औषधांचा पुरवठा करणेकामी प्रशासनास वरील प्रस्तावात उल्लेखलेल्या न्युनतम दराच्या निविदाकारांशी बाबनिहाय संविदेस व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ <u>विषय क्र.६ :—</u> मालमत्ता कर देयकाचे कुरियरमार्फमत वाटप करणेकामी प्रशासनास न्युनतम दराचे निविदाकार मे. मधुर कुरीयर सर्विस यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

---

<u>मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :—</u> याची पध्द्त काय आहे? पोचपावती घेतली जाईल काय?

<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी :—</u> मी तुम्हाला समजावुन सांगतो. आपण कुरियरमार्फत देयक पाठविल्यानंतर आपल्याकडे सहीचा पुरावा असेल, त्याला मिळाले नाही तरी आपल्याकडे आपण पुरावा ठेवु शकतो.

<u>मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :—</u> याचा काय फायदा? लोकांना वेळेवर बिल मिळाले नाही तर त्यांना नाहक व्याजाची रक्कम भरावी लागते.

<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी :—</u> आपल्याकडे स्वाक्षरी असेल. तसेच कोणतेही देयक हे मार्चपूर्वी भरायचेच असते हे लोकांनाही कळायला हवे.

<u>काही सदस्य :—</u>पास, पास ......

<u>मा. सभापती :—</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

<u>विषय क्र.६ :—</u> मालमत्ता कर देयकाचे कुरियरमार्फमत वाटप करणेकामी प्रशासनास न्युनतम दराचे निविदाकार मे. मधुर कुरीयर सर्विस यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

प्रस्तावना:—

वर्ष २००५—०६ साठी मालमत्ता कराचे देयक तसेच मागणी नोटीस मालमत्ता धारकांना वाटप करण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आले आहेत. सदरच्या प्राप्त झालेल्या निविदेचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | ठेकेदारांचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|---|
| १ | मे. राईट मॅन कुरीयर सर्व्हिस | रु. ६.०० प्रती देयक |
| २ | मे. मधुर कुरीयर सर्व्हिस | रु. ४.६० प्रती देयक |
| ३ | मे. उमा एंटरप्राईजेस | रु. ५.२५ प्रती देयक |

उपरोक्त तक्ता पहाता मे. मधुर कुरीयर सर्व्हिस यांनी सादर केलेले दर रु. ४.६० हे सर्वात कमी असल्याचे दिसते. मधुर कुरीअर यांचेकडुन प्राप्त झालेल्या सर्वात कमी दराचा विचार करता २,५०,००० देयके व मागणी नोटीस वितरित करण्यासाठी रु. ११,५०,००० एवढा खर्च अपेक्षित आहे.

सदरचा खर्च ''अ'' अंदाजपत्रक भाग—१ अ—३ (ix) ''टपाल खर्च'' या लेखा शिर्षातुन करण्याचे प्रस्तावित आहे.

टपालाद्वारे सदरची देयके पाठविल्यास पुढीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| युपीसी (Under Certificate of Posting) | | रु. ६.०० प्रती देयक |
| रजिस्टड एडी (पोहच शिवाय) | Regd. Ad (W/O Acknow) | रु. २२.०० प्रती देयक |
| रजिस्टड एडी (पोहचसह) | Regd. Ad (With Acknow) | रु. २५.०० प्रती देयक |

तरी मे. मधुर कुरीयर सर्व्हिस यांची निविदा मंजुर करुन अपेक्षित खर्च रक्कम रु. ११,५०,०००/— यास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ अन्वये मा. स्थायी समिती पुढे ठेवणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ६१ दिनांक:—२०/१२/२००५

सुचकाचे नाव :— श्री. सुरेश जाधव
अनुमोदकाचे नाव :— श्री. मोहन साधवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मालमत्ता कर देयकाचे कुरियरमार्फमत वाटप करणेकामी प्रशासनास न्युनतम दराचे निविदाकार मे. मधुर कुरीयर सर्विस यांच्याशी संविदेस व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :— विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र.७ :— कॅम्प नं. १ ते ५ साठी आर.सी.सी मेनहोल फ्रेम झाकणे पुरविणे व बसविणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

---

मा. सदस्य श्री मोहन साधवानी :— रक्कम किती आहे? ठेकेदार कोण आहे?

मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :— त्यावर उमपाचा शिक्का असेल काय?

<u>कार्यकारी अभियंता (पा.पु)(श्री.आर.आर.सावकारे) :—</u> आता हे प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी आहे त्यानंतर निविदा मागविली जाईल.तसेच शिक्क्याबाबत ठेकेदाराला सांगु.

<u>काही सदस्य :—</u>पास, पास ......

<u>मा. सभापती :—</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

<u>**विषय क्र.७ :—**</u> कॅम्प नं. १ ते ५ साठी आर.सी.सी मेनहोल फ्रेम झाकणे पुरविणे व बसविणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

<u>**प्रस्तावना:—**</u>

भुयारी योजने अंतर्गत शहरातील विविधी ठिकाणी मेन होल्सची झाकणे तुटणे, चोरीस जाणे किंवा रस्त्यात बुजणे अशा प्रकारांमुळे कव्हर्स बसविणे अत्यावश्यक ठरते. तुटलेली किंवा चोरीस गेलेली झाकणे, फ्रेम इत्यादी न बसविल्यास अपघाताची गंभीर समस्या उद्‌भवते. यामुळे सदरचे काम त्वरीत करणे भाग पडते. याशिवायही मेन होल उघडी राहून कचरा पडून बंद होवू नयेत या दृष्टीनेही मेन होल फ्रेम कव्हर्स बसविणे आवश्यक ठरते. सदर कामाची किंमत रु. ४८४८२०/— एवढी आहे.

या कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यतेकरीता स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर करण्यात येत आहे. मंजूरीनंतर हे काम जिल्हा उपनिबंधक, ठाणे यांच्या शिफारशीनुसार मान्यता प्राप्त म.का.स. संस्थेमार्फत करण्यात येईल.

<u>**स्थायी समिती ठराव क्र.**</u> ६२ <u>दिनांक:—२०/१२/२००५</u>

सुचकाचे नाव :— श्री. गणपत एडके
अनुमोदकाचे नाव :— श्री. वाघे शामु

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार कॅम्प नं. १ ते ५ मध्ये आर.सी.सी मेनहोल फ्रेम झाकणे पुरविणे व बसविणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे तसेच प्रशासनास जिल्हा उपनिबंधक, ठाणे यांचे शिफारसीनुसार योग्य मजुर कामगार सहकारी संस्थेमार्फत हे काम करणेकामी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

<u>**विषय क्र.८:—**</u> उल्हासनगर कॅम्प नं २ व ३ येथे वार्षिक तत्वावर भुयारी गटार योजनेची देखभाल व दुरुस्ती करणेकामी सध्या कार्यरत असलेल्या कंत्राटदाराशी पूर्वीच्या संविदेतील अटी, शर्ती व दराने मुदतवाढीच्या संविदेस व पुढील वर्षासाठी सदरहु कामासाठी प्रशासनास मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

**मा. सचिव :—** याबाबत मी सभागृहास माहिती देवु इच्छितो, विषय क्र. ८ ते ११ चे प्रस्ताव सुस्पष्ट नाहीत. गोषवारा संदिग्ध आहे. नेमकी काय मान्यता हवी आहे ते कळुन येत नाही. त्यामुळे प्रशासनाने स्पष्ट प्रस्ताव देणे आवश्यक आहे.

**कार्यकारी अभियंता (पा.पु)(श्री.आर.आर.सावकारे) :—** आधीचे काम १३/५/०५ रोजी संपले आहे. त्यानंतर करार संपल्याने काम बंद होते. आता प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी हा प्रस्ताव स्थायी समितीसमोर आणलेला आहे.

**मा. सदस्य श्री नथु सोनवणे :—** आधी हे काम काम कोण करीत होते? तसेच हा विषय आणण्यास एवढा विलंब का लागला?

**मा. सदस्य श्री मोहन साधवानी :—** एकाच ठेकेदाराला हे काम देणार आहात काय? कारण जेव्हा पण आम्ही फोन करतो तेव्हा गाडी उपलब्ध होत नाही. तसेच जो मणी नावाचा ठेकेदार आहे तो माणसे नाहीत असे सांगतो. त्यामुळे रस्त्यावर गटारे भरुन वाहत असतात.

**मा. सदस्य श्री राजु जग्यासी :—** पूर्वीचे काम संपल्यानंतर ऑक्टोबर महिन्यापासुन ठेकेदाराने हे काम सुरु केले आहे. त्यामुळे तेव्हापासुन संविदा करण्यास मान्यता द्यावी.

**मा. सदस्य श्री नथु सोनवणे :—** सफाईचे काम नियमीत करणार आहात की गटार भरल्यावर करणार आहात? कारण मधुबन ते डी.टी कॉलेज या रस्त्यावर नेहमी गटार भरुन वाहत असते परंतु कधीही साफसफाई करण्यास कोणीही येत नाही.

**मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :—** कुठे कुठे काम करणार याची आम्हाला यादी द्या.

**काही सदस्य :—**पास, पास ......

**मा. सभापती :—** सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र.८:—** उल्हासनगर कॅम्प नं २ व ३ येथे वार्षिक तत्वावर भुयारी गटार योजनेची देखभाल व दुरुस्ती करणेकामी सध्या कार्यरत असलेल्या कंत्राटदाराशी पूर्वीच्या अटी, शर्ती व दराने मुदतवाढीच्या संविदेस व पुढील वर्षासाठी सदरहु संविदेतील कामासाठी प्रशासनास मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

**प्रस्तावना:—**

उल्हासनगर शहराच्या भुयारी गटार योजना देखभाल व दुरुस्तीचे काम महापालिकेमार्फत ठेकेदाराकरवी वार्षिक तत्वावर करण्यात येते. मागील निविदेची मुदत दिनांक १३.५.२००५ रोजी संपलेली असल्याने, चालू वर्षासाठी अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदर अंदाजपत्रकात भुयारी गटार योजनेच्या दैनंदिन देखभाल दुरुस्ती अंतर्गत व चोकअप काढण्यासाठी मजुरांचा पुरवठा करणे, आवश्यक तेथे खोदकाम करणे, एस.डब्ल्यु पाईप टाकणे, फ्रेम कव्हरचा पुरवठा व बसविणे (मर्यादित परिमाण) इत्यादी बाबींचा समावेश आहे. ज्या ठिकाणी सिवर लाईन क्लिनींग मशीन जावु शकत नाही अशा ठिकाणी मजूरांमार्फत चोकअप काढण्याचे काम वरील अंदाजपत्रकात समाविष्ठ आहे. सदर कामाची किंमत रुपये ४,९९,३००/— एवढी आहे.

या कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यतेकरीता स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर करण्यात येत आहे. मंजूरीनंतर हे काम जिल्हा उपनिबंधक, ठाणे यांच्या शिफारशीनुसार मान्यता प्राप्त म.का.स. संस्थेमार्फत करण्यात येईल.

**स्थायी समिती ठराव क्र. ६३** **दिनांकः—२०/१२/२००५**

सुचकाचे नाव :— श्री राजु जग्यासी

अनुमोदकाचे नाव :— श्री गणपत एडके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे उल्हासनगर कॅम्प नं २ व ३ येथे वार्षिक तत्वावर भुयारी गटार योजनेची देखभाल व दुरुस्ती करणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व पुढील वर्षाकरिता सदरहु कामासाठी प्रशासनास जिल्हा उपनिबंधक, ठाणे यांच्या शिफारसीनुसार योग्य मजुर कामगार संस्थेशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**मा. सचिव :—** विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ९ :—** उल्हासनगर कॅम्प नं ५ येथे वार्षिक तत्वावर भुयारी गटार योजनेची देखभाल व दुरुस्ती करणेकामी सध्या कार्यरत असलेल्या कंत्राटदाराशी पूर्वीच्या संविदेतील अटी, शर्ती व दराने मुदतवाढीच्या संविदेस व पुढील वर्षासाठी सदरहु कामासाठी प्रशासनास मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

---

**काही सदस्य :—**पास, पास ……

**मा. सभापती :—** सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. ९ :—** उल्हासनगर कॅम्प नं ५ येथे वार्षिक तत्वावर भुयारी गटार योजनेची देखभाल व दुरुस्ती करणेकामी सध्या कार्यरत असलेल्या कंत्राटदाराशी पूर्वीच्या संविदेतील अटी, शर्ती व दराने मुदतवाढीच्या संविदेस व पुढील वर्षासाठी सदरहु कामासाठी प्रशासनास मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

**प्रस्तावना:—**

उल्हासनगर शहराच्या भुयारी गटार योजना देखभाल व दुरुस्तीचे काम महापालिकेमार्फत ठेकेदाराकरवी वार्षिक तत्वावर करण्यात येते. मागील निविदेची मुदत दिनांक १३.५.२००५ रोजी संपलेली असल्याने, चालू वर्षासाठी अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदर अंदाजपत्रकात भुयारी गटार योजनेच्या दैनंदिन देखभाल दुरुस्ती अंतर्गत व चोकअप काढण्यासाठी मजुरांचा पुरवठा करणे, आवश्यक तेथे खोदकाम करणे, एस.डब्ल्यु पाईप टाकणे, फ्रेम कव्हरचा पुरवठा व बसविणे (मर्यादित परिमाण) इत्यादी बाबींचा समावेश आहे. ज्या ठिकाणी सिवर लाईन क्लिनींग मशीन जावु शकत नाही अशा ठिकाणी मजूरांमार्फत चोकअप काढण्याचे काम वरील अंदाजपत्रकात समाविष्ठ आहे. सदर कामाची किंमत रुपये ४,८८,८५०/– एवढी आहे.

या कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यतेकरीता स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर करण्यात येत आहे. मंजूरीनंतर हे काम जिल्हा उपनिबंधक, ठाणे यांच्या शिफारशीनुसार मान्यता प्राप्त म.का.स. संस्थेमार्फत करण्यात येईल.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ६४ <u>दिनांक:–२०/१२/२००५</u>

सुचकाचे नाव :– श्री राजु जग्यासी
अनुमोदकाचे नाव :– श्री शामु वाघे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे उल्हासनगर कॅम्प नं ५ येथे वार्षिक तत्वावर भुयारी गटार योजनेची देखभाल व दुरुस्ती करणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व पुढील वर्षाकरिता सदरहु कामासाठी प्रशासनास जिल्हा उपनिबंधक, ठाणे यांच्या शिफारसीनुसार योग्य मजुर कामगार संस्थेशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची <u>सही/–</u>

अनुमोदकाची <u>सही/–</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :–</u> विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

<u>विषय क्र. १० :–</u> उल्हासनगर कॅम्प नं ४ येथे वार्षिक तत्वावर भुयारी गटार योजनेची देखभाल व दुरुस्ती करणेकामी सध्या कार्यरत असलेल्या कंत्राटदाराशी पूर्वीच्या संविदेतील अटी, शर्ती व दराने मुदतवाढीच्या संविदेस व पुढील वर्षासाठी सदरहु कामासाठी प्रशासनास मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

---

<u>काही सदस्य :–</u>पास, पास ......

<u>मा. सभापती :–</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. १० :–** उल्हासनगर कॅम्प नं ४ येथे वार्षिक तत्वावर भुयारी गटार योजनेची देखभाल व दुरुस्ती करणेकामी सध्या कार्यरत असलेल्या कंत्राटदाराशी पूर्वीच्या संविदेतील अटी, शर्ती व दराने मुदतवाढीच्या संविदेस व पुढील वर्षासाठी सदरहु कामासाठी प्रशासनास मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

**प्रस्तावना:–**

उल्हासनगर शहराच्या भुयारी गटार योजना देखभाल व दुरुस्तीचे काम महापालिकेमार्फत ठेकेदाराकरवी वार्षिक तत्वावर करण्यात येते. मागील निविदेची मुदत दिनांक १३.५.२००५ रोजी संपलेली असल्याने, चालू वर्षासाठी अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदर अंदाजपत्रकात भुयारी गटार योजनेच्या दैनंदिन देखभाल दुरुस्ती अंतर्गत व चोकअप काढण्यासाठी मजुरांचा पुरवठा करणे, आवश्यक तेथे खोदकाम करणे, एस.डब्ल्यु पाईप टाकणे, फ्रेम कव्हरचा पुरवठा व बसविणे (मर्यादित परिमाण) इत्यादी बाबींचा समावेश आहे. ज्या ठिकाणी सिवर लाईन क्लिनींग मशीन जावु शकत नाही अशा ठिकाणी मजूरांमार्फत चोकअप काढण्याचे काम वरील अंदाजपत्रकात समाविष्ठ आहे. सदर कामाची किंमत रुपये ४,८२,३७०/– एवढी आहे.

या कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यतेकरीता स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर करण्यात येत आहे. मंजूरीनंतर हे काम जिल्हा उपनिबंधक, ठाणे यांच्या शिफारशीनुसार मान्यता प्राप्त म.का.स. संस्थेमार्फत करण्यात येईल.

**स्थायी समिती ठराव क्र.** ६५ **दिनांक:–२०/१२/२००५**

सुचकाचे नाव :– श्री राजु जग्यासी
अनुमोदकाचे नाव :– श्री चंदाराम मोकल

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे उल्हासनगर कॅम्प नं ४ येथे वार्षिक तत्वावर भुयारी गटार योजनेची देखभाल व दुरुस्ती करणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व पुढील वर्षाकरिता सदरहु कामासाठी प्रशासनास जिल्हा उपनिबंधक, ठाणे यांच्या शिफारसीनुसार योग्य मजुर कामगार संस्थेशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**मा. सचिव :–** विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ११ :–** उल्हासनगर कॅम्प नं १ येथे वार्षिक तत्वावर भुयारी गटार योजनेची देखभाल व दुरुस्ती करणेकामी सध्या कार्यरत असलेल्या कंत्राटदाराशी पूर्वीच्या संविदेतील अटी, शर्ती व दराने मुदतवाढीच्या संविदेस व पुढील वर्षासाठी सदरहु कामासाठी प्रशासनास मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

---

**काही सदस्य :–**पास, पास ......

**मा. सभापती :–** सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

☑

**विषय क्र. ११ :—** उल्हासनगर कॅम्प नं १ येथे वार्षिक तत्वावर भुयारी गटार योजनेची देखभाल व दुरुस्ती करणेकामी सध्या कार्यरत असलेल्या कंत्राटदाराशी पूर्वीच्या संविदेतील अटी, शर्ती व दराने मुदतवाढीच्या संविदेस व पुढील वर्षासाठी सदरहु कामासाठी प्रशासनास मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

**प्रस्तावना:—**

उल्हासनगर शहराच्या भुयारी गटार योजना देखभाल व दुरुस्तीचे काम महापालिकेमार्फत ठेकेदाराकरवी वार्षिक तत्वावर करण्यात येते. मागील निविदेची मुदत दिनांक १३.५.२००५ रोजी संपलेली असल्याने, चालू वर्षासाठी अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदर अंदाजपत्रकात भुयारी गटार योजनेच्या दैनंदिन देखभाल दुरुस्ती अंतर्गत व चोकअप काढण्यासाठी मजुरांचा पुरवठा करणे, आवश्यक तेथे खोदकाम करणे, एस.डब्ल्यु पाईप टाकणे, फ्रेम कव्हरचा पुरवठा व बसविणे (मर्यादित परिमाण) इत्यादी बाबींचा समावेश आहे. ज्या ठिकाणी सिवर लाईन क्लिनींग मशीन जावु शकत नाही अशा ठिकाणी मजूरांमार्फत चोकअप काढण्याचे काम वरील अंदाजपत्रकात समाविष्ठ आहे. सदर कामाची किंमत रुपये ४,९९,३७०/— एवढी आहे.

या कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यतेकरीता स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर करण्यात येत आहे. मंजूरीनंतर हे काम जिल्हा उपनिबंधक, ठाणे यांच्या शिफारशीनुसार मान्यता प्राप्त म.का.स. संस्थेमार्फत करण्यात येईल.

**स्थायी समिती ठराव क्र.** ६६ **दिनांक:—२०/१२/२००५**

सुचकाचे नाव :— श्री राजु जग्यासी
अनुमोदकाचे नाव :— श्री नथु सोनवणे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे उल्हासनगर कॅम्प नं १ येथे वार्षिक तत्वावर भुयारी गटार योजनेची देखभाल व दुरुस्ती करणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व पुढील वर्षाकरिता सदरहु कामासाठी प्रशासनास जिल्हा उपनिबंधक, ठाणे यांच्या शिफारसीनुसार योग्य मजुर कामगार संस्थेशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**मा. सचिव :—** विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १२ :—** आरोग्य विभागातील स्वच्छता निरीक्षकांना कार्यालयीन कामकाजासाठी मोबाईल वापर खर्च प्रतिपूर्ती रु. ५००/— मान्य करणे.

**काही सदस्य :—**पास, पास ......

मा. सभापती :— सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

विषय क्र. १२ :— आरोग्य विभागातील स्वच्छता निरीक्षकांना कार्यालयीन कामकाजासाठी मोबाईल वापर खर्च प्रतिपूर्ती रु. ५००/— मान्य करणे.

प्रस्तावना:—

दिनांक २/६/२००५ रोजी व दिनांक २१/६/२००५ रोजी मा. महापौर, उल्हासनगर महानगरपालिका यांनी स्वच्छता निरिक्षक, प्रभाग अधिकारी व उप—आयुक्त (आरोग्य) यांच्या आढावा बैठकी आयोजीत केलेल्या होत्या.

सदर दोन्हीही बैठकांमध्ये मा. महापौर व उपस्थित मा. नगरसेवक यांनी स्वच्छता निरिक्षक दुरध्वनीवरुन उपलब्ध होत नसल्यामुळे त्यांच्या प्रभागात अडचणी निर्माण होत असल्याबबात तक्रारी केल्या होत्या. याला पर्याय म्हणून सर्व स्वच्छता निरिक्षक व मुख्य स्वच्छता निरिक्षक यांना 'रिलायन्स कंपनीचे' रुपये ५००/— किंमतीचे प्रिपेड कार्ड देणेबाबतचा निर्णय घेण्यात आला.

आरोग्य विभागाकडे एकुण १७ स्वच्छता निरिक्षक व ०१ मुख्य स्वच्छता निरिक्षक असुन प्रत्येकी रुपये ५००/— किंमतीचे प्रिपेड कार्ड दिल्यास दरमहा महानगरपालिकेस रुपये ९००० व वार्षिक खर्च रु. १०८०००/— अपेक्षित आहे. प्रशासकिय कामाची गैरसोय दूर होण्यासाठी मा. स्थायी समितीची वित्तीय व प्रशासकिय मान्यता देण्याची शिफारस आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ६७ दिनांक:—२०/१२/२००५

सुचकाचे नाव :— श्री. संजय बठिजा
अनुमोदकाचे नाव :— श्रीमती मोना वनवारी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार आरोग्य विभागातील स्वच्छता निरिक्षकांना महापालिकेच्या/कार्यालयीन कामकाजासाठी मोबाईल वापर खर्च प्रतिपूर्ती दरमहा रु. ५००/— मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :— विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. १३ :— उल्हासनगर—२ येथील बजरंग आईस फॅक्टरी, संतोषी माता मंदिरापर्यंत बी.एम. एसी रस्ता बनविणेकामीकामी न्युनतम दराचे निविदाकार मे. जयभारत कन्स्ट्रक्शन यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

---

मा. सदस्य श्री गणपत एडके :— हा विषय तसेच क्र. १५ वरील विषय येथे मान्यतेसाठी आणल्याबद्दल मी मा. सभापती व आयुक्तांना धन्यवाद देतो. हा रस्ता गेल्या १५ वर्षांपासुन बनलेला नाही. आता हे काम होणार असल्याने मी आपला आभारी आहे.

<u>मा. सदस्य श्री मोहन साधवानी :—</u> मा. सभापती कॅम्प नं ४ व ५ येथील रस्त्यांची अवस्था देखिल वाईट आहे. २५ सेक्शन ते नेताजी चौकापर्यंतचा रस्ता अत्यंत खराब झाला आहे. तसेच दुधनाक्याचा रस्ता देखिल खराब झाला आहे. त्याचे काम होणे आवश्यक आहे.

<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी :—</u> माझ्या प्रभागातील रस्त्यांची अवस्था अतिशय वाईट झालेली आहे.

<u>मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :—</u> माझ्या प्रभागातील प्रबुध्द्नगर येथील रस्ता देखिल खराब झाला आहे.

<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी :—</u> ही जी निविदा आहे ही दिड वर्षापुर्वी प्राप्त झालेली आहे. ठेकेदारांना देयक मिळत नसल्याने ते काम करण्यास तयार नाहीत. जे ठेकेदार काम करण्यास तयार आहेत त्यांचेच प्रस्ताव येथे आणलेले आहेत. तसेच कॅम्प नं ४ व ५ येथील रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे काम देखिल व्हायला हवे.

<u>मा. सदस्य श्री नथु सोनवणे :—</u> माझ्या प्रभागातील रोहिदास नगर येथील ११ लाखाचे काम कधीच मंजुर झाले आहे परंतु प्रत्यक्षात कामास सुरुवात झालेली नाही.

<u>काही सदस्य :—</u>पास, पास ......

<u>मा. सभापती :—</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे. 

---

☑

<u>विषय क्र. १३ :—</u> उल्हासनगर—२ येथील बजरंग आईस फॅक्टरी, संतोषी माता मंदिरापर्यंत बी.एम. ए.सी रस्ता बनविणेकामीकामी न्युनतम दराचे निविदाकार मे. जयभारत कन्स्ट्रक्शन यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना:—</u>

| | | |
|---|---|---|
| १ | कामाचे नांव | उल्हासनगर—२ येथील बजरंग आईस फॅक्टरी संतोषी माता मंदीर पर्यंत रस्ता बी.एम.ए.सी.ने बनविणे व नाला कल्वर्ट व सी.सी.बनविणे. |
| २ | प्राकलनाची किंमत | ९१८१००/— |
| ३ | तांत्रिक मंजुरी देणा—या अधिका—याचे पदनाम | कार्यकारी अभियंता |
| ४ | तांत्रिक मंजुरी मिळाल्याचा क्र. व दिनांक: | क्र. १९३९ दि.२५/५/२००५ |
| ५ | प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळाल्याचा क्र व दिनांक | क्र. ६५/४ दिनांक ०८/०७/२००४ |
| ६ | निविदा सुचना क्रमांक व दिनांक | क्र. ४२६ दिनांक २४/२/२००५ |
| ८ | विक्री केलेल्या निविदा फॉर्म्सची संख्या | ८ |
| ९ | अंतिम दिवशी प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ३ |
| १० | निविदा उघडल्याचा दिनांक | दिनांक २४/०३/२००५ |
| ११ | निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता | |
| अनु | निविदाधारकाचे नांव | |
| १ | मे. जयभारत कंन्स्ट्रक्शन | १५.६० टक्के जास्त |
| २ | मे. माधव कंन्स्ट्रक्शन | २५.०० टक्के जास्त |
| ३ | मे.एम.सी.चंदनानी कंन्स्ट्रक्शन कं. | ३१.२५ टक्के जास्त |
| १२ | निविदाधारकाशी वाटाघाटी केल्या | दि. ०६/०६/०५ रोजी सकाळी ११.०० वाजता |

| | | |
|---|---|---|
| | असल्याचा त्याचा तपशिल | मा. शहर अभियंता यांचेकडे मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन यांना वाटाघाटीकरिता बोलविण्यात आले होते. मे. भालचंद एस.खटर यांनी त्याचे पुवध्र्ये १५.६० टक्के जास्त दरामध्ये १०.०० टक्के सवलत दिल्यानंतर (त्मइमज) आता वाटाघाटीनंतर सदर निविदेच्या अंतिम दर प्राकलनीय दरापेक्षा ५.६० टक्के जास्त होत आहे. व हा दर चालू दरसुचीवरील (२००४–०५) प्राकलनिय किंमती १.८४ टक्केने जास्त होत आहे. |
| १३ | लेखा शिर्षाचे नांव | सी–४(पपप) पी–२ रस्तें प्रवास व पुल इत्यादी सुधारणे व नवीन बांधणे. |

उक्त नमूद केल्याप्रमाणे मे जयभारत कंन्स्ट्रक्शन यांचे वाटाघाटी अंती प्राकलनिय दरापेक्षा ५.६० टक्के जास्त असलेली निविदा वाजवी असल्याने व आर्थिकदृष्टया महानगरपालिकेसाठी फायदेशिर असल्याने मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांच्या शिफारसीनुसार दर स्वीकृत करण्यात आले आहेत. सबब, निविदाधारक मे जयभारत कंन्स्ट्रक्शन यांचेशी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये संविदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करणेसाठी स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यासाठी सविनय सादर

स्थायी समिती ठराव क्र. ६८ दिनांकः–२०/१२/२००५

सुचकाचे नाव :– श्री. चंदाराम मोकल

अनुमोदकाचे नाव :– श्री. सुरेश गायकवाड

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर–२ येथील बजरंग आईस फॅक्टरी, संतोषी माता मंदिरापर्यंतचा रस्ता बी.एम.ए.सी ने बनविणे तसेच नाला कल्वर्ट व सी.सी. बनविणेकामी प्रशासनास न्युनतम दराचे निविदाकार मे. जयभारत कन्सट्रक्शन यांच्याशी संविदेस व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :– विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. १४ :– उल्हासनगर–३ येथील महापालिका कार्यालयामागील तरणतलाव ते आयलसिंघानी चेंबर द्वारा मध्यवर्ती जकात नाका या रस्त्याचे नुतनीकरण करणेकामी न्युनतम दराचे निविदाकार मे. जयभारत कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

---

काही सदस्य :–पास, पास ......

मा. सभापती :– सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

**विषय क्र. १४ :—** उल्हासनगर—३ येथील महापालिका कार्यालयामागील तरणतलाव ते आयलसिंघानी चेंबर द्वारा मध्यवर्ती जकात नाका या रस्त्याचे नुतनीकरण करणेकामी न्युनतम दराचे निविदाकार मे. जयभारत कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

**प्रस्तावना:—**

| | | |
|---|---|---|
| | कामाचे नांव | उल्हासनगर—३ येथील महानगरपालिका कार्यालयामागिल स्विमिंग पूल ते आयलसिंघानी चेंबर द्वारा सेंटर नाका या रस्त्याचे नुतनीकरण करणे. |
| २ | प्राकलनाची किंमत | ३१,४७,२३०/— |
| ३ | तांत्रिक मंजुरी देणा—या अधिका—याचे पदनाम | शहर अभियंता |
| ४ | तांत्रिक मंजुरी मिळाल्याचा क्र. व दिनांक: | क्र. ३४२८ दि. ३०/१०/२००४ |
| ५ | प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळाल्याचा क्र व दिनांक | क्र. १७६/७ दिनांक ४/३/२००५ |
| ६ | निविदा सुचना क्रमांक व दिनांक | क्र. ....... दिनांक १०/४/२००५ |
| ८ | विक्री केलेल्या निविदा फॉर्म्सची संख्या | ७ |
| ९ | अंतिम दिवशी प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ३ |
| १० | निविदा उघडल्याचा दिनांक | दिनांक १०/०५/२००५ |
| ११ | निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता | |
| अनु | निविदाधारकाचे नांव | |
| १ | मे. जयभारत कन्स्ट्रक्शन | निविदादरावर (।ज चंत) |
| २ | मे. जयहिंद रोड बिल्डर्स | ९.०० टक्के जास्त |
| ३ | मे. डी.एस.कन्स्ट्रक्शन | ९.९० टक्के जास्त |
| १२ | निविदाधारकाशी वाटाघाटी केल्या असल्याचा त्याचा तपशिल | दि. ०२/०६/०५ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. शहर अभियंता यांचेकडे मे. जयभारत कंन्स्ट्रक्शन यांना वाटाघाटीकरिता बोलविण्यात आले होते. मे. जयभारत कंन्स्ट्रक्शन यांनी वाटाघाटी करण्याकरीता तयारी दर्शविली नाही. सदर निविदेच्या अंतिम दर प्राकलनीय किंमती इतका होत आहे (At par). व हा दर चालू दरसुचीवरील (२००४—०५) प्राकलनिय किंमती ७.२८ टक्केने कमी होत आहे. |
| १७ | लेखा शिर्षाचे नांव | सी—४(पपप) पी—२ रस्तें प्रवास व पुल इत्यादी सुधारणे व नवीन बांधणे. |

उक्त नमूद केल्याप्रमाणे मे जयभारत कंन्स्ट्रक्शन यांचे वाटाघाटी अंती प्राकलनिय दरावर निविदा असल्याने व आर्थिकदृष्टया महानगरपालिकेसाठी फायदेशिर असल्याने मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांच्या शिफारसीनुसार दर स्वीकृत करण्यात आले आहेत. सबब, निविदाधारक मे जयभारत कंन्स्ट्रक्शन यांचेशी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये संविदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करणेसाठी स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यासाठी सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. ६९** **दिनांक:—२०/१२/२००५**

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर–३ येथील महापालिका कार्यालयामागील तरणतलाव ते आयलसिंघानी चेंबर द्वारा मध्यवर्ती जकात नाका या रस्त्याचे नुतनीकरण करणेकामी प्रशासनास न्युनतम दराचे निविदाकार मे. जयभारत कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याशी संविदेस व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :– विषय क्र. १५ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १५ :–** उल्हासनगर–२ येथील प्रभाग क्र. ५ मध्ये बजरंग आईस फॅक्टरी ते गुप्ता किराणा, रमाबाई नगर येथे रस्त्याचे नुतनीकरण व साईड नाली बनविणेकामी न्युनतम दराचे निविदाकार मे. जयभारत कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

---

काही सदस्य :–पास, पास ......

मा. सभापती :– सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. १५ :–** उल्हासनगर–२ येथील प्रभाग क्र. ५ मध्ये बजरंग आईस फॅक्टरी ते गुप्ता किराणा, रमाबाई नगर येथे रस्त्याचे नुतनीकरण व साईड नाली बनविणेकामी न्युनतम दराचे निविदाकार मे. जयभारत कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

**प्रस्तावना:–**

| | | |
|---|---|---|
| १ | कामाचे नांव | उल्हासनगर–२ रस्त्याचे नुतनीकरण व साईड नाली बनविणे बजरंग आईसफॅक्टरी ते गुप्ता किराणा, रमाबाई नगर, प्रभाग क्र.५ |
| २ | प्राकलनाची किंमत | २७,९९,०८६/– |
| ३ | तांत्रिक मंजुरी देणा–या अधिका–याचे पदनाम | शहर अभियंता |
| ४ | तांत्रिक मंजुरी मिळाल्याचा क्र. व दिनांक: | क्र. १९५७ दि. ७.०६.२००४ |
| ५ | प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळाल्याचा क्र व दिनांक | क्र. ६५/१ दिनांक ०८/०७/२००४ |
| ६ | निविदा सुचना क्रमांक व दिनांक | क्र. ४२६ दिनांक २४/०२/२००५ |
| ७ | विक्री केलेल्या निविदा फॉर्म्सची संख्या | ६ |
| ८ | अंतिम दिवशी प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | २ |

| | | |
|---|---|---|
| ९ | निविदा उघडल्याचा दिनांक | दिनांक २४/०३/२००५ |
| १० | निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता | |
| अनु | निविदाधारकाचे नांव | |
| १ | मे. जयभारत कन्स्ट्रक्शन | १५.०० टक्के जास्त |
| २ | मे. एम.सी.चंदलानी | ३५.५० टक्के जास्त |
| ११ | निविदाधारकाशी वाटाघाटी केल्या असल्याचा त्याचा तपशिल | दि. ०६/०६/०५ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. शहर अभियंता यांचेकडे मे. जयभारत कंन्स्ट्रक्शन यांना वाटाघाटीकरिता बोलविण्यात आले होते. मे. जयभारत कंन्स्ट्रक्शन यांनी निविदेमध्ये भरलेल्या १५.०० टक्के जास्त दरामध्ये १०.०० टक्के सवलत दिल्यानंतर (त्मइमज) आता वाटाघाटीअंती मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन यांचा अंतिम दर प्राकलनीय दरापेक्षा ५.०० टक्कने जास्त होत आहे. व हा दर चालू दरसुचीवरील (२००४–०५) १.३८ ने जास्त होत आहे. |
| १२ | लेखा शिर्षाचे नांव | सी–४(पपप) पी–२ रस्तें प्रवास व पुल इत्यादी सुधारणे व नवीन बांधणे. |

उक्त नमूद केल्याप्रमाणे मे जयभारत कंन्स्ट्रक्शन यांचे वाटाघाटी अंती प्राकलनिय दरापेक्षा ५.०० टक्केने जास्त असलेली निविदा वाजवी असल्याने व आर्थिकदृष्टया महानगरपालिकेसाठी फायदेशिर असल्याने मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांच्या शिफारसीनुसार दर स्वीकृत करण्यात आले आहेत. सबब, निविदाधारक मे जयभारत कंन्स्ट्रक्शन यांचेशी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये संविदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करणेसाठी स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यासाठी सविनय सादर.

**स्थायी समिति ठराव क्र.** ७० **दिनांकः–२०/१२/२००५**

सुचकाचे नाव :– श्रीमती मोना वनवारी
अनुमोदकाचे नाव :– श्रीमती माया मसंद

ही स्थायी समिति वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर–२ येथील प्रभाग क्र. ५ मध्ये बजरंग आईस फॅक्टरी ते गुप्ता किराणा, रमाबाई नगर येथे रस्त्याचे नुतनीकरण व साईड नाली बनविणेकामी प्रशासनास न्युनतम दराचे निविदाकार मे. जयभारत कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याशी संविदेस व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**मा. सचिव :–** विषय क्र. १६ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १६ :–** उल्हासनगर–४ येथील व्ही.टी.सी मैदान ते बॅ.क्र. १६१० पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणेकामी न्युनतम दराचे निविदाकार मे. जयभारत कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

---

**काही सदस्य :–**पास, पास ......

**मा. सभापती :–** सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. १६ :–** उल्हासनगर–४ येथील व्ही.टी.सी मैदान ते बॅ.क्र. १६१० पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणेकामी न्युनतम दराचे निविदाकार मे. जयभारत कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

**प्रस्तावना:–**

| | | |
|---|---|---|
| 1 | कामाचे नांव | उल्हासनगर-4 व्हि.टी.सी.ग्राऊंड ते बॅरेक 1610 पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे (शिल्लक काम) |
| 2 | प्राकलनाची किंमत | 3,76,575/- |
| 3 | तांत्रिक मंजुरी देणा-या अधिका-याचे पदनाम | कार्यकारी अभियंता |
| 4 | तांत्रिक मंजुरी मिळाल्याचा क्र. व दिनांक: | क्र. ........ दि. ................ |
| 5 | प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळाल्याचा क्र व दिनांक | क्र. ........ दिनांक .............. |
| 6 | निविदा सुचना क्रमांक व दिनांक | क्र. .......... दिनांक ................... |
| 8 | विक्री केलेल्या निविदा फॉर्म्सची संख्या | 3 |
| 9 | अंतिम दिवशी प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | 3 |
| 10 | निविदा उघडल्याचा दिनांक | दिनांक 05/02/2005 |
| 11 | निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता | |
| अनु | निविदाधारकाचे नांव | |
| 1 | मे. जयभारत कन्स्ट्रक्शन | 18.18 टक्के जास्त |
| 2 | मे. प्रतिक कन्स्ट्रक्शन | 23.00 टक्के जास्त |
| 3 | मे. गजानन कन्स्ट्रक्शन | 24.97 टक्के जास्त |
| 12 | निविदाधारकाशी वाटाघाटी केल्या असल्याचा त्याचा तपशिल | उपरोक्त काम निविदादरावर 18.18 टक्कने जास्त होत आहे. व हा दर चालू दरसुचीवरील (2004-05) प्राकलनिय किंमती 23.30 टक्क्ने कमी होत आहे. |
| 17 | लेखा शिर्षाचे नांव | सी-4(iii) पी-2 रस्तें प्रवास व पुल इत्यादी सुधारणे व नवीन बांधणे. |

उक्त नमूद केल्याप्रमाणे उपरोक्त काम निविदादरावर १८.१८ टक्कने जास्त असलेली निविदा वाजवी असल्याने व आर्थिकदृष्टया महानगरपालिकेसाठी फायदेशिर असल्याने मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांच्या शिफारसीनुसार दर स्वीकृत करण्यात आले आहेत. सबब, मुंबई प्रांतिक महानगरपालिका

अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये संविदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करणेसाठी स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यासाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ७१ दिनांकः—२०/१२/२००५

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर—४ येथील व्ही.टी.सी मैदान ते बॅ.क्र. १६१० पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणेकामी प्रशासनास न्युनतम दराचे निविदाकार मे. जयभारत कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याशी संविदेस व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :— विषय क्र. १७ वाचुन दाखवितात

⇨ विषय क्र. १७ :— उल्हासनगर शहराच्या विकासासाठी पूढील १० वर्षासाठी भांडवली गुंतवणूक योजना (Capital Investment Programme) व आर्थिक व्यवस्थापन (Financial Operation Plan) तयार करणेसाठी सल्लागाराची नेमणूक करण्यास करणे.

मा. सचिव :— विषय क्र. १७ वाचुन दाखवितात

⇨ विषय क्र. १७ :— उल्हासनगर शहराच्या विकासासाठी पूढील १० वर्षासाठी भांडवली गुंतवणूक योजना (Capital Investment Programme) व आर्थिक व्यवस्थापन (Financial Operation Plan) तयार करणेसाठी सल्लागाराची नेमणूक करण्यास करणे.

मा. सदस्य श्री मोहन साधवानी :— हा विषय काय आहे ते समजावुन सांगा.

कार्यकारी अभियंता (विद्युत)(श्री मुकेश आयलानी) :— मी आपणांस सांगतो. सध्या महापालिका ज्या सेवा देत आहे उदा. रस्ते, पाणी पुरवठा, विद्युत विभाग या सेवांची पाहणी करुन त्याचा सविस्तर अहवाल तयार करण्यात येईल. त्यानंतर प्रत्यक्षात किती आवश्यकता आहे व किती पुरवठा आहे यामधील तफावत काढण्यात येईल. त्यानंतर पुढील १० वर्षासाठी अहवाल तयार करण्यात येईल. यापैकी ७५ टक्के खर्च एमएमआरडीए मार्फत करण्यात येईल. तसेच शासन आपणांस जे अनुदान देते त्यासाठी देखिल आपल्याकडे हा अहवाल असणे आवश्यक आहे. त्याशिवाय आपणांस शासन अनुदान देखिल देणार नाही.

काही सदस्य :—पास, पास ......

मा. सभापती :— सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

☑

**विषय क्र. १७ :—** उल्हासनगर शहराच्या विकासासाठी पूढील १० वर्षासाठी भांडवली गुंतवणूक योजना (Capital Investment Programme) व आर्थिक व्यवस्थापन (Financial Operation Plan) तयार करणेसाठी सल्लागाराची नेमणूक करण्यास करणे.

**प्रस्तावना:—**

उल्हासनगर शहराचा विकास व सुशोभीकरण करणेसाठी नविन रोड बनविणे, जल वाहिन्या टाकणे, नाले व गटारे बांधणे, शहर रोशनाई, भुयारी गटार योजना राबविणे ही सर्व कार्ये व कर्तव्ये महापालिकेमार्फत पार पाडण्यात येतात.

सध्यस्थिती व दिवसेंदिवस वाढत असलेली लोकसंख्या लक्षात घेवून अशा पुरविण्यात आलेल्या सेवा व सुविधा किकती प्रमाणात पुरेशा आहेत व त्यामध्ये किती प्रमाणात सुधारणा करणे आवश्यक आहे, या सर्व बाबींचा आढावा घेणेसाठी भांडवली गुंतवणुक योजना (Capital Investment Programme) तयार करणे गरजेचे आहे. तसेच भांडवली गुंतवणूक योजनेची अंमलबजावणी करणेसाठी महापालिकेच्या वित्तीय स्थितीचा आढावा घेणेच्या दृष्टीने आर्थिक व्यवस्थापन (Financial Operation Plan) तयार करणे जरुरीचे आहे.

एम.एम.आर.डी.ए. या संस्थेने उल्हासनगर महानगरपालिकेस रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत कर्ज मंजूर करतांना भांडवली गुंतवणूक योजना (Capital Investment Programme) व आर्थिक व्यवस्थापन (Financial Operation Plan) तयार करणे आवश्यक आहे, अशी अट करारात नमूद केली होती.

तसेच केंद्र शासनाने जाहिर केलेल्या '' नॅशनल अर्बन रेन्युअल मिशन'' या योजनेतंर्गत अनुदान मिळणेसाठी स्थानिक स्वराज्य संस्थेने भांडवली गुंतवणूक योजना (Capital Investment Programme) व आर्थिक व्यवस्थापन (Financial Operation Plan) तयार करणे आवश्यक आहे, असे सुचित केलेले होते.

सदर योजना हाती घेणेसाठी एम.एम.आर.डी.ए. कडुन अंदाजे ७५ टक्के रक्कम काही रक्कम अनुदान स्वरुपात मिळणे अपेक्षित आहे.

तरी उल्हासनगर महानगरपालिकेने एम.एम.आर.डी.ए. च्या सहकार्याने उल्हासनगर शहराच्या विकासासाठी पुढील १० वर्षासाठी भांडवली गुंतवणूक योजना (Capital Investment Programme) व आर्थिक व्यवस्थापन (Financial Operation Plan) तयार करणेच्या दृष्टीने सल्लागाराची नेमणूक करणेसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार पुढील ८ संस्थांकडुन निविदा प्राप्त झाल्या.

१. मेसर्स किर्लोस्कर कन्सल्टंस लिमिटेड
२. मेसर्स घेरजी इस्टर्न लिमिटेड
३. मेसर्स फिडबॅक व्हेनचंर प्रा. लिमिटेड
४. मेसर्स जे.पी.एस. असोसिएटस लिमिटेड
५. मेसर्स शहा टेक्नीकल कन्सल्टंस लिमिटेड
६. मेसर्स कन्सल्टींग इंजिनिअर्स लिमिटेड
७. मेसर्स दाराशाह ॲण्ड कंपनी लिमिटेड
८. मेसर्स अे.एफ.फरगुसन प्रा. लिमिटेड,

वरीलपैकी एकूण ८ संस्थांकडून प्राप्त झालेल्या निविदानुसार सदर संस्थाच्या तांत्रिक बाबी पाहून फक्त खालील चार निविदा उघडण्यात आल्या होत्या. सदर संस्थांनी भरलेल्या रक्कमेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | भरलेली रक्कम |
|---|---|---|
| १. | मेसर्स शाह टेक्नीकल कन्सल्टंस लिमिटेड | १५,५०,०००/— |
| २. | मेसर्स कन्सल्टींग इंजिनिअर्स लिमिटेड | ३३,००,०००/— |
| ४. | मेसर्स दाराशाह ॲण्ड कंपनी लिमिटेड | १९,८३,६००/— |
| ५. | मेसर्स अे.एफ. फरगुसन प्रा. लिमिटेड | ७०,६५,६७४/— |

वरील एकुण चार संस्थांनी भरलेल्या रक्कमेचा विचार करता मेसर्स शाह टेक्नीकल कन्सल्टंस लिमिटेड यांनी भरलेली रक्कम रुपये १५,५०,०००/— सर्वात कमी असल्याचे दिसते.

सदरचा खर्च रक्कम रुपये १५,५०,०००/– सी–४ (३), भाग–२, अ–अंदाजपत्रक, नविन रोड बनविणे या लेखा शिर्षातून करण्याचे प्रस्तावित आहे.

सबब मेसर्स शाह टेक्नीकल कन्सल्टंस लिमिटेड यांना भांडवली गुंतवणूक योजना (Capital Investment Programme) व आर्थिक व्यवस्थापन (Financial Operation Plan) ''सल्लागार'' म्हणून नेमणूक होणेस स्थायी समितीपूढे मंजूरीसाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ७२ दिनांकः–२०/१२/२००५

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :– श्री. नथु सोनवणे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहराच्या विकासासाठी पूढील १० वर्षासाठी भांडवली गुंतवणूक योजना व आर्थिक व्यवस्थापन सल्लागारा मार्फत तयार करणेकामी प्रशासनास न्युनतम दराचे निविदाकार मेसर्स शाह टेक्नीकल कन्सल्टन्ट्स लिमिटेड यांच्याशी संविदेस व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सायंकाळी ५–२० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः–२८ डिसेंबर, २००५

## दि. २८.१२.२००५ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा बुधवार दिनांक २८.१२.२००५ रोजी सकाळी ११–३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

*१६. मा. सभापती – श्रीमती ज्योती सुरेश (पप्पु)कालानी*
१७. श्री. वनवारी किशोर नारायणदास
३. श्री. एडके गणपत गोविंद
२३. श्री. गायकवाड सुरेश नामदेव
२४. श्रीमती जावळे संगिता रमेश
२५. श्रीमती वनवारी मोना अशोक

२६. श्री. साधवानी मोहन रहंदोमल
२७. श्री. सोनवणे नथु काशिराम
९. श्रीमती कृष्णानी रेखा हरेश
१०. श्री जग्यासी राजु किशनचंद
११. श्री. जाधव सुरेश मधुकर
१२. श्रीमती मसंद माया घनश्यामदास
१३. श्री मोकल चंदाराम विठोबा
१४. श्री वाघे श्यामु बाबु
१५. श्रीमती ससाणे लक्ष्मी रोहिदास
१६. श्री. बठिजा संजय रामचंद्र

दुपारी १२–३० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी :— मा.सभापती महोदया, मा. मुख्यमंत्री महोदयांनी उल्हासनगर शहरासाठी जो महत्वपुर्ण निर्णय घेतला आहे त्याबद्दल धन्यवाद व्यक्त करण्यासाठी येथे अभिनंदन प्रस्ताव पारित करावा, ही विनंती.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :— श्री. कन्हैयालाल गिडवाणी, श्री. नितीन गडकरी यांच्यासाठी तसेच मा. उपमुख्यमंत्री यांच्यासाठी देखिल अभिनंदन प्रस्ताव पारीत करावा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— मा. श्री. डावखरे साहेब, मा.पालकमंत्री श्री गणेश नाईक तसेच मा. राज्यमंत्री, नगर विकास श्री. टोपे साहेब यांच्यासाठीही अभिनंदन प्रस्ताव पारीत करावा.

मा. सभापती :— सर्व सदस्यांना मी सांगु इच्छिते की, आजचा दिवस हा उल्हासनगर शहरासाठी अत्यंत महत्वपुर्ण व ऐतिहासीक असा दिवस आहे. आज उल्हासनगर शहराचा नव्याने जन्म झालेला आहे. उल्हासनगर शहरासाठी नव्याने बांधकाम नियंत्रण नियमावली मंजुर केल्याबद्दल मी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष मा. शरदचंद्रजी पवार, मा.श्रीमती सोनियाजी गांधी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.ना.श्री.विलासरावजी देशमुख, मा. उपमुख्यमंत्री ना.श्री.आर.आर.पाटील साहेब, नगरविकास राज्यमंत्री मा.श्री.टोपे साहेब, मा. पालकमंत्री श्री. गणेश नाईक साहेब, उपसभापती श्री. डावखरे साहेब, शिवसेना पक्षाचे सर्व नेते, तसेच विधानपरिषदेत मुद्दा उपस्थित केल्याबद्दल मा. विधानपरिषद सदस्य श्री. गुरुमुख जगवानी, श्री. कन्हैयालाल गिडवाणी, श्री. नितीन गडकरी, श्री. पांडुरंग फुंडकर, श्री. गुरुनाथ कुलकर्णी, श्री जितेंद्र आव्हाड व इतर सर्वांची मन:पुर्वक आभारी आहे. तसेच स्थानिक शिवसेना, भाजपा, आर.पी.आय कॉंग्रेस इत्यादी पक्षांच्या नेत्यांचीही मन:पुर्वक आभारी आहे. या सर्वांनी मेहनत केल्यानेच आज ही नियमावली मंजुर झालेली आहे. आता याची अधिसूचना निघाल्यानंतर, तसेच मा. न्यायालयात याची माहिती दिल्यानंतर सर्व उल्हासनगर शहरवासियांना याचा फायदा मिळणार आहे. शासनाने उल्हासनगरसाठी एक विशेष पॅकेज मंजुर केलेले आहे. उल्हासनगर शहर हे निर्वासितांचे शहर आहे. फाळणीनंतर निर्वासित येथे येवुन स्थायीक झाले होते. त्यावेळी आम्ही मोठा त्याग करुन येथे आलो होतो. त्यावेळी आम्हाला जी आश्वासने दिली होती ती नंतर पुर्णत्वास गेली नाहीत. पण आता जे झाले आहे ते चांगले झाले आहे. आता या नवीन नियमामुळे शहरातील सर्व प्रकारच्या बांधकामांना फायदा मिळणार आहे. फक्त जी बांधकामे रस्त्यामध्ये, नदी अथवा नाले यांच्यामध्ये येतात त्यांनाच याचा फायदा मिळणार नाही. शहरातील उर्वरित सर्व झोपडया, इमारती, बॅरेक तसेच सर्व प्रकारच्या बांधकामांना यामुळे फायदा मिळणार आहे. आम्ही तर शासनाकडे ही देखिल मागणी केली होती की सर्व बांधकामांना वैधता प्रमाणपत्र देण्यात यावे. प्रत्येकाला प्रमाणपत्र दिल्याने शासनाच्या विविध योजना, बॅक लोन इत्यादी कामांसाठी त्याचा वापर होवु शकतो. तसेच मी येथील अधिका–यांची देखिल आभारी आहे. त्यांनी दिवसरात्र मेहनत केल्याने तसेच शासनाकडे पाठपुरावा करण्यासाठी योग्य कागदपत्रे सादर केल्याने देखिल मोठा फायदा झाला आहे. तसेच आपले जे मा. आयुक्त आहेत, ते येथे आल्याने त्यांच्या पायगुणाने देखिल आपल्यास फायदा झाला आहे. यासाठी मी त्यांची आभारी आहे. तसेच यापुढे देखिल आपण सर्व अशाच प्रकारे सहकार्य कराल अशी मी आशा करते. धन्यवाद.

## अभिनंदन प्रस्ताव :—

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

श्री. मोहन साधवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. नथु सोनवणे
श्रीमती रेखा कृष्णानी

भारताच्या फाळणीनंतर पाकिस्तानातुन मोठया प्रमाणवर स्थलांतरित झालेल्या निर्वासितांनी उल्हासनगर शहरात आश्रय घेतला होता. त्यामुळे उल्हासनगर शहर हे निर्वासितांचे शहर म्हणुन ओळखले जाते. उल्हासनगर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ अत्यंत कमी म्हणजे फक्त १३ चौ.कि.मी एवढे आहे. महापालिकेचे क्षेत्रफळ अत्यंत कमी असल्याने शहराच्या विकासासाठी अत्यंत कमी जागा उपलब्ध आहे. त्यामुळे उल्हासनगर शहरात दाटीवाटीने अनेक बांधकामे उभी राहिलेली आहेत.

शहराच्या सर्वांगिण विकासासाठी वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक व स्वतंत्र विकास नियंत्रण नियमावली असणे आवश्यक असल्याने त्याप्रमाणे महासभा ठराव क्र. ६५, दि. ५/१२/२००५ अन्वये सुधारित विकास नियंत्रण नियमावली मंजुर करण्यासाठी व वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक मिळणेसाठी प्रस्ताव मंजुर करुन शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला होता.

दिनांक २७/१२/२००५ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत सदर प्रस्तावास मा. मंत्रीमंडळाने मंजुरी दिलेली असुन याबाबतचा अध्यादेश लवकरच येण्याची शक्यता आहे. सदरचा निर्णय हा उल्हासनगर शहरवासियांसाठी महत्वपुर्ण व विकासाच्या दिशेने जाणारा आहे.

सदरचा निर्णय घेणेकामी कॉंग्रेस (आय) पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा श्रीमती सोनियाजी गांधी, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.ना.श्री. शरदचंद्र पवार, मा.मुख्यमंत्री ना.श्री. विलासराव देशमुख, मा. उपमुख्यमंत्री ना.श्री. आर.आर. पाटील, मा. विधानपरिषद उपसभापती ना.श्री.वसंतराव डावखरे, मा.पालकमंत्री ना. श्री. गणेशजी नाईक, मा. नगरविकास राज्यमंत्री ना.श्री.राजेश टोपे, मा. विधानपरिषद सदस्य श्री गुरुमुख जगवानी, मा. श्री. नितीन गडकरी, स्थानिक आमदार मा.श्री.पप्पु कालानी, मा. श्री कन्हैयालाल गिडवाणी, मा. श्री. पांडुरंग फुंडकर, मा. श्री. गुरुनाथ कुलकर्णी, मा. श्री. जितेंद्र आव्हाड, यांनी महत्वपुर्ण भुमिका बजावलेली आहे.

उल्हासनगर शहरासाठी वरील सर्वांनी विशेष प्रयत्न केल्याने उपरोक्त सर्वांचे अभिनंदन करण्यासाठी स्थायी समितीसमोर प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ७२अ</u> <u>दिनांक:—२८.१२.२००५</u>

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर शहरासाठी विशेष प्रयत्न करुन सुधारित विकास नियंत्रण नियमावली मंजुर केल्याबद्दल कॉंग्रेस (आय) पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा श्रीमती सोनियाजी गांधी, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.ना.श्री. शरदचंद्र पवार, मा.मुख्यमंत्री ना.श्री. विलासराव देशमुख, मा. उपमुख्यमंत्री ना.श्री. आर.आर. पाटील, मा. विधानपरिषद उपसभापती ना.श्री.वसंतराव डावखरे, मा.पालकमंत्री ना. श्री. गणेशजी नाईक, मा. नगरविकास राज्यमंत्री ना.श्री.राजेश टोपे, मा. विधानपरिषद सदस्य श्री गुरुमुख जगवानी, मा. श्री. नितीन गडकरी, स्थानिक आमदार मा.श्री.पप्पु कालानी, मा. श्री कन्हैयालाल गिडवाणी, मा. श्री. पांडुरंग फुंडकर, मा. श्री. गुरुनाथ कुलकर्णी, मा. श्री. जितेंद्र आव्हाड या सर्वांचे आभार व्यक्त करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा

<u>मा. सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

<u>**विषय क्र. १ :–**</u> मागील सभेचे दिनांक २०/१२/०५ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>**मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :–**</u> मा. सभापती महोदया, मागील २ वर्षापासुन आम्ही प्रबुध्द् नगर ते सी ब्लॉक हा रस्ता एम–२५० ने तयार करण्याची मागणी करीत आहोत, परंतु अजुनही त्याचे काम येथे आणले जात नाही. तर पुढील बैठकीत सदरच्या रस्त्याचा प्रस्ताव आणला जावा, ही विनंती.

<u>**मा. सभापती :–**</u> ठिक आहे.

<u>**काही सदस्य :–**</u>पास–पास......

<u>**मा. सभापती :–**</u> मागील सभेचे दिनांक २०.१२.२००५ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

<u>मा. सचिव :–</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. २ :** जकात वसुलीकामी खाजगी अभिकर्ता नेमणेबाबत.

---

<u>**मा. आयुक्त (श्री.डी.एस.पाटील):–**</u> उल्हासनगर महानगरपालिकेचे जकात वसुलीचे काम वर्ष १९९८–१९९९ ते २००३–२००४ पर्यंत खाजगी अभिकर्त्यामार्फत पार पाडण्यात येत होते. अभिकरण योजना प्रारंभ केल्यानंतर ती शक्य तो बंद करण्यात येवू नये असे शासनाचे निर्देश आहेत. काही अपरिहार्य कारणामुळे सदर अभिकरण योजना काही कालावधीसाठी स्थगित करावयाचे असल्यास त्याबाबत महापालिकेने तपशिलवार कारणे नमूद करणे आवश्यक आहे. त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिकेने महासभा ठराव क्र. २०, दिनांक १९/३/२००४ अन्वये कोणतेही कारण नमुद न करता जकात खाजगीकरणास मान्यता न देता ते महापालिका कर्मचा–यांमार्फत करण्याचा निर्णय घेतला. त्यानुषंगाने दिनांक २७/७/२००४ पासून जकात वसुलीचे काम महापालिका कर्मचा–यांमार्फत पार पाडण्यात येत आहे.

**जकातीचे खाजगीकरण केल्यामूळे प्राप्त झालेल्या वसुलीचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.**

| अ. क्र. | वर्ष | रक्कम | प्रतिदिवस | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | १९९९–२००० | ३३.०३ कोटी | ९.०५ लाख | १२ महिन्याचे कालावधीसाठी |
| २ | २०००–२००१ | ४५.१५ कोटी | १२.३७ लाख | १२ महिन्याचे कालावधीसाठी |
| ३ | २००१–२००२ | ४३.७७ कोटी | ११.९९ लाख | १२ महिन्याचे कालावधीसाठी |
| ४ | २००२–२००३ | ५१.६५ कोटी | १४.१५ लाख | १२ महिन्याचे कालावधीसाठी |
| ५ | २००३–२००४ | ५६.२५ कोटी | १५.४१ लाख | १२ महिन्याचे कालावधीसाठी |

**जकात वसुलीचे काम महापालिका कर्मचा–यांमार्फत करण्याचे ठरल्यानंतर प्राप्त झालेल्या वसुलीचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | कालावधी | रक्कम | प्रतिदिवस | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २५/७/२००४ ते ३१/३/२००५ पर्यंत | ४४.८९ कोटी | १८.०२ लाख | –– |
| २ | १/४/२००५ ते १५/१०/२००५ पर्यंत | ३५.४० कोटी | १७.८८ लाख | वर्ष २००५–०६ मध्ये एकुण ८ वस्तुंच्या जकात दरात वाढ करण्यात आली व त्यानंतर ३ वस्तुंचे जकात |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | दर कमी करण्यात आले. त्यामुळे अंदाजे ५.०० कोटी उत्पन्न अपेक्षित आहे. सदर वाढ प्रतिदिवस १,३७,०००/— होत आहे. |

जकात वसुलीचे काम महापालिका कर्मचा—यांमार्फत पार पाडणेसाठी खालीलप्रमाणे दरवर्षी खर्च करावा लागतो.

| अ.क्र. | खर्चाचा तपशिल | खर्च |
|---|---|---|
| १ | पगार व भत्ते | २.०० कोटी |
| २ | संगणकीकरण व साहित्य खर्च | ०.२४ कोटी |
| ३ | वाहन व्यवस्था | ०.२४ कोटी |
| ४ | मजूरांवरील खर्च | ०.०९ कोटी |
| ५ | इतर खर्च | ०.१२ कोटी |
| एकुण | | २.६९ कोटी<br>(प्र.दि. ७३,६९८/—) |

उपरोक्त जकात आकडेवारीचे अवलोकन केले असता, जकात वसुलीच्या आकडेवारीत ब—याच प्रमाणात घट झाल्याचे दिसून येते. शिवाय अंदाजे २५० कर्मचारी जकात विभागात वर्ग केल्याने सर्व विभाग विशेष करुन कर वसुली व पाणीपट्टी वसुलीवर परिणाम झाल्याचे दिसते.

सबब जकात वसुलीचे काम पुन्हा अभिकर्त्यामार्फत पार पाडणेसाठी पुढीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

किमान देयक आकारणी :—

मागील तीन वर्षात करण्यात आलेल्या जकात वसुलीचा तपशिल :—

| अ.क्र. | वर्ष | रक्कम | प्रतिदिवस |
|---|---|---|---|
| १ | २००२—२००३ | ५१.६५ कोटी | १४.१५ लाख |
| २ | २००३—२००४ | ५५.७४ कोटी | १५.२७ लाख |
| ३ | २००४—२००५ | ६१.६७ कोटी | १६.९० लाख |
| ४ | २००५—२००६<br>(दि. १/४/०५ ते ५/१०/०५) | ३५.४० कोटी | १७.८८ लाख |

| | |
|---|---|
| पुर्वीच्या अभिकरणामुळे स्वीकृत निविदा रक्कम किंवा पुर्वीच्या लगतच्या तीन वित्तीय वर्षात जकातीपासुन मिळालेले उत्पन्न यातील जास्त असलेली वार्षिक रक्कम (५६.२५ कोटी — ६१.६७ कोटी) | रुपये ६१.६७ कोटी |
| अधिक १५ टक्के वाढ. | रुपये ०९.२५ कोटी |
| ८ वस्तुंच्या जकात दरात वाढीमुळे अपेक्षित उत्पन्न | रुपये ०५.७५ कोटी. |
| **एकुण किमान देकार रक्कम** | **रुपये ७६.६७ कोटी** |
| **एकत्रित** | **रुपये ७६.७० कोटी** |

| | |
|---|---|
| निविदेची कालावधी | कार्यादेशापासून १२ महिने |
| निविदा फॉर्म फी | रुपये १०,०००/— |
| इसारा रक्कम | रुपये ७६,७०,०००/— |
| सुरक्षा अनामत रक्कम<br>(चार समान रक्कमेची बॅक गॅरंटी) | रुपये १२,२७,२०,०००/— |

**इतर अटी व शर्ती :**

उपरोक्त फेरफाराच्या अधिन राहुन इतर सर्व अटी व शर्ती वर्ष २००३—२००४ मध्ये जकात अभिकर्ता नेमणेसाठी नमुद केलेल्या सर्व अटी व शर्ती जसेच्या तसे लागु करणेसाठी प्रस्तावित आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ८ चे कलम ३५ नुसार जकात वसुलीकामी अभिकर्ता नेमण्यासाठी मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे प्रस्तावित करीत आहे.

<u>मा. सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u> मा. सभापती महोदया, जकातीचे खाजगीकरण करणे अत्यावश्यक आहे. यामुळे महापालिकेचे उत्पन्न वाढेल तसेच तेथील जो कर्मचारीवर्ग आहे तो कर विभागात वर्ग केल्यास मालमत्ता कराची वसुली देखिल वाढेल. प्रशासनाचा जो गोषवारा आहे तो २९ ऑक्टोबरचा आहे, तसेच या गोषवा–यावर मागील आयुक्त श्री सोनवणे यांची सही आहे. तर यामुळे काही तांत्रिक अडचण तर उद्‌भवणार नाही?

<u>मा. सभापती :–</u> मी सर्वांना सांगु इच्छिते की, हा गोषवारा ऑक्टोबरमध्ये आला होता. परंतु त्यावेळी दिवाळी असल्याने जकात वसुलीत वाढ झाली होती. त्यामुळे आम्ही त्यावेळी यावर विचार केला नव्हता. पण दिवाळी नंतर आपण पाहिले तर दिसुन येईल की वसुली अत्यंत कमी झाली आहे. याबद्‌दल विविध वर्तमानपत्रांमध्ये देखिल बातम्या छापुन येत आहेत. अशीच परिस्थिती राहिल्यास आपल्यास पगार, बिले देणे अशक्य होईल. आपण एमआयडीसीचे बिल देखिल देवु शकत नाही. त्यामुळे वारंवार पाणी कपात होत असते. विकासाची कामे देखिल ठप्प झालेली आहेत. खाजगीकरण केल्याने कर्मचारी मालमत्ता कर विभागात जातील, त्यामुळे कर वसुलीत देखिल वाढ होईल.

<u>मा. सदस्य श्री मोहन साधवानी :–</u> मी आपल्याशी सहमत आहे. परंतु आयुक्त साहेबांनी देखिल त्यांचे मत द्यावे.

<u>मा. सभापती :–</u> आता जी महासभा झाली त्यामध्ये आयुक्तांनी देखिल खाजगीकरण करण्याबद्‌दल सहमती दर्शविली आहे.

<u>मा. सचिव :–</u> आता हा जो प्रस्ताव आला आहे हा बेकायदेशिर नाही. हा आयुक्तांचा अधिकार आहे. आयुक्त त्यांच्या आधीच्या आयुक्तांचे निर्णय रद्‌द करु शकत नाहीत. त्यांना आवश्यकता भासल्यास ते त्यामध्ये बदल मात्र करु शकतात.

<u>मा. सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u> मा. सभापती महोदया, जकातीचे खाजगीकरण हे करायलाच हवे. सध्या महापालिकेची आर्थिक परिस्थिती खराब आहे यामुळे आर्थिक परिस्थितीत सुधारणा होवु शकते. आमच्या मागील अनुभवाप्रमाणे खाजगीकरण केल्याने व्यापा–यांना त्रास होतो. हे देखिल लक्षात घ्यायला हवे. जकात ठेकेदाराने व्यापा–यांना त्रास द्यायला नको. तसेच ठेकेदाराने देखिल मनमानी करता कामा नये. काहीही विवाद निर्माण झाल्यास अंतिम निर्णय घ्यायचा अधिकार मा. महापौरांना द्यायला हवा. काहीही विवाद उत्पन्न झाल्यास ठेका रद्‌द करण्याचा अधिकारही मा. महापौरांना द्यायला हवा. निवडुन आलेले जनप्रतिनिधी हे सामान्य जनतेचे दु:ख समजु शकतात. त्यामुळे मा. महापौरांना निर्णय घ्यायला अधिकार द्यायला हवा.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :–</u> हे योग्य आहे. व्यापा–यांचा सन्मान व्हायला हवा. व्यापा–यांना काही त्रास झाल्यास ते नगरसेवकाला संपर्क करु शकतात. कोणाचीही बेइज्जती होता कामा नये. स्थायी समितीला ठेका रद्‌द करण्याचे अधिकार आहेत, त्यामुळे मा. सभापती हया निर्णय घेवु शकतात. ठेकेदाराने १० पट दंडाची आकारणी करायला नको. खाजगीकरण केल्याने महसुलात वाढ होईल. आता महापालिका हे काम करीत होते तर निश्चित उत्पन्न प्राप्त होत नव्हते, उत्पन्न कमी जास्त होत होते. महापालिकेला विविध कामे उदा. विद्युत, गटार, पायवाटा ही कामे करावी लागतात, उत्पन्न जास्त प्राप्त झाल्यास ही कामे करता येवु शकतील. परंतु व्यापा–यांचेही हीत बघायला हवे, त्यांना त्रास व्हायला नको. व्यापारी राहतील तर शहर राहील.

<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी :–</u> मी सांगु इच्छितो की, जकात खाजगीकरणाचा मुद्‌दा ऑक्टोबर पासुन प्रलंबित आहे. आम्ही देखिल खाजगीकरण करु इच्छित नव्हतो. सर्व पक्षांचा असाच निर्णय होता. परंतु महापालिका आयुक्त श्री.आर.के.सोनवणे यांच्या कार्यकालात जकात वसुली अत्यंत कमी झाली होती. यामुळे महापालिकेचे नुकसान होत होते. महापालिकेकडे पाण्याचे बिल भरण्यासाठी देखिल नव्हते. तसेच श्री. सोनवणे यांच्या काळात व्यापा–यांना मोठया प्रमाणावर जाच होत होता. यामुळे कंटाळुन २० ते २५ संस्थांनी देखिल आमच्याकडे जकात खाजगीकरण करण्यासाठी मागणी केली होती. महासभेत देखिल यावर वारंवार प्रश्न, लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली होती. महापालिकेने खाजगीकरण केल्यास ठोस उत्पन्न प्राप्त होवु शकेल. प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावात मी पुढीलप्रमाणे सुधारणा सुचवित आहे.

**प्रशासनामार्फत** सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेण्याअगोदर वस्तुस्थितीवर चर्चा होणे आवश्यक असून ती पुढील प्रमाणे.

**दिनांक** २५/७/२००४ पासून जकात वसुलीचे काम महापालिका कर्मचा—यांमार्फत पार पाडण्यात येत आहे . दिनांक २५/७/२००४ ते ३१/३/२००५ पर्यंत झालेल्या वसुलीचा आढावा घेतल्यास तो पुढील प्रमाणे .

| अ.क्र. | कालावधी | दिवस | रककम |
|---|---|---|---|
| १ | २५/७/२००४ ते ३१/७/२००४ | ०७ | ९४,०६,५६४/— |
| २ | ऑगष्ट् , २००४ | ३१ | ४,७१,८५,७२८/— |
| ३ | संप्टेंबर, २००४ | ३० | ५,६१,२१,७६७/— |
| ४ | आक्टोंबर, २००४ | ३१ | ६,४०,१९,४३७/— |
| ५ | नोव्हेंबर, २००४ | ३० | ४,८१,९०,९९२/— |
| ६ | डिसेंबर, २००४ | ३१ | ६,२५,५९,७५७/— |
| ७ | जानेवारी, २००५ | ३१ | ५,७६,७५,७४९/— |
| ८ | फेब्रुवारी, २००५ | २८ | ५,०६,२२,८९७/— |
| ९ | मार्च , २००५ | ३१ | ५,३१,३३,७४३/— |
| | एकूण | २५० | ४४,८९,१६,६३४/— |

**वरील प्रमाणे एक दिवसाची सरासरी वसुली रुपये १७,९५,६६६/— झाली असल्याचे दिसते .**

<u>वर्ष २००५ — २००६</u>

महानगरपालिकेने वर्ष २००५ — ०६ करिता शहरात आयात होणा—या ८ वस्तुच्या जकात दरात वाढ केली. त्यानतंर दोन वस्तुच्या जकात दरात घट करण्यात आली.

काही वस्तुच्या जकात दरात करण्यात आलेल्या सदर वाढीचा शहरातील उदयोगधंदयावर विपरीत परिणाम झाले असल्याचे दिसते.

वर्ष २००५—२००६ मध्ये दिनांक १/४/२००५ ते २६/१२/२००५ पर्यंत झालेल्या वसुलीचा तपशिल पुढील प्रमाणे आहे .

| अ.क्र. | कालावधी | दिवस | रककम |
|---|---|---|---|
| १ | एप्रिल, २००५ | ३० | ५,१८,९१,४१३/— |
| २ | मे , २००५ | ३१ | ५,९१,७२,६७७/— |
| ३ | जुन, २००५ | ३० | ५,४८,६४,६५४/— |
| ४ | जुलै, २००५ | ३१ | ४,८१,१८,८११/— |
| ५ | ऑगष्ट, २००५ | ३१ | ५,३०,०३,५१२/— |
| ६ | संप्टेंबर, २००५ | ३० | ५,४८,१२,०७६/— |
| ७ | आक्टोंबर, २००५ | ३१ | ६,३२,४१,७९२/— |
| ८ | नोव्हेंबर, २००५ | ३० | ५,०४,४६,१७०/— |
| ९ | डिसेंबर, २००५ (दि. २६ डिसेंबर पर्यंत) | २६ | ३,८५,६४,९१४/— |
| | एकूण | २७० | ४७,४१,१६,०१९/— |

**वरील** प्रमाणे एक दिवसाची सरासरी वसुली रुपये १७,५५,९८५/— एवढी झाली असून वर्ष २००५—२००६ मध्ये एकुण उत्पन्न रुपये ६४,०९,३४,५२५/— होईल , हे स्पष्ट आहे .**त्यामधून** जर महापालिकेतर्फे आस्थापनेवर करण्यात येत असलेला खर्च रुपये २,६९,००,०००/— वजा केल्यास निव्वळ उत्पन्न फक्त रुपये ६१,४०,३४,५२५/— होईल, ही वस्तुस्थिती आहे .

**मागील** दोन वर्षात जकात वसुलीत टक्केवारी प्रमाणे झालेली वाढ याचा तपशिल पुढील प्रमाणे

| अ.क्र | वर्ष | रक्कम | टक्केवारी वाढ % | सरासरी |
|---|---|---|---|---|
| १ | २००२—२००३ | ५१.६५ कोटी | ८ % | ९.५% |
| २ | २००३—२००४ | ५५.७४ कोटी | ११ % | |
| ३ | २००४—२००५ | ६१.६७ कोटी | | |

वित्तिय वर्ष २००२ — २००३ मध्ये किमान देकार रक्कम रु. ५७.०० कोटी निश्चित करण्यात आली होती परंतु अंतिमरित्या अभिकर्त्याची निविदा रु. ५४.५४ कोटी मध्ये स्विकारण्यात आली.

तसेच वर्ष २००३ – २००४ मध्ये किमान देकार रक्कम रु. ६०.०० कोटी निश्चित करण्यात आली होती परंतु अंतिमरित्या अभिकर्त्याची नेमणुक रु. ५६.२५ कोटी मध्ये करण्यात आली. व शासनाने ही त्यासाठी मान्यता दिली.

**उपरोक्त** सर्व बाबींचा सखोल अभ्यास व शहानिशा करुन किमान देकार रक्कम ही वस्तुस्थितीवर आधारित असणे आवश्यक आहे असे आमचे मत आहे. तरी किमान देकार रक्कम व इतर बाबी पुढील प्रमाणे निश्चित करण्यात यावी असे प्रस्तावीत करण्यात येत आहे

चालू वर्षात झालेली रक्कम रुपये १७,५५,९८५/–
सरासरी वसुली गृहीत धरुन ३६५ दिवसांसाठी

| | | |
|---|---|---|
| अपेक्षित उत्पन्न ( १७,५५,९८५ X ३६५ ) | | ६४,०९,३४,५२५/– |
| नैसर्गिक वाढ ( १० % ) | | ६,४०,९३,४५३/– |
| किमान देकार रक्कम | | ७०,५०,२७,९७८/– |
| प्रती दिवस | : | रुपये १९,३१,५८३ . ५०/– |
| निविदा फॉर्म फी | : | रुपये १०,०००/– |
| इसारा रक्कम (किमान देकार रक्कमेच्या ५ टक्के. ) (प्रशासनामार्फेत सादर केलेल्या प्रस्तावात नजरचुकीने १ टक्के दराने नमुद करण्यात आल्याचे दिसते.) | : | रुपये ३,५२,५१,३९९/– |
| सुरक्षा अनामत रक्कम (किमान देकार रक्कमेच्या १६ टक्के. ) (चार समान बॅक गॅरंटी कोणत्याही राष्ट्रीयकृत, शेडुयल्ड किंवा सहकारी (को.ऑ.) बॅकचा ) | : | रुपये ११,२८,०४,४७६/– |
| कालावधी | : | कार्यादेशापासून एक वर्ष |

कामाचे स्वरुप व परिमाण लक्षात घेवून अभिकर्ता नेमण्यासाठी निविदेत खालील अटी व शर्ती आवश्यक राहतील.

१. नगरपालिका करिता शासनाने जकात अभिकर्ता नेमण्यासबंधी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती.
२. जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदाधारकास पुर्वीचा किमान एक वर्षाचा व एका वर्षात किमान ३० कोटी रक्कमेच्या जकात वसुलीचा अनुभव असावा.
३. जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदाधारकाने पुर्ण झालेल्या लगतच्या मागील ३ वर्षात म्हणजेच वर्ष २००२ – २००३, २००३ – २००४ व २००४ – २००५ मध्ये प्रत्येक वर्षी किमान ३५ कोटी इतक्या आर्थिक रकमेची उलाढाल (Turn over) केलेली असावी व त्यासाठी ३ वर्षाचे लेखा परिक्षण करण्यात आलेले लेखा विवरण पत्र सादर करणे आवश्यक आहे.
४. जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदाधारकाची भांडवली स्थिती (Net Worth) किमान देकार रक्कमेच्या किमान ५ टक्के एवढी असावी व त्यासाठी २००४ – २००५ या वर्षाचे लेखा परिक्षण करण्यात आलेले लेखा विवरण पत्र सादर करणे आवश्यक असावे.
५. सयुंक्तपणे (Joint venture) सादर केलेली निविदा स्विकारण्यात येवू नये.
६. इसारा रक्कम निविदा सादर करण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या तारखेच्या एक दिवस अगोदर जमा करुन प्राप्त झालेल्या पावती, लिफाफा क्रमांक १ मध्ये सादर करणे आवश्यक असावे.

उपरोक्त सर्व अटी व शर्तीचा समावेश निविदा पत्रक तसेच जाहीर नोटीस मध्ये पुर्व पात्रता अट म्हणून करण्यात यावा. तसेच उपरोक्त सर्व अटी व शर्ती पुर्ण करणा–या इच्छुक निविदाधारंकासच निविदा पत्रक देण्यात यावे.

उप आयुक्त (मुख्यालय)(श्री.उत्तम लोणारे) :– आम्ही जो प्रस्ताव सादर केला आहे त्यामध्ये आपण ज्या सुधारणा सुचविल्या तर यावर मी सांगु इच्छितो की, आम्ही शासनाची जी मार्गदर्शक तत्वे आहेत ती बघुन त्याप्रमाणे निविदेची कार्यवाही करु. तसेच आम्ही किमान देकार रक्कम रु ७६.६७ कोटी एवढी ठेवली होती. ती तेवढीच ठेवली असती तर योग्य झाले असते. आता तुम्ही येथे किमान देकार रक्कम रु ७०.५० कोटी एवढी

केली आहे. तसेच आपण ज्या अटी ठेवल्या आहेत त्यामुळे स्पर्धा होणार नाही, आपल्याला जो जास्त देकार रक्कम देईल त्यालाच ठेका देणे योग्य होईल. त्यामुळे अटी देखिल बघायला हव्यात. तसेच श्री. राजु जग्यासी यांनी सांगितले की, मा. महापौरांना ठेका रद्द करण्याचा अधिकार द्यावा तर ही बाब देखिल प्रशासनाशी संबधित असल्याने प्रशासनच योग्य ती कारवाई करेल.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– कृपया आयुक्त या विषयावर बोलले तर योग्य होईल. तसे आता आपण जो प्रस्ताव पारीत करीत आहोत अशाच प्रकारचे प्रस्ताव यापूर्वी सन २००३–०४, २००४–०५ मध्ये देखिल आम्ही पारित केलेले आहेत. यामध्ये नवीन असे काहीच नाही. त्याच धर्तीवर आम्ही येथे प्रस्ताव पास करीत आहोत.

उप आयुक्त (मुख्यालय)(श्री.उत्तम लोणारे) :– आम्ही सन २००३–०४ च्या निविदेमध्ये ज्या अटी व शर्तीचा अंतर्भाव होता तसेच शासनाची जी मार्गदर्शक तत्वे आहेत त्याप्रमाणे कारवाई करु.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– ही काही पहिलीच निविदा नाही. आम्ही किमान देकार रक्कम रु ७०.५० कोटी ठेवली आहे. निविदेनंतर स्पर्धा होवुन ही रक्कम वाढु देखिल शकते. रु ८०–९० कोटी पर्यंत निविदा प्राप्त होवु शकते.

उप आयुक्त (मुख्यालय)(श्री.उत्तम लोणारे) :– सध्या सरासरी रु १८ लाख दैनिक वसुली प्राप्त होते. आमच्या अंदाजाप्रमाणे रु ६१.७६ कोटी प्राप्त होतील. जर आपण बघितले तर आठ बाबींचे दर आपण वाढविले आहेत त्यामुळे त्यापासनु रु ५.७६ कोटी आपणांस प्राप्त होतील. त्यामध्ये १५ टक्के वाढ गृहित धरल्यास रु ७६.६७ कोटी आपणांस प्राप्त होवु शकतात. त्यामुळे कमीत कमी एवढी रक्कम ठेवणे योग्य होईल.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– तुम्ही आता रु ७६.६७ कोटी ठेवण्याची मागणी करीत आहात तर आमचे म्हणणे असे आहे की, खाजगीकरण न करता महापालिकेमार्फतच वसुली करावी. तुम्ही आम्हाला रु ७० कोटी तरी आणुन दाखवा. जेव्हा स्वत: वसुली करता तेव्हा एवढी कमी वसुली करता. आता आमचे मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी अहवाल दिला आहे की, एमआयडीसीचे बिल भरण्यास पैसे नाहीत. खाजगीकरणाने निश्चित उत्पन्न प्राप्त होवु शकते. आम्ही जी रु ७०.५० कोटी एवढी रक्कम ठेवली आहे तुम्ही एवढी तरी वसुली करुन दाखवा. तुम्ही वसुली व्यवस्थित करीत नाही यामुळे महासभेत आम्हाला सहायक आयुक्तांना निलंबीत करण्याचे आदेश द्यावे लागले.

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी :– सध्या शहरातील परिस्थिती खराब आहे. लोकांचे धंदे पण कमी झाले आहेत. ते एवढी वसुली करतील तरी कसे?

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :– एवढया दिवसात प्रशासनाने किती वसुली केली ते आम्हाला दाखवा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– आम्ही जी किमान देकार रक्कम ठरवली आहे. ती वस्तुस्थितीला धरुन काढलेली आहे. तसेच २००३–०४ ला ज्या अटी होत्या त्याच आता देखिल आहेत. खाजगीकरण केल्यानंतर कर विभागात कर्मचारी नेमुन मालमत्ता कराची वसुली वाढु शकते. सध्या आपल्याला कर्मचा–यांचा पगार, स्टेशनरी, गाडयांचा खर्च, लाईटबिल, टेलिफोन बिल हा सर्व खर्च करावा लागतो. खाजगीकरणानंतर हा सर्व खर्च ठेकेदार करेल.

मा. सदस्य श्री. राजु जग्यासी :– मा. सभापती महोदया, जकात खाजगीकरण केल्यानंतर व्यापारी व ठेकेदार यात विवाद उत्पन्न होवु नये यासाठी मा. महापौरांच्या अध्यक्षतेखाली एक समिती बनविण्यात यावी. जेणेकरुन काहीही विवाद उत्पन्न झाल्यास मा. महापौर त्यावर तोडगा काढु शकतील.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– आम्हाला अशी आशा आहे की, खाजगीकरणानंतर काहीही विवाद उत्पन्न होणार नाही, जर काही विवाद उत्पन्न झाला तर त्यावर मा. महापौर व आयुक्त मिळुन संयुक्तरित्या मार्ग काढतील.

उप आयुक्त (मुख्यालय)(श्री.उत्तम लोणारे) :– माझे म्हणणे असे होते की, किमान देकार रक्कम थोडी जास्त ठेवली असती तर बरे झाले असते.

मा. सदस्य श्री. राजु जग्यासी :– लोणारे साहेब आपण येथे येण्यापूर्वी मा. सभापतींची परवानगी घेतली होती काय? तसेच बोलण्यासाठी अनुमती घेतली होती काय? आपण येथे कसे काय बसलात?

मा. सभापती :– मी आपल्या निदर्शनास आणु इच्छिते की, यापूर्वी जेव्ही श्री आर.डी.शिंदे हे आयुक्त होते, त्यावेळी ते मला विचारल्याशिवाय कधीही सभागृहाचा वापर करीत नव्हते. काहीही बैठक घ्यायची असल्यास ते प्रथम माझी अनुमती घ्यायचे त्यानंतरच सभागृहाचा वापर करायचे. यामुळे येथे येण्यापूर्वी व बोलण्यापूर्वी सभापतींची अनुमती घेणे आवश्यक आहे. आपण सभागृहाची मर्यादा पाळायला हवी. तसेच जकातीच्या मुद्दयाबाबत मी सांगु इच्छिते की, शहरातील व्यापा–यांचा खाजगीकरणाला विरोध आहे परंतु आम्ही त्यांची समजुत घातली आहे. व्यापा–यांना कधीही त्रास व्हायला नको. आम्ही व्यापा–यांना होणा–या त्रासाच्या विरोधात आहोत.

मा. आयुक्त (श्री डी.एस.पाटील) :– किमान देकार रक्कम रु ७६.६७ कोटी एवढी ठेवली असती तर बरे झाले असते.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :– आम्ही जेव्हा महासभेत जकातीवर प्रश्न विचारतो तेव्हा अधिकारी तेथुन पळुन जातात.

मा. सभापती :– व्यापा–यांना त्रास व्हायला नको म्हणुन आम्ही खाजगीकरण रद्द केले होते. परंतु मी येथे उदाहरण देवु इच्छिते, उल्हासनगर मधील काही सोनार मुंबई येथुन सोने आणतात व नंतर त्याचे दागिने बनवुन पुन्हा मुंबईला पाठवितात, त्यामुळे त्यांच्याकडुन जकातीची आकारणी करणे योग्य नाही. मी याबद्दल यापूवीच्या आयुक्तांना सांगितले असता त्यांनी काही एक न ऐकता त्यांना हाकलुन दिले होते. तसेच मुरबाड येथे एक व्यापारी धंदा करतो, तेथे त्याचा धंदा चालतो, येथे फक्त त्याचे एक छोटे कार्यालय आहे. तो येथे एस्कॉर्ट फी भरुन माल घेवुन जातो. तरी देखिल त्याच्याकडुन जकातीची मागणी केली जात होती. तो व्यापारी माझ्याकडे सर्व कागदपत्रे घेवुन आला होता, त्याने मला समजावुन सांगितल्यानंतर मी आयुक्तांना फोन करुन त्याला न्याय देण्याबाबत सांगितले असता आयुक्तांनी त्याला शिपायाकरवी हाकलुन दिले तसेच त्याच्याकडुन १०पट जकातीची आकारणी रु ९६००० एवढी केली. असे व्हायला नको.

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी :– श्री. बनसोडे यांनी सांगावे की अशाप्रकारे समिती बनवता येईल अथवा नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– सर्वांचे म्हणणे हेच आहे की, व्यापा–यांना त्रास व्हायला नको. यामध्ये कोणाचेही दुमत नाही. आपण जर बघितले तर दिसुन येईल की, यापूर्वी प्रशासनाने रु ६० कोटी एवढी किमान देकार रक्कम असताना रु ५६ कोटी तसेच रु ५७ कोटी एवढी देकार रक्कम असताना रु ५४ कोटीचे प्रस्ताव स्विकृतीसाठी आमच्यासमोर आणले होते. यासाठी शासनाने देखिल परवानगी दिली होती. आमचे असे म्हणणे आहे की, किमान रक्कम रु ७०.५० कोटी ठेवल्यानंतर स्पर्धा होवुन जास्त रक्कम प्राप्त होवु शकते. महापालिका जकात वसुलीमध्ये अपयशी ठरली आहे. तसेच माझी विनंती आहे की, निविदा प्रक्रिया लवकरात लवकर सुरु करावी. तसेच जे २५० कर्मचारी आहेत त्यांना कर विभागात पाठवावे.

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी :– मा. सभापती महोदया, माझी विनंती आहे की, यापूढे जेव्हा स्थायी समितीची बैठक असेल त्यावेळी विधी अधिका–यांना येथे उपस्थित राहणेसाठी आदेश देण्यात यावेत.

मा. सचिव :– जकात वसुलीसाठी प्रशासनाने रु ७६.६७ कोटी किमान देकार रक्कमेचा प्रस्ताव सादर केला होता, स्थायी समितीने सदर प्रस्तावात पुढीलप्रमाणे मुख्यउसुधारणा सुचविल्या आहेत.

१) किमान देकार रक्कम रु. ७०,५०,२७,९७८/– एवढी राहील.

२) महापालिकेला अशा अभिकरण व्यवस्थेसाठी राज्य शासनाने नगरपालिकांसाठी ठरवुन दिलेल्या अशा अटी व शर्तीशी सुसंगत असलेल्या अटी व शर्ती देखिल विनिर्दीष्ट करता येतील.

३) जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदाधारकास पुर्वीचा किमान एक वर्षाचा व एका वर्षात किमान ३० कोटी रक्कमेच्या जकात वसुलीचा अनुभव असावा.

४) जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदाधारकाने पुर्ण झाालेल्या लगतच्या मागील ३ वर्षात म्हणजेच वर्ष २००२ – २००३, २००३ – २००४ व २००४ – २००५ मध्ये प्रत्येक वर्षी किमान ३५ कोटी इतक्या आर्थिक रकमेची उलाढाल (Turn over) केलेली असावी व त्यासाठी ३ वर्षाचे लेखा परिक्षण करण्यात आलेले लेखा विवरण पत्र सादर करणे आवश्यक आहे.

५) जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदाधारकाची भांडवली स्थिती (Net Worth) किमान देकार रक्कमेच्या किमान ५ टक्के एवढी असावी व त्यासाठी २००४ – २००५ या वर्षाचे लेखा परिक्षण करण्यात आलेले लेखा विवरण पत्र सादर करणे आवश्यक असावे.

६) सयुंक्तपणे (Joint venture) सादर केलेली निविदा स्विकारण्यात येवू नये.

७) इसारा रक्कम निविदा सादर करण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या तारखेच्या एक दिवस अगोदर जमा करुन प्राप्त झालेल्या पावती, लिफाफा क्रमांक १ मध्ये सादर करणे आवश्यक असावे.

<u>काही सदस्य :–</u> पास–पास.................

<u>मा. सभापती :–</u> सदरचा प्रस्ताव पुढील प्रमाणे सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

<u>विषय क्र. २ : जकात वसुलीकामी खाजगी अभिकर्ता नेमणेबाबत.</u>

<u>प्रस्तावना</u> :

**जकात** वसुलीचे काम खाजगी अभिकर्त्यामार्फत करणेबाबत प्रशासनामार्फत प्राप्त झालेल्या प्रस्तावाचा तपशिल पुढील प्रमाणे

**उल्हासनगर** महानगरपलिकेचे जकात वसुलीचे काम वर्ष १९९८–१९९९ ते २००३–२००४ पर्यत खाजगी अभिकर्त्यामार्फत पार पाडण्यात येत होते . अभिकरण योजना प्रारंभ केल्यानंतर ती शक्य तो बंद करण्यात येवू नये असे शासनाचे निर्देश आहेत . काही अपरिहार्य कारणामुळे सदर अभिकरण योजना काही कालावधीसाठी स्थगित करावयाचे असल्यास त्याबाबत महापालिकेने तपशिलवार कारणे नमूद करणे आवश्यक आहे . त्यानुसार उल्हासनगर महानगरपलिकेने महासभा ठराव क्रमांक : २० दिनांक १९/३/२००४ अन्वये कोणतेही कारण नमूद न करता जकात खाजगीकरणास मान्यता न देता ते महापालिका कर्मचा–यांमार्फत करण्याचा निर्णय निर्णय घेतला . त्यानुषंगाने दिनांक २५/७/२००४ पासून जकात वसुलीचे काम महापालिका कर्मचा–यांमार्फत पार पाडण्यात येत आहे .

**जकातीचे** खाजगीकरण केल्यामूळे प्राप्त झालेल्या वसुलीचा तपशिल पुढील प्रमाणे आहे .

| अ.क्र. | वर्ष | रक्कम | प्रतिदिवस | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | १९९९–२००० | ३३.०३ कोटी | ९.०५ लाख | १२ महिन्याचे कालावधीसाठी |
| २ | २०००–२००१ | ४५.१५ कोटी | १२.३७ लाख | १२ महिन्याचे कालावधीसाठी |
| ३ | २००१–२००२ | ४३.७७ कोटी | ११.९९ लाख | १२ महिन्याचे कालावधीसाठी |
| ४ | २००२–२००३ (२५/७/०२ ते २४/७/०३) | ५४.५४ कोटी | १४.९४ लाख | १२ महिन्याचे कालावधीसाठी |
| ६ | २००३–२००४ (२५/७/०३ ते २४/७/०४) | ५६.२५ कोटी | १५.४१ लाख | १२ महिन्याचे कालावधीसाठी |

**जकात** वसुलीचे काम महापालिका कर्मचा–यांमार्फत करण्याचे ठरल्यानंतर प्राप्त झालेल्या वसुलीचा तपशिल पुढील प्रमाणे आहे

| अ. क्र. | कालावधी | रक्कम | प्रतिदिवस | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २५/७/००४ ते ३१/३/२००५ पर्यंत. | ४४.८९ कोटी | १८.०२ लाख | –– |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | १/४/२००५ ते १५/१०/२००५ पर्यंत. | ३५.४० कोटी | १७.८८ लाख | वर्ष २००५–०६ मध्ये एकूण ८ वस्तुंच्या जकात दरात वाढ करण्यात आली व त्यानंतर २ वस्तुंचे जकात दर कमी करण्यात आले .त्यामूळे अंदाजे ५.०० कोटी उत्पन्न अपेक्षित आहे .सदर वाढ प्रतिदिवस १,३७,००० /– होत आहे . |

**जका**त वसुलीचे काम महापालिका कर्मचा–यांमार्फत पार पाडणेसाठी खालील प्रमाणे दरवर्षी खर्च करावा लागतो.

| अ.क्र | खर्चाचा तपशिल | खर्च |
|---|---|---|
| १ | पगार व भत्ते . | २.०० कोटी |
| २ | संगणकीकरण व साहित्य खर्च | ०.२४ कोटी. |
| ३ | वाहन व्यवस्था | ०.२४ कोटी. |
| ४ | मजूरांवरील खर्च | ०.०९ कोटी |
| ५ | इतर खर्च . | ०.१२ कोटी |
| | एकुण | २.६९ कोटी<br>(प्र.दि. ७३,६९८/–) |

उपरोक्त जकात आकडेवारीचे अवलोकन केले असता, जकात वसुलीच्या आकडेवारीत ब–याच प्रमाणात घट झाल्याचे दिसून येते . शिवाय अंदाजे २५० कर्मचारी जकात विभागात वर्ग केल्याने सर्व विभाग विशेषकरुन **कर वसुली व पाणीपट्टी** वसुलीवर परिणाम झाल्याचे दिसते.

**सबब** जकात वसुलीचे काम पुन्हा अभिकर्त्यामार्फत पार पाडणेसाठी पुढील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

किमान देयक आकारणी :––

मागील तीन वित्तिय वर्षात करण्यात आलेल्या जकात वसुलीचा तपशिल : –

| अ.क्र. | वर्ष | रक्कम | प्रतिदिवस |
|---|---|---|---|
| १ | २००२–२००३ | ५१.६५ कोटी | १४.१५ लाख |
| २ | २००३–२००४ | ५५.७४ कोटी | १५.२७ लाख |
| ३ | २००४–२००५ | ६१.६७ कोटी | १६.९० लाख |
| ४ | २००५–२००६<br>( दि.१/४/०५ ते १५/१०/०५ ) | ३५.४० कोटी | १७.८८ लाख |

| | |
|---|---|
| पुर्वीच्या अभिकरणामुळे स्वीकृत निविदा रक्कम किंवा पुर्वीच्या लगतच्या तीन वित्तीय वर्षात जकातीपासून मिळालेले उत्पन्न यातील जास्त असलेली वार्षिक रक्कम (५६.२५ कोटी – ६१.६७ कोटी) | रुपये ६१.६७ कोटी |
| आधिक १५ टक्के वाढ . | रुपये ०९.२५ कोटी |
| ८ वस्तुंच्या जकात दरात वाढीमूळे अपेक्षित उत्पन्न . | रुपये ०५.७५ कोटी |
| एकूण किमान देकार रक्कम | रुपये ७६.६७ कोटी |
| एकत्रित | रुपये ७६.७० कोटी |
| निविदेची कालावधी | कार्यादेशापासून १२ महीने |
| निविदा फॉर्म फी | रू १०,०००/– |
| इसारा रक्कम | रू ७६,७०,०००/– |
| सुरक्षा अनामत रक्कम (चार समान रक्कमेची बॅक गॅरंटी) | रू १२,२७,२०,०००/– |

इतर अटी व शर्ती :

**उपरोक्त** फेरफाराच्या अधिन राहुन इतर सर्व अटी व शर्ती वर्ष २००३–२००४ मध्ये जकात अभिकर्ता नेमणेसाठी नमुद केलेल्या सर्व अटी व शर्ती जसेच्या तसे लागु करणेसाठी प्रस्तावित आहे.

**प्रशासनामार्फत** सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेण्याअगोदर वस्तुस्थितीवर चर्चा होणे आवश्यक असून ती पुढील प्रमाणे .

**दिनांक** २५/७/२००४ पासून जकात वसुलीचे काम महापालिका कर्मचा—यांमार्फत पार पाडण्यात येत आहे . दिनांक २५/७/२००४ ते ३१/३/२००५ पर्यंत झालेल्या वसुलीचा आढावा घेतल्यास तो पुढील प्रमाणे .

| अ.क्र. | कालावधी | दिवस | रककम |
|---|---|---|---|
| १ | २५/७/२००४ ते ३१/७/२००४ | ०७ | ९४,०६,५६४/— |
| २ | ऑगष्ट् , २००४ | ३१ | ४,७१,८५,७२८/— |
| ३ | संप्टेंबर, २००४ | ३० | ५,६१,२१,७६७/— |
| ४ | आक्टोंबर, २००४ | ३१ | ६,४०,१९,४३७/— |
| ५ | नोव्हेंबर, २००४ | ३० | ४,८१,९०,९९२/— |
| ६ | डिसेंबर, २००४ | ३१ | ६,२५,५९,७५७/— |
| ७ | जानेवारी, २००५ | ३१ | ५,७६,७५,७४९/— |
| ८ | फेब्रुवारी, २००५ | २८ | ५,०६,२२,८९७/— |
| ९ | मार्च , २००५ | ३१ | ५,३१,३३,७४३/— |
| | एकूण | २५० | ४४,८९,१६,६३४/— |

वरील प्रमाणे एक दिवसाची सरासरी वसुली रुपये १७,९५,६६६/— झाली असल्याचे दिसते .

<u>वर्ष २००५ — २००६</u>

महानगरपालिकेने वर्ष २००५ — ०६ करिता शहरात आयात होणा—या ८ वस्तुच्या जकात दरात वाढ केली. त्यानतंर दोन वस्तुच्या जकात दरात घट करण्यात आली.

काही वस्तुच्या जकात दरात करण्यात आलेल्या सदर वाढीचा शहरातील उदयोगधंदयावर विपरीत परिणाम झाले असल्याचे दिसते.

वर्ष २००५—२००६ मध्ये दिनांक १/४/२००५ ते २६/१२/२००५ पर्यंत झालेल्या वसुलीचा तपशिल पुढील प्रमाणे आहे .

| अ.क्र. | कालावधी | दिवस | रककम |
|---|---|---|---|
| १ | एप्रिल, २००५ | ३० | ५,१८,९१,४१३/— |
| २ | मे , २००५ | ३१ | ५,९१,७२,६७७/— |
| ३ | जुन, २००५ | ३० | ५,४८,६४,६५४/— |
| ४ | जुलै, २००५ | ३१ | ४,८१,१८,८११/— |
| ५ | ऑगष्ट, २००५ | ३१ | ५,३०,०३,५१२/— |
| ६ | संप्टेंबर, २००५ | ३० | ५,४८,१२,०७६/— |
| ७ | आक्टोंबर, २००५ | ३१ | ६,३२,४१,७९२/— |
| ८ | नोव्हेंबर, २००५ | ३० | ५,०४,४६,१७०/— |
| ९ | डिसेंबर, २००५ (दि. २६ डिसेंबर पर्यंत) | २६ | ३,८५,६४,९१४/— |
| | एकूण | २७० | ४७,४१,१६,०१९/— |

**वरील** प्रमाणे एक दिवसाची सरासरी वसुली रुपये १७,५५,९८५/— एवढी झाली असून वर्ष २००५—२००६ मध्ये एकुण उत्पन्न रुपये ६४,०९,३४,५२५/— होईल , हे स्पष्ट आहे .**त्यामधून** जर महापालिकेतर्फे आस्थापनेवर करण्यात येत असलेला खर्च रुपये २,६९,००,०००/— वजा केल्यास निव्वळ उत्पन्न फक्त रुपये ६१,४०,३४,५२५/— होईल, ही वस्तुस्थिती आहे .

**मागील** दोन वर्षात जकात वसुलीत टक्केवारी प्रमाणे झालेली वाढ याचा तपशिल पुढील प्रमाणे

| अ.क्र | वर्ष | रक्कम | टक्केवारी वाढ % | सरासरी |
|---|---|---|---|---|
| १ | २००२—२००३ | ५१.६५ कोटी | ८ % | ९.५% |
| २ | २००३—२००४ | ५५.७४ कोटी | ११ % | |
| ३ | २००४—२००५ | ६१.६७ कोटी | | |

वित्तिय वर्ष २००२ — २००३ मध्ये किमान देकार रक्कम रु. ५७.०० कोटी निश्चित करण्यात आली होती परंतु अंतिमरित्या अभिकर्त्याची निविदा रु. ५४.५४ कोटी मध्ये स्विकारण्यात आली.

तसेच वर्ष २००३ — २००४ मध्ये किमान देकार रक्कम रु. ६०.०० कोटी निश्चित करण्यात आली होती परंतु अंतिमरित्या अभिकर्त्याची नेमणुक रु. ५६.२५ कोटी मध्ये करण्यात आली. व शासनाने ही त्यासाठी मान्यता दिली.

**उपरोक्त** सर्व बाबींचा सखोल अभ्यास व शहानिशा करुन किमान देकार रक्कम ही वस्तुस्थितीवर आधारित असणे आवश्यक आहे असे आमचे मत आहे. तरी किमान देकार रक्कम व इतर बाबी पुढील प्रमाणे निश्चित करण्यात यावी असे प्रस्तावीत करण्यात येत आहे

चालू वर्षात झालेली रक्कम रुपये १७,५५,९८५/—
सरासरी वसुली गृहीत धरुन ३६५ दिवसांसाठी

| | | |
|---|---|---|
| अपेक्षित उत्पन्न ( १७,५५,९८५ X ३६५ ) | | ६४,०९,३४,५२५/— |
| नैसर्गिक वाढ ( १० % ) | | ६,४०,९३,४५३/— |
| किमान देकार रक्कम | | ७०,५०,२७,९७८/— |
| प्रती दिवस | : | रुपये १९,३१,५८३ . ५०/— |
| निविदा फॉर्म फी | : | रुपये १०,०००/— |
| इसारा रक्कम | : | रुपये ३,५२,५१,३९९/— |

(किमान देकार रक्कमेच्या ५ टक्के. )
(प्रशासनामार्फेत सादर केलेल्या प्रस्तावात नजरचुकीने
१ टक्के दराने नमुद करण्यात आल्याचे दिसते.)

| | | |
|---|---|---|
| सुरक्षा अनामत रक्कम | : | रुपये ११,२८,०४,४७६/— |

(किमान देकार रक्कमेच्या १६ टक्के. )
(चार समान बॅक गॅरटी कोणत्याही राष्ट्रीयकृत, शेडुयल्ड
किंवा सहकारी (को.ऑ.) बॅकचा )

| | | |
|---|---|---|
| कालावधी | : | कार्यदिशापासून एक वर्ष |

कामाचे स्वरुप व परिमाण लक्षात घेवून अभिकर्ता नेमण्यासाठी निविदेत खालील अटी व शर्ती आवश्यक राहतील.

१ नगरपालिका करिता शासनाने जकात अभिकर्ता नेमण्यासबंधी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती.

२ जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदाधारकास पुर्वीचा किमान एक वर्षाचा व एका वर्षात किमान ३० कोटी रक्कमेच्या जकात वसुलीचा अनुभव असावा.

३ जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदाधारकाने पुर्ण झाालेल्या लगतच्या मागील ३ वर्षात म्हणजेच वर्ष २००२ — २००३, २००३ — २००४ व २००४ — २००५ मध्ये प्रत्येक वर्षी किमान ३५ कोटी इतक्या आर्थिक रकमेची उलाढाल (Turn over) केलेली असावी व त्यासाठी ३ वर्षाचे लेखा परिक्षण करण्यात आलेले लेखा विवरण पत्र सादर करणे आवश्यक आहे.

४ जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदाधारकाची भांडवली स्थिती (Net Worth) किमान देकार रक्कमेच्या किमान ५ टक्के एवढी असावी व त्यासाठी २००४ — २००५ या वर्षाचे लेखा परिक्षण करण्यात आलेले लेखा विवरण पत्र सादर करणे आवश्यक असावे.

५ सयुंक्तपणे (Joint venture) सादर केलेली निविदा स्विकारण्यात येवू नये.

६ इसारा रक्कम निविदा सादर करण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या तारखेच्या एक दिवस अगोदर जमा करुन प्राप्त झालेल्या पावती, लिफाफा क्रमांक १ मध्ये सादर करणे आवश्यक असावे.

उपरोक्त सर्व अटी व शर्तीचा समावेश निविदा पत्रक तसेच जाहीर नोटीस मध्ये पुर्व पात्रता अट म्हणून करण्यात यावा. तसेच उपरोक्त सर्व अटी व शर्ती पुर्ण करणा—या इच्छुक निविदाधारंकासच निविदा पत्रक देण्यात यावे.

**स्थायी समिती ठराव क्रमाक ७३** **दिनांक : २८/१२/२००५**

**सुचकाचे नाव : श्री किशोर वनवारी**
**श्री नथु सोनवणे**

अनुमोदकाचे नाव : श्रीमती संगिता जावळे
श्री मोहन साधवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार आयुक्तांनी कार्यादेश दिल्यापासुन एक वर्षाच्या कालावधीसाठी महानगरपालिका क्षेत्रात जकात वसुलीचे काम अभिकरणामार्फत पार पाडण्यासाठी मान्यता देत आहे.

*परंतु ––*

१) किमान देकार रक्कम रु. ७०,५०,२७,९७८/– एवढी राहील.

२) महापालिकेला अशा अभिकरण व्यवस्थेसाठी राज्य शासनाने नगरपालिकांसाठी ठरवुन दिलेल्या अशा अटी व शर्तीशी सुसंगत असलेल्या अटी व शर्ती देखिल विनिर्दीष्ट करता येतील.

३) जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदाधारकास पुर्वीचा किमान एक वर्षाचा व एका वर्षात किमान ३० कोटी रक्कमेच्या जकात वसुलीचा अनुभव असावा.

४) जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदाधारकाने पुर्ण झालेल्या लगतच्या मागील ३ वर्षात म्हणजेच वर्ष २००२ – २००३, २००३ – २००४ व २००४ – २००५ मध्ये प्रत्येक वर्षी किमान ३५ कोटी इतक्या आर्थिक रकमेची उलाढाल (Turn over) केलेली असावी व त्यासाठी ३ वर्षाचे लेखा परिक्षण करण्यात आलेले लेखा विवरण पत्र सादर करणे आवश्यक आहे.

५) जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदाधारकाची भांडवली स्थिती (Net Worth) किमान देकार रक्कमेच्या किमान ५ टक्के एवढी असावी व त्यासाठी २००४ – २००५ या वर्षाचे लेखा परिक्षण करण्यात आलेले लेखा विवरण पत्र सादर करणे आवश्यक असावे.

६) सयुंक्तपणे (Joint venture) सादर केलेली निविदा स्विकारण्यात येवू नये.

७) इसारा रक्कम निविदा सादर करण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या तारखेच्या एक दिवस अगोदर जमा करुन प्राप्त झालेल्या पावती, लिफाफा क्रमांक १ मध्ये सादर करणे आवश्यक असावे.

सुचकाची सही :

अनुमोदकाची सही :

<u>सर्वानुमते</u>

सभापती / पिठासन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :–</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३** : उल्हासनगर–५ येथील बॅरेक नं. १८२४ व १८३२ जवळील शौचालयाचाव मुतारीचा विनियोग करणेकामी पूर्वीच्या स्थायी समिती ठराव क्र. २४, दिनांक ७/६/२००३ मध्ये बदल करणे.

<u>काही सदस्य :–</u>पास, पास ......

<u>मा. सभापती :–</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. ३** : उल्हासनगर–५ येथील बॅरेक नं. १८२४ व १८३२ जवळील शौचालयाचाव मुतारीचा विनियोग करणेकामी पूर्वीच्या स्थायी समिती ठराव क्र. २४, दिनांक ७/६/२००३ मध्ये बदल करणे.

*<u>प्रस्तावना :</u>*

श्री. मोहन साधवानी व अन्य व्यापारी यांचेकडून बॅरेक नं. १८२४ व १८३२ जवळील शौचालय व मुतारी तोडणेबाबतची मागणी प्रशासनाकडे प्राप्त झाल्याने कॅम्प नं. ५ मधील संबंधीत स्वच्छता निरिक्षक व प्रमुख स्वच्छता निरिक्षक यांनी पंचनामा करून सदर शौचालय व मुतारी नादुरूस्त असल्याने तोडणेबाबत प्रस्ताव सादर केला होता. त्यांस स्थायी समिती ठराव क्र. २४, दिनांक ७/६/२००३ अन्वये मान्यता देण्यात आली नव्हती.

सदरचे शौचालय व मुतारी ही नादुरूस्त असून वापरात नाही. तथापी सदर वास्तुंमुळे आजूबाजुच्या व्यापा—यांना दुर्गंधीचा त्रास होत असून सदर त्रास बंद करणेसाठी प्रस्तावित शौचालय व मुतारी निष्कासित करणे आवश्यक आहे.

तरी सदर मालमत्ता निष्कासित करणेसाठी व अन्य प्रकारे विनीयोग करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ प्रमाणे मान्यता देणे व त्याजागी सी.सी. पायवाटा बनविणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर शौचालय व मुतारी निष्कासीत करण्याच्या हेतुने पूर्वीचा स्थायी समिती ठराव क्र. २४, दि. ७/६/२००३ मध्ये अंशत: बदल करण्यासाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ७४</u> <u>दिनांक:— २८/१२/२००५</u>

सुचकाचे नाव :— श्री मोहन साधवानी
अनुमोदकाचे नाव :— श्री गणपत एडके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार पूर्वीच्या स्थायी समिती ठराव क्र. २४, दिनांक ७/६/२००३ मध्ये बदल करुन बॅ. क्र. १८२४ व १८३२, उल्हासनगर—५ जवळील महापालिकेचे नादुरूस्त शौचालय व मुतारी निष्काषित / विल्हेवाट करणेकामी मान्यता देत आहे व त्याजागी सी.सी पायवाट तयार करण्यास निर्देशित करीत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. आयुक्त :—</u> प्रशासनातर्फे आजच्या सभेत आयत्यावेळचा विषय म्हणुन एक प्रस्ताव आणला आहे, आपली संमती असल्यास तो आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करुन घेता येईल.

<u>मा. सभापती:—</u> सदरचा विषय सर्वानुमते आयत्यावेळचा विषय म्हणुन दाखल करुन घेण्यात येत आहे.

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

*<u>विषय क्र.. ४:— आयत्या वेळचा विषय:</u>*

उल्हासनगर—५ येथील प्रभाग क्रमांक.११ मधील बॅरेक क्रमांक.२१०८ जवळ समाजमंदिर बांधणे कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देणे बाबत.

---

<u>काही सदस्य :—</u>पास, पास ......

<u>मा. सभापती :—</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

## आयत्यावेळचा विषय

*विषय क्र.. ४:–* उल्हासनगर–५ येथील प्रभाग क्रमांक.११ मधील बॅरेक क्रमांक.२१०८ जवळ समाजमंदिर बांधणे कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देणे बाबत.

*प्रस्तावना:*

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेले काम करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन–२००५–२००६ च्या निधीतून काम करण्यास प्राकलने तयार केलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | प्राकलनिय किंमत |
|---|---|---|
| १ | उल्हासनगर–५ येथील प्रभाग क्रमांक. ११ मधील बॅरेक क्रमांक. २१०८ जवळ समाजमंदिर बांधणे. | ०५,००,०००/– |

उपरोक्त नमुद केलेल्या कामाच्या जागेवर जाऊन कनिष्ठ अभियंता व उप–अभियंता यांनी पाहणी करुन सदर प्राकलन तयार केले आहे. तरी सदर काम करुन घेण्यासाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळण्याकरिता स्थायी समिती सभेपुढे ठेवण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्रमांक. ७५** **दिनांक.२८/१२/२००५**

सुचकाचे नांवः– श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नांवः– श्री. राजु जग्यासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर–५ येथील प्रभाग क्रमांक. ११ मधील बॅरेक क्रमांक. २१०८ जवळ समाज मंदिर बांधणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाचे सही

अनुमोदकाची सही

<u>सर्वानुमते</u>

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

दुपारी १.३० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका